पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

७

शाहू व बाळाजी विश्वनाथ आरंभींच्या हालचाली

१७०७—१७२०

[किंमत— ८ आणे किंवा १० पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई

१९३१

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.


EARLY ACTIVITIES OF SHAHU AND BALAJI VISHVANATH, 1707-1720

These letters (41) give us an insight into the administrative activities of Chatrapati Shahu in his early years. The Maratha kingdom which at the time of his death extended from the Cauveri to the Ganges and the Jumna, comprised in the beginning of his reign a very small tract round Satara, threatened by Tarabai, the dowager-queen of Rajaram, on the South, and by the Mug[illegible] in the North and East. It was a delicate situation for the young Maratha nation, out of which Shahu steered very skilfully. The king, as is seen from this correspondence, is busy making new appointments, rewarding his adherents, sending out orders for the recovery of dues from the ryots and cautiously directing the movements of his troops. Many of the letters speak of the financial straits of the king, it being difficult at times to obtain supplies for the Royal kitchen (Letter No. 8). The country is still in an unsettled condition and reports of raids and disturbances on the part of Damaji Thorat, Chandrasen Jadhav and other Maratha and Mussalman Sardars daily reach the king. Many of the adherents of Tarabai are placated by grants of Vatans and Inams; clothes of honour are bought for an interview with the powerful Angria (Letters Nos. 14, 21).

Balaji Vishwanath who, towards the end of 1713, rose to the position of Premier (Peshwa) meets us as the Sar-Subha, Prant Poona, evidently under the regime of Tarabai. Though his motive for the espousal of the cause of Shahu remains a matter for conjecture he seems to be in the King's confidence, along with his brother Janoji from the very beginning, since a letter is discovered which asks Balaji not to fall out with Janoji for a colt, but to restore it to him. Another dispels the myth of the drowning of Janoji by the Sidi of Janjira. He is in Shahu's employment in 1708. The minister Balaji Vishvanath is busy going from place to place to see that order is restored everywhere, and appears to be active in the district of Khargon on his way South from Delhi in 1719. Chauth is also being recovered from the Mogul Subha in the south, that of the Nizam.

Two or three papers in this section are lists of important personages—e.g., Fatesing Bhonsle was married in 1719 and invitations were issued to many persons whose names are recorded, many of them veterans who had rendered valuable service to the Maratha cause in the war of Independence.

That Shahu triumphed over the overwhelming difficulties which confronted him on his return to the Deccan in 1707, almost without resources, appears from these letters to be due to his own tireless energy and unfailing tact. Evidently he was then a very different person from the indolent and eccentric monarch of later years.



Facsimile of the handwriting of Pantaji Shivdeo Soman, Shahu's Rajadnya (1727-28).

No. 1]

[आरंभींचा मजकूर फाटला आहे.]

९३५५ सरसुभा रा। बालाजी विस्वनाथ.
१४१४ सेनापति
६१७ हंबीरराऊ

२७७५१८÷

बाकी रुपये

४२३०२८≡

ता।

३९५२७॥= गांवगन्ना
२५४२ सिलक बाडली
४९९ दि॥ रामाजी हरी व * * जी जगथाप
१८४ कृष्णाजी व कासी हरी
७९८॥. मोरो यादव व मलारजी लगडा
१०६० खंडोजी सिंदे.

२५४२

२७२८= फाजील खत खंडोजी शिंदे.

४२३४५८÷

¶*A piece of account in which Balaji Vishvanath is referred to as Sarsubha.*

No. 2]

यादी पत्र येणेंप्रमाणें पत्र रा। बालाजी विश्वनाथ यासीं की राजश्री रुद्राजी विस्वनाथ यांजवळ तुमची घोडी सभर होती. त्यासी घोडी प्रसूत जालियावरी घोडी व सिंगरु तुमचे स्वाधीन केले. त्यासी एक वरीस जाले. हली तुम्ही नसतें तुफान केले की हे सिंगरु आमचे घोडीचे नव्हे, ऐसे म्हणोन सिंगरू मारचे घरी पाठऊन त्याचे घोडीचे सिंगरू नेले आहे म्हणून विदित जाले. तरी हे गोष्टी कार्याची नाहीं. हली आज्ञापत्र लिहिले आहे. तरी देखतपत्र याचे सिंगी याचे स्वाधीन करणें. फिरोन ये गो(ष्टी)चा बोभाट आलिया कार्यास येणार नाही ऐसे पत्र देवावे.

¶*This letter proves how intimately Shahu knew Balaji Vishvanath's family.*

No. 3] [2-8-1708

श्री

श्री
....
....
.... ॥ बालाजी
विश्वनाथस्य मुद्रा
* * विराजते

अजस्वारी राजश्री जानो विस्वनाथ * * मोकदमानी मौजे कोढीत का। सासवड प्रा। पुणे सु।। तिसा मया आलफ. पागेचा गला लोहगडी खा। करून ठेविला होता तो भाडे करून आणिला. त्यास भाडेपटी सिस्त मौजे मजकुरास रुपये ३५ पसतीस करार केले. त्यापैकी हाली बराबर मलू माहार मौजे मजकूर, रुपये १७ सतरा पाठविले ते जमा स्वारी मजकुरा असेती. रा। छ २६ जमादिलोवल.

लेखन
बार सिमा

¶*Janoji Vishvanath, brother of the first Peshwa, recovers from the village of Kodit the charges of bringing corn from Lohgad. This paper proves that Jano Vishvanath was in Shahu's service and used Balaji's seal. That he was drowned by the Siddi is not correct. It was Balaji's surety at the salt works, one Sambhajipant, that was so drowned.*

No. 4] [1709

श्री

हिसेबु प्रा। भागानगर सु।। असर मया अलफु तह गु।। रा. कृष्णाराऊ मलार रुपये ८००००० पैकी वसूल दि।। कृष्णराऊ

३०५५५२॥।.	ऐन वसूल रुजू जाबिता हरि कृष्ण
४००००	दरबार खर्च
२००००	जकायेतीवरी ऐवज
१२५०००	रा. मलार अंबाजीस आपल्या कर्जा * * यासी जाब बाकी * * दिल्ही. तो देविला ऐवज
७५०००	कवीलास माहलपैकी
५६५५५२॥।.	

३

११६५४० रदबदली कलमें.

४००० मेलगिरी
१३२१५ मकरडी.
७००० रामरडी
८७५० हतीबा.
१२७५ बा घोडे
४००० प्रवलचनेर
८००० अतीक्रहर
१००० गुड्डुर
६००० टकमाल
१००० * * *
२७०० * * *
५००० कोटपली
५१०० कोउर
३०० अकलकोटा
१५०० पोटदूर
२१००० कलपदूर.
३००० तुपळाणा
२००० गंजवेल
५००० सूगुर
१६६४० ———
———
११६५४०

———
६८२०९२॥.

बाकी. ११७९०७।.

सदरहू पैकी पनास हजार पावतो साल मजकुरी वसूल घेतला आहे म्हणून * * * * * लक्ष देविले होते. त्या पैकी रुका पाठवला नाहीं. हुजूर लक्ष देविले होते त्यापैकी गोदाजी निंबालकर याचे गुजारतीने दाहवीस हजाराची विले करून दिल्ही. त्या पैकी तीस हजार पावेतो वसूल होऊन आला म्हणून ऐकतो. गोदजी निंबालकराची भेटी होऊन वर्तमान कले(ल) तेहि लिहिले जाईल.

¶*This little account shews the dues which Shahu had to receive from the Bhaganagar District so early as 1709 probably on account of the Chouth.*

No. 5] [29-10-1709

श्री

श्रीउमाकांत
पदांभोजभजनाप्त
समुन्नते ॥ बालाजी
विश्वनाथस्य मुद्रा
विजयतेतराम्

आज्ञापत्र राजश्री बाळाजी विस्वनाथ ता। खोतू मौजे सोमेस्वर ता। हरचिरी सु॥ आशर मया आलफ. मौजे मा।रपैकी रुपये १०० येकसे राजश्री दताजी आंगरे याकडे देविले आहेती. मौजे मा।रपैकी आदा करणे. उजूर न करणे. पावलियाचा जाब घेणे, जाणिजे छ ६ रमजान.

मोर्तब
सुद.

¶*Balaji Vishwanath, not then the Peshwa, orders Rs. 100 to be paid to Dattaji Angre, who appears to be a relation of Kanhoji.*

No. 6] [1710 ?

श्री

यादी

रा। बालाजी विस्वनाथ सैनाकर्ते याकडे वरात रुपये २०००
दोनी हाजाराची देवराव भोसले यास देविली पाहिजे.

देणे

मौजे लोणद ता। नीरथडी पा। पुणे येथील बाबतीचा मुकासा देवराव भोसले याकडे देविले पाहिजे.

१ देणे

¶*Shahu's financial arrangements.*

No. 7] [1708—1711

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री अंताजी
त्रिमल गोसावियासी.

सो गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि नमस्कार उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे विशेश. श्रावण वद्य दसमीस श्राध आहे. त्यास ब्राम्हणास द्यावयासी धोत्रजोडे पाहिजे. तरी तुम्ही धोत्रजोडे सुमार २५ पंचवसि किं॥ रु॥ दीड पावणेदोन सवादोन अडीच यैसा किमतीचे धोत्रजोड खरीदी करून सत्वर पाठवणे; येक क्षणाचा दिरंग न लावणे. या कामास लखमोजी चवाण व रायाजी पवार अफराद दि॥ लबे पाठविले आहेत. यासी वेतनात रुपये ४ च्यार रास देविले असे. आदा रुपये तुम्हाकडे यैवज नेमिला आहे त्यापैकी देणे. सदरहू धोत्रजोडविशी खोलंबा होऊ न देणे. जाणिजे रा॥ छ १४ जमादिलाखर बहुत काये लिहिणे

बार

¶*The Pratinidhi orders for Shahu 25 pairs of dothirs for some anniversary. Whose can it be ?*

No. 8] [1708—1711

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री आंताजी त्रिमल गोसावी यासी. सेवक गदाधर प्रल्हाद प्रतिनिध नमस्कार. येथील कुषळ जाणून स्वकुशललेखन करणे विषेश. हुजूर राजश्री स्वामीच्या मुदबखाकडे बकरी खा॥ गु॥ सेटी खाटीक मी॥ (?) देणे. पैकी तुम्हाकडे पेशजी रु॥ १५० दीडसे सादर आहे. त्यापैकी तुम्ही पाऊणसे रुपयेची वरात तोडिली आहे म्हणोन खाटीकमजकूर याणी विदित केले. यैसियासी मुदबखचे काम रोजबरोज नाजुक लागले आहे. पैका न पावता काम बंद होऊन हुजूर बोभाट आला आहे. तरी हाली सेटी खाटीक तुम्हाकडे आला आहे तर याचे पदरी पाऊणसे रुपये आताच घालणे, आणि पाऊणसेची वरात तोडिली आहे त्यास ताकीद करून तेहि पाऊणसे पावणे. अनमान न करणे छ १६ जमादिलाखर. बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*Gadadhar Pralhad Pratinidhi orders Antaji Trimal to pay Rs. 75 to the butcher who supplies mutton to Shahu's kitchen.*

No. 9] [1708—1711

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री अंताजी त्रिमल गोा यासी सेवक गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी नमस्कार. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे. विशेष. हुजूरपागेकडे पखला पाहिजेत तरी २ बैल पखलासुगा सिताबीने पाठऊन देणे. येके घडीचा उजूर न करणे. जाणिजे. या कामास जोत्याजी कदम व संकराजी कापशा अफराद पाठविले आहेत. यास वेतनात दर रुग २ यागे च्यार रुपये रास आदा करणे. छ १० जमादिलाखर बहुत काये लिहिणे.

(लेखन सीमा.)

¶*Gadadhar Pralhad was removed from his office in 1711. He is busy equipping Shahu's army.*

No. 10] [23-2-1711

श्री

स्वस्ति श्री राज्याभिशक शके ३७ विक्रतिनाम संवछरे माघ सुध पूर्णिमा भौमवासरे क्षेत्रियेकुलावतंश श्रीछत्रपती स्वामीचे सेवेसी सेवक आमरसिंग वलद बाहादूरसिंग बारगीर सेवक राजमंडळ लिहून दिल्हे जमानपत्र यैसेजे. स्वामी कृपाळू होऊन राजश्री रघुनाथसिंग बिन जयेसिंग रजपूत यांसी सतसहश्री सेना सिलेदारीची सेवा सांगोन जमानाविषीं आज्ञा केली त्यासी आपण जमान आसो.

(श्री ० शाहूनरपतिहर्षनिधान मोरेश्वरसुत भैरव प्रधान.)

(श्री आई आदिपुरुष श्री राजा शाहु छत्रपती स्वामी कृपानिधि तस्य परशराम त्र्यंबक प्रतिनिधि.)

मााइल गैरहजीर जाहालियां आपण हजीर करू. हजीर करूं न सको तरी माार-इलेच्या तालुकातीचा जाब करूं. हे जमानपत्र लिहून दिल्हे सही. लेखनालंकार

रुजू

तेरीख १४

जिल्हेज सुाा ईहिद

अशर मया व अलफ

सुरुसुद

अस्पष्ट.
शिका

¶*A Rajput Raghunathsing, son of Jaysing, was appointed to provide and command seven thousand troops by Shahu. This shews that Rajputs from the north accepted Shahu's service.*

No. 11] [*23-7-1711*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री अंताजीपंत गोसावी यास, सेवक गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी नमस्कार उपरी. येथील कुशल जाणून कुशललेखन करणे विशेष. तुम्हाकडे मोधीचा यैवज दरमाहे नेमिला आहे त्या यैवजपैकी बद्दल-देणे वेतनात गोविंद राम खरिदी जिसनीध (?) राजश्री स्वामी रुपये ५० पनास रास देविले असेत. प्रविष्ट करणे. छ १७ जमादिलाखर सुहुर सन इहिदे अशर मया अलफ. बहुत काय लिहिणे.

शिका

¶*Gadadhar Pralhad asks Antajipant to make a payment of Rs. 50 for things purchased.*

No. 12] [*1-10-1711*

श्री

माहाराज राजश्री छेत्रपती स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक संताजी जाधवराऊ सेनापति विज्ञापना. ताा छ २८ साबान स्वामीचे कृपादृष्टीकरून

वतमान येथास्थित असे विशष. स्वामीनी वेचास मोहरा ३० तीस पाठविल्या त्या पावल्या. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

शिक्का.

¶*Dhanaji Jadhao's son Santaji was Shahu's Senapati for a short time in 1711-12. He acknowledges receipt of 30 mohors.*

No. 13] [*11-10-1711*

(शाहू दप्तर रुमाल ५५ पैकीं.)

जाबिता जमा पैदास्त बाबत स्वारी मौजे किंवळ ताा उंबरज सुाासन इसने अशर मया व आलफ. मौजे मजकुरीं हरामखोराकडील व्यासराव यांचा कबिला धरून आणावयाकरितां स्वारी पाठविली होती. त्यांनीं त्याचे निसबतीचे कबिले धरून त्याजवळ घेतले ते आणिले व स्वारीस लोक गेले होते त्यांचा हरवजा झांडा घेऊन किरकोळी चिंदीचोळा सांपडला ते देखील जमा केले छ ९ रमजान. बिाा रुपये ५६२।≈ बाबत जिनस एकून पांचशे सत्रा बासष्ठ चवल रोख येक अस्त्र रोख दागिने सुमार १० दाहा रोख [याखालीं सर्व जिनसांच्या किमतीसह यादी आहे. तसेंच या तारखेच्या जमाखर्चांत आवजी नीळकंठ व महादाजी यमाजी यांचा उल्लेख सभासद म्हणून आहे. आवजी नीळकंठ हा पेशव्यांचा चिटणीस व महादाजी यमाजी हा सखाराम बापू बोकील याचा चुलत आजा. शाहूचे आरंभीं हे गृहस्थ त्याचे दरबारीं होते.]

¶*This paper singularly corroborates the incident of the deer which being pursued by Piraji Raut was sheltered by Vyasrao, a clerk of Chandrasen Jadhao, the Senapati of Shahu. The incident resulted in the desertion of the Maratha cause by Chandrasen.*

No. 14] [*24-10-1711*

श्री

दरबंदगी माहाराज राजश्री छत्रपति
साहेबांचे बंदगीस.

दाा बेाा रायाजी बिन लखमोजी जाधव मोकदम मौजे भोईज साा निंब पाा वाई सुाा इसनेअशर मया अलफ कारणे साहेबाचे बंदगीस लहून दिल्हा कबूल-

कतबा ऐसाजे. साहेबी सेरीकरास हुजूर बोलाऊन तोहमत लाविली+ कीं तू थोराताकडे चाकरी करून होतास. थोरात मार हरामखोर जाहले. तूं गुन्हेगारी देणे म्हणून तगादा आपणांस लाविला. मग आपले बाहे देशमुखे[1] देसकुळकर्णी[2] पा मार यानी इलतमस[3] केली कीं पटल मार थोराताचे चाकर होता खरे. परंतु चंद्रसेन व थोरात हरामखोर होऊनु पांडोगडासी जुझत होते ते प्रसंगी आपले गावी पटल मार राहून रयेतगिरीने होता. हली साहेबी गुन्हेगारीचे हुकूम त्यास केला तरी सेरीकर दिवाण नफर आहे त्याचे मवसर पाहून जीवनमाफीक टका सिरी ठेविलियाने उगवणी करून पेस्तर गावी राहून कीर्दीआबादानी दिवाणकिफायत करील म्हणून इलतमस केली. बराये इलतमतस देसमूख व देसकुलकर्णी साहेबी खातरेस आणून सेरीकारावरी कृपाळू होऊन कुल तकसीर माफ करून आपले जीवनमाफीक खंड आपले सिरीं ठेविला तो आपण खुषरजा कबूल केला. त्याची उगवणी करून देऊन. रुपये साहजार यो बेरीज रो ६०००

तेरीख २२

रमजान

निमनागर

साक्ष

सिवजीपा मौजे आरफळ सभाजी पा मौज तुगी.

सा निब

¶*The letter refers to the rebellion of Damaji Thorat and Chandrasen Jadhav.*

√*No. 15*] [*1712?*

श्री.

यादीदास्त राजश्री संभुसिंग जाधवराव यांचे पत्राचा अशय कलमे पा पाथरी वगैरे माहाली पेशवे यांची फौज जाताना गेली, त्यामुले कमावी(स)दार कोणी करीत नाहीं आणि कर्जवामहि मिलत नाहीं. तर साहेबी काही मदतखर्च देवावा. कलम १; व कलबरगे वगैरे माहाल पाच याच्या ताकिदाही प्राप्त होत नाही त्या आज्ञा करून देवाव्यां. कलम १

¶*Shambhusing Jadhav, son of Dhanaji, was Shahu's active supporter, after his brother Chandrasen's desertion in 1711, and sends his terms to Shahu.*

\+ येथें उजवे बाजूस शिक्का. १ बिहुजूर जोत्याजी केसरकर अजहत देसमुख पा वाई.
२ बिकलम. गिरमाजी झुंगो देसकुळकर्णी पा वाई. ३ विनंती.

No. 16] [17-1-1712

श्री

स्वारी राजश्री राज्याभिषकशके ३८ खरनाम संवत्सरे पौष बहुल पंचमी गुरुवासरे क्षत्रियकुलावंतस श्रीराजाशाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री कृष्णाजी

(शिक्का) (शिक्का)

बलाल देशाधिकारी व लेखक प्रांत सातारा यास आज्ञा केली येसीजे. प्रांत मजकुरी मोगलाकडील पटी करून दिली आहे त्या * * * * बिलाकुसूर वसूल करून त्याकडील कमावि- * * आहेत त्याकडे पावणे लेखनालंकार

(मर्यादेये विराजते)

¶*Shahu orders Krishnaji Ballal to collect dues for the Moguls from the district of Satara.*

No. 17] [30-9-1712

रा॥ रोजकीर्द

सु॥ सलास

दि॥ मजमू छ ९ रमजान

कि॥ सनद इनाम नीळकंठ बलाल यास; राजश्री आबुराऊ याकडे जमावाचे बेगमीबदल तुम्हाकडून रुपये ५००० देविले ते पाविले नाहीत. हली या पैकी हुजरून त्याकडे देन्हे १६०० तो ऐवज हूजूर पाठवणे. या कामास बालोजी कापसा व गुणाजी सिंदा नि॥ दर्याजी ना॥ पवार यासी मसाला रुपये—

१० बालाजी कापसा

१० गुणाजी सिंदा

२०

¶*An order upon Nilo Ballal to pay into Government treasury Rs. 1,600.*

802

No. 18] [30-1-1713 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत आमात्य स्वामीचे
सेवेसी

सेवक कोनेर वेंकटेश साा नमस्कार विनंती उपर. सेद सेखमिरा याच्या निसबत राऊत त्याचा घोडा लाखपुरीवरी पडला म्हणोन आपणासी तगादा केला. त्यार्चा मुनसीबी[१] स्वामीकडे आली. त्याचा करीना मनास आणिता निर्व्हा गोही वरी आला. त्याची गोही रा. कृष्णाजी बलदेव, संताजी जाचक व सिउजी गरुड याजला शपतपूर्वक पत्र स्वामीचे जागे आणि त्यानी आपले बेतालीस स्मरोन गोही लेहून पाठविली कीं सेखजीचे राऊत लाखे(दु)रीच्या दांडगियाबराबर आले होते. त्या जुंझामधे घोडे पडले तरी दावा आपणाकडे नाही. अगर पत्र त्याचे आले कीं राऊत दांडगियाबराबर नवते. हे निराले आले होते. जुंझात नवते. येकायेकीं याचा घोडा मारिला. यैसे आले. तरी घोडीयाचा जाब आपण करून ब मनसुबी वराडात अजम नुरखानी दिाा साहेबसुभा व रा. दामाजीराव दिवाण याचे विद्यमाने निवडून त्याचे पत्र सेवेसी पाठऊन देऊन. हे तेथे फैसल रुबरु याचे न जाले तरी त्रिवर्गाची पत्रे हूजूर पाठऊन देऊ. मग आखेरसाली स्वामीच्या विद्यमाने जें चुकणे ते चुकऊन ताा १४ मोहर सुाा सलास हे विनंती.

गो

त्रिंबकराउ धायगुडे	रामजीपंताजी मजमदार
आपाजी गोसावी	बाबती प्राा वराड

¶*Konher Vyankatesh undertakes to repay the price of a horse that was killed.*

No. 19] [19-8-1713

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके ३९ नंदन संवत्सरे भाद्रपद सुध नवमी भृगुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाशाहु छत्रपति याणी राजश्री माणको बापूजी यांसी आज्ञा केली येसीजे.

१ निवाड्याचें प्रकरण.

तुम्ही खासगीचा धंधा करीत असता कारभारासमध्यें राजश्री यादव गोपाल यांचे विद्यमाने स्वामीचे बेहड्याकडील तुम्हाकडे कर्ज रु ४२०० च्यार हजार दोनीसें यावे यापैकी वसूल रु ३००० तीन हजार आले. ते मुजरां तुम्हास राजश्री आनंदराऊ माहादेव यांचे विद्यमाने वजा होऊनु बाकी रु १२०० बारासे उरले, तो येवज कसबे इंदापुरावरी खासगीच्या येवजी बाकी आहे. तो येवज वसूल घ्यावा येविसी आज्ञा केली आहे ते वसूल घेतील. तुमचा कतबा बेहड्याकडे आहे तो देविला आहे. घेणे. याउपरी बेहड्याकडील कर्जाचा तगादा तुम्हास होणार नाही. जाणिजे लेखनालंकार.

¶*Shahu pays Manko Bapuji portion of the debt due to him, on account of his dealings with Yado Gopal and Anandrao Mahadev.*

/*No. 20*] *[9-7-1714*

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यांसी.

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो दावलजी सोमवंसी रूस्तुमराऊ समसेरबहादर दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये वैभवलेखनआज्ञा केली पाहिजे. हुजूरची लग्नपटी आम्हाकडील माहाल बिताा

१ चांदवड
१ दिंडोरी
१ सोनगीर
१ बाबल
१ भडगाव
१ उतरायेण
१ अडावद

७

येकून माहाल सात. याजवर एकरार यैवज रुपये ४५०१ साडेच्यार हजार. पैकी निमे यैवज सालमजकुरी जेस्ट मासी रुाा २२५० साडेबाविससे घेऊन निमे राहिले ते पेस्तर साली देऊ. अतर न पडे. विशेस काये लिहिणे? कृपा निरंतर असो दिल्ही पाहिजे. सुाा आर्बा असेर मया व अलफ छ ७ रजब्र. हे विनंती.

¶*Dawalji Somvanshi to the Peshwa : undertakes to pay the amount of the marriage cess from the seven districts in two instalments.*

No. 21] [8-11-1714

श्री

माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेशी.

विनंती सेवक आज्ञाधारक बसवंतराऊ कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान तागायेत कार्तिक शुध त्रयोदशी भोमवासर पर्येत येथास्थित असे विशेष. स्वामीनी आबाजी बाड याजबराबर आज्ञापत्रे सादर केली की रा। कान्होजी आंगरे याचे भेटीचा प्रसंग आहे तरी सनगे तुरे व पदके येका दो प्रतीची याद पाठविली आहे, त्याप्रमाणे सिध करून पाठवणे. त्यावरून थोडीबहुत माहाली जे वस्ता होत्या त्या व आनिखी खरिदी करून शेवेसी पाठविल्या आहेत. त्याची माहालीची बखैर व सनगाप्रमाणे बजिनस जाबिता पाठविला आहे, त्याप्रमाणे पावलियाचे उतर द्यावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर दर्शनाचा प्रसंग दिसगतीचा देखिला या करितां सनगे पाठवावयाचा अनमान केला होता, परंतु मागती समागम यैसा नाहीं, या करिता पाठविली असेत. तरी बजिनस स्वामीनी ज्या प्रसंगास आणविला आहे तोच प्रसग संपादिला पाहिजे. याउपरी येसा जिनस माहाली व खरीदीहि समई मिलणार नाही या करितां सेवेशी सूचना मात्र लिहिली असे. स्वामी सर्वज्ञ आहेत आपण शेवक आज्ञाधारक आहो ह विज्ञाप्ति.

¶*Basvantrao Khoja, a trusted servant of Shahu, informs him of his having arranged dresses for presentation to Kanhoji Angre when he comes to visit the King. This is the first visit of Kanhoji Angre to Shahu, after he was conciliated by Peshwa Balaji Vishvanath in his well-known negotiations of 18th February 1714.*

No. 22] [8-12-1714

[आरंभीचा मजकूर फाटला आहे.]

सिका

व कारकून वर्तमान भावी ता। नाणेमा (वल) * * * * * विश्वनाथ प्रधान सु॥ खमस अशर (मया) (अ)लफ वे॥ राजश्री बापूभट बिन कृष्णभट मोघे मुद्गल गोत्र सूत्र आश्वलायन वास्तव्य पेठ लोहोगड, हे वेदशास्त्रसंपन्न बहुत थोर ब्राम्हण, स्नानसंध्यादि षट्कर्मे आचरण करून राजश्री स्वामीच्या राज्याचे कल्याण चिंतून आहेत. हे लोहोगडचे प्रसंगात अनुष्ठान करून अभिवृद्धि केली. पुढे राजश्री स्वामीच्या राज्याची अभिवृद्धि चिंतून आहेत. याचे कुटुंब चालविले पाहिजे. याजकरिता यास इनाम.

¶*Balaji Vishvanath confers inam on a Brahmin Bapubhat Moghe.*

No. 23] [1715 ?

श्री

तेरीज सेनापति सन खमस

४३२९०	हूजूरपागा
३४९०००	मोघम संरजाम
७८००	कारकून
२००७०	खासा वेतन
६२९०	फुट सिलेदार
३०९०	सिपाई हुजुरात
९४३००	सुभा संताजी जाधवराव
१८९९०	सुभा चंद्रसेन जाधव
१२७२९	सुभा रामाजी घाटगे
३९९९०	सिवाजी जाधवराव
२८२९	विठोजी खताल
१३९००	भुजबलराव काकाजी
३०७००	गणूजी कोलेकर
३९००	जागोजी रुपनवर
४०९०	सेटियाजी व जागोजी रुपनवर व येमाजी माहार्णवर
२२८००	सुभा पदाजी बांडगर
१०८००	पाा रुपनवर माहर्णवार
११००	सिदोजी रुपनवर
१०००	रामोजी बेलदार
९००	सयाजी जगथाप
९०००	कासोजी मोरोजी जगा
३०९००	वणगपाल निंबालकर
९४००	साबाजी भोसले
९४००	पिराजी वागमोडे
१८९००	खानाजी व मुधोजी बांडगर
३९००	सितोले मोरवालके
१६०००	सभाजी व खानाजी बांडगर
२३०००	मुधोजी बेलदार

२९०० भिवजी चव्हाण
९००० रामराव खराडे
३०३०० राणोजी माने
३७०० सताजी पवार
९०० संभाजी नलवडे
१८३७९ सताजी बिन बाजी भोंा
४१९०० तुळाजी घाटगे
७०० सिदोजी बिन कोडंर्जी
६४४० राणोजी यादव
२९९० सुकमाजी यादव
१३०० दताजी भोसले
२३४०० भिकाजी कोकरे
१०००० फत्तेखान भोसले
२०० सिवाजी सालोखी
३७०० माधवराव कृष्णाजी घाटगे
१२९० जानोजी गिरजोजी भोसले
१४१०० रायाजी मल्हार
४७९० मिताजी सेडगे
४३०० वाघोजी कदम
४९७९ सिवाजी धुलोजी ठेवी
८०० तुळाजी जाधवराव
६३२९ संताजी समसेर
१३३२९ मानाजी दरेकर
४९०० बहिरजी गोडे
१०२०० देवजी सताजी खेडकर
७९० सर्ज्याराव पवार
३९७९ राणोजी सिंदे
६८०० धुकोजी वागमोडे
१२३९० शाहजी सिंदे
९००० मेसजी कोळी
११००० हिरोजी सोनवलकर
६९६०० अंबरोजी व बालोजी पांढरे

३९५०	गुणाजी अविचार
५२५	रामाजी बाजी
४६५५०	त्र्यबंकजी ढमढेरे
४४७००	अबा दाजी सेडगे
३०५०	शंकराजी फर्जंद
११७००	अपाजी अश्वाजी सोनवलकर
४८४५०	तुलाजी गिरजोजी सोनवलकर
१२९८३५०	

¶*An abstract account of Rs. 12,98,350 rendered by the Commander-in-chief.*

If this paper be correctly dated, it gives many important names in Shahu's employ. Their families and descendants can therefrom be conveniently traced.

No. 24] [*26-3-1715*

श्री.

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४१ मन्मथ सवत्सरे चैत्र शुध त्रितीया मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहु छत्रपति स्वामी यांणीं राजश्री देवजी यादव यासी आज्ञा केली ऐसीजे. श्रीच्या दर्शनास स्वामी जात आहेत. समागमे जमाव असिला पाहिजे. याकरिता पत्रदर्शनी स्वार होऊन जमावानसी येणे. या कामास बहिरजी भोसला, रामजी पवार नि॥ कृष्णाजी नाईक * * यासी रुा १ एकून दोनी रास देविले, आदा करणे. जाणिजे बहुत काय लिहिणे.

(मर्यादेय विरा)

बार सुरुसुद बार.

¶*Shahu's visit to some celebrated temple (Jejuri ?)*

No. 25] [*12-9-1715*

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके ४२ मन्मथसंवत्सरे भाद्रपद बहुल येकादसी इंदुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाशाहु छत्रपति याणी राजश्री जगदेवराव निंबालकर मुद्राधारी व कारकून किले महिमानगड यांसी आज्ञा केली ऐसीजे. हुजूर लोकांचे प्रयोजन आहे याकरितां लोक किले मजकूर पैकी २५ पंचवीस आणविले आहेत. तरी बेरड व मऱ्हाठे मिलोन सदरसरनोबताबराबरी देऊन सिताबीने पाठवणे. या कामास लखमोजी सावत दिमती खुदेचाकर यासी रु १ यक रास देविले असें अदा करणें. जाणिजे लेखनालंकार.

¶*Mahimangad is near Satara. This paper contains an order of Shahu to Jagdev Nimbalkar to send 25 men.*

No. 26] [*9-8-1716*

श्री.

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४३ दुर्मुखनाम सवछरे भाद्रपद शुध त्रितिया गुरुवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्य धुरधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रधान यांसी अज्ञा केली ऐसीजे. बदल देणे वेतनात राघो रखमांगद सभासद राचा चाकर किले मजकूर

[त्याच कागदाचे पाठीवरचा मजकूर]

श्री

नावनिसी जासूद रा कागद चंद्रसेन जाधवराव देऊन जाब घेऊन देणें जी दर्याजी

६ राणोजी पारख
६ जोत्याजी चव्हाण

१२

छ १६ जिल्हेज.

¶*Some notes of Shahu about payments to certain officials.*

No. 27] [1717—1718

श्रीभार्गवराम

माहाराज राजश्री छत्रपती स्वामीचे
शवसी.

विनती शेवक आज्ञाधारक पंताजी सिवदव कृतानक विज्ञापना विनती. माहा राजाचे कृपाद्रुस्टीकरून या प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे. विज्ञापना. माहाराजाचें आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की सरदारखान बागडियाचे दीडसे रुपये पैकी पनास रुपये पावले, सेभर रुपये राहिले ते पाठवून देणे म्हणून आज्ञा. ऐसियास जिल्हे कुल खराब थोराताचे उपसर्गामुळे व शामलाचे उपसर्गकरिता देश मावले उद्वस जाली. दोन रुपयाचा यैवज येईना. हुजूरची रवासुदगी तो वारणे अगत्य म्हणून चिचवडीहून सावकाराचे कापड आणून बराबर सिदोजी सालखी तिवटे १३ येकूण कि।। रु।। ९५ पंच्याणव पेसजी पनास रुपये रसद व पाच रुपये त्याजकडील लोकास खर्चास दिल्हे येकूण दीढसे रुपये सरदारखानाचे पावले. शेवेसी स्रत जाल पाहिजे हे विज्ञापना. या खेरीज सावाजी सालखी यास रु।। ५ पाच मसाला पांवला. विदित जाल पाहिजे हे विज्ञापना.

¶*Pantaji Shivdev Soman writes to Shahu of his having paid Rs. 150 to Sardar Khan. Pantaji Shivdeo was appointed Rajadna in 1727 in succession to Naro Ram. The whole letter is in Pantaji's hand and shews how distracted Shahu's situation was in his early career.*

No. 28] [1718 ?

श्री शंरा(क्रा)जी मल्हार यासी कितेक राजकारण प्रसंगास पाठविले आहेती. त्यास मुख्य तह ऐसा की, नर्मदेपासून रामेपर्यंत जितुका देश आहे तितुका देश स्वामींचे स्वाधीन करावा, आणि कौल मुलुकास देऊन मामुरी करावी. स्वामीच्या लस्कराचा उपद्रव जो मुलुकास लागतो तो लागो न द्यावा. रयत नादवावी. गडकोट कुल स्वामीचे स्वाधीन करावे.

¶*This paper contains the draft of terms suggested by Shahu to be obtained from the negotiation conducted by Shankraji Malhar with Syed Hussein Ali. The final treaty is given by Mavji and Parasnis.*

No. 29] [9-1-1718

श्रीनकल

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री सिवाजी
चिंतामणी फडणीस पो सुपे गोसावी यासी

सेवक बाळाजी विश्वनाथ प्रधान नमस्कार सुा समान आशर मया आलफ. काा सुपे येथे माहाराज राजश्री स्वामी याणी आम्हास राहावयास आज्ञा केली आहे. त्यास कोटाची मजबुदी व पाणी कसे आहे हे तपसीलवार जानोजी जासूद पाठविला आहे तरी याजबरोबर लेहून पाठवणे. जाणिजे छ १७ सफर आज्ञा प्रमाण मोर्तब असे.

¶*Balaji Vishvanath is allowed by Shahu to make his residence at Supa.*

No. 30] [10-11-1718

श्री

श्री
राजा शाहु नरपति हर्ष-
निधान बाळाजी विश्व-
नाथ मुख्य प्रधान.

दाा माो मोकदम व समस्त रयां काा तळेगौ ताा पाबळ साा जुनर सुा तिसा आशर मयां आलफ सन ११२८ साहेबाचे सेवसी कतबा लेहोन दिधला यैसाजे. साहेबी हुजूर बोलाऊन आज्ञा केली की सालमाराकारणे काा मारची खंडणी मुशकस[1] करणे म्हणौन आज्ञा. त्यावरून गावाची हकीकत. धामधुमे करितां काही हाल राहिला नाही. रयेतीची नातवानी. पीक कमतर, म्हणौन आर्ज केला तो साहेबी खातिरेसी आणौन रयेतीवरी नजर देऊन जमाबदी जिराइत व बागाइत

---

१ निश्चित.

काली पाढरी कुलबाब कुलकानू साल तमाम खडणी मोकरर केली ते कबूल असो. उगवणी करून.

मो जमा — रुो

३००१

येकूण तीन हजार येक रुपये रास.

ता

२५०१ इनाम खंडणी

२००१ यैन

५०० स्वारीखर्च वगैरे

२५०१

४०० सरदेसमुखी

१०० साहोत्रा

३००१

तेरीख २७ जिल्हेज — माहे जिल्हेज

बार सुरुसुद बार

¶*Balaji Vishvanath fixes the revenue of Talegaon (Dhamdhere).*

No. 31] [*30-12-1718*

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके ४५ विलबी संवत्छरे पौष्य बहूल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी विनती सेवक निरजन तुबाजी मुतालीक मजमू दिा राजश्री

श्री
राजा शाहु छत्रपतिहर्ष-
निधान बाळाजी विश्व-
नाथ प्रधान.

श्री
श्रीआई आदिपुरूष श्रीराजा
शाहु छत्रपति स्वामि कृपा-
निधि तस्य श्रीनिवास
परशुराम प्रतिनिधि.

होनाजी अनंत सेनाकर्ते सेवेसी विज्ञापना. स्वामीनी कृपाळू होऊन राजश्री विठल

कृष्ण यासी राजश्री भिकाजी काकडे याची मजमू सागितली त्यास जमानाची आज्ञा केली त्यावरून मारानिलेसी आपण जमा [न] आसो. जाये पले तरी हाजीर करून देऊन. हाजीर न करू तर त्याचे तालुकातीचा जाब करून देऊन. हा सेवेसी लिहून दिल्हा जमानकतबा सही. लेखनालंकार रुजूसूरू सा॥

निवीस मत्री

तेरीख १८
सफर सुा॥ तिसा.

बार सुद सुरुसुद बार बार

¶*Shahu appoints Vithal Krishna, Majumdar of Honaji Anant.*

No. 32] [*14-3-1719*

श्री

० श्री
राजा शाहु नरपति
हर्षनीधान बाजीराव-
बल्लाल प्रधान.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता॥ मोकदमानी मौजे केटारे पा॥ खरगोण(?) सुा॥ तिसा असर मया अलफ. लस्कर या प्रांते आले आहे तर देखत आज्ञापत्र मोकदम भेटीस येणे. मौजे मजकूरचे रखावालीस स्वार दिमत राजश्री बालाजी विस्वनाथ पाठविले आहेत यास रुपये ५० पनास देणे. जाणिजे छ ३ जमादिलवल आज्ञा प्रमाण

लेखन
सीमा.

¶*Balaji Vishvanath makes an expedition into Khargon.(?)*

No. 33] [9-6-1719

[स. १७१९ च्या ज्येष्ठात फतेसिंग भोसले अकलकोटकर याचें लग्न झालें त्या वेळची हयात मंडळींची यादी].

खर्च तशरीफ

लग्न फतेसिंग छ १ साबान

कारकून व बाजे

	तिवटे	शेले
माहदाजी गदाधर सुमंत	१	१
खंडोबा चिटनीस	१	१
दादोबा	१	१
मोरो सामराज	१	१
हरि गणेश	१	०
मल्हार खंडेराव	१	०
नानाजी रघुनाथ	१	०
गणेश रखमांगद	१	०
दिा चिटनीस		
रावजीसा वाकेनिसी	१	०
मल्हार तुकदेऊ	१	०
यादव राऊ	१	०
लाल भागीरथ	१	०
बापुजी	१	०
आऊबा	१	०
कृष्णाजी कासी	१	०
विठल पुंडलीक	१	०
दिा न्यायाधीश	१	०
त्र्यंबकराव दरोगे	१	१
काळो राम	१	०
मोरोपंत बाळासी	१	१
लिहिणारा दिा बाळासी	३	०
लिहिणार तोपखाना	४	०
मल्हार खंडेराऊ चिटनीस	१	०
	३१	९

आश्रित

	तिवटे	शेले	मदिल
राघो पाध्ये	१	०	
दि उपाध्ये	६	०	०
जोसी	५	०	०
साने ठाकूर	१	१	०
कचेस्वर भट	१	१	१
देवभट	१	०	०
जगोबा	१	०	०
मुद्गलभट पंडितराऊ	१	१	०
कासीनाथ बाबा	१	०	०
जगनाथ बावा	१	०	०
शामजी गोसावी	१	०	०
अपाजी गोसावी	१	०	०
कृपाराम वैद्य	१	०	०
चितामण वैद्य	१	०	०
रामभट वैद्य	१	०	०
भालचंद भट वैद्य	१	०	०
राजमणि	१	०	०
नारायेण वझे	१	०	०
ब्राह्मण	१	०	०
त्रिलोचन भट	१	०	०
शामभट	१	०	०
विस्वनाथ पंडित	१	०	०
सोनठाकूर याचे पुत्र	८	०	०
बाल जोसी	१	०	०
राजमणीचे पुत्र	१	०	०
वस्ताद बाबा	१	०	०
चिंतामण गुरव	१	०	०

¶*This list of invitations issued by Shahu for the marriage of Fatesinh Bhonsle of Akalkot will be found helpful in determining many unknown characters existing in 1719.*

No. 34] [8-12-1719

श्री

श्रीराजा शाहु हर्ष-
निधान बाळाजी विस्वन
मुख्य प्रधान

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ता। मोकदमानी मौजे अडी कर्यात सावगाव सु॥ अशरीन मया अलफ. या प्रांती स्वारी जाली आहे तरी मौजे मा।रचे पाटील कुलकर्णी हुजूर आणविले (असतां) हुजुर येणे. दिरग न लावणे. या कामास स्वार दि॥ सुभानजी बेकरे व मोघाजी (सोलकर) पाठविले असती. यासी मौजे मा।रपैकी रुा ५० पनास देविले आहेत. आदा करणे. छ ८ सफर. आज्ञा प्रमाण.

¶*Balaji Vishvanath visits the province of Savgaum.*

No. 35] [8-12-1719

श्री

श्री
राजा शाहु नरपती हर्ष-
नीधान बाळाजी वीश्व-
नाथ मुख्य प्रधान.

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्ये राजश्री बाळाजी पंडित प्रधान ता मोकदम मौजे फुडसिगी ता। रुकडी सुहूर सन आशरीन मयां आलफ. लष्करची श्वारी या प्रांतास जाली आहे. तरी पाटील कुलकर्णी देखत-आज्ञापत्र हजूर खडणीस येणे. या कामास श्वार दि॥ संताजी धायभोर याजकडील पाठविले आसेत. यासी रुपये २० वीस देविले आसेत ते आदा करणे आणि हजूर येणे. छ ७ सफर. आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा.

¶*Balaji Vishvanath goes south for collecting Maratha dues.*

✓
No. 36]. [8-2-1720

श्री

~ श्री ०
राजा शाहु नरपति हर्ष
नीधान बाळाजी वीश्व-
नाथ मुख्य प्रधान.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ताा रामजी कदम व नरसोजी जाधव सु॥ आशरीन मया अलफ. तुम्हास तारले तर्फेचा यैवज वसूल करून आणावया पाठविले आसेत. तरी जो यैवज आणाल तो चिरंजीव राजश्री बाजीरायाकडे देणे छ १० रबिलाखर. आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा.

¶*Balaji Peshwa orders revenue being paid to his son Bajirao.*

✓No. 37]. [16-3-1720

श्री

श्री राजा शाहु नरपति
हर्षनीधान विस्वनाथ
सुत बलाल प्रधान.

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री पंतप्रधान ताा मोकदम मौजे डिगरज ताा मलगल सुाा आशैरन मया आलफ. या प्रांते स्वारी जाली आहे तर पाटील कुलकर्णी घासदाणियाचे खंडणीबद्दल येणे. या

कामास स्वार दिा आनदराऊ घाटगे पाठविले आसे. यास रु॥ २५ पचवीस आदा करणे. जाणिजे छ १७ जमादिलावेल पाा हुजूर.

मोर्तब

¶*Balaji Vishvanath is in the south collecting Maratha dues, two weeks before his death.*

No. 38]

श्री

माहाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक बालाजी विश्वनाथ कृतानेक विज्ञापना स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष. स्वामीने दया करून यादोजी कनोजे याजबाा रुपये ४५० येकूण मोहरा ३० तीस पाठविल्या त्या पावल्या. विदित जाले पाहिजे. सेवेस विज्ञाप्ति.

¶*Balaji Vishvanath acknowledges receipt of Rs. 450 to Shahu.*

No. 39]

श्री

यादी तहची पत्रे करून द्यावी.

हशम.

सुभा जावलीचे हशमाचे मुकासे गांव आहेत. तेथें खेरीजसरदेसमुखी वसूल घ्यावयाचा तह सुभा व माहाल व हुजरात दर खंडीस तीन ०३ मण करून दिला आहे. येणेप्रमाणे हंगामाचे हंगामी वसूल देणे. जाजती तगादा लागणार नाहीं. म्हणून पत्र देखील रयत व रजपूत मुकासे गावीची. हशमाची पाहाणी करून सनद वर्क करावा.

ठाणेस चाकरी करावी तेव्हा अडीसेरी आपले घरची खावी. दुसरे

सुभाची जमाबंदी करणे ते पाहाणी करून जमाबंदीचा आकार करावा. १

पारचे ठाणियास चाकरी सुभा हजरी लेहून चाकरी करावी. जो सुभा चाकरीस हजर नव्हे त्याचे दुमालेचा वसूल मुदत माफीक घ्यावा.

हशमा खेरीज मुकासी असतील तेथे हशम सेतकरी असतील त्यास खंडीस तीन मण वसूल घ्यावा. जाजती न घ्यावा. रजपूताची नक्तबाब सेतेची दखील दुमाला लेहून तीन मण वसूल

जागा चाकरीस नेऊ तेव्हां अडिशेरी देऊन चाकरी घेऊं.

(हा मजकूर मागाहून खोडला आहे)

घ्यावा. जाजती तगादा न करावा. रयत असेल त्याचा वसूल मुकासी यानें घ्यावा.

येणेप्रमाणे तह करून सनदा दिल्या छ ७ सफर.

¶*This appears to be Shahu's standing order about payment to troops. The paper does not bear the year.*

No 40]. [*1800*

(जमाव रुमाल नंबर १७७३)

श्री.

यादी केसो बापूजी मोकासी विज्ञापना येसीजे. श्रीमंत कैलासवासी बालाजीपंत नाना कोकणात असता शामलाकडून मिठागराचा हवाला करून आमचे निपणजे संभाजीपंत याची हमी दिल्ही. मीठ पिकले नाही. येवजाचा फडशा न जाला. म्हणोन शामलाने संभाजीपंतास समुद्रात बुडविले. तेव्हा आमचे पणजे कसोपंत लाहान होते. यास घरचे कुणबिणीने सचिवाचे घरास आजुलास घेऊन पलाली. पुडे त्यास शहाणे करून रुद्रगडचे काम सांगितले. बालाजीपंत नाना कोकणातून वरती आल्यावर पेशवाई जाली. त्यानी पूर्व ममता धरून सचिवाकडून केसोपंतास मागून घेतले. आपणाजवल ठेऊन खासगीचे काम सांगितले, व पुढे कैलासवासी बाजीरावसाहेब यानी कसबे पुणे हा गाव इनाम करून घेऊन वसाहातीचे व कमाविसीचे काम सांगितले. पेशजी पुरंधरास येवनाचे लढाईस केसोपंतास जखमा लागल्या. त्याचे पुत्र आनंदराव यास कैलासवासी नानासाहेब यानी कुटुंबातील म्हणून प्रतिपाल केला. येविसी ममतेची पत्रे स्वदस्तुरची आहेत. सातारियाचे मुकामी जेठी आले. त्यासी नानासाहेबी माहाराजासंनिध लढविले. जेठी जिवे मारिला. तेव्हा माहाराज कृपाळु होऊन जमीन इनाम दिल्ही. जेठियानी त्यास जादू केली, नंतर एका वर्षाने मृत्य पावले. त्याचे पुत्र बापू लाहान होते याजकडून याद करऊन कैलासवासी दादासाहेब यानी दिलीचे स्वारीस जाते समई आपले हाते यादीवर मखलासी करून नानासाहेब याचा करार करून देऊन कसब्याचे व सोमवार पेठेचे कमाविसीचे काम व कारकून सिलेदारीची आसामी याची याद करून देऊन

वेतनाची नेमणूक कसब्याचे वसुलात घेत जाणे म्हणोन सनदहि दिल्ही; त्याप्रमाणे सन मयातैनापवतो पावले. प्रतिपाल पुत्रवत पूर्वापार करीत आले. पुढे माझाहि करणे स्वाम समर्थ आहेत.

¶*This paper gives an interesting account of a family who had all along worked as friends of the Peshwas. It appears to be a petition addressed to Bajirao II by the last descendant (No. 5) about the year 1800. One important fact revealed in the paper is the cruel death inflicted by the Siddi upon Sambhaji Pant Mokashi, (No. 1,) the first ancestor of the family, who was sewn into a sack and thrown into the sea, as he failed to pay the contracted amount of dues for the management of the salt monopoly, which the first Peshwa had entrusted to him on his own behalf. The current story relates that the first Peshwa left his habitation in the Konkan when his elder brother Janoji was drowned into the sea by the Siddi. The story is substantially correct. But the victim of the Siddi's cruelty was not Janoji Bhat but Sambhaji Mokashi.*

१ संभाजीपंत मोकासी
|
२ केसोपंत } *Served Bajirao I*
|
३ आनंदराव } *and Nanasaheb.*
|
४ बापू
|
५ केसो बापूजी

No. 41] [19-4-1716

श्री

श्रीमत क्षत्रिय कुलावतंस माहाराज

राजश्री छत्रपती स्वामीचे शेवेसी.

सेवक आज्ञाधारक त्र्यंबक सिवदेऊ कृतानेक सेवेसी विज्ञापना. स्वामीच्या कृपावलोकनेकरून वैशाख शुा नवमी गुरुवासर पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र चैत्र शुध नवमीचे बराबरी खंडोजी इंगवला व संताजी गायेकवाड जासूद सादर जाले तेथें आज्ञा कीं, राजश्री बाळाजी पंडित प्रधान याकडून गलियाचे खरेदीस ऐवज देविला होता त्यापैकीं ऐवज आला काय, गला खरेदी केला काय, सिहिगडी दास्तन जाले आहे काय, तो हिसेब तपसीलवार लेहोन पाठवणे म्हणोन आज्ञा. ऐसियास राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांकडून स्वामींनी दोन हजार रुा ऐवज देविला. त्यापैकीं पंडितमाारनिले याणी भिवजी सिदा व रामजी कुटा हुजुरियाबाा रुा २५० आडीचसे ऐवज पाठविला, त्याचे पावलियाचे विनंतीपत्र ते समईच त्याबराबरी स्वामीचे सेवेसी पाठविले आहे. त्या अलाकडे त्यांकडील ऐवज आला नाहीं. सांप्रत पंडित माानिले लस्कर-

सहवर्तमान स्वारीस दूर लाबोन गेले आहेत. ऐवज आला असता तरी गलाहि खरेदी जाला असता. अडीचसे रुपये ऐवज आला तो येणेप्रमाणे गडोगडास गलियाचे खरेदीस दिल्हा बिता रुपये.

किले राजगड रो॥	किले प्रचंडगड	किले सिहीगड रो॥
१००	१००	५०

येणेप्रमाणे अडीचसे रुपये ऐवज दिल्हा आहे. स्थळोस्थळाचे नातवानीचा जो अर्थ जाला आहे तो सेवेसी विदितच आहे. बेगमी करावया स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Trimbak Shivdeo reports to the Chhatrapati an account of the amount received from Balaji Pandit Pradhan for purchasing stores for the fort of Sinhgad. The writer Trimbak Shivdeo appears to be the maternal uncle of Sachiv Naro Shankar, his mother Yesubai's brother, who was the regent (Mutalik) of the young Sachiv who had not then come of age. This Trimbak Shivdeo ought not to be confused with a person of the same name, viz., Vithal Shivdeo's brother.*

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

८

शाहू–खाजगी

[किंमत— ९ आणे किंवा ११ पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

SHAHU IN HIS PRIVATE LIFE

This section of about fifty letters contains interesting information about the private life of King Shahu, now made available for the first time. Plutarch in his " Lives " relates incidents in the daily life of his hero, which very happily hit off his character. To understand the personality of a man we must look not to his exploits in the field or the court but to his daily life. The truth of this statement is amply borne out by these documents.


A study of these letters, revealing King Shahu as he appeared to his contemporaries, helps us to explain the success he attained in the face of terrible difficulties. A Maratha to the core, the idle years spent in the Mughal zenana failed to impair his love of an open-air life. Through all these letters breathes an air of simplicity which he inherited from his illustrious grandfather and which is a national trait of the Marathas. He was a keen *shikari* and devoted to all kinds of sport. Tiger-shooting seems to have been his favourite recreation, and he reprimands the Peshwa for not sending him beaters in good time (Letter No. 31). News of a tiger in the neighbourhood reaches him. The Shimga sports are suspended and the king rides forth in hot haste into the jungle after the quarry. n touring the country, he is careful never to miss a chance of a hunt; orders are issued to protect the forests (Letter 5). The hunt es him so much that for days he lingers on in the jungle where the l cooks are hard put to it to dress the King's repast. Fishing is ler of his fancies and when somebody mentions that good fine fishing- is available only in Khandesh the King immediately sends letters to ninister to secure some of this line for his rod (Letter No. 26).

ogs, horses and rare birds he delights in, and insists on getting them never and wherever he can (Letters 14-25). His love for horses was love of a connoisseur. Mark how the horse sent by the Peshwa after ful inquiries failed to please him because of a slight defect in the hind (Letter 23). When the Peshwa is in the North intent upon questions igh policy, he is reminded by his prince to keep his eyes open for fine b horses, musk deer and yaks! Dancing was another national eation and he asks for good-looking dancing girls to be sent to his na. His collection of birds, yaks, dogs and leopards must indeed e formed an admirable zoo.

le was essentially a family man and had a kind word for everybody is household. His niece Daryabai is loaded with all kinds of ornaments dresses when she takes the King's farewell. The sickness of his en grieves him and he bestows presents for her recovery. The memory his courageous father and uncle is observed with due respect and mnity (Letters Nos. 36, 41, 49, 50).

lis bearing was cheerful and unaffected, pleasing yet dignified. There something in him which disarmed his enemies and aptly gained for the title of " one born without an enemy." In the presence of his nsellors he maintained an easy but dignified familiarity. The expansion he Maratha kingdom in his time was not due so much to fortuitous umstances as his happy choice of ministers and his own lovable sonality.

No. 10



Facsimile of the handwriting of Balaji Bajirao (*1740—1761*)

No. 1]

श्रीमलारिर्जयति

वि+नंती उपरी. पा भडोच देखील देहजबारे व पा खंबाईत प्रांत गुजरात व पा घोगे प्रो सोरट हे माहाल हुजूर खासगीकडे ठेविले आहेत. त्याच्या सनदा देखील बाबती व सरदेशमुखी माहाराजानी देवविल्या आहेत. राजश्री नारो विठल याचे स्वाधीन कमावीस केली आहे. तरी याप्रमाणें सनदा लेहून बिंद्राबन चोपदार याचे स्वाधीन केल्या पाहिजेत. सुरतपैकी तीन महाल पेशजीपासून खासगीकडे आहेत. त्याचेही ताकीदपत्रें व साहित्यपत्रें यादी पाठविली आहे. त्याजवरी 'देणे' करून द्यावे हे विनंती.

¶*Jivaji Khanderao Chitnis asks (probably Bajirao) that orders be issued for the specified Mahals being retained for the King's private expenses.*

[29-11-1731 ?
[28-3-1721 ?

No. 2]
पौ छ १० जाखर

श्री

पुरवणी राजश्री राऊ स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी हुजूर घराचा मजकूर लेहून पाठविला. त्यावरून कळो आला. त्यांस किले पुरंधर येथील कारकून व लोक सुतार गवंडिये आद्याप येथे आले नाहीत. स्वामीनी लिहिले की, राजश्री तात्याची आमची भेटी जालियावर घराचा विचार करून, तुम्हास लेहून पाठऊन. तरी घराचा पैका खंडून एकंदर घेत नाहीत. मार्गसीर्ष पूर्णमा ता माघ वद्य आमवाश्या २॥ आडिचा महिनियामध्ये दोन तीन यात्र्या कराव्या. फालगून मासी घरामध्ये येऊन राहावे. ऐसा विचार वाडियांतील आहे. सांप्रत वाड्यामध्ये झाडे आहेत. तेथे माडव घालून, कुल मनुश्ये आहेत. घर तातडीने बाधोन दिल्हे पाहिजे. हाइगई करिता येत नाही. याजकरिता स्वामीस वर्तमान तपसिले लिहीले आहे. तरी घर बाधोन द्यावे. याचीच तरतूद स्वामीनी करून द्यावी. कदांचित स्वामी

+From Shahu R. N. 48.

तीर्थरूप[प] राजश्री तात्यास सांगतील की, पैका देऊन लिगाड वारणे. ते स्वामीचे भिडेमे बरे म्हणतील; परतु येथें वारणार नाही. याकरिता स्वामीस लिहिले आसे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The handwriting shows this letter to be from Malhar Tukadev Purandare to Bajirao asking the latter to build the house for Raja Shahu at Satara with the utmost expedition. The work should not be put off on any account, the writer adds. (Can this house be the one which Shahu constructed for the first time on the ridge below the fort in 1720 ?)*

No. 3] [*7-10-1730* ?

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
पंत आपा स्वामीचे सेवेसी.

सेवक केसो सहदेव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ रबिलाखर जाणून स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे. विशेष:—राजश्री सरखेलीकडील कापड व पैका व बराबर लोक ३० तीस व येसाजी पवार जासू रोजगुदस्ता कसबे पुणियास हजीर जाले. यैवजाची रवानगी राजश्री सरखेली पत्रावरून विदित होईल. राजश्री पंतप्रधान स्वामीचा मुकाम जेजुरीस अ म्हणून लिहिलें होतें. मागती दुर्गोजी भोईटे आले, त्याणी सांगितलें जे, राजश्री छत्रपती स्वामी व सौभाग्यवती मातुश्री विरूबाई व राजश्री पंतप्रधान स्वा घाटाखाले उतरले नाहीं. परभारें कूच करून मजल दरमजल तुळजापुरास गे व आंगरियाकडील तीस माणूस बराबर आहे. अडिसेरी मागतात. राजश्री सरखेलीनें अडिसेरी पुणियापावेतों दिल्ही. आतां कुलाबियापावेतों अडिसे पाहिजे यैसे म्हणतात. तरी यैवजाची व अडिसेरीची आज्ञा करावया स्वा समर्थ आहेत. वरकड वर्तमान जासूद जबानी सांगतां विदित होईल. सेवे श्रुतं होय हे विनंती.

¶*Keso Sahadev from Poona to Chimaji who was out in Swari, giving new of Shahu, Bajirao and Virubai proceeding to Tuljapur.*

No. 4]

पाा छ २४ साबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसीं

आज्ञाधारक लक्षुमण विस्वनाथ सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २२ साबानपर्यंत येथास्थित असें. विशेष स्वामीचें पत्र सादर जाहालें. तेथें आज्ञा कीं, माहाराज राजश्री स्वामी जेजुरीस येणार; त्यास नाणेंमावलपैकीं सेंभर वेठें व बुरूडकाम पाठवणें म्हणून आज्ञा. त्यास येंदा तिजाई महसूल गला पुणियास आणविला. हाली वेठें आणविले त्यास दाभाडियांचें कसालियानें रयेंत तजावजा जाली आहें व सालमजकुरी गला पुणियास पाठवावा लागतो. इनामदार ब्राम्हणाचें गाव आहेंत त्याचे वेठे येत नाही. आम्हास रोखां करिता येंत नाही. धामधुमीचा प्रसंग, महसूल गला आला पाहिजें. त्यास वेठें जरूर पाठवावें यैसे जालें तरी पुणियाचा गला मना करावा. वेठे पाठऊन देऊं. इनामगावास परभारें हुजरून वरातदार पाठऊन न्यावें. सेंभर वेठ्याची भरती होत नाही; जें जमा होतील ते पाठऊन. नाणेंमावलात बुरूड नाहीत, पौड खोरियात लिहिले आहें. दाभाडियाचा नित्य कसाला. गावगना राऊत येऊन गवत दरगावास दाहा हजार पाच हजार याप्राा काढविलें. आणखीहि किरकोळीं कामकाज पडतच आहें. आपणाकडीलहि गडकिल्याचे कामकाज जालें पाहिजे; याकरिता जे आज्ञा करणें ते करावी, त्याप्राा वर्तणूक करून. देंह ८४ पैकी

४ खराब
९ राजमाची
४ मोकासे मातुश्रीबाई
८ मोंकासे राजश्री पंतप्रधान
६ इनाम वतनदार
६ किले लोहगड
१ काा नाणे सौ मातुश्रीबाईसाहेब
८ ब्राम्हण

१ करजगाव	१ सोमवडी
१ गोंवित्री	१ स्वांडसी
१ वाहवली	१ कोंडिवडे
१ वडवली	१ भाजे
	१ वेहरगाव

१ मौजे वाकसे इनाम जनार्दन बलाल.
४४

त्रेतालिस बाकी ४१ येकतालीस, त्यामध्ये कोणीं गावी च्यार घरें पाच घरें याप्रा आहेत. त्यामध्ये श्वामीचे आज्ञेप्रा वेठें २५ पंचवीस पाठवितों. सकट गावचे वेठे तो येतातसे नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्त. ये प्रांती तो बुरूड नाहीत. पौऊडखोर येथे बुरूड आहेत; तेथे आपला परभारा रोखा जाला आहे. सरंजाम व वेठे जमा करावयास आठ दिवस पाहिजेत. दाऊदखान जेजालबारदार आला आहे तो जेवीत नाही. पांघुरणे फाडितो. त्यास आम्ही काय करावे ? वरातदार तो निकडीचे. ये प्रांतीचा धदा वस्ती जनी आपणास श्रुत आहे. प्रत्यवरसी भात महसूलचे घेत असतो. सालमजकुरी तांदूल करून घ्यावे लागतात. याकरिता चितास येईल तर वेठे मना करावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्त.

¶*Lakshman Vishvanath to Chimaji Appa explaining the writer's difficulties in supplying a hundred labourers and cooper's work for the King's trip to Jejuri.*

No. 5] ✓ [*31-1-1731*

पाा छ ३ साबान

श्री

+पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती राजश्री स्वामी जेजुरीस देवाचे यात्रेस येतात. त्यास माघ यात्रा आहे. परंतु वाडियातील घर नीट करितात यामुळे सौभाग्यवती मातुश्री साहेब सदरेच्या घरात राहिली आहेत. ते घर काही कार्याचे नाही. यास वाडियातील घर नीट होये तोवर बाहेर महिना दोन महिने कर्मविसे अ याकरिता पौष मासी वद्य पक्षीच राजश्रीचे येणे ते प्रांती होईल ऐसे आहे. स्वामीनी साहित्याची तातड करावी. राजश्रीच्या वरकडाच्या चितात यैसे मुलकात पाऊस गेला तऱ्ही आपण साहित्य करणार समर्थ आहेत यैसे अ तरी सर्व साहित्य केले पाहिजे. कोणे वेलेस उठोन तिकडे येतील हे न त्याहिमधे खासा स्वामी प्रसंगी आहेत यास्तव सर्व साहित्य करावे. रा त्या प्रांते येतात, यात सवशये नाही. याउपरी राजश्रीनी आज्ञा केली जेजुरीपासून पुरंधरपर्येत डोंगरचे रान कोणी छट्ट न पावे. का की ससे व ह व डुकरे वगैरे सावजे रानात असतील ती माणसाचे वाेगीमुले[1] धुडावेतील.

+ पत्र माहादोबा पुरंदऱ्याचें. १ वापरामुळें पळून जातील.

आता माणसे जागा जागा ठेऊन पहिले राजश्री आले होते ते वेलेस असवल धरली होती ते रान देखील चौक्या ठेऊन जतन करणे, यैसे सागितले. तरी स्वामीनी चौक्या ठेऊन रान राखविले पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Appa, communicating Shahu's intention to visit Saswad and Jejuri, hunting en route.*

No. 6] ✓ [*31-1-1731*

पाा छ ३ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती. काली बुधवारी त्रितीये प्रहरी राजश्री स्वामीनी बोलाऊन आज्ञा केली की, पहिले तुम्हास सांगितले होते ; पाच हजार रुपये घेऊन उंटे व घोडी आम्हास खरिदी करून देणें. त्यास तुम्ही अद्याप दिल्ही नाहींत. याउपरी जेजुरीस स्वारीस जावे लागते तरी तुम्ही उंटे आम्हास तीन हजाराची खरिदी करून लौकर आणवणे. त्यावर आम्ही विनंती केली की, येंदा आमच्या प्रांतास बरग फार पडले यामुले घोडे अगर गुरू अगर उट कोठे राहिले नाही. त्याहीमधे उटास तो फारच रोग आला. तमाम उट मरतात. येसे जाहाले. यास्तव अवदा काही आम्हास उट कोठे मिलत नाही. त्यावर राजश्री बोलिले की, तुम्हास आम्ही पहिलेपासून उटाविसी सागतो आम्ही (आणि) तुम्ही नाही म्हणता. तर येसे काही कार्यास येणार नाही. तुम्ही राजश्री चिमाजी आपास लेहून निदान फार न मिलेत तर दाहा उट तो खामखा आणवणे. तुम्ही दिवाणाचे यैवजी मजुरा घेणे. यैसे बोलिले. त्यावरून हे पत्र लिहिले असे. तरी स्वामीनी उटाचा तलाश करावा. येविसी माणसे शहरास व नवाबाच्या लस्करांत पाठऊन उट मेलविले पाहिजे. व हैगै येकंदर न करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa, asking the latter to purchase camels and horses for the King.*

No. 7] ✓ *[15-2-1731*

छ १९ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी दरबारीचे वर्तमान तरी, राजश्री स्वामी यानी साताराहून माघ सुध सप्तमी गुरुवारी कूच करून मुा मौजे पलसी पा वाई येथे मुकाम केला. दुसरे दिवसी तेथून कूच करून तडवले येथे मुकाम केला. तिसरे दिवसी मौजे खेड पा सिरवल येथे मुकाम केला. तेथून कूच करून दशमीस वाल्हे येथे मुकाम केला. दुसरे दिवसी वाल्हे येथे मुकाम जाला. द्वादसी मगलवारी जेजूरीस मुकाम जाला. वाई मुलकाची आवस्था काही राहिली नाही. गैरमोईनी खर्चाची नीत नाही. स्वामीस वर्तमान कळावे याकरिता लिहीले असे. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी सातारा आहेत. समागमे राजश्री दादोबा आले आहेत. येमाजी सिवदे यास त्याचे बंधू वडील यांस सांप्रत बरे वाटत नाही ते महीगांवी[1] आहेत. स्वामीस कळावे याकरितां लिहिले आसे. राजश्री नारबावा मंत्री कऱ्हाडास कोटी होम करायास गेले आहेत. ते आद्याप आले नाहीत. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापि.+

¶*Nana's letter to Bajirao, communicating Shahu's tour round about Satara.*

No. 8] ✓ *[17-2-1731*

पा छ २० साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती. राजश्री स्वामी जेजुरीचे यात्रेस जाणार आहेत. त्यास वाटेच्या मुकामाच्या गोष्टी बोलिले कीं, येथून निघावें ते दहिगावीं मुकाम करावा. तेथून पुढें धायेगुडयाच्या येका गावांवर मुकाम करावा. तेथून पुढें सिरवलास जावें. तेथून निघोन परिंच्यावरी मुकाम होईल. तेथून सिवरीच्या खिंडीने जेजुरीस

---

१ महेगांव माहुलीजवळ. + पत्र नानासाहेबांचें.

जावे, तेथें यात्रा करून सासवडावरी जावे दोनच्यार मुकाम करावे, तेथून सिवा-पुरावर जावे येसे बोलिले आहेत. तरी स्वामीनी गवताफांट्याचे व मडक्याचें सामान काहीं परिंच्यास करवावे व सासवडासहि पाच सात मुकाम जालेच तरी तितक्या मुकामापुरते सामान, राजश्री बापुजीपंतास[१] सांगून गवत लाकूड फांटे व मडकीं वगैर करविलें पाहिजे व बुरूडकाम देखील करवावें. सासवडास पहिले नारो जनार्दन व नारो दादाजी होते, ते माहित होते. याकरितां अवघें साहित्य करून ठेवीत होते. प्रस्तुत तेथें माहित कोणी नाहीं. भिकाजी नारायेणास कांहीं साहित्य होणार नाहीं. तरी स्वामीनी अगोधर येक शाहाणा कारकून पाठऊन पूर्वबत प्रमाणे सर्व साहित्य करवावें. आइतेसमई होणार नाहीं यास्तव लिहीलें आहे. कसबे मजकुरी पहिलें राजश्री स्वामी जितक्या घरांत राहत होते तितकीं घरे रिकामी करून सारऊन निर्मल करून ठेविलीं पाहिजेत. पूर्वीचीच घरें रिकामी करून ठेवांवी. राजश्रीकडील कारखान्यास व लोकांस जीं घरें राहावयास दिल्ही होती तितकीं घरे रिकामी करवावीं. गांवकरी यांस ताकीद करून स्थलें रिकामी करविलीं पाहिजेत. सासवडचें साहित्य राजश्री बापुजीपंताकडेच सोपावें. यासिवाय दुसऱ्यास होणार नाही. त्यांस सागितलें म्हणजे गांवगनाचे कुंभार व बुरूड व गुरव वेटे आणून कारखाना घालून साहित्य करितिल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Programme of Shahu's tour to Jejuri and preparations required at the different places are mentioned in this letter.*

No. 9] ✓ [*22-2-1731*

पाा छ २९ साबान

श्री

पुा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलाचे सेवेसी

विनंती राजश्री स्वामी प्रतिपदेस निघावयाची बोली आहे. परंतु पंचमी सप्तमी इतके खामखा जेजुरीस येतात. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. बहुत करून प्रतिपदेसच निघावयाची बोली आहे. आम्ही राजश्री स्वामीबरोबर

---

१ बापूजी श्रीपत.

आल्यावर येथे चवकीस माणसे अधिक पाहिजे. याकरिता रामाजी माहादेव यास माणसे वीस लोक पाटवणे म्हणून लिहिले आहे. स्वामीनीहि माणसें सातारियास घरास चौकीस पंचवीस सिपाई पाटवणे म्हणून त्यास पत्र लिहिले पाहिजे. नाही तर स्वामीनी तरी पाटविली पाहिजेत. राजश्री गेलियाउपरांतिक येथे चोरीचा फारसा मामला होतो व आम्हीहि येऊ, माणूस वाडियात नाहीं. तरी सिपाई सत्वर पाटवावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Purandare to Appa about Shahu's visit to Jejuri.*

No. 10] [24-2-1731

पा छ २७ साबान

श्री

पुा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलाचे सेवेसी

विनंती राजश्री स्वामी जेजुरीचे यात्रेस यावयास प्रतिपदेस निघणार. आज्ञेप्रमाणे मोधी व गौळी यास सागितले व पैकाहि देतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shahu's journey to Jejuri.*

No. 11] [5-12-1736

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार गोविंद गोसावी यांसी.

सेवक चिमणाजी नारायेण सचीव नमस्कार. सुा सबा सलासीन मया अलफ. राजश्री स्वामीचा मुकाम कोा फलटणी आहे. त्यास मांडवाचे व किरकोळ साहित्य जिल्हेपैकी आणवणे म्हणोन आज्ञा केली आहे. याजकरितां हे पत्र

सादर केले असे. तरी का बारामतीपैकीं येणे प्रमाणे सामान का मारच्या मुकामास आणविले असे. पत्रदर्शनी रवाना करणे.

वेठे सुमार	गुरव कामास	कुंभारकाम	सुतारकाम.
१९ ऐनवेठे	गुरव सुमार ९	कुंभाराबोार पाठवणें.	हराजिनस ठाणव्या
१० माहार		१० राजण	व पोळपाट
—		२९ डेरे	लाटणी कलम १
२९		२९ घागरी	
एकूण रावताची ओझी		५० मडकी	
पंचवीस पाठवणे.			

*　　*　　*　　*

*　　*　　*　　*

सदरहुचा ऐवज जो तो लेहून पाठवणे. ऐवज मजुरा दिल्हा जाईल. ऐवज हुजुरून रवाना केला नाही. या कामास स्वार पाठविले आहेत. यास रुपया एक देविले असत, देणें.

सुरुसूद बार

छ १२ साबान　　(सिक्का)

¶*Arrangements made for Shahu's camp.*

No. 12] ✓　　[*7-1-1740*

पाा छ २८ सवाल

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ताा

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

आपल्ये मल्हार तुकदेव कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ताा छ १९ सवाल परियेत कुशल आसो विशेस. दरबारींचे वर्तमान तरी, पूर्वी लेहून पत्रे पाठविली आहेत. त्यावरून वर्तमान विदित जाले असेल. सांप्रत छ १८ सवाली सोमवारी प्राथःकाली मौजे कलवर येथून राजश्री स्वामींनी कूच करून, श्रीच्या दर्शनास प्रतापगडास गेले. तेथे तीन दिवस मुकाम आहे. यात्रा जालियावर तेथून कूच करून चिखली व धोम यावरून वाईस यावे, तेथून सत्वरच स्वार होऊन श्रीचे यात्रेस जेजूरीस जावे. त्यास माघ

सुध द्वितीया आगर त्रि[ती]यसे सालपियाचा घाट उतरावा आगर खांबकिटीच्या घाटे खालते जावे. यामध्ये जो निश्चये होईल तो खरा. विदित जाले पाहिजे स्वामीकडील सांप्रत वर्तमान कलत नाही. तरी सविस्तर लिहिले पाहिजे. राजश्री सुलतानजी निबालकर याजकडील मजकूर काये जाला ते लिहिले पाहिजे. पुढे स्वामी कोणत्या मार्गे जाणार, हे लिहिले पाहिजे. वरच्यावर पत्रे स्वामींनी राजश्री स्वामीस लिहिली म्हणजे राजश्री स्वामी सतोष पावतील. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Purandare to Bajirao, describing Shahu's journey to Pratapgad and Jejuri.*

No. 13] ✓ [*1740 ?*

पा छ १६ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजेश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी.

विनती. राजश्री स्वामीची स्वारी प्रतापगडाकडे होणार आहे. चाकरमाने पाटील सिकारीस असावे याकरितां ताकीद निकडीने केली आहे. तरी काही पाठऊन द्यावे. समयास न येत म्हणजे स्थित राहावयाची गोष्टी स्वामीस विदितच आहे. सेवसी श्रुत होये हे विनंती.

¶*Nana to Chimaji, communicating Shahu's proposed visit to Pratapgad.*

No. 14] ✓

श्री

राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी.

श्रीमंत सकलगुणअलंकर्ण अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्ये श्नो तान्हांजी धायेभोर दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन अज्ञा केली पा. विशेष. काहाराकडे कुतरियाचे पिल २ आहेत ते पाठऊन देणे, म्हणून आज्ञा केली. यैसियांस स्वामीकडील पालखी घेऊन भोई आले व्होते.

त्याजबाार काला कुतरा गेला की आणिक कोन्हीकडे गेला हे न कले. काला कुतरा बारंगल[1] जाला आहे. हरणा कुतरा कालतोंडा महादजीबाार पाठविला आहे. तो सेवेसी पावता व्होईल. विदित जाले पाा काल्या कुतरियाचे वर्तमान माहादजी सांगता विदित व्होईल. बहुत काये लिा हे विज्ञापती.

¶*Tanhaji Dhaybhor to Bajirao, informing him about the dogs which the latter had asked for.*

No. 15] ✓

पाा छ २ जिल्हेज.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसीं.

विनंती उपरी. स्वामीची कुतरी पुण्यांत उत्तम पील जाले आहेत. ते राजश्री स्वामीचे कुत्तेबाजानी पाहिले, ते राजश्री स्वामीपासीं येऊन सांगितले. त्यावरून राजश्री स्वामीनी आज्ञा केली आहे कीं राजश्री चिमाजी आपाचे कुतरीस पील उतम जाहाले आहेत ते आणवणे. त्यावरून स्वामीस लिहिलें आहे. तरी स्वामीचे कुतरीस पील जे जाले असतील ते पाठवून द्यावे. राजश्री स्वामीचे कुतेब्राजानी पाहिले तेव्हांच मागावे तरी स्वामी पुण्यांत नव्हते. यास्तव त्यानी आणिले नाहीं. तरी याउपरी पिलांची बहुत प्रकारें ताकीद करून सांगितलें आहे. कदांचित स्वामीची कुतरी नसिली तरी जवळपास दुसरी कोणाची असतील त्याची तहकीकात करून पाठवून द्यावीं. तथापि थाक लागेना तरी राजश्री स्वामीस पत्र लेहून पाठवावें कीं ज्याणे कुत्र्याचे पील पाहिले असतील त्यासच पाठवून द्यावा, तो घेऊन जाईल. आम्हाकडे नाहीं. जेथें असतील त्याणें पाहिले असतील तेथून घेऊन जाईल. म्हणून पत्र पाठवून द्यावें. पां(ढ)रा कुतरा सफेद उतम थोर अगर पील आठां दिवसां, पंधरा दिवसां, महिन्या दोन महिन्यां, जेव्हां मिळेल तेव्हां तलास करून आणून पाठवून द्यावा. राजश्री संताजी धायेभर यांचे पुत्रानी तीन पील कुतऱ्याचे पाठविले होते, त्यापैकीं येक चितास आला तो ठेविला. दोन माघारे फिराविले. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विनंती.

¶*Purandare writes to Chimaji Appa to procure good pups and dogs for Shahu who seems to be very fond of these animals.*

---

[1] वेडावलेला.

No. 16] ✓

श्री

+पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. स्वामीनी गजनाचे बीज पाठविले ते येथे आले. राजश्री स्वामीस गुजरानून उतर पाठऊ. कुतरी चालीस हुजरे याजबराबर पाठविली आहेत, म्हणून स्वामीनी लिहीले. यैसियासी कुतरी येथे आली. परंतु राजश्री स्वामीच्या चितास आली नाहीत. यैविसीचे तपसिले वर्तमान पहिले सेवेसी लेहून पाठविले असे. तरी स्वामीनी राजश्री अनंदराऊ पवार याकडे कोणी शाहाणा माणूस पाठऊन, तेथून कुतरी आणवावी. न्हावीकर सितोले याचे घरी कुतरी आहेत. तीहि आणऊन पाठविली पाहिजेत. मौजे सिकरापूर येथील पाटील पाठविला आहे, म्हणून स्वामीनी लिहिले. यैसियासी पाटील अद्याप येथे आला नाही. आलियावर वर्तमान लेहून पाठऊ. कलले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare informs the Peshwa that not one out of the forty dogs sent by the addressee pleased the King. The Peshwa is asked to make enquiries with Anandrao Powar or the Sitoles of Nhavi who were reported to have a good breed in their possession.*

No. 17] ✓

छ ४ जिलकाद

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. छ २ जिलकादी शुक्रवारी दीड प्रहर रात्रीस राजश्री स्वामीनी आज्ञा केली कीं, सांप्रत कुतरियाची वीण लागली आहे, तरी उत्तम कुतरे पिल आपले जिल्हेतून आणवणे. राजश्री आपास लेहून पाठवणें ऐसी आज्ञा राजश्री स्वामीनी केली. आणि मागती बोलिले कीं, ढमढेरे याची घरी पिल उत्तम असतील, सिकरापुरी धायेभोर याचे घरी पिल उत्तम असतील. त्यावर राजश्री फत्तेसिंग बावा बोलिले कीं, नाहावीकर सितोळे याचे घरी पिल उत्तम असतील. त्यावर राजश्री स्वामीनी आज्ञा केली कीं, उत्तम पिल आणून देणे. मुलकातील जमा करून पाठविले तर, कार्याचे नाहींत. ज्या गावांत

+ पत्र माहादाजी अंबाजीचे.

उत्तम कुतरी असेल, तिला पिल चांगले जाले असतील, ते आणवणे. त्यावरून स्वामीस पत्र पाठविले आहे तरी स्वामीनी ये गोष्टीचा बरा प्रयत्न करून पिल मेळऊन आगत्य पाठऊन दिल्हे पाहिजेत. जे गोष्टीचे राजश्री स्वामीस आगत्य, ते गोष्टी केली पाहिंजे. पत्राचे उत्तर पुढे पाठऊन द्यावे. मागाहून पिल निगेनसी पाटऊन द्यावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Chimaji is asked to secure choice puppies for the King.*

No. 18] ✓

पाा छ १७ जमादिलोवल

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १९ जमादिलावलपरियेत येथास्थित असे. विशेष. स्वामीनी राजश्री स्वामीस कुतरी सुमार १० दाहा पाठविली. ती नेऊन गुजरानली परंतु मनास आली नाहीत. उगीच तीन कुत्री मात्र ठेऊन घेतली. वरकड सात कुतरी माघारी दिल्ही ती पाठविली असेत. स्वामी येथून गेले तेव्हा राजश्री स्वामीपासी कुतरी उत्तम पाठवितो म्हणून मान्य केले आहे व त्याणी निमोनाही कुतरी दाखविली आहेत. तरी उतम कुतरी तलाश करून अगत्य पाठविली पाहिजे. येविसी अनमान न करावा. राजश्रीस कुत्र्याचे अगत्य फार आहे. तरी पाठवावयासी हैगै न करावी. विदित जाले पाहिजे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare informs the Peshwa that the dogs sent by him were not approved by the King and asks him to secure a better breed.*

No. 19] ✓ *[1738 ?*

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २९ जमादिलवलपरियेत येथास्थित असे. विशेष स्वामीनी कुतरी सुमार १४ चवदा पाटविली, ती राजश्री स्वामीस गुजरानली. परंतु

राजश्री (चे) चितास आली नाहीत. दोन कुत्री मात्र घेतली. वरकड काही म्हातारी, काही कामाची नाहीत, यास्तव माघारी टाकिली. विदित जाहाले पाहिजे. राजश्रीनी माघारी टाकिली त्यापैकी येक तो पिसाललेसे झाले, ते सोडिले. व येक अघासिग यानी घेतले व येक चिरंजीव नानाने घेतले व येक दोन जिवबा चिटनीस याणी घेतली. बाकी राहिली ती पाठविली असेत. तरी स्वामीनी आणीक कुतरी उतम पील पाहून राजश्रीकारणे पाटविली पाहिजे. सेवेसी श्रुत होये वे विनंती.

¶*Mahadaji Purandare to Bajirao, asking him to send some well-bred dogs for Shahu.*

No. 20] *[18-9-1744*
[or 18-8-1747
[or 3-6-1755

श्री

तीर्थरूप राजश्री नाना ता। राजश्री भाऊ
स्वामींचे सेवेसी.

अपत्यें त्रिंबक सदासिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २२ साबान भोमवासरपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी राजश्री स्वामीकारणे कुतरीयाचे पील जोडा १ पाठविला तो राजश्री स्वामीच्या खातेरीस न आला. उतम नाहींत यास्तव माघारा परतोन दिल्हा. तो कार्याचा नाहीं मग काये करावायास्तव आम्हींही आणून गावांत सोडून दिल्हा. तर राजश्रीकारणे उतम कुतरेयांचे पील राजश्रीचे मर्जीयोग्य येत्नपुर:सर जे मिलतील ते मेलवून आणून पाठवून द्यावे. वरकड वर्तमान दरबारचे अलाहिदा पुंरवणीपत्रीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. उतरें पाटवावीं. विदित जालें पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare writes to Nana, asking him to supply good dogs for Shahū.*

No. 21]
पा। छ २६ जमादिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी स्वामीनी राजश्रीकारणे घोडा पाठविला तो छ २१ जमादिलाखरीं सकालच्या प्रहर दिवसा येथें पावला. राजश्री सिकारास गेले होते. ते

दोन प्रहरीं आले. संध्याकालच्या चवथे प्रहरीं घोडा नेऊन राजश्रीस गुदरला. राजश्रीनी पाहिला. फेरावयास चाबूकस्वार हाजीर नव्हता म्हणून रिकीबदारास सांगून फेरून पाहिला. रिकीबदाराने राजश्रीस सांगितलें की जवलच्या टप्यांत घोडा हालविला तरी तोंडचा बहुतसा गोड आहे. दुरच्या टप्यास बहुतसा दाटला तरी थोडासा वोढितो. त्यांहीमध्यें त्यास खपाव्या लगाम म्हणून थोडा वोढितो. आडवा लगाम दिल्याने सज येईल येसे सागितले. त्यावरी राजश्री बोलिले कीं पुढीले चौकास जसा आहे तसा मागले चौकास नाही. मागें कमी पडिला आहे. आम्हास जसा पाहिजे तसा नाहीं. परंतु आठ दिवस ठेऊन पाहू. आमचे मरजीस उतरला तर ठेऊं नाहींतर माघारे देऊं. पागेच्या हवालदारास सांगितलें की तूर्त डाग न करणे. बिनदागीच असो देणे. येसे बोलिले. स्वामीस कलावें म्हणून लिहिलें असे. स्वामीनी जरी सरोसर[1] विकत घेऊन देणे म्हणून लिहिले. त्यावरून जरी सरोसर विकत घेऊन दिल्ही. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये. विज्ञापना.

¶*Bajirao and Chimaji are informed that the horse sent to the King has been found defective in some respects.*

No. 22]

छ २६ साबान
पा. छ ९ रविलाकर.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती एक इराकी घोडा वेगली कुल फर्मासी जिनसा सवंग महाग तयार करून गड्डे बांधून ठेविली आहे. इराखी घोड्यासाठी माणसे लाहोरास पाठविली आहेत. परंतु या दिवसात काबलेकडून सौदागरी घोडे आले नाहींत. ज्यास पाठविले आहे तो मार्ग पहात बसला आहे. सौदागरी घोडे आल्यावर ऐखादा घोडा उत्तमसा

---

१ घोड्याचा एक दागिना.

खरीद करून आणील. जिन्नस तयार करून ठेविली आहे, ते तो मागाहून उंटे माणसे समागमे देऊन वाटे लावितो. सांप्रत वनगाई व कस्तुऱ्या मृग व हुमे पक्षी जिवंत पाठवावा. हे जिन्नस श्रीनगरच्या राज्यात आहे म्हणून येथे कोणी सांगितले त्याजवरून राजश्रींनी आज्ञा केली तरी तुम्ही छोटेखानी कारकून शाहणा एक श्रीनगरास पाठवून सदरहू तीन जिन्नस प्रेत्नपुर:सर आणवून पाठवून देणे मुजरद कारकून पाठवून तलाश करणे म्हणून पुरवणी पत्री आज्ञा लिहीली. यास श्रीनगरच्या राज्याचे येथें वकील आहेत. पादशहा वजीर इत्यादिक यांस कधीं कधीं तोहफा म्हणून कांहीं जिन्नस पाठवित असतात. आम्हासीहि स्नेह राखतात. तेथले राज्याशीही आमचा दंडक आहे. त्या वकीलास बोलावून विचारिले. त्यांनीं निवेदन केले कीं, हुम पक्षी तो जिवंत मिळत नाहीं. कोणी स्वदृष्टीनें देखिलाच नाहीं. श्रीनगर बंदरी पलीकडे पहाडात दो चौ वर्षांत कधी कधी हे पक्षी उतरतात तेथे पक्ष मात्र टाकून जातात. जिवंत पक्षी कोणी देखिलाच नाहीं. वनगाई व कस्तुरीया मृग मिळतो परंतु हे दिवस नव्हेत. वर्षाकाळास प्रारंभ जाहला असतां येथून माणसे पाठवावी. विजयादशमीच्या दिवसात वनगाई व कस्तुरीया मृग येथे येईल तो हिवाळ्या दिवसांत साताऱ्यात पुण्यात पोहचूं शकतो. आता उष्ण काळांत तो कदापि चार मजलीहि निभणार नाहीं. या प्रकारचे वर्तमान

आहे. या कार्यानिमित्य एखादा छोटे-
खानी कारकून श्रीनगरास पाठवितो.
तेथल्या राज्यास स्वामीच्या तर्फेनें कांहीं
जिन्नसहि पाठवून या दोही वस्तुचा तलाश
करितो. सेवेशी श्रुत होय बहुत काय
लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Shahu orders the Peshwa to procure several curious animals from the Himalayas.*

No. 23]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व
तथा राजश्रा आपा स्वामीचे
सेवेसी.

आपल्ये मल्हार तुकदेव कृतानेक सा(ष्टांग) नमस्कार विनंती. येथील कुशेल ता। छ २२ ज(मा) दिलाखर पर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी राजश्रीकारणे घोडा पाठविला होता. त्याचा पहिलें अर्थ लिहून पाठविला होता. त्यावरी आजी प्रात:काली दरबार जाला. तेव्हा पागेतून घोडा पाहावयास (आ)णविला. तेव्हा राजश्री देवजी सिर्के व नागोजी घाटगे व त्रिंबकराव धायेगुडे व आणखी लोक बोलिले कीं, घोडा उतम नाही. परदेसी घोडा मागें कमी पडिला आहे. उमर वरसें सात आठ जालीं आहेत म्हणून बोलिले. त्यावरी राजश्री बोलिले कीं, आम्ही तोंड वासून घोडा मागितला. तसा * * * * हीं आम्हा योग्ये नाहीं. मलीक रिकिबदारास फेरून पाहावयास सांगितला. त्याणे फेरून आणिला. त्याणे सांगितलें की, घोडा वोढक फार * * * * माहाराजांच्या कार्याचा नाही. यैसे बोलिला. (घो)डा राजश्री च्या चितास नये. म्हणून फ * * * * * * व सुभाननाक वगैरे यांजबराबर················माहे सरोसर जरी घे················पार देऊन विकत घेतली················येकून दोनी सरोसरा पाठविल्या आहेत. व पहिला साज समेत पाठविला असे. लाड * * बहिरनाक सुभाननाक वगेरे चौघे करोल यानी खर्चास (मागि)तले; त्यावरून त्यास व घोड्यास दाण्यास रु * * * काडजी व सुभाननाक याचे

हवाला केले आहेत. त्याचा हिसेब स्वामीनी त्या दोघाज(वळून) घ्यावा. घोडा उतम आरबी थोर * ल * * * पाठविला पाहिजे. येविसी अनमान केला न पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdev Purandare writes to Bajirao about the horse which Bajirao had presented to the King. The horse did not meet with approval.*

No. 24]

छ १९ जाखर

श्री

+पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. बुधवारी दरबारी राजश्री स्वामी बोलिले की, ये गोस्टी मोठी बेवकुबीची जाहाली की, राजश्री प्रधानपंतास मागितला; हे उतम न जाहाले. यैसे बोलिले. त्यावर आम्ही उतर दिल्हे की, माहाराजानी घोड्याविसी हुकूम केल्यास काही विसर पडला अगर हैगै केली यैसे नाही. आम्ही येक दोन वेला लिहिले होते. त्याचे उतर आले की, घोड्याच्या तलाशात आहो. माहाराजाच्या मर्जी माफक योजून लौवकरीच पाठवितों. यैसे आले आहे. यैसे आम्ही बोलिलो. त्यावरी राजश्री बोलिले की, याउपर आम्हास त्याचे घोडे घेणे नाही. त्यावर मागती आम्ही उतर दिल्हे की, घोड्याविसी काही हैगै जाहाली नाही; असे असता माहाराजानी असे म्हणावेसे काये आहे? घोडा लौकर येईल यैसे बोलिलो. तरी स्वामीनी हैगै करावीसी नाही. बिशाद फारसी नाही. तर अगत्य घोडा पाठवावा. येविसी अनमान न करावा. कुतऱ्याविसीहि वरचेवर राजश्री आज्ञा करितात. तरी तलाश करून कुतरीहि पाठवावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

¶*Mahadaji Purandare to the Peshwa and Chimaji that the King is quite upset over the Peshwa's negligence in the matter of complying with the King's request for a horse. It should therefore be sent with all despatch.*

+ पत्र महादाजी अंबाजीचे.

No. 25] [*1740 ?*

श्री

विनती उपरी. अमरसिंग बुंधले याणी बाज व जुरे व कुतरियाची जोडी राजश्री स्वामीकडे रवाना केली होती. त्याजबराबरी बालकिसण परदेसी होता. याची खर्ची सरली याकरितां याचे सोबती होते त्याणी यास माघारा लाविला. तो राजश्री बहिरजी निबालकर यांच्या लष्करासमागमे आला. त्यांच्या कारकुनांनीं याचे दोन गलथे[1] घेतले आहेत. ते देत नाहींत. त्यास बोलाऊन आणून यांचे गलथे यास देविले पाहिजेत. विशेष काय लिहीणे. हे विनती.

¶*Dogs, hawks and other hunting animals of prey are brought for Shahu from North India.*

No. 26] [*22-8-1740*

पाा छ १३ जमादिलाखर

श्री

तीर्थरूप राजश्री आपा व ताा
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

अपत्ये मल्हार तुकदेऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ १० जमादिलाखर भृगुवासर दीड प्रहर रात्रपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. आतापासून दसरादिपवालीपर्यंत माशाचे सिकारीचा हंगाम आहे. यास्तव माशाचे डाव जागजागा राजश्री स्वामीनी घातले आहेत. नित्य जाऊन गल टाकून बसावे, त्यास आजी सायेकाली सिकारीहून आल्यानंतर दरबार जाला. माशाचे व सिकारीची चर्चा निघाली. तेव्हां गलाचे दोरीस बारीक सूत असावे म्हणून बोलिले. त्यावरी कितेक लोक बोलिले की बऱ्हानपुरी खानदेशचें सूत बहुत बारीक मिलते म्हणून चर्चा केल्या. त्याजवरून राजश्री स्वामीनी आम्हास बोलाऊन नेऊन आज्ञा केली की दीडसे रुपयांचे सूत अतिउतम बारीक खानदेसी बरानपुराहून विसावे दिवसीं येथे आणवणे म्हणून आज्ञा करून स्वामीसहि सहीचे पत्र लिहिलें आहे. तर ही पत्रे पावतील तेक्षणी मुजरद जासूदजोडा तयार करावा. त्यांचे पदरीं दीडसें रुपयांचे हुंडीपत्र करून द्यावें. कमावीसदारास सुताविषीं ताकीदपत्रें लेहून देऊन बऱ्हानपुरास रवाना करावें. कमावीसदारास ल्याहावें कीं येक दोघां सावकारांचे घरीं सूत बहुत बारीक आहे त्याचे ठिकाण पाहून अवघ्या सुतापेक्षां

---

1 Loads or bundles.

जे बारीक चांगले मिळेल ते खरिदी करून दीडसे रुपयांचे टाकोटाक पाठऊन देणे म्हणून बरी ताकीद करून ल्याहावें व जासुदासहि मार्गी सत्वर जावें सत्वर यावें यैसी ताकीद करावी. सदरहू सुताचे रुपये १५० दीडसें हरयेक यैवजी मजुरा देऊन म्हणून राजश्री स्वामी बोलिले आहेत. देतील. सिकारीचें अगत्य राजश्रीस बहुत आहे. स्वामीस विदितच आहे. तरी अविलंबे सूत राजश्रीस येऊन पोंहचे तो अर्थ केला पाहिजे. पैक्याची वरात स्वामी तिकडीलच कमाविसदारावर लेहून देऊं म्हणतील तर कमाविसदारापासून पैका आतांच येणार नाहीं आणि दिवसगत लागेल. यास्तव रोख पाठवावा अगर हुंडी पाठवावी आणि सूत खरिदी करून आणवावें. विदित जालें पाहिजे. राजश्री स्वामीस उत्तर पाठवावें कीं, महाराजांचें पत्र पावतांच सूत आणावया माणसें पाठविलीं म्हणून ल्याहावे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Letter from Purandare to Chimaji Appa, communicating him Shahu's orders to purchase fine twine for the King's fishing rod, as he was fond of fishing.*

No. 27]

श्री

श्रीमंत क्षत्रिये कुलावंतस माहाराज राजश्री
छत्रपति स्वामीचे सेवेसी.

विनती सेवक निलकठ बलाल कृतानेक विज्ञापना विनंती. स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचे व या प्रांतीचे वर्तमान छ १२ रबिलाखर पावेतों येथास्थित असे विनंति. स्वामीचे आज्ञापत्र सादर (ज्ञा.)लें. तेथें आज्ञा कीं रामचंद पायेदामी[1] व माहादजी खापणा लावेबाज[2] पाठविले आहेत. यांबराबर माणूस देऊन लावे धरून आणून पाठवणें म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रमाणें त्याबराबर माणसें व सुताचे चिवट[3] येक देऊन पाठविले. त्याणीं लावे धरून आणिले ते सेवेसी घेऊन आले आहेत. सेवेसी विदित जाले पाहिजे. यांस वेचांस[4] रुपये वीस २० +देविले ते आज्ञे प्रमाणें पावविले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापनां.

¶*Letter addressed to Shahu by Chitnis Nilo Ballal informing him of his having sent birds as ordered.*

---

१ पायेदामी = जाळी टाकून अगर लावून पक्षी पकडणारे.

२ लावबाज—लाव, लावा = पक्षिविशेष, शिकारखान्यांतील लाव्यांकडचा कामगार. जसे, हरण-बाज, खबुत्रबाज.

३ चिवट—A roll of coarse cotton thread. It is usually ten or twelve cubits long and consists of from one hundred to two hundred winding around the तानवट or two stakes.

४ वेच – खर्च. + वळण निराळें.

No. 28]

पौ छ १९ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

पोष्ये अंबाजी त्रिंबक कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुषल ताा छ १५ जमादिलाखर जाणून स्वकीये कुषल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री स्वामीनी बाजजुरे याचे खरिदीबदल स्वामीकडून पाच हजार रुपये विद्यमान राजश्री अनंदराऊ सुमंत देणे ताा मल्हार प्रभु देविले. त्यास आम्ही स्वामीपासी होतो. याकरिता राजश्री स्वामीची पत्रे घेऊन राा मल्हार प्रभु स्वार होऊन जेजुरीस गेले. आम्ही सातारियांस आलो. त्यावरून मार-निलेनी आम्हाकडे राजपत्र पाठविले. त्यावरून आम्ही आजी छ मारी राजश्री कृष्णराऊ व राजश्री जिवबा चिटनवीस याच्या विद्यमाने वाघोजी कामथे हवालदार व राघो माहादेव कारकून यांचे पदरी रु ५००० पांच हजार घालून कबज घेऊन दप्तरी ठेविले. स्वामीस वर्तमान कलावे याकरिता लिहिले असे. राजश्री मल्हार प्रभु स्वामीची भेटी घेतली राजपत्र स्वामीस देतील. पैका मागतील तर त्यास काही न देणे. विदित जाले पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनती.

¶*The writer informs Bajirao that five thousand rupees have been paid out to purchase two hawks for His Highness.*

No. 29]

श्री

पुाा सेवेसी विज्ञापना राजश्री बोलले कीं, वाग. पाठऊन द्यावासा करार केला होता. त्यास अद्यापि वाग आला नाही. कदाचित वाग दुखवला असेल. तरी वाघीण तऱ्ही पाठऊन द्यावी. तरी स्वामीनी वाघ रवाना केला असिला तरी उतमच. नाही तरी वाघिणीची आज्ञा करून पाठवावी. सेवसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Shahu orders a tiger and a tigress.*

No. 30]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. सिमघीयाचा खेल संपूर्ण जाला नाही. दशमी पावेतो आहे. त्यास छ २० सवाली रविवारी दोप्रहरा वाघाची हवी आली. याकरितां राजश्री स्वामी सिकारीस गेले. पाटिलाचे स्मरण केले. याउपरी सिकारीस जातील. पाटील सत्वर स्वामीनी पाटविले म्हणजे येथे आमचा आब राहील. नाही तर राहत नाही. क्रोधास येतील. ते समई समस्ता देखता काये बोलतील ते कलेना. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Apa is informed that the King, having learnt that tigers are abroad, has gone out hunting and expects huntsmen to be sent to him immediately.*

No. 31] [*1737*

पाा छ ३ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती चाकरमाने पाटलाचे त्वर्ष[१] राजश्री स्वामीनी लाविले आहे. नित्य आम्हास पुसतात पाटील आले कीं नाहीं, तुमच्या चितांत आणावयाचे नसेल तरी तसेंच आम्हास सांगणे. आम्ही हुजरे मसाले पाठऊन आणितो. यैसे बहुत प्रकारें बोलतात. तरी तूर्त काही थोडेबहुत पाठऊन द्यावे. सत्वर पाठविले पाहिजेत. येथें दुमल(?) बहुतच केली आहे. विदित जाहाले पाहिजे हें विज्ञापना.

¶*Shahu enquires why the Patils in employ for his Shikar have not been sent.*

---

१ तगादा त्वष्ट.

No. 32]

पाा छ ४ जिाद

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सांप्रत राजश्री स्वामी चौघटिका रात्रीस सिकारीस जातात. संध्याकाली येतात. दोनतीन घटिका राज्यकारभार करावयाचा तो होतो. मग आवघियास निरोप होतो. याप्रमाणे पांचसात रोज जाले. पुढे किती दिवस चालेल ते पाहावे. तीनचारसे माणसाचा स्वयपाक सिध करून रानात न्यावा. भोजने तेथेच करावी. बहुत संतोषरूप आहेत. जे समई राजश्री संभाजी राजे याचे पत्र येते ते समई मात्र आम्हावर कोप होतो. तो समये गेल्यावर मग काहीच नाही. अद्याप स्वामीचे राऊत पुणियास आले नाहीत. मागती पत्रे लेहून आणिले पाहिजेत. सेवेसी विज्ञापना.

¶*King Shahu is reported to be spending the major part of his time in hunting and has his repast served in the forest.*

No. 33]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर मुाा किले तलागड साष्टांग (दंडवत) विज्ञापना ताा छ २७ माहे शौवालपर्येत स्वामीचे कृपावलोकनेकडून शेवकाचे व प्रांत-मजकुरीचे वर्तमान येथास्थित असे विशेश. आज्ञापत्र छ ४ सवाल पैवस्ता छ १४ मिनहूं, तेथे अज्ञा कीं "बटकीच्या पोरी दोन बहुत चांगल्या दाहा अकरा वर्षांच्या निरोगी, नाचावयासी लायेक लाविलीयानी उपयोगी पडत यैशा आणवणे-विसीं राजश्री स्वामीची येकांतीची फर्मास आहे. तरी प्रैत्नपूर्वक मेलऊन येथे पसंद पडत वोईट न म्हणत यैशा पाहून पाठवणे" म्हणौन आज्ञा. यैसियासी इकडील माणूस आहे हे स्वामीस विदीतच आहे. कुणबी माणूस काले[1] रीस, देखणें नव्हे. पाहाता वीट येतो. यैसेही असोन शोध मनास आणिला, परंतु स्वामीनी लिहिल्यांप्रमाणें वस्त मिलत नाही, व बदसुरत कुंगार[2] असिल्या तरी

---

१ 'काले रीस देखणे नव्हे'—या वाक्याचे दोन अर्थ संभवतात. इकडचीं माणसें काळीं रिसासारखीं म्ह. अस्वलासारखीं असा एक अर्थ होईल. किंवा रीस देखणा (रीझ देखणा—रिझविण्यसारखा सुंदर) असा शब्द स्वीकारून इकडीऌ माणसें रीझ देखणीं म्ह. सुंदर नाहींत असाहि अर्थ होईल. कोकणांत रीस ही एक माकडाचीहि जात आहे.

२ भिकार.

घरिच्या पोरग्या द्यावयासी कोण्ही रजावंद होत नाहीं. अतिशये करावा, तरी मुल्लक दुतर्फा, यास्तव कार्यास नये. तैशामध्यें लिहिल्याप्रमाणें प्रयोजनिक वस्त असिलियासी हरयेक प्रेत्न केला जाता. परंतु स्वामीनी लिहिल्याप्रमाणे या प्रांती वस्त मिलत नाही. सेवक आज्ञाप्रमाणे तलासामध्यें आहों. तलासें मिलालियावर अंतर होणार नाही. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Shahu ordered from the Konkan two young girls as maid servants. Khandoji Mankar replies to the Peshwa that good-looking girls of the type required were not available in the Konkan.*

No. 34]

श्रीभार्गवराम.

सेवेसी विनंती उपरी राजश्री प्रधान पंताकडे धिंगराज भाट यास रुपये २०० दोनसे देविले पाहिजे हे विनंती.

¶*Shahu's gift of Rs. 200 to a bard.*

No. 35] *[12-7-1749*

राजमंडल मा॥ पोते रोजकीर्दी
माहे शाबान सुरु खमसैन

तेरीख ७ रोज सौम्यवासरे श्रावण शुद्ध नवमी मु॥ गोडोली.

पैकी नोंद

बंद ८ वा — यैवज दरमाहा आशाढ मास व सिलक ता॥ जेष्ठ मास पैकीं खर्च

नटवे वगैरे. हिरामण

१९ १४८÷ यैन
|||≥ कसूर

१९

४० दुर्गादास
२९ खासा
१९ देविदास

४०

३२ सेटी बिन रघुनाथ ताा गंगाराम
२२ खासा
१० मानराव

३२

३६।।। राणोजी गुंजकर
२०।।। खासा
१६ नागोजी

३६।।।

२१।।। तुकोजी पडतुरकर
१९ गोविंदा बीरभान
२० फकिरा वगैरे
१९ नरसिंगराव
१९ खिरसागर
१९ राहुजी
१६ भगवती हणवंतराव
७।। आपाजी बिन सिवाजी
२० नसू बिन बसवाजी
३० तुळजी राव वगैरे
१९ येलगडप
९ खासा
९ भवानी
९ बसवाजी
२० लालमण दिाा आमीना ताा सुक· मादाई
१९ संगीतराव
३० शंकर जोगी वगैरे
९ खासा
६ येसू
६ गोविंदा
६ जयेराम
३ कसूर

२५ गणोजी जोगी वगैरे

१० खासा

५ आनंदराव

५ भवानी

५ मानाजी

२० गंगाराम वा। भगवान

१० खासा

१० हैबतराव वा। येशवंतराव

७५ धोंडी जोगी वगैरे आसामी

१ खासा बिन जनार्दन जोगी

१ गंगाजी बिन त्रिंबकजी जोगी

१ आपाजी बि॥ त्रिंबकजी गुरव

१ रामाजी बिन गणोजी जोगी

१ गोविंदा बिन सकोजी गुरव

१ मुरारजी बिन त्रिंबकजी जोगी

१ सिवाजी बिन त्रिंबकजी गुरव

१ भागोजी बिन त्रिंबकजी जोगी

१ चिमाजी बिन सुभानजी जोगी

१ संताजी बिन सुभानजी रुजू जनार्दन जोगी

१४५॥. गुरव लोक

२० रघूजी बिन रखमाजी

४८ भवानीदास वगैरे

२५ खासा

२० तुळाराम

१ बोहण

२ बसफोड

१६ संभू बिन माहादजी ता। मावजी

२५ सदाशिव

९ खंडोजी ठोसर
७॥ आवजी बिन दमाजी
१० राणोजी आंबडकर
१९ बापूजी गुरव.

¶*This is a list of the Court-players of Shahu with their monthly salaries.*

No. 36]
पौ छ २९ मोहरम

श्री

+पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री शिवाजी यांची कन्या राजश्री स्वामीनी येथें ठेविली होती. तिची रवानगी राजश्री संभाजी राजे यांजबराबरच करीत आहोत. दहा सहस्राचे अलंकार घडून आंगावर घातले. सात पोषाक द्यावयास केले. हस्ती द्यावयास केला आहे. स्वामीस कळावें याकरितां लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Purandare communicates to Chimaji Appa the news that Shahu has taken care of Daryabai Nimbalkar and sent her home with a gift of ornaments.*

No. 37]
पा छ २० साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलाचे सेवेसी.

विनंती उपरी. गोपाळ आरडया व गोविंद बिडवई व सिवजी गोलकर लोहगांवकर येथें आले आहेत. त्यानीं राजश्री बसापा[1]ची भेट घेऊन सौभाग्यादिसंपन मातुश्रीबाई साहेबांस दाखल होऊन सांगितले कीं, कसबे मजकूर पहिले

+ पत्र मल्हार तुकदेव पुरंदरे याचें. शिवाजीराजांची कन्या दर्याबाई निंबाल्कर.

१ बसवंत खोजा.

मातुश्री जिजाऊ साहेबांकडे दरोबस्त गांव होता. तेव्हां पेठ बाजार भरून गावची लावणी होऊन उत्तम प्रकारें नांदविला होता. आतां खराब पडिला आहे तरी साहेबी दरोबस्त आपलेकडे करून घ्यावा. सात साला कौल द्यावा म्हणजे पूर्ववत प्रमाणें पांढर नांदऊन पेठ बाजार भरून. ऐसा कितेक प्रकारें भर भरून सांगितले आहे. सौ मातुश्रीबाई यांचेहि चितास आले आहे. पुढें गांव दरोबस्त करून घ्यावयाचा मजकूर करतील तरी स्वामीनी ये गोष्टीचा धरबंध अगोदरच केला पाहिजे. येथें जे त्रिवर्ग आले आहेत त्यांचे कसबे मजकुरी कोणी असतील त्याची तहकिकात करून आपल्याजवळ बोलाऊन नेऊन विचारे समाधानें त्यांस सांगून यांस घेऊन जात तो अर्थ करावा. केवळ जबरदस्तीच करावयाचे काम नाहीं. तेथें जबरदस्ती जाली म्हणजे हे येथें अर्धाकच लावालावी करितील. यास्तव युक्तीनेंच यास येथून नेले पाहिजे. महादशेट सेव्यास यावयास दिसगत लागली. या कारितां रा स्वामीनीं राजश्री राघो राम यास सांगितलें आहे की, जेजालबारदार पाठऊन मसाला घेऊन सेव्या व पांढर घेऊन येणे म्हणून त्यास आज्ञा केली आहे. स्वामीस कळावे या करितां लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

[पत्र नानासाहेबाचें असावें].

¶*This appears to be a letter by Nanasaheb to Chimaji, reporting that Sagunabai Rani and Basappa are concocting plans as regards the village of Lohagaon.*

No. 38] *[April 1747 ?*

श्री

राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांसी प्रती सौभाग्यादिसंपन्न बाईसाहेब याणी आज्ञा केली ऐसी जे, तुम्ही निरोपास आला ते समयीं आम्हापासी बोलला की, मौजे वडुतास श्री कृष्णास्नानास जातो, च्यार रोज तेथे राहीन. पुनरोक्त येथे येऊन साहेबाकडील लाहान मोठी कामे असतील तितकी विल्हे लाऊ. यैसा करार करून आज्ञा घेऊन गेला. आणि आजी ऐकितो की, तेथून कूच करून पुढे गेला हे कोण गोष्ट ? काये निमित्य आज्ञा न घेता रुसवा करून पुढे जाता हा अर्थ काहीच कळत नाही. हा मलमास[१]. आपणास जाणेच जरूर जाहले तरी वडुतच्या मुकामास माघारे येणे. मलमास क्रमल्या

---

१ अधिक मास.

नंतर येथील जाधवाकडील व बाब्याकडील कागदापत्राचा गुता वगैरे कामे उरकून महाराज राजश्री स्वामीची आज्ञा घेऊन जाणे. यामध्ये लौकीक उत्तम आहे. नाही तरी आज्ञा न घेता जाणे हे उचित नाही. पत्रदर्शनी तेथून वडुतास येणे. ये गोस्टीस अनमान कराल तर तुम्हास महाराजाच्या पायाची शफत असे व आमचे पायाचा शफत असे. जातेसमयी तुम्ही बोलला की, साहेबाकडील कामे विल्हे लाऊन आज्ञा घेऊन जाईन. यैसे बोलोन आमच्या पायाची आण वाहून गेला. यैसे असता आजी परस्परे स्वार होऊन गेला. यैसे चितात तुमच्या होते तरी आम्हासी आण वाहून काये निमित्य न पुसत जाता हे न कले. यैसे न करणें. उचित नाही. बहुत काये लिहिणे सूज्ञ असा.

¶*Sakwarbai to Peshwa Nanasaheb: beckons him to her presence and requests him not to depart in an angry mood.*

No. 39]

श्री

पु॥ सेवेसी विज्ञापना श्रीमंत सौभाग्यादिसंपन्य मातुश्री बाईसाहेब वाडा दुसरा यास स्वामीनी पत्र पाठविले. ते पत्र सेवकाने राजश्री माहादजी सालोखी याजपासी देऊन वाडियात धणी(णी)स गुजरलिले, त्यास स्वामीचे पत्र लाखोटा फोडून अक्षरशाहा धणीने वाचून पाहिले. परंतु निबगावचे कजियामुळे धणीन माहादजी सालोखी यास म्हणो लागली की, आपणास पत्र लागत नाही. त्याचे पत्र त्याचे कारकुनाचे हवाला करणे. त्यावरून आपणासी पत्र रा महादजी सालोखी व चिटनिविस माघारे देत होते. परंतु आपण घेतले नाही. निबगावामुळे धणीन बहुत नाखुश आहे. निबगावचा मजकूर धणीने सेवकास रुबरु पडद्याआड बोलाऊन आज्ञा केली. ते सविस्तर रा नानास लिहिले आहे. त्यावरून स्वामीस विदित जाले असल. स्वामीचे कागदाचा जाबहि न दिल्हा नाही. परंतु धणीन येका दोघा पासी बोलली की राजश्री पंतप्रधान याचा व माझा भाऊपण्याचा स्नेह लौकिकात फार आहे. येसे असून माझीच माणसे मारून पिटऊन घालितात. म्हणून मला त्याचा फार राग येतो. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Letter addressed to Peshwa Balaji Bajirao at Poona by some one of his party at Satara. It explains why the second Rani Sagunabai was offended with the Peshwa.*

No. 40] [पौ 23-9-1743 ?

पौ छ १९ साबान.

श्रीशंकर

पु॥ तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती. सांप्रत रघोजी बावावर धाकटे बाईची कृपा फारशी आहे. हमेश भोजनास बोलावावे. आपण खासा त्याच्या घरास जावें. प्रत्यह खलबतहि दोन च्यार घटका होत असते. फारशी ममता धरली आहे. आम्ही जातो तेव्हां स्वभाविक गोष्टी काढून रघोजी बावाचा स्तव फारसा करितात. कितेक जिनसाचे पोशाख व हरजिनस, हार, माला, फुले, नाना प्रा यांस आपले स्वहस्तें तयार करून पाठवावें; पकवानें करून पाठवावीं. ऐसी बहुतसी माया आहे. कळले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Purandare to Peshwa, reporting Rani Sagunabai's attentions to Raghuji Bhosle.*

No. 41] [10-11-1735

पा छ ११ रजब

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
राऊ व तथा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेबांस आरोग्येता व्हांवी म्हणून राजश्री स्वामीनी छ ९ रजबीं इंदुवारीं प्राथःकाली गजदान व उष्ट्रदान व दोन अस्वदाने म्हैसीची दाने दोन व पांच सात गोदाने व कृष्णाजनदान व किरकोल दश दाने ब्राह्मणास दिल्हीं; अद्यापि वेथेस चढ उतार कांही नाही. राजश्री परम क्लेसी आहेत. विदित जाहालें पाहिजे. स्वामीस वर्तमान कलावे याकरिता लिहिले आसे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Shahu distributes alms for the recovery of his queen, whose illness distressed him much.*

No. 42]

पौा छ १८ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती बावानीं बाईस निरोप पाठविला. नानाचे ठाई कृपा पूर्ण असो द्यावी, दुसरा विचार किमपि न धरावा. त्याचीहि निष्ठा तुमचे जागा आहे म्हणून सांगितले. तुम्हीहि बोलला होता त्यास आता ऐकितो कीं, नानावर अभक्त जाहाला आहे. तरी हेच आमचे ठाई निष्ठेचे भाषण बोलला त्याचे फल हे. तरी ही गोष्ट तुम्हा प्रभू लोकास उत्तम नाहीं. नानासारखा सेवक तुम्हास मिलणें नाहीं. तुम्ही लोकाचें इतरांचे बाष्कल वर्तमान ऐकून थोरले बाई सारखे करिता, तरी हे गोष्ट उत्तमांत नाहीं. नाना आमचे लेकरूं त्याजविसी आम्ही तुम्हांस सांगितले त्याचे फल तुम्ही हे आणले तरी याचे उत्तर यथार्थ चांगले पाठवा व लटका रोष टाकून देऊन नानाचे समाधान करून त्यास पत्र पाठवावे. नाहींतर तुमचा आमचा (स्ने) श्नेह कशास पाहिजे ? आम्हा लोकास तुमचा स्नेह काय उपयोगीं आहे ? यैसे सांगून पाठविले आहे. उत्तर लौकर आणा म्हणून सांगितले आहे. उदेक उत्तर आणा म्हणोन नारोबास सांगितले आहे. बावानीं आम्हास आणिक बोलाविले आहे. बाईचे उत्तर काय होते ते लिहून पाठवितो. सारांष बावाची कृपा निपूण स्वामीचे ठाई आहे. कांहीं चिंता नाहीं. सर्व उत्तम होईल. कलले पाहिजे हे विज्ञापना+

No. 43]

पा

छ १८ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी.

विनंती. स्वामीच्या आज्ञेप्रमाणे येवतेश्वरास आठा चो दिवसा जात असतो. बावास वर्तमान दरबारचे थोक थोक व उभयता बाईची मर्जीचे व राजश्रीचे

+ पत्र नाना पुरंदरे याचे हातचे.

सांगत असतो. नारायेण[१] स्वामीनींहीं मजला आज्ञा केली आहे कीं दो चौ दिवसा येथें येऊन वर्तमान दरबारचे व नानाचे ठायीं प्रीत आप्रीत राजश्रीची व दोघी बायकांची कसकशी आहे, दिवसेदिवस कसकशी होती, ते सांगत जावे म्हणून आज्ञा केली आहे. त्याजप्रमाणे व स्वामीच्या आज्ञेप्रमाणे जाऊन सांगत असतो. बावाहि सविस्तर पुसतात. एकांती सांगतों. नारायेण स्वामीची आमचे ठायीं बहुत कृपा आहे. सदैव आपल्या शरीराचे वर्तमान पुसत असतात. सांगत असतो. तूर्त धाकटीबाई क्षुद्र गोष्टीस्तव रागे भरून रुक्षता वाढवितात. लोकांचे आइकतात म्हणूनहि नारायेण स्वामीस श्रुत केले. तूर्त धाकटी बाई नारायेण स्वामीस फारसी भजत असतात. हमेशा फुले पाठवावी. नारोबा उपाद्धे बावाकडे पाठवीत असतात. हेहि वर्तमान नारायेण बावानीं आम्हास सांगितले. बाई नारायेण बावाचे दर्शनास गेली होती. तेव्हां बाईनीं बावास म्हटले कीं, मी लेकरूं आपले आहें. ज्याप्रमाणे नानावर कृपा आपण करितात त्या प्रमाणे मलाहि लेखून कृपा करीत जावी. म्हणून बहुतसी नम्रता भाषण केले. बावानीं उत्तर केले कीं बरें असो. तुम्ही सत्वगुणी आहां. कृपाच आहे. परंतु नानाचे ठायीं कृपा तुम्ही करीत अहाच परंतु अधिकोत्तर करीत जावी म्हणून सांगितले. ते वेळेस बाईनीं बावास उत्तर केले की, असे म्हणावेसे काय आहे? नानाचीहि माया आमचे ठाई आहे. आमची कृपा त्याजवर आहे. हेहि वर्तमान बावानींच मजवळ सांगितले. पहिले धाकटे बाईची कृपा स्वामीचे ठाई निपूण आहे म्हणून बावाजवल सांगत होतो व आपणहि येथें असतां बाईची कृपा फार आहे म्हणून बावाजवल सांगितले होते. त्यास तूर्त धाकटे बाईनीं क्षुद्र गोष्टींस्तव क्रोध केला आहे म्हणून आम्ही बावास सांगितले. बावानीं उत्तर केले कीं, नाना बहुत सजन आहे, त्याची वासना चित्त उत्तम आहे, कांहीं चिंता नाहीं, ईश्वर सर्व गोष्टी उत्तम करील. आम्हीहि ईश्वराजवल हेच चिंतन करितो. कांकीं नानाची माया हेतु आमचे ठायी आहे. म्हणून नाना आमचा हेच जाणून आहो. वरकड कित्येक प्रभू आहेत, आम्हास काय त्याचे प्रयोजन आहे? नानाचे आगत्य माया ही आम्हा लोकास कशास पाहिजे? परंतु वरकडा प्रभू सारखा नाना नव्हे. बहुत सजन थोर आहे. आमचे ठायीं बहुत माया धरितो. येणे करून आम्ही त्याचेच होऊन राहिलो आहो. नानाची चिंता आम्हास आहे. कांहीं चिंता नाहीं ऐस उत्तर दिल्हे व बाईस धाकटे नारोबा उपाध्या हस्ते बावानीं

१ नारायण भट पाटणकर. (?)

सांगून पाठविले कीं तुम्ही आमचे ठाई हेतु धरता कित्येक निष्टेच्या गोष्टी बोलत होता आम्ही ही तुम्ही सत्वगुणी म्हणून तुम्हासी बोललो होतो ते स्मरण आहे कीं नाहीं? दुसरी पुरवणी वाचावी.

¶*These two letters are from Nana Purandare to the Peshwa. They relate how the Peshwa tried through Narayan Dikshit Patankar and persons of that type to capture the good will of the two Ranis of Shahu and others. Brahmendra Swami and Narayan Dikshit appear to be tools employed by the Peshwa to carry out his schemes.*

No. 44] [*1740 ?*

छ ९ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
व तथा राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती राजश्री केदारजी केसरकर यांची कन्या वाडियांतील लिंगाई यांचे पुत्रास राजश्री स्वामीनी नेमस्त करून लग्ननिस्चये केला आहे. आपण खासा त्यांचे घरास जाऊन मुलीस हरिद्रालेपन करून आले. ये गोष्टीमुले बहुत अतिशये जाला. कितेक विपर्यासी भाषणे दोही पक्षीं जालीं. परंतु राजश्री स्वामीच्या चि(तात) गोष्ट होती तेच राजश्रीनीं अत्याग्रहे करून केली. कोणाचा काही उपाये चालिला नाहीं. स्वामीस कलावें म्हणून लिहिलें असे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना

¶*Shahu performs a marriage forcibly and attends the ceremony personally.*

No. 45]

पौ छ १९ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती राजश्री केदारजी केशरकर याची कन्या वाडियांतील लिगुबाईच्या लेकास राजश्री स्वामीनी अत्याग्रहें मागून देविले हे वर्तमान तपासिले पहिले लिहिले

होते. प्रस्तुत गुरुवारी लग्न जाहलें. राजश्री स्वामी व समस्त सरकारकून अश्व गजसहित मोठ्या समारंभ लग्नास गेले होते. त्यावर काली भृगुवारीं सौ मातुश्रीबाईसाहेबहि गेली होती व राजश्री स्वामीनी भोजनास गेले होते. भोजन केले. विदित व्हावें यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shahu performs the marriage of Kedarji Kesarkar's daughter with Lingubai's son.*

No. 46]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री कुसाजी व येसाजी भोसलें यांचे पंचवीस खडी मिठाचा कागद स्वामीस लेहून त्यांजकडे दिल्हा आहे. तो त्यांचा कोणी स्वामीकडे घेऊन येईल, तरी स्वामींच्या चितास आलें तरी द्यावें. नाहींतरी न द्यावे. येथून भिडेस्तव कागद लेहून द्यावा लागतो. विदित जाहालें पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao, informing him of the supply of salt to Kusaji and Yesaji Bhosle, sons of Shahu.*

No. 47] *[3-5-1747?*

छ ६ जालाकर.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं

विनंति. येसाजी भोसले यास आणावयास लखमोजी व लिंगोजी हवालदार राजश्रीनी पाठविले होते. दादा येत नव्हतेच. हमेश तीन्ही भव्या सडक चुवत असतात (?) तथापि यानी बहुत प्रयत्नें करून आणले. दादाचा व प्रतिनिधीचा कलहे आहेच. याजकरितां येसूदादानी से पन्नास राऊत शभर प्यादा हतीवर निशाण याप्रकारे प्रतिनिधीच्या घरावरून वाकडी वाट दाटून करून सदरेस आले. राजश्रीचे दर्शना जाहले. येसूदादाचा तमासा सदरेस बहुत होत असतो. कांहीं ताळ नाहीं. इतकेंही राजश्री सोसतात. काय आहे भगवान जाणे. असों उगेच वर्तमान हेहि सेवेसी लिहिले आहे हे विज्ञापना.

¶*Purandare writes to the Peshwa news of Yesaji Bhosle's unruly conduct. Yesaji and Kusaji were two illegitimate sons of the King.*

No. 48] [31-1-1741

नकल

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी

सेवक रघोजी भोसले सेनासाहेब सुभा कृतानेक विज्ञापना ताा छ २४ माहे जिलकाद मुकाम त्रिचनापली येथे स्वामीचे कृपाकटाक्षे सेनसह सेवकाचे वृत येथास्थित असे विज्ञप्ति. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहाले ते छ २० माहे जिल्कादी मुकाम मारी येऊन पोहचले. पौश बहुल त्रितिया बुधवारी सौवती मातुश्रीबाईसाहेब यास येकायेकी देवआज्ञा जाहाली. ईश्वरे मोठीसी आनुचित गोष्ट केली. परम खेद चितास जाहला तो पत्री कोठपर्यंत विस्तार ल्याहावा? सेवकाचे चित परम शोकार्णवी पडिले आहे. तैसेच स्वामीची आज्ञा की, राजश्री फतेसिगबाबा भोसले याचे समाधान करणे. त्याजवरून बहुताप्रकारे शांतवन केले. परतु आतिशय खेद करून परम शोक केला. समाधान करीता चिताचा खेद न टाकीत तेव्हा स्वामीचे हस्ताक्षर दाखविले. स्वामीनी आपले पायाची शफत घालून लिहीले, ते अवलोकन करीता व सेवकाचे सागितलेवरून किंचित शोक टाकिला आहे. केवल मनःपूर्वक शोक सोडितील ऐसे नाही. स्वामीस दखलच आहे. स्वामीचे चरणारविंदाचा निजध्यास बहुतच करितात. याउपरी लवकरच स्वामीचे सेवेसी येतील. स्वामीचे चरणाचें अवलोकन जाहालियावाचून शोक टाकितातसे नाहीं. बहुत बहुत विचारे समाधान करीत आहो. लोकोपचारी किंचित समाधान दाखवून अतर्यामी बहुतच दुख करितात. आहिर्निसी स्वामीच्या पायाखेरीज दुसरे निजध्यासच नाही. स्वामीवाचून शोक दूर अणकाच्याने होणे नाही. बरचेवरी प्रतिदिनी जाऊन समाधान करावयास अंतर करीत नाही. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Raghoji Bhonsle writes from Trichinopoli to the king how he tried his utmost to console Fatesing in his bereavement consequent upon the loss of his mother.*

No. 49]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १६ राखर पर्यंत स्वामींचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असें विशेष. कैलासवासी

राजाराम स्वामीची समाधि किले सिंहीगड येथे आहे. त्यास तेथें प्रतिवर्षी समाराधना होत असते. प्रस्तुत हुजरून हुजरे सामानास्तव आले आहेत त्यानी गडास जाऊन गडीहून कर्यात मावलात सामानाचे रोखे आणिले आहेत. त्यास येविसी स्वामीची आज्ञा नाही याजकरितां रोखे आम्ही माघारे फिरविले. हुजूर बोभाट येईल याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. स्वामीची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करून. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh Khasgiwale to the Peshwa, requesting orders to provide for the anniversary of Rajaram at Sinhgad.*

No. 50]

श्री

राजमान्य राजश्री चिमणाजी पंडित यांप्रती आज्ञा केली ऐसीजे किले सिहगडी कैलासवासी माहाराजाचे वृंदावन बाधावयास काम चालीस लाविले आहे. त्याच्या साहित्याविसी तुम्हाकडे हरजी ढमढेरे पाठविले आहे. तरी अनकूल पडेल ते साहित्य करून वृदावन तयार होये येसे करणे. जाणिजे छ ६ सवाल बहुत काय लिहिणे.

लेखन
शुध.

¶*Sambhaji of Kolhapur to Chimnaji Pandit, ordering a tomb being built at Sinhgad for Rajaram Chhatrapati.*

No. 51] [*13-4-1723*

रा छ २८ रजब

श्री

श्रीमंत महाराज राजश्री छत्र-
पति स्वामीचे सेवेसी.

सेवक कान्होजी आंगरे सरखेल कृतानेक विज्ञापना येथील कुशल चैत्र बहुल चतुर्थी मंदवासरपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचें व या प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र सादर केले ते प्रविष्ट जाहाले. आज्ञा

केली कीं चिरंजीव राजसबाईच्या लग्नास मोंबतियांचें प्रयोजन आहे. तरी येक हजार मोमबत्या पाठऊन देणें म्हणोन आज्ञा. त्या वरून मोबत्या व गुलाब सिसे पाठविले आहेत

मोमबत्या

	वोझी सुमार	येकुण वजन खरेवजन	येकुण सुमारी दागिने
प्राा वोझें	१	८१॥	८१
मोठ्या २४			
लाहान ५८			
८१			
प्राा वोझें	१	८१॥	१९०
प्राा वोझें	१	८१॥	१६४
प्राा वोझें	१	८१॥	१८४
प्राा वोझें	१	८१।९	१७०
	५	.।=।९	७५०

गुलाब सिसे वोझी चार येकूण सुमार २०

येकूण मोमबत्या सुमार साडेसातसे येकूण वजन खरे सवासातमण पाचसेर व गुलाब सिसे सुमार २० वीस या प्रमाणे रवाना केले असें. सेवेसीं श्रुत जाहलें पाहिजे हे विज्ञाप्ति.

शिक्का
कान्होजीचा

¶*Raja Shahu constantly ordered candles and other foreign articles from the Angres who probably procured them from the British.*

No. 52] [*3-8-1715?*

शाहुदप्तर स. नं. ५१

[शाहू छत्रपतीने कान्होजी आंगऱ्यामार्फत इंग्रजाकडून मागविलेलें सामान.]

यादी श्रावण वाा १ बुधवार छ १४ साबान.

२ इंगरेजी तरवारा उत्तम कोडी.[1]

२ सुऱ्या उत्तम इंगरेजी व हरजिनसी कोडी.

---

१ कोडी म्ह. २०.

०।० दांत[1] पका मण निकोपी

१ सुरी[2]

१ सुरी वजा पातळें

२ खाशा लायख

१ शाला

१ पशमी जामेवारी.

२

१०० गुलाब सिसे

४०० मेंबती.

०१ अगर[3] उत्तम पका

१ सुऱ्याच्या मुठी मोहऱ्याच्या व तऱ्हतऱ्हावार

०।० तबाखू सुरती

०२ तबाखू बगदादी

१०० कस्तुरीचे नाफे[4] सुमार

१ दारू खासा खेळायास पका खंडी

येणेप्रमाणे पाठवणे म्हणोन कान्होजी आंगरे यास पत्र लिहिणे. मसाल्यास सावटी कर्णे×

¶*Shahu orders foreign articles from Angre—elephant tusk, knives, cloths, rose-water, candles, tobacco, musk, gun-powder, etc.*

No. 53]

छ १९ रमजान

श्री

माहाराज राजश्री छत्रपती स्वामीचे सेवेसी विनंती सेवक नारो गंगाधर कृतानेक विज्ञापना विनंती ताा छ ९ रमजान पावेतो स्वामीचे कृपे करून सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विज्ञापना. राजश्री पंत अमात्य स्वामींनी रााा निलकंठ बलाल याजकडे पाच हजार रुपयेचे यैवजावर पाा त्यास सदरहू पाचा हजाराची विल्हे करून दिल्ही. राजश्री पत आमात्य यानी कोण कोणास रुपये देविले ते त्याचे पदरी घातले. उरला यैवज आपण घेऊन राा आमात्य पताकडे जाऊन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Gangadhar Mujumdar explains some payments to Shahu.*

---

१ हस्तिदंत. २ कपडा रेघांचा. ३ अगरू.

४ नाफे = नेफे = नाभी, Naval × कान्होजी आंगऱ्याचे ह्यातींत श्रावण वा। १ बुधवार = ३-८-१७१५ अर्थात् शाहू महाराजांनीं सामान मागविलें.

No. 54]

श्री

पुरवणी माहराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी विज्ञापना राजश्री माहदाजी पंताबराबर रेशीम पाटविलप्रमाणे येथे पोहचलें रंगवयास दिल्हे आहे. ते रंगावयास दिवसगत आहे. याकारणे पटवेकरी यापासून रंगीत रेशीम वजन सेर पक्के.

८८१ किरमिर्जी
८८२ वलीव पंचरंगी
८८५ कचे पंचरंगी मोठे.
८८३।९ कचें पंचरंगी बारीक.

८।१।९

येकूण अकरा सेर दीड पाव पाटविले असें. येकूण वजन बतीस टक्याचे सेर प्रमाणे पाटविले आहे. सेवेसी पावलियाचे जाब सादर करावया स्वामी समर्थ आहेत. रेशीम रंगावयास टाकिले आहे ते आलियावर अकरा सेर दीड पाव पंटवकरी यास देऊन बाकी रेशीम माहाराजाचे सेवेस रवाना करून. सेवेसी विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The paper mentions some silk clothes of Shahu being dyed in various colours.*

No. 55]

श्री

पुरवणी श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनती उपरी. स्वामीचे सेवेसी शालू च्यार देशी गतवर्शी स्वामीनी आज्ञा केली होती. त्या-प्रतीचे २५ पंचवीस व येलची दोडा वजन शेर ८८१ येकूण रा। भिकाजी साटम पाटविले आहे. सेवेसी प्रविष्ट होईल. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

श्री
श्रीशाहूनृपतिप्रीत्या
तुकोजीतनुजन्मनः। का-
न्होजीसरखेलस्य मुद्रा
जयति सर्वदा ॥

¶*Kanhoji Angre's letter to Shahu supplying shawls and cardamom.*

No. 56] [19-11-1711

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री अंताजीपंत स्वामी गो.

पोष्य यादव गोपाल नमस्कार विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे विशेष. राजश्री स्वामीनी हरभरेचे आंबीच्या घागरी २ दोन व आंबकापड हात २० वीस आणविले असे. तरी ज्या गावी हरभरा असेल तेथे ताकीद करून आंबीच्या घागरी दोन भरून व कापड आंबीचे वीस हात करऊन पाठऊन देणे. या कामास मानाजी कदम व सुभानजी बागुल जासुद जथे राणोजी जाधव जासूद पा. यास वेतनात दर रूपये २॥ अडीच प्रा रूा ५ पंच आदा करणे. बहुत काये लिहिणे, लोभ असो देणे हे विनंती. छ १९ सवाल सुहुर सन इहिदे अशर मया अलफ.

¶*Yado Gopal asks Antaji Shivdeo to send two potfuls of sour juice for Shahu.*

No. 57]

श्री

श्रीमंत माहाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी

सेवेसी खेलोजी कालभोर विज्ञापना येथील क्षेम ताा छ ११ मोहरम परियेत स्वामीचे कृपादृष्टी करून येथास्थित असे. राा सुभानजी अटोले याजबराबर घोडी कुमाईत व सिंगरु येक येसे आपले हवाल केली जे. लस्करात ज्याची त्यास पाऊन देणे. तरी आज्ञेप्रमाणे घोडी पावती करून देऊन. मारुफाती बुध चोपदार. घोडी आपणाजवली पावली, पावती करून. हे विज्ञापना.

¶*A mare and its colt are carefully handed over to their owner by Raja Shahu.*

No. 58]

श्री

सेवेसी विज्ञापना. कसबे सासवड येथील देशमुख पाटलास सुध व्हावयाचे पत्र आज्ञा करून देविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This bit of paper is in the handwriting of Chimaji Appa. It solicits orders to readmit into caste the Patil of Saswad.*

862

No. 59]

पाा छ १६ जमादिलाखर

श्री

पुत्रणी तीर्थरूप राजश्री राऊ

व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. केरोजी आटोले यांस श्रीहनुमंताची निष्ठा फार आहे; भक्ति बहुत करितांत. देवहि त्यांस संकटास पावती, यैसे कितेक विस्तारें करून पहिलें कोणी राजश्री स्वामीस सांगितलें होते; त्यास छ ११ जमादिलाखरी रात्रीं राजश्री त्रिंबकराव सोमवंसी सरलस्कर यांसमागमे राजश्री संताजी आटोलें व बजाजी आटोले व भिकाजी कांकडे व निराजी पवार वगैरे भले लोक राजश्रीच्या दर्शनास गेले. दर्शन जालें. सदरेस बसले तेव्हां चर्चेवरून चर्चा निघाल्या ते समई केरोजी आटोले यांची चर्चा राजश्री स्वामीनी आटोल्यांस विचारिली ते सत्यच आहे; त्यावरून राजश्री स्वामी बोलिले कीं केरोजी आटोल्यांस दर्शनास आणवणे म्हणून राजश्री संताजी आटोले व बजाजी आटोलें यांस व आम्हास आज्ञा केली कीं केरोजी आटोल्यांस दर्शनास आणवणे त्यांवरून स्वामीस लिहिलें आहे. तरी केरोजीं आटोल्यांस जातीनसीं राजश्रीच्या दर्शनास पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*King Shahu being much impressed with the devotion of Keroji Atole, asks that he should be brought to see him.*

No. 60] *[15-7-1749*

छ ११ साबान

श्री

पुाा तीर्थरूप राजश्री नाना व ताा राजश्री

भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी राजश्रीच्यां वृषणा सुजले. नारू किंवा वायु विकार. प्रथम दिवसी मुसलमान तबीबानी लेप लाविला होता. सोकित बसले असतां राजश्रीस मूर्छना आली. बापुजीबावा पलंगावर चढोन धरले. तोंड उघडून तोंडांत

पाणी घेतले. आर्ध घटिकेने किंचित पीत पडले. त्याउपरी चौका घटिकानी सावध जाहले. वैद व पंचाक्षरी आवघे जमा केले होते. दर्याबाईहि जवळ आली होती. हे वर्तमान मागेच ल्याहावे ते लिहिले नाही. यास्तव हाली लिहिले आसे. आजी तीन रोज जाहाले आद्यापिवर सूज तसीच आहे. उपाय होत आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Shahu's health in his last days.

No. 61]

श्री

श्रीमंत परमहंस श्री स्वामी

याही

चिरंजीव जगनाथ यासी आज्ञा. आम्ही निघालो ते छ १० रोजी श्रीस्थळी पावलो. बरोबर सूत्र काथ्या वजन ८२ दोन मण असोन नारळ सुमारी ५ पाठविले आहे. काथ्या सूत्र निगेनिसी ठेवणे व नारळ पाठविले आहेत याजपैकीं चिरंजीव शाहूस दोन देणे व चिरंजीव सौ सगुणाबाईस दोन देणे व तुम्ही येक घेणे; येणेप्रमाणे कर्णे. चिरंजीव चिमाजीआपा याजकडे श्रीचे जामदारखान्यापैकीं ऐवज येणे आहे त्याचा हिशेब त्याणी करून पाठविला होता तो पाहून त्याजकडे दोन माणसे बरी हुशार पाहून पाठवणे. रुपये आणोन ठेवणे. राजश्री येशवंतराव पवार याजकडोन भिक्षेबदल दुसाला तीन हजार रुपये येणे; त्याजकडे केसोबास रवाना कर्णे. आनेवाडी येथील झाडाची नीट रखवाली कर्णे, म्हणोन अंतोबास सांगणे. आम्ही तरी येवढे तुम्हाकरितां श्रम करितो. चिमणाजीचे पुत्रवत पालग्रहण केले तो तर आम्हास टाकून गेला. हा मृत्य लोक. आमचा भरवसा आहे असे नाहीं. काय ते आमचे पुत्र व सिष्य तूच आहे. मेळविले गावसीव पैका पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने खाणे. तुम्हास कोणी उपद्रव देणार नाहीं. मजमागे तुमचे शाहू चालवील. कोणते गोष्टीचे चिंता न कर्णे. जो उपद्रव होईल त्याचा निरवंष होईल हे समजणे. आम्ही वैशाख मासी येऊ. चिरंजीव शाहूस पत्र पाठविले आहे. तुम्ही जाऊन देणे व नारळ देणे; जाणिजे. इंदापुरचे तळयाचा बंदोबस्त ठेवणे म्हणोन सुलतानभाईस लिहिणे. वाड्यातील चौकी पाहरा नीट बंदोबस्ताने ठेवणे. जाणिजे हे आज्ञा.

864

No. 62]

श्री

तीर्थरूप परमहंस श्री स्वामी वडिलाचे शेवेसी

आपत्ये शाहूने त्रिकाल चरणी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दंडवत विज्ञापना. जेष्ट बहुल १३ पावेतो आसीर्वादे करून यथास्थित आहे. विशेष आज्ञापत्र आले त्यांत कितेक प्रकार लिहिले ते कळले. आंगरे याजविसीचा मजकूर लिहिला त्यांस त्याजकडे मुदाम जासूद पाठऊन आणवितो. राजश्री रघोजीराव भोसले याजकडोन व होळकर याजकडोन पुज्या वगैरे आले म्हणोन लिहिले ते नीटच जाहले. हा मृत्य लोक, मानवाचा भरवसा आहे असे नाहीं. ; म्हणोन वगैरे उदासिने लिहिले. त्यास आपण ईश्वर, जे करतील ते होईल. गावसीव पैकां मेळविला यास धनी कोण आहे? बहुत प्रकारे लिहून आले. त्यास असे लिहावयाचे कारण काय? मुळीच जगनाथपंत याचे पुत्रवत रक्षण केले तेव्हां तो धनी व आम्हा सर्वास गुरू याप्रमाणे आज्ञा जाहाली आहे. त्याप्रमाणे जगनाथ-पंत यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरे आम्ही व आमचे वंषांत जे होतील ते चालवितील यांत अंतर होणार नाहीं हे कळले पाहिजे. शालजोडी १ व मोहरा १०० येणेप्रमाणे पाठविले आहे. कृपा करून घेतले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Chatrapati Shahu very humbly supplicates the favour of Brahmendra Swami and agrees to continue in perpetuity the inam lands to the heirs and disciples of the Swami.*

No. 63] [23-6-1748

श्रीनिवास.

श्रीमंत राजश्री नाना स्वामी यांचे सेवेसी

विनंती पौष्ये केशवराव रघुनांथ कृतानेक साां नमस्कार विनंती येथील कुशल ताा आषाढ शुध अष्टमी मोा सातारा स्वामीच्या कृपेस्तव येथास्थित जाणून स्वकीय कुशलादि लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आलीकडे बहुत दिवस जाले स्वामीकडून सस्मरणपत्र येउन परामृश न जाला. यास्तव चित सोत्कंठित आहे. तर सदैव कृपा करून पत्रप्रेशणीं आज्ञा करावी. राजश्री स्वामी मेढियाची स्वारी संपादून आणखी उर्वरित स्वारी दिनचतुष्टयांत पूर्ण करू परावृत व्हावें तों रामोजी[१] सिरके यांस वेथेनें बहुत दाटिलें. यास्तव श्रीमत सौ बाईसाहेबांचे येणे नित्य त्यांच्या अवलोकनास्तव सातारियास यांवे लागले

१ सकवारबाईचा बाप.

म्हणून लस्करसहित जुन्या कळंब्यावर आले. तेथें दाहापधरा मुकाम जाले. त्याचे मुकामावर स्वामीकडून राजश्री गोविंदरावजी आले. भेटी जाली. वर्तमान त्यांच्या सांगितल्यावरून कळलें. सर्वही समयावर महकुफ आहे. आम्हांस न्युन्यांच्या[१] तलावरीच शरीरी ज्वराची पीडा होउन आम्हीं घरास आलो. आजी पंचेवीस रोज जाले. नित्य ज्वर येतो. उपाय होतच आहे. स्वामीचे कृपेनें आरोग्य होईल. रावजींहि ज्वराने श्रमी आहेत. त्यानंतर पर्जन्यानें आपला उद्योग अत्यंत आरंभिला. यांचे नित्य जाणे येणे न बने; श्रेष्ट तो मार्गेंच ग्रामप्रवेश केला समागमें आम्हींहि ते दिवसीं होतो. बहुतसा विराग दाखविला. परंतु राजग्रहप्रवेशभोजनाधिक संपादून मागती रामोजीबावांस पाहून लस्करास गेले. त्यानंतर दोनच्यार आवर्ती जाल्यानंतर नदीस पाणीं येऊं लागेलें. उभयतांचा वियोगहि येक दिवस जाला. तदोतर निश्चय होऊन गोडोलीवास नेमिला. तेथें अंतःपुरास ग्रह निर्मिलें. आपल्यास तृणग्रहच योजिलें आहे. सर्वांनीहि येथांशे ग्रहे दाक्षण्यास्तव घातलीं आहेत. नेहमी राहतां राजश्री देवरावजी मात्र आहेत. त्यास हे ते सारखेंच आहे. आणि मनोगतहि श्रेष्टांचे त्यांतच आहे. राजश्री त्र्यंबकरावनाना आले तेहि नित्य दरबारास जात येत असतात. त्यांस दोन रोज बाधले आहे म्हणून यैकतो. शरीर आहे. येवं प्रकारे रामोजीबावाच्या योगे करून समीप आगमन जालें. जर कोरेगांवी असते तर येक नदी व दोन वोहल. नदीहून अधीक, यांत बहुतांचा सेवट होता. श्रीस चिंता येथें आहे. निदानीं उपाय करिता करितां रामोजीबावाहि शष्टीच रात्रीं पंच (त्वाप्रत) पावले. येथास्थित माहुलीस नेले. वरकड होणे ते होतच आहे. चातुर्मास्य गोडोलीवरी होतो. तदोतर ईश्वरेछया. जें होणे ते विवाहादिक व्हावींसे आहे. पाहावे. आतां छपरे घालण्यांचाच शुगुल आहे. सिकार तो सहज स्वभावच. धणीण दाहा रोज घरींच वाडियांत आहेत. त्यांचीच अवृत्ती द्विवार होत असते. वरकड राजकीदेवकी चर्चा आहे, स्वामीस विदितच आहे. नवाब नासरजंग माघारें फिरलें म्हणून हुजूरची बातमी आहे. श्री जाणे. तेथें सर्व वृत आसेलच. राजश्री जानोजी निंबाळकरच आले आहेत. सर्वेहि स्वामीपासीं आहे. कर्नाटकात तह करून नवाबास द्यावा हें मानस राजपुत्रांचे. त्या अनुसंधनांची पत्रें सदैव यांची त्यांस जातात. त्यांचीं उतरेंहि येतात जे, करून देतों. हुजूर लिहिले आहे त्यांचीं उतरें येतात. करून देतो. विठलराव कोरेगांवांवर आले आसतां करार करून गेले आहेत, त्यावरी यांणी आधेण[२] ठेविलें आहे. कर्नाटकास हे उभयता त्यांपैकी राजश्री रघोजीबाबा तिकडेच गुंतलें. आतां

१ नुनें गांव आहे.

२ आधान = आधार.

यावरच देणे घेणे. तहाच्या भरोसीयावर आहेत. त्यापैकी आरकाडचे दोन लाख रुपये आले. वरकड येतील असें आहे. नाईक साप्रत कोरेगावांपासून वाडियांत पैगाम करून त्यांचे वच दोन महिनियांत तुझे बरे करीतों यैसें घेउन येक मास लोटिला. उरला लोटोन कार्य जालियां उतम. नांहीतर पूर्व रंग करूं म्हणतात. तें तैसेंच आहे श्रेष्ठाच्या मते आपण [illegible] देऊं केले, मागें दिल्हे, लाखा रुपयांचे माहाल त्यांत वेचले, ते देवविती आगर मुद्दल देववितो. मग यांचे लिगाड आम्हांकडे नाहीं. वाडा जाणेत ते जाणेत. हें आसें आहें. अंत:कर्ण पुत्रांचेच ठायीं कर्नाटकविशयीं दिसतें. होता होईल तें खरें. सेवेसी विदित व्हावे म्हणून नवें जुनें वृत लिहून आम्ही आपल्या सेवेचा मात्र मजरा करून [illegible]तला. स्वामीस सर्व विदित आहेच. बहुत काये लिहावे कृपा पूर्ण आसावी विज्ञापना.

Keshaorao Raghunath to Nana (Peshwa) from Satara. The letter in very humorous style gives many important details of Shahu's life, who [illegible]ed living in a hut thatched with hay in the height of the rainy season [illegible]ara. Further details are given regarding the intentions of Shahu and [illegible]g Bhosle (Prince) regarding the division of [illegible]rnatak, the covetous eye of [illegible]huji Bhosle and Babuji Naik in the same [illegible]on and the intrigues of Shahu's Rani Sakwarbai whose father Ramo[illegible]irke is reported in the letter to have died on 21st June 1748. Forr[illegible] mentions how Gordon of the British embassy had to meet Shahu in a tent with knee-deep of water during the rains. The letter is interesting in various ways. The reference to Babuji Naik repeating his attempt at suicide, supplies a clue to the date of the paper. That attempt took place in June 1748 (vide पु. द. भा. १ ला—१६९).

No. 64] [*End of June 1748*

श्रीनिवास

पुर्वणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी वरकड अर्थ मुख्य पत्रावरून विदित होईल. पेशजीप्रमाणे सावणूर बिदरुर सोंधें हें तिनी संस्थाने त्या राजश्री स्वामीकडून (आपणा) * * * कडें जालीं हें वृत तिकडोन आम्हांस बहुतांनी लिहिलें कीं हें कसें काय (आहे) * * आम्ही स्वामीचा प्रतापलेख आपल्या मतेच केला आहे कीं हे तीनी संस्थानेसीं काय आहेत, आगदी दक्षणचा व हिंदुस्थानचा बंदोबस्त सर्व श्रीमंतावरच आहे तेथें हें काय आहे ? सर्वेहि रुजु होणे यांतच खैर आहें आसें सहजस्थितीनें लिहितों. सांप्रत राजश्री मुरारजी हिंदुराव घोरपडे यांणी स्वामीस पत्रे लिहून मुजरद कारकून व जासूदजोडे पाठविलें आम्हांसहि हाच भाव

स्वामीची ममता आपल्या ठायीं आसावी हा अर्थ लिहिला आहे. सांप्रत ते व
नवाब हिदायेत मोहिदीनखान मिळोन दाहा बारा हजार स्वार आहेत. चित्रदूर्गकर
कस्तुरीरंगपा नाईक आहेत. संतेहोंनूर बिदरुरकरांचे, त्यास वेढा घालून
बिदरुरकरांस पैका मांगतात. तेथें पांच च्यार लाख रुपये घेऊन उठतील.
चित्रदुर्गकरानी तीनी लाख रुपये दिल्हे. याप्रकारे हिदायेत मोहीदीनखानांचे
चितीं नातूपंणांचा (?) आहंभाव होतो घोरपडे, व सेसआपा तो मिळोन आहेत.
गुदरान आहे. मनसबा कळतच आहे. त्यांस काय ते आज्ञा स्वामी लिहितीलच.
आंम्हांसहि आज्ञा करावी. त्याप्रमाणे आम्हीहि त्यांस लिहूं. श्रीकृपेनें जें स्वामी
मनावर धरितील ते घडेल असाच पुण्योदये स्वामीचा आहे. तेथें राजश्री जानब
आले आहेत त्यांचा स्वामीचा इतर भाव नाहीं. या समयीं कर्नाटकचा बंदोबस
स्वामीचे हाते होये असें जालियां उतम. स्वामी जे गोष्टी विचारास उपयोगी
करीतीलच. सैन्यांत स्वामीस त्या समारंभें करून पाहवे असा हेतू होता
पूर्ण स्वामीनी मुजरद केला. दुसरा हे(तु) पुण्यांत स्वामी असतां तें सर्व
नूतन सदरा बाग पाहावयाचा हेतू आहें. पूर्ण करणार स्वामी समर्थ
आहिर्णीसीं चित्तवृत्ति... ...मीपच आहों. कदाचित दैवगतीनें स्वामी ...कृप
करून दर्शनांचा योग ...ल्या सांप्रत सहजवृत्तींत राजश्री माहाराव ...नोजी
निंबालकरहि तेथें आहेत त्यांच्या दर्शनाचा लाभ जाला तर होऊं ये. हें सर्वही
स्वामी कृपा करून लळा चालवितात म्हणून भलतेंच मनोगत सेवेसी लिहितो.
सारांश येक स्वामीची कृपा असतां आम्हीं कोठें असिलों तरीं शोभिवंत आहो.
राजश्री स्वामीनींहि हस्ताक्षर पत्र स्वामीस पाठविलें आहे. म्ह(ण)णें कीं कांहीं
सांगणें पुसणें आहे तर राजश्री बाबासच * * * ते पत्रे पावलीं
असतीलच. आम्ही तो ते समयीं दरबारीं नव्हतो, परंतु * * त्यांणी
आभिप्राय सांगीतला कीं पर्णग्रामीहून[1] कांहीं वार्तासंभुतीश्रवणे साशंक होऊन, ते
तों वृत निराकरणसें करून क्षणेकावर हें पत्रें स्वामीस पाठविलीं आहेत म्हणून
यैकीलें ते हि सुचविलें असे. बहुत काये लिहावें कृपा पूर्ण असावी हे विज्ञापना.
पानगावांस पत्रे पाठविली त्यांणी लिहिलें की काय आहे तो शोध मनास आणणे.
त्यावरून कासीरायाचे पुत्र खंडेराव न्यायाधिस तात्काल करून मातबरी देऊन
पाठविलें आहेत याउपरी काय होते पाहावे हे विज्ञापना.

Keshaorao Raghunath to the Peshwa, giving him news of Shahu's Court, particularly as regards the affair of Karnatak to which several persons were making their claims. The last lines mention an inquiry of (Ramraja residing at) Pangaum and the dispatch there of Khanderao Nyayadhish by Shahu. This warrants the date of the paper to be about 1748.

---

१ पानगांव.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

९

बाजीराव–कौटुंबिक

१७२०—१७४०

[किंमत— १० आणे किंवा १ शिलिंग १ पेन्स]

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई

१९३१

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

BAJIRAO AND HIS FAMILY

With the death of Aurangzeb in 1707, the illustrious dynasty founded by Babur began to decline, and upon the political arena of the Indian continent appeared rival claimants who hotly contested the suzerainty of the defunct empire. The Marathas, against whom the old monarch had carried on a ceaseless struggle for nearly a quarter of a century, remained unsubdued to the last, and when they found the opposition crumbling away, they were not slow to avail themselves of the advantageous position they had won. They crossed the Nerbudda and overran the rich provinces of the empire. In their career of conquest fortune favoured them with a leader of rare ability in Bajirao Ballal, about whose family the papers here presented furnish interesting details.


Bajirao, a bluff soldier, interested himself but little in domestic affairs, which were ably managed by his mother Radhabai and his younger brother Chimaji Appa. [redacted]t was under Radhabai's iron discipline that Bajirao and Chimaji w[redacted]ed to the habits of simplicity, adventure and industry to which th[redacted] their success in life. Radhabai's masterful personality looms larg[redacted]se letters. She makes anxious inquiries about her children an[redacted]doings ; she is afraid her son is no match for the wily Nizam, an[redacted]s Bajirao not to visit him unless accompanied by the Sumant an[redacted]ansi (Letter No. 7). Chimaji's ill-health causes her ceaseless a[redacted]nd she repeatedly requests him to return to Poona from the unheal[redacted]soon climate of Bassein. Everybody in the household holds h[redacted]r in the highest respect and obeys her smallest wish. She has only [redacted] mention she desires to bathe in the sea on the Amavasya day and C[redacted]ji makes elaborate preparations for her journey to Bassein from [redacted] (Letter No. 19). In 1735 she started on a pilgrimage to Benares [redacted] she completed in April 1736. In a letter (No. 11) couched in the most affectionate terms, Chimaji writes, "You desire to take little Sadashiv with you on your pilgrimage. No doubt he will receive presents from Sawai Jaysing and other princes. But why should we think about these princely gifts when we have everything one can wish for? Moreover he is so young, he will be a perfect nuisance to you on your journey! Mother dear, when I last parted from you I should have walked by the side of your palanquin on foot ; but to my regret, in the hurry of the moment the idea escaped me altogether. On account of this lapse I am quite upset, and I shall not feel at rest unless you assure me that you have overlooked my rudeness". Another letter informs us that the Maharaja of Udaipur gave the venerable lady a rousing reception when she reached his capital. Pilgrimages to Pandharpur, Mahabaleshwar and other sacred places in Maharashtra are referred to in some other letters. In matrimonial affairs Radhabai prudently tried to secure rich heiresses for her grandsons, realizing as she did the important part played by money in political undertakings.

Chimaji Ballal, or Chimaji Appa as he was familiarly called, is another striking personality. Rare are instances of fraternal love such as existed

between these two distinguished brothers. Though eclipsed by the exploits of his brother, Chimaji was in no way his inferior either at court or on the field. A brave soldier and a skilful general, Chimaji possessed that wonderful quality of tact, with which he helped Bajirao to retain the King's favour. Bajirao, engaged in distant expeditions, despised the petty intrigues of the Court at Satara, which but for the wise mediation of Chimaji, would have seriously hampered him in his task.

In the latter part of his life Bajirao became enamoured of a beautiful dancing girl of Musalman extraction named Mastani and completely neglected affairs of state. The origin of Mastani and her first meeting with the Peshwa still remain in the dim twilight of legendary history. But letters (Nos. 30-36) for the first time disclose what a commotion the Peshwa's growing infatuation and the licentious habits he seems to have developed, particularly as regards drinking and eating meat, caused in the family. A letter (No. 30) tells us that while the Peshwa was riding out one day he accosted the Patil of a village and in an unguarded moment asked to be provided with fowls. In another letter Chimaji informed his nephew Nana that Bajirao had solemnly promised to gi[illegible]king intoxicants after purifying himself in the holy waters of th[illegible]s, provided that his mistress was allowed to return. Chimaji how[illegible] pessimistic about the promise being kept (No. 31). The King[illegible]equested to admonish the Peshwa for his *liaison* could only say i[illegible] that Bajirao would be induced to mend his ways not by externa[illegible]e, but only when he could be brought to repent (No. 32)[illegible]aji in utter exasperation remarks, " I tried my utmost to persua[illegible] mend his ways. But God wills it otherwise. I leave him to his [illegible]


Some of the Peshwa's relatives are mentioned in letter (No. 41). Govind Krishna writes how the work at the Poona Palace was progressing. Some captive *Firangees* were skilful workmen and were put to work at the b[illegible] Telescopes, lamps, glasses, watches and other articles of Europea[illegible] interested the Peshwa greatly, and were bought for him by his agents posted at Bombay (Nos. 9, 10).



श्री

Facsimile of the handwriting of Chimnaji Ballal. *(Died on 31-10-1740)*

No. 53


श्री

Facsimile of the handwriting of Bajirao Ballal (*1720–1740*).

श्री

वेदमूर्ती राजश्री कृष्णभट करवे स्वामीचे सेवेसी सेवक बाजीराऊ बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहलें. अनुष्टान अधिक वद्य त्रयोदसीस संपूर्ण होते त्यास काये आज्ञा ? संपूर्ण करावे तरी पूजा दक्षणा व येथील ब्राम्हणांस भोजन पाहिजे. पुढे चालते करावे तरी ब्राम्हणाचे श्रम आहेत दक्षणा द्यावी लागेल न ये गोष्टी * * * * * * वी म्हणून लिहिले. यैसियास अनुष्टान तुम्ही भाद्रपद सुध चतुर्थीपर्यंत अनुष्टान चालवणे. ब्राम्हणास सामग्री पाहिजे त्यास पेशजीचे मोईनेप्रमाणें नारो जनार्दन याजकडून देविली आहे व पुजेचे व दक्षणेचे साहित्य लागल त्यास रा त्रिंबक हरी सुभेदार पा सुपे यास आज्ञा केली आहे. साहित्य करितील. पुजेचे साहित्य सुपाहून अनकूल पडल ते पडल. तेथे अनकुल न पडे तरी येथे लिहून पाठवणे. येथून पाठऊन. अनुष्टान चालते करणे. संपूर्णास च्यार पाच रोज पुढे राहातील तेंव्हा ब्राम्हणाचे दक्षणेची व ब्राम्हण भोजनाची अनकूलता येथून करून पाठऊन. अनुष्टान तुम्ही करीत आहा परंतु ज्या कार्यासाठी करविले आहें त्या कार्याचे निदर्शन येत नाही. तेव्हां अनुष्टानाचे ठायी कांही अंतर पडते किंवा काये हे न कले. या उपरी समस्त ब्राम्हण येकचित्ते किमपि अंतर पडू न देता निष्टापूर्वक अनुष्टान करून कार्य-सिधी सत्वर होये ते करणें. येविसी तुम्हास विस्तार ल्याहावा यैसा नाहीं. सामग्रीची अनकूलता नारो जनार्दन याजकडून करविली आहे. ते अनकूलता करतील. जाणिजे छ २० सवाल बहुत काये लिहिणे. अनुष्टानास बहुत दिवस जाले परंतु स्वप्न काही होत नाही, तर अनुष्टान सांग होत नाही की काये ? अनुष्टान सांग करून जे गोष्टीने कार्यसिध होये ते गोष्ट केली पाहिजे. दक्षणा फार द्यावी लागेल ब्राम्हणास श्रम पडतो म्हणोन लिहिले तर ब्राम्हणाचे समाधान करून सागणे ब्राम्हणास दक्षेणा उतम प्रतीने देऊन. कलले पाहिजे * अनुष्टान सांग होऊन कार्यसिधि होये ते गोष्ट करणे. बहुत काये लिहिणे ? साहित्याविसी त्रिंबक हरीस आज्ञा केलीच आहे. कदाचित काही जिनस तेथे मिलेनासारखा जाला तर लेहून पाठवणे. येथून पाठउन देऊन. हे विनती.

¶*Letter addressed by Bajirao to Krishnabhat Karve, regarding some religious rites for attaining a certain object. Bajirao expresses wonder that the deity does not appear before the Brahmins in a dream.*

---

*From here the handwriting is of that Chimaji Appa.

२


No. 2] [1730 ?

श्री

श्रीसहस्रायु चिरंजीव राजश्री आपा यांसी

प्रतिपूर्वक विस्वनाथ भट मेहेंदळे वास्तव्य श्रीवर्धन कृतानेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा कार्तिक सुध पूर्णिमापावेतो सुखरूप असो विशेष. तुम्ही (त्रिंब) * * क विश्वनाथ याबरोबर पत्र पाठविले * * * तेथे लिहिले कीं गोविंद कृष्ण यांसी दूर केलें असे. मा * हून सरगुमास्ता पाठवावा तो राा केला जाईल. तूर्त महालोमहालचे गुमास्ते आहेत हे कामकाज चालवितील व मातुश्री आई तेथे आहेत ती दरयेक काजकाम सागतील त्यात मन घालून दरबारीची बोली चालू करीत जाणे. त्यावरून ते पत्र हुजूर रुजू केले बोलीचाली करावयाची ती केली. तों गोविद कृष्णासहि करार करून पाठविले ते हुजूर रुजू जाहले. यावर तेथील बोलीचाली जे जाली ती मागील व पुढील त्रिंबक विश्वनाथ मुखवचनें विदित करील त्यावरून सविस्तर कळों येईल व मातुश्री आईनें लिहिलें आहे त्यावरून विदित होईल व गोविंदपंत आले त्यांबरोबर आम्हास फुकाचें पत्र लेहून पाठविलें नाहीं. काये म्हणऊन पाठविलें नाहीं हें कळों येत नाहीं. हरयेक बोलीचाली करावयाची ती करीतच असों हें वर्तमान परस्परें कळों येईल. विस्तार ल्याहावे यैसे नाही आपण सूज्ञ आहेत. बहुत काय लिहिणें कृपेस अंतर केलें न पाहिजे. हे आशीर्वाद मातुश्रीमामीस नमस्कार. नानास आशीर्वाद.

¶*This letter gives a few definite relations of the Peshwas.*



या कागदांत विश्वनाथभट चिमाजी आपास आशीर्वाद लिहितो म्हणून तो वयानें मोठा व त्याची आई बाळाजी विश्वनाथाची वडील बहिण असावी. नानासाहेबास आशीर्वाद आहे म्हणजे तो आठ-दाहा वर्षांचा असावा त्या वेळचें म्हणजे स. १७३० च्या सुमारचें पत्र आहे. विश्वनाथभटाचा पुतण्या बळवंतराव मेहेंदळे पानिपतावर पडला. श्रीवर्धनचे कारभारांत बाळाजी विश्वनाथाची बहीण लक्ष घालीत होती. मामी म्हणजे चिमाजी आपाची आई राधाबाई.

No. 3] [*1730 ?*

छ १४ मोहरम.

श्री

पु॥ राजश्री पंतप्रधान स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. फिरंगाणातून काफरी पलोन आले आसामी तीन ३ यास स्वामीकडे पाठविले आहेत. हे काम करावयास धक आहेत. तरी यांस वाडियाचे कामावरी ठेऊन काम घ्यावे आणि पोटास अडिसेरेस मात्र पोटभर द्यावी व येक दुसरे धडुत द्यावे म्हणजे इमारतीचे कामावरी खपावयास बरे आहेत. यास मुशारा द्यावा लागेल. यास पागेत बिराड देऊन लिहिलेप्रमाणे द्यावे आणि काम घ्यावे. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणे. लोभ केला पाहिजे हे विनंती.

No. 4] [*9-3-1731 ?*

छ १९ रमजान.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक सिवराम कृष्ण साष्टांग नमस्कार विनती. विनवावया प्रार्थना येसीजे. ताा छ ११ रमजानपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानतर स्वामीनी आज्ञापत्र पाठविले पावले. लिहिले वर्तमान अक्षरसा कळले. तेथे आज्ञा कीं इमारतीचे वर्तमान लिहून पाठवणे. कुतरे ८ आठ पाठविले आहेत याची निघा करवणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे कुतरे पावले. त्याची निघा करणे ते करवितो. इमारतीचे वर्तमान तरी स्वामीची निजावयाची खोलीया २ त्याचे तख्तपोसी गिलावावरील आस्तरगारी देखील कारंजे करून सिमगियाकारणे जागा मुस्तेद[१] केला आहे व पुढील दिवाणखानियास रंग लाविला

---

१ तयार.

याउपरी जागाजागा वेलपते काढीत आहे. याउपरी रोगण होईल. पुढील दरवाजियाचा वरील खण तयार जाला. नवे घर करविले होते त्याचे पाये घातले आहेत. लाकड तासावयास सुतार लाविले आहेत. वाडियाचे विहिरीचे खडक फोडावयास पाथरवट लाविले आहेत. दोन गज खडक फोडिले. पाणी लागत नाही आणिखी येक गज फोडवितो. पाणियाचे तोटा आहे. नदीजवलची भुडकीस विटाचा पाट बांधत आहेत. पाट तयार जालियावर मोटा लाऊ * येतील कीनिची लाकडे से दीडसे तासून आणिली. पौड खोरीतील वासे आरधे आणिले आरधे येतील. नाने मावलेच्या कडिया आद्यापि आणिल्या तोडिल्या नाहीत. याउपरी तोडणार आहेत. बागेतील विहिरीचे काम अनकूल पडिले नाही. काये निमित्य तरी चालीस माणूस पाहिजे व पाथरवट पाहिजेत. त्यास पाथरवट तो वाड्याचे विहिरीस लाविले आहेत. चालीस माणूस तेथे लावावे तरी अगदीच इमारतीचे काम पडते. याजकरिता विहिरीचे काम चालिले नाहीं. क्षेमा केली पाहिजे. दिवाणखानियाजवलील राहाटाचा बंगल्याच्या भिंती चहुकडून मुस्तेद जाल्या. बाबूजी नाईक याजकडील गावकुसू सिध जाले. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shivram Krishna reports to Bajirao in reply to his queries, the progress of the work of building the Shanwar Palace. He also adds that the eight dogs have safely arrived and will be properly looked after.*

No. 5] [*13-3-1733*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री चिमाजी प्रति राधाबाई आसीर्वाद उपरी. आम्ही ता। छ ७ सवाल परियेंत कुषल आसो विशेष. तुम्हाकडील साप्रंत वर्तमान कलत नाहीं तरी सविस्तर लेहून पाठवीत जाणे. यानंतर चिरंजीव सौभाग्यवती कासीबाई फालगुण बहुल द्वादसीसह त्रयोदसीं मंदवासर संध्याकालचा सात घटिका दिवस उरला तसमई प्रसूत जाली. पुत्र[१] जाला. संतोषाचे वर्तमान

---

१ पत्रांत उल्लेख केलेल्या बाजीरावाच्या मुलाचा जन्म ता. ३-३-१७३३ रोजीं झाला. हा मुलगा लहानपणींच वारला असावा.

पूर्वी तुम्हास लेहून पाठविले आहे ते पत्र पावेल न पावेल म्हणून सांप्रत पत्र लेहून पाठविले आसे. तुम्ही आपणाकडील कुशल वृत्त लिहित गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे+ आसीर्वाद

¶*Radhabai writes to her son Chimaji Appa that Kashibai has given birth to a male child. The last two words are in her own handwriting.*

No. 6] [*About 1733 ?*

श्री

तीर्थ सौभाग्यवती मातुश्री
ताई वडिलाचे सेवेसी.

आपत्ये नानाने चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। भाद्रपद बहुल दशमीपरियत वडिलाचे आसीर्वादे करून वर्तमान येथास्थित असे विशेष. दशमीचे दिवसीचे वर्त(मान). मी म्हटले कीं आज जेवित नाही. मातुश्रीबाई म्हणाली की दुसरियाचा लेक, बोलता येईना. इतकीच दशमीचे दिवसीची गोष्ट. याउपरी त्यामागे जे जे वर्तमान जाहाले ते लिहिले आहे. वडिली लिहिले कीं, तुम्ही उपास करावा ऐसा अर्थ नाही; असे लिहून पाठविले तरी मी जर निरशन येकादसी जर केली असेल तरी आण आहे. या उपरांतिक वडिली लिहिले की, वडिलानी बोलावे आणि तुम्ही सोसावे; ऐसा अर्थ लिहून पाठविला. तरी वडिली येकदा बोलावे. सारा वेल तेच गोष्ट, हे गोष्ट वडिला उचित नाही. मातुश्रीबाई याचे मनात आहे की मला जितके दिवस बालगले तितके बालगले, आता तो माझी गोष्ट आयेकत नाही; आता त्याला रायाबाकडे पाठविते, ऐसा गोष्टी जे मनुश्या येते त्याबरोबर हेच गोष्ट बोलावी ऐसा गोष्ट जाहली आहे. यानंतर वडील जर मला दसऱ्या अलिकडे सातारियास आणितात तरी बरी गोष्ट आहे. येथे तुम्ही जर असता तरी सर्व वर्तमान विदित होतो. आता वडील म्हणत असतील की "गोष्टी च्यार आमचे सामाधानास्तव लिहितो" ऐसे मनात न आणने. चिरंजीव रामचंद्र याजकरवी रायास कागद लिहिवणे; त्यावरून आमचे येणे होईल. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती. चिरंजीव रामचंद्रास आसिर्वाद. हेच (पत्रीं) राजश्री बापूजी गणेश यासी नमस्कार विनंती. मातुश्रीनी ईस कागद

+ पत्राच्या अखेरचीं "हे आसीर्वाद" हीं अक्षरें खुद्द राधाबाईच्याच हातचीं असावीत. अक्षरें मोडींत आहेत व अक्षराचें वळण मोठें व सामान्य आहे.

लिहिला आहे त्यावरून सर्व वर्तमान कळो येईल. तुमचा मेहणा नारायेण यासी आमचा नमस्कार सांगणे. बहुत काये लिहिणे हे विनंती. मातु (श्री) जिऊबाई यासी साष्टांग नमस्कार. दया असो दिधली पाहिजे हे विनंती. चिरंजीव सदासिव सुखरूप आहे. काही चिंता न करणे हे विनंती. मातु (श्री) सौभाग्यवती मातुश्री ताईचे पत्री लिहिले आहे ; त्यावरून सर्व वर्तमान विदित होईल. आपणहि काही साह्यता केली पाहिजे हे विनंती.

¶*Interesting letter by Nana Saheb to his mother : throws light on the domestic affairs of the family. Who is Bapuji Ganesh? Ramchandra Baji died in 1733 : so the letter must be dated a little before then.*

No. 7] [*1734?*

श्री

श्रियासहस्रायु चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराऊ यासी प्रति मातुश्री राधाबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणें विशेष. मौजें जेजुरी येथील मुकामीं तुम्हास राजश्री स्वामीचीं पत्रें आलीं तें वर्तमान आम्हांस कळलें त्याजवरून विश्वतोमुखीं त्याचे भेटीस न जावें. राजश्री रंभाजी निंबाळकर व तुरुज ताजखान याची भेट जालियानंतर भेटीचा मनसुबा मोडला तर बहुतच उत्तम आहे, नाहीं तरी तुम्ही विचार करून भेटीचा मनसबा मोडे ते गोष्ट करणें. तुम्हास भेटीचा मनसबा मोडावयाचा विचार कीं, राजश्री आनंदराऊ सोमवंशी सरलष्कर व शंभुसिंग जाधवराव हे दोन्ही सरदार बरोबर नाहीं (त) आणि आम्ही येकलेच यावेंसें काय आहे ? ऐसें राजश्री आनंदराऊ सुमंत यांस सांगोन भेटीचा मनसुबा मोडे ते गोष्ट करणें. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Radhabai warns Bajirao not to go and visit (the Nizam?) in the absence of Anandrao Somvanshi and Shambhusing Jadhao.*

No. 8] [*4-1-1721*

श्री

श्रियासह चिरंजीव विजयीभव राजमान्य राजश्री बाजीराऊ यांप्रती राधाबाई अनेक आशीर्वाद उपरी. येथील कुशल पौष बहुल त्रयोदशी जाणून स्वकीये क्षेमलेखन करवीत आसिलें पाहिजे. विशेष, सांप्रत आज पंधरा दिवस तुम्हाकडील वृत्त कलत नाहीं याजकरितां चित्त सचिंत आहे. तरी साकल्य वर्तमान अक्षरशः

लेहून पाठवणें. तणेंकरून चित्तास समाधान होईल; तरी सविस्तर लिहिणें. येविशी अनमान कराल तरी माझ्या गळ्याची आण असें. बहुत युक्तीनें मनसुबा करून येणें. येविशी अनमान न करणें. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Radhabai's letter to Bajirao to communicate to her full details of his doings.*

No. 9] [*1734*

श्री

सेवेसी विज्ञापना. इंग्रजाच्या सरकारात साल गुदस्तांपैकीं सकलाद होती. ते हालीं लिलांव करून सावकारांस दिल्ही. सकलाद ससती विकली. त्यांत सकलादी गालिचे सुजनीवजा वेलदार हिरवे पिवले लाल बहुत बेश खुशतऱ्हा, येक गालिचा येक तक्या तेच वजेचा, त्यास जोडा म्हणतात, येक गालिचा येक तक्या येकून जोड्यास सवा अठरा रुा किंमत लिलावांत जाहाली. याजवरी कोण्ही चढेना. याजकरितां यथास्थित किंमत न होय यास्तव इंग्रजानी ठेविले. त्यापैकीं सदरहू किंमतीने वीस पंचवीस जोडे कोणा कोणास दिल्हे आहेत. गालिचा लांब अडीच वार रुंद दोन वार याप्रो आहेत. तऱ्हादार जिनस दृष्टीस पडला व मोरो विश्वनाथ याणी दोन जोडे घेतले आहेत. सरकारांत खपतील तरी लेहून पाठवणें म्हणौन सांगितले. त्यावरून लिा आहे. विदित होणें हे विज्ञापना

¶*Bajirao's agent at Bombay writes to him regarding broadcloth and carpets to be had there.*

No. 10]

श्री

सेवेसी विज्ञापना. मेस्त्र सिलेवान इंग्रज याचे घरी बिलोरी दिवें झाडाचे मज्यालसीत बसकेवरी ठेवावयाचे व फानसवजा टांगावयाचे येसे बहुत बेश दोनसे रुपयांचा जोडा यापासून आठसें पावेतों जोडा येसे तऱ्हेतऱ्हेचे आहेत. मुजरद आम्हांस वखारेंत नेऊन दाखविले. तसेच थोर आरसे अडीच पावणेतीन हात लांब व दोन हात रुंद वरते काम मुलामगिरी बहुत बेश, साल गुदस्तां विलायती ज्याहाजे आलीं होंती त्यापैकीं. सरकारांत खप असला तरी लेहून पाठवणें म्हणौं इंग्रजाने सांगितलें. त्यावरून सेवेसी विदित व्हावें याजकरिता लिा आहे. जडाव हिरे यांचे घड्यालें लहान सोन्याचें येसे येक उतम आहे. त्याचें

वृत्त व हिऱ्यांचा सुमार पेशजी जासुदांबराबर लिा आहे त्यावरून विदित होईल. यासिवाय दिवसाचें आकाश पाहावयाचे येक यंत्र पोटरी येवढें मोठें नळीवजा आहे. त्यांतून आकाश दिवसाचें पाहिलें म्हणजे जे आकाशांत जे आहे ते दिसतें येसें सांगतों. ते यंत्र आम्हास दाखविलें घरांत, परंतु बाहेर नेऊन आकाश दाखविलें नाहीं. दाखवीन येसें बोलला तों त्यांची दरबारास जावयाची घटका भरली तसा उठून गेला. आम्ही आपल्या घरास आलो. फिरोन साक्षप करोवा तो केला नाहीं. सेवेसी कलावें यास्तव लिा आहे. आज्ञा होईल त्याप्रा॥ वर्तणूक करून. विदित होणे हे विज्ञापना.

¶*An agent of the Peshwa at the Bombay market refers to lamps, large mirrors, a watch studded with jewels, etc.*

No. 11] [*14-2-1735*

श्री

मातुश्री बाई यासी

अपत्ये चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत फाल्गून सुध त्रितीया भृगुवार संध्याकाळ. तुमच्या आसीर्वादें करून सुखरूप असो विशेष. चिरंजीव सदासिवास पाठवावयाचा विचार आपल्यासी बोलून आलो होतों. त्यास विचार पाहातां चिरंजिवास सवाई जयसिंगाचे घरीं बहुमान होईल हा येक अर्थ; वरकड[१] चिरंजिवाचे यात्रेचे दिवस हे आहेत येसे नाहीं. बहुमानाची गोष्ट म्हणावी तर तुमच्या आसीर्वादें आम्हांस काये न्युन्य केलें आहे ? दोन पर्याय तों या प्रकारचे आहेत. परंतु तिसरा पर्याय तुमची आज्ञा, क्षेपनिक्षेप पाठवावें येसीच असली तर लक्षप्रकारें पाठऊन देऊं. तुमच्या समाधानापेक्षां आम्हांस दैवत दुसरें नाहीं. तुम्हीं यात्रा करावयास जातां, देवधर्म तीर्थ करावयास चिरंजीवाचा पायेगोवा[२] होईल येसे आहे. आपण तुमचा निरोप घेतला ते समई आपण पाय उतारा तुमचे पालखीसमागमें घटकाभर येऊन मग निरोप घेऊन यावें येसें होतें, परंतु ते समई चितांत आलें नाहीं यामुलें चित्तांत आलीकडे आलियावर हळहळ वाटली. आपलें समाधानपूर्वक आसीर्वाद पत्र आलें म्हणजे चित्तांतील हळहळ दूर होईल हे विनंती. छ २[+] सवाल दुपाहार.

¶*Chimaji Appa's letter to his mother Radhabai, shewing the most affectionate reverence for her. The lady was proceeding on a pilgrimage and wished to take with her Sadashivrao Bhau, then only five years old.*

---

१ एरवीं; नाहीं तर. २ म्ह. मुलाची तुम्हांस अडचण होईल.

+ सदाशिवराव या वेळीं ५ वर्षांचा. सबंध पत्र चिमाजीच्या हातचें.

No. 12] [18-5-1735

छ ८ सफर

श्रीउमाशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी तथा राजश्री

आपा स्वामींचे सेवेसी

पोष्य बाबूजी जोशी साष्टांग नमस्कार विनंती उपरीचें बातमी वर्तमान स्वामीचे आशीर्वादें करून मुकाम नाथद्वार ज्येष्ठ शुद्ध ८ रविवार पावेतों मातोश्री संनिध सुखरूप असों विशेष. बडवाईहून वैशाख शुद्ध ७ शुक्रवारीं निघोन वैशाख वद्य १० स उदेपुरास आलों. आठ दाहा दिवस राणाजीनी आपलें संनिध ठेऊन मातोश्रीचा सन्मान उत्तम प्रकारें केला. माहालांत मातोश्रीस नेली. राणाजी मातोश्रीचे दर्शनास माहालांत गेले. मोत्यांची माळ १ पदक १ व हातचे सोन्याचे चुडे किंमत तों माफक परंतु जनांत बहुमान हेंच गोष्ट थोर आहे. हत्ती छावा १ ५००० रुपये खर्चास. बिहारीदास[1] यांनीं १००० येक हजार नजर केली. राणाजीचें चित्तांत बहुमान फारसा करावा असा हेत होता; परंतु बिहारीदास यांस नूतन सेवा प्राप्त जाली यामुळें स्वामीस किफायत करून दाखवितात! आम्हांसहि ईश्वरें काय वाण केली? रंग राखून निरोप घेऊन आलों. दरमजलां सत्वरींच जयपुरास जाऊन सवाईजीची भेटी घेऊन सत्वरींच पुढें जाऊं. विशेष पव्याचें वर्तमान स्वामींनीं सदाशिवपंत यांस राणाजीकडे पाठविलें. राणाजीचें आर्जव उत्तम प्रकारें राखून पुढें दबाव दाखऊन कार्य करावें. त्यावरून आपले सरदारांस पत्रें अंतस्तें लिहिलीं त्यांचें उत्तर त्यांनीं काय लिहिलें तें स्वामीस विदित जाहालें. स्वामींनीं सरदारांस उत्तर लिहिलें तों दिवस आखर जाला आणि बिहारीदास लष्करांत होते तेथें रामचंद्रजीनीं पष्ट सांगितलें कीं सदाशिवपंतास निरोप देणें. पुढें हंगामवर आम्ही येऊं ते समयीं तुमचें आमचें विचारें पव्याचें काम करणें तें करूं. येक दबाव देऊन कार्य करावें तें न केलें. दुसरी फिसाद केली यामुळें च्यार दिवस काम तटलें. याजकरितां स्वामींनीं बिहारीदास यांस व राणाजीस पत्रे पाठवावीं कीं बारा वरषें आपण तुमची सेवा केली. अद्याप..........चें कार्य होऊंन ये [अपूर्ण]

¶*Radhabai's reception at Udepur when she went on a pilgrimage.*

---

1 Diwan of Udepur.

No. 13] [पौ 19-12-1735

पो छ १९ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. मातुश्रीबाई प्रयाग करून कासीची यात्रा करून गयेस सुखरूप पावली म्हणून स्वामींनी लिहिलें त्यावरून बहुत हर्ष जाहला तो पत्रीं लेहावें येसें नाहीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana Peshwa to Chimaji : he rejoices to hear that Radhabai has arrived safe at Gaya on her pilgrimage.*

No. 14][1] [5-1-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामींचे शेवेसी

पोष्य वासुदेव जोसी साष्टांग नमस्कार विनंती. ता। माघ शुध ३ पावेतो जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही श्रीयात्रेस तीर्थश्वरूप मातुश्री बाईसमागमे गेलो होतो ते यात्रा करून पोश वद्य चतुर्दसीस घरास आलो. येथे आलियावर स्वामीचे पत्र आले की, राजश्री स्वामीचे येथे लग्न आहे. तर पालखिया पाठऊन देणे; म्हणून आज्ञा. त्यावरू[न] पालखी व भोई आ। १० येसे पाठविले आहेत. पावतील. चिरंजीव पांडुरंग जोसी थेवरास गेले आहेत. तेहि येका दो दिवसी आपणाकडे येणार आहेत. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे. हे विनंती.

¶*Vasudev Joshi to the Peshwa, returning from his pilgrimage to Benares whither he had accompanied Radhabai.*

No. 15]

श्रीरामप्रा

पु।। रा चिमणाजी पंडित आपा
स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. नवाब पुसत होते की राजश्री चिमणाजी पंडित यांचे घरी शादी जाली ते कोणाची? आम्ही सागितले की पुत्राची मुजी जाहाली. बेटा

कैसा आहे? आम्ही अर्ज केला बहुत माकुल आहे. त्यावरी खुदा म्हणून त्रिवचन बोलिले. यौसियास आपले घरी वृतबंध जाहला त्याचे वर्तमान सर्वांस कळल. नवाबासहि कलले. याकारितां वस्त्रें उतम नवाबास नजर पाठविली तरी उतम आहे. पाठवावी. आपली पत्रे थैली पाठवावी. आम्ही गुजरानून उतर पाठऊ. नवाबहि आपणास पाठवितील. याचा विशय फार आहेसे नाही. आगत्यरूप हजार रुा मधे मोईन आहे अनमान न करावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Chimaji Appa is requested to send robes of honour to the Nizam on account of the thread ceremony of his son Sadashivrao.

No. 16] *[April 1736?*

श्री

चिरंजीव बाजीराव बलाळ प्रधान यांप्रति नारायण दिक्षीत पाटणकर यांचे अनेक आाशिर्वाद उपरी. येथील क्षेम चैत्र वद्य ११ गुरुवार जाणोन आपलें कुशल सविस्तर लिहीत जाणें तेणेंकरून समाधान होईल विशेष. तुम्हीं यंदा जयनगर प्रांतास आलेत म्हणोन आयकिलें त्यावरून असें चितामध्यें आलें परराष्ट्रामध्यें येणे हे अत्यंत दुसह आहे परंतु श्रीविश्वेश्वर त्याचाहि निर्वाह करणार समर्थ आहे. यानंतर निजामाचा तुमचा युधास आठ वर्षें जाहालीं. त्या समयामध्येंच आम्हास साक्षात्कार जाहाला होता त्यावरून पन्नासावा वांटा व दाहा गांव इश्वराचे आज्ञेने लिहोन घेतले होते तर आतां तुम्ही या प्रांतास आले आहा. राजा अत्यंत प्रतारक आहे. तुम्हास अग्निहोत्र करा ऐसें म्हणेल अथवा यज्ञ करा ऐसें म्हणेल तर तुम्हीं त्यास म्हणावें कीं आपल्या गुरूचा आज्ञेव्यतिरिक्त कर्तव्य नाहीं व आपले परंपरा ऋत्विज्यहि त्या प्रांती आहेत. यानंतर तेथे प्रतारक शुद्र याजक आहेत ते कदाश्चित राजास सांगोन तुम्हास भुलवितील, आणखी तुम्हीं हें कर्म कराल तर आपण प्राणत्याग करीन. यानंतर आर्त्विज्यह जें आहे तें आपल्या ज्ञातिव्यातिरिक्त अणखी कोणास देऊं नये. अणखी परराष्ट्रामध्यें येऊन अत्यंत सावध सदैव आशिलें पाहिजे. विशेष राधाबाई गयायात्रा करून आली. नंतर आमचा घरास येऊन येक अतिरूद्र होमद्वारा करावा अणखी चित्तानरूप ब्राम्हण-भोजन सहस्र दोन सहस्र करावा त्यास आमचा घरीं येक अतिरूद्र व ब्राम्हण भोजन व अणखी अनाहूत ब्राम्हणी बायका आदिकरून सर्वांस येकक पातळहि देविलें तर जात्येसमई व स्त्रीसाठीं येक सहस्र रूपये दिल्हे परंतु दोन सहस्र

रूपये लागतील. यानंतर तेथें होतों तेव्हां क्षणा क्षणा हरिभटास पाठवित होतों. निजामाची तुमची भेटि जाहाली तेव्हां हरभटासच पाठविला होता. अणखी कोंकणात गेले होतेत तेव्हांहि त्यासच पाठवित होतों. आतां चिरंजीव राम दीक्षित तिलक हे जसे वासुदेव दीक्षित तसेच हे आपणास आहेत. या नंतर कदाश्चित राजाचा संकोच पडला तर वाजपेयांत अनुष्ठानाचा निर्वाह करीत असे ऋत्विज पाठविले आहेत परंतु आपले स्वसैन्य टाकून येक घटका कोठे न राहाणें. राहाल तर तुम्हास माझा शफत आहे. अग्निहोत्रादिक अनुष्टान आहे ते सावकाश-पणाचे आहे यास्तव लिहिलें असे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

¶*Narayan Dikshit Patankar to Bajirao : advises the latter to perform religious sacrifices only through Deccani priests. The letter is interesting as exposing a phase of Maratha expansion controlled by such persons as the writer.*

No. 17] [*May 1736*

श्री

पुरवणी+ तीर्थरूप राजश्री राऊ व

तथा राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती. राजश्री प्रातिनिधीनी च्यातुर्मास्य केली व पशुयेज्ञहि केला. वैशाख शुध पूर्णमेस अनुस्टान समाप्त जाहाले. स्वामीस कलावें याकरिता लिहिले असे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Pratinidhi performing sacrifices and vows.*

No. 18] [*9-6-1736 ?*

पा। छ १० सफर

श्री

पु॥ राजश्री चिमाजीपंत आपा

गोसावी यासी

विनंती उपरीं. राजश्री राऊ याजकडील काये वर्तमान, कोठे आहेत, काये मनसबा यौजिला आहे, तिकडे छावणी होणार किंवा देशास येणार, ते

+ पत्र महादाजी अंबाजीचें.

लिहिले पाहिजे. राजश्री बाजीराऊ व चिरंजीव राजश्री आपा याजकडील लस्कर कोठे आहे, काय विचार केला, त्याचे पत्र आले असेल ते लिहिले पाहिजे. मातुश्री बाई माहायात्रेहून टोकियापर्यंत आली म्हणून वर्तमान राजश्री दादोबा याणी सातारियाहून लेहून पाठविले होते. यैशास मातुश्री बाई याची आपली भेटी जालियाचे वर्तमान लिहिले पाहिजे. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Letter to Chimaji Appa, inquiring whether he met his mother on her return from the pilgrimage.

No. 19] *[1-5-1737 ?*

पौ छ १२ मो

श्री

चिरंजीव राजश्री नाना यास चिमणाजी बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ११ मोहरम यथास्थित असे विशेष. मातुश्रीबाई समुद्रस्नान करणे आहे म्हणून पावसाला बोलली होती. याकरिता अमवाशे आलीकडे च्यार दिवस येथे पावणे म्हणजे अमवाशेस स्नान करून स्वार होऊन जाणे. आम्ही जेस्टी पौर्णिमा होताच निघोन येऊ येसे मातुश्रीस पत्र लिहिले आहे. मातुश्रीच्या विचारे यावेसे असले तर रवानगी करणे. सौभाग्यवती मातुश्री कासीबाई वहिनीचा पाय बरा जाला असला आणि त्यांच्या विचारे समुद्र स्नानास यावेसे असले तर त्यासहि रवाना करणे. ती आली म्हणजे जनार्दन, रघुनाथ, सदाशिव त्रिवर्गहि येतील. जर त्याच्या पायाचे दुख बरें जालें नसलें आणि त्यांच्या विचारें तूर्त यावेसें नसलें तर त्यांचें राहणें होईल. त्यांचें राहणें जालें तर जनार्दन त्यांजवळ राहील. रघुनाथ, सदाशिव यांस मातुश्रीसमागमें पाठवणें. मातुश्रीच्याहि विचारें तूर्त यावेंसें नसलें तर कोणासहि पाठवावयाचें प्रयोजन नाहीं. हे आशीर्वाद.

¶Chimaji Appa, all in his own hand, writes this letter to Nana asking him to send his mother Radhabai for sea-bathing, with the little boys Raghunath, Sadashiv and Janardan.

No. 20] [11-11-1737 ?

छ ६ सावान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक रघुनाथ सिवराम सां नमस्कार विज्ञापना. स्वामीचे कृपाकटाक्षेकरून शेवकाचे वृत यथास्थित असे विशेष. स्वामीनी माहादाजी व माणकोजी जासूद दिा म्हसाजी ना यासमागमे आज्ञापत्र सादर केले. तेथ आज्ञा की, बिदरी+ हुका १ व बिदरी पिकदानी १ पाठऊन देणे. ऐसीयास थेट बिदरी पिकदानी चागली मिलत नाही. हुका, पूर्वी आणखी कितेक सामान काहारासमागमे पाठविले आहे त्याजमध्ये पाठविला आहे. सिरोजी खारवे पावणे तीन सो प्रो मिळू लागले. याजकरितां फार माहाग म्हणून पा नाहींत. सेवेसी विदित जाले पो. हे विज्ञापना. मिती कार्तिक वदी ३० शुक्रवार.

हे विनंती.

¶*Raghunath Shivram to the Peshwa : sends a tobacco pipe and a spitoon.*

No. 21] [14-11-1731 ?
[26-11-1738 ?

श्री

चिरजीव राजश्री बाजीराऊ यासि प्रती राधाबाई कृतानेक आसीर्वाद उपरी येथील कुशल कार्तिक बहुल एकदसी जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. "हाकाटी न करितां विचारे करून साहित्य कर्तव्य ते करावे व आईतेसमई दाहा हजाराची सामग्री होईल व मिलेल संकट नाही. आहे अर्थ तो कलतच आहे. अनकूल प्रतिकूल हा अर्थ लोकास काये कले? हाकाटीने जन मिले लौकिकासारिखे संपादावे लागेल, यास्तव लक्ष प्रकारे हाकाटी न करणे. गुप्तरूप होईल ते करणे. वरकड आईतेसमई करणे" म्हणून कितेक लिहिले ते कलले. तुम्ही लिहिलेत त्याचप्रो आम्ही करून. हाकांटी सर्वथी करणार नाही. आनकुलता नाही हा अर्थ आम्हीच तुम्हास लिहिला होता व लग्न करितो न करितो हे घरात चर्चा केली नस्ता तुम्हाजवल कोणी काये सागितले असेल ते न

+ Made at Beder.

कले. वरकडहि लोक काये म्हणतात तेहि न कले. जन विरुध आहे, ज्याचे चितास जे येते ते तो म्हणतो. आपण विचार लिहिला तो युक्तच आहे. आम्हास विचारास आला. नारो भिकाजी यांचे कन्येचे नेमस्त करावयास रा रामचद्र जोसी नेरकर पाठविले होते, त्याणी नेमस्त केले. मूल देतात. माणसे पाठऊन आणावी इतकच अत्र ठेऊन पत्रे व जासूद पाठविले ते काल सनवारी संध्याकाली आले. तुम्हास कलवे यास्तव लिहिले असे. टोकियासहि धोंडभट पाठविले आहेत. लग्नास आठ रोज उरतील तेसमई मुलीस आणऊन. कलले पाहिजे बहुत काये लिहिणे हे आसिर्वाद.

¶*Radhabai discusses some matrimonial affair with her son.*

No. 22] [*1738?*

श्रीभार्गवराम

श्रीमत् परमहौस स्वामी याही

सहश्रायु चिरंजीव बाजीराऊ प्रधान यासी आज्ञा केली यैसी जे. येदाचे समाधी आम्हास कठीण गेली. त्या दिवसापासून शरीर आशक्त जाले आहे. आपा जोसी याजबराबरी निरोप पाठविला होता, त्या गोष्टीचे आपण काही आशंका न धरणे. तुम्ही सुखरूप आसलेत, भार्गवे तुमचे कल्याण केले, म्हणजे सर्व पावले. आमचे चालावे तैसे चालेल. तुमचा कागद अंतोबाबा आला. तुमचे निष्ठा देखोन व श्रीजवल प्रतरणा नाही * * कडून सतोषी जालो. तुमचे बऱ्यावर येक भार्गव किवा काही राजा आहे. वरकड आवघे तुझेठाई बरेच आहेत! याजकरिता सर्व प्रकारे तुझे कल्याण व्हावे, हेच आम्ही श्रीपासी नित्यकाल मागत. तुम्ही सुखी आसले म्हणजे भार्गवसेवा करालच, यैसा श्रीसहि भरवसा आहे. तुमचे पदरी श्रीदयेने महदकार्ये तीन येशे पडली. कोणती म्हणाल तरी, येक सैदाचा सला केलात, येक दिलीस गेलेत आणि कालीच मोगल बुडविलात. समारंगनी चालीस हजार घोडा सिवाजीजवल होता. परंतु कोठे समोर मोगलासी युध केले? ते गोष्ट तुम्ही केलीत! सामान्य येशे श्रीने तुमचे पदरी घातली, यैसे नाही. पुढेहि श्रीदयेने यैसीच येशे तुमचे पदरी पडतील. साप्रत राज्याने तुमचेठाई अकृपा धरिली आहे, म्हणून आइकिले. तरी तुम्ही वोढूनच धरणे. रागाखाली वेणे. पुढे निदानी आ(म्हा)सारखे असोन, तुम्ही आमचे म्हणविता; तेव्हा आम्ही सर्व तपशा समाधीचे श्रय भरीस घालून, राजा तुमचे घरास येऊन, तुमचे समाधान करी, यैसेच भार्गव करील. हे गोष्ट होये

तोवर, आम्ही गोमुत्र घेऊन तरी, तुझ्या गल्याचे आण आसे; जाणिजे. जलवा आणिल्या होत्या त्या पाठविल्या आ(हेत). जलवा सुमार ९३ पा आहेत. घेतले पाहिजेत. विदित जाले पाहिजे. हे आज्ञा. ताब्राचे युधाचे पत्र तुमचे, येलोजी पडवल घेऊन आला होता. त्याजवल तुम्हास श्रीचे भोगवस्त्र, प्रसाद दुलई पा होती; ते पावली की नाही ते लिा पाहिजे. जाणिजे.

¶*Brahmendra Swami to Bajirao. Extols him beyond measure as having to his credit achievements superior to those of Shivaji, who, the Swami says, never fought the Mogul openly.*

No. 23] [*28-2-1739 ?*

पो ३ जिल्हेज.

श्री

तीर्थस्वरूप मातुश्री बाई वडिलाचे सेवेसी

आपत्यें चिमानें साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत फाल्गुन बहुल अमावास्या मुकाम ठाणें वडिलाचे आशीर्वादें करून येथास्थित असें विशेष. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. राजश्री सुलतानजी रायेजादे यांचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास वस्त्रें देऊन निरोप द्यावयाचा होता; परंतु कारकुनांनीं आपला निरोप त्यास सांगता तफावत पडली. असो. त्यास आपण काय करितील? आम्हास यावयाविशी दोनतीन पत्रें विशदें पाठविलीं त्यास येथील आहे अर्थ तो विस्तारयुक्त वडिलास लेहून पाठविला आहे त्याजवरून अवगत जाहालेंच असेल; व चिरंजीव राजश्री नाना-यांस पाठविलें आहे त्याचे आपले भेटीनंतर सविस्तर कळेल. वरकड वडिलीं मजकूर लिहिला तो येथार्थच आहे. शरीरापेक्षां अधिकोत्तर नाहीं खरेंच. परंतु अडचणीच्या प्रसंगास कैसें करावें? येथील बंदोबस्त करून अविलंबेच येऊन विदित जाहालें पाहिजे. +सुलतानजी रायेजादे यास जेवावयास येक दोन वेळ घालावयाचें होतें. तैसेंच खर्चास वस्त्रें देऊन रवानगी करावयाची होती. त्यास बरें वाटेना, यास्तव ते कुडाळास गेले; त्याकडील कारकून येथें आला असे. जिवाजीपंत निरोप सांगावयास चुकले. त्याचा कारकून बोलाऊन आणून सांगितलें असतें तर तोहि निरोपास येऊन भेट घेऊन जाता. सारांश जिवाजीपंतापासून आळस चूक जाली. इकडील कांहीं लटकी खबर ऐकली असेल यास्तव जासूद

+ येथून अक्षर चिमाजीचें.

पाठविला तो पावला, यैसियास येथें कांहीं आवई जाली यैसें नाहीं. येक धारावी मात्र आम्ही येथें नसतां घेतली. तें वर्तमान तपशिलें पूर्वी लिहिलेंच आहे. नानासहि सर्व आवगत जालेंच आहे. ते सांगतील हें विनंती.

¶*Chimaji Appa to his mother, replying to her entreaty not to exert himself too much.*

No. 24] [*20-4-1739 ?*

श्री.

श्रियांसह चिरंजीव राजश्री चिमाजी यांप्रति मातुश्री राधाबाई आसीर्वाद. उपरी, येथील कुशल ताा चैत्र वद्य नवमी जाणून स्वकीये लिहित जाणें विशेष. मुलास खेलावयाचा जिनस बाहुली हस्तिदंती व काचेची यैसी उतम असतील ती पाठऊन देणें. पूर्वी तांदूल व पोहे जिनस पाठविला त्याचा जाब आला नाही. तर जिनसाचा जाब पाठऊन देणे. तांदूल पाटणी व पोहे वगैरे जिनसाचे प्रयोजन असिले तर लेहून पाठवणे; त्याप्राा पाठऊन देऊन. आवलकठीचे प्रयोजन असिले तर लेहून पाठवणे; त्याप्राा पाठऊन देऊ. हा आसीर्वाद.

¶*Radhabai to Chimaji Appa, asking him to send toys for the children.*

No. 25] [*3-6-1739*

श्री.

वेदमुर्ती[१] राजश्री अचलवैष्णव व उमानाथ पाठक
गंगापुत्र वास्तव्य श्रीकाशि यांप्रति

प्रतीपुर्वक राधाबाई नमस्कार विनंति उपरि. आह्मी श्रीस यात्रेकारणें आलों ते समइं क्रोधसंवत्सरिं तुमचें पुजन करून तुम्हास हें पत्र लिहुन दिलें आहे. तरी आमचे चिरंजित्र राजश्री बाजीराव व राजश्री चीमाजिआपा व आणखि आमचे वंशींचे कोण्हि येतेल ते तुम्हांस पुजतील. संवत १७८२ मीति पौंश वद्य पंचमि. स्वस्ताक्षर माहादाजी अंबाजी श्री × ⪢ ⪢ ⪢

हे पत्र तुम्हांस मातुश्रीनी दिल्हे आहे. जर श्रीमाहाराणाजी व आणखी चौघां मातबरांची पुरोहितपणाची पत्रें तुम्हाजवल असलीं तरी हे पत्र मातुश्रीनी दिल्हे लेहून हे प्रमाण असें. त्यांची पत्रें नसिली तरी प्रमाण नसे. छ ७ रौवल सुाा

१ येथपासून × अशा खुणेपर्यंतचा मजकूर मूळ पत्रांत बाळबोधींत आहे, तो अस्सल बमोजिब नक्कल केला आहे. फक्त शब्द तोडून विरामचिन्हें पदरचीं घातलीं आहेत.

आर्बैन मयां अैलफ. शके १६६१ सिधार्थीनाम संवसरे. हस्ताक्षर बाबूराऊ राम फडनिवीस. याखेरीज तुम्हांजवळ अजितसिंग व कोटेवाले यांचें लिहिले असिले तरी हे प्रमाण असे. तिघांचीं पत्रें असतील तर आमचें प्रमाण असे.

¶*Radhabai appoints Umanath Pathak of Benares to act as the family priest to the Peshwas there, provided he has similar authorities granted to him by Maharanaji and Ajitsing.*

No. 26] *[8-5-1739 ?*

छ १४ सफर.

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेसी अपत्ये सो भिऊबाईचे+ नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा वैशाख शुध येकादसीपावेतो वडिलांचे आसीरवादे करून सुखरूप आसो. यानंतर आम्हास यते समई चिरंजीव राा सदोबानी सांगितले होते कीं आपणाकरिता बनोसी तिवटे पाठवणे. त्यावरून बनोसी तिवट येक व केसरी येक यो दोन तिवटे चिरं(जी)वाकारणे पाठविली आहेत. त्यातून आपले चितास येईल ते चिरंजीवास देणे. कदाचित यातून येकहि आपले चितास न ये तरी जामदारखान्यामध्यें तेथें देऊन जमेस धरवणे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दीजे हीाा

¶*A personal letter of Bhiu Bai, daughter of the 1st Peshwa, to her mother.*

No. 27] *[26-11-1739*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराऊ माहादेव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष शुध्ध सतमी इंदुवार स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. आपण चासेहून स्वार होऊन आलों. आजिचा मुकाम ब्राम्हणवाडें येथें आहे. स्वामीचे स्वारीची त्वरा असली तर येक दिवस मुकाम केला पाहिजे. तों आपण येऊन पोहचतों. सेवेसी विदित होय. गंगातीरी येक मुकाम अगत्य करावा. आपणहि त्वरेनच येतों. परंतु उंटास मोठी मजल निभावता नाहीं. म्हणून येक दिवस

+ बाळाजी विश्वनाथ पेशव्याची मुलगी.

अधिक लागेल. यास्तव लिहिलें असे. बहुत[१] काये लिहिणे. मुकाम करावयास आंतर कराल तर माझी आण आसे. लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev, brother-in-law of Bajirao, writes to him that he will visit him on the following day on the banks of the Godavari.*

No. 28] [*22-1-1740*

श्री

+आसीर्वाद उपरी रा बाबूजी नाईक वोकार याची मूल रास्ते याच्या मुलास देणार म्हणून वर्तमान ऐकिले. त्यावरून रा कृष्णाजी नाइकास व बाबूजी नाईक वोकार यास मातुश्रीबाईस ती मूल रघुनाथासाठी राहावणे यैसी पत्रे पाठविली आसेत. मूल रास्ते याच्या मुलास देणार नाहीत. रघुनाथाच्या लग्नास तीथ याच कार्यात योजली तर याच कार्याबरोबर तेहि कार्य करावे लागेल. जर तूर्त तीथ न योजली तर पुढे लग्न केले तर कार्यास येईल. परतु मूल चागली. हातची जाऊ न द्यावी यैसा रायाचा सिधात आहे. रा बाबूजी नाईक जोसीहि मागून येथून येत आहेत. हेहि ते मूल रघुनाथासाठी राखून ठेवतील. छ २ जिलकाद रास्ते याचा मूल येईल त्यास दुसरी मूल योजून लग्न करवितील हे आसीर्वाद.

¶*Chimaji Appa asks that the daughter of Babuji Naik Onkar should be reserved for Raghunathrao, and not married to Raste.*

No. 29]

श्री

×सेवेसी विज्ञापना. इमारतीची कामे नाचाचा दिवाणखाना व धरणे वगैरे नेमणुकेप्रो जलदीने तयार करणे म्हणोन स्वामीनी पत्रीं आज्ञा केली. ऐसियासीं नाचाचा दिवाणखानियाचे काम जोती तयार करून जोडणी उभी केली * * * आज्ञेप्रो तयार होईल. हौदाचे काम चालीस लावितों. थोरल्या दिवाणखान्यापुढील चौसोपीचे काम चालत आहे. तेहि तयार होईल. पर्वतीचे वाटेवर तल्याची माती भर बहुतेक टाकिली, वाट तयार होत आली. फरासखानियाचा सोपा तयार जाला. धरणाचे काम चालीस लाविले आहे. वरकडहि आज्ञेप्रमाणे कामे तयार होतील. सेवेसी[२] श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed about the progress of the extensions of his Palace, of the water-tanks on the road to the Parvati temple, etc.*

---

१ येथून अक्षर खाशाचें. + सबंध पत्र चिमाजीआपाच्या हातचें.

× पत्र नानासाहेबाच्या कारकीर्दीतील चुकीनें येथें दाखल झालें. २ येथून वळण निराळें.

No. 30] *[6-1-1740 ?*

श्री

आसीर्वाद उपर. वाटेस घोड्यावर बसोन राऊ चालत होते. तेव्हा येके गावचा पाटील भेटीस आला तेव्हा असावध होते. त्यामुले पाटलासी सहजात बोलले जे कोबड्याचे प्रयोजन आहे घेऊन येणे. काये बोलतो हा अर्थ चितात नाही. हे विचार मस्तानी जवलून निर्माण जाले असेतः ती पीडा जाईल तेव्हा पुण्यच प्राप्त होईल न होई यैसे दिसत नाही. "राऊत लस्कराभोवते चौकीस ठेवावे इकडे राऊत येऊ लागेल तो धरून येखाद्याचे पारपत्य केले म्हणजे दुसरा कोणी येणार नाही" म्हणून लिहिले. यैसियास ते गोस्ट कार्याची नाही यास्तव राऊत चौकीस ठेवले नाहीत. लस्करातून राऊत जाईल तो बोलखू येईलसे नाही. यैसे असता लटका लौकिक करावा यैसे नाही. तुम्हाकडील बोभाट मस्तानीने लिहिला तर तो लटके म्हणावयास आम्हास कार्यास येईल. छ १७ सवाल हे आसीर्वाद+.

¶Chimaji Appa writes to Nana asking what steps could be taken to prevent Bajirao from getting intoxicated and communicating with Mastani.

No. 31] *[12-1-1740 ?*

श्री

चिरंजीव राजश्री नाना यास चिमणाजी बल्लाळ आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत छ २४ सवाल शनवार संध्याकाळ यथास्थित असे विशेष. बाळोबानें आमच्या सांगितल्याप्रमाणें उत्तर रायास सांगितलें. त्याउपर त्यानी विचार केला जे, गडमुक्तेश्वराहून गंगोदकाच्या कावडी आल्या आहित त्या जमा करून ठेवल्या आहित. या उदकें आपण स्नान करावें, व आम्हांसहि स्नानास उदक देऊन स्नान जालियावर गंगोदक आमच्या हातावर घालावें. मस्तानी आणून दैणें म्हणजे महिन्या दोचौमध्यें आपण प्राशनाचें सोडतों. बलकी * * * ? आजपासूनहि सोडतों ऐसें म्हणणें पडलें तर म्हणावें. याप्रमाणें बाळोबाजवळ आम्हास निरोप सांगणें ऐसें सांगितले. त्यावर फिरोन निरोप न सांगणें ऐसें सागून मना केले आहे. उद्यां परवा गंगातीरास गेलियावर हा विचार करावा ऐसा अर्थ चित्तांत असावा(सा) आहे; परंतु कशीहि क्रिया * (म)स्तानी * * (फाटलें) * * * सता साप्रत ये * *

\+ पत्र सबंध चिमाजी आपाचे हातचें बहुधा नानासाहेबास.

* * * * * (त्यास)स धीर निघत नाहीं. लोक फटकाळ म्हणतात. आम्ही संनिध आहों ते शंका चितांत येऊन खोडं सोडवत नाहीं; तेव्हां तिचा समागम जालियावर व आमचा सहवास दूर जालियावर आतांच्यापेक्षां अधीकहि करूं लागतील. क्रिया केल्याची शंका कोठून चित्तांत येईल? आहे अर्थ तो कळलाच आहे! राउत पाठवावयाची तजवीज आजपावेतों योजिली नाहीं. पूर्वी येका दोघांसी बोलले आहेत. आलीकडे चर्च्या राउताचे रवानगीची करीत नाहींत. तुम्हास तिकडे जावयाची निकड न लागती तर आणिक च्यार दिवस आजपावेतों घालविले तैसेच घालवावयास कार्यास येतें. आतां तिकडील जाण्याची लग्नघटका प्राप्त जाली आहे. इकडून राउताची रवानगी तों तूर्त होत नाहीं. एखादे समयीं अकस्मात करतील तर न कळे. जे समई रवानगीची चर्चा करूं लागतील ते समई येऊन सांगेन यैसे बाळ्या म्हणत असतों. पारपत्य न करावें तर तुम्ही तिकडे गेलिया * * * * * * * * जाईल हे न कळे. (पुढील दोन ओळी फाटल्या). हे आशीर्वाद+.

¶Chimaji seriously discusses with young Nana measures to prevent Bajirao from drinking and from committing other excesses.

No. 32] *[21-1-1740*

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेशी.

पोष्य गोविंद खंडेराव कृतानेक साष्टांग दंडवत प्रणम्य विनंती उपरी. येथील कुशल छ २ जिल्काद जाणोन स्वकीय कुशललेखन करीत गेले पाहिजे. यानंतर स्वामीनी राजश्री दादा यांस लिहिले की मैकारीविसी[१] राजश्री स्वामीची मर्जी कैसी काय आहे ते राजश्री येशवतराव यांस व आम्हास पुसोन पुर्ता शोध करऊन लेहून पाठवणें. त्याजवरून हे वर्तमान मारनिलेनी आम्हास सांगितले. ऐशियास राजश्री स्वामीची मरजी पाहाता ते वस्तु त्याजबराबर न द्यावी; ठेऊन घ्यावी; चौकी बसवावी; यांजमुळें राजश्री राऊ खटें जालें तऱ्ही करावें ऐसी नाही. त्याची वस्त त्यांस द्यावीं. त्याचें समाधान करावें. दुर्वेसनाचा मजकूर त्या वस्तूवर नाही. त्यांच्या चितांस पश्चाताप होऊन टाकतील तेव्हाच जाईल.

+ सबंध पत्र चिमाजीच्या हातचें.

१ मस्तानी ?

ऐसे असतां या वस्तूस अटकाव करून सखा तोडू नये ऐसी मर्जी आहे. येथील अर्थांतर विदित व्हावें याजकरिता लिहिले असें. बहुत काय लिहिणें. कृपा असों दिल्ही पाहिजे हे विनंती.

¶*Govind Khanderao Chitnis to Nanasaheb Peshwa, telling him what course King Shahu advises to be taken with regard to the Mastani affair. It is only repentance, the King says, that will improve matters and not any kind of restraints imposed on Mastani.*

No. 33] *[29-3-1740*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यास चिमणाजी बल्लाळ आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागाईत छ ११ मोहरम शनवार जाणून स्वकीयें लिहीत जाणें. विशेष. राजश्री बापूजीरात्र मल्हार व राजश्री चिमणाजी भिवराव यांचीं पत्रें आलीं त्याच्या नकला करून तुम्हाकडे पाठविल्या आहेत त्यांवरून सविस्तर वर्तमान कळेल. तीर्थरूप राजश्री राऊ स्वामी छ १९ जिल्हेजीं गेले त्यादिवसांपासून आज पावेतों आम्हास पत्र लेहून पाठविलें नाहीं. त्यांची आमची (फाटलें) * * * * * * * *
र्थ नाहीं. जेथपर्यंत आमचा यत्न चाले तो केला; परंतु ईश्वराचे चित्तास नये. त्यास आमचा उपाय काय आहे? त्यांचे प्राक्तनीं जें असेल तें सूखरूप होऊ. आपण निमित्य घ्यावें ऐसें नाहीं. यास्तव आज आम्ही निंबदेव्हान्याचा घाट चढलों. दोहो तिही दिवसां पुण्यास जाऊं. पुण्यास गेल्यावर तिची रवानगी त्यांजकडे करावी, आपलें निमित्य वारावें. त्याचे प्राक्तनीं असेल तें होईल, ऐसा विचार केला आहे. याचें उत्तर सत्वर पाठऊन देणें. तीर्थस्वरूप राजश्री राउ स्वामीस आम्ही लेहून पाठविलें आहे कीं आपले शरीरीं समाधान नाहीं. यास्तव स्वारीस जावें, ऐसा अर्थ नाहीं. घरास यावयाचा विचार करावा म्हणोन लेहून पाठविलें आहे. त्याचे विचारास येईल तसें करतील. त्यास आमचे लिहिण्याचें पथ्य आहे ऐसें नाहीं, हे[1] आशीर्वाद.

¶*Chimaji to Nana, communicating his despair of curing Bajirao of his evil ways.*

---

१ शेवटचे दोन शब्द लेखकाच्या हातचे.

No. 34] [1740 ?

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री आपा यांप्रती राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष, चिरंजीव राजश्री राव याजपासी बहुत युक्तीच्या विचारे जो विचार करणे तो करून येणे. चालीवरी नजर देऊन जे कर्तव्य ते करावें. बहुत काये लिहीणे हे आसिर्वाद.

¶*Radhabai's letter to her son Chimaji Appa, asking him to remonstrate with Bajirao about his ways and arrange matters, presumably as regards Mastani.*

No. 35] [28-12-1739

पौ छ ११ सवाल.

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेसी अपत्यें चिमाजीनें साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ ८ सवाल पावेतों समस्त सुखरूप असों विशेष. सिवाजी कृस्ण यास नासिकास चिरंजीवास नोवरी पाहावयासी पाठविलें होतें तो आला कीं नाहीं, काय वर्तमान ते लेहून पाठविलें पाहिजे. माघ मासीं लग्न व मुंजी नेमिली आहे. ऐसियास, राजश्री स्वामी जेजुरीस माघ मासीं येणार. त्यांचे साहित्य केलें पाहिजे व घरचेहि साहित्य जाहालें पाहिजे. दोन्ही साहित्यें येकदांच होणार नाहीं. यास्तव वैशाख मासीं लग्नाचा व मुंजीचा मुहूर्त आहे कीं नाहीं ते मनांस आणावे. वैशाख मासी मुहूर्त असिला तरी वैशाख मासीं करावें, म्हणजें माघ मासीं राजश्री स्वामीचे साहित्य होईल. तदनंतर वैशाख मासीं घरचे साहित्य होईल. आपले विचारें माघ मासींच उरकून घ्यावे ऐसेंच असिले तरी साहित्य जसें होईल तसें होऊ. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे. रायासीहि च्यार गोस्टी नम्रतेनें बोलणे तैशा बोललो. सांप्रत पहिल्यापेक्षा बोलून चालून भोजन करून सुखरूप आहेत. देवाची दया आहे तर दिवसेदिवस संतोषीच होत जातील. चितात मात्र वेध आहे तो कललाच आहे. सविस्तर नानाहि सांगतील त्याजवरून कळेल. हे विनंती.

¶*Chimaji Appa to his mother regarding the marriage of Sadashivrao and the thread ceremony of Raghunathrao. Adds "I have humbly remonstrated with Bajirao. He is now in much better spirits, and God willing, he will daily grow more cheerful. But I am afraid however he is ill at ease on one account (Mastani)."*

No. 36]

श्री

राजश्री बाजीराऊ पंत प्रधान
साहेबाचे सेवेसी

॥ऽ सेवेसी विनंती. साहेबापासून आलियावरी येथे सुखी असो, व साहेबाचे हुकुमाप्रमाणे वर्तणूक केली. त्यास साहेब प्रदेशामधे गेल्यामुले काही समाधान नवते. त्यास साहेब दिगविजये करून आपले स्वस्थलास आले, त्यावरून परम समाधान जाले. यानंतर साहेबापासी मस्तान आहे त्यावरून आम्हासहि समाधान आहे. यामधें काही अनमान असल तरी साहेबाचे पायाची आण आहे. आमचा काही परामर्श न केला. साहेब थोर आहेत. आम्ही विनंती लेहावी यैसा काही अर्थ नाही. परंतु लौकीक बहुतसा जाला आहे कीं आम्हा पासून पोरी हिरोन घेतली यैसा विचार जाला आहे यैसे न कीजे. दोनी महिने पाठऊन दीजे. मागती सवेच पाठऊन देऊन. आपण साहेबाची जोड केली आहे आणि आम्हास पायापासी बोलावाल तरी सेवेसी येऊन. आमची फिकीर साहेबास आहे. सेवेसी तुकोजी पाठविला आहे. विनंती करील त्यावरून विदित होईल. विशेष काय लिा हे (विनंती.)

¶*The writer tells Bajirao that he is happy to see him living with Mastani. Whether this Mastani means Bajirao's mistress Mastani is a question. The origin of Mastani is yet undetermined and hence the importance of this letter.*

The whole letter is in one uniform old Modi handwriting.

No. 37] [23-3-1740

छ ९ मोहरम

श्री

तीर्थस्वरूप मातुश्री बाई
वडिलांचे सेवेसी

आपत्यें बाजीरायें साष्टांग नमस्कार विनंति. येथील वर्तमान तागायत छ ९ मोहरम मुकाम शाहापूर नजिक बराणपूर वडिलाचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिलांचे आसीर्वादपत्र आलें तें पावोन संतोष जाला. यैसेंच सदैव पत्र पाठऊन सांभाळ केला पाहिजे. ऊष्ण काल आहे, चिरंजीव राजश्री रघुनाथ व जनार्दन समागमें आहेत त्यांचा परामर्ष करीत जाणें म्हणून लिहिलें, यैशास

उभयतां सुखरूप आहेत. आपणांस कळावें याजकरितां लिहिलें असे. प्रस्तुत कोकणांतील हवा जबून आहे. चिरंजीव राजश्री आपा यास * * मध्यें बाहेर जाऊं न द्यावें. वसईकडे पाहावयास जाऊं लागतील तरी येकंदर त्याणीं न जावें. मातबर सरदार समागमे आहेत याजपासून जे मेहनत घेणे ते घेत जावी. आपण जवळ आहेत त्यांस वरचेवर सांगत जावें. लोभ असों दीजे हे विनंति+.

¶*Bajirao to his mother from Burhanpur, asking her not to let Chimaji Appa over-exert himself and not allow him to proceed to Bassein.*

No. 38] [*30-3-1740 ?*

छ १९ मोहरम

श्री

सेवेसी जगंनाथ नागेश विज्ञापना ऐसीजे. छ १२ मोहरमी आज्ञापत्र सादर जाहाले. तेथें आज्ञा की, तल्यात पाणी पहिले किती होतें व हाली नवे किती आले व पुढे नित्य नवें येतच आहे की काय हे तपसीलवार वर्तमान लिहून पाठवणे म्हणौन. त्याजवरून सेवेसी विनंती हेच की, पहिलें पूर्वीचे नक्षत्राचें पाणी, लांबी उतर दक्षण तिही बुरुजामध्यें सुमार १०० हात व रुंदी पूर्व पश्चम असी नवद व खोली कोठे तीन हात कोठे च्यार हात येणेप्रमाणे होते पु(ढे) उत्तराचे दोन तीन पाऊस बरेच पडले. त्याचे पाणी पहिल्यासुधा लांबी उतर दक्षण हात सुमार ५०० व रुंदी पूर्वपश्चम हात ३०० व खोली पहिली हात च्यार व हालीची हात १० येकून तेरा चौदा हात पश्चमेचे आंगे पके इमारतीकडे आहे. तिनी आंगे राहिली. तेथें कोठे च्यार हात कोठे पांच हात. कोठे अधीक उणे जसा जसा चड तसे आहे व आणखीहि वरचेवर येतच आहे. पावसाचे हि येतें. व जिले वोढे वाहो लागलें. पूर्वेकडील दोही खोऱ्यातील वोढे व दक्षणेकडील तल्याचे पालीबाहीरील वोढे जिले वाहो लागले. ते खणोन बाधोन आणून तल्यात आणिले आहेत. पाण्यापासून वरची चौरसी व माथा बारा हात खुली राहिली आहे. व तल्याचा तल रिकामा दक्षणेचे घाटाचे जाग्यापासून उतरेकडील घाटापावेतों पूर्वेचे आगाकडून लपेट लांबी हजार हात व रुंदी दक्षणेचे आंगे संभर सवासे दीडसे पावेतो व पूर्वेकडील आगी संभर

+ आर्बैनच्या सालांतील मोहरमांत बाजीरावाचा मुक्काम बऱ्हाणपुरांस असलेला सापडतो. त्याचे पूर्वीच्या दोन सालांत मोहरम महिन्यांत त्याचा मुक्काम बऱ्हाणपुराकडे असलेला सापडत नाहीं. सबब सदर पत्र २३ मार्च १७४० चेंच असावें.

पावणसे व उतरेकडे कोठे पनास कोठे पावणसे कोठे शंभर हात येणेप्रमाणें पाण्यापासून इमारतीकडे रिकामा तल आहे. तिनी आगचे (ओढ्याचे) पाणी बाधोन वोढ्या(स) (पुढे फाटले) तल्यात आणिले आहे. तल्यातील मा(से) * * न जगले. व बागेतील झाडे कुल जगली. (आ)बराईहि पावसाचे पाण्याने . कुल नवी फूट जाहाली. सदरहू लिा प्रमाणे लिंगोजी निबाणेकर व कुसाजी गायकवाड याणी आपले नजरेने पाहिले; उपरात सेवेसी विनती लिा आहे. विनंती पत्रावरून व लिंगोजी मुखजबानी सागता विदित होईल. कुसाजी गायकवाड आजच येथून श्री जजुरीचे तले पाहावयासी गेले. येणेप्रमाणे सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना. वरकड कामाकाजाचे वर्तमान मी उदईक सेवेसी येऊन निवेदन करीन. हे विज्ञापना.[१]

¶*Jagannath Nagesh gives the extent of water in the Mastani tank at Vadaki just near the Diva pass on the Poona-Saswad Road.*

No. 39] *[8-6-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामिचें सेवेसी,

सेवक कृष्णराव माहादेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल अशाढ सुध प्रतिपदा रविवार मुकाम श्री कासी जाणून स्वकीय कुशललेखनांज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिवस आम्ही आलियातागाईत स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी आपल्याकडील सविस्तर वृत लिहिलें पाहिजें. इकडील वर्तमान तरी मातुश्री ताई व आम्ही श्रीमधें सुखरूप पावलो. चतुर्मास येथें कार्तिकश्नानाचा उदेग उरकून गयेस जाऊन. आपणास कलावे म्हणौन लिहिले असे. वरकड वर्तमान मातुश्री ताईने आपणास पत्र लिहिले आहे त्यावरून सविस्तर कलो येईल. प्रस्+तुत मातुश्री शरीरी सावकाश आहे. चिंता न कीजे. घरी सर्वांचा सांभाल करीत असिले पाहिजे. आमची खर्चाची आबाल फार जाहाली आहे. सरकारातून काही अनकूलता होईल तर बरेच आहे. रोजमु(रा) स्वामीनी दरमाहे रुा सातसे देविले. त्यास सातशा रुोयाचा चारा दरमाहे पुरत नाही, तेथे आणखी तपसील काये ल्याहावा? नवाबाकडील वर्तमान लिहिले पाहिजे. आमचेविसी स्वामीनी नवाबास लिहिले त्याचे उतर काये आले ते लिहिले पाहिजे. बहुत काये

---

१ पुणें-सासवड-रस्त्यानें जातांना दिवे घाटाखालीं मौजे वडकीच्या शिवारांत, 'मस्तानीचें तळें' या नावाचें तळें लागतें; त्या तळ्यास अनुलक्षून या पत्रांतील मजकूर असावा असें वाटतें.

+ येथून वळण निराळें.

लिहिणे, कृपालोभ असो दीजे, हे विनंती. राजश्री बाबास नमस्कार विनंती उपर, लिखितार्थ परिसोन उतर पाठविजे. घरी सर्वांचा परामर्ष करीत असाल, परंतु सूचनार्थ लिहिले असे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev Joshi, brother of Kashibai, who had accompanied her on a pilgrimage, writes to the Peshwa from Benares about the future programme of their travels.*

No. 40]

श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यांप्रती मातुश्री राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून ताा छ १२ जिलकाद मुकाम ठाणे बारामती स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही द्वादसीचे पत्र पाठविले ते ठाणे मजकुरी छ मजकुरी पावलें. कितेक विस्तारें लिहिले ते येथार्थ आहे. राजश्री नाइकाचा हरयेक प्रकारे निकाल पडोन जेवतील; मग आम्ही तुम्हाकडे येऊ आगर पुणियास जाऊं. चिरंजीव सौ भिऊबाई येथेच आहेत. चिरंजीव सौ गोपिकाबाईस तुमचे पत्रावरून प्रस्तुत पुणियास राहाविलीं आहेत. आजच पुणियास पत्रे राा केली आसत. याउपरी तुमचे पत्र जसे येईल त्याप्रमाणे करूं. बहुत काये लिहिणें हे आसीर्वाद.

¶*Radhabai to her grandson Nana. She appears to have gone to Baramati to conciliate Babuji Naik, who was fasting.*

No. 41]

श्री

यादी थैल्या येथून पाठविल्या पावत्या करणे

पौ छ १ सवाल

१ मातुश्री बाई	१ राा आबाजी नाईक
१ सौ कासीबाई	१ माधवराव
१ सौ अनुबाई	१ नारो व्यंकटराव घोरपडे
१ उमाबाई	—
१ सौ भिऊबाई	३

१ सिऊबाई मामी
१ सदासिव
१ रघुनाथ
१ जनार्दन
—
९

१ उपाध्ये
१ कृष्णाजीपंत पुराणिक
१ सुभराव
—
६

यो पंधरा थेल्या पाठविल्या अस(त) पृथक पृ(थ)क पावत्या करणे छ २० रमजान×

Names of some of the Peshwa's relations.

No. 42]

छ ४ रालोवल

श्री

आसीर्वाद उपरी मानाजी खलदकर याचा मजकूर पेशजी तुम्हास लिहिला आहे त्यावरून त्याचे घरी मसाला करविलाच असेल. साराश मानाजी बरा येवजदार आहे. सतर असी हजार रुपये पावेतो याचा वहिवाट आहे. आम्ही घोडी मागत होतो ते व तिची सिगी व आणखी गुंडाबाबत घोडी मातबर व चवथी सारंगी ऐशा च्यार घोड्या चागल्या आहेत. त्या घेऊन पधरावीस हजार रुपये घ्यावयाची जागा आहे. पेशजी गुड फिराद जाहले होते, त्यांस पुन्हा उभे करून याजला जबैत आणून खरा अगर खोटा करून, रुपये घोडी घ्यावी. राजश्री बापूजीपंत अगर देशमुख देशपांडे अथवा आणखी कोण्ही प्रतिपक्ष करितील त्यांचे न आइकणे. आधी घोडी हाताखाले घालणें. पैकाहि+ साधेल. हा वतनी कारभार आहे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Bajirao's letter to Chimaji Appa, showing that his sense of justice was not very keen when self-interest came in. He orders that horses and money should be taken from Manaji Khaladkar, as he was a well-to-do person.*

×वरील यादींत पेशव्यांच्या कुटुंबीयांचीं कांहीं नांवें आलीं आहेत. शिऊबाई ही मल्हारपंत बर्वे याची बायको म्हणजे राधाबाईची भावजय असावी. अनुबाई व भिऊबाई ह्या बाळाजी विश्वनाथाच्या मुली.

+ येथून अक्षर खुद्द बाजीरावाचें.

No. 43]

पाा छ ७ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती राजश्री माहादाजी पंतास राजश्री स्वामीनी हिंदुरायाकडे रवाना केले. येथें आम्ही येकलेच आहों. दरबारीं जाबसाल करावयास कोण्ही नाहीं. तरी स्वामीनी पत्रदर्शनी राजश्री दादोबा[1]स पाठविलें पाहिजे. त्यास दुसरेकडे जाऊं न द्यावें. टाकोटाक येथें येऊन पोंहचत ती गोष्टी करावी. आ+म्ही वाकीब नाही. तरी वडिली दया करून राजश्री दादास पाठविले पाहिजे हे विनती.

¶*Nana asks Chimaji Appa to send Dadoba Purandare to Satara for his help.*

No. 44] [1740 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री पंत प्रधान स्वामी गोसावी
यांस

सेवक गोपाल सोनदेव कमविसदार काा साकोरे दिाा राजश्री राऊ सुमंत साां नमस्कार विनंती उपर येथील क्षेम जानोन स्वामीनी आपले वेभव लिहित आज्ञा केली पाहिजे. यानंतर कसबे मजकुरचे वर्तमान काल छ ७ रोज माहे रजब राजेश्री तुकोजी पवार वगैरे फौज कासारघाटीने आली त्यांस आपन जाऊन कासारीस पांच कोस जाऊन पाटील भेटविले. आपनहि भेटला. गांवचे वर्तमान सांगितले कीं मोकासा राजश्रीचा आहे. गाव बागाइती आहे. मुकामाची जागा व चाऱ्याचे जंगल दाखवितों. त्यास सर्व गोष्टीन मान्य करून येऊन थलांतच मुकाम केला. अगदी उसाची थले उलगाड (?) जाली. दोन फड सरकारचे होते, त्याजमधे हती उभे करून कही केली. थले मुतलक नाहींसी केलीं. सरदार उभे राहून कोनास ताकीद न केली. या सालास प्रजन्याचे आवर्षन जाले. लोकास कोलपत्रे देऊन वेळवाक करविले ते उंटे घालून चारली.

---

१ पुरंदरे. + नानासाहेबाचें अक्षर.

गावहि खर्चीखाले. घासदाना वगैरे फर्मीविसी रूो सेंभर पडले. यामुळे गाव बहुत हुलहुला जाला. राजश्री सुमंत तो सनिध नाहींत कीं त्यास वर्तमान विदित करावे. आज छ ८ रोजी राजश्री बाजी भिवराऊ व आपाजी जाधव याची फौज आली. तिचाही मुकाम काा मारी जाला त्यांही तो कांहीं तोसीस लावली नाही. त्यानी (ताकी)द केली कीं हे वर्तमान तुम्ही राजश्री राव यास लिहि (णे) त्यास स्वामी खावंद आहेत. आपन चाकर आहोत जे, वर्तमान साहेबास विदित करावे. न करावे तर धन्याचा शब्द लागेल की तुम्ही वर्तमान पावते न केले. गांव बहुत उदास जाला आहे. स्वामीस कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृ(पा) लोभ असो दीजे हे विनंती.

¶*A Kamawisdar reports to the Peshwa how the movements of armies destroy crops and ruin villages.*

N.B.—*This and the following letters which cannot be accurately dated but which have a general interest apart from the date, are given at the end of the section.*

No. 45]

पाो छ २० साबान

श्री

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसी.

आज्ञाधारक उधव वीरेश्वर चरणावरी मस्तक ठेऊन साां नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ माहे शाबानपर्यंत यथास्थित असे विशेष. मूळखडीचा पूल लाकडी बांधणे त्यास तालुके सिवनेर येथे कारखानदारास बोलाऊन आणून लांकडे मिळतात न मिळतात हें मनास आणून लिहिणे. त्याजवरून त्या वेळेस एक दोघे कारखानदार बोलाऊन आणिले त्यांचे वर्तमान सेवेसी लिाच आहे. परंतु त्याउपरी शोध करितां रामजी कडुसकर कारखानदार यास बोलाऊन आणिला. याने सरकारचे सनदेप्रो लाकडे आंबेघारगावावर आणून पोहचवावयाचे मान्य केले. त्याजवरून रामजी मजकूर सेवेसी पाठविला आहे. यास आज्ञा कर्तव्य ते करणार साहेब समर्थ आहेत. लाकडाचे खेरेदीस ठिकाणास लाकूड पोहचावयासी तीस पस्तीस हजार पर्यंत रुो लागतील. सस्ते महाग कोणेकडून आणावयासी पडते त्याचा आजमासें जिकडून लाकडे न्यावयाची तिकडे आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Udhav Vireshwar Chitale (Kiledar of Shivner) to Radhabai about building a bridge at Mulkhedi in the Poona District.*

No. 46] [9-3-1740 ?

श्रीभार्गवराम

श्रीमत परमहंस स्वामी याही

सहश्रायु चिरंजीव विजईभव चिमाजी आपा प्रधान यासी आज्ञा केली यैसीजे. चिमणाजीचा सासरा धोंडोपंत सफरा भला ग्रहस्त होता तो मृत्य पावला. त्याचा पुत्र रामाजी धोंडदेव हबसी याजकडेस होता, त्याजकडून माणसे घेऊन आम्हाकडेस आला. त्यास आम्ही तुमचे पदरी घातला. रामाजीचे लग्न जाले होते ते बाइको वारली. हाली त्याचे लग्न वैशाख मासी योजिले आहे. तरी रामाजी धोंडदेव यास पनरा दिवसाचा निरोप देऊन लग्न करावयास पाठवणे. लग्न च्यार दिवस जालियावर सवेच पाचवे दिवसी तुम्हाकडे रवाना करून. लग्नास खर्च पाच शत रुपये लागतात. यैशास ब्राम्हण तुमचे पदरी घातला आहे. ब्राम्हणाचे लग्न केलियास बहुत पुन्य आहे. याचे लग्नाचे येश आपण घ्यावे. पाचशात आपणास काय अनकुल होईल ते द्रव्य सध्या देऊन रामाजीस पत्र दर्शनी पाठऊन देणे. अनमान न करावे. आपण लग्नास द्रव्य देऊन रवाना करितील. त्यातून काही विशेश सें पनास लागले तर आम्ही अनकूलता करून देऊन. रामाजी भला ब्राम्हण आहे. याचे आपण चालवीतच आहेत. यापेक्षा पुढे विशेष चालवावें. वराड होताच रवाना करितो. ठेऊन तरी तुझी आण असे. केसोबा मुखांतरे सांगता कलो येईल. बाजीराऊ याचा कागद सुखसमाचाराचा तुम्हास आला असेल त्याचे नकल करून आम्हाकडेस पाहावयास पाठवणे म्हणजे संतोष होईल. जाणिजे विशेष काय लिहिणे. रा छ २१ जिल्हेज हे आज्ञा.

¶*Brahmendra Swami to Chimaji, requesting help for the marriage of Ramaji Dhondadev Safre.*

No. 47] [19-12-1736 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. ता छ २६ साबान पावेतों येथास्थित असें विशेष. थोर पाखरूं दिवाणखान्यांत आहे तें पाठवणें म्हणोन लिहिलें; त्यावरून पाखरूं कामाटी याजबा जासूद बरोबर देऊन पाठविलें आहें. पाखरास तांदुळ कैली ८८। येक सेंर दिल्हे आहेंत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Peshwa from Satara, having dispatched the pet bird as ordered.*

No. 48]

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक कृष्णराव बापूजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. शेवकाचे वर्तमान ताा छ १८ रबिलोवलपर्यंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून यथास्थित आसे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन आलो ते दुसरे दिवसी पुणियास प्रविष्ट जाहालो. मातुश्री श्रीयात्रेहून शरीरी स्वस्थ नाहीं. परम कठीण आवस्थेने आली. तसेच टाकून स्वामीचे शेवेसी यावें तर लोकापवाद. यास्तव काही उतार पडलियां शेवेसी येतो. आज्ञेप्रो बंगलियाचे काम पाहिले सविस्तर रामाजी विठल यानी शेवेसी विनंती पत्र लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल. बहुत लिहिणे शक्ति नव्हे हे विज्ञापना.

¶*Krishnarao Bapuji to Nana Peshwa—informing him of the illness of his mother.*

No. 49]

श्री.

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांसी.

प्रति सौभाग्यादिसंपन्न उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत जाणे विशेष. प्रस्तुत तुम्हाकडून पत्र येऊन राजश्री चिमाजी पंडित याचे वेथेचे वर्तमान कलत नाही, तरी यैसे न करणे. निरंतर पत्र पाठऊन संतोशावीत जाणे. यानंतर बटकी २५ पंचवीस देतो म्हणून मान्य केले, त्यास आजी किती दिवस जाहले, अद्यापि पाठविल्या नाहीत. यावरून काये म्हणावे ? याउपरी सदरहू पंचवीस बटकी उतम सेवेयोग्य पाठवणे. पुणेदेसी वगैरे देशात बटकीचा दुकोल आहे, मिलत नाहीत की काये, हे कलत नाही. याउपरी दिसगत न लाविता पाठऊन देणे. या कामास दावलखान व अनाजी ताव्या दिमत देवढी पाठविले आहेत. यास खर्चास रुपये १० दाहा देणे. जाणिजे. छ १२ माहे रबिलाखर. जरी बटकी पाठवीत नाहीत तरी तुमची भेट घेणार नाही ! जाणिजे. बहुत काये लिहिणे

मोर्तब
सुद.

¶*Some female member in the family of the Chattrapati writes to the Peshwa inquiring about the health of Chimaji Appa and reprimands him towards the end for not despatching 25 maid servants though he had promised to do so.*

No. 50]

श्री

आसीर्वाद उपरी, तुम्हीं चिठी पाठविली ते पावली; आजी अयोग दोनतीन आहेत याजकरितां फुरासिगीस राहातों. उद्येक तेथे येऊन. बारसियाचा निश्चये कधी केला तो लिहिला पाहिजे म्हणोन लिहिले ते कलले. यैशांस आजी शनवारी उतम नाहीच; उद्येलाहि बतीस घटका वैधृत आहे तरी तुम्हीं दिवस अस्तानंतर रात्रो चवथे पाचवे घटिकेस घरी येणें उतम आहे. बारशाचा निश्चये सोमवारी केला आहे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Auspicious times for certain ceremonies are mentioned.*

No. 51]

श्री

चिरंजीव राधाबाई या प्रती मल्हार दादाजी कृतानेक आसीर्वाद येथील कुशल मार्गसीर सुध ९ जाणून आपल्याकडील कुशल ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर आम्ही तुमची आज्ञा घेऊन स्वार जालों ते पारनेरचे मुकामी लस्करास आलों. राजश्री आपाची भेट जाली. बारीपावेतों समागमेंच होते. मार्गी घरचे वर्तमानाचें पत्र चिरंजिवाचें आलें त्यावरून आज्ञा घेऊन काली कोटुरियास गंगातीरीं आलों. घर उघडें पडिलें. श्रीच्या चित्तास आलें त्यास उपाय नाहीं. रुणानमंध प्रमाण आहे. तिचें सार्थकच जालें. मागें मुलास सर्व प्रकारें तुम्ही वडील आहां. चिरंजीवाचे समाधान केलेच असाल. ल्याहावेसें नाहीं. खेद करूं न द्यावा व तुम्हीहि खेद न करावा. विवेकेकरून दुख निरशन करावें. मृत्यास उपाय नाहीं. तुम्ही सूज्ञ आहां. विशेष काये लिहू. चिरंजीव बावाचे लग्न होणे त्यास वेदशास्त्रसपन नारायण दिक्षित व त्र्यंबकभट खेडकर व समस्त ब्राम्हणाचे मतें तीन पक्ष जाल्यानंतर लग्न करावया कार्यास येईल यैसा शास्त्रार्थ आहे. तिकडेहि विद्वान ब्राम्हण आहेत. मनास आणून लग्नसिधी करावयाचे केले पाहिजे हे आशीर्वाद.

¶*The death referred to in the letter may be that of Baburao Malhar's wife. Letter to Radhabai from her elder brother Malhar Dadaji Barve.*

No. 52]

श्री.

गंगाभागिरथी समान राधाबाई यांसी

प्रीतिपूर्वक कान्होजी आंगरे सरखेल दंडवत उपरी. येथील कुशल वैशाख बहुल पंचमीपर्यंत जाणून आपले क्षेम वर्तमान लिहित जाणे. सांप्रत तुमचें पत्र येत नाही ऐसे तर नसावे. आपले सर्वदा कुशल वर्तमान लिहीत जाणे. बहुत काय लिहिणे हे विनंती+.

No. 53]

श्री

आसीर्वाद. हती कोणास न देणे. पैका कोणा सिलेदारास न देणे. आगत्या आगत्य विचार पाहून संसार करणें. घोडी भुजाऊ पागेस ठेवणे. डोचट भोरप्या ह्याची पाहून खडून लोकास देणे. त्याचे कागद लेहून घेत जाणे. गजराज हती पवारापासून तजविजेने बसावयास अगर निशाणास म्हणून आगत्य मागून घेणे. आम्ही लिहिलेसे कलो न देणे. मोबदला पाहिजे तरी येखादा त्यास मेलऊन देणे हा आसीर्वाद ×

¶*Bajirao in this autograph letter is giving some instructions to his brother Chimaji Appa. " Money and elephants should not be handed over to anyone. The elephant Gajraj should be taken from Pawar without letting him know that it is done at my instance."*

No. 54]

श्रीगजानन.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवसी.

सेवक कृष्णराव माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुषल जाणून स्वकीये लिहिले पाहिजे विसेष. वडिलाचे आज्ञापत्र आले तेथे आज्ञा कीं सत्वर येणे. त्यास वडिलाचे कूच दिपवालीचे प्रतिपदेस आहे म्हणून ऐकतो. याजकरिता घरचे

+ सबंध पत्र एकहातचें, कान्होजी आंगऱ्याचें राधाबाई पेशवे यांस, बहुधा कान्होजीचें हस्ताक्षरच असावें. पत्रावरून पेशवे व आंगरे यांचा घरोबा व्यक्त होतो.

× सर्व पत्र खुद्द बाजीरावाच्या हातचें.

कितीक संसारिक कामकाज व स्वारीची तयारी करावी लागते. आपणावाचून कामकाज चालणार नाहीं. आवदा चिमणाजीपंत घरी नाहीं याजकरितां जे करणे ते आम्हासच करणे लागते. दो चौ दिवसात येथील. उलगडा करून आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. वरकड सविस्तर वर्तमान वेदमूर्त राजश्री सिवभट गाडगील सेवेसी निवेदन करितील तो सविस्तर अर्थ ध्यानांत आणून आज्ञा करावी त्या प्रमाणे आपण त्रयोदसीस स्वार होऊन येतो. विसेष आपण आजिपर्यंत थैसे संमजत होतो कीं बाजीराव प्रधान याचे वचन म्हणजे ईश्वराचे प्रमाण वचन, कदापि अन्यथा होणे नाहीं. परंतु सांप्रत युगपरत्वे करून थैसे जाले कीं त्या वचनास अनृत लक्षण ग्रहण लागोन दोष लागला. वरकड आमचे गुणदोष म्हणावे तर आम्ही पतित आणि स्वामी पावन. पतितांचा उधार पावनानी करावा तें सामर्थ पावनाचे गेले म्हणजे उभयताहि पतित जाले. ईश्वरी वचन बुडाले येविसी बहुत ल्याहावे तर स्वामी सर्वज्ञ आहेत. बहुत काय लिहिणे ? कृपा लोभ आसो दिला पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Krishna Rao Mahadeo remonstrates with the Peshwa for not having kept his word and promises to join him soon.*

No. 55]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, राजश्री कुसाजी भोसले याचे लग्न राजश्री स्वामी करितांती. आजीपासून चौथे दिवसी लग्नाचा निश्चये केला आहे. त्यास आहेर वरकड सरकारातून करितील. स्वामीचे निसबतीने आहेर जाला पाहिजे. तरी संनगे पाठऊन दिल्ही पाहिजेत. त्याप्रमाणे आहेर करून विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa, requesting that a wedding-dress may be sent by way of a present to Kusaji Bhosle, the celebration of whose marriage was fixed by Shahu within four days.*

No. 56]

पाा छ १९ मोहरम.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. काा सिवापूर येथील खासगत बागापैकी आंबे सुमार १०००० दाहा हजार

स्वामीचे जिल्हेत गावगना लावणीस दिल्हे हे वर्तमान पहिले तपसीलवार सेवेसी लिहिले होते. प्रस्तुत आंब्याचे कागद बागावरील कमावीसदारास घेऊन पाठविले असेत. तरी स्वामींनी आंबे आणऊन तमाम गावगना वाटणी करून लावणीस द्यावे आणि कुणबियास दहशत पडे आणि लावणी मुलकात आंब्याची होये ते अगत्यरूप करावे. येविसी राजश्री स्वामी वारंवार आज्ञा करितात, यास्तव आम्हीहि सेवेसी लिहितो. विदित जाहाले पाहिजे. का जिंतीचेविसी पहिले लिहिले आहे तरी खामखा तेविसीचा बंदोबस्त होये ते अगत्यरूप केले पाहिजे. संताजी जासुदाबराबर पत्रे पाठविली आहेत त्याची उतरे लौकर पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shahu orders Bajirao and Chimaji to carry out a plantation of mango trees in several villages.*

No. 57]

श्री.

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी.

ꣿ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशललेखन-आज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले तेथें आज्ञा केली कीं, रामायेण पुस्तकांतील युध्यकांड आहे त्याचे प्रयोजन आहे. तरी ते पुस्तक पाठऊन देणे म्हणऊन आज्ञा केली, त्यावरून येणेप्रा पुस्तक पाठविले आसे:

१ सुंदरकांड
१ युध्यकांड
१ उतरकांड
———
३

येकून तीन कांडे पाठविली आहेत. घेतली पाहिजे. विशेष काये लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंती

(मोर्तब सुद.)

(पिलाजी जाधवरावाचा शिक्का.)

¶*Pilaji Jadhao sends to Bajirao a handwritten copy of three chapters of the Ramayana.*

No. 58]

श्री.

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसी.

ℰ श्रीमंत सकलगुणाअलंकरण अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले तेथे आज्ञा केली की, डुकराचें व वाघाचें व मोराचे व आसवलीचें व (व)डवाघलाचें यैसी तेंले आणविलीं. प्रस्तुत आमचे संग्रही वाघाचें व डुकराचें व सुसरीचे यैसीं तिन्ही जिनसाची तेलें पाठविलीं आहेत. आसवलीचें व वडवाघलाचें संताजी मानकर याजकडून देविलें आहे तेथून आणवावें. त्यांस पत्र लिा आहे. यानंतर आम्ही वऱ्हाडांतून येतसमई वाघ मारिले त्याचें तेल काढून बुधली भरून सेव्यापासी दिल्ही आहे. राजश्री विसाजीपंतास ठावकें आहे. तेहि जामदार-खानियांत आणिले नसलें तरी आणविलें पाहिजे. विशष काये लिहिणे हे विनंती.

(श्रीपांडुरंगचरणी दृढभाव चांगोजीसुत पिलाजी जाधव)

(मोर्तब सुद.)

¶Pilaji Jadhao sends some medicinal oils to the Peshwa.

No. 59]

श्री

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी स्वामीस कोणी सांगितले असेल की कोकणचे मूग गोडे उतम. येसे असेल तरी लक्ष प्रकारे खरिदी करून मूग कैली ·|||· पधरामण पाठऊन देतो. कलवे याकरितां लिहिले असे. पधरामण स्वामीनी लिहिलेप्रमाणे पाठऊन देऊन. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶" Mug ", a species of grain which is a speciality of the Konkan, is sent to the Peshwa.

No. 60]

श्री.

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ताा जेष्ट वद्य पंचमी जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपल्या कारणे फणस ४ च्यार व अननासे ५ पांच पाठविली आहेत. घेऊन पावलियाचें उत्तर पाठवावे. येतेसमई भोयास चौरोजा अडिसेरी द्यावी. बहुत काय लिहिणें? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Some fruit is sent to the Peshwa.*

No. 61]
पाा छ ८ सवाल

श्री.

पुाा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. स्वामीनी अस्पी नगारियाविसी आज्ञा केली होती त्यावरून नगारे नवे सजून जोडी येक पाठविली आहे. तांबे वजन पके ८।२। सवाबारासेर लागले आहे. बहुत काय लिहिणे. यास मसाला नगारची सागेल त्याप्रमाणे देविला पाहिजे. हे आपले विचारास आले तरी या प्राा आणखी येक दोन जोडिया लागल्या तरी तयार करून पाठऊन देऊन. बहुत काय लिहिणे? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*A pair of drums is prepared and sent to Chimaji Appa.*

No. 62]
पौ छ १ सवाल.

श्री.

पुरवणी राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. प्रस्तुत वर्तमान येकितो कीं स्वामीनी आपल्या वाड्याभोवता कोट घालावयास प्रारंभ केला आहे. त्यास आमचे घर व राजश्री गोविंद हरी याची घरे कोटा बाहेर पडतात. त्यास आमचे विचारे ही घरे बाहेर टाकावी येसे

नाहीं. कोटांत घ्यावीं ये गोष्टीस पैका जाजती पडला तरी ज्याची घरें ते देतील आणि आपण घ्यावा परंतु घरे कोटाबाहेर न टाकावीं. नाहीतरी आम्हांस घर मोडावे लागेल. कळावे याकरितां लिहिलें असे. बहुत काय लिहिणें, लोभ केला पाहिजे हे विनंती.

No. 63]

श्री.

पुा राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी.

विनंती उपरी. वसईस सुकेली होतात त्या केळीचे नांव राजेली. त्यास राजेली केलीची रोपे वसईस माणसे पाठऊन आणून स्वामीकडे बाा सिपाई धर्मोजी मगर पाठविली सुमार ३५ पचतीस पाठविली आहेत ही स्वामींनी आपले बागेमधे लाविली पाहिजेत. आणि पावलियाचे उतर पाठविले पाहिजे हे विनंती.

¶*Some Rajeli banana plants, a species known for its keeping qualities, are sent to the Peshwa to be used in his gardens.*

No. 64]

पाा छ ८ जिलकाद.

श्री.

पुा राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी.

विनंती उपरी. तांबटास भाडी घडावयाची धोडी कल्याणास आहेत म्हणून विदित जाहाले. येशास धोडीचे प्रयोजन आहे तरी धोडी उतम २ दोन अगत्य पाठवणे म्हणून लिहिले. येसियासी येथे धोंडी नाहीत. येथें तांबट आहेत. त्यांजपुरत्या दोन तीन नेमस्तच आहेत. जाजती आहेत येसे नाहीं. येथे मिळत नाही हे विनंती.

No. 65]

श्री

राजश्री माहादोबा गोसावी

यासी

विनंती उपरी. चिरंजीव राजश्री आपा गंगापार होऊन गेले. त्याजकडून कासीद पत्रे घेऊन आले श्रावण शुध सप्तमीची पत्रे आहेत. चिरजिवाजवली वर्तमान आले

की श्रीमत् राजश्री पतप्रधान यासी पुत्र जाला. त्याणी पत्री लिहिले नाही परंतु जबानी कासिदाने सागितले. हे संतोशाचे वर्तमान तुम्हास कलावे याकरिता लिहिले असे. हे विनती. गंगेपलीकडे आलीकडे पाऊसहि बरा आहे हे विनती.

¶*The birth of a son to the Peshwa is reported to Mahadoba Purandare.*

No. 66]

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामाचे सेवेसी.

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ १९ माहे सफर जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामीनी जासुदा समागमें पत्र पाठविलें कीं मधाचे व सोरलतेलाचे प्रयोजन आहे याकरितां पूर्वी लिहिले होते परंतु पाठविलें नाहीं. तरी हली सोरल पेणेतून आणून व मध येसे पाठवणे म्हणून लिहिले. येसियासी येविसी पूर्वी कांही पत्र आले नाहीं. हली लिहिले येसियासी सोरल पेणेतून आणून पाठवावे त्यास प्रस्तुत तेथेही हगाम नाही. तेथेहि मिळणार नाहीं याकरिता सोरल थोडकेसे घरात होते ते व मध मेळऊन पाठविले असे.

मध घागर १ येकूण वजन पके ८।	सोरल घरांतील होते ते पाठविले वजन पके ८८९॥.

येकूण मध वजन पके दाहासेर पके व सोरल वजन पके साडेपांचसेर पाठविले आहेत. कळावे याकरिता लिहिले असे. येकूण मध व सोरल वजन पके साडेपंधरासेर पाठविली आहे. बहुत काय लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi sends to the Peshwa some honey and other articles.*

No. 67]

श्री

विनंती सेवक तुबाजी अनंत सा। नमस्कार. सेवेसी प्रार्थना यैसीजे, आजी सनिवारी सेवेसी पत्र माहाराज मातुश्री आईसाहेबाचे आज्ञाप्रमाणे आम्ही सेवेसी लिहिले की सोमवारी सूर्योदयापूर्वी येथून कूच होईल म्हणौन लिहिले होते. त्यासी आजी दोनप्रहरा बोलाऊन नेऊन आज्ञा केली की तुम्हाकरवी कागद लिहिविला. उदईक येतो. येथे आता गावचा जोसी आला होता. त्याने मुहूर्त सांगितला कीं

मंगलवारी प्रयाणास व प्रवेशास मुहूर्त आहे. व अकरावा चंद्र आहे म्हणौन सांगितले. त्यासी सुमुहूर्त भेटी होवी; ग्रामप्रवेश सुमूर्त करावा, येक दिवस आधिक लागतो. पेशव्यास आताच पत्र लिहिणे. मंगलवारी आम्ही येतो. त्यावरून विनंती लिहिली आहे; व स्वामीची आज्ञा होती की बराबरच्या लोकाचे गणति नावनिसीवार पुराणिकापासून लेहून मागितली. त्यानी लेहून दिली त्याची नकल सेवेसी पाठविली आहे. याची तरतूद असो द्यावी; व काली रात्री पागेची घोडी बोर येत होती. पागेची घोडीचा पाये नलीत जाऊन टिकोर पडले. घोडी येलूनजीक राहिली. प्रात:काली माणोस पाठविल तो घोडी मेली. स्वामी म्हणतील की सकाल येक लिहिले आता यैसे लिहिले? यासी आमचा इलाज काये आहे. आज्ञेप्रमाणे सेवेसी लिहितो. बहुत काये लिहिणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Tubaji Anant, Peshwas' agent in the Konkan, writes to the Peshwa from Satara about the auspicious hour for entering a new house and other matters. He also refers to an accident to a mare.

No. 68]

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंती. वेदभाष्याचे पुस्तकाविसी तुम्हास लिहिले होते त्याचे उतर तुमचे आले कीं, वेदमूर्ति रा विस्वनाथ जोसी रायेरीकर यापासून पुस्तक आपण घेतले नाही व दुसरे आपले संग्रहीहि नाही. त्यावरून हाली जोशाचे पत्र बजिनस अलाहिदा तुम्हास पाठविले आहे. मनास आणून खामखा वेदभाष्याचे पुस्तक बहुत माफजातीने पाठऊन देणें म्हणून स्वामीनी पत्री आज्ञा लिहिली. यैसियास, पूर्वी सेवेसी विनंती लिहिली ते स्वामीस मिथ्या भासोन, जोशाचे पत्र घेऊन पाठविले. तस्मात, आमच्या लिहिलियाचा विश्वास नाही यैसे दिसोन आले. तरी स्वामीच्या पायासी आपण मिथ्या भाषण करू हे गोष्ट सर्वथा होणार नाही. विस्वनाथ जोसी समर्थ. त्यास काये म्हणावें? नसता विकल्प स्वामीचे चितात येईल जाणोन चिरंजीव बाबूराव सिनरी आहेत, त्यास हे वर्तमान लिहिले. त्याचे उतर आलें की, पूर्वी पुण्यात आम्ही असता वेदभाष्याची चर्चा जोशाजवल निघाली होती. ते समई जोसी आपल्याजवल बोलिले होते कीं, आपले संग्रही पुस्तक होते ते द्रव्यपर्यायें वेदमूर्ति त्रिंबकभट खेडकर वास्तव्य नासिक याणी नेले. त्यावरून त्रिंबकभटास पत्र लेहून सरकारचा कासी तिकोना जासूद व आम्ही आपली माणसे नासिकास

पाठविली; पुस्तक आणविलें. त्याणी उतर लिहिले की, आजी बीस वर्षे रायेरीकरापासून पुस्तक विकत आपण घेतले. त्या पुस्तकावर सता दुसरियाची नाही. द्रव्य देऊन पुस्तक घेतले असता तुमचे नाव कशास घ्यावे. पुस्तक आपण देत नाही, यैसे परिछिन उतर त्रिंबकभटी दिल्हे. आग्रह करावा तर भिक्षुक ब्राह्मण. उपाय नाही. स्वामी समर्थ आहेत. आपली आज्ञा त्यास जालियावर देतील तर न कले. रायेरीकरास आम्ही पत्र पाठविले आहे. प्रविष्ट जालियावर त्यासहि उमज पडेल. बिस्मृतीने आमचे नाव त्याणी घेतले आसेल. आपण त्यापासून पुस्तक घेतले नाही. विश्वास मानावा. * हे विनंती.

¶*On being asked by the Peshwa why the copy of Vedabhashya was not returned, the writer explains that he is not responsible for it as it passed to several persons from hand to hand.*

No. 69]

श्री

पुरवणी राजश्री राऊ प्रधान स्वामीचे सेवेसी विनंती विज्ञापना जे. राजश्री जानबा साहेबानी श्रीमंत मातुश्री बाई वडिलास वस्त्रें पाठविलीं ततसमई सौभाग्यादिसंपन्न मातुश्री कासीबाईसाहेबांस वस्त्रें पाठविली. माहाराजाचें आगमन होईल याजकारितां मार्ग लक्षिला. सांप्रत रा आपासाहेबांचा निरोप घेऊन राजश्री जानबासाहेबांकडे गेलो. सौ मातुश्री बाईसाहेबाची वस्त्रे सुतडे काले पोफले व चोली तापथियाची यैसी सनगें दोन सेवेसी पाठविली आहेत. ज्याची त्यासी प्रविष्ट करून कृपा करून प्रत्योतर देविले पाहिजे. बहुत काये लिहिणे, कृपा असों दीजे, हे विनंती.

¶*Bajirao is requested to hand over to his wife the robes of honour sent by Janba Nimbalkar.*

No. 70]

श्रीव्यंकटेश

श्री सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलकृत
राजमान्य राजेश्री चिमणाजी
पंत आपा स्वामी गोसावी यासी

पोा व्यंकटराऊ नारायेण कृतानेक साा नमस्कार विनंती उपर येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. आपण जासुदाबराबर पत्र पाठविले तेथे लिहिले

की कारजकराबाबत कापड कोठे आहे हे कळत नाही. सावकाराचेथे शोध केला परंतु कोणी सागत नाही तरी कोठे आहे हे लिहिणे म्हणजे पाठऊन देऊ म्हणून आज्ञा केली. त्यावरून कारजकरास बोलाऊन विचारले. त्याणे नारोबा नाईक अनगळ यास पत्र दिल्हे आहे ते बजिनस पाठविले आहे. त्यास देऊन कापड घेऊन उटावर लौकर येथे येऊन पोहचेसे केले पाहिजे. सौ. मातुश्री लक्षुमीबाई राजेश्री गोविंद हरि याची मातुश्री तेथे आहेत त्यास येथून पालखी पाठवावी तर येथे सध्या अनकूलता नाही यास्तव आपणास लिहिले असे. तरी हर कोणाकडील पालखी मेळऊन मातुश्रीची रवानगी सत्वर केली पाहिजे. लग्नाचा निछय पूर्णिमेसच केला यास्तव त्वरा केली पाहिजे. तेथील ग्रहस्तास आमंत्रणपत्रे पाठविली आहेत तरी आपण कारकुनाचे हाती देऊन ग्रहस्तास आमंत्रण केले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan to Chimaji Appa: makes enquiries about the cloth of Karajker and asks him to secure a palanquin for Govind Hari's mother.*

No. 71]

श्रीव्यंकटेश

तीर्थरूप राजश्री अपा वडिलांचे शेवेसी,

अपत्ये सौभाग्यादिसंपन्न अनुबाई कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम अश्विन वद्य त्रयोदसी भृगुवासरपर्येंत मुकाम नांदणी वडिलांचे असीर्वादेकरून सुखरूप असों विशेष. बहुत दिवस जाहाले, अम्ही आल्यादारभ्य परामर्ष होत नाही. ऐसे न पाहिजे. निरंतर पत्री सांभाळ केला पाहिजे. यानंतर त्या प्रांतात महर्गता व बरग पडिले अहे. यैशास, आम्हाकडे हरभेरेहि सवंग आहेत, गवतहि अहे. सुभिक्ष धान्य अहे. याकरिता वडिली पागेच्या मादवाना वीसपंचवीसपावतो पाठविलिया उतम आहे. निगादास्तहि आम्हास कलेल तैसी करूं. याकरिता वडिली या पत्राचे मनन करून अगत्यरूप पाठविली पाहिजे. बहुत काये लिहिणे, कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Anubai to Chimaji Appa, requesting a few mares being sent to be trained under her care.*

छ २२ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक बाबूराऊ मल्हार सां। नमस्कार विनंती. ता। छ ११ सौवाल-पर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीचे आज्ञापत्र काली संध्याकाली सादर जाले की, "आपण हुताशनीकरिता माहाराज स्वामीची आज्ञा घेऊन पुण्यास आलो. वर्षाचा दिवस. इष्टमित्र येके स्थली हुताशनी करावी ऐसा विचार आहे. यास्तव, तुम्ही पत्र पावताच स्वार होऊन येणे. पंचमी जालियावरी सर्वच आज्ञा घेऊन जाणे" म्हणून पत्रीं आज्ञा केली, तेणेकरून बहुत संतोष जाला. आम्हा स्वकीये लोकांचे स्वामी छत्र आहेत. दुसरें गौरव कोण करणार आहे? लक्षप्रकारें आज्ञेप्रा। स्वार होऊन सेवेसी यावे. त्यास इकडील सर्व विचार पूर्वी सेवेसी लिहिला आहे त्यावरून श्रुत जाला असेल. नवाब अबदुल अजीजखान नासिकी येऊन दाभाडियाकडील लोकी किले त्रिंगल-वाडी घेतली होती ते फिरोन घेऊन आले. दाभाडियाकडील कमावीसदार व माणसे येकेकडे जाली आहेती. पुरसीस मांडिली आहे. आम्हास परवा येक पत्र व काली येक पत्र आले कीं, भेटीस येणे. कामकाज तो अगदी सर्वांचे बंद आहे. आपणास येऊन पंधरा दिवस जाले; इतकियांतच येकाकी येथून स्वार होऊन यावे तेव्हा त्यांचे चितात काये येईल न कले. आपले गुमास्ते माहाली माहाली आहेती. जमाबंदीचे दिवस. कामाकाजास अंतराये होईल. अद्याप बाबती व सरदेसमुखीचा पैका वसूल नाही. मुलकात होईल की, त्वरेने कां गेले? विपर्यास मानितील. तांब्राच्याहि चिती काये येईल? ऐसा अर्थ. दुसरे, उष्ण काल दिवस. माझे शरीर स्वाधीन नाही. पत्र पावले (तों) दिवस थोडे. त्वरेने यावयाची शक्ति नाही. फिरोन त्वरेने यावे लागेल. मागे कामकाज होणे. ऐसा विचार देखिला. वाईस गेलो; लग्नसिधि जालियाउपरी स्वामीसंनिध येऊन भेटी घ्यावी आणि आज्ञेप्रमाणे इकडे यावे. त्यास, हुताशनी पंधरा दिवस राहिली. स्वामी आज्ञा देतील न देती. इकडे तो कामकाजाचा अगत्यवाद. यास्तव, भेटीस न येता स्वार होऊन आलो. इतका अर्थ पाहोन हुताशनीस यावया अंतराये केला. आपणास सर्वप्रकारें वडील स्वामी आहेती. आज्ञेचा उलंघ जाला याची क्षमा केली पाहिजे. मी खासगत चाकर. उजूर नाही. परंतु तीर्थरूप येंदा येथे ना(ही)त ; यामुले चार दिवस विरजीक करावी म्हणून आज्ञा न घेतां आलों.

आज्ञापत्राप्र।। स्वार होऊन यावे; परंतु विस्तरें वर्तमान लिहिले आहे यामुले अनमान जाला. दुसरे, दरम्याने तीन दिवस राहिले यैसा अर्थ समजोन आलों नाही. अपराध क्षमा केला पाहिजे. विदित होये हे विनंती.

हे विनंती.

¶*Baburao Malhar (Barve) to the Peshwa, regretting his inability to be present at Poona for the Hutashani especially in view of the impending trouble by the Mughals in his province.*

No. 73]

श्री

चिरंजीव राजश्री बाजीराऊ यांप्रति राधाबाईने कृतानेक आसीर्वाद उपरी. सौभाग्यवती चिरंजीव भिऊबाईस पातल पाठविले ते व चोली आपणाजवळील यैसे देणे म्हणून लिहिले. ऐश्यास, ते परभारीच आपले घरी गेली. आजी सात-पांच रोज रुसली आहे. घोडा घेतलेबगर समजत नाही. कलले पाहिजे. चोली व पातल त्यांचे घरी पावावयासी पाठविते. हे विज्ञापना.

¶*Radhabai writes to her son Bajirao about some petty grievance of her daughter Bhiubai.*

No. 74]

छ २२ जिल्हेज.

श्री

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. स्वामीकारणे सुरण गोडा येक थोर व येक लाहान यैसे दोन पाठविले आहेत. त्यास, या सुरणास मध्यें मोड फुटलें आहेत त्याचे चौफेर कापून भक्षावा. मोडाभोवतां अनमाने अदसेरेक वजन सुरण ठेऊन तो लावावा म्हणजे फिरोन जेव्हड्याचा तेव्हडा भुईमधे होतो. तरी लिहिलेप्रमाणें करावें. कलले पाहिजे हे विनंती.

¶*This letter, written to Chimaji, refers to a peculiar variety of an esculent root* (सुरण), *presented by the writer.*

No. 75]

श्री

चिरंजीव सौभाग्यवती कासीबाई यांसी प्रति मातुश्री राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा जेष्ट वद्य चतुर्दसी जाणून आपणाकडील सविस्तर वर्तमान लेहून संतोषवीत जाणें विशेष. बहुत दिवस तुम्हाकडील वर्तमान कळों येत नाही, तर सविस्तर लेहून पाठवणें. आपणांस व चिरंजीव बालास जतन करणें. जनार्दनास जतन करणें. बहुत काये लिहिणें, हा आसीर्वाद.

हेच सौा अनुबाई व सौा भिऊबाई यांचे नमस्कार. लोभ असो दीजे हे विनंती.

आश्रि[त] कृष्णभट कर्वे आसीर्वाद.

¶*Radhabai to her daughter-in-law, Kashibai, asking her to take proper care of Bal and Janardan.*

No. 76]

श्री

चिरंजीव विजयीभव राजश्री नानास प्रति सौा कासीबाई असीर्वाद उपरी. येथील क्षेम ताा श्रावण बहुल अमवाशापर्यंत सुखरूप आसो विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कळो आले. यैसेंच सदैव पत्र पाठऊन समाचार घेत जाणे. तुम्हाकारणे अंजीर सुमार ९ नव पाठविले आहेत हे घेणे. तुम्हास अंजिराची आवडी असली तरी लेहून पाठवणे. येथून थोडेबहुत पाठवीत जाऊन. तुमचे पत्र आले ते आम्हास न कळत राजश्री आपास कळले. त्याणी वाचून पाहिले. त्यावरून बहुतसे कौतुक करून बाजी भिवराऊ यास पत्र लिहिले आहे त्यावरून वर्तमान कळेल. तुम्हास तेथे पेरू मिळत असिले(स) थोडे-बहुत बालास पाठवीत जाणे. बहुत काये लिहिणे, हे आसीर्वाद.

पोा नारो गंगाधर सांा नमस्कार विनंती उपरी आबाकारणे स्वामीच्या स्वहस्ताक्षरे दाहा बंद लेहून पाठवीजे. आनमान सहसा न कीजे. बहुत काये लिहिणे कृपा निरंतर कीजे हे विज्ञाप्ति.

सेवेसी विज्ञापना. बाळाजी करकरे याचे सांा नमस्कार, हें विज्ञाप्ति.

¶*Kashibai writes in endearing terms to her son Nana asking him how he enjoyed the figs sent by her.*

914

No. 77]

छ ८ मोहरम.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी चरणरज आपाजी सेटगे सां दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ४ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविलें ते अक्षरशा वाचून आज्ञेप्रमाणें अवरंगाबादेहून दाई आली आहे तीस बोलाऊन आणून पत्रार्थ सांगितला. तिणें उतर दिल्हें कीं, आपण अवरंगाबादेहून आपली दाहावीस माणसे टाकून येथें खिजमतीस आल्यें आहें. केवळ पोटानिमित्य आल्यें यैसे नाही. बख्तवंराची[1] चाकरी करून मजुरा करून घ्यावा याच उदशें आल्यें अहि. त्यास, येकच वेळ आवधियास औषध दिल्याने गांठी कैसी पडत्यें ? गूण कैसा येतो ? तरी आधी येकास औषध देवणे. त्यास गूण येऊन शरीर दृढ जाहाले म्हणजे मग दुसरियासी देवणें. ज्यास औषध देईन त्याजवळ नेहमी असावे लागतें म्हणौन बोलली. त्यास, घरांत सौभाग्यवती मातुश्री कासीबाईच्या शरीरास आरोग्य नव्हते. तोंडास पाणी सुटत होतो व अन रुचत नव्हते. त्यांस स्वल्पसा उपाये करून औषध देविले. त्याणेंकरून गूण आला. तोंडाचे पाणी राहिले, अन रुचो लागले. त्याबरी आणखी चालीसपंनास प्रकारची औषधें सांगितली. त्यास, वाणियाचे घरीची होती ते वाणियांपासून घेतली. रानातून आणायाची होती ते रानातून आणिली आणि औषधास प्रारंभ केला आहे. यांस उत्तम प्रकारचा गूण जाहाला. शरीर दृढ जाहालें म्हणजें सेवेसी लेहून पाठऊन. उपरांत नणदीकराकडे नेहमी महिनाभर दाईस ठेऊन आज्ञेप्रमाणे त्यांकडे औषधउपायें करून. मतवाली व साहिबीस औषध द्यावें व तालीम करवावी व गायन सांगवावे म्हणौन आज्ञा. यैशास, दाईचे मतें औषध द्यावें तेव्हा दोन महिनेपावेतों तालीम व गायन अगदी राहावावें व तालीमहि राहावावी, तरीच औषधाचा गूण येईल म्हणौन बोलिली. त्यास, प्रस्तुत नटवियासी सांगोन तालीम करवितों व गायन सांगवितों. पुढें औषधाविसी आज्ञा होईल त्याप्रा औषधउपा(ये) करऊन. सेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Apaji Shetge to Bajirao, informing him of the improvement in health of Kashibai under the treatment of a nurse from Aurangabad.*

---

१ बख्तवार = सुदैवी.

No. 78]

श्री

गंगाजान्हवी मातुश्री बाई वडिलांचे सेवेशी,

प्रति सौभाग्यादिसंपन्ये राधाबाई दाभाडे दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखण करीत गेलें पाहिजे विशेष. आपण माहायात्रा करून आला हे वर्तमान येकोन परम समाधान जाहालें. परंतु आपण स्मरणपूर्वक पत्र पाठऊन माहायात्रेचा प्रसाद पाठविला नाहीं. यैसी निष्ठुरता धरिली न पाहिजे. सदैव पत्रद्वारें सांभाल करीत गेलें पाहिजें. तेण्हेकरून चिताचें सामाधान होत जाईल. राजश्री चिमणाजीपंतआपा यांसी शरीरी वेथा प्राप्त जाहाली आहे, तेण्हेकरून चित स्वस्त नाहीं. रा तुकपोा दाभाडें पाठविलें आहेत. तरी आरोग्यते [चे] लेहून पाठविलें पाहिजे. तेण्हेकरून सामाधान होईल. बहुत काये लिहिणें, लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Radhabai Dabhade, probably wife of Krishnaji, congratulates Radhabai Peshwa on her safe return from the pilgrimage. She further makes enquiries about Chimaji Appa's health.*

No. 79]

पौाा छ १९ सवाल.

श्री

तीर्थस्वरूप मातुश्री राधाबाई वडिलांचे सेवेसी अपत्यासमान पिलाजी जाधवराव सांा दंडवत विनंती. येथील वर्तमान ताा छ २१ रमजान मुकाम कसबे सुरोंज भेलसें प्रांत मालवा जाणऊन स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. वडिलांची आज्ञा घेऊन स्वार जाहालों त्यादारभ्य पत्र येऊन परामर्ष जाला नाही; तेणेंकरून चित सापेक्षित असे. तरी वडिली कृपा करून आसीर्वाद पत्र पाठऊन सांभाल करीत असिलें पाहिजे. यानंतर, वडिलांकारणें संक्रमणाची तिलशर्करा पाठविली आहे. अंगिकारून उतर पाठविलें पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao sends to Radhabai his Sankrant greetings with tilgul.*

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यासी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल कार्तिक वद्य प्रतिपदा जाणून तुम्ही आपणांकडील कुशल लिहीत जाणें विशेष. राजश्री बालाजीपंत येथे आम्हाजवळ होते, यांची माणसे नासिकास आहेत. त्यास, धामधुमेचा प्रसंग दिसत असता माणसें तेथे ठेवावी हे अनुचित. यास्तव, माणसें देसीं आणावयासी आज्ञा करून यास तुम्हाकडे पाठविले आहेत. हे नासिकातून माणसें पुण्यास आणवितील. त्यास राहावयास घर जागा साहित्य उतम करून देवणें व येक गांव यास वरघाटे जवळपास कुटुंबा अनकूलता हो
यैसा पाहून देणें. यास गुदस्ता मोईनपैकी रुपये १००० येक हजार व बाबत खानदेशपैकी रुपये ५०० पांचसे, येकून दीड हजारांची नेमणूक केली.
यैवज यांस पावला नाही. यैसियास यैवज जिकडे थारला असेल तिकडे ताकी
करून देवणें. साल मजकुरी गुदस्तांप्रमाणे नेमणूक करून देणें.
बसावयास घोडे नाहीं. त्यास, यांजयोग्य तुरकी घोडी पागेपैकी देणें. लोभ
दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks Chimaji Appa to make arrangements at Poona for the*
Balajipant from Nasik who is required to shift his family on account o
trouble there. It should also be arranged—he writes—that he g
Rs. 1,500 promised to him last year as remuneration.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१०

बाजीराव आणि निजाम
हर्षामर्ष

(१७२०—१७४०)

[किंमत— १ रुपया किंवा १ शिलिंग ८ पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१


Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

THE STRIFE BETWEEN BAJIRAO AND THE NIZAM
(1720-1740)

In this section are brought together papers which can be said roughly to describe the early movements of Bajirao and Nizam-ul-mulk and the manner in which they drifted into hostile relationship from the conciliatory tone which prevailed between them in the beginning. Bajirao seems to have paid two important visits to the Nizam, one in 1721 and the other in 1723. The visits created not a little stir in the Deccan, having perturbed even Bajirao's mother who apprehended possible treachery at a personal interview. Shahu also seems to have tried his utmost to befriend the Nizam and restrain Bajirao from assuming aggressive attitude. Bajirao, on the other hand, by way of diversion, planned an incursion into Malwa, and sent ahead, on a series of plundering raids, some of his most trusted generals. But the Nizam, who claimed the Subha of Malwa as much as that of the Deccan, let loose in different directions several of his subordinates to harass the Marathas and gradually assumed such a threatening attitude that Bajirao ultimately encountered him on the battle-field of Palkhed early in 1728 and imposed his own terms upon him. Sambhaji of Kolhapur, Chandrasen Jadhao, Turuktajkhan, Kuwar Bahadur and others of minor note are found in these letters upholding the cause of the Nizam who contrived to get Sambhaji married to a Rajput lady of the Sisodia clan and had made the position so difficult for Shahu that it was only the admirable strategy and the rapid movements of Bajirao that saved the situation. Innumerable incidents and characters hitherto unknown to history are mentioned in these papers and deserve to be minutely traced before one can write a well connected account of this important period of the early strife between Bajirao and Nizam-ul-mulk, the two characters who practically have set their stamp on it.


Although after the action at Palkhed the Nizam never dared to confront Bajirao in the open field, he nevertheless contrived by means of subtle and incessant intrigues to undermine the Peshwa's power and sow dissensions in the Maratha ranks on all possible occasions. This phase of the Nizam's policy is vividly illustrated in the copious and informing letters of Ganesh Ballal, the Peshwa's agent at Aurangabad. These letters will be read with great interest not only for the minute details they contain about the Nizam's doings but for the part which Sawai Jaising played in the politics of the Deccan and the respect he felt for Shahu and Bajirao.

No. 53



Facsimile of the handwriting of Chandrasen Jadhao.

No. 62



यादी मतालिब

स्वराज्याचा फर्मान पेशजीप्रमाणे पातशाही फर्मान आणून द्यावा कलम
१

चौथाईचा फर्मान सा सुभे दक्षण याचा पेशजी प्रमाणे पातशाहाचे आणून द्यावा कलम
१

सरदेशमुखीचा फर्मान सा सुभ्याचा पेशजीप्रमाणें पातशाही फर्मान आणून द्यावा कलम
१

पेशकसी[१] माफ करावी पातशाहाचा फर्मान आणून द्यावा कलम
१

गुजराथ मालवे येथील चौथ सरदेशमुखीचे पातशाहाचे फर्मान आणून द्यावा कलम
१

चंदीचे राज्य आमचे कदीम आहे ते हाली मोगलाई मध्ये गेले आहे तरी ते राज्य आमचे आम्हास बाहाल करावे कलम
१

भिवरेआलीकडे

१ गड

- १ सिवनेर
- १ चाकण
- १ माहुली
- १ कर्नाळा
- १ पाल
- १ मिरज

व किरकोल आमचे मुलकात तसरूफ[२] आहेत ते द्यावे

७

१ पेशकसी = खंडणी, नजराणा. २ कबजांत, म्ह. मोगलांच्या कबजांत.

मुल्क गडाचे
तसरूफ आहे तो[१]

१ जुन्नर तर्फा
१ पारनेर
१ राजणगाव
१ आकुल्झज
१ मिरजसुभा
१ कोतूल
१ धाधरफल

—
७

सिन्नेरच्या[२] देशमुखीचा फर्मान आम्हास करून द्यावा कलम १

आम्ही दक्षणची सुभेदारी मुकरर करून पाठऊन त्याप्रमाणे सुभा पाठऊन द्यावा कलम १

दक्षणेस पठाणे[३]

१ दिलेलखान
१ आबदुल नबीखान
१ अलफखान

—
३

या तिघास फर्मान सादर करावे की तुम्ही पातशाहाचे कामावर नजर देऊन मराठशाही फौजास राज्या शाहूचे फौजास सामील होऊन निजामनमुलुकांस तबी पोहचावणें कलम १

पनालकरासी दक्षणच्या सुभ्यान सलूख न करावा १

१ द्यावा, असें वरील कलमाच्या संदर्भानें घेणें.

२ सदरहू कलम समासांत आडवें लिहिलेलें आहे.

3 See Irvine's later Mogals, vol. 2, p 231.

अबदुल मजीदखान दिलेलखानाचे लेक यास दिलेलखानी किताब द्यावा व ज्यागिरा व फर्मान पहिल्याप्रा करून द्यावे व बिज्यापूरचा सुभा अबदुल मजीदखान याचे चुलते अबूल करीम यांस होता तो, यांस करार करून फर्मान पातशाही द्यावा कलम

१

आम्हाकडील लोक मोगलाईत चाकर न ठेवावे कलम

१

रामाजी गोसावी व वरकड द्रागौ[१] आहेत त्याचे फर्मान इनामाचे करून द्यावे कलम १

मराठे उमराव आमचे, मोगलाईत जाऊन चाकर राहिले आहेत ते आमचे आम्हाकडे द्यावे कलम १

मोगल व मराठे दक्षणेस तैनात आहेत त्यास फर्मान हासील करावे कीं जो कोणी पातशाहाचे कामावर तन देऊन निजामनमुलुकास तंबी पोहचावील त्याच्या मनसबा व ज्याहागिरी बाहाल होतील व गौर[२] होईल कलम १

फतेसिग भोसले यांस भागानगरचा सुभा द्यावा कलम १ त्यास ती मनसब व नवद हजारी मनसब व वीस हजार फौजेस जागीर द्यावी.

हबसियांकडे आमचे गडकिले आहेत ते कुल आमचे आम्हांस द्यावे व मुलूक आहे तो द्यावा. जरी तो न देई तर पातशाही फौजा तेज[३] होऊन तंबी पोहचाऊन गड आमचे व मुलूक द्यावे कलम १

तुमचे हमरा[४] आमची फौज चालेल त्यास सैदाप्रा रोजमरा द्यावा.

(पुढील मजकूर कागदाच्या आरंभी माथ्यावर आहे.)

पनास लाख रुपये पातशाहा मसाद[५] देविली आहे ते आमची आम्हास देवावी कलम १

---

१ द्रागौ (?) दोहोंकडे मध्यस्थीस जाणारे ?

२ गौर = गौरव.

३ तेज = तयार, सिद्ध, सज्ज.

४ हमरा = संगती, बरोबर.

५ मसाद–मदत, पैका.

मूळ मजकूर डावे उजवे अशा दोन रकान्यांत लिहिलेला असतां, तो या नकलेंत एकाखालीं एक एक भिन्न प्रतीकांत लिहिला आहे.

Draft of terms proposed.

This is an important paper containing a treaty which marks the stages in the relationship of Shahu with the Mogal Emperor, and consequently also the great change which Shahu brought about in this connection from the avowed enmity which the great Shivaji entertained for the Emperor. After the death of Aurangzeb, Shahu was freed from the Mogal custody by Azimshah and sent into the Deccan as the Emperor's vassal to claim his hereditary kingdom from his aunt Tarabai. In a few years' time Shahu established his influence at Satara and his predominence over his cousin Sambhaji. Later on about the year 1717, when Hussein Sayad became the Governor of the Deccan, he obtained Shahu's help and marched on to Delhi to establish his power at the Court. In return for the Maratha help the Sayad brothers granted Shahu the sanads of Swarajya, Chowthai and Sardeshmukhi under the Emperor's seal. Matters progressed in this way for some time, when Bajirao assumed the Peshwaship and with it a forward policy of expansion into Northern India. The Great Nizam-ul-mulk saw the danger of this new policy and, having disagreed with the Emperor, started for the Deccan with a view to establish his independence in the beginning of 1724. He accomplished his object on the battle-field of Sakharkhedla on 9th September 1724 in which he killed his opponent Mubarizkhan.

The paper in question, which bears no date, appears to contain terms which Shahu sent to the Emperor in offering his help in putting down Nizam-ul-mulkh, which is the principal object of the proposed negotiations. The Maratha troops were, the paper adds, to be paid at the rate which was offered by the Sayads, when the first Peshwa went with Maratha forces to Delhi in 1718.

The Emperor's active hostility to the Nizam occurred during 1723 and 1724 before the battle of Sakharkhedla and hence this paper must be referred to the early months of 1724. The terms mentioned by Shahu are interesting and run as follow :—

1, 2, 3. Imperial grants of Swarajya, Chouth and Sardeshmukhi should be made as on the previous occasion.

4. Shahu should be exempted from paying the usual tribute (as a feudatory).

5. Chauth and Sardeshmukhi for the provinces of Malwa and Gujarath should be granted.

6. The Tanjore kingdom, 'which belongs to us of old' and which has been annexed to the Mogal Empire, should be restored.

7. The following seven forts (names mentioned) and the territories attached to each, on this side of the Bhima, should be restored.

8. The Deshmukhi of Sinnar should be granted (personally to Shahu).

9. The three Mogal officials in the Deccan, Dilelkhan, Abdul Nabi-khan and Alafkhan, should be ordered to join their forces with the Marathas to put down Nizam-ul-mulk,

10. The Mogal Governor of the Deccan should not extend his protection to Shahu's cousin, the Raja of Panhala (Sambhaji).

11. Abdul Majidkhan, whose uncle Abdul Karim held the Subha of Bijapur, should be given the title of Dilelkhan and granted the Subhaship of Bijapur with a Jagir in addition.

12. Maratha deserters should not be entertained in Mogal service.

13. Ramaji Gosavi and other mediators should be granted inams.

14. Maratha sardars who have deserted to the Mogals should be handed back.

15. Those Mogal and Maratha sardars who hold inams and Jagirs from the Emperor, should be assured of their holdings if they worked zealously in putting down Nizam-ul-mulk.

16. Fatesing Bhosle should be given the Subha of Bhaganagar and 90 thousand mansab and a jagir to maintain 20 thousand troops.

17. All the forts and territories of the Marathas which the Sidi of Janjira has captured should be restored. If he refuses to restore them, the imperial troops should proceed against him and compel him to yield them to Shahu.

18. Whenever Maratha troops accompany the Mogal troops on duty, the former should be paid at the rate which was granted by the Sayads.

19. The assistance of 50 lacs promised by the Emperor should be paid to Shahu.

No. 2] [1714?

श्रीराम

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराव याप्रति प्रीतिपूर्वक नारो राम कृतानेक विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. कुरकुंबास[१] आलो म्हणून पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें, लिहिले वर्तमान सविस्तर कलले. तुम्ही आलेस उतम जाहालें. याउपरी पुढें यावयाचा विचार तरी आजी अजम तुरुकताजखान व राजश्री रंभाजी निंबालकर यांची मेजमानी आहे. कालीच त्यांस आमंत्रण सांगितलें होतें. याकरितां आजीचा दिवस या कार्यास लागणार. तुमचा मुकाम आहे तेथेच असो द्यावा. उदैक राजश्री आनंदराव सुमंत यांस तुम्हाकडे पाठवितो. यांची भेटी होऊन वर्तमान कलेल. तुमचे लोकहि जमा व्हावे लागतात. राजश्री जाधवराव यांस आणावयास चिरंजीव राजश्री सिउबा पाठविले आहेत. लस्कराकडेहि पत्रें पाठविलीं आहेत. ते भुमेवरी [आज्ञा] पत्र पावलियावरी येतील. काली नवाबाकडून कासीद पांचवे दिवसीं आले. उदगीरवरी येऊन तुमचा मार्ग पाहातो. आपणास आणखी काम उदंड आहे. तुम्ही लौकर येणे म्हणून बहुत त्वरेने लिहिले आहे. तुम्हास कलावे म्हणून लिहिले आहे. यानंतर आजी यांचे मेजमानीस वस्त्रें पाहिजेत. येथे तलाश केल्याने तिवटे उतम मिलत नाहीं. बारामतीस माणसें पाठविली आहेत. परंतु समयास आली पाहिजेत. तरी तुम्ही आपल्याकडील तिवटें पाचसाहा रुपये याप्रतीची तांबडी पिवलीं हिरवी या जिनसांची तीस सनगें पाठविलीं पाहिजेत. बारामतीची आल्यावरी मुबदला प्रविष्ट होतील. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. याखेरीज सनगें पाहिजेत. मंदले सरासरी २ व पटके उंच २ व दुपटे ९ याप्रमाणे पाठविले पाहिजे. येथें मिलत नाही यास्तव लिहिले आहे. माणूस बारामतीचे आल्यावरी सनगेच देऊ, अथवा पैका होईल तो देऊ. समये संपादिला पाहिजे. याकरितां सत्वर पाठविलें पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Ram Mantri to Bajirao, stating that he cannot visit the addressee immediately as he is entertaining Turuktajkhan and Rambhaji Rao Nimbalkar. He asks Bajirao to supply him with some head-dresses to be presented to the guests assembled. It seems Shahu was trying to conciliate the Nizam through his subordinates whom Shahu had invited for an entertainment. The time at which this happened must be referred to 1713-15, when Bajirao was not the Peshwa.*

---

१ बारामतीजवळ; येथें देवी आहे ती पेशव्यांची कुलदेवता.

No. 3] [पा *6-3-1720 ?*

पौ छ ७ जमादिलोवल.

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत राजश्री प्रधानपंताचे शेवेसी.

विनंती उपर. रानोजी भोसले[१], लगडे, व नूरखान व बाळाजी वकील, कान्होजी भोसले व शकराजी दिवाण येैसे पूर्वी खडकीचे अधिकारी याचे विद्यमानें मोगलाईत आले होते, मनसब जागीर घेऊन तीन वरसे गुजरान थोडीबहुत तंगीतुरसीने करीत होते. ते जागिरीहून काल लस्करांत आले. गयासखानाचे भेटीस चांद-रात्रीस आले. त्यावर गयासखानामे कानोजीचे वर्तमान पुसिले. त्यांनी सांगितलें जे, शंकराजी दिवाण ऐवजखानांनीं हातीं दिला होता, तो कनोजीपासीं होता. धास्तीने दुखने काहाडले आनी निरोप घेऊन आला. तुकोजी गुजर तर रघोजी राणोजीनें छापा घालून लढाईत मारला. दोन जुझें त्याची परस्परे जाली. रघोजी व रानोजीजवळ तीनच्यार हजार फौज आहे व कानोजीजवळ दोन अडीच आहे. परंतु रघोजीरानोजी वर जाहले आहेती, कानोजीचे गढीस लागले आहेती, ऐसें वर्तमान कानोजीचे सांगितले. गयासखानानी पुसिले कीं कानोजी पुढे काय करनार ? यानी उतर दिले जे त्याची खोये (सोये ?) आहे कीं लाइलाज जाहला म्हणजे दोनसे अगर शंभर राऊतानसी एखादीकडे जाऊन दबा मारून राहतो. गढियांत बरकंदाज दारूगोळा मजबूत करून जातों. ऐसा प्रकार त्याचा आहे. तूर्त रघोजी रानोजीची बाजी सर आहे म्हणोन वर्तमान सांगताच गयासखान मनीं खोचले. विदीत होय. दुसरे सैद हसनअलीखान नामे जाहांदरशाहाचा तोफखानीयाचा दारोगा होता व त्यास पातशहाजादियाचा मोड जाहला तेव्हां सैदानी * * * सैदआनी तिकडे जाहला होता, फरुकसेराकडे न जाहला, म्हणोन फरुकशेराची पातशाही जाहली तेव्हां त्यास तोडून ठेविलें होते, जसे आतां निजामानें सैद जमालखानास वगैरे तोडिले आहे. परंतु सैद हसनखान खानदान थोर हामसरचा जमीदारहि आहे त्यास महमदशाहाने वाढऊं लागला. त्यावरून निजामाने त्यास ललोपतो करून आपणापासीं बोलाऊन त्यास कवडीचा माल करूं आरंभिले. निदान पंनासा हजाराची जागीर नादेडांत दिल्ही. तेवीस वसूल होताती. बहुत याचे हाते जलाला आहे. स्वामीनी मागे त्यास धोडाजीचे वचनावरून पत्रें लिहिली होती. तूर्त तो जागिरीत आहे हे विदित होय हे विनंती.

¶*An important but incomplete letter addressed to the Peshwa. It gives news of the collusion of Kanhoji Bhosle with the Nizam. If the date be correct, the letter must be taken to be addressed to Balaji Vishvanath.*

---

१ कान्होजी, राणोजी व रघूजी भोसले मोगलांकडे कामें करीत होते असें यांत आहे.

No. 4] *[12-5-1720?*

श्री

श्रीमंत राजश्री मल्हारपंत[1] स्वामी गोसावी यास पो। माहदाजी कृष्ण[2] नमस्कार विनंती. येथील कुशल वैशाख कृष्ण ७ मुा वानखेडे[3] जाणून स्वकीये लिहिले पाहिजे. वरकड वर्तमान तर पूर्वी लिा च आहे. किलीचखान बऱ्हानपुरास आंबराईत दाखल जाला. असेरगड त्यास अनकूल जाला. शहरांत अद्याप दाखल नाही. परंतु फितूर जाला. शहरांत लोक कितेक आहेत ते फितवा करीतील तेव्हां, शहर त्याचे हातास लागलें म्हणजे फितूर थोर जाला, तमाम खानदेस बदलला, मुलूख बुडाला, यैसा प्रसंग आरभला. राजश्री पंतप्रधान फौजेसमेत येत होते, त्यास येलीकडे वर्तमान न कलेसे जाले. तर लिा पाहिजे. टका तो हातास येत नाही. ईश्वरे थोर उसुलाचे दिसांतच खलेल केले * * * * * सविस्तर प्रधानपंतास लिहिणे. तातडीने तुमचे माणूस गेले तर हेच आमचे पत्र रा। करणे. मुळूक बागलाण आदीकरून बदलले आहे. फौज मुलकात आली तर बरे, नाही तर मामला बुडतो. पष्ट लिा पाहिजे. कृपा असो दीजे हे विनंती. किलीचखानाजवली पातशाही नसल आहे येसेहि खबर आहे. मागून तहकीक लिहून पाठऊ हे विनंती.

¶*Mahadaji Krishna to Malharpant, describing the advent of the Nizam into the Deccan in the summer of 1720, just before the battle of Khandwa, on 19th June 1720, in which the Nizam killed Dilawar Ali.*

No. 5] *[28-12-1720?*

श्रीशंकर

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

सेवक माधवराऊ पिंगळे कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल पौष श्रुा १० पर्येत असे. स्वानंद लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर कृपा करून पत्र पाठविलें ते उतमसमई पावोन विश्रांती जाली. आज्ञा कीं निजामन-मुलकाचे भेटीस जावे लागते, तरी आपले फौजेनिसी येऊन पोहोचणे. ऐसियास आपणास आज्ञा प्रमाण. परंतु सांप्रत राा फत्तेसिंगबावाही आमचे फौजेस दोन

---

१ मल्हार तुकदेव पुरंदरे? हाच प्रथम शाहूस स. १७०७ त मिळाला. त्यास हुजूरची फडणीसी मिळाली.

२ चासकर जोशी?

३ तालुका बुल्ढाणा.

तीन महिन्याची आज्ञा दिधली होती कीं आपले तालुकियास जाऊन बंदोबस्त करून घेणे. त्यावरून श्रीपतरायाबो फौज देऊन आपले प्रांताकडे पाठविले आहे. ते गंगातीरीं मुधेळ[१] प्रायांत आहेत. सांप्रत आपले आज्ञापत्रें आलियावर जोडी रवाना केली कीं लवकर येऊन पोहचणे. मधें अंतराय ताम्राचे सैन्याचा आहे, याजकरितांच संकट आहे. रात्री विर्ती (?) करून येऊन पावतील. ते येतांच आपण सेवश येऊन पोहचतो. विदित होय. बहुत काय लिा? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Madhaorao Pingle to Bajirao, referring to the latter's visit to Nizam-ul-mulk.*

No. 6] [*18-1-1721 ?*
[*6-1-1733 ?*

श्री

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री बाजीराऊ याप्रति मातुश्री राधाबाई अनेक आसिर्वाद उपरी. येथील कुशल ताा माघ शुध द्वितीया मंदवार पावेतो जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें ते पावले. भेट जाली उतम जाले. ईश्वरें तुम्हास येश दिल्हे. याउपरी नवाबाचा निरोप घेऊन लौकर येणे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Radhabai congratulates Bajirao on his successful visit to the Nizam. The date of the letter requires to be verified. Magh S. 2 does not fall on Saturday during 1721 or 1722, according to Khare's Calendar.*

No. 7] [*20-2-1721 ?*

पाा छ ४ जमादिलोवल

श्री

राजश्री आपा गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रो बहिरजी पांढरे विनंती उपरी. येथील क्षेम जाणोन तुम्ही आपले स्वकीये कुषल लेखण करीत आसिले पाहिजे. यानंतर नवाबांचे येक दोन पत्रें आली कीं दरशणास येने. त्याजवरून शैन्यास गेलो. कलबुरगेचे मोकामी मुलाजमत जाली. आपले दयेकरोन त्यानी कृपा करून पूर्ववत आपली स्थले आपणास बहाल करोन ताजी सनद करून दिधल्या

१ नांदेडच्या आग्नेयीस २५ मैल.

आणि करनूलचे मोकामीहून आज्ञा देऊन रुकसत केले. बहुमान बहुद काही केला. सर्व कृपा आपली आणि जेणेप्रमाणें त्यानी कृपा केली तेणेप्रमाणे आपणही करीत असिले पाहिजे. आपलेच असू. बहुत काये लिहीणे कृपा असू दीजे हे विनंती.

¶*Bahirji Pandhre to Chimaji Appa, thanking him for the kind reception the writer had from the Nizam-ul-mulk. The Peshwa and the Nizam appear to be on friendly terms at this time.*

No. 8] [*February 1721 ?*

श्रीरामचंद्र

श्रीमंत राजश्री राऊ प्रधान स्वामीचे सेवेसी.

पोष्य कृष्णाजी अनंदराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लेखनअज्ञा केली पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते पाऊन परमसंतोष जाला. संक्रमणाचा तीलगूल पाठविला, पावला. तीर्थरूप राजश्री अपा नवाबाकडे सिवापुराहून अज्ञा घेऊन गेले. प्रस्तुत नवाब सवनुराजवल अहे. पुढे बिदनूरप्राते जावयाची कस्त अहे. सारांश स्वामीच्या प्रतापाचे भये विशेष आहे. प्रस्तुत हेहि गेले आहेत. पुढे काये कर्तव्यार्थ लिहितात त्यासारखा सेवसी लिहिला जाईल. वरकड कित्येक अर्थ राजश्री अपा लिहितील त्यावरून विदित होईल. अपल्यास अश्रा सर्वस्वे स्वामीचे पायाचा अहे. बहुत काये लिहू? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Krishnaji Anandrao (Sumant ?) writes to the Peshwa that his father is on a visit to the Nizam, who has marched into the Karnatak and is at present at Savnur. 1721 is the only year in which the Nizam marched into the Karnatak during the life-time of Bajirao and hence the date of the paper.*

No. 9] [पाा *2-4-1721 ?*

छ १९ जााकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी विनंती. स्वामींनी लिहिलें कीं राजश्री स्वामीस विनंती करून राजश्री सुमंतास निरोप नबाबा-

कडे जावयासी देवणें. त्यासी राजश्री सुमंताचाही हाच विचार आहे कीं आपल्यास नबाबाकडे जावयासी राजश्री (आपण)हून जा म्हणतील तर उतम आहे. आह्मास केवल हटकता न ये, ऐसे म्हणतात. त्यास आह्मी राजश्रीस हटकावे तरी सिकारी-मुळें फावत नाहीं. येकादो दिवसा हटकून. जालें वर्तमान तें लिहिले असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to Peshwa, obtaining Shahu's orders to send Sumant to the Nizam.*

No. 10] [*23-4-1721 ?*

श्री

विनंती उपरी राजश्री यादोपंत[१]बराबरी कितेक भाऊपण्याच्या व मनसुबियाच्या गोष्टी सांगोन पाठविल्या त्या सविस्तर मारनुलेनी सांगितल्या. हस्ताक्षराची पुरवणी पाठविली तेहि पावली. त्याजवरून साकल्यार्थ कळू आला. ऐसियास पूर्वी कैलासवासी राजश्री नानांनी गोसावी यांचे आमचे हात एक करून सांगितले कीं परस्परें बंधुत्वें चालावे. त्यादारभ्य दिवसेदिवस उभयपक्षी श्नेहाची अभिवृधीच होत आली. तिळतुल्य अंतराय जाला नाही. पुढेंहि याहून आधिकाधीकच भाऊपणा चालावा हेच मनोगत उभयपक्षीचे आहे. गोसावी यानी प्रस्तुत मनसुबा योजिला आहे ते महत्कार्य आहे. ऐसियास आम्हीहि छ ७ रजबी कूच करून नवाबसाहेबाकडे चालिलों. पांचा साहा दिवसांत मुलाजमत होईल. तदनंतर तेथील विचार कळेल त्यामध्ये जो उत्तमसे दिसोन येईल ते गोसावियांसीं लेहून पाठऊं. तोपर्यंत गोसावियांनीं श्रीगंगापार न व्हावें, तांतडी न करावी ऐसे आहे. गोसावियांनी जो मनसुबा करणे तो विचारणा करूनच केला असेल. परंतु आम्हीहि सुचला विचार लिहावा ऐसे आहे. याकरितां च्यार दिवस अधिक लागले म्हणून त्वरा न करावी म्हणून लिहिले असे. व पुरवणीत लिहिले कीं च्यारमहिने कळेल तैसे रक्षावे म्हणून लिहिले; तरी च्यार महिनेच रक्षावे ऐसे काय आहे? सर्वदा हरएक कार्यप्रसंगाचे ठायी सहसा अंतराय नसावा ऐसी श्नेहाची रीतच आहे. त्यामध्यें समयोचित अंतराय जालियाने क्रियेत अंतर पडिलें मग भाऊपणा काशास असावा? तरी गोसावियांनीं इकडीलविशई द्वैतार्थ चिंतांत न आणावा. आम्ही गोसावियांकडील. दुसरे जाणत नाही. येथील सर्वहि जे आहे ते गोसावियाचेंच आहे. येविशई पत्री काय लिहावें? मनेमन साक्ष आहे. सर्वदा

---

१ यादो गोपाळ मुतालिक गदाधर प्रल्हादाचा.

पत्री कुशलार्थ लेखन करीत गेले पाहिजे. राजश्री चिमाजीआपा पुणियात राहिले आहेत. प्रसंगी साहित्याविशई लिहितील त्याप्रमाणे करणे म्हणून लिहिलें, तरी जे क्षणी त्याचें पत्र येईल त्याप्रमाणे साहित्य केले जाईल. अंतर न होय. या पत्राचें उतर सत्वर पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*This is a letter of some prominent Maratha Sardar to Bajirao, offering his services and friendship in accordance with the wishes of Balajipant Nana, Bajirao's father. The letter mentions Bajirao's intended visit to the Nizam.*

No. 11] [पौ *6-7-1721 ?*

छ २१ रमजान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी नवाब निजामनमुलुक यांचा निरोप घेऊन श्रीच्या दर्शनास गेलो म्हणून पत्र राजश्री स्वामीस पाठविले ते प्रविष्ट केले. त्यावरून राजश्री स्वामी बहुत सतोषी जाले आणि स्वामीस पत्र पाठविले आहि त्यावरून सविस्तर कळो येईल. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao, announcing Shahu's pleasure at hearing of Bajirao's visit to Nizam-ul-mulk.*

No. 12] [*21-10-1721*

श्री.

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी

बाजीराऊ बलाल क्रतानेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल कार्तिक शुध द्वादसी मंदवार मुा मौजे सेलगाऊ ताा इंदापूर जाणून तुम्ही आपले कुशल वर्तमान लिहीत जाणें विशेष. तुमचे पत्र घोडनदीचे मुकामीहून आले होतें. त्याआलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी सविस्तर लिहीत जाणें. यानंतर तुम्ही लोक रवाना करा[या]विसी लिहिले होते, त्यास लोक तमाम रवाना जाहाले आहेत. सत्वरीच तुम्हांजवल येऊन पोहचतील. म्हणावयास येक राा मुधोजी नाईक याचा मात्र यावयाचा अनमान दिसतो. त्याचे कैसे काये होते ते मागून लिहून पाठऊन. राजश्री

हिरोजीराऊ पाटणकर यासहि ताकीद केली आहे. त्यास ते इतके दिवसी निघते, परंतु द्वारकोजीराऊ पाटणकर याची स्त्री निवर्तली. तिचे सुतक त्यास येऊन पाच दिवस आजी जाहाले. आणखी सात रोज आहे. त्यास सात आठ दिवस त्यास लागतील. त्या[चा] गुता उरकलियावर ते तुम्हांस आटोपीत येतील. त्याची गाठ खानदेसामध्यें इतकियात पडली तरी उतम जाहालें. कदाचित तुम्हास मजल दरमजल हलू हलू जाणेंच लागले तरी पाच सातसे राऊत बारीआलीकडें ठेऊन, मागून पाटणकर वगैरे लोक जे येतील ते सांभालून घेऊन जाणें. थोराताकडे सिंदची (सिंद्याची?) व घाटगियाची घोडी आहेत त्यासाठी येकदोन मुकामे करून पूर्वी लिहिल्याप्रा घोडियांचा निर्वाह करून घेणें व येकदोन मुकाम संगमनेराजवल व सिनर परगणियांत करून तुरुकताजखान याचे आमीलीचे परगणें आहेत, तेथील बाबती सरदेशमुखी व जकातीचा अमल बसऊन देणें. हा संगमनेराजवळ मुकाम करून अमल बसऊन देणें. आसीर्वाद.

¶*Bajirao Peshwa to his brother, advising him about his march to the north.*

No. 13] [*22-10-1721*

श्री

विनंती. नवाब निजामनमुलुक याजकडील वर्तमान तरी नवाब धारवाडपर्यंत गेले. बिदनुरचा लिगापा भेटला. च्यार लाख रुपये द्यावयास रजावंद आहेत. नवाबाच्या चिती पांच लाख घ्यावयाचे आहेत म्हणून शंकराजी दतात्रेय यांणी लिहिले होते. बहुधा बिदरूरकर पाच लाख देऊन रजावंदी करतील. सादुलखान याचे पुत्रहि रुपये मागितल्याप्रमाणें देऊन रजावंद करितील. कितुरचा देसाई पलाला याजकारितां राजश्री जानोजी निंबालकर व आणखी फौज पाठविली होती. मागाहून वर्तमान येईल ते लिहून पाठवून. छ+ १ मोहरम. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे. मातुश्री बाईकडील सांप्रत पत्रे आली नाहीत. पंधरा दिवसा देशास येतील येसे आहे हे विनंती.

¶*The letter appears to be addressed to Bajirao. Nizam's expeditions into the Karnatak occurred in 1721 and 1743. So this letter should refer to the earlier date, as it conveys news of the Nizam's movements towards Dharwar and Bednur.*

+ येथून अक्षर खाशाचें.

No. 14] [*27-12-1721 ?*

श्री

चिरंजीव राजश्री सिंदोजी तरडे मोकादम मौजे गरोड[1] यास प्रति खंडोजी तरडे आश्रीवाद उपरी. येथील क्षेम जाणून तुम्हाकडील वर्तमान कळूं येत नाही. ऐस न कर(णें). हरघडी आलिया मनुष्याबरोबर पत्र पाठवून समाचार घेत जाणे. आमचें वर्तमान तर मार्गेसर च[2]ता सोमवार ते दिवसी झुंज मोजे हिवरे तुरुज-ताजखानाचे, तेथे जाहालें. रा सदासिवपंत * * र पागे गोळ्या लागून ठार पडले. तुम्हास कळावें म्हणून लिहिले. आपण समस्त मंडळीसह सुखरूप असो. रो सुलतानबा गाडेकर आम्हापासी आहेत. त्याचे घरी सागने की कुशाल आहेत. तुम्ही दाणाडुणा राणातील आटोपून राहणे. लोकांकडील दाणा वसूल करून घेने आणि पेव घालून ठाने[3]. मोगल या प्राते येतो तवर घाट चढल्यावर आणखी कागदगडी पाठवितों. परंतु बहुत सावध राहाणें. तुम्ही आपले घरीं लाहान, आम्हाकडे येण्याचें कराल तर एकंदर येऊं नका. आपणच थोडकिया दिवसांत घराकडे येतों कळलें पाहिजे. हे आशीर्वाद. रा येसाजीबावाचे घरचा समाचार घेत जाणे. रा माणासिंग चवकीदार याचे कर्ज रा जोतीबा बा होते ते आम्ही फेरले. तुम्हास कळावें म्हणून लिहिलें. रा शाहाजी अडळा व रो डुल-बाजी इंगवळा यास खंडोजी तरडे रामराम. आमचे घरचे समाचार घेत जाणे. आपण तुमचे भरवासियावर बेफिकीर असो. हे विनंती. रो सूर्याजी जाधव याचे पदरी देवळाचे रुपये घातले अ(स)तील परंतु देवळाचें काम जाहले कीं नाहीं तें लिहून पाठवने. नाथाचे देवालयाचे काम चांगले करवने हे आश्रीवाद.

¶*Khandoji Tarde to Sidoji Tarde: describes an action at Turuktajkhan's the village of Hivre.*

No. 15] [*1721 ?*

तालीक

श्रीराम

पुरवणी राजश्री केसोपंत गोसावी यास

विनंती उपरी पुणाचे ठोणे राजश्री पि (लाजी जा) धवराऊ पहिले पासून * * * * निसबतीने होते. त्याउपरी राजश्री नारोबा होते त्याचे निसबतीने होते. साल मारी गनिमाची धामधूम जाली याकरिता

---

१ सासवडचे पश्चिमेस ३ कोस. २. चउथ (?) ३ ठेवणे ?

खासा राजश्री संभाजी जाधव राहिले. त्याजवळ चिरजीव रा॥ नारोबा होते जे. जेव्हा किलीचखान अला तेव्हा राजश्री सभाजी जाधव ठाणियाहून निघाले त्याज बराबर चिरजीव नारोबा गडास आले. किलीचखान गेलियावरी सला जाला · ते समई रा॥ सभाजी जाधव ठाणियात आले. त्याजबराबर नारोबाहि पुणियासी आले. हा कालवरी त्याची निसबती सोडिली नाही. सांप्रतकाले त्याचा रुसवा जाला याकरिता राजश्री पंती ठाणे राजश्री नारोबाचे हवाला केले. पूर्ववतप्रा॥ ठाणियाची व शाहारची अलगनोबत करितील. त्यात तुम्ही इसकील[१] करावी यात काही फायेदा नाही. यामध्ये उतम दिसेल ते करणे. फिरोन ये गोस्टीचा बोभाट न ये ते करणे. लोभ असो दीजे हे विनंती. चिरजीव नारोबा रा॥ पिलाजी जाधव याचे निसबतीने होते याकरिता त्याचे निसबतीचे म्हणून ठाणे याचे हवाला केले आहे. यास तुम्ही कोणेविशी कटकट न करणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*This is an important letter referring to the protection of Poona by Pilaji Jadhav and the Nizam's movements against it.*

No. 16] [*1722*?

छ १० रबिलाखर

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री चंद्रसेन जाधवराव याणी राजश्री हैबतराव बंडगर याचे मुलकांत बहुतसा उत्पात मांडिला आहे. ठाणी घेतात. याजकडील लोकांचे बकिले (कबिले) धरितात. बंडगराकडील सुलतानजी टेवरा म्हणून त्यास त्यानी धरून नेला म्हणून वर्तमान आलें. त्यावरून राजश्री फतेसिंग बावानी राजश्री स्वामीकडे बंडगरास पाठऊन * * याची आज्ञा बंडगराची घेतली * * यावेली राजश्री स्वामीनी रा॥ हैबतराव बंडगर यास वस्त्रें देऊन गावास जावया आज्ञा दिल्ही. स्वामीस कळावे यास्तव लिहिले आहे. विदीत जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Letter to Chimaji Appa probably from Mahadoba Purandare at Satara, giving news of the trouble created by Chandrasen Jadhao.*

---

[१] हरकत.

No. 17] [1722?

श्री

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. हुजरातचे लोक तुम्हाजवळ आहेत त्यांस तुमची कुमक व चिरंजीव राजश्री फत्तेसिंग भोसले यांजकडील लोक येऊन पोहचेत तों राहावयांची आज्ञा केली आहे. चिरंजिवाकडील लोक रवाना जाले हेही लौकरीच पावतील. तुम्ही आपणाकडील लोक लौकर आणवणे, आणि हुजरातचे लोकांस निरोप देऊन हुजूर पाठवणें. तुमचे व चिरंजीवाचे लोक येत तोवरी हुजरातीस ठेऊन घ्याल त्यांस रोजमरियांची बेगमी करून देणे आणि सेवा घेणे. आठ नवसे माणूस हुजरात आहे त्याचा मुबादला चिरंजीवाकडील व तुम्हाकडील नवसे माणसाची भरती जाली म्हणजे हुजरातच लोक व लक्षुमण गोविंद व बाळाजी साळोखी याचे लोक हुजुर पाठवणे. सुज्ञ आसा.

¶*Shahu orders Bajirao not to disband the Huzrat forces, until Fatesinh Bhosle joins him. The paper bears no date.*

No. 18] [16-3-1723?

पो छ १९ जमादिलाकर

श्री

पुरवणी राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. स्वामी नवाब निजामनमुलुक याचे भेटीस जात आहेत. त्यास राजश्री स्वामीस दमाजी सोनवणी याचेविशीं पत्र पाठऊन द्यावें कीं आपणासमागमें न्यावयास पाहिजेत तरी पाठऊन दिल्हें पाहिजेत. यैसें स्वामीचें पत्र आलें म्हणजे राजश्री स्वामीस विनंती करून निरोप दिल्हा तर स्वामीकडें पाठऊन देऊन विदित. जालें पाहिजे. कृपा केली पाहिजे हें विनंति.

¶*The writer asks Bajirao to request the king to allow Damaji Sonavani to accompany him on his visit to Nizam-ul-mulk.*

No. 19] [29-5-1723 ?

छ ८ रमजान

श्री

पुरवणी राजश्री पंत स्वामीचे
सेवेसी

विनंती. राजश्री आनंदराऊ याणी पत्रे पाठविली. याचे वर्तमान कीं, यैवजखान याची भेटी घेऊन जाणे उचित आहे, तरी याचे भेटीचा आदर पूर्वीपासून विदित आलें. प्रस्तुत ते खुदीनेच (खुबीनें ?) देवगड फतेकरून आले. त्याची मरजी गरम आहे. दुसरी गोष्टी तुम्ही त्याकडे देवगडचे कामास न गेलेत, हे त्यानी श्रम मानिले आहेत. पेशकसीचे समक्ष भेटीचे समई त्याणीं पुसिलें तर पैका नाही, (असे) समक्ष सागावें हे स्वामीस प्रशस्त न वाटे, संकोच उतराचा पडेल आणि पैका तों आनकूल नाही. यास्तव भेटीचा प्रसंग करणे तो विचारून करावा. रा आनदराऊ याचे समाधान कागदीपत्री रक्षावे. पैकाहि त्यांचा द्यावा. हती यैवजखान याकडून(?) रा अनदराऊ याणीं मागोन पाठविला तरी भेटीसहि जावे. यासमधे उतम विचार बहुतमतें दिसेल तो केला पाहिजे हे विनंती.[१]

¶*Mahadaji Krishna Joshi Chaskar, father-in-law of Bajirao, writes to him to be on his guard during his visit to Aiwajkhan. The whole letter is in the writer's own hand.*

No. 20] [20-6-1723
रोजकीर्द

रो.

माहे रमजान जेष्ठ मास सुा आर्बा

तेरीख २७ रोज जेष्ठ बहुल चतुर्दशी गुरुवार

पत्रे चिटनीसी

किा पत्र छ मजकुर खंडो गोविंद कमाविशदार दिमती सरदेशमुखी पाा बीड व पाथरी यास पत्र जे: राजश्री बाजीराव पंडित प्रधान याणी तुम्हाकडून सरदेशमुखीचे ऐवजी रुपये २०००० वीस हजार तुम्हाकडून देविले त्याचे मुदती वाइदे हुजूर करून दफ्तरी खत लेहून दिल्हे. त्या ऐवजाबदल हुजरे पाठविले

---

१ पत्र महादाजी कृष्ण याचें. याच पत्राबरोबर लिहिलेल्या दुसऱ्या पत्रांची रवानगीची मिा 'ज्येष्ठ शुद्ध ६ बुधवार' ही आहे.

होते, त्यास तुम्ही येक रुपया न देतां बदमस्ती करून हुजूरच्या लोकास बदमस्तीन जोरावारीने मारून वाटे लाविले म्हणून विदित जाले. तरी याउपर सरकारचा यैवज वीस हजार व व्याज ५००० एकूण रुपये पंचवीस हजार घेऊन सिताब हुजूर येणे येविशी पत्रे २:

खंडो गोविंद कमाविशदार सरदेशमुखी पचवीस हजार रुपये घेऊन हुजूर येणे मसाला लोक

१३० दिमती खुद

१०० सिदोजी दलवी.

३० खान माहमद.

१३०

५० मोघम.

१८०

शिवाजी सुर्वा २५

रामजी सांवत २५

बाजीराव प्रधान यास पत्र जे, खंडो गोविंद याजपासून रुपये २५००० घेऊन हुजूर पाठवणे. खंडो गोविंदास दस्त करून देखील त्याचे जमावदार हुजूर पाठवणें.

पा। हुजूर रसानगी चूडामणी चोपदार दि। अदिराज कागद ता। हंसराज चोपदार दि। रा। पंताजीपंत

¶*This paper explains some of the difficulties that were felt in the collection of the sardeshmukhi dues.*

No. 21] [*18-8-1723?*

छ २८ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री राऊ व राजश्री आपा स्वामीचे सेवेसी पोष्य अबाजी त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीचे पत्र आले ते आजी छ २७ जिलकादी रविवारी प्रहर दिवस चढतां पावलें. तेथे लिहिलें कीं तुम्ही कोठे मुकाम केला आहे लोक किती जमा जाहालें, गनीम कोठें आहे, ते सविस्तर लिहिणे, म्हणून आज्ञा केली. त्यास गनीम तासगावी आपल्या ठाणियाच्या आश्रियास गेला होता तेथूनही कूच करून कागवडाकडे गेला. फौज किती जमा म्हणून लिहिले तरी अव्वी फौज

आठसे जमा (जा)हाली आहे त्यामध्ये सवासे स्वार आपले आहेत. याखेरीज हुजरात व रा। रायाजी जाधव, जोगोजी जाधव, मानाजी जाधव, राणोजी भोसले व रघूजी भोंसले हे सरदार आहेत व लोक आहेत. आम्ही फौजसहवर्तमान पुसेसावळीस मुकाम केला आहे. गनीम तो निघोन आपल्या वळणांत गेला. आम्ही येथे व्यर्थ खर्च खाऊन राहावे यांत कांहीं कार्य नाहीं. आमचे लोक समजाविसीस आले होते तैसेच येथे आले. ते तजावजा रावयास जाहाले आहेत. राहिल्या कांहीं कार्य असते तरी असो. गनीम गेला, याउपरी कांहीं प्रयोजन नसता उगेच बसावे यैसा प्रसंग आहे. त्यास स्वामीच्या विचारास येईल तरी राजश्री स्वामीस विनंती करून आमचा निरोप घेऊन आम्हास माघारे नेले पाहिजे. राजश्री पंतप्रतिनिधि याचे समाधान जाहालें म्हणून आइकिले. त्यास त्याचे तुमचे समाधान कैसे जाहाले ते सविस्तर ल्याहावयासी आज्ञा करावी. राजश्री जोत्याजी केशरकर हवालदार याजकडील बोली. रा। चिंतामणी थोरात यास सांगून बंद करविली पाहिजे. आपण लिहिले कीं उतावली न करणे; त्यास उतावली सहसा करणार नाहीं. मानमार्ग पाहोन जो विचार करणे तो करून. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती. याउपरी आमची येथून सुटका होये तो विचार स्वामीने करावा. आम्ही विचारास चुकत नाहीं. परंतु येथें राहणे प्रयोजन नाहीं. कळले पाहिजे हे विनंती

पोष्य खंडो बलाल दंडवत. लिहिल्यावरून विदित होईल. स्वामीने विचार बरा चितात आणून आज्ञा करणे ते करविली पाहिजे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Khando Ballal Chitnis and Ambaji Purandare were ordered by Shahu to hold in check Chandrasen and the Mogal Governor Mubarizkhan who had been giving trouble in the southern sector. They write to Bajirao asking to be recalled. Incidentally Purandare mentions the reconciliation of the Peshwa and the Pratinidhi. This must therefore be taken to refer to the famous dispute about the future policy of the Maratha kingdom. Khando Ballal died on 17th July 1726, so this letter may be taken to be correctly dated.*

No. 22] [*26-9-1723 ?*

श्री

श्रीमत् राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनति. आज्ञाधारक मलार दादाजी सां नमस्कार विनति येथील कुशल ता। छ ७ मोहरमपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून आपलें वर्तमान यथास्थित आसे.

यानंतर येसजी बलकवडे याणी अविचार करून का नासिकी आबदूल आजिज-खान याची पागा चालीस पनास घोडी होती त्याजवर घोड्याचे लालुचीने छ ६ मा बुधवारी पहाटेस येऊन घातले. गढीत घोडी होती बारगीर खबरदार जाले. गूल होताच बारगिरानी येसजीवर चालोन घेऊन तोडातोड केली. बारगीर साठ सतर माणूस, येसजी अडीचसे तिश्या माणसानसी. परंतु मावले बेहूश. विचारे काम करावे ते न केले. याचे त्यांचे जुज जाले. येसजी पंधराविसा माणसानसी कामास आला. वरकड पलोन किलियास गेले हे सविस्तर वर्तमान रा हरी कृष्ण शेवेसी लिहितील त्यावरून निवेदन होईल. येसजी चांगला माणूस होता परंतु होणारास उपाये नाहीं. मोगलाईचे लोक शेर जाले. सदासिव कासी व बारगीर घोडी आधुरव्यास[१] गेले. तूर्त रा हरी कृष्ण कावनये वगैरे किलियाचे खबरदारीस पा आहेत. परंतु सरदार नावाचा माणूस तेथे आसावा तरी कोणास पाठवणे त्यांस सत्वर पाठविणार स्वामी खावद आहेत. मोगलाईच्या आमलाविसी सदासिवपंतासी आम्ही सारी दोरी लाविली. त्याणी भेटीस येऊन निकाल काढावा यैसे केले. इतकियात येसजीने हे कर्म केले. यांउपर ते सावध जाले. उलटे कामकाज चालत होते त्यात डोहणा आरंभला. बरे; स्वामीचा प्रताप समर्थ आहे. विदित जाले पाहिजे. मातुश्री उमाबाई दोन अडीच हजार फौजेनसी नासिकाजवल बसली आहेत. मोगलाई अमल त्याणी जफ्त केला. मोकासे आपले आपण मोगलाई घेऊ म्हणतात यैसा आर्थ आहे हे विनंति.

¶*Malhar Dadaji Barve, brother of Balaji Vishvanath's wife, Radhabai, to Chimaji Appa—communicates the death of Yesji Balkavde in action near Nasik.*

No. 23] *[27-12-1723?*

छ १० राखर

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी

यांस

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे. यानतर आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. को शाहागड येथील

---

१ अंधरवड कावनईजवळ.

सरदेशमुखीची बोली करावी लागते याकरिता कलंदरखानास पाठऊन देणे, बोली करून त्यास आज्ञा देऊन म्हणोन लिहीलें. येसियासी कलंदरखान अद्यापि कसबे मजकुराहून आला नाही. सेवेसी राजश्री बाबूराव पाठविले आहेत त्यांसी बोली करावयाची ते केली पाहिजे. विशेष कार्य लिहीणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav to Chimaji informing him that Kalandarkhan had not arrived at Shahagad.*

No. 24] [*1723 ?*

छ १३ मोहरम

श्री.

विनंती उपरी. आपण येमालास गेलो होतों, इतकियांत तुरुकताजखान खराडीस आले. त्यानी आग्रहे करून बोलाविलें. तेथें गेलों. त्यांची आमची भेट जाली. ते समई विठोजी घुले याची घोडी सोडावी, ऐसा करार त्यासी केला. त्यानी कागद व माणूस दिल्हे. त्यासमागमे आपला जासूद व बाबाखान हवालदार पाठविले असेत. लक्षा प्रकारें घोडी येतील. न येत तर पारपत्य करावयाचे संकट नाहीं. कळावे म्हणून लिहिले असे. काल राा आनंदराऊ पवार याचे पत्र आलें. राजश्री मल्हारजी होळकर व राा राणोजी सिंदे गंगातीरास आले ऐसें वर्तमान लिहिले होते. कळावें म्हणून लिहिले असे हे विनंती. आज उद्यां भिवरा उतरतील हे विनंती.

¶*Writes Chimaji Appa, probably to Bajirao, about his interview with Turuktajkhan.*

No. 25] [*1723 ?*

जोतलिंग बावा फकीर

पंत परधान बाजीराव

चिरंजिव यास आसिर्वाद उपर. आपनास तुमचेविशंई आपाजी मानेकेश्वर यानी पुसलें होतें कीं बाजीराऊ म्हनत होते कीं किलीचखानाचें धरुशन घेव; तर तुम्ही सुखरूप धरुशन करावें. त्यास ते तुम्हावर मेहेरवानगी करतील. भेटीचा अनमान न करनें. नेकसला केलीचखानास भेटनें. वसवासा न धरनें. येक फते पावसील. आनिक याजपरिस लक्षेमी पावसील. मोंगलाचें भूतभवीस थोडें आहे. ज्यादा काय लिहिणे. आपाचा चिरंजीव जिबानी सांगतो कळों येईल. आपाचे जबानी सांगतां कळों आलें. ज्यादा काय लिहिणें हें पत्र

A saint advises Bajirao to interview Kilichkhan without any misgiving and prophesies a rapid decline for the Mughals.

No. 26] [2-5-1724?

छ १९ साबान

श्री

पुरवणी राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. पेशजी किलेदार चाकणच्या कोटामध्ये होता, तो हली नवाब निजामनमुलुक याणी दूर करून हली मखदूम आलम यास किलेदारी सांगितली. त्यास जुना किलेदार कोट देत नाही याकरितां मखदूम आलम फौजबदी करून चाकणेस येऊन किलियासी भाडताती, यामुळे मुलकास उपसर्ग लागोन रयेत परागदा होईल. तरी येविसीं नवाब निजामनमुलुक यास वर्तमान सांगोन त्याचे पत्रे मखदुम आलम यास पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.+

¶*Purandare to Bajirao requesting him to ask Nizam-ul-mulk to order the new killedar of the fort of Chakan not to molest the country.*

No. 27] [पौ 10-6-1724?

पौ छ २८ रमजान

श्री

राजश्री पंतप्रधान स्वामी नरबदापार होऊन, भूपाळगडास गेले. मोरचे लाविले. इकडून यारमहंमद[1] रोहिला इसलामगडाहून फौज घेऊन चालून गेला. जुज जाले. परंतु मोरचे उठूं न सकले. यारमहा फिरोन इसलामगडास आले. त्यावरी राजश्रीनी मल्हारजी होलकरास भूपाली ठेऊन आपण इसलामगडास येऊन मोरचे देऊन बसले. यारमहमदाने सलूक केला. पांच लक्ष मोकरर करून ३॥ नगद व ९ घोडे व वस्त्र व जिनस आणीक देऊन सलूक केला. यावरी राजश्रीनी कूच करून चतरसाला[2]चे देश्याकडे गेले. येैसे वर्तमान नवाबास आर्ज जाली. छ ११ रमजानी हे वर्तमान येथे आले. मल्हारजी होलकराचे चितात सलूक करायाचे नवते. इसलामगडी ठाणे बसवावे, या उपायांत होते; परतु प्रसंग याच प्रकारचा देखिला. नवाबाचा व यारमहमदाचा करार येैसा होता की, फौज यारमहंमद बोलावील तरी नवाबानी कुमक करावी. आपण जावे. त्याने याविशई सांप्रती नवाबास काही लिहिले नाही.

+ चाकणच्या किल्ल्यासंबंधीं हें पत्र दाभाडे वगैरे सरदारानें बाजीरावास लिहिलेलें दिसतें. बाजीरावाचें निजामाशीं सख्य असतांचे वेळचें पत्र म्हणजे स. १७२३-२४ चें असावें.

१ भोपाळचा संस्थापक दोस्तमहंमद याचा मुलगा. (See p. 131 Irvine II.)

२ छत्रसाल = बुंदेलखंड.

२

नवाब छ ३० शाबानी बऱ्हाणपुरास आले. दिवस आठ बाब (?) आबराईत राहिले. त्यावरी हवेलीत शहर दाखल जाले. रमजानाचे रोजे आहेत याकारितां मोकाम आहेत. दिलीस पादशाहजीस लिहिले आहे की, पंतप्रधान दरसाल जाऊन माळव्याचा मुलक मारून खराब केला. आपण तिकडे जाऊन पारपत्य करावे तरीं हुकूम पाहिजे. जरी हुकूम आला, माळव्याची सुबेदारी आपणांस दिधल्याने त्या देश्यांत बंदबस्त करून. आगोधर नवाबाचे वकिलाने काही आसरा लिहिला आहे, त्या भरवसियावर येथे आले. मार्गप्रतीक्षा करीत आहेत. त्यासी पूर्ण भरवसा आहे की, उजेनची सुबेदारीचा फर्मान येतो. तो आलियावरी उजनेस जावे. यारमा रोहिला व चतरसाल व आणिक कितेक तिकडील लोक यासी श्यामील होणार आहेत. यानी आपल्या कुली फौजा बोलाविल्या. नवी फौज पाच हजार या दिवसात ठेविली. आपल्या विचारा आहेत. सवाई जयेसिंगहि यासी भेटणार. कमरदीखांन व कितेक मोगल याचे आप्त दिलीकडून बोलाऊन येकदां उपाधी बरे प्रकारें करावी या विचारांत आहेत.

३

रा। कान्होजी भोसले मोगलाईत निस्चये येत आहेत. हिरजुलाखान माहोरचा सुभा त्यांचे सरजामाबदल नवाबाजवळी आला आहे. रदबदली आहे. जाहगीर यांसी मनसब पोखता सरजाम देत आहेत. प्रस्तुत रा। रघोजी भोसले ४ हजार फौजेनिसी उमरावती तळेगावावरी आहेत. कान्होजी भामचे गढीवरी २ आडीच हजार फौजेनिसी आहेत. जुज तरी नाही. खडागल्यास कान्होजीचे बोलाऊ गेले आहे. तो आलियावरी लडाईचा प्रसंग आहे. भामच्या गढीभोवता खंदक करीत आहेत.

४

रा। योगिराजपंत पैठणच्या कामास येथे राहून प्रयेत्न करीत असत. स्वामीचे आज्ञापत्र आले की उठोन येणे, त्यावरी ते स्वामीकडे गेले. नवाबाजवळी दोनी तिनदा स्वारीमधे उभे राहिले. नवाबानी ताकीद मुतसदियासी केली. योगिराजपंती निरोप मागितला. निरोप न दिधला. परंतु मुतसदी कोन्ही तन देईनात. दरबार आंधेर, याकारिता स्वामीपरियेंत आले आहेत. आता जैसी आपली आज्ञा ते करितील. नवाबापासून आंतर नाही. परतु नवाबासी रद-बदली करायासी फावत नाही. नवाब आवकाश करून ऐकत नाही. दरबारची रीति परस्परें विदितच आहे.

५

राजश्री राऊ सुमंत रा रत्नाकरपंताचे लग्न करावयासी पैठणास गेले. लवकरीच येतील. नवाबाने सत्वर बोलाविले आहे. परवाना गेला आहे. ते आलियावरी आजूरदार माणसे रा पंताकडे पाठवितील.

६

रा पंतप्रधान स्वामीकडील बातमी: जासुदजोड्या आम्हाजवली येत नाहीत की नवले वर्तमान लिहून पाठवावे. तिकडून आपण लिहिले पाहिजे की, नवाब या प्रांती आहे तोवर जासूद पाठवीत जातील.

सेवेसी सेवक शंकराजी दतात्रये सा नमस्कार. माणसे वरचेवर पाठवीत जावी. घालमेलीचे दिवस आहेत. नवाबास निस्चये कलों आलें की, रा पंतप्रधान येकच फौज आपल्या राज्यात आहे. याच्या मागे आपण फिरलियाने हे साह च्यार महिनियांत जेर होतील. आणिक दुसरी फौज नाही की मागे दक्षन देश्यात धुद करीत. निस्चित या देश्यात येऊन बसले आहेत. मनमाने तैसी वर्तनूक करीत आहेत. याचा उपाये आतांपासून केला पाहिजे. येक येक सरदार मोगलाईत चालिले. दुसरी फौज भारी नाहीच. जमाव तुटत चालिला येक पंतप्रधान यानी काये केले पाहिजे? हजूर स्वामीस लिहून दोनी फौजा वीस वीस हजाराची सिध केली पाहिजे. येखादी लाहान मोठी फौज तिकडे फिरते ते बुडवावी, भये दाखवावे, येसे आगत्य करावे. भरम[1] राज्याचा या मोगलाजवली राहिला नाहीं. आमर्यादा करून आगत्य जाणौन लिहिले आहे. निस्चित न राहावे. नवाब आपल्या काबूवरी आहे. आवदा याच्या मनात माल्व्यात खवखव करायाची फार आहे. सूचना लिहून पाठविली पाहिजे विनंती.

¶*This news-letter gives important details of Bajirao's entrance into Malwa and the activities of the Nizam in that connection. The Nizam is returning from Delhi strengthening his position, on the way conciliating Chhatrasal, Jaisingh and others, and detaching Kanhoji Bhosle and others from their allegiance to Shahu, all for stopping the inroads of Bajirao into Malwa and Bundelkhand. The letter is probably addressed by Shankaraji Dattatraya, the Peshwa's agent with the Nizam to Chimaji Appa.*

---

१ भ्रम, दबाव.

No. 28] [11-9-1721 ? or 7-9-1724 ?

श्रीशंकर

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक चिमणाजी दामोदर सेवेसी विज्ञापना. आस्वीन शुध प्रतिपदा इंदुवासरपर्यंत माहाराजाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजकी वर्तमान जे श्रुत जाहले ते सेवेसी लेहून पाठविले आहे त्यावरून श्रुत होईल. त्यायेलीकडे काही लिहिजेसे नाही. जे वर्तमान येईल ते वरचेवर सेवेसी लेहून पाठऊन विशेष. माहाराजाचे सेवेसी पालकी २ दोन व निशाणे वगैरे जिनस पाठविले आहेत त्याची किमत चोवीससे अठ्याणव रुपये तेरा आणे. याचा जिनसबराबर नथु व बुला काहार व चिंतामण परदेसी सेवेसी पाठविले आहेत. अवलोकन करून जाब सादर करावया आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The whole letter is in Chimaji Damodar's hand, addressed to Shahu probably giving news about the Nizam.*

No. 29] [1724 ?

श्रीजयति

आपत्ये नमस्कार विनंती. रायाजी जाधव यांचे (व) रंभाजींचे झुंझ जाले तेव्हां रंभाजीनें रायाजी मारिला. त्याचे भाऊ आले ते भोईजेस आहेत. त्या युध्यांत राणोजी कोकरा मेला. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांणी मिरजकर दिलेलखान धरिला. दोन हती व च्यारसें घोडे घेतले. दिलेलखान वसंतगडी हली ठेविला आहे. दोन लाख रुपये मागतात. तैसेच्च राजश्री संभुसिंग जाधवराऊ यांस रा॥ व्यासराऊ राजदर्शनास घेऊन आले. दर्शन जालें. सरंजाम द्यावयाची बोली केली आहे. परंतु अमका सरंजाम द्यावासा निर्वाह जाला नाहीं. हली तें सातारां आहेत. निवडलियावरी जे होईल ते लेहून पाठऊन. हे वर्तमान पूर्वी लिहिले आहे. पत्र पावले नसेल म्हणून हली लिहिले असे. चाकणचा वाडा आडसला-

कडील होता तो पाडला. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणें. राा पिलाजी जाधवराव यास स्वामीनी पत्रे पाठविलीं त्यास ते सत्वरीच स्वामीपासी येऊन पावतील. येथून आमचा निरोप घेऊन वाघोलीस गेले. तेथूनहि लवकरच स्वार होऊन तिकडे येतील हे विनंती.

¶Chimaji Appa writes to his brother Bajirao an account of the fight between Rayaji Jadhav and Rambhaji Nimbalkar. The former was killed, and Shambhusing Jadhao was brought back into Shahu's service.

No. 30] [*1724?*

श्री

पुरवणी चिरजीव राजश्री आपा यासी आसीर्वाद उपरी. बैलाविशी व गाडियाविशी तुम्हास पहिले लिहिलेच आहे. यांचे स्मरण असेलच. तरी बैलगाडे मिलतील ते वरचेवरी पाठऊन देणे. बऱ्हानपूरचा अमल उठला. मोगलानी सख्ती केली आहे. त्यास तुम्ही राा धोंडो माहादेव यांस आपणाजवल बोलाऊन आणणे. तुमची वाट बऱ्हानपुरावरूनच आहे. तरी तेथील अमल पहिल्याप्रो सुरलीत चाले तोच विचार करणें. येविशी गई न करणें. आमल दिवसे दिवस बुडतच जाईल. यास्तव वरचेवरी ठासून आमल राखावा (हे) उत्तम आसे. लोभ+ आसो दीजे हा आसिर्वाद.

¶Bajirao to his brother Chimaji advising him to keep a firm hold on Burhanpur.

No. 31] [पौा *9-2-1725?*

छ ९ जमादिलोवल.

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत

राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित स्वामी गोसावी यांसी.

सेवक आनंदराऊ रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. पूर्वी आपणांस पत्रे

---

१ पत्र चिमाजी आपाचें. यापुढील मजकूर खास चिमाजीच्या हातचा. रायाजी जाधव साखरखेडल्याचे लढाईत मारला गेला (९-९-१७२४), त्या सुमारचें हें पत्र.

+पत्र बाजीरावाचें.

लिहिली आहेत त्यावरून विदित जाहलें असेल. सांप्रत जमालुदीखान ऐवजखानीचे पुत्र यासी नवाबानीं निष्ठुरता करून अलजपूर[१] त्याचें तगीर केले; वराडचे सुबेदारीची नायेबत सुजायेतखान बाळापुरी होता त्यास दिधली. बुऱ्हानपूरचा सुबा हफीजुदीखानास दिल्हा. अबदूल रहीमखान नबाबाचा चुलता होता त्यास तगीर केले. ऐसा निष्ठुरतेचा सागर आपले स्वकीये घरच्या लोकांसी जाला आहे तेथें दुसरा विस्वास याचा कोणी मानावासा अर्थ राहिला नाहीं. +बडे दादा (?) परयेत आले, येताती. आपले पुत्रास आवरंगाबाद दिधली. आपण या प्रांतातच आहेत. तूर्त याचे कांहीं बुधी पूर्ववत नाहीं. क्षणभंगूर प्रकृति आहे. पाहावें, श्रीकृपेनें लौकरी विल्हे लागल. दीपसिंग आले. भेटी जालिया वस्त्रे देऊन आज्ञा जाली. दागजी (?) अजंठे येथें मृत्य पावले. बहुत काय लिहिणे. आपण बहुत सावध राहणे. वरचेवरी वार्तिक पाठवणे जे. समाचार लिहिला जाईल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Anandrao Sumant to Bajirao, giving news of Nizam-ul-mulk's severe treatment of Aiwajkhan's son.*

No. 32] [*13-4-1725?*

श्री

विनंती उपरी. येथील कुशल क्षेम तागाईत छ १० साबान मुकाम गडतगव्हाण पूर्णातीर जाणोन स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे. विशेष राजश्री उदाजी चव्हाण नवाबापासीं चाकर राहतात त्यास बमये (फाटलें * *) तीस हजारी मनसब दहा लक्ष रुपयाची जागीर देतात. विजापूर मिरज प्रांती देतात. बद्रीजमाखानास जिल्हेदारी नांदेड तहद गंगेआलाकडे कळंबपोजारपर्यंत दिधली. तीन हजार स्वार समागमें दिल्हे. उमरखान यासी जिल्हेदारी बाळापुरापासून जाफराबाद या देशात जिल्हेदारी दिधली. नवाबसाहेब पंढरपुराकडे येऊन तिकडेच उदाजी चवाणास चाकर ठेवणार ऐसी वार्ता तहकीक असे. बहुत काय लिहिणे ? सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao, communicating appointments made by the Nizam.*

---

१ एलिचपूर. + येथून अक्षर भिन्न.

No. 33] [1725?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुरूकताजखान याजकडे मोगलाईकडून संगमनेर नासिक आकोले वणादिडोरी कोतुल धांदरफल परगणे आहेती. त्याचा मामला सख्त, आम्हाकडील कामकाजास जबरदस्ती होत नाही[१]; त्याहीमध्ये पाा नासिक वणदिडोरी हे परगणेयास रामभाऊ त्याचे तर्फेने आमिल आहेत त्याची वर्तणूक लिहिता येत नाहीत. आमच्या गुमास्तयास जमाबदीमध्यें दाखला देत नाहीत. अखेर साली तुमार[२] जाला त्यावरी आमचे दसकत नाही. परगणेयात सख्ती करून वसुल घेतला. खराबी केली, मुकाशाची जबरदस्ती नाही. नासिक परगणेयाचे जमीदार हाती धरून जमाबंदीमध्यें कितेक खुर्द बुदरूख केले; प्रजेस दुख दिल्हे. सांप्रत तुरूकताजखान पायासी गेले आहेती, यास्तव परगणाचे पटील हजूर फिर्याद जात होते त्यास येवल्यामध्यें आटकाऊन ठेविले ये धास्तीने आबादी राहिली. आधीच पाऊस गेला आहे. दुसरी आमिलाची सख्ती. यास्तव सेवेसी लिहीणे लागले. येविषी तुरुकताजखानास आपले पत्र बरे रीतीने लियाहावे की रामभाऊ आमील दूर करून दुसरा ठेवणे. हे होत नाही तरी येकाधा दबाऊ लेहून त्याची तगीरी होये येसे केलिया परगणे वसात राहतील; नाही तरी खराबी आहे. मोगलाईचे इजारदार, प्रजेची माया नाही; आपली नुकसानी होत आहे यास्तव विनती लिहिणे लागले. तुरूकताजखानास पत्र पाटवावे ते आपण येथून त्यांकड पावती करून उतर आणऊन रामरा (ऊ) याचे पारपत्य आगत्य होये येसे केले पाहिजे. त्यावरी ताकिरीरही जाली आहे. परंतु पाटील हजुर जाऊ पावत नाही. येसे वर्तमान आहे. सरदेसमुखीच्या गुमास्त्याचे दसकत नसता तुमार नेला आहे येविषी तुरूकताजखानास पत्री लियाहावे की गुमास्तयाचे दसकत नसता तुमार काये बदल विल्हे लाविला. यांत गुंजाईश[३] आहे हे निमित्य ठेऊन लिहिले पाहिजे व नासिक परगणेयाचे जमीदारास ताकीद की सरदेस-मुखीच्या गुमास्त्याखेरीज तुम्ही तुमार होतो त्यावरी दसकते करितां, तसेच वरकड कागदीपत्री दाखला देत नाही, ये गोष्टीने मारले जाल. तैसी ताकीद लियाहा-वया आज्ञा केली पाहिजे. पारपत्य होये येसे तुरूकताजखापासी पत्र लिहावे. यासी आज्ञा करावी. विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶*Peshwa's officer at Nasik writes to him complaining of the highhandedness of Turuktajkhan and his subordinates and requesting to have them removed.*

---

१ आम्हांकडून जबरदस्ती होऊं शकत नाहीं. २ तुमार=लेखी कागद. ३ लबाडी.

No. 34] [*1726?*

पाो छ २७ जिल्हेज

श्री

विनती उपरी. येथील क्षेम तागाईत छ १३ जिल्हेज जाणौन स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. राजश्री पंतप्रधान याचे पत्र आले होते, त्याचा अभिप्राये व नवाबासी भाशन जालियाचे वर्तमान पूर्वी मुजरद कासदाबराबर लिहून पाठविले पावले असल. यानंतर तुम्ही आसुदाचे जोडियाबराबर पत्र पाठविले ते पावलें. वर्तमान कलो आले. चव्हाणाकडील मजकूर लिा तो कलला. पुढे होईल ते लिहिले पाहिजे. व राजश्री पतप्रधान याकडील व नवाबाकडील व सरलस्करा-कडील राजश्री सुलतानजी निबालकराबाबत विचार काये जाला तो लिहून पाठवणे म्हणोन लिहिले. तर राजश्री पंतप्रधान यांचे पत्र आलियावर नवाबास परिछिन पुसिले की तुम्हास त्यासी युधास जाणे आहे तरी आम्हास निरोप देणे. पूर्वी सुरत प्रांतास राजश्री पंतप्रधान यासी बिगाडास चालिले तेव्हा आम्ही निरोप घेऊन गेलो तैसाच आताहि निरोप मागत होतो की यावरून नवाबाचा खुलासा निघल. तेव्हा नवाबानी बहुत समाधान केले की खुदानखास्त बाशद आपनास राजश्री पतप्रधानासी बिगाड सहसा करणे नाही. बिगाड करणे असता तर आम्ही आगोधर औरगाबादेस आलो होतो राजश्री पतंप्रधान मागून आले तेव्हाच जाऊ न देतो. बिगाड होता आथवा मागे मागे जाऊन पोहचतो आथवा आतांहि बिगडास जातो तर तुम्हास साफ सागतो. भय काये आहे? आखश गोस्ट झाकत नाही. परतु माझे चितात हे गोस्टच नाही मग चिंता काय. वडीलवडिलापासून पातशाहाचे नवाजीस दरम्यान दाग थोडासा लागला. आपले वाचायाचा भरवसा काये? पुढे लेकराबालास निमकहरामीचा शब्द लागल म्हणौन लाजस्त(व) जातों ते राजश्री पतप्रधान यास तीस चालीस कोस डावे उजवे टाकून जाईन मजवर शब्द ठेवितात मी मऱ्हास्टास जाऊन पातशाही मुलूक खराब केला याचाहि परिहार केला पाहिजे म्हणौन जातो. पातशाहानी माळवा व गुजरातचा सुभा आपनास दिल्हा आहे की तुम्ही मुलकाचा बदोबस्त करणे. आपण कबूल करीत नाही. इस्ताफ दिल्हा की आपल्याच्याने होत नाही. दक्षनहि खातरेश येईल तर हजरत कोन्हाचे साभाली लाऊत, आबरूने आज्ञा देता मी मकेस जाईन यैसे लिहून चुकलो आहे. दिलीचे आमीर जे बोलतात ते कुली झूट आहे. त्याचा विश्वास राजश्री पंतप्रधानाही न करावा, हे तुम्ही त्यास लिहून पाठवणे. आम्हीं म्हटले की तु (अपूर्ण)

¶*This news-letter of which only the first sheet is available, reports the intentions of the first Nizam's movements in the Deccan. It seems to refer to the early years of Bajirao.*

No. 35] [22-1-1727?

छ १९ जाखर

श्री

श्रीमत् राजश्री पंतप्रधान
व तथा राजश्रीं आपा स्वामीचे सेवेसी.

पोष्य रामाजी दामोदेर[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १० जमादिलाखरपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. नवाब निजामनमुलूक प्रस्तुत बिडास आला व जुनरास मखबूल आलम याणेहि थोरात व निंबालकर वगैरे बोलाऊन तीन च्यार हजार फौज जमा केली आहे. नवाबाने आवाई औरंगाबादेस जावयाची घातली आहे. परंतु अंतर्यामी काये आहे, तें कलत नाहीं. येथें तरी वतर्मान आईकतो कीं, औरंगाबादची अगर बऱ्हानपूरची आवाई घालून, इकडील येखादे जागा घालावें, यैसें वर्तमान आहे. आणि त्याचे पहिल्यापासून चलणहि असेंच आहे कीं, दबदबा घालावा येकीकडे आणि जावे येकीकडे, हे स्वामीसहि विदितच आहे. आडलला मजकूर यास्तव स्वामीस लिहिला आहे. स्वामीकडे वर्तमान वरचेवरी येतच असेल. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री माहादाजीपंताचे पत्रावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये. हे विनंती.

¶*Ramaji Damodar to the Peshwa informing him of the arrival of the Nizam-ul-mulk at Beed and his mobilization of the forces of Thorat and Nimbalker. "The Nizam" he says "has given out his intention of proceeding to Aurangabad but it is difficult to fathom what he really intends. To put others on a wrong scent is a characteristic of the Nizam as is well known to you."*

No. 36] [6-3-1727?

पाा छ १ शाबान.

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी पोशा महिपत आनंदराऊ[2] सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशाळ जाणौन निजानंद लिहावया आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. नवाब छ २३ रजबी कूच करून अजनठियाकडे गेले. सैदलस्करखा व महमद गयासखा बराबर गेले आहेत. येका दो मजलीवरून ज्यास

१ आंबीकर असावा. २ सुमंत.

बिदा करणे त्यास करितील व बुऱ्हानपुरीहून हरकारियाही नवाबास वर्तमान लिहिले की, राजश्री पंतप्रधान सोनगड दोन मजली राहिले तेथ जाऊन राहिले आहेत. राजश्री बाजी भिवराव व पिलाजी जाधव याचे पुत्र व मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे व आनंदराऊ पोवार यासी बुंधेलखंड व माळवे प्रांतास बिदा केले की, आपलाले तालुकियास जाऊन पैसे टके वसूल करून घेण व राजश्री पंतप्रधान याचे मुकाम तेथच कितीक दिवस सोनगडी आहेत. त्यानंतर पावागडाकडे जातील, यैसे वर्तमान आले. पुढे जासूद बातनीचे आलिया वर्तमान लिहित जाऊन. बहुत काये लिहिणे, लोभ असू दीजे, हे विनंती.

¶Mahipatrao Anandrao Sumant to Chimaji Appa intimating to him that the Nawab had left for Ajanta, accompanied by Said Lashkarkhan and Mahmadgayaskhan. The Nawab, adds the writer, has received the news from his messengers that the Peshwa had encamped near Songad and has despatched his Sardars Baji Bhivrao, Pilaji Jadhao, Ranoji Scindia, Anandrao Powar into Malwa and Bundelkhand to exact dues from their respective provinces.

No. 37] [*Summer 1727 ?*

श्रीभार्गवराम

पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापि. आपण शहरास आलो. त्यास जगली शाजादा याचे भेटीस गेलो. भेटी जाली. बोलीचाली जाली आहे ते सेवेसी भेटीस येतों, विदित करून. नवाब येवजखान याचा त्याचा बेबनाव बहुतच आहे. नवाब निजामनमुलुक याजकडे जात होता. त्यासी त्याची आज्ञा आली की आपण भेटीस येतो, तुम्ही न येणे. सतावीस परगणे नासिक सगमनेर पाटोदे बीड वगैरे, खानदेशात पाचसात परगणे, वराडात सातआठ परगणे येकूण सतावीस परगणे जागिरीच्या सनदा पाठविल्या. फिरोन जगली शहरास आले. त्याचा हेत बोलीचालीत बहुत देखिला की भाद्रपद मासी कलम धरावे. वीस हजार मोगल चाकर ठेवावे. स्वामीसी स्नेह संपादून वीस हजार फौज मागोन घ्यावी. नेमाडातून आधी उजनीस जावे. दोस्तमहमद याची पत्रे आली आहेत की आपण सामील होऊन उजनीस ठाणे बसऊन मालवा कबज करून गुजरातेस फौजानसी जावे. दिली-पावेतो ठाणी बसवावी. आपले राज्याची चौथाईसरदेसमुखी आमल बसऊन द्यावा. मालवा गुजरात वगैरे कुलचौथसरदेसमुखी आमल द्यावा. ठका मिलेल तो

फौजेमाफीक तविजे द्यावा येसी बोली आम्हासी करारवाके करून सिरपाव देऊन आज्ञा दिली. एविसी स्वामीस राजश्री छत्रपतीस्वामीस पत्रे लिहीली आहेत. मागा जासूद ठेविला आहे. पत्रे घेऊन येईल. स्वामीचे सेवेसी वर्तमान कलावे म्हणून सेवेसी लिहिल आहे हे विनंती.

¶*The writer who appears to be the Peshwa's agent, or possibly Anandrao Sumant, informs the Peshwa of his interview with the Jungli Shahazada at Aurangabad and his plans against Nizam-ul-mulk, and his intention to proceed with the help of the Peshwa into Malwa and Gujarat and reduce those provinces.*

No. 38] [*Summer 1727?*

श्री.

विनंति उपरी. राजश्री सटवोजी जाधव व राजश्री राणोजी भोंसले याच्या लस्करास रोजमरा नाहीं. आजितागायत घरीहून निघालिया महिना होऊं आला, पोटास नाहीं. यामुळें लोकानी गवगवा फारच केला आहे. पुढेंहि पंथास जाऊं तों महिना येक पाहिजे. याकरितां त्याच्या पोटापाणियाची जैसी आज्ञा करणें ते केली पाहिजे. आम्हांस लौकरी आज्ञा जालिया मेहुनबारीवरून पुढें धूलकोटावरून लौकरी त्या प्रांतास गेलियास स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून जें होणें तें होईल. यानंतरी नबाबाकडे आमचे जासूदजोडे बातमीस गेले होते व आवरंगाबादेस स्वार गेले होते, त्याणी बातमी आणिली कीं जाफराबादेखालता तीन कोसावरी मुकाम आहे. तेथून आंजणटेयावरी जाणार. पुढें फरदापूरचा घाट उतरोन बराणपुरास जावें, यैसी लौकिक वदंता आहे. परंतु स्वामीचें लस्कर खानदेश प्रांतें आहे ते करवंदीच्या घाटे गेलियाविना तो घाट उतरून जातो यैसें नाहीं. स्वामी नर्मदेच्या कांठीं गेले यैसी बातमी गेली म्हणजे बराणपुरास आसेरीस जाणें तरी जातील यैसें दिसतें. स्वामीस कलावें म्हणून लिहिलें आहे. आम्हांस आज्ञा दिली म्हणजे आम्ही धूलकोटावरून पलीकडे गेलों म्हणजे पोटापाणियाचें लस्करचें चालेल आणि जें कार्य होणें तेंहि होत जाईल. वरकड बाब पथकाकरितां वारंवार ल्याहावें लागतें. नाहीं तरी काशास लिहावें लागते ? राजश्री गोविंद हरी व राजश्री भिकाजी सिंदे व राजश्री संताजी मोरे आद्यापि आले नाहींत. आम्हांस स्वामीची आज्ञा जाली म्हणजे तेही धूलकोटाआलीकडे पलीकडे येऊन पोहचतील. कललें पाहिजे. हें पत्र लिहिलें त्याउपरि अतांच

१ तवाजा = बक्षीस.

राजश्री सटवोजी जाधव याचे स्वार सुतोडी परगणेयांतून आले. त्याणी वर्तमान सांगितलें कीं नवाब आजणटेचे मुकामी जाऊन पोंहचला. स्वामीस कलावें याकरितां लिहिलें असे. मुलुकगिरीचे दिवस थोडे राहिले आहेत. जे आज्ञा करणें ते सत्वर केली पाहिजे. स्वामी म्हणतील कीं नर्मदेपरयेंत समागमें जावें. खर्गोणावरून निरोप घ्यावा त्यास खर्गोणावरून जाऊं तों आम्हीं मकडाईस या मार्गे जाऊं. चारी लस्करें येक्या मार्गे चालिल्यास पोटास मिळणार नाहीं. पुढें मनसबाही कांहीं दिसोन येत नाही. स्वामीनी जो मनसबा योजिला आहे त्यास लौकर जावें दिवस थोडे राहिले. आम्ही आज्ञेप्रमाणें च्यारी सवस्थानें फिरून सेवेसी लौकरीच येऊं. दतयेकर रामाजीपंतास लौकर पाठविलें पाहिजे. सूचना आर्ज सेवेसीं लिहिला आहे. ज्या मार्गे जावयाची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. मलगावाहून कूच करून कोणे मार्गे जावें हें उदईक आस्तमानी पत्र येईल त्याप्रमाणें कूच मुकाम होईल. पत्र मार्गीं पावलें म्हणजे आज्ञेस अंतर पडतें. वडिलांस कलावें म्हणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपालोभ असों दीजे हे विज्ञप्ति.

¶*The writer asks orders from Bajirao whether he should proceed to the North, and enquires as to what his plans are.*

No. 39] [*28-5-1727 ?*

श्रीशंकर

श्रीमत राजश्री अंबाजीपंत तात्या

स्वामीचे शेवेसी

पोष्ये सदासिव बलाल सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १७ शवालपावेतो स्वामीचे कृपेकरून यथास्थित आसे विशेश. काही कार्यामुले व येका ग्रहस्ताचे लग्नानिमित्य क्षा गांडापुरी आलो होतो. त्यास वेदशास्त्रसंपन राजश्री दिक्षित मौजे कायेगावीहून येथे (आले यैसेयास) राजश्री पंतप्रधान स्वामीचे सैन्यातून राा पिलाजी जाधवराऊ याणी त्यांस पत्र लिाा होते. त्याची नकल बजिनस राा दिक्षितांचे पत्रांत लपेटून पाठविली आहे. वर्तमान कलेल. वरकड कितेक वर्तमान त्यांही लिाा आहे, ते आम्ही शहरी आसतांच आयकिलें होते. त्यावरून संकलित लिाा होते. पावले असेल. हाली राजकारण विचित्र आहे. दुसरे तांम्राचेच मुतसदी यांचे येथे तत्वता आयकिले कीं, राा श्रीपतराऊ व राा कान्होजी भोसले याही भागानगरचे कार्ये करून द्यावे, म्हणजे राा कान्होजी भोसले यांस चांद्याचे

राज्य नवाबाही द्यावे आणि निराळे राजे यैसे नाव म्हणवावे. व श्रीपतराऊजीसहि त्या राज्यांत विभाग काही मुलूक द्यावा. यैसा येकांत दृढनिश्चये जाला आहे. रंभाजी निंबालकर यास दोन हजार फौजनसी सांगाते घेऊन, सातारियास श्रीपतराऊजीनी यावे. त्यास रंभाजी निंबालकर रुखसत होऊन पुढे देशास आले आहेत. मागून श्रीपतराऊजीहि कृष्णातीरास मागती येकत्र होऊन, मग सातारियास यावे, यैसा विचार घरोब्याने ताम्राकडून स्नेहाकारितां कलला. राजश्री बब्रूराऊजीस या मसलहतीत अगर पहिल्यापासून काडीइतका विचार कलो दिल्हा नाही. माहाराजाचे वकील म्हणजे जितके वकील आपला राज्याचे तितक्याही व सरदाराही यांचे आनुमते * * * * वावा. त्यास सरदार परभारे भेटोन जे रीतीने भेटावे ते न केलें. सबब की, रत्नाकरपंत वकील केले. त्यांही हरकैसे नवाबास आर्जव करून, आपले घर करावे म्हणोन श्रीपतराऊजीकडून मोठे नवाबास दाहा मोहरा नजर करविल्या व नवाब यैवजखांजीस पांच मोहरा नजर केल्या. तर उभयेता नवाबास प्रतिनिधी याणी नजरा कराव्या, तेव्हा वकील लोकांही काये करावे? कुली वकर[१] बुडालासा जाला. ज्या तांम्रास रा। पंतप्रधान स्वामीच्या भेटीची आशा दुर्लभ, तेथे नजर कोठून? बरें या गोस्टीची आम्हांस श्रत करावयास आगत्य की, राज्याचा दबाव जातो. हेहि पत्र स्वामीनीच चितांत विचारून मागती फाडून टाकावे आणि पारपत्य काये करावयाचे तें करावे. बहुत काये लिहिणे कृपावृधी केली पाहिजे. हे विनती.

¶*Sadashiv Ballal to Ambaji Purandare, giving confidential news of the treacherous intrigues carried on by Shripatrao Pratinidhi and Kanhoji Bhosle with the Nizam.*

No. 40] *[29-7-1727?*

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी. सेवक गोविंदे[२] कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ २० जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून.प्रांत जुनरचे वर्तमान यथास्थित असें विशेष. अबदुल अजीजखान व कुवर बाहादुर व थोरात व केतर बेग औरंगाबादकर मिलोन स्वार दीड हजार व बरखंदाज दीड हजार येसा तीन हजार जमाव गुज धरून आजीपावेतो होते. त्यास कुवर व कतरबेग औरंगाबादेकर मिलोन स्वार व बरखंदाज मिलोन दीड हजार निघोन गेले. त्याची बोली यैकिली कीं औरंगाबादकडे आम्हाकडील

---

१ आव.

२ श्रीवर्धनाच्या देशमुखीवर पेशव्यांचा मुतालीक.

आऊजी कवडे व संभुसिंग व भापकर यैसे जमाव धरून मुलकास उपसर्ग करितात त्या उपराळ्यास म्हणून बोलाऊन नेले. त्यास जाऊन आजी च्यार दिवस जुनरीहून जाले. बाकी अबदुल अजीजखान व थोरात यैसे स्वार व बरखंदाज दीड हजार पावेतो जमाव आहे. कडबा गवत नेऊन सिवनरीच्या गडदात साठवितो. सेवेसी वर्तमान कलावे म्हणून लिहिले असे. विदित जाले पाहिजे बहुत काय लिहिणे. कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶Govind Krishna to Chimaji Appa: reports activities in the Junnar region of several officers of the Nizam, probably about the year 1727.

No. 41] *[19-12-1727?*

श्री.

श्रीमंतु राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. ताा छ १६ जमादिलौवल पर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून मुाा निघोज येथे सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहालें तेथे आज्ञा कीं, मोगल दगेखोर आहे; तुम्ही बहुत खबरदारीनें जाणें. यैसियास, पूर्वीहि स्वामींची आज्ञा होती आणि राजश्री तात्यानीहि ताकीद करून सांगितले ते गोश्टी चितांत आहे. आम्ही निघोन पुढें जात होतो; परंतु हा विचार चितांत आणून, अवघे येके जगां जमा करावे, कोणी बाहेर न निघे म्हणून निघोजेवरी येऊन राहिलों. राजश्री मल्हारजी होलकर यास पत्र पाठऊन आणिले. राा तुकोजी पवार यांस माणसे पाठविलीं आहेत. तेहि येतील. कदमाचा गुंता आद्याप वारिला नाही, त्यास्तव गुंतोन पडलों. टाकून जावे तरी खामखा दगा खातील. यास्तव त्यांस लवकर येत ते केलें पाहिजे. पुढे जावयाची आज्ञा मार्गाची ज्याप्रकारें केली त्याप्रमाणें वर्तोन भिऊन चालावयास अंतर करीत नाही. आणि प्रसंग पडलाच तरी स्वामीचें पुणे समर्थ आहे. जें होणे ते स्वामीच्या पुण्यें होईल. स्वामीची कृपादृश्टी आम्हावरी आहे तो आमचा परिणाम ईश्वर करीतच आहे. विशेष ल्याहावे तरी स्वामी सर्वज्ञ आहेत. आज्ञापत्र पाठऊन आमचा सांभाल केला पाहिजे, हे विज्ञाप्ति.

¶Ranoji Scindia to the Peshwa, saying that in obedience to his orders he has encamped at Nighoj and that he has sent for Holker and Powar. He further writes that Kadam's arrival is awaited by them.

No. 42] [1727

श्री

सेवेसी. चांदवडची गढी फते जाली. सातलवाडीचा पैगाम प्यादाचा आ[ला] की आज चार दिवस तोफा लावणे. आम्ही आपली शर्त करून निघोन जाऊ. त्यास तोफा फौज गढीस पोहचली. संध्याकालपावेतो तोफा वाजल्या म्हणजे रात्री जातील. उदेक स्वामीनी कूच करावे. तोफा उदैक मुकामास पावत्या करितो. तूर्त आणवावयाच्या आजचा दिवस न करावे. जाऊन लागले उठोन आलिया आमचा आब जातो. उदैक गढी राहात नाही. भूपाळचे पनास हजार रुो पदरी पडले. पारखून घेतले. आज येतील अगर उदैक येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chandwad is reported to be captured.*

No. 43] [1727 ?

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

विनंती. नवाब निजामनमुलुक फौजेनसी निबाईलाहनेर प्रातें आले, यामुले दलपतराऊ पिपलगावीहून पलोन गेला. भावसिंगराऊ याचा किबला[1] कन्हेयास होता, तेथून घेऊन वारसें प्रातें गेला आहे. कन्हा वसविला होता त्यासही फौज लागोन कन्हाही घेतला. भावसिंगरायाची ठाणीं होतीं ते पलोन राहुडाकडे गेले. याउपरी नवाब छ १४ जमादिलोवली फौजेनसी मलगावावर आलें. चौगिर्दा फौजा उतरल्या आहेत. मलगावकराची जागा त्याणे बरीच बंदोबस्ती केली आहे, भेटत नाहीं. परंतु मोगलाई फौजा आहेत. तोफा मोव्या समागमें आहेत. हाली छ १७ जमादिलोवली नवाबानी भोवते गाव पाहोन मोरचेयाची तजवीज करून सलोबतकुचे[2] खणावयास बेलदार लाविले आहेत. मोरचे बांधतात. महिना पधरा दिवस लागला तरी मलगाव घेतलियावेगले येथून उठतात येसे नाही. वरकड मलगावकराने गाव लाविले होते ते कुल घेतले, ठाणी बसविली आहेत. वरकडही कितेक याप्राते गढिया आहेत त्याही पाडावयाचा विचार आहे. वरकड आपण लस्करांत गेले होतो तेथे बोलीचाली मनास आणिली, त्यास नबाब निजामनमुलुक याचा हेत आहे की राजश्री पंतप्रधान स्वामीसी स्नेह करावा. मलगाव

---

१ कुटुंबपरिवार. २ सलाबतकुचे=एक विशिष्ट मांडणीचा खंदक.

फते जालीयाउपरी ते आपण कर्नाटक प्राते जावें असे, लोकबोली आहे. परंतु आपणाकडे लिहिली कागदपत्र केले असतील ते वर्तमान खरे. याउपरीं पुढे याप्रांती नवल अपूर्व वर्तमान आसल होईल ते लिहोन पाठवीन. मजला यंदा कोठे काही दिक नाही. नेरचा धंदा सुरलीत होऊन कागदपत्र आले. आण फतेसिगाकडील माहाल आहेत तसे करार आसिले तर राजश्री गणपतराऊ याणी आपले लिहीलेप्रमाणे ताकीदपत्रे मजला दिली आहेत त्याप्रा खटपट नेरची करीन. नेरच्या बाबती आहेत. मी काही खटपटेस कोणे गोस्टीस चुकणार नाही आण स्वामी सेवेसीं तिलतुल्य अंतर पडो देणार नाहीं. येविसी स्वामीच्या पायासी विनती पूर्वी केली आहे. कुटुंबी आहे, स्वामीचे आनाचा पुरातन आहे, आता दुसरे कोठे जाऊ ? जसे स्वामी चालवितील तसे कालक्षेप करून आहो. नेर गालणा निबोईत[१] या प्रांते जे दिवाणाचे धंदेयाचे काम काज आसेल ते मजला आज्ञा होईल तें आमलदारीने माहितीने खटपट करून होता होईल ते करीन. सेवेसी श्रुत होये हे विनंती. पिलाजी गायकवाड यंदा जमाव ठेवित नाही. थोडे बहुत आहेत. सोनगड प्रस्तुत आहेत. कंठाजी कदम रनाळे-तोरखेडयावर हजार दोन हजारानी आहेत. दरबारचे प्रसंगाचा मार्ग लक्षितात. पोहाणेयाचे ठाणे व होलकराकडील लोक स्वस्तिक्षेम आहेत. नबाब आनखी कोणासी विरुध करीत नाहीत आसे आहे. पा चिखलवाहाल येंदा मोकासा कोणाकडे दिली ? तेथील वसुलाचा हंगाम आहे. मोगलाईचा धंदा चालतो याकरिता लिहिले आहे हे विनंती.

¶*This letter addressed to Chimaji Appa (the first sheet missing) relates to Nizam-ul-mulk's aggression into Khandesh-Baglan districts. This and other moves of the Nizam must be verified with dates, as those of Bajirao also, before an historically accurate account can be given with reference to the conflict between these two prominent personalities.*

No. 44] *[1727 ?*

श्री

राजेश्री पंत गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मुमीअलंक्रत राजमान्ये स्नो मालोजी नाईक निंबालकर दडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकुषललेखन करावयासी निरोपिले पाहिजे. विशेश. आपण वार्तिकासमवेत पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन संतोष जाहला.

---

१ निंबात, लोहनेर, कन्हा, वारसा, पिंपळगांव, राहूड, मळगांव हीं ठिकाणें खानदेश-बागलाण प्रांतांत पिंपळनेरच्या आजूबाजूस आहेत. नेर परगणासुद्धां त्याच बाजूस आहे.

आपणाकडील तपसीलवार व्रत लेहून पाठवणें म्हणऊन लिहिलें; तरी राजेश्री संभुसिंग जाधवराऊ व रा आपाजी सोमवंसी सरलष्कर व गोरखोजी भाबकर व लक्ष्मणराऊ प्रभु यांच्या भेटी जाहल्या. आपण प्रसंगी होतो. अवघियांचा धंदा-हि विल्हेस लाविला. या उपरांतिक ताम्राचें शैन्य मनसुबा होऊन कोणीकडे जाईल तेही आपण लेहून पाठऊन देऊं. सदैव पत्रार्थी श्नेहाभिव्रधि केली पाहिजे. विशेश काये लिहिणे कृपा असो दीजे. हे विनंती.

¶*Maloji Naik Nimbalkar to Bajirao about the Nizam's affairs.*

No. 45] [*1727?*

माहाराज राजश्री राऊसाहेब साहेबचे सेवेसी

श्रीमंत प्रउड राजमान्य निराधार्यासी आधार आज्ञाधारक सुलतानजी गायेकवाड चरनावरी मस्तक ठेऊनु दडवत विनती उपरी. स्वामीची आज्ञा घेऊनु स्वार जाहलो. त्यास तुमच्या अज्ञाप्रमाण राजश्री सिऊजीबावाची भेट घेतली. त्या आखाड मासी दाद प्रभु याचा उट हिवरे प्रा राज्याचा पिपलगाव यानी अलम-अलीखानाच्या युध्याच्या समई नेला होता. त्यारजबदल आज्ञापत्र होतें त्या कार्यानिमत्य फौजेसहवर्तमान बोदिनखेड प्राते आले. काही कामकाज करावे तो निज्यामणमुलुक अजनठियावरी आला. याजबदल ते काम राहिले. मग सरकार विज्यागड येथील जमानगतीचे सखो महादेवाबा जमानगतीचे रुपये आपानी पुन्यात घेतले. याच्या उगवणीबदल नेमाड़प्राते आपणासमागमे असो. बावाजीचेविषी कागद लिहिला आहे तरी फौज कोण्या प्राती जाते, कोणता घाट उतरतात येसे लिहिणे. आपण व बावा दर्शनास येतो. सेवेसी श्रुत जाहले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनती.

¶*Sultanji Gaikwad to Bajirao, communicating the movements of the Nizam.*

श्री

No. 46] [*1727?*

राजश्री पंत प्रधान गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नेहांकित तुकोजी पवार दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून श्वकीये श्वानंदवैभवलेखनआज्ञा करीत गेले पाहिजे विशेष. तीर्थरुप राजश्री नाना व रा. मल पाटील व रा. दादा सिनर प्रांते गंगातीरी

आहेत. त्याचे व कुवर बहादुर याचे युधे जाले. सात घोडे त्याजकडील पाडाव केलें. हे वर्तमान पूर्वी आपणास कललेच आहे. आपले पुन्येकरून तीर्थरूपास येष आले आहे. प्रस्तुत रोजबरोज युधे होत आहे यैसीयासी * * गाबजे(त) * न ऐवज (खान ?) याचे आहंदी पारनेर * * रात व नेवासकर थोरात यासी आले आहेत कीं कुवरबाहादुरास सामील होऊन गनीमास तंबी पोहचावणे. त्यांस पारनेरकर व नेवासकर थोरात तिकडे जावयासी सिध जाले आहेत. येंदनिमित्य आम्हांस तीर्थरूपाच्या मदतीस जावे लागते; तर आम्हा समागमे आपली हजार फौज यां वलणची दिल्हे पाहिजे. च्यार दिवस पोट भरून स्वामीचा नक्ष करून. तर ये गोस्टीस दिवसगत न लाविता फौज पाठविली पाहिजे. आपणहि या पत्राच्या उत्तराचा मार्ग लक्षीत आहो. आपणास-तो खायेमखाये जावे लागते. बहूत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Tukoji Pawar, afterwards founder of Dewas, writes to Bajirao about his engagement with Kuwar Bahadur near Sinnar and asks for a thousand troops to be sent to his succour. This is apparently a campaign against the Nizam, on whose behalf Kuwar Bahadur must be fighting.*

No. 47] [*January 1728 ?*

[आरंभीचा मजकूर गाहाळ]

कागद आला की फतेसिंगबावा व रघोजी भोसले यासी चंद्रसेन जाधवराऊ यासी जाहाले जुज तुंबल येक प्रहर जाहाले. उभयेतांकडील लोक बहुत पडले आणि येक कोस हाटऊन माघरे सरलें म्हणौन पत्रे आली. त्या जुजास आठरा येकोनीस दिवस आजी जाहाले म्हणौन माणोस सागत होता. सेवसी विदित होये हे विज्ञाप्ती.

¶*Battle between Chandrasen Jadhav and Fatesing and Raghuji Bhosle (see No. 80 of Purandare Daftar I). Chandrasen was fighting on behalf of the Nizam.*

No. 48] [January 1728?

श्री

विनती. मोगलापासून बातमीचे राऊत आले. त्यास मोगल तीन कोसावर आ(ला) (आ)हे, पुढे ही येत आहे. तरी कटकात ताकीद करून राऊत पाटविले पाहिजे * * दुसरीहि बातमी आलियावर लेहून (पाठविने) कलले पाहिजे हे विनंती. राजश्री बाजी भिवराऊ याजकडे राऊत आणखी पाठवावें. कलले पाहिजे हे विनंती.

¶*Movements of the Nizam are communicated in this letter, possibly about the Palkhed campaign.*

No. 49] [3-2-1728?

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी.

७ श्रीमंत सकलगुणालकरण आखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ता। छ २ रजब मु॥ भामगड[1] प्रांत नेमाड जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गोसावियानी सातारियाचे मुकामीहून पत्र पाठविले ते काली आमदनगरचे मुकामी प्रविष्ट जाहाले. तेथें आज्ञा कीं औरगाबाद डावी टाकून न जाणें. उजवी टाकूण जावे. हाळूहाळू मजली करून फौज आवघी जमा करून जाणे म्हणून लि॥. त्यास सोकरचे मुकामी राजश्री आपाचे पत्र आले होते, त्यावरून त्या प्राते जावयाचे बहुमानार्थ लि॥ होते. त्यास त्या प्रांते जावे तर नवाबाचा रोख त्या प्राते नांदेडास येणार. मऱ्हाटे सरदार व कविजंग वराडात राजश्री कान्होजी भोसले याजकडे जाणार. आम्ही त्या मार्गे जाऊन फौज माघेमाघे येती त्यासी खवखव पडेल. येकेजई जमा करावी तर पोटास पाहिजे. फौजेस वेढा पडावा, मुलुक कौली, यास्तव सोकरचे मुकामीहून कासारीचे घाटे जावयाचा निश्चये करून आलो आणि आपणाकडे पत्रे पाठविली, ती शेवसी विदित जाहालेच असेल. कासारीचे घाटे उतरून चालिसगावावरून बऱ्हाणपूर उजवे टाकून कालाचौत्रा नजीक मुकाम करून काली अमदनगरास आलो. फौजा माघून रा॥ संभाजी भोसले व संताजी मोरे व रा॥ हैबतराऊ सोमवंसी व रा॥ दादजी सितोले आम्हास

(1) 20 miles east of Khandwa.

सामील जाहले नाहींत. तेहि येका दिवसा सामील होतील. राजश्री येधाजी संतकर याजकडे जासूद पाठविले आहेत. तेहि रेवावरच येतील. राजश्री सिवाजी गायेकवाडहि येतील. याउपरी मजल दरमजल रेवापार होऊन जाऊन फौज़ाहि अवघ्या सामील होतील. पलीकडे गेल्यानंतर ते प्रांतीचे सविस्तर वर्तमान शेवेसी लिहून पाठऊन. राजश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे याचे वर्तमान तपासिले आलाहिदा पत्री लिहिले आहे. त्यावरून विदित होईल. संभाजी सिंदे याजकडील पागेचा कर्डा घोडा आज्ञेप्रमाणे पाठविला असे. शेवेसी प्रविष्ट होतील. विशेष काये लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

(श्रीपांडुरंगचरणीं दृढभाव चांगोजी-सुत पिलाजी जाधव)

(मोर्तब सुद.)

¶Pilaji Jadhao to Bajirao: communicates his own movements and those of the other Sardars.

No. 50] *[26-2-1728*

श्रीजयति

आपत्यें चिमाजीनें साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ २६ रजब मु॥ माची पुरंधर स्वामीचे आशीर्वादें यथास्थित असे विनंती. स्वामीची दोन पत्रें एक फाल्गुण शुध सप्तमी(1) अलिमोहनचे मुकामचे आपले वार्तिकासमागमें व एक राजश्री स्वामीचे जासुदाबराबरी फाल्गुण शुध पौर्णिमा(2) सिरपूर वाघाडीचे(3) मुकामचे ऐसीं दोन पत्रें पाठविलीं ती प्रविष्ट होऊन स्वामीचे आगमनाचे वृत्त कलले. ऐशास जो जो प्रसंग पडला तो स्वामीनी राजश्रीचे पायावरी स्वामी कार्यावरी दृष्टी देऊन मान्य करून सकल सरदार घेऊन सेनेनसी आले, उत्तम जाले. वरकड अर्थ म्हणावा तरी श्रीवरी भार आहे. वडिलांचे पुण्येकडून व स्वामीची निष्ठा राजश्रीचे ठायीं आहे तेणेकडून ईश्वर निभावीतच आहे. आपली दोन पत्रे आलियावरी राजश्री संतोषी जाले. नित्य उठोन आपणाकडे वर्तमानाचे ठायीं बहुत आतुर आहेत. पत्रावरी पत्रें वरचेवरी वर्तमान लेहून पाठविली पाहिजेत. येविसी अंतर केले न पाहिजे. इकडील वर्तमान सविस्तर

---

(1) 6th February 1728. (2) 14th February 1728. (3) In Khandesh.

कळावें म्हणून दोन प्रतीनें जासूद पत्रें लेहून रवाना केले व बाळाजी गोसावी पाठविले. परंतु स्वामीची दोन पत्रें आली त्यावरून वार्तीक न पावले, सविस्तर श्रुत न जालेंसे कळोन पुनरपि हे पत्र लिहिले असे. सारांश, पहिले तुरूकताजखान व रंभाजी निंबाळकर व थोरात व धिराजी वगैरे येऊन मुलकांत धुंदी केली. लोहगडचे पेठेपर्यंत गेले. तेथें लोहगडकरी यानी ठेचून वाटे लाविले. ते माघारे येऊन चिंचवड पुणे यामध्यें राहिले तों निजामनमुलुक या प्रांतास आला. तो अंजनापुरास येऊन राहिला. त्या मुकामी जवळेकर[१] ठाणेकरानीं कौल घेऊन ठाणे चिमणाजीपंताचे[२] स्वाधीन केले. तळेगाव[३]-शिखरापुरकर[४] जाऊन कौल घेतले. तलेगावास ठाणे मागितले. तेथून निजाम नारायणगड उदापुरचे रोखे जाऊन गडाखालीं दो कोसावरी राहिला. उदापुरासहि[५] दोअडीच कोसाचे अंतर उरलें तेव्हां मुधोजी यादव याणी हिमत धरिली होती. परंतु तेथील तोफची बदलले. मग पागेची घोडी मात्र घेऊन मुधोजी निघोन आला. बांदल आपले जमावानसीं उदापुरास गेले. अवसरी-पाबळकर ठाणी टाकून पळाले. खेडकरहि ठाणे सोडून निघाले. नारायणगडास खासा न लागतां जुन्नरकर दोगे खालीं मोर्चास ठेविले होते तेच धास्तीनें घिगोऊन[६] संभाजी राजे यांचे निशाण घेतले. आम्ही नारायणगडास लोक पाठवावयास सिध करून किल्लेकरी यास पत्र लिहिले. त्याचें उत्तर सकाळीं लेहून आम्हाकडे पाठविलें तेच दिवशी तिसरे प्रहरीं निशाण त्यांचे घेतले. वरकड सामान दाणादारू होता परंतु त्याणी लबाडी केली. तेथून निजामाने उदापूर पाडलें. अवसरी खेडची ठाणीं जुनरकराचे हवाला केली. पाबळी बांदल ठेविले आणि माघारा वाघोली लोहगावावरून पुणा आला. तेथें संभाजी राजे यांचे लग्न केले. रामनगरकराची सोइरीक होती ते लग्न झाले. पुणियास फाजिलबेग म्हणून मोगल ठाणे ठेविले आणि लोणी पारगावावरी गेला. सुपे पाटसास फौज पाठविली, ती ठाणी घेतली. सुपे निंबाळकर रंभाजी व थोरात पाटसी ठेविले. आंबी निंबाळकराकडे गेली. बारामती धायगुडे टाकून पळाले. तेथें जानोजी निंबाळकराचे ठाणे बैसले. वेसेगावीहून मजल दरमजल पेडगावास स्वामीचे आगमन जालें ऐसें ऐकोन गेला. तेथून नगरास जाऊन छ २२ रजबीं नगरी बुनगे टाकून सडे स्वारीने स्वामीचे रोखें कासारबारीने जावे

---

१ जवळे, घोडनदीच्या काठीं.

२ चिमणाजी दामोदर.

३ (ढमढेरे).

४ नारायणगांवाजवळ.

५ जुन्नरजवळ.

६ घाबरून.

म्हणून तडक तिकडे आला. त्यास स्वामीची बातमी धुळ्यास आलेसी आली होती. हे वर्तमान विदित व्हावे म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*This is an important letter written by Chimaji Appa to his brother Bajirao, informing him from Purandar of the expedition of Nizam-ul-mulk and Sambhaji into the north Poona district and of the several important places captured by them. Chimaji Appa and Shahu seem to be both at Purandar, and are recalling Bajirao with all haste to return and meet the danger. The Nizam captured nearly all the important places including Poona where he married Sambhaji to a bride of the Ramnagar Ranas who are Sisodia Rajputs. Nimbalkar, Thorat and several Maratha Sardars took service under the Nizam and Shahu's existence was severely threatened. The two brothers Bajirao and Chimaji saved the situation. The Nizam's progress through the Poona district deserves to be historically traced.*

No. 51] [*February 1728 ?*

श्रीशंकर

विनंती उपरी. आम्ही स्वामीपासोन फिरोन आलो, तो नवाबाचे लस्कर कुल कूच होऊन नदीतीरी येऊन राहिले. नवाबाचे डेरे मात्र तेथे राहिलेत. तेथे सेभर स्वार घेऊन आम्ही चौकीस राहिलो. नवाबाच्या माहालातून परवानगी आली की तुम्ही च्यार्‍ही प्रहर रात्र चौकी करणे. त्याचे आज्ञेप्रमाने चौकीस राहिलो. त्याचा सेजार कुल शाहजादेसुधा कूच करून गेले. नवाबास सागावे की चौकीस सेभर स्वारानसी सुभेदार तेथे आहेत काही फिकीर न करणे. येणे प्रमाणे नवाबास सागावे हे विनंती. नाव येक सततर मागोन घेणे. सेभर(दा) काम लागता जरूर येक नाव मागोन घेणे हे विनंती.

¶*The writer is appointed to guard the Nawab (Nizam-ul-mulk ?). This may be during negotiations.*

No. 52] [*February 1728*

श्रीजयति

विनंति उपरी. आम्ही व नवाब आजी येथें आलों. त्या मोगलास आम्हास दो कोसांचें अंतर आहे. तुम्ही त्याजपासून कोसावरी आहां म्हणून ऐकिलें. त्यास नवाबानीं सांगोन पाठविलें कीं राजश्री पिलाजी जाधव यास लेहून पाठवून जोगणी(?) डाव्या पडत आणि वाट भांडियांच्या गाडिया चालतसी उत्तम कोणती

आहे तें मनास आणून आणवणें. तरी तो मोगल आज येतो कीं नाही ? आम्ही पुढें यावें किंवा आजी दिवस फार जाला म्हणून येथें मुकाम करावे ? वाट उत्तम जोगणी डाव्या पडतसी पाहून लेहून पाठवणें. लोक बरे बरे माणूस खबरदार करून निशाणापासी जमोन असो देणें. 'आम्हास घोडा बैसायास नाही तरी राजश्री आनंदराऊ पवार यांचा घोडा कोतल[१] आहे तो व राजश्री रांगाजी जाधव याचा घोडा कोतल आहे तो यैसे दोन्ही घोडे जरूर मागोन घेऊन पाठवणें. यावें राहावें, वाट जोगणी डाव्या पडतसी पाहून लौकर लेहून अगर सांगोन पाठवणें. रंभाजी कदम व राजश्री दावलजी सोमवंशी डावे बाजूस व पिलाजी जाधव उजवे बाजूस यैसें सांगोन ठेवणें. येथें सरलस्कर आहेत ते वहमा बाळगतात ते इरे आम्हास आहे, तरी सर्व लोकांस सांगणें कीं निंबाळकराची इरे व जुम मोगलाचें शरम तुम्हा लोकांवरी आहे. समयें राखोन राहाणें. मोगलाचे बुनगें गावांत राहिले म्हणून ऐकितों. तरी सारेच गेले किंवा थोडे बहुत बुनगे राहिले तें कळल्यासारिखें लेहून पाठवणें. वरचेंवरी खबर पाठवीत जाणें. तों मोगल पुढें चालतोच. तुम्ही फौजेनसी आम्हाजवळ येणें. घोडे दोन्ही अगत्यें पाठऊन देणें. हे विनंती.

¶*The last words appear in Bajirao's hand and the main letter appears in the hand of Chitnis Ramaji Malhar. It evidently refers to the action between Bajirao and the Nizam, for which Bajirao is trying to put some spirit into his men. The action may be the one of Palkhed.*

No. 53] [*30-3-1728* ?

श्री

राजश्री चिमणाजी पंत गोसावी

यांसी.

•॥ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो चंद्रशेन जाधवराऊ दडवत विनंती उपरी. येथील कुशल आधिक सुध प्रतिपदा जाणऊन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. राउली पत्र पाठविले ते प्राविस्ट होऊन लेखनार्थ सविस्तरे आवगत होऊन संतोश जाला. राजश्री रायाचे वर्तणाते शृत होऊन संतोश जाला. सांप्रतहि तिकडील वर्तमान आले आसेल ते लिहिले

---

१ कोतवाल.

पाहिजे. यानतंर इकडील वर्तमान तरी मुर्ल्ये[१] मजल दर मजल आवरगाबादेस जाताती. सदईव पत्रे पाठऊन श्नेहाभिवृधी करीत गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे[+] विनंती

¶*Chandrasen Jadhav to Chimaji Appa, congratulating him upon Bajirao's victory.*

No. 54] [*March 1728*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी.

सेवक रामाजी दामोदर सा. नमस्कार. सेवेसी विज्ञापना. स्वामीनी पत्रे राजश्री स्वामीस व मातुश्री बाईस व तात्यास राजश्री दादास व वेदमूर्ति भटंभटास पाठविली. वर्तमान साविस्तर, कलोन बहुत संतोश सर्वास जाहला. कैलासवासी नानाच्या पुण्यप्रतापेंकरून तांब्र लुटून फना केला. सा हजार फौज बुडविली. सरदार मृत्य पावला. हती येकुणीस पाडाऊ जाहले हे वर्तमान राजश्रीनी आयिकोन बहुतसे संतोसी जाहले. येकनिष्ट सेवक आहेत त्यास श्री येश देत आहे, यैसे बोलिले. श्रुत होये. वरकड वर्तमान राजश्री दादानी लिहिले आहे त्यावरून श्रुत होईल. राजश्री फतेसिंग व श्रीपतराऊ चांदे प्रातें जाणार. राजश्री नारबासमागमे सिदोजी निंबालकर दोन हजार व त्रिंबकराव दाभाडे च्यार पाच हजार हुजरात दोनसे बंकापुराकडे रवाना केली. आष्टावर गेली आहे. श्रुत होये. सेवकावर कृपाआवलोकन करून कृपा पत्र पाठऊन साभाल केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Ramaji Damodar to Chimaji Appa, informing him of the satisfaction of the King at the news of the complete rout of the Mogals. "It is on account of their loyalty," the king said, " that my servants are favoured with success." Further on, the movements of the armies under the various Sardars are given by the writer.*

No. 55] [*5-9-1728 ?*

पौा छ १३ सफर.

श्री

श्रियांसह चिरंजीव राजश्री नाना यासीं चिमणाजी बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ११ सफर जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष.

---

१ निजाम. +यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा असून बालबोधींत आहे.

रा येशजी बलकवडे यांचे पत्र छ ८ सफरचे छ १० मिनहूस येऊन पावले. त्यात मजकूर कीं आलगेहून छ (८) सफरी कावनईवर गेलो. कावनचे दरवाजियाजवल गेलो तो सा घटका रात्र राहिली. दरवाजियास कुराडी लाऊन सीनेजोरीने[1] किला घ्यावा त्यास सुचे[2] जाहाले. किलेकरानी बरकंदाजी करून साभालिले. काम कारगार जाहाले ना(ही). दोन तीन माणोस जाया झाले. मग खाली पेठेत येऊन किलेकराचे वाणीबकालाचे कबिले दस्त केले. किल्याखाली मोर्चे बैसविले. कबिल्यावर निग्रह आरंभिला. हातकान कापावयास प्रवर्तोन माणोस गडावरी पाठविले. तेव्हा किलेकरी कौलास आले. कितेक मुदे सागोन पाठविले ते मान्य करोन कौल दिल्हा. किलेकरी खाली उतरिले. स्वामीचे निशाण छ ७ सफरी दोन प्रहरा किल्यावर चढविले. किला आटोपसार, कडे थोर, पाणी पुस्कल, सेभर माणसांनीं राखा(वा) सारिखा आहे म्हणोन लिहिले असे. तुम्हास वर्तमान कलावे याजकारिता लिहिले आहे. मुख्य गोष्टी माारनिलेनीं ज्याहांबाजी सिनेदेराजी[3] बरीशी केली. हुंनरवंदीनें किला फते केला. येरवी विनाराजकारण पाहाडी किले येणें न येणें कलतच आहे. तीर्थरूप राजश्री रायांचा पुण्यप्रभाव विचित्र, तत्प्रभावेंकडून मोठेहीं अटेक[4] कर्म स्वल्पहासे होते हे[+] आशीर्वाद. कागद कोण्हास न दाखविणें. दादोबाचीं पत्रें दादोबाकडे पाठविणें.

¶*Letter from Chimaji to Nana, communicating the news of the capture of Kavanai fort near Manmad. The writer extols the good luck of Bajirao.*

No. 56] *[13-12-1728 ?*

छ २२ जालोवल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती येसीजे. आणकईकडील[5] वर्तमान पूर्वी डाकेचे जासुदाबाार सेवेसी लिा आहे ती पत्रे पावलीच असतील. हाली अबदूल अजीजखान यास पत्रे आली त्यावरून आपणास बोलाऊन बहुतसे इतराज जाले. महिपतराऊ त्रिंबकराऊ तेथे आहेत. त्याणी शार्मजीपंत[6] याचे पत्र किला न देणे म्हणून आले

---

१ सिनाजोरी = बळजबरी. २ सूचना.

३ बळजबरी, छाती, पराक्रम. ४ अवघड.

+ These two words in Chimaji's hand.

५ जि. नासिक, येवल्याजवळ. ६ शामजी गोविंद टकले.

त्यावरून कबिला हस्तगत करून फिराऊन गोष्ट सांगितली व श्रीमंतांचे पत्राचा-हि उजूर केला आहे म्हणून लिा त्यावरून आपणावर बहुत दुखित जाले. त्यावरून आपण उतरप्रत्योतरही करणे ते केले की सल्याचे दरम्यान नवाब व माहाराऊ आहेत. करारमदार जाला आहे, त्याप्राा श्रीमंतांकडून तो काही तफावत पडिला नाही. किला देऊ केला आहे त्यास अन्यथा करणार नाहीत. दिवसाचा मात्र फेर आहे, परंतु तुम्हाकडील येकही गोष्ट अमलात आली नाही. याप्रमाणेच स्वामीचे पत्र राा माहाराऊ यास आले ते त्याणी यांकडे पाठविले ते पावले, तेव्हा विचारांत पडले, आणि नवाबास तेच क्षणी अर्जी स्वहस्तेकरून स्वामीचे पत्र माहाराऊ याचे नात्रे होते ते अर्जीत घालून रवाना केले आहे. विदित होये. हाली मुख्य पत्र त्याचे आज्ञेप्राा लिहोन रवाना केले असे. त्याचे उतर अलाहिदा सादर करावे व अबदूल अजीजखा यास येक पत्र बरे बोलून लिहावे व हरयेकविसी आपणासी दरखोष न करीत यैसे लिहावे. काजीबाा अडीचशे रूााचेविसी पूर्वी विनंती लिा आहे व राा शंकराजी निकम याचे पत्र आले तेही पाा आहे ते पावले असेल. विनंती प्राा पारपत्यपुरसर उतर पाठविणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*The writer, an officer of the Peshwa, reports to Chimaji Appa, that Abdul Azizkhan, the Nizam's officer, had taken offence at the fort of Ankai not being handed over to him as per terms of the agreement (very likely the treaty of Sheogaon, February 1728).*

No. 57] [*1728?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वमीचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक सांा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना येसीजे. आपली आज्ञा घेऊन सोनपेठेस आलो. तेथील खंडणी करून जमीदार सेवेसी पाठविले ते पावतील. पु * ठीवर तों आपला मुकाम आहे. +तेथे रोखा घेऊन आमचे स्वार गेले आहेत. परंतु शा[२]हाने खंडणी करणे ती करावी. सेलगाव कसब्यावरून आलों, तो कसबा उजाड आहे. तेथील जमीदार देशमूख

---

१ तकार. +From here the writer's hand.

२ दबाबानें, शह देऊन.

आवजी कवडे यांचे जावई आहेत, तेथे तीनसे स्वार गेले आहेत त्यांस ते ऐकत नाहीत. आम्ही स्वारी करावी तर मागे राहत. ते लस्करात आले तर चुकवावे नाहीतर स्वामीस जवल आहे. हजार पांचसे स्वार पाठऊन जमीदार नेऊन चुकवावे. टाकली परगणा तों दूर आहे स्वारी गेली आहे. आले तर बरे. नाही तर डावे हाते दाहा कोस * * आहे. स्वामीचे * * * * * स्वामीचा मुकाम न * * * * * * कैसा होईल जो लबाडी करील त्याजवर फौज घेऊन जावयास फुरसत असली पाहिजे. पुढे पालीम खंदार शाहावर आहे.[1] त्रिबकपंताकडील परगणे कुली डावे बाजूस डोंगरात राहिले तैसेच विठल आपदेव तो फारच दूर आहेत. हरबाजीकडे जावें की पुढे सुमारेच जावें हे आज्ञा करावी. सिरसोलेहि[2] मागें पडले. तेथे राऊत गेले आहेत. आले तर स्वामीकडेच येतील. आम्ही उदेक खडाचा घासदाणा चुकऊन तेथे मुकाम करू. राउत फार दूर गेले आहेत. जमा जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी.

¶*Vithal Shivdeo to the Peshwa, giving news of his own doings and movements in the dominions of the Nizam.*

No. 58] [*28-4-1730?*]

छ २७ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक आनंदराऊ रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २१ सवाल मुकाम का भिलवडी पा मिरज कृष्णातीर जाणोन आपले स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिवस जाले पत्रेहि येतात, परंतु सेवकाचे स्मरण होऊन पत्रद्वारें सांभाल होत नाही येणेकरून कृपावृधीस न्यूनता दिसते. आम्ही पहिलेपासून स्वामीचे पदरीचे. स्वामीखेरीज आश्रये काये आहे नाही हेहि विदित आहे. यैसे असतां न्यून जालियाने आमचा तरणोपाये कैसा होईल? त्याहिमधे आपण सर्वज्ञ. आम्हापासून काही सेवेंतहि अंतराये नाही. सांगणार कोण्ही सांगोत, परंतु समर्थ चितांत विवेक आणितात. सारांश आम्ही पदरीचे सर्व प्रकारे सेवाचोर, परंतु आपले म्हणवितो याजकरितां कृपावृधि केली

१ पालीम व खंदार हीं स्थलें मोंगलाईत. २ मोगलाईत.

पाहिजे. प्रस्तुत राजश्री स्वामीनी दर्शनास बोलाविलें होते. राजश्री आपाजी सोमवंसी व आम्ही गेलो. पांचसात हजार रुपये तूर्त कर्ज मात्र खर्चास दिल्हे व सतावीस हजार रुपये बीड आबड येथील बाबतीचा गुतका[1] जाला होता, त्यापैकी पांच हजार माफ केले. बाकी बावीस हजार रुपये मक्ता द्यावेसे जाले. रा संभुसिंग जाधवराऊ व रा गोरखोजी भापकर व हुजरातची फौज राजश्री बालोजी डुबल घेऊन आले आहेत. अवघे येकत्र आहो. प्रस्तुत उदाजी चव्हाण गुमटाहून कूच करून सोनीवरी आला. तेथूनहि सडी स्वारी खानापुराकडे धावला म्हणून छ मजकुरी बातमी आली. आपणास कलावें म्हणून लिहिले आहे. राजश्री सिदोजी थोरात व घोरपडे यैसी दोनहजार फौज कोल्हापुरावरी आली आहे. तेहि येका दो दिवसांत आमचे फौजेस सामील होणार. निरंतर पत्री सेवकाचा साभाल केला पाहिजे, तेणेंकरून समाधान होईल. बहुत लिहिणे तरी आपण सर्वज्ञ आहेत हे विनंती.

¶*Anandrao Sumant in a wholly autograph letter, after giving full assurances of his devotion to the Peshwa, writes to Chimaji Appa about some monetary settlement made by Shahu regarding the province of Beed Ambad. The news about Udaji Chavan having left Gumat (Shirol) for Soni is also given.*

No. 59] [*About 12-9-1730 ?*

छ २० रावल

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. रा रत्नाकरपंत वराडाहून येथे आले. त्याणी घरोघर सांगितले व राजश्री आनंदराऊ सुमंत यांचीं पत्रें हाजी माादअलीखान वगैरे समस्त लोकांस दिल्हीं कीं, वकीली आपणास जाली. त्यास हाजी माादअलीखान याणी आम्हांस हटकिले जे, हे काये वर्तमान ? त्यास आम्ही तर येकच उतर दिल्हे की वकीली जाली आहे तर सनद दाखऊन आपला अमल करीत, आमची काही मिरास नाही. त्यास हाजीजीनें सांगितले कीं रायास लिहून उतर आणवणे. त्यास तेथून आलियावर दुसरे जागा नवाबचे मुतसदियाचे घरी गेलों. तेथे तर परिछिन राजश्री स्वामीची सनद दाखविली, परंतु त्यामधे काये मजकूर तो मुतसदी तर फारसीनवीस त्यास न कले. परंतु रत्नाकरपंती सांगितले कीं वकीलीची सनद

---

[1] गुंता.

आहे. त्याणे पुसिले कीं रायाची सनद कोठे? त्यास उतर दिल्हे कीं रायापासून सिके राजश्री स्वामीनी हिरून घेतले. आतां रायाचे सिके काये मंजूर? त्यास त्याणे उतर दिल्हे कीं येसी गोस्ट काये समजोन बोललेत? आज दक्षणेत मोहरा येकच आहे. तुम्ही येसी काये गोस्ट बोललेत येसे परभारे फजित केले. परंतु नबाबास राजश्री स्वामीचे पत्र थैली आहे त्यांत मजकूर वकीलीचा आहे म्हणोन नबाबाची भेटी जेव्हा होईल तेव्हा आमल करू म्हणतात. येविशईचा अर्थ राजश्री दादोबा अगर कोणी दरबारांत पाठऊन ध्यानास आणून शेवकास लिहावयास आज्ञा केली पाहिजे. जर खरेच आहे तर तैसीच आज्ञा लिा पाहिजे. नाही तर येक लिहिले हाजी मादअलिखान व नेकरोजखान व गयासखान यैसी तीन पत्रे आपलीच या प्रकारें आली पाहिजेत की आमचे लिहिल्यावाचून जे सनद येईल ते नामंजूर आहे. जर पत्र येत नाहीत तर काम अबतर[1] होते. येथे किरकोल कामे भोकर्दन वगैरे राजश्री संताजी चितलकर यांचे मोकासियाचे रुपये कचेरीत खजान्यांत घ्यावे लागतात ते बंद पडतील. वरकडहि कामे आहेत. जर खरेच वर्तमान, वकीली त्यास जाली असिली तर आज्ञापत्र सत्वर सादर जाले पाहिजे की तैसीच वर्तणूक केली जाईल. श्रीमंत राजश्री आपा व राजश्री बाबूराऊजी यात्रेस गेले होते बदल तातडीनें स्वामीचे शेवेसी विनंती पत्र लिहिले असे. पारपत्य करणार स्वामी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*News-letter from Ganesh Ballal to Peshwa, writing news of the Nizam's Court.*

No. 60] [*1-10-1730*

पो छ ७ जमादिलौवल.

श्रीशंकर.

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधानपंत स्वामीचे शेवेसी

विनंति उपर. आज छ ३० राखरी चांदरातीस स्वामीकडील जोडी सुमंताकडेच आली होतीं म्हणोन त्यानी बोलाविले होते त्यावरून गेलो. मागे येकदोन वेला गेलो तेव्हा स्वामीची निंदायुक्त गोस्टी काहाडली होती. त्याउपर

१ बिघडतें.

नवाबाकडे अनादर देखिला, पुन्हा पाचारिले नाही, याकरितां आता स्वामीची स्तुतीच घडीघडी करितो. म्हणतात जे, पंतप्रधान यासमयांत येक डोला माहाराजियांचा आहे. येकनिष्ठ राजश्रीची चाकरी चिते मनेभावे करिताती, म्हणोन श्रीने भाग्य, उत्कर्ष दिल्हे. आणि जयेहि आहे. जे कोन्ही देखो सकत नाही तेच हीनप्राक्तनी करंटे आहेती, यैसी आज बहुत स्तुति करीत होते. आनि स्वामीचें पत्र लिहिले आले ते दाखविले की, आम्हांस लिहिले आहे जे, तुमच्या भरवसियावर आहोंत. तर मजपासी जासूद नाही जे. घडीघडीचे वर्तमान ल्याहावे व माझें लिहिल्याचें त्यास खरें वाटनार नाही. तुम्हीच लिहिणे जे, निजामलमुलक नरखेडावर[१] श्रीपतराऊ भेटले तेपासून किंबहुना श्रीरंगपटनापासून नवेली[२] फिरऊन बेइमान जाहाला आहे. सैदाचे वेलेस कैलासवासी तीर्थरूप नानांही बंदोबस्त केला होता जे, त्याजवेगली मोगलाईत कोन्हास वाट नव्हती. आतां श्रीपतराऊ जाहाले, मऱ्हाठे सरदार जाहाले, कानोजी आदिकरून सर्व वकील पाठऊन वर्तमान लिहिताती, यामुले ताम्रांस फितवा जाहाला, आनि हे काबुची, यैसें बहुत वर्तमान सांगितलें. खोजे आबदुलखानाचे घरी जाऊन राऊ सुमंती कांहीं अर्ज नवाबास करविला. त्यास याचा हेत कीं या मिसें तऱ्हीं नवाब बोलाऊन पुसतील. त्यास नवाबानी काये उतर देणे ते खोजे आबुदुलाखानानें सुमंतास निरोप पाठविला, कीं तुमचा जाबसाल केला. तुम्ही येऊन आईकोन जाणे अगर इतबारी पाठवणे. सांगोन भागवतास यानी पाठविले. मग काये जाब असेल तो न कले. यावरून सुमंत बहुतच खटे जाहाले की माहाराजानी आम्हास आज्ञा केली होती जे, नवाबास जवाहर व वस्त्रे दोन अडीच हजारांची गुजराननें. त्यावरून आनिली होती, परंतु आता अम्हास गुजरानून काये सिध ? म्हणौन बोलत होते. हेहि सांगत होते की रत्नाकरपंती उगेच जाऊन नवाबाचे घरीहून श्वान मागोन आनिले आनि आगोधरच सर्वां मुतसदियास सांगितलें 'यैसा वेडा' म्हणोन सांगत होते. आम्ही उतर दिल्हे जे हातीहि आइकिला होता. त्यानी म्हटलें कीं रंभाजी आम्हास म्हणो लागला जे, आपला येक हाती देणें. त्यास आम्ही कशास देऊन ? यैसें बोलत होते. विदित होये हें विनंति.

¶*News-letter. The writer Ganesh Ballal reports to the Peshwa the opinions and views about Bajirao entertained by the Nizam.*

---

१ नागपुर जिल्ह्यांत. २ वृत्ति.

No. 61] **[2-10-1730**

पाा छ ७ जमादिलौवल

श्रीशंकर

श्रीमत राजश्री प्रधानपंत स्वामींजीचे

शेवेसी

विनती. स्थापित गणेश बलाल करद्वये जोडून सां नमस्कार विनंति उपर. विनवावया प्रार्थना येसिजे. येथील क्षेम ताा कार्तिक शुध ३ त्रितिया छ १ जाावल मुाा लस्कर नवाब्रपूर जागा मौजे मेंढेगाव व भायेगाव परगणे साकरखेडले, धर्म स्वामीचा जाणोन निजानंद लेखकास आज्ञापिलें पाहिजे. यानंतर कृपापत्र जासुदाचे जोडीबराबर पाठविले तें उतम समई, आनंदराऊ सुमंत याचे डेरियास त्यानी बोलाविले होते तेथें गेलो, तें पावोन वर्तमान कलों आले. धोंडाजीचेंहि पत्र पावलें. शहरीहून चिरंजीवित सदासिवपंती पत्रें लिहिल्याप्रमाणें पावली. वर्तमान कलो आले. यैसियासी आम्ही येथून जाहाले आइकिले बर्तमान कालपर्यंत वरचेवर लिहित गेलो. शेवेसी विनंतिपत्रें पावली असतील अगर पावतील. अभिप्राय विदित होईल, पारपत्य करनार स्वामी समर्थ आहेती. नवल अपूर्व काये ल्याहावें? मूल नवाब व गयासखान जातउजहम (?) आहेती. स्वामीना पत्रीं आज्ञा केली जे संभाजीचे वेलेस सला गयासखानीचे मारफातीनें केलां जे, ते दरम्याने आमचे आहेती. म्हणोन क्षण न लागतां यास येश देऊन याचे मारफाती सला केला. त्यास दोन गोस्टी प्रखर पुसोन उतर पाठवणें म्हणोन आज्ञा. यैसियास बेइमानी लोक. यास वचनप्रमाणाची सये असत नाही. आनि गयासखानजीस उमाबाईकडील माया बहुतच आहे. त्याहीवरी याचे विचारें दाभाडियाची फौज मोडली तऱ्ही बरेच आहे. अगर स्वामीचे फौजेस मोडिले तर मग सहजेच संभाजी आणून स्थापावा यैसा पूर्ण हेत धरून. याच मुदा मी अजंठियाची सराये केली आहे ते पाहून तसेच लासूर परगणे गांडापूर तेथे यावे. यामध्ये मलगावकरास व भावसिंगास दबाव स्वामीचे फौजेस दबाव व दाभाडिये व गायेकवाड व बांडे याचे फौजेस पुस्ती[१] दाखवावी. बलकी मलगावावर जाऊन मलगावची गढी व वानासीची गढी पाडावी हेहि चर्चा आहे हें पत्र प्रहर रात्रीस लिहिले. चर्चा आहेजे छ १ रोजी प्रातःकाली कूच करनार. जाफराबादेकडें जाणार यैसी वार्ता आहे. प्रातःकाली सोमवारी कूच जाहाले तर जासूद सांगतील. पुरवणीहि लिहून देऊन. विदित होये हे विनंती.

¶*News-letter from Ganesh Ballal to the Peshwa, reporting the plans of the Nizam to restore Sambhaji to the Satara gadi and appoint Umabai as Senapati.*

---

१ मदत.

No. 62] [9-10-1730?

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये राजेश्री बाजीराऊ पंडित स्वामी गोसावी यासी.

सेवक आनंदराऊ रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. पूर्वी आपणास सवस्तार लिा आहे त्यावरून कलो आले असेल. आम्ही पंढरपुरास येऊन पंधरा दिवस तेथे मुकाम जाले. पर्जिन्याचा अतिशये होता. त्याउपरीं तेथून कूच करून दरमजल येऊन आश्विन शुध अस्टमी सुकुरवारीं राजश्री स्वामीची भेटी झाली. नबाबाकडील मातबर लोकहि समागमे आहेत. याउपर राजश्री चिमाजीआपा पौर्णिमेकारणे सातारियासी येणार. त्यांचीहि पत्रे आम्हास आली होती. त्यास राजश्री आपास आल्यानंतर परस्परे भेटी होऊन त्याचे विचारे व राजश्री स्वामी आज्ञा करितील ते आपणास लिहून पाठऊन. आपणाकडील सविस्तर व्रत लिहून पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे. रा॑+ माहदाजी आंबाजीनी सविस्तर विनंती केलीच असेल. पुढे आम्हास बुद्धिवाद त्याहाल त्याप्राो वर्तणूक करून. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Anandrao Raghunath Sumant informs Bajirao of his arrival at Satara and his interview with the King. He further writes that certain high officials from the Nizam had also come to Satara with him.*

No. 63] [25-10-1730?

छ ४ जाावल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री पंतप्रधानजी स्वामीचे शेवेसी

विनंती उपर. उतरें प्रतिउतरें यैसी जाहाली होती त्याचा जाबसाल मध्यस्त जवली धोंडाजीपंती सविस्तर आज्ञेप्रमाणे सागितला. त्याची प्रतिउतरें नवाबाने दिल्ही कीं माहाराज तुमचे वचनाने कूच करून येत नाही तर तुमचे उठोन जाणे काये युक्ती? यैसा पैगाम तर मकबुल आलमानेहि तुमचे सांगितल्यावरून केला होता. परंतु हा पैगाम फुच (?) आहे. दुसरें कर्ना-

---

+ येथून अक्षर वेगळें.

टकचा मजकूर तरी पहिले आम्हीं तुम्हास धोडाजीबराबर सांगोन पाठविले होतें. परंतु हाली राजियानी आनंदरायाबराबर निरोप पाठविला त्यावरून आम्ही माहाराजासी बोलावयाचे ते बोलोन. तुम्हासी गोस्टी राहिली नाही. तिसरा जाब मुलकाचे बंदोबस्तीविषई फौज व किला जवली मातबर ठेऊन करून म्हणौन सांगितले होते, त्याचा जाब वरचेवर दिल्हा की, तुमचे फौजेची काये गरज ? तुम्ही आपल्ये फौजेस ताकीद करा. आम्ही आपले लोकासी ताकीद करून. चौथे तुम्ही म्हणतात जे, आमचे सरदार तुम्हाकडे येताती करारमदारांत नाही. त्याचे उत्तर दिल्हे की आमचेहि जाधोराये वगैरे तुम्हाकडे गेले, तुम्ही ठेविले. तुमचे येतील ते आम्ही ठेऊन, यैसे जाब अनादराचे, मध्यस्तापासी दिधले. घरचा फितवा बहुतसा आपल्याच राज्यांतील अकार[१]पूर्वक येऊन दर्शविला त्यामुले यासहि बहुत संकल्पविकल्प जाहाले आहेती. विदित (होय.) मध्यस्त बोलिला जे, बिगाड माहाराजासी नाही. बिगाड स्वामीसिस्याचे मनी आहे. मूल पैजेचा विडा आनंदरायानी उचलून, महाराजाचें मतें आले किंवा तुम्ही आपणच आपमतें नास करिताती कलत नाही. स्वामी विवेक करून पारपत्य करनार समर्थ आहेती. वर्तमान जाहाले आइकिले त्वरेंने लिहिणें जरूर जाणोन विनंतीपत्र लिहिले असे हे विनंती.

सेवक धोंडो गोविंद सा॥ नमस्कार. पा॥ गणेशपती शेवेसी लि॥ले त्यावरून विदित होईल. साराउश हे गृहस्त बहुत भले आहेत. यास प्रतिदिनी चमतकार पा॥जे तेव्हा यास इतबार येतो यैसे आहे. लि॥प्रमान सावध आसावे. पुढे जाले वर्तमान शेवेसी पावेल हे विनति.

¶*News-letter communicating plans and discussions to the Peshwa from the Nizam's Court.*

No. 64] [*26-10-1730* ?

छ ४ जमादिलावल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री पंतप्रधानजी स्वामीचे शेवेसी विनंती उपर. सर्व ही वर्तमान लिहिलें तें प्रज्ञाचक्षुकडूनच विसाजी तुकदेऊ आलियावर थाट वरचेवर लिहून पुसोन बांधत गेले, या थरास गोस्ट आनिली. पुढे काये होईल तें पाहावें. उमाबाईस सेनापती संभाजी राजियाकडील करावेंसा निश्चय केला

---

१ आनंदराय सुमंत.

आहे. तूर्त वार्ता आनंदरायाचे विदमाने कीं मोगलाईत कंठाजी येतो. परंतु गनीमाईतच राहून स्वामीस मोडून मग संभाजीस आणावें अगर जे करणे तें करावें यैसाहि विचार माडले आहेती. परणामी काय होईल ते पाहावें. दष्टस्वप्नै[1] आहे. विदीत होये हे विनंती.

¶*The news writer reports to the Peshwa that Umabai Dabhade was trying to obtain the office of Senapati from Sambhaji of Kolhapur.*

No. 65] [*27-10-1730 ?*

छ ६ जावल मुा घरगाऊ

श्री

पुरवणी

श्रीमंत राजश्री प्रधान पंत

स्वामीजीचे शेवेसी

विनंती उपर. स्वामीचे सरकारची जोडी धोंडोपंताअगोधर खते नवाबास घेऊन आली होती व येक खत अबदुल रहमाखानास होते. दोन्ही खतें नवाबानी आपले व खानाचे आपण फोडून अक्षरशा वाचली. बहुत खुशबख्त होऊन मध्यस्तांस फरमाविले जे जासुदास खावयास च्यार रुपये देणें. धोंडाजी आलियावर जाब लिहून देऊन म्हणोन मध्यस्ताने जासुदाची तैसले[2] केली. मग धोंडाजी आलियावर धोंडाजी व चिरंजीवित सदासिवपंत भेटीस गेले. त्याजपासींही मुनसी यानी व अबदुलरहमाखानाने सांगितले कीं श्रीमंत राजश्री प्रधान पंताचे जाब व मतलब नवाबानी मान्ये केले. जाब तुम्हांवर मोकूफ[3] आहे. तुम्हीं आलेत आतां तुम्हांस खिलवतात बोलाऊन जाबसाल सविस्तर परस्परें पुसोन लिहून देतील. यैसी तसले केली. इतकियांत राजश्री राऊ सुमंत आले. यानी राजश्री नारबाचें पत्र आनिलें तें दिधले व कांही येकांतीं भेटीचे रोजी भाशण जाहाले. दुसरे रोजी गयासखानाचे घरी जाऊन त्यांसी सुमंतानी येकांती काये भाशण केले ते न केले. त्यावरून नवाबाची नवॅली[4] बदलली देखिली. त्या रोजापासून आज ६ दिवस जाहले रूख बदलोन गेला. भेटी धोंडाजीची राहेली व आटोले याच्या गडिया काही पाडिल्या. काही राहिल्या त्याही पाडितात आनी आजकाल नारबाची बहुतसी श्रुत करितातीं. मग राजेश्री नारबानी काये पत्रीं लिहिले असेल व राऊ सुमंतानी काये निशा केली असेल

---

१ दुष्ट स्वप्न. २ खातरजमा. ३ तहकूब. ४ वृत्ति.

न कळे. लोकचर्चा कीं राऊ सुमंतानी सांगितले जे राजश्री बाजीरायास नवाबानी तंबी पोहचाविले तरी राजे वाईट माननार नाहीत व राजियाचे राज्य बुडत नाही. अवघे मऱ्हाटेहि खूष होतलि यैसें सांगितले म्हणोन बाजारू गपा. परंतु तसेंच दिसतें. श्री जाणे व जुबानीही राऊ सुमंत पहिले शेवेसी लिहिली होती. विदित होये हे विनंती.

¶*This news-letter discloses a fresh development of Bajirao's relations with the Nizam. They two had felt great respect for each other and were about to be completely reconciled when suddenly the Nizam received the letters from Naro Ram and Anandrao Sumant and was altogether prejudiced against Bajirao.*

No. 66] [*27-10-1730*

छ ६ जमादिलावल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधान पंत स्वामीजी शेवेसी. विनंती उपर दीपसिंगजी भेटीस नवाबाचे गेले होते. मेजमानी वगैरे देऊन बहुमान(नें) मुख्य भेटला. पोटासी धरिले. मग येकांती बैसोन वर्तमान पुसिलें कीं आम्हीं जाणतों जे, सवाई जैसिंगजी सर्वाहून थोर, यानी तुम्हास शाहू राजियापासी पाठवावेसें काये काम होते ? तुम्हासारखी थोर माणसांही यावेसें नव्हतें, म्हणोन पुट देऊन भेद घेऊं लागले. त्यास यानी उत्तर दिल्हे जे, माहाराजियांनीं आम्हांस आपमतें पाठविले नाहीं. पातशाहांची आज्ञा होती जे, जाऊन मांडवगडास जप्तीत आणावा. आनी शाहू राजियाकडे इतबारी मुतसदी पाठऊन गुजरात व मालवियाचा बंदोबस्त करावा कीं नरमदा उतरोन आलीकडे न येतेसें करावें, म्हणोन पातशाहाचे हूकुमावरुन गेलों होतों, म्हणोन जाब दिल्हा. मग पुसों लागले जे कसें केलें, काये केलें ? यांनीं निवेदिले जे, अकरा लाख मालवें व पंधरा लाख गुजरात येणे प्रमाणें करार केला. म्हणों लागले जे, मालवे तर तुमचे हातचे गेलें. बंगस जाहला. जाब दिल्हा कीं तोच चितास येईल तर येणेप्रमाणे चुकवील अगर न चुकवीत, येख्तियार त्याचा आहे. नवाब म्हणो लागला की तुम्ही बंगशाचे घर अकरा लाख करुन बुडविले. त्यास काये राहेल ? आपण मालवाचे सुबेदार होतो तेव्हां अगदी तीस लाख चालीस लाख वसूल होत होता, म्हणून नवाब बोलिले. यांनीं उतर दिल्हे जे, तो एक रुपया न देउत आम्हांस काये गरज ? मग गुजरातचा मजकूर पुसिला की गुजरातेस बांडे व गायेकवाड धुमधाम करतील. तुम्ही प्रधान पंताचे विदमाने चुकविले हे कसें होत जाईल ? यांनीं उतर दिल्हे.

जे करार पडला आहे कीं बांडे गायेकवाड दाभाडे येतील त्यांस श्रीमंत राजश्री चिमाजी आपा व आम्ही येक होऊन त्यास तंबी करावी. मग बोलिले जे यांचा इतबार तुम्हांस आहे. आपणास येक काडीचा इतबार वाटत नाही. यांनी उतर दिल्हे कीं, आम्हास इतबार आहे. याचे आमचे वडिलापासून घरोबा आहे. आम्हासी बदलून गोस्ट सागणार नाहीत. मग या गोस्टी सोडून घडी घडी पुसो लागले कीं सातारा माहाराजापांसी मातबर मनसुबेबाज राजा ज्यास मानीतो यैसा तुमचे नजरेस कोण आला ? यांनीं जाब दिल्हा कीं माहराजा जैसिंगजीनी मजला याच कामाबदल बहुत करुन पाठविले जे, बाजिराऊ पंडित प्रधान यांचें नाव मुलकात मरदुमीचे फार आहे. परंतु गिरंदारी व मुतसदगिरी व मान आदर राज्यांत व बोलोनचालोन पोख्त कारबारी मनास आणून येणें म्हणोन पाठविले होते, ते आपण मनास आणिले. मग नवाब पुसो लागलें की कोन्हास तुम्ही मातबर व पोख्तकार व साहेबतरतुद व राजामेहरबान गिरंदार कोन्हांस वलखिले ? दीपसिंगजीनी उत्तर दिल्हे जे सिवाये बाजीराऊजी आणिक कोन्ही सत्यवचनी अगर प्रामाणिक अगर पोख्तकारी अगर चलन-साहेब-फौज दुसरा दिसत नाहीं. मग पुसिले जे, राजा खुद कसा आहे ? यानी उतर दिल्हें की राजाहि बहुतच खुबीया राखतो. नबाबानी उत्तर दिल्हे जे आम्ही आयिकिले जे कितेक गोस्टी हलकेपणाच्या आइकतो. यांनीं उतर दिल्हें कीं ते मजलीसी-सारखे न चालत तर राज्य कैसे राहतें ? परंतु पोख्त शाहणे विवेकी. जाबसाल उतम करिताती. यैसे उतर झालें.

छ ६ जमादिलावल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधान पंत स्वामीचे शेवेसी विनंती उपर. दीपसिंगजीचे व नबाबाचे यैसे वारंवार बहुतच भाशण जाहले. दिपसिंगजीनी स्तुती करितां माहाराजाची किंवा स्वामीची फार केली त्यावरून स्वामीचे स्तुतीवरुन कांहीं दिलगीर नवाब जाहला. म्हणो लागला जे, मजवर बाजीरायाचा इतबार अगर अदमीयेतीची[१] वचनाची सत्यता वाटत नाहीं. मग दिपसिंग बोलिला जे नवाब अनभवी. केलेले, मर्द, येकवचनी, येकनिष्ट, राज्या (स) हुजूरमुजरदा[२] व फौज जितकी ठेवील तितकिया जमातदारांस कुली वचनाचा वगैरे इतबार, राज्यांत याचाच पाहिला; आजी आहे. मग नवाब म्हणो लागले गरुर[३] प्रधान पंतास

---

१ माणुसकीची. २ राजाचा खास अधिकारी ? दरबारांतील खास अंमलदार.

३ गर्व.

फार जाहला आहे. येक वेल पारपत्य करणें जरूर आहे. यांनीं उत्तर दिल्हे जे, तुम्ही पातशाही गैरराजी; आणि यैशा मोहरियासी तुम्हास बिगाडने उचित नाही. आम्हींहि खैरखाहीने सांगतो, बाजीराऊ लाख फौज मेलवील तर मिलेल यैसें दिसतें. मग या गोस्टी सोडिल्या. पुसों लागले कीं, नारबा राज्यापासी कोण आहे? त्याचा कुन्हावंकर[१] राजियाजवळ कैसा आहे, मातबर आहे कीं असाच आहे? यांनीं उतर दिल्हे जे नारबा आपण पाहिला नाही. मातबर असता तर आमचे राजकारण मातबर होतें. अलबत मातबर असता तर कामांत आढळता. कोन्ही मुतसदी खानगी असेल. आम्ही देखिला आइकिला नाहीं. मग आपण शंभर वेळ म्हणते कीं तो मातबर आहे. गयासखांजी गेले होते तेहि साक्षी मातबरीची दिल्ही, त्यावरून स्वामीचे अत्र सोडून म्हणों लागले कीं नारबा बहुत मातबर आहे. आजी बाजीरायांस येक वेल तंबी करितों. सिदोजी निंबालकर व कंठाजी बांडे व उदाजी पवार व कानोजी भोसले यैसे पनास हजार स्वार समेत गायेकवाड होती, त्यांनींच शर्त केली, कीं बाजीराउजीस धरून देतों, अगर धुडावितों. फौज लुटून घेतों. यैशा पराक्रमाच्या गोस्टी बहुत त्याजपाशीं गोस्टी सांगितल्या. मग ते म्हणों लागलें कीं आम्ही बराये होत नबाब साहेबास विनंती केली. बेहतर जाणतील ते करतील. गयासखांजी बहुत फुगले आहेती. आटोलियाच्या तीन गढिया पाडिल्या, आनीक च्यार पाडनार, व घोरेवालियाच्या गढ्या जाफराबादेच्या ८ पाडनार. चर्चा आहे. तूर्त येक गढीस लागले आहेती. ते भांडते. घोरवोली, साकेगाव पा। देवलगांव, मुतवसलखान वगैरे अनीक फौज कुमक गेली आहे. पाहावे. भाडेल तर खुद गेलें तऱ्ही वीस रोज भांडेल. भिऊन पलेल तर उठोन जाईल. यैसें वर्तमान दरबारचे पाहोन आम्ही काही कोठे ललोपतो[२] करीत नाही. केलिया स्वामीचा बदनक्ष दिसोन येईल. स्वामी सर्वज्ञ याची पैरवी जे करणे ते स्वामी करनार समर्थ आहेती. मूल आनंदरायाने फिसाद मोठी उठविली आहे. हे विनंती.

¶*Ganesh Ballal reports to the Peshwa the dialogue of Nizam-ul-mulkh and Dipsingh.*

No. 67] [*29-10-1730*

छ ६ जमादिलावल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधान पंत स्वामीचे शेवेसी. विनंती उपर. सरकारची जोडी जासुद रा धोंडोपंताबराबर आली होती तिजबराबर दरबारचें वर्तमान

१ कुन्हावकर = कुर्रा व वक्र; वजन; दबाव. २ ललोपतो = बाबापुता, हांजीहांजी.

आनंदराऊ सुमंत आले त्यानी वलगना चितास आल्या तशा मूल स्वामींसी शत्रुत्व चालून राज्यास धका बैसावयाच्या बहुत कांही भेटीचे रोजी केल्या. त्याउपर मग गयासखांजी आलियावर यांसीहि येकप्रहरपर्येंत खिलवत रत्नाकरपंत व आपण करून, याजहाती मुल्यास साक्ष गुदरविली. त्यावरून मुल्यास सत्य भासोन मुख्य चिताचा खोटा, मायावी चित, इकडून उठोन दुसरियाकडे फिरले. तूर्त भरभर म्हणावी तर पहिले भेटी मात्र जाहली, त्याउपर आज गुरुवार ताा दाहा रोज जाहले, दुसरी भेटी सुंमताची नाही. सबब की हा मोगल काबुची, माणसाचा पारखी, याने आनंदरायाचे रदबदलीवरुन सर्वास वोलखिलें की काय ? आनंदराऊ ही मालाचे माल आनी राजा ही तसाच जे घडी घडी यास हरप्रकारें पाठवितो. तसमात श्रीपतराऊ पाहिले, आनंदराऊ पाहिले आनिकहि कितेक परस्परे आइकिले. मूल राज्यांत मुतसदी मातबर प्रामाणिक वचनाचा खरा अगर मनसुबियाचा कोन्ही बहुधा नाही. राज्य माहाराजा शाहूचे प्रागतने करुन चालत आहे. यैसें मनी कल्पना करून त्याचाहि अव्हेर, आज धोंडाजी आले याचाहि अव्हेर दिसतो. दुसरें कंठाजी बांडे व उदाजी पवार याचा व कानोजीचा भरवसा फार धरिला आहे, कीं भेटीस येताती. त्यावरून बहुतच गर्व जाहालासा दिसतो. यैसियासी वर्तमान आहे जे कंठाजी सात आठ हजार फौजेनसी कसारीचे धाटे येतो. यैसीयासी सहजेसहज स्वामीचेंहि श्री गंगा त्रिंबक यात्रेस येणे जाहले आहे. सहजेसहज चितास आलिया, कंठाजी लुटून घेतलिया मोठीसी दुशमनास पादरक्षा लागत आहे. याजवर चितास येईल तें करणार स्वामी समर्थ आहेती. बहुत काये लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*News-letter to the Peshwa describing the consummately crafty nature of the Nizam who skilfully induced several Maratha Sardars to desert Shahu's cause.*

No. 68] [*28-10-1730*

पो. छ ४ जमादीलौवल

मु॥ खोटे.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंती. स्थापित शेवक गणेश बल्लाल सा॥ नमस्कार विनंती उपर. येथील क्षेम ता॥ आस्विन बहुल १३ त्रयोदसी बुधवार धर्म स्वामीजीचा जाणोन निजानद लेखकास लेखनार्थ आज्ञा केली पाहिजे. यानंतरे स्वामीनी धोंडाजीस कितेक जाबसाल सांगोन पाठविले होते त्यास जे

समयी धोंडाजीस येथून बहुमान करून खर्चवेच देऊन मुख्याने स्वामीकडे पाठविले तो समये आनीक होता. हाली यांची नवली बदलली कीं आनंदराऊ सुमंत आले, यानी सांगितले जे श्रीमंत राजश्री बाजीरायासी वैरभांडन केलियास राजा सला बिगाडीत नाही. यैसी आनंदरायाने गलतनिशा बरी मुख्याची केली. त्यावरून व कंठाजी बांडे दाहा हजारानसी राजश्री चिमणाजीपंताचे मारफतीने भेटीस येताती व कानोजी भोसले येताती त्यामुले नवली बदल खादला आहे. मूल स्वामीसी विरुध दढतर करावेसें याचे मनी आहे. पुढे पहिल्यासारखें येक वेल येश घेतले तसे घेतील की काये श्री चे चिती आहे न कले: याची निशा जाहली आहे कीं रायास येंदा फौज बधत नाही, यैशे अडचणीत घ्यावें, यैसा विचार घाटला आहे. आम्हास न पुसत. आटोलियाच्या गढ्या तीन लुटल्या आनी मालमालियेत लुटिली, गाव मारिले. मूल हे कलह करायाविषयी दढतर खातर आहेती. विदित जाहले पाहिजे. स्वामीनी या गोस्टीची पैरवी मजबूत करावयाची ते केली पाहिजे. गाफील न राहिलें पाहिजे. वरकड कितेक वर्तमान श्रीमंत राजश्री रावजीचे पत्रावरून विदित होणार. दृष्टश्वप्नाने सावध जाहलें पाहिजे. आनंदरायाने निशा केली जे स्वामीसी बिगाड केलिया स्वामीचे समागमी कोन्ही राज्यातील कुतरेहि होणार नाही. त्यावरुन नाश श्रिष्टीचा आरभला दिसतो. विदित होये हे विज्ञप्ति.

¶*Ganesh Ballal informs the Peshwa of the change in the attitude of the Nizam towards him since the arrival of Anandrao Sumant at his court.*

No. 69] [*30-10-1730*

छ ६ जोवल.

श्री

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधानपंत स्वामीचे शेवेसी

विनंति उपर. आज शुक्रवारीं आटोलियाचा व सिदोजीचा व कंठाजीचा वगैरे मजकूर गयासखांजीस हटकिला. त्यास उत्तर दिल्हे जे. आटोळियाच्या गढिया पाडाव्या इतका मजकूर मात्र आम्ही शहरीं तुम्हांसी केला. परंतु खुदा गैबदानखानाची जुबानी खरी केली कीं नवाबांनीं तिकडे येऊन आम्हापूर्वीच गढिया पाडिताती, यैसा जाब दिल्हा. म्हणों लागले कीं आम्ही दाऊदखानाचे तगीरीं नवाब सुबेदारी करून आले होते, तेव्हां जाल्हनापुरी वगैरे जिलेदार ठेविले

होते. चौथ गनीमाई असतां एक दाम दिल्हा नाहीं. ठाणेबंदी करून मारीत होतो. आतांही हजार स्वार जाल्हनापुरी ठेऊन आटोळियास तंबी करून चौथाई कमावीसदार रास्ती कचेरींत घेईल तर देऊन. आम्ही उत्तर दिल्हें जे एक गाव पांगरी बावनीयाची पा जाल्हनापुर तेथें या वरसी अमिलानें चारसें रुपये दुबार वसूल घेतला. आम्हांस एक पैसाहि दिल्हा नाहीं. गुजस्ताची चौथ दिल्ही नाहीं. कचेरीत आमील रास्ती चौथ देतील तर काय पाहिजे! मग सेख काबिलास पुसों पाठविलें. त्यानें व जमीदारी व अब्रुतराय पेशकार यांनीं गोष्ट उडविली. मूळ याचे मनीं कपट पुरतें आहे. स्वामीजीसी वैर राखिताती. सिदोजी कंठाजीचा मजकूर केला तोही उडवाउडव केला. कंठाजी तर मोगलाईत येत नाहीं. आणि उदाजी कंठाजी जो कोन्ही येईल तो ठेऊन. सबब कीं तुम्ही करारास बेकरार जाहलेत जे, रंभाजीचा बिरादरीचा जमादार छीहजारी तीन हजारी मनसबदार तुम्हाकडे आला तसाच माधोराऊ पिंगळा आला, तसेच महिपतराऊ सिंदा ज्याचा आजा बाप मनसबदार व तो मनसबदार तुम्हाकडे तुम्ही घेऊन त्यास सरपाटीलकीची, नसती करारमदारांत गोष्टी नाहीं ते सनद करून देऊन मुल्क लुटवितां. श्रीपतराऊ आनंदराऊ कबूल करून गेले जे माधोराऊ वगैरेस पाठवितों. हमेज पाठविताती. आम्ही तसें न केलें. तुम्हां पासून अंतर पडलें. मग सुलतानजीनें लिहिलें जे सिदोजीराऊ तुम्ही मनसब गांव देत नाहीं तर तिकडे राहत नाहीं, गोसावी होतो. जरूर जाणोन लोनार, मेहकर व पुसद व पंचगव्हाण चार परगणे देऊन बोलाविला, तो पैठण अगर सेवगाव मागत होता, परंतु न दिल्हें. यैसा जाब दिल्हा. आनंदरायानें राज्याचा श्रम गमवायास मात्र नारबाचें पत्र घेऊन येऊन दोन गोष्टी भेटीचे रोजीं घालोन सल्याची बदनामी आपले सिरीं घेतली. यांस पाय ठेवावयास जागा जाहाली कीं आनंदरायानें म्हटलें जे, जसे पातशहाचें तुमचें सख्य तसें महाराजाचें व बाजीरायाचें सख्य. त्यावरून खरें बोलिला अगर खोटें, परंतु त्यास वैर करावयास भेद कळला. आतां आनंदरायासहि पुसत नाहीं. हालीं आतां मागती आणाप्रमाणा लटकियाच करितो. शास्वत नाहीं. परंतु अलियातागाईत आजवर पहिली भेटी मात्र जाहाली. त्याउपर भेटी नाहींत. राऊ सुमंत त्यांची हे गति, दुसरे राज्याचे मुसाहीब आम्हांस कोण पुसतो! भिवराऊ सुलतानजीचा आला आहे तो नित्य दरबारास जातो. विदित होय हे विज्ञप्ति.

¶*News-letter from Ganesh Ballal to Bajirao from Aurangabad, reporting how the Nizam began to evade payments and engagements contracted (in the treaty of Shevgaon, 1728). Anandrao Sumant came to visit him from Shahu, but the Nizam did not shew him proper attention.*

No. 70] [30-10-1730 ?

पो छ ७ जमादिलोवल.

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधानपंत स्वामीचे शेवेसी

विनती. उपर, सैदहसनखानाचा मेहुणा घसिटखान नामे कटकात आहे, तो भेटीस आला होता. त्याने कितेक वर्तमान सागितले की सैदहसनखान जागिरीत आहे, परतु बहुत बेदील, आनी साहेबुमन[1] म्हणजे सरदार घर वतनदार हमसरचा[2] जितके हमसरीये[3] तितके याचे दोन महिनियाचे चाकर सारखे आहेती. यास धनियासारखे मानिताती व जितके जमातदार नवाबाचे चाकर तितके पूर्वी याजपासीच चाकर होते. याची तसली दिलबरी शिपाही यास ठावकी आहे जे प्रमाणिक आहे. येकवचनी आहे. येसियासी त्यास धोडाजीने स्वामीचे पत्रहि आनिले आहे. त्यांस देऊन तो कमतर तऱ्ही हजार स्वारानसी उठोन स्वामीकडे आला म्हणजे याचेहि कटकात भरड पडेल. तो मोठासा साहेबु-मन आहे व अबदुलरहीमखान तापीतीरावर आले तेही रुसले आहेती व सैदजमालखानही फकीर होताती. यैवजखान व हामीदखान मेले. कितेक लोक बेदील. हेच म्हणतात जे याची बुध फिरली. मरण समीप आले. बाजीरायाचे हाते मरणार म्हणोन येसी वर्तनूक आरभिली आहे. मूळ आपले राज्यात याने फितूर करीतो, परंतु याजला याचे कटकातही श्रीने यास बुधि यैसी दिल्ही जे सहजेच फितूर याचा हाच करीतो. तसमात स्वामीजीचे पदरी वडिलाचे पुन्ये समर्थ व शाहू राजियाचे राज्यास जो कोन्ही अनिष्ट चिंतील त्यास यैसा भ्रम प्राप्त होतो. आनिकही वाहदखान वगैरे जमातदार नित्यानी येताती की अभयेपत्र प्रधानपंताचे आणवाल तर उठोन जाऊन. आटोलियाच्या गढिया पडल्या म्हणोन भये जाहाले. त्यास्तव हातीमाहाल व गावखानियाचे तोफांचे बैल वगैरेस आज्ञा, किमपि दूर न जाऊं देणे. इकडे पांच सात हजार फौज नाही, याकरिता मात्र हावभरी आहेती. पठाण तर अद्यापि कोन्ही ठिकानीहून चळन केले नाही. बहुधा स्वामीस महदयेश पूर्वीहून अधिकोतर हा देणार हे दिसोन येतें. गयासखान मोठा कपटी, प्रपंची. यास आपले राज्यातील आपलेच लोकाचे विद्यमाने भेद कळला. म्हणोन यास गरुर बहुत जाहला आहे. परंतु श्री सत्याकडे आहे हा भरवसा पूर्ण आहे. साराऊंष माहाराजाणी काये ते वर्तमान

---

१ मोठ्या मनाचा ? २ हमसर = ग्रामस्थ. ३ हे शब्द चांगलेसे लागत नाहीत.

चितास आलियासारखे अंबाजीपंताचे विदमाने पावऊन चाकरलोकाचा धरबंद, श्रीपतराऊ व नारबाचीं पत्रें घडीघडी येताती, यास फुसी देताती, तो करविला पाहिजे ; व दावलजी व फतेसिग स्वामीचे फौजेस शामील जाहालेसी याची बातमी आली म्हणजे काही चमत्कार दाखविलियाने याची त्रिधा होईल, येसे येथील कितेक म्हणताती. ते थोर लोक अवशकच आहेती. विदित होये हे विनती.

अभयपत्र येईल तैसे हसनखान व घासिटखान उभयेताचे नांवे पाठविले पाहिजे. हे विनती.

¶*News-letter from Aurangabad, written by Ganesh Ballal to the Peshwa, giving an account of the state of the Nizam's helpmates, and those of Bajirao also.*

No. 71] [*31-10-1730*

छ ६ जौवल आंबीघारगाव.

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंति. स्थापित शेवक गणेश बलाल सा। नमस्कार विनंती. उपर, येथील क्षेम ता। कार्तिक शुध १ शनवार प्रात:काल मु। लस्कर निजामलमुलक दर जागा मौजे मेढेगाव भायेगाव पा। साकरखेडले धर्म स्वामीचा जाणोन निजानंद लेखनास आज्ञा केली पाहिजे. यानंतरे स्वामीजीची आज्ञापत्रें शेवकास व धोंडाजीस व चिरंजीवित सदासिवपंतास [वरचेवर येत गेली] जे. निजामलमुलक कूच दरकूच जलदीने येताती. शहरास पावले असतील. तुम्हास जाऊन इतके दिवस जाहाले, कांहीं वर्तमान, काये मनसुबा, कोनीकडे जातो, हे सविस्तर वरचेवर लिहिणे म्हणोन आज्ञा. यैसियासी आलियाता। दोनतीन पत्रें वरचेवर संकलित जाहाले वर्तमान लिहीत गेलो. शेवेसी प्रविष्ट जाहाले असेल अगर होईल. बागजी तर वाटेत अजिंटियापासी मेला. दीपसिंग वगैरे आले होते ते वर्तमान लिहिलेच आहे. काल त्यास सात सिरपाव तीन तीन वस्त्रे देऊन बिदा केले. परंतु ते तापीतीरचा सुभा आबदुल रहीमखानाचे तगिरी[१] हफिजुदिनखान मेहुणा केला तो लस्करात आहे, त्याजबराबर हे जाणार म्हणोन सिदोपंती आज येऊन सांगितले व खरगोनचा खोजा महुनलीखान मकडाईकर फतेसिंग राजियाने मारिला म्हणोन गप होती. त्यास त्याची अर्जदास्त आली. तो मात्र जिवंत ; परंतु फौज मुन्हेचे[२] लोक मारले गेले खरेच.

---

१ तगिरी = बदली ; बडतर्फी.

२ मुना = मुकाबला. मुन्हेचे लोक=आघाडीचे लोक अर्थात मातबर लोक.

मीर महमदखान जमातदार स्वामी जाणताती तो मेला. विदित जाहले पाहिजे. दुसरें वर्तमान सैद जमालखान पहिले शहरास आले होते तेव्हा बदनाम होऊन कची मसल्हती केली होती. त्यामुळे नवाबानी त्यास तगीर करून शुजायेतखान बालापुरकर त्यास बालापूर वगैरेची आमिली बाहाल ठेऊन सुबेदारी वराडची दिल्ही व जागिरा सरकारच्या वराडातील याची दिवाणगिरी आमील तगीर बाहालीचा येखत्यार दिल्हा. कलावे म्हणोन लिहिले असे. कितेक मुसाहिब[1] व गयासखान व नवाब अद्यापि बिगाडाची गोस्ट मात्र तोंडातून काहाडीत नाहीत. परंतु तमाम कारभार व आमचे ठाई अनादर. स्वामीचे अगर माहाराजाचे जानबातोचे[2] आनंदराऊ व आम्ही आहोत, परंतु कोन्ही बोलाऊन गोस्टी पुसत नाही न कुच आणिक लोकांचे वकील येताती त्यांचा गौर. चंद्रसेन रुसला त्याची समजावीस होत आहे, परंतु समजत नाही. निदानी समजावीस होईल. स्वामीस कलावे म्हणोन लिाले असे. सारांउष याचें मनी पूर्ववत कपट खरेखुरे आहे. सावधतेने कर्तव्य ते करावे हे विनंति.

¶*News-letter from Ganesh Ballal to the Peshwa, giving him news of the treacherous plans of the Nizam with reference to Bajirao and Shahu.*

No. 72] [*1-11-1730*

पो. छ ७ जमादिलावल

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री प्रधानपंत स्वामीजीचे शेवेसी स्थापित शेवक गणेश बलाल साा नमस्कार विनंती. उपर, विनवावया प्रार्थना ऐसीजे. येथील क्षेम कार्तिक शुध २ रविवार मुाा मौजे मेढेगाव पाा साकरखेडले, धर्म स्वामीचा जाणोन निजानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर काल छ २९ शनवारी हुजूरचे जासुदाची जोडी आली होती त्याबराबर सविस्तर वर्तमान विनंतीपत्री शेवेसी लिहीलेच होते प्रविष्ट होईल. आज बारकाईने जो शोध जाहला तो तेथवर करून ज्या द्वारें वर्तमान कळले त्याने मायेने आण घालून सांगितलें. आजी तजवीज कर्तव्यतेचीहि पुसिल्याने सांगितली तेहि शेवकाचे मते चितास आली की मुख्यास ही गलतनिशा करणार लटकेच म्हणोन कलले. आजी दाभाडियावर दबाव होईल कीं, फतेसिंग व दावलजी सरलस्कर येक होऊन येताती. त्याहीवरी स्वामी सर्वज्ञ आहेती. परंतु सत्वर विवेक कर्तव्य तो करावा. दर्शविले कीं

---

१ मुसाहब – स्नेही. २ तर्फेचे.

येक स्वामीसीच बिगाड परंतु पैरवी राज्य बुडवायाचे फिकीरीत आहे. यास स्वामीचा ही उत्कर्ष नित्य दाहक जाहला आहे. येकदांच सला मोडिला तर मुलकाची ही खराबी आनी गनीमाई वाढेल म्हणोन जो प्रेत्न बनतो तो करुन पाहतो. आनंदरायानी भेटीचे रोजी पार्तंडे[1] वाचिलें व दुसरियाने गयासखाना जवली बकवाद केला. आता निसुर बैसला, परंतु गोस्टी उतम नाही. सत्वर माहाराजास व अब्रुतरायास ल्याहवयाचें ते लिहून तिन्ही फौजा स्वामी सरलस्कर व फतेसिंग येकत्र जाहल्यासें यास कलले. आजी आटोलियास व संताजी जाधव व पिलाजी जाधव यासी आज्ञा जाहली म्हणजे डोले उघडतील. आजी पत्रें यास ल्याहावी की तुंम्ही रास्ती चौथ देत नाहीत म्हणोन हे खटखट करीत असतील तर रास्ती चौथ देऊन कलह मोडने. मूळ माहाराज व आम्हीं सला तोडीत नाही यैसी पत्रें याचेसारखी कृत्रिमांची स्वामीनीहि ल्याहावी. जशासी तसें व्हावें तर पेशें[2] जातें. स्वामीस आम्ही विनंती काये ल्याहावी? मूळ कळले वर्तमान शेवेसी विदित करावें. अबदुल रहीमखान भेटले. आतां कोन्हीकडे जातील पाहावें. मागाहून लिहिले जाईल हे विनंती.

¶*News-letter from Ganesh Ballal to the Peshwa from the Nizam's camp near Sakarkhedle. The Nizam is reported to be planning a campaign against the Peshwa.*

[1-11-1730

पा छ ७ जमादिलोवल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधान पंताचे

शेवेसी

विनंती उपर. काल प्रात:काली कितेक वर्तमान येथाज्ञाने आढळले ते शेवेसी लिहून पाठविले. पावेल. आनि अभिप्राये कलोन योचैना[3] कर्तव्य ते करितील. आज छ ३० राखरी रविवारचे वर्तमान तर बहुत बारिकाईने परामृश करितां ज्यास स्वामीनी पत्र लिहिले होते तो व आनी येक व मुख्य यैसे त्रिवर्ग होते. येक महिनियाची गोस्ट आहे कीं नवाबाने उमाबाईची व कंठाजीची पत्रें आली तेव्हा या दोघासी विचार केला जे या प्रकारची पत्रे आली आहेत जे, कांही कवडी मागत नाहीत. फुकाचा आश्रये मात्र नवाबाचा असावा. म्हणजे प्रधान पंतास

---

१ पातंडे = पंचांग, रडगाणें ?

२ पेश – मालकास पोहोचते.

३ योजना.

आम्ही युध करून मोडून. जर त्यानी आम्हास मोडिले तर मग तुंम्ही जागिरा व मनसब द्यावी. आनी आम्ही मोडिले तर राजा शाहूचें राज्य बुडवितो कीं राजाच आम्हांस भांडवितो. राज्य बुडाल्यावर संभाजी राजियास रांजी स्थापून त्रिंबकराऊ सेनापती व कंटोजीस सरलस्कर द्यावे म्हणजे नवाबाचाही बोलबाला होत आहे ऐसे कितेक प्रकार बांडे व दाभाडियाची पत्रे गयासखानीचे विद्यमाने आली होती. त्यावरून दोघे मुसाहेबं[१] बोलाऊन नवाबाने विचार पुसिला. येकावर तर तूर्त इतराजी, परंतु मनसुबेबाज उतम व यैवजखानसारखा येकरंग सलुखी त्याचे नाव तुम्हीं ज्यास पत्र लिहिले तो हिकारपूर्वक व दुसरा अकारपूर्वक यासी पुसिले कीं यैसी पत्रें आली आपले कांही वेचत नाही. तुमचे विचारास कैसे येतें ? त्यास स्वामीचे मायेत आहे. त्याने उतर न दिल्हे: अकारपूर्वकाने म्हटले जें हा मजकूर पहिल्यासारखा संभाजीचे वेलेचाचसा दिसतो. सुलतानजीचा इतका भरवसा नवाबसाहेबांस होता जे वीस हजार फौज मेलऊन बाजीरायास मोडिल, परंतु कांहीच न जाहलें. तसेंच हेहि आहे. कठाजीचा तेव्हांही वकील आला होता. आखीर तिकडेच राहिला. याचा इतबार धरावासा नाही. मग नवाब सरसाऊन बसोन जाब दिल्हा कीं मजला संभाजीची सिरे[२]चोट लागली आहे की येक वेल राजी बैसवावे व शाहूस मोडावें. अनायासे मनसुबा फुकटफाकट आला आहे. घरांत कलह लागोन जो मोडिल तोच उणा जाहला. आपले काये गेले ? यैसे बोलिला. विदित होये हे विनंती.

¶*News-letter from Ganesh Ballal. Mentions the Nizam's intention to put down Shahu, install Sambhaji and appoint Trimbakrao Dabhade his Senapati.*

पा छ ७ जमादिलोवल

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधानपंत स्वामीचे शेवसी

विनती उपर. नवाबानी आर्नीक जाब दिल्हा जे 'बाजीरायानी कंठाजी वगैरेस मोडिले तरी उतमच आहे'. अकारपूर्वकाने जाब दिल्हा की त्यास आपला विचार बाजीरायास कळला कीं आपण दाभाडियाचे विचारात आहोत. त्यास मोडिलियावर राजपूत वगैरे फौज आणून बिगाड करतील तर कैसे ? उतर दिल्हे जे 'ते गरीबानी काये तरवार धरणे

१ सल्लागार.

२ त्वष्ट, भुणभुण, लकडा, तगादा.

आहे? व शाहू राजियांचेहि मनोगत आपणास चिमणाजीपंत, सुलतानजी निंबालकरानी व बोलतां बोलतां आनंदरायनी आम्हास सागितलें कीं बाजीरायासी काये, की तुम्ही सर्वासी बिगाड कराल, आनि येक राजामात्रांसी लटकाच सलूख ठेवाल, तऱ्ही राज्यास सलूक मान्ये. परंतु बिगाड करनार ही यैसी गलतनिशा याची पुरती जाहाली आहे. यानी विचार केला जे बिगाड तर करूं नये. चौथ तर रास्ती देऊ नये. हे गुजरात मालवियात जातातो तसे जाऊं द्यावे. हरकैसे[1] उणे करावे. विज्यापुरची चौथाई उडविली. भागानगर तसे घेतले. बिंदारची (सी)? ठाणी गनिमाची उठविली. तिकडे चौथाईचा सुरलित अमलच नव्हता. राहिले तीन सुबे. आम्ही इकडेहि आलो. दावलजीस व फतेसिगबावास इकडे येऊं देत नाही. टकापैका येक वरीस याचे हाती न लागला म्हणजे सहजच बुडतील' यैसे येसे मनसुबा गेयासखानाचे (व) नवाबाचे तूर्त आहेती. हे सला तोडितोसे मुखेकरून म्हणत नाही. राज्यासी सला तोडीत नाही. राजा असा आप्त, त्याचा आमचा स्नेह. बाजीरायाचा स्नेह. यैशा लौकिकीं गोष्टी सागतो, आनि स्वामीकडील धोंडाजी अगर आम्हासी रूख देत नाही[2]. सबब की दाभाडे बांडे याचे वकिलास कळेल कीं प्रधानपंताचे वकिलासी स्नेह करून बोलताती व सलाममुजरा होतो, यास्तव स्वामीकडील अगर राजियाकडील आनंदराऊ आले आहेती (त्यांस) निर्माल्यवत ठेविलें आहे. हे सदरहू वर्तमान सुमंतास विदित नाही. मूळ राज्य घरभेदियानी बुडवावेसें प्रकार यास सांगितले. हा मोठा मायावी. पाहोंयासी[3] दरबारी उगीच चर्चा करितो कीं राजे थोर व नारबा व चिंतामण व आनंद याचे आज्ञेत राजा आहे, असा प्रतिनिधप्रधानपंताचे (हि) नाही. येसे दर्शऊन राजा गाफील करून स्वामीसी समजोन मग राजियासी समजने किती? क्लेश नाहीत. हरकैसें संभाजीस राजीं स्थापावे. हे विनंती.

¶*News-letter from the Nizam's camp, communicating the Nizam's plans to put down Bajirao and put Sambhaji on the throne of the Marathas.*

पाा छ ७ जमादिलावल

श्रीशंकर.

पुरवनी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंती उपर. आम्ही हिकारपूर्वकास जो आपल्ये मायेत, ज्याने वर्तमान सदरहू निवेदिले, त्यास पुसिले की 'याचा उपाये काये करावा? हे कोण्ये गोस्टीने शरमिंदे होतील?' त्यानी

---

१ हरएक उपायानें, कसेंहि करून.

२ समोर बोलणें करीत नाहीं.

३ वरवर, लौकिकांत पहावयास गेलें तर.

उतर दिल्हे जे, ' सांगणारानी निशा केली कीं, बाजीरायासी कोन्ही मऱ्हाठी फौज राजियाची शामील होत नाही, म्हणोन निशा केली आहे व दावलजी व फतेसिंग यासी हे वराडात येऊं देत नाही. राजियाहातीच राजियाचे मुतसदी घाट घडोन ठेविला आनि नवाबास लिहिले आहे. यैसियासी शाहूराजियास राज्य राखने असेल व बाजीरायांसहि या गोस्टीचा अहंकार[१] असेल तर दावलजी व फतेसिंग रायाचे फौजेस शामील जाहाले म्हणजे नवाबाचे डोले उघडतील. व दाभाडे पहिल्यापासून राज्याचे पायासी शत्रुत्व चालवितातीं, येकनिष्ट नाहीत. सुलतानजी निंबालकर येकनिस्ट होते त्याचा इमान कळला (?) तसा दाभाडियाचाहि वळखावा. ऐसा जाणोजनमाचा (?) राज्याचा जाणता' यैसी तजवीज हिकारपूर्वकाने सांगितली. स्वामी उतम: देखतील ते करतील. मूळ हे सविस्तर वर्तमान माहाराजासहि विदित केले पाहिजे. बहुत विचार करणे लागेल. स्वामी सर्वज्ञ आहेती. पैरवी केली पाहिजे हे विनती.

¶*News-letter giving Bajirao an account of the plans and intrigues of Nizam-ul-mulk.*

No. 73] [*1-11-1730* ?

पो छ ७ जमादिलोवल

श्रीशंकर.

पुरवनी श्रीमंत राजश्री प्रधानपंत
स्वामीचे शेवेसी.

विनंती उपर. वासदेवपंत कानोजीचा वकील आनंदरायांनीं आम्हादेखतां बोलाऊन आणून बहुत चढउताराच्या गोष्टी नेसीहतशिक्षा[२] करून म्हणों लागले कीं, तुम्ही मोगलाईत याल तर खापर हातीं घेऊन भीक मागाल, ऐसें अधिक उणें बोलोन त्यास निरोतर केलें. त्यानें जाब दिल्हा जे, येक प्रधानपंतांस मात्र वचकतातीं. नाहींतर राजियासी कांहीं संवशैये[३] धरीत नाहीं. मग सुमंतांनीं धीराजी पत्रारास आपण घेऊन गेलों, यैसें केलें, तैसें केलें, ? (?) आमचा चमत्कार तुम्हांस कळला असेल, माहाराजापासून पुसोन आलों आहोंत. हस्ताक्षर पत्रहि घेऊन येत होतों. श्रीपतराऊहि बसले होते. जर तुम्हास आमचा इतबार असेल तर त्यांस पत्रें लिहिणें. परंतु कानोजीस इतबार येणार नाहीं. येसी रदबदली

---

१ अभिमान.

२ उपदेशाच्या व जरबेच्या गोष्टी सांगून, नरमगरम बोलून.

३ भीति, वचक.

वासदेवपंतासी केली जे, आम्ही दरम्यानें आलियावर प्रधानपंत अगर कोन्ही बोलों सकणार नाहीं. मग वासदेवपंतानें पत्र सुमंताचें घेऊन आपलेंहि लिहिणार. विदित होये. विशेष. चंद्रसेनाचा रुसवा अद्यापिवर निर्गमला नाहीं. फौज दोन हजार उतम आहे. रामाजी दगडोनें त्याचा दोरा आनिला आहे जे श्रीमंत राजेश्री बाजीराऊजी दस्तगिरी करून माहाराजास भेटऊन सेनापती देवितील तर उठोन येईल. आम्ही उतर दिल्हे जे त्याची शराबेची तार उतरलियावर जर खुरेखुरे चित्त वळत असेल तर काय चिंता! दाभाडे व बांडे गायकवाड इकडे येणार, राज्यांत बदलणार, त्यांचे ठाई यांसीं श्रीमंत पंतप्रधान स्थापितील. परंतु यांचा दृढनिश्चये असावा, त्यास गोष्टीगपा रामाजीपंताच्या प्रासिध आहेती. म्हणताती कीं प्रधानपंताचे दाश्यत्व करून राजी राखोन त्यांचाच होऊन राहील, व मोगलावर जे फत्ते पावेल तेही अनभवी कळो येईल. इकडील पाणियाचा गुण की मोगलाचें अन्न भक्षिल्याचा राहत नाहीं म्हणोन सांगत होते. मागाहून त्याची इच्छा असेल, आनि लागू होतील तर सविस्तर लिहून पाठऊन. विदित होये. आजताा आटोलियाच्या साद गढिया लुटून गाव पेठ वस्तभाव कुल लुटून गढिया पाडिल्या. विदित होये. तेही पाचशें निवडक जमा जाहाले आहेती. हातपाये हलवणार, परंतु आम्ही वरचेवर मना करितों. परंतु त्यांचें नुकसान बहुत जाहालें. त्यांचे मनी सला तोडितोंसें घालों नये. हात उचलून चौथाई सरदेशमुखी सरकारचे आमील चोरटे देतील ते घ्यावी. स्वार कमावीसदाराबराबर नसावे. असले तर लुटून घ्यावे, मनांत कपट (कीं) राज्य बुडवावें म्हणोन, यैसें परिछिन आहे. हे विनंती.

¶*Letter addressed to the Peshwa by Ganesh Ballal from Aurangabad. Kanhoji Bhosle, like Chandrasen Jadhao and Dabhade, was trying to desert the Maratha cause and join the Nizam. Bajirao is apparently trying to win back Chandrasen; while the Nizam seems to be trying to induce Dabhade, Bande and Gaikwad to desert the cause of Shahu.*

No. 74] [*4-11-1730*

छ ४ जो मु खोटे.

श्रीशंकर

पुरवनी श्रीमंत राजश्री राऊजी स्वमीचे शेवेसी

विनंती उपर. आज बुधवार त्रितीये प्रहरी वर्तमान आलें कीं तुकोजी गुजरासी व रघोजी भोसले व रानोजी भोसलियासी झुंज जाहाले. लडाई बरी जाहाली. तुकोजी गुजर रणात पडला. ठार जाहाला. रघोजी व रानोजीकडे जमाव फुटोन

तुकोजीचा आला. कानोजी भोसला माहोराकडे उठोन जुज जमियेतीने गेला म्हणोन वार्ता आहे व रानोजी रघूजीने नवाबाचे बैल सरकारचे बालापूर परगणियाचे येके दो गावात चरत होते ते गाव मारिले त्यामध्ये वळून नेले. शुजायेतखानाने लिहिले. परंतु सोडिले नाहीं. मग गयासखानाचा लेक दोन हजार फौजेनसी त्यावर धावला परंतु ते दूर निघोन गेले. चंद्रसेनाचा व नवाबाचा अद्यापिवर रुसवाच आहे. आज बाबूराय वकील चंद्रसेनाचा गयासखानानी बोलाविला आणि खिलवतात नेऊन हमवार करावयाचा मजकूर केला. समजावीस होईलसी दिसत्ये. येंदा दोन हजार स्वार पांढरे उतम जमाव बराबर आहे. विदित होये व परगणोपरगणे ठाणेबंदी अमीलाचे तैनाती स्वार करितातील. तूर्त सुबेदारी औरंगाबादेची हफीजुदिखान सादुलाखानाचा नातू त्याचे नावे शौहरत[१] आहे. मग कोण ठेरेल ते पाहावे व दीपसिंग वगैरे वकील शहरी आले ते थोरले नवाबाचे कटकात येऊन काल मुलाजमती केली. नवाबानी मेजमानी पाठविली. मेवा पाठविला. परभारे जात होते. येथें आलियाने बेवकरी[२] बाह्यात्कारे दिसोन आली की बदरका[३] घेऊन परभारे न गेले. मागती इकडे आले व सविस्तर वर्तमान जाबसालापूर्वी शेवेसी लिहिले आहे. बाह्यात्कारे तमाम लोक म्हणतात कीं बिगाड करील तर खिपत[४] खातील. मुखश्री दिसत नाही. आजी जाबसाल तर तैसा जाहाला. त्याहिवरी न कले. आटोले कुल किरकोली परगणाती जमा होऊन रानोजी व रघोजी भोसले याकडे गेले. .विदित होये हे विनंती. उपर कंठाजी बाडे येणार. कोन्ही म्हणेत की पांच हजार फौज आहे. कोन्ही म्हणताती दाहा हजार फौज आहे. परंतु येतो तहकीक म्हणोन नवाब धोंडोपंतास अगर आम्हास बोलाऊन काही पुसत नाही की त्यास कलले तर येणार नाहींत. यैसेहि कितेक लोक मजालेसी[५] म्हणताती. हेहि तजवीज त्याचीच असेल. मूल प्रगट तर सला मोडीत नाहींत. दबावनी मात्र दाखविताती यैसेहि बोलताती. बागजी अजेठी याचे सरायेपासी मेला मग दीपसिंग वगैरे इकडे आले. सिदोपंतहि आले विदित होये हे विनंती.

¶*A news-letter from north giving detailed news to Bajirao Peshwa. There was a fight between Tukoji Gujar, Raghoji and Ranoji Bhonsles, in which Tukoji Gujar lost his life and consequently Ranoji and Raghoji ravaged the Nawab's provinces. "Though Chandrasen and Nawab are still disaffected towards each other there are possibilities of a compromise as Gayaskhan has sent for Baburay, the Vakil of Chandrasen." Towards the end of the letter, the news regarding the movements of Dipsingh and Kanthaji Kadam is given.*

---

१ प्रसिद्धि, आवई, कीर्ति. भावार्थ औरंगाबादची सुभेदारी हफीजुद्दीखान यास मिळेल अशी जनवार्ता आहे. २ अप्रतिष्ठा.

३ Escort. ४ फजिती. ५ मुत्सदी, दरबारांत.

No. 75] [*9-12-1730*

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व

ता राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

अपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ताा छ ९ जमादिलाखर बुधवार मध्यरात्रपरियेंत कुशल आसो विशेष. दरबारीचे वर्तमान तरी, राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत यांचे पत्र छ १८ जमादिलोवल मुाा मुदाणे पाा आमलनेर येथून आले; ते छ मारी संध्याकाली प्रविष्ट जाले. त्यामध्ये मजकूर लिहिला होता; भावसिग ठोके यांणी दोन तीन वरषे खानदेस प्रांते व वरघाटे धामधूम करून मुलकास उपसर्ग बहुत दिल्हा; त्याचे पारपत्य जाले पाहिजे. आणि नागोजी पाटील मौजे मलगाऊ पाा निंबाईत याणे दाहा वीस वर्षे पुंडावे करून, उपसर्ग केला. त्यांस नतिजा देऊन, रयेतीचे बरे करावे याकारिता, नवाब निजामन मुलूक याणी उभयेतावर मोहीम करून, मौजे मुदाणे येथे मुकामास आले. त्यास मौजे मजकुरी ठाणेदार अंताजी रुद्र होता, त्याने ठाणे वोस करून पलोन गेला. त्यामुले गावास उपसर्ग लागला. वरकड ठाणियास उपसर्ग लागला नाहीं. इतकियामध्ये नवाबास वर्तमान आले की, राजश्री पंतप्रधान याणी भावसिग ठोकियांस चाकरीस ठेविले. पाा लोहनेर व खारी येथे अजम गयास-खान याचे ठाणे होते, त्यास गांव मारून, फौजदार धरून, तेथील कुली वस्तभाव घेतली. यैसी दोन्ही वर्तमाने विदित जालियावर, नवाब बहुत श्रमी होऊन बोलिले की, आमचा व माहाराजाचा स्नेह चालत आसतां, आमचा मुलूक मारावा, ठाणेदार धरावा, हे गोष्टी उचित की काये ? भावसिग ठोके याजवर आम्ही मसलत केली असतां, त्यास चाकरीस ठेवावे; हे गोष्टी उचित की काये ? यैसे जालियावर स्नेहाचे प्रयोजन आहे यैसे नाही. तुम्ही आम्हापासी राहावेसे नाही. यैसे किते भाषण केले. यैसे वर्तमान तपसिले राजश्री स्वामीस लेहून पाठविले. त्यावरून राजश्री स्वामीनी आपणांस पत्र तपासिले लेहून पाठविले आहे. त्याचा आर्थ चितांत आणून, भावसिंग ठोके यांस चाकरीस न ठेविता त्यास निरोप दिल्हा पाहिजे. काा लोहानर व खारी येथील फौजदार यास सोडून, देखील वस्तभाव घेतली आसेल ते माघारी देऊन, त्याचे कबज घेऊन पाठविले पाहिजे. स्वामीनी किरकोल उपसर्ग करावे, नित्य नालीश दरबारांस यावी, हे गोष्टी स्वामीचा पदायोग्य नाही. कौली मुलूक मारावा आणि दुतर्फा नालीश पदरी घ्यावी, हे गोष्टी उतम नाही. नवाबाचा मुकाम मुदाणियावर आणि स्वामीचा

मुकाम लाबकानीवर जाला आहे. जवल करून राहावे यैसा विचार नाही. नवाब खानदेश प्रांते आले आहेत. ते कुली ठाणी उठवितील; तऱ्ही तुम्ही ते गोष्टीमध्ये मन घालावे यैसे नाही. आणि त्याच्या श्नेहास अंतर करावे यैसे नाही. यैसी आज्ञा राजश्री स्वामीनी केली; म्हणून स्वामीस लिहिले आसे. तरी स्वामीनी कोण्हाचा विस्वास न धरावा. बहुत खबरदार राहून, लाब जाऊन, लस्कर ताजे करून, कर्ज फिटे तो उपाये करावा. नवाबाजवल राहून कलह वाढवावा यांत उतम गोष्टी नाही. तरी स्वामीनी लाब गेले पाहिजे. राजश्री नारबावा मंत्री तलेगावास गेले होते, ते आजी सध्याकाली आले. राजश्री कृष्णाजी दाभाडे फौजसहवर्तमान हुजूर आले. राजश्री त्र्यबकराऊ दाभाडे सेनापती व उमाबाई तलेगावी आहेत. त्याचा बेत आहे की, आपलिया सरजामांत जाऊन आंमल बसवावा. स्वामीस वर्तमान कलावे याकरिता लिहिले आसे. सारांश गोष्ट की राजश्री स्वामीनी आज्ञापत्र लिहिले आणि शफतपूर्वक स्वमुखे आज्ञा केली. तेंच वचन लिहिले आसे की, भावसिग स्वामीजवल आला त्यांस दोन विडे देऊन निरोप द्यावा. चाकरीस न ठेवावा. नवाब निजामनमुलूक याची मरजी राखावी याकरितां भावसिग ठोके यास निरोप द्यावा. का॥ लोहनर व खारी येथील फौजदार सोडून द्यावा; त्याची वस्तभावदेखील सोडून द्यावी. नवाबासी कलह करू नये. यैसी आज्ञा केली आहे. आणि शफतपूर्वक पत्र लिहिणे म्हणून आज्ञा केली आहे. तर स्वामीस शफत कैलासवासी राजश्री नाना स्वामीच्या पायाची शफत आसे की, भावसिग ठोकियास निरोप द्यावा. हे गोष्टी स्वामीनी केली म्हणिजे, राजश्री स्वामी बहुत सतोषी होतील. स्वामी भावसिग ठोकियांस निरोप देणार नाहीत तेव्हा निजामनमुलूक सख्यास आंतर करीत आहेत. तेव्हा राज्याचे आपेश स्वामीकडे येते. स्वामी राज्याचे प्रधान आहेत. राज्यभारांस उतम दिसेल तो विचार स्वामीनी केला पाहिजे. येविसी राजश्री नारबावा मंत्री याणीहि स्वामीस पत्र लिहिले असे. आमची वोढ फार जाली आहे. तरी स्वामीनी पैका पाठविला पाहिजे. सारांश भावसिग ठोके यास चाकरीस ठेविले न पाहिजे. नवाबासी कलह केला न पाहिजे. स्वामीनी लांब गेले पाहिजे. तीर्थरूप राजश्री तात्या तलेगावीहून पुणियास आले. तेथून सासवडास गेले आहेत. सत्वरच येथे येतील. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo Purandare writes to Bajirao and Chimaji Appa: King Shahu's orders to dismiss Bhansingh Toke from service and not to offend Nizam-ul-mulk. The letter vividly describes Shahu's method of dealing with the Nizam.*

No. 76] [1730?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती येसीजे. येथील राजकी वृत तर नवाब येथेच आहेत. फौजाची तयारी होत आहे. रा रंभाजी बाजी खानदेशांत रवाना जाहाले व जमीलबेगखां वराडांत खंडागलेयाचे कुमकेस रवाना जाहाले. उतरेकडील फौजा मालवियांत येतात ते वृत मुफसल पेसजी राजश्री बाबूरावजी यांचे सेवेसी लिहिलेच आहे. सेवेसी निवेदन जाहालेच असेल. आलीकडे नवलविशेष लिहावेसे नाही. गोविंद सिधेस्वर खानदेशातून आजउद्या येथे दाखल होणार. त्याजकडील च्यार माहाल आमिली नवाबानी दूर करून हजरून अमिल नवे केले; याउपर ते आलियावर पाहावे, काये ठहरेल. बहुत करून पदोच्युत होतीलसे आहे. जे आमलांत येईल ते खरे. रा चिमणाजी दामोदर येथे आले आहेत. रा उदाजी पवार याचे पुत्र गोविंदराऊ तिकडून रुसवा करून नवाबापासीं चाकरीचे उमेदीने आले आहेत; त्यास नवाबाने काही मनसबा देऊन आपणाकडे ठेवावेसे जाहाले होते. त्यास रा सुमंत यांस रा उदाजी पवार याणी लिहिले त्यावरून नवाबास अर्ज केला कीं माहाराज राजश्री स्वामीचा आपला करार काये आहे आणि तिकडील कोणी रुसवा करून आलियास साहेब चाकर ठेवितील तर करार कोठे राहिला? त्यावरून प्रस्तुत त्याचा मनसबेचा डौल राहिला आहे; पुढे पाहावे गोविंदराऊ जातील अगर ठहरतील; निवडलियावर सेवेसी लिहिले जाईल. भावसिंग टोके याचे पुत्र येथे आले. त्यास नवाबानी तूर्त पाच हजार रुपये मदतखर्च देऊन दोन हजार स्वार ठेवायाची आज्ञा केली आहे; त्यापैकी काही स्वार जमा करून सरकारांत दागतसिये[१] जाहाले आहेत. स्वारास शेरा[२] पंधरापासून तीसपर्यंत देतात. विदित जाले पाहिजे. रा सुमंत गोलटगावचे यात्रेस कालीच येथून गेले आहेत. दोचौ रोजी येतील. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*This is a news-letter from the Nizam's court, giving news about Jamilbegkha, Khandagale, Govind Sidheshwar, etc. Govindrao, son of Udaji Powar, had approached the Nizam with an intention of serving him; but the proposals of his service had to be set aside owing to the fact that Sumant at Udaji's instance wrote to the Nizam that it was against the terms of the treaty with King Shahu.*

---

१ घोड्यांच्या व स्वारांच्या निशाण्यांची नोंद, खुणेचे डागसुद्धां. २ पगाराचा दर.

No. 77] [1730?

श्रीशंकर.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. नवाब निजामनमुलुक याजपासी कृष्णाजी सुंदर ठेविले आहेती (त्यास) हि लिहिले आहे व नवाबासहि उतरेकडून लिहिले आले आहे की तुम्हाकडील चालणा हुजूर होत आहे व उतरेकडून सरबुलंदखान येत होते त फिरोन दिलीस गेले. वरकड फौज याजवर यावी यैसी कोण आहे. येणार तऱ्ही दोनी वरसे पाहिजेत. आली तऱ्ही काही यापुढे कोण्ही टिकतो यैसे नाही. तुम्हाकडेहि लिहिले येत असेल ते लिहित गेले पाहिजे. कृष्णाजी सुदर याचे पत्र आले आहे तेच बजिनस पाठविले आहे त्यावरून कलो येईल. +बहुत काये लिहिणे कृपा निरतर केली पाहिजे हे विा.

¶*The last line suggests the handwriting of Anandrao Sumant who writes from the Nizam's Court to Bajirao giving news about the return of Sarbulandkhan back to Delhi. Krishnaji Sundar is said to be posted with the Nizam.*

No. 78] [27-5-1731?

पाा छ १४ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाबानें पत्रार्थ श्रवण केलियावर आज्ञा केली कीं तुम्हीं आम्हासमागमें लस्करास येणें. सेवक बोलिलो कीं "राजश्री बगाजीपंत लस्करांत आहेत. ते वकील मुतलक आहेत." यावर नवाब बोलिले कीं "ते आहेतच; परंतु तुमचें प्रयोजन जरूर आहे. आमचे तर्फेचा जाबसाल तुमचे तर्फेने होईल. आम्ही रावजीस जे ल्याहावयास सांगोन तें लिहित जाणें. आम्हाजवल मजकूर बोलावयाचा असेल तो रावजीनें तुम्हांसच ल्याहावा. तुम्हीं जाहीर करावात. बगाजीपंतास न ल्याहावा, याप्रों तुम्ही रावजीस लेहून पाठवणें व आम्हींहि रावजीस खत लेहवितों कीं कितेक मजकुर रघुनाथ पंडित येही जाहीर केले. त्याचे जाबसाल त्यांस सांगितले आहेत. त्याचे लिहिलेयाजवरून मालुम होतील.

+ येथून अक्षर वेगळें.

आम्हीं रघुनाथ पंडितास समागमे लस्करास नेले इतके लिहितां," म्हणोन बोलोन सदरहुप्रो खत तयार करावयास मुनसीस आज्ञा केली; आण नवाब बोलिले कीं समागमें येणें. सेवकाने तसेंच बराबर जावें तर बेसरंजाम. पाल पडताल केवल नाही; उघडेयावर राहतां स्वामीचे लौकिकास युक्त दिसत नाही. याजकरितां नवाबास अर्ज केला कीं "आपण बेसरंजाम आलों आहे. आज्ञा होईल तर शहरास जाऊन सरंजामनसीं येऊन पोहचतों." नवाबाने आज्ञा केली कीं "उतम. शहरास जाऊन सरजामानसीं जलद लस्कारास येणें." इतका मजकूर जाला. छ १ जिल्हेजी गुरुवासरीं प्रातःकाली नवाबानें सेवकास शहरीं यावयास रुसकत केलें. काजी करिमुदीनखान व कोतवाल यैसे चितेपिंपलगावचे मुकामींहून नवाबानें शहरास रुसकत केले. कमालदीहुसेनखान दिवाण व अबदुलदईखान करोडा व मीर गदाई अदालतचा दरोगा व मजलिसराय व रतनाकर सोनदेव वगैरे छ १ जिल्हेजी प्रातःकालीं शहरास जावयास रुसकत करून नवाब स्वार होऊन शाहागडावर गेले. नवाब आसफज्याहा धारूरावर आहेत. शहराचा तालुका नवाबानें प्रस्तुत कमालदिहुसेनखानास रुसकत करिते समई सोंपिला. सेवक छ २ जिल्हेजी संध्याकालीं शहरदाखल जालों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A news-letter from Raghunathpant: gives news to the Peshwa from the Nizam's court stating that the Nizam had full confidence in the writer and not in Bagajipant. The movements of some Sardars and the Nizam himself are given in the end.*

No. 79] [*25-8-1733*

छ ११ रालाखर

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीच्या कृपावलोकनेकरून ता। श्रावण वद्य द्वादसी मंदवार सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. आज्ञापत्र सादर जाले; सेवकास पावले. आज्ञेप्रमाणे भला मनुष्य देखील आविलंबे सेवेसी येतो. नवाबास फार बरे वाटत नाही; त्यासी गुरुवारी आबदुलाखान अंदर गेले होते. विनंती केली की आज्ञेप्रमाणे भारभरदारी आणिली आहे. येथे चारा नाही; अवकास असेल तर माघारे पाठऊ म्हणतात. आज्ञा जाली की सनवारी बोलाऊन आणू; रूकसत करू. बोलायासी च्यार घटका पाहिजेत याकरिता दिस लागले. जमाबकसखानास तातकाल रुकसत केले. आजी बोलावितील आणि जाऊन

रुकसत होऊन आवलंबे सेवेसी येतो. मरजीप्रमाणे करून येतो. इलाज काये (?) शर (?) त्याचे नीट नाही. स्रमी वेथेने आहेत. नजला ? आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter gives news about the Nizam's Court, a slight indisposition of the Nizam, etc.*

No. 80] [*About 1733-1734*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बजाजी आठोळे सेनाबाराहजारी दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. आमचें वर्तमान पूर्वी पत्रें पाठविलीं होतीं त्यांचें उत्तर आलें कीं 'तुम्ही फौजबंदी होणें' कितेक विचार आहे म्हणून राजश्री सुलतानजीराऊ निंबाळकर सरलस्कर यांजवळ राहाणें' त्याजवरून राहिलों. इकडील वर्तमान परस्परें विदित जालें असेल. तांब्र तों संनिध धारूरानजीक छावणीस आहे. काय मनसुबा कोणे वेळेस काय विचार करील हें कळत नाहीं. आपण तरी पूर्वीपासोन स्वामीसेवक येकनिष्ट आहों. कदापि सेवेसी स्वामीकार्यास अंतर पडणार नाहीं. विशेष काय लिहिणे ? कृपा असों दिल्ही पाहिजे हें विनंती.

¶*Bajaji Atole to the Peshwa, saying that in pursuance to his orders he has been staying with Sultanji Nimbalker and that the Nizam is encamping at Dharur.*

No. 81] [*1729 ?*

श्रीकृष्ण[१]

राजमान्या विराजित राजश्री अंबाजीपंत यांसी

प्रति नारायेण दीक्षित कृतानेक आसीरवाद उपरी. येथील कुशल ताा छ १७ माहे शवाल मुाा मौजे कायेगाऊ जाणोन स्वकीये लिहिणे. यानंतर

१ हीं ठराविक बालबोध अक्षरें दीक्षितांच्या हातचीं समजलीं जातात.

राजश्री पिलाजी जाधवराऊ यांचें पत्र आम्हास आले त्याची नकल बजिनस पाठविली आहे त्यावरून वर्तमान राजश्री बाजीराऊ प्रधान यांचे कलेल. मुख्य गोस्ट जे आम्ही आशीरवाद दिल्हा होता की येमुनातीरपावेतों अमल जाल. या उपरी राजश्री श्रीपतराऊ रंभाजी निंबालकर यास दोन हजार फौज मोगलाची बार घेऊन भागानगरच्या कामाबदल राजश्री छत्रपतिचे सेवेसी येतात, त्यास परीछिन क्रुत्रिम बुधीने येतात यांत संदेह नाही. पहिले गयासखान राा बाजीराऊ प्रधान यांजबराबर आले ते दोनशे स्वारासी गेले होते, आतां दोन हजार फौजेचे प्रयोजन काये? तेथे फौजाहि नाहीत. या उपरी श्रीपतराऊ याणी येकांती विचार अहंकारपुरस्कर केला आहे की, 'जर भागानगरचे न बनले तर मी कुल सेनेसहवर्तमान नवाबापासीं येईन हे तत्वता आहे.' तर मजला हें पत्र लिहावयास कारण कीं जंवर हे तेथे येत तंवर मुख्य तुमचे वचनांत असिले तर येकांती च्यार गोस्टी उमजून सांगोन यैसे करणे (कीं) गडाखाले माहाराजाही न यावे आणि रंभाजी निंबालकर यांस कृष्णातीराअलीकडे येऊ न द्यावे की आज-पावेतो श्वराज्याचे गाव मारून लुटून नेत होता. देखत[१] देखत मुदई[२]. बमये फौज श्रीपतराऊ घेऊन येतात हे बरी ध्यानांत गोस्ट आणून दूरवर विचारून लिाा प्राा कृष्णातीराआलीकडे येऊ न द्यावे. जर चितास येईल तर राजश्री चिमाजीआपास बमेयफौज हजूर बोलावणे. आम्ही मायेने जे खरेंखुरें वर्तमान आयकिलें ते लिहिले आहे. या गोस्टीस चुकाल तर माझी शफत असे. मुख्य गोस्ट राज्याचे अभिस्ट आहोरात्र चिंतितो, त्यास वेलेस सूचना करणे आगत्य होती. आजपावेतो जे बतीसी माझी बोलते ते कधींहि अनृत जाली नाही. आतांहि निकड जाणून लिाा आहे. तर शापतपूर्वक रंभाजी निंबालकराचे दर्शण माहाराजाही न घ्यावे. जर भागानगर बुडाले तर बुडो, परंतु हे पत्र ईस्वराचे आज्ञेने लिहिले आहे. तर तुम्ही वाचून फाडून टाकणे व राजेश्री तुमचे अधीन असिले तर त्यांस वाचून दाखवणे. नाहीतर तुम्ही वाचून तेच घडीस फाडून टाकणे. बहुत काय लिहिणे असीरवाद. राजश्री नानाप्रति अनेक असीरवाद.

¶Narayan Dixit to Ambajipant Purandare informing him of the treacherous intentions of Shripatrao and Rambhaji Nimbalkar in marching on Satara though they avowedly come for the settlement of the Bhaganagar affair. The writer further asks the addressee to caution the King, and not to allow the Nimbalkar beyond the Kistna, and to summon, if necessary, Chimaji Appa with his forces for the occasion.

---

१ उघड उघड. २ दावेदार.

No. 82] [23-4-1734 ?

श्री

राजश्री बाजीराऊ प्रधान गोसावी यासी.

-॥९

सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो चंद्रशेन जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल वैशाख सुध प्रतिपदा जाणऊन स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. स्मरण करून वार्तिकासमागमे पत्रे पाठविली ते प्रविष्ट होऊन परम आनंद जाला. यैसेच निरतर पत्र पाठऊन, स्नेहाभि-वृधी करीत गेले पाहिजे. यानतर पैकियाचा मजकूर लिा तरी, राजश्री शा* याने नवाब साहेबाची मुलाजमत केला. राजश्री आनंदरायास[1] नवाबसाहेबी आज्ञा केली, पचमहालची चौथाई चव्हाणास देणे. त्याणी आपणास सांगितले की, चव्हाणास चौथाई देणे, नूतन राजपत्रे त्याणी आणिली, त्यावरून चौथाईचा यैवज त्याजकडे दिधला. नवाब कनोला गेले. कनोलकरापासून पंधरा लाख रुा घेतले. कडपेकराचे वकील आले होते. त्याणी बावीस लाख रुा कबूल केले. आरकाटकराचे वकील आले आहेत. त्याचेहि मोकरर होणे आहे. वरकड वर्तमान येथास्थित आसे. बहुत काये लिहिणे. हे+ वीनंती.

¶*Chandrasen Jadhav to Bajirao, giving details of his financial position and the movements of the Nizam.*

No. 83] [पो॥ *16-11-1734*

छ ३० जाखर

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी

यासी

९ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो संताजी जाधव दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. तुम्हास नवाब किलिजखान याजकडे भेटीस जावयाची राजश्री स्वामीनी आज्ञा केली आहे. आम्हासहि तुम्हाबाा यावयाचा हुकूम जाहला आहे. आम्हीहि

---

१ सुमंत. + हे दोन शब्द बालबोधींत खुद्द चंद्रसेनाचे आहेत.

मजल दरमजल येतों. तुम्ही येक दोन दिव(स) आमची वाट पाहणें. आम्ही आपली तयारी करून येतों. येविसीचे उतर सत्वर पाठऊन देणें. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Santaji Jadhao is ordered to accompany Bajirao in the latter's visit to the Nizam.*

No. 84] [*1734?*

श्री

तीर्थरूप रजश्री आपा
साहेबाचे सेवेसी.

चरणरज रेनुरायें चरनांबुजावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. काल बुधवारीं येथील अध्येपत्याचे वकिलाचीं पत्रें मोठे नवाबाचे लशकरींतून आलीं त्यांत लिहिलें होतें कीं "करनाटकचे कुल पठान दाहा बारा हजार स्वार येऊन भेटले व उदाजी चव्हान तीचौं हजार स्वारानसी येऊन भेटला. येक हती व पांच घोडे व मोत्याचा तुरा यैसा उदाजीस दिधला. बीस हजारी बमये बिरादरी केलें, जागीर दिल्ही. बिदनुराकडे जात होते ते मावकुफ करून बमये पठान वगैरे कृस्णातीराने तिकडे येतात" यैसें लिहिलें होतें व "येथील अध्येपत्याचा जावई त्या समागमे होता त्यास धारवाड विज्यापूर प्रांतीं किला होता तेथील किलेदारी दिधली म्हणोन लिहिलें होतें" त्याजवरून हे बहुत खुशवख्त आहेत. यैसियास साहेबी अपनास व माधोरावजीस ज्या कार्यासाठीं पाठविलें त्यास अवघें वर्तमान राजश्री नरसीपती व आपन मुख्यास व दखनीमियास व गुलाम हुसेन पीरजादे यांस म्हनतिलें बहुत कांहीं बोलीचाली केली. त्यास त्यांचें वचन हेंच कीं "आधी मोठे नवाबाची नजर व पेशकस व आपले दीस्ट यैसी विले लावनें. मग मोठे नवाबास लिहूं आनि तुमचें कार्य करून देऊं." विनाद्रव्ये कांहीं होत नाहीं. आनि आशाही मोठी त्यास. आपन जेथवर साहेबाचे तरफेनें ज्या रीतीने यांजवर दबाव पडे आनि कार्यावर येत यैसें म्हनतिलें. परंतु त्याचे येकच उतर. आतां तरी कालपासून नवाबाचे आगमनाचें वर्तमान आयेकोन हें कार्य त्यांचे चित्तीं करून देयाचें यैसें नाहीं. आतां खालीं बयेसून काये करनें?

नरसीपतही बेजार जाले. नरसीपती बहुत जोर मारला परंतु न आयेके. त्यास आज तिसरा प्रहरा नरसीपत व माधोरावजी व आपन जाऊन रुकसत घेऊन स्वार होऊन येऊ व नरसीपत चासैस राजश्री कृष्णरावजीचे पुत्राचे व्रतबंधासाठीं जातील; विदित जालें पाहिजे व माधोरावजीस च्यार लंघनें जालीं. आतां पथ्यें घेतलीं परंतु घोडीवर बसावयाची ताकत नाहीं. नरसीपंताची पालखी मागून घेऊन स्वार होऊन येऊ. विदित जालें पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Renurai, a newswriter, reports to Chimaji Appa the activities of the Nizam in his southern tour. Udaji Chavan and several others are described as having joined the Nizam.*

No. 85] [*1734?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सवेसी

विनंती उपरी. तीर्थरूप राजश्री राऊ याची नवाब निजामनमुलुक याची भेटी जाली. पत्रे तेथून आली ते वर्तमान राजश्री आबाजीपंत तात्या यानी श्री परमहंश यास सांगितले. त्यावरून बहुत समाधान जाले. पत्र अक्षरशाह वाचून पाहून आपणाजवल ठेविले, आणि पांच भांडी मारिली. नोबत वाजविली. शर्करा वाटिली. बहुत उछाह केला. स्वामीस वर्तमान कलावे याकरिता लिहिले असे. मौजे अनेवाडी हा गाव श्रीपरमहंसबावास आहे. तेथील सीव मौजे निंब ये * (पुढील काही भाग गहाळ झाला आहे.) * विदित जाले. राजश्री स्वामीनी कोथले देत नाही म्हणून उतर दिल्हे. राजश्री तात्यानी सांगितले कीं बेलसर राजश्री पंतप्रधान याचा खासगत गाव आहे. त्यावर गांवाची निकड ह्या जाली तेव्हा राजश्री तात्यानी मौजे पिसररे ता। कऱ्हे-पठार हा गांव घेणे म्हणून सांगितले. त्यास गोसावीबावापासी सांगणार बहुत-जण. त्याच्या चितास गाव न ये; तेव्हा गोष्टी तसीच राहिली. राजश्री स्वामी सातारियास गेले. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Nanasaheb to Chimaji Appa, communicating the visit of Bajirao and Nizam. On the success of the visit Paramhansa Baba held grand rejoicings. When can this visit have taken place?*

No. 86] [29-3-1735 ?

श्रीमलारीमार्तंडभैरवाय नमा

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

आज्ञाधारक नरसो कुसाजी साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील कुशल चैत्र बहुल २ जाणोन स्वकीये स्वानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे. आज्ञापत्र राजश्री रेणूरावजीबराबर पाठविलें पावलें. येजमानास राजश्री माधवरावजीस भेटविलें. त्यानीं उतर दिल्हें कीं मातबर कारभारी येथे आलियावर त्यांसी बोली करणे ते करून. स्वामीनी वस्त्रें नवाबसाईबांस पाटविलीं त्ये त्यास प्रविष्ट केली. बहुत खुशवखत जाले. वस्त्रें उतम होती. दखनामियांसहि वस्त्रें पाटविलीं होतीं, त्येंहि त्यास प्रविष्ट केलीं. उभयेताची उतरें सेवेसी पाटविलीं आहेत. सविस्तर वर्तमान राजश्री रेणूरावजी व माधवराऊजी सेवेसी निवेदन करतील. विशेष काय लिहा विज्ञापना.

¶*Narso Kusaji reports to Chimaji an account of his mission to Nawab Abdul Ajijkhan.*

No. 87] [23-4-1735 ?

श्रीमलारीमार्तंडभैरवाय नमा

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी. आज्ञाधारक नरसो कुसाजी सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल वैशाख शुध १२ बुधवार प्राथ:काल जाणऊन स्वकीयेस्वानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. नवाब अबदुल आजीजखान बाहादर यानी तीन च्यार पत्रे जुनरास पाठविली कीं आवरंगाबादेस सत्वर येणे. त्यास त्याचे आज्ञेप्रमाणे चैत्र शुध १ स्वार जालो ते श्रीरामनवमीचे दिवसीं अवरंगाबादेस पावलो. अवरंगाबादेस जातों येसे स्वामीचे सेवेसी पत्र लेहोन पाठविले होते त्यें पावलें असेल. त्यास अवरंगाबादेस आलियावरी तेथेच कितेक दिवस होतो. तेथून नवाबसाहेबीं श्रीमंत राजश्री राऊ स्वामीकडे पाठविले. त्यास वैशाख शुध ९ बुधवारी श्रीमंत स्वामीचे दर्शन जाले. पत्रे येजमानाची होती ते दिल्ही. त्यांस अवरंगाबादेहून दखनामियास बोलाविले आहे. जरी ते आले तर परस्परे स्नेहाची अभिवृधी होईल. अगर ते न येत तरी श्रीमंत स्वामीची आज्ञा घेऊन अवरंगाबादेस जाऊन. स्वामीकडील बहुत दिवसा वर्तमान कलों

आले नाही. कृपा करून उतर श्रीमंत स्वामी यांस डांकेबराबर बऱ्हानपुरास पाठविले पाहिजे कीं सेवकाचे समाधान होईल. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. विज्ञापना.

¶*Narso Kusaji, Peshwa's agent, writes to Chimaji saying that he met Abdul Ajijkhan at Aurangabad.*

No. 88] [*1-10-1735*

पाा छ २८ जाालोवल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. छ २४ जमादिलवलीं बुधवारी नवाबाच्या लस्करांतून बातमी आली त्याजबराबर सकराजी दतात्रये याचे पत्र सुमंतास आलें त्याची नकल करून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. बातमीच्या जासुदाबरोबर पत्र आलें तें वाचून दाखविलें. राजश्री बोलिले की " नवाब धारूरास येतो, तर तो दरसाल आपल्या वळणातच फिरतात व माहुलीचा मजकूर तरी नवाबानी आपली फौज द्यावी. आम्हींहि राजश्री प्रधानपंतास सांगोन पाचसें राऊत व येक शाहाणें माणूस सरदार देऊं यैसें बोलिले; व आम्हांस आज्ञा केली कीं तुम्ही राजश्री प्रधानपंतास लेहून सदरहूप्रमाणें फौज व सरदार देणे " त्यावरून हें पत्र लिहिलें असे. स्वामीकडे वर्तमान आले असेल तें ल्याहावें. विदित जाहलें पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao reporting the Nizam's move towards Dharur and negotiations about the fort of Mahuli.*

No. 89] [*16-10-1735*

पाा १० जमादिलाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवसी

विनंती. स्वामीनी पत्रें पाठविलीं तेथें लिहिलें कीं सविस्तर वर्तमान लिहिणें. यैसियासी राजश्री प्रतिनिधी मनसबा करितात कीं माहुली किला राजश्री

पंतप्रधान याणी घेतला हे गोष्टी कांहीं त्यास जिरों द्यावी यैसें नाहीं यास्तव नवाबास पेडगांवपर्यंत आणावें; दबाव बरा द्यावा; राजश्रीस भये दर्शऊन खामखा किला देवावा; येविसीं राजश्री सुमंतासी बहुता प्रकारें अपल्या कुटांत मेळवितात. कितेक अशाही दाखवितात. हे प्र(सं)गोचित त्याच्या मनोदयानरूप उत्तर प्रत्योत्तर करितात. साराउष, कुचितास कोणी चुकत नाहींत व सुमंताचा विश्वास नाहीं. येविसीचें वृत्त पहिले राजश्री बाबूराऊ याजबरोबर सांगोन पाठविलें आहे. पुढेंही दिनप्रतीनें राजश्री प्रतिनिधी ये गोस्टीचा उदेग करितात. विदित जाहलें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. राजश्री प्रतिनिधी राजश्री सुमंतासी बोलतात. त्यास दो चौ दिवसा सुमंत अमच्या घरास येऊन वर्तमान सांगतात आणि बोलतात कीं आम्हीं जे गोष्टी राजश्री प्रधानपंतासी बोलतों त्यांत किमपि अंतर नाहीं. येविसीं शफत पुरस्कर बोलतात. केवल तिकडीलच पक्ष धरितात यैसें नाहीं. जालें वर्तमान लिहिलें असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Pratinidhi concerting plans to thwart the Peshwa of his possession of the fort of Mahuli, if necessary by calling in the Nizam against the Peshwa.*

No. 90] [*17-10-1735?*

पाा छ २३ जमादिलाखर गंगा

श्री

सेवेसी सेवक आज्ञाधारक शंकराजी दतात्रये कृतानेक साा नंमस्कार विनंती. आज्ञापत्र पावोन सनाथ केले. छ ११ जमादिलाखर श्री धसाडीजवली उतरोन कसबे परबाणीजवली दीडकोस दुदनेचे कांठी येऊन पोहचले. वार्ता आहे की, पडदूर साकरखेडले त्या प्रांती गवत आहे तेथे जाऊंन बहीर बुनगे लस्कर ठेऊन येक हाजा(रा) राउतानसी आवरंगाबादेस जावे. तेथे कांही दिवस राहूंन * * द जमालदीखानांचा विवेक करून मागती बहिरीमधें यावे. आथवा फरजपूर व आजनटे तेथे चारापाणी आसलिया तेथें जावे. यैसी तजवीज आहे. याचा विचार येक भरवसा नाहीं. जाले वर्तमान लिहीत जाऊ. हरकारेजोड वरचेवर खर्चास देऊन पाठवीत जावे. नवाबाचे हरकाऱ्याबाा व आपली माणसे नारोपंत व दुसरा ग्रहस्त त्याबाा नवाबाची व खोजे आबदुलाखानांची पत्रें माहाराज स्वामीस व आपणांस व राजश्री राऊ सुमंत यासी घेऊन पाठविले आहेत. नवाबाचे जासूद आगोधर सातारियासि जाऊंन आले. तरी तेथील पत्रे देऊन

येतील. पुण्यास आले तरी सर्वहि पत्रें सेवेसी श्रुत होतील. नारोपंत तरी सेवेसी पावेल. सकल वृत कलेल. माहोलीच्यामुले विक्षेप बहुत मानिला आहे. पत्री उपचार फार लिहिला आहे. विवेक जालियां विवेक करावा. नवाब थोर माणूस आहे. रा छ १२ जमादिलाखर.

वसमतचें जागीरदार व मुकरबखान आणीक या प्रातीचे जागीरदार फौजदार येत आहेत. फौजा जमा करीत आहेत. सुलतानजी निंबालकरहि येणार. पाऊस बहुत दिवस या प्रांती नवता. आता पडो लागला. श्री पूर आला होता. आस (?) मोकाम पलाकडे केले. चारा दाणा लस्करात महाग जाला आहे. कृपा करून कामकाज लिहीत जावे. हे विनंती.

¶*Shankraji Dattatraya writes about the plans of the Nizam which, he says, are very uncertain. Letters, he adds, have already been dispatched to Satara for the King and Sumant.*

No. 91] *[21-10-1735?*

पा छ २६ जमादिलाखर

श्री

सेवेसी सेवक शंकराजी दतात्रये कृतानेक सां नमस्कार विनती. छ १९ जमादिलाखरी नवाब मौजे धार पा परबानी तेथे दुदना नदी उतरोन मौजे मागनगाऊ पा हूटगाऊ तेथे मोकाम केले. दुसरे दिवसी कूच करून लोहगाऊ परगणियातून पडदूर प्रांते जात आहेत. बहीरबुनगे तेथे टाकून औरंगाबादेस जाणार. समागमे प्रस्तुत तीन हजार फौज पाच हजार तोपची आहेत. वरचेवर येतच आहेत. शहरास गेलियावरी काये विचार होईल तो लिहून पाठऊन. बातनी-जोडे पाठवीत जावे. आपण पाबल सिकारपूर प्रातास आलेत, हे वर्तमान यासी पावले. याचा विचार बहुत खोल आहे. कलत नाहीं. सामान सरंजाम पोख्ता करविला पाहिजे. याचा श्नेह, प्रीत, आवघी भयाची आहे. उतर पंथे जायाचे आसेल तरी पोखता सरजाम समागमे आसावा. येके वेलेस आडवे आले तरी नेटून जाऊं सकेत, येसे आसावे. कासारीचे घाटावरी जाणार येसी वदंता आहे. साहेब बहुत सेना ठेवीत आहेत; नवे लोकास आगाऊ पैके पाठवीत आहेत हे वर्तमान आले आहे. आता बातनी हरकारे झाडी जाले, लवकरी आणीक पाठविणे. विनती रा छ १७ जमादिलाखर.

---

१ रवाना.

नवाबाची पत्रें व आबदुलाखानाची आपले माणसा बा व नवाबाचे जासुदाबा पाठविली आहेत. पावली आसतील. विनती.

¶*After giving the probable halts and marches of the Nizam the writer Shankraji Dattatraya sounds a note of caution to the Peshwa regarding the professed friendship of the Nizam and asks him to be well prepared for any emergency.*

No. 92] *[19-11-1735*

पा छ १८ रजब

श्री

सेवेसी शंकराजी दत्तात्रेय कृतानेक सा. नमस्कार. आज्ञापत्र समागमे मालोजी तुकोजी पावले. येथील वर्तमान तरी नवाबानें छ १२ रजबी बाहीरबुनगे खजाना पागा सराफा कचेरी चदरसेन, जगपतराऊ, मालोजी, गोपालसिंग आदीकरून समस्त सरदार सिवणे आजंठे तेथे ठेऊन दीड हजार फौज व खोजे अब्दुलखान, अनवरखान, अनरुलाखान नवनीधराये, वजारतखान, रामसिग मुनशी यैसे घेऊन माहाल घेऊन आवरगाबादेस चालिले, ते छ १४ रजबी बुधवारी शहर दाखल जाले. राजश्री राऊ प्रधान चांदवडचा घाट उतरोन नवापुराकडे गेले, हे वर्तमान नवाबास कलले. आपले जागा विचारआचार करीत आहेत. काही उपाधी प्रसंग दिसत नाहीं. अवरंगाबादेची व समागमेची व मऱ्हस्ट खलक आवघे मिलोन ५ हजार फौज आहे. तोपखाना बहुत आहे. सुलतानजी निंबालकर येणार आहे. शहरास गेलियावरी नवीन वर्तमान असेल ते दिनचर्या वरचेवर लिहून पाठवितो. जोडी हरकारे आहेत विनंती. रा छ १४ रजब. फुलमडी-पासून कूच जाले [शहरास चालिले.] आगरे प्रांती आडाऊ कोण्ही थोर मवास होता, यासी सादतखानाने जुज देऊन मारले. हे ऐकोन सादतखानांचा जये जाला, यावरून सचित आहेत. रा राऊहि त्या प्रांते जाणार ऐकिले आहे. चितांत घाबिरे आहेत. बाहीर धिटाई धरून सपादनी करून आहेत. काही विचार यासी सुचत नाहीं. पुढे जे दिसोन येईल ते लिहिलें जाईल. उदाजी चव्हाणाचा प्रसंग नवाबानी गई केली होती. आता आणीक त्याच्या कामाची चर्चा आहे. जागिरा विज्यापुराकडे तजवीज लावीत आहेत. जाले काही नाही. चर्चा आहे. जाधवरायाने साक्षेप केला असे. विनंती.

¶*Shankraji Dattatraya gives news of the Nizam proceeding to Aurangabad with his Sardars and a force 5 thousand strong. The Nizam, he further says, has been very anxious since he heard of Sadatkhan's victory over some Adau (?) at Agra and of Bajirao's impending arrival on that side.*

No. 93] .[पो 23-12-1735 ?

पा छ १९ साबान गंगा प्रयागेस कासीस

श्री

१

सेवेसी शंकराजी दतात्रये सां नमस्कार विनंती. आज्ञापत्र पावोन सनाथ जालो. येथील वर्तमान तरी नवाब साहेब इ ली गडत गव्हांण दुर्ग चिचोन येथे पावले. येक दोनी मोकाम जाले. येथून पूर्णा नदीतीरेच श्री तीरास कोटेस्वरास जाणार. तेथून काये विचार तो लिहिला जाईल

२

तीर्थस्वरूप मातुश्री स्वामी श्री पावले. येक हती ५ हजार रुा दान केला. आणीक १० हजार रुा दान केले. ब्रांह्मण संतरपण आतिशये जाले. त्यावरी * * * * गेले. राजश्री राऊ प्रधानस्वामी मुकुंद बारा पावले. बुदी कोटा * * * णार नवाबास हे वर्तमान पावले आहे. त्या प्रांतीचे कुल रजपू(जी)त व फौजदार सुबेदार रुजू जाले आहेत.

३

जुनरचा किलेदार कस्टी आहे, हे नवाबास वर्तमान आले. त्यावरून तिकडे फौज देऊन सैदलस्करखानास पाठवणार आहेत. फौज बराबर व सिंदे आणीक मऱ्हाटे येथून जातील तेव्हा तिकडे कोन्ही येईल. विचार मात्र आहे.

४

आवरंगाबादेचा कोतवाल हाजी आलीखान वारला म्हणऊन वर्तमान आले आहे. प्रस्तुत त्याच्या लेकासच कोतवाली देतील.

५

सुलतानजी निबालकर आले. आडीच हजार फौज आहे. रभाजी निबालकराचे शरीरास सावकाश नाहीं, म्हणंऊन त्याचे पुत्र जानोजी निबालकरास फौजेनिसी बोलाविले आहे. नवाबाची पत्रे गेली आसेत.

६

नवाबाचा विचार आहे की बेदराकडून कलबुरग्यावरून सगर वागनगिऱ्याकडे जावे, तिकडे मुलूक पिकला आहे. तेथे राहून कर्णाटकाकडे मनसुबा करावा. राजकारण लाऊन पैका येईल तो घ्यावा. राजश्री राऊ प्रधान उतर प्रांता(स)

गेले आहेत तिकडील राजकारण विलेवार होतां * * * * पाहिजेत तोंवर येक जागा बसोन कार्ये करणे, याकरिता जात आहेत. जाले वर्तमान लिहीत जाऊं. हरकारे पाठवीत जावे.

७

येथे वर्तमान आले आहे की गुजरातेचा सुबा भंडारी[1] फौजनिसी मही नदीवर बडोद्यास आला तेथे दमाजी गायेकवाडाचे ठाणे फौज होती त्यासि जुज जाले. भटारीने घोडी घेतली. फौज गायेकवाडाची मोडली हे ऐकोन दमाजीने आणींक फौजा पाठविल्या. भंडारी तेथेच आहे. जुज होणांर आहे. रा छ ९ शाबान.

समागमे येसाजी व रवलोजी हरकारे.

¶*This is a news-letter from the Nizam's camp sent by Shankraji Dattatraya giving various details, particularly referring to the Nizam encamping at Chichon fort, Bajirao proceeding to North, and Damaji Gaikwad fighting with the Subha of Gujrat.*

No. 94] [*28-12-1735?*

पा छ ४ रमजान

श्री

विनंती विज्ञापना. ता छ २४ शाबान लस्कर मौजे मुरूम पा नलदुर्ग येथे आले. दरकूच कलबूर्ग सगर प्रांतास जात आहेत. हबशी यानी बानकोट घेतला व चिपलोन मारून बंद मवेशी फार नेली, हे नवाबास आर्जे आला. नवाबानी यासी आंतस्थे लिहिले की उपाधी फार करणें. हे खेले आहेत. याच्या स्नेहांचा भरवसा न धरावा. यैसियासी बानकोटावरी फौजा पाठऊंन तंबी करून घेतले पाहिजे. नवाबाजवली आपली कमीची गोस्टी न यावी. स्वामीचे नांव थोर आहे. नकश केला पाहिजे. तीर्थस्वरूप स्वामी बुदीकोटा तिकडे गेले. मालव्यांत भला आमल नकश केला. नवाबास वर्तमान आले. कर्णाटकचेहि पैगाम पैकिया * * * ले आ * * * * * नाहीत. भिमातीर परियेत जात आहेत. [पुढील एक ओळ अस्पष्ट]

¶*The writer Shankraji Dattatraya in giving news from the Nizam's Court refers to the capture of Bankot by the Sidis and advises the Peshwa to send fresh reinforcements to recapture it. He also refers to the successful campaign of the Peshwa in Malwa.*

---

१ रतनसिंग भंडारी.

No. 95] [1735 ?

श्री २

१२

राजश्री राऊ सुमंत कितेक कामकाज लवकरी निघत नाहीत म्हणऊन दिवाणखानियांत नवाबास सलाम करून रुसून घरास आले. त्यावरी नवाबानी बहुत समाधान करून खोजे आबदुलाखान सैद लस्करखानास घरास पाठऊन घेंऊन जावे यैसे जाले. आदित्यवारी नवाबाचे भेटीस जातील. कामकाज काही विशेश नाहीं; तेहि करून देतील. आजीच शनिवारी भेटीस जातील.

१३

बातमी जासूद वरचेवर पाठवीत जावे. नवीन वर्तमान रा। राऊ सुमत लिहितील. योगिराजपंतास स्वामीचे पत्र आले म्हणऊन ते सेवेसी आले आसतील की येतील. येथे रा। मोरोपंताची भीड फार. दिवाण त्याचे लगामी आहे. नवाबास आर्ज़ कोण्ही करीत नाहीत. आनवरखान स्वामीचे कार्यावर बहुत आहे. सेवकहि या दिवसात यासी बाजिदी फार करितो. स्वामीनी आपलेच येक पत्र मा। आनवरखानास त्याविशाई पाठविले पाहिजे. श्रीइछेने काही काम निघेल. नवाबास त्या ग्रहस्ताचे काही आगत्य नाहीं. परतु नवाबास समजाऊन कोन्ही सांगत नाहीत. प्रयेत्न आत करून पाहतो.

१४

गणेश कुटे याचे विशाई रा। राऊ प्रधान यानी आनवरखानास पत्र लिहिले होते ते बजिनस नवाबास त्यानी दाखविले. त्यावरून सजावल परवाने ताकीद येथून येक दोनी पाठविले. शुज्यायतखानाने त्यासी दोघास सोडिले. परतु रोखे पनास साठी हजाराचे लिहून घेतले आहेत त्यांचीहि वाट कांही खान करितील

सेवेसी शंकराजी दतात्रये सां। नमस्कार. लिहितार्थ सेवेसी अवगत होईल. आपण सेवक आसो हे विनती.

¶*This is a news-letter to the Peshwa from Aurangabad, regarding the Court of the Nizam and the movements of his Sardars Anwarkhan, Said Laskarkhan, etc.*

No. 96] [1734

नक्कल

श्री

१

नवाब बागडकोठाजवळी कमती म्हणून गांव आहे तेथें मलप्रभा नदीवर आठ मुक्काम केले. कितेक गांवीं ठाणे बसविले. मुलूक लुटविला. बहुत नास देशाचा चाला. त्यावरी छ २९ रमजानीं तेथून कूच करून कोस पांच कलगुडगांव तेथून बदामी पांच कोस आहे तेथें आले. आजी छ ३० रमजान येथें मुक्काम आहे. उदैक ईद आहे मुक्काम होईल. अबदुल्ल मजीदखान बंकापूर प्रांतींचा सुभा अद्यापि भेटला नाहीं. नवाबाच्या लष्करांतून १२ पंधरा गांवे पलीकडे सोधे बिदनुराकडे गेला. नवाबही येथून तुंगभद्रा नदीवर जाऊन त्या उदकावरच बिदनूर प्रांतास जाणार. यावर काये विचार करतील तो लिहिला जाईल.

२

अबदुल मजीदखान बंकापूरचा पठाण याणें पातशाही किल्ले दोन केरूर व बेलगांव घेतले होते. आतां केरूरचा किल्ला फिरोन दिल्हा. नवाबाचे प्यादे आडीचसें जाऊन किल्लांत बसले. आतां दुसरा किल्ला बेलगांवहि मागत आहेत तेहि देऊं म्हणत आहेत. प्यादे आडीचसे घेऊन गेले कीं त्या किल्ल्यांत बसऊन तोही किल्ला देतील.

३

चिमणाजी दामोदर यांस देवआज्ञा जाली. त्याची जागीरपैकीं एक परगणा त्याच्या भावास पुत्रास देऊन वरकड जागीर आपण घेतील. गयाजखानाचे जागीर पैकीं एक परगणे सिवणे त्याच्या लोकास दिल्हे. वरकड परगणे आपण घेतले. तैसेंच कोतवालाची जागीर याच्या लेकास देऊन वरकड आपण घेतली. कोतवाली याच्या पुत्रास दिधली.

४

सैद जमानखान ऐवज़खानाचे पुत्र त्यास परगणे चोपडे व बाबल व एरंडोल तीन परगणे जागीर दिल्ही. मुतालीक वसीलखान नवाबाचा जावई दिल्लीस गेला होता तो येतो. नर्मदेपर्यंत आला. यासी थालनेर परगणा जागीर दिल्ही.

५

कडप्याचा पठाण येणार होतां त्याची लेक व जावई एक रात्रींच निवर्तली. त्या दु:खाकरितां तेही येतां राहिले. कर्णोलकरही त्याचे संगतीनें राहिले. बंकापूरचा पठाण ते आवघे आलियावर येईल. त्याणे लिहिले आहे. नवाबानें सांप्रत इकडील प्रसंगास गै करून न जात आहेत.

६

विज्यापूरचा सुभा नवाबासमागमे येथवर आला होता त्यासी निरोप दिल्हा तो तालिकोटास गेले. सुभा प्रस्तुत यांस सांगितला.

७

राजश्री पंतप्रधान दिल्लीस पावले, सार्वभौमाची भेटी जांली, यैसे वर्तमान कित्तेक लोकानीं नवाबास सांगितले आहे.

८

मीरशजमसूदी बकशी नवाबाचा धारूर प्रांती होता त्यास हुजूर बोलाविले तो येतो. जवल आला आहे. सैद लष्करखान बंदीजमाखान हजूर बोलाविले ते गुंजोठीपर्यंत आले. त्यास लिहिले आहे कीं त्याच प्रांती राहेत. भापकर देशास उपद्रव न करीत.

९

लष्करांत जोंधले सवंग पैशास शेर आहेत. वरकड सर्वेही महर्ग आहे

कणीक सेर	तांदूल सेर	दाल सेर	चौवि सेर	तूप सेर
०।=	०।१	०।२	०।४	००१॥.
गूल सेर	खोबरे	तेल	सजगुरे	
००५	००४॥.	००४	०॥५	

नवी फौज नित्य दोनसे तीनसें स्वार ठेवीत आहेत.

१०

उदाजी चव्हाणास बोलाऊन नवाबानें पाठविले आहे. अध्यापि येतो यैसी वार्ता आली नाहीं.

११

बागडकोठ्याजवल नवाब उतरले तेव्हा तेथें दिलेलखानाची स्त्री राहते तिणे दोन हजार प्यादे मेलवून किल्ला बलाविला. आश्रये केला. युद्धास सिद्ध जाली. त्यावर

११

नवाबास मेजमानीं बहुतसी पाठविली. त्यावर नवाबानी यास अभय सांगून पाठविले. रखवालीस राऊत प्यादे पाठविले, समाधान केले.

१२

बिदनूरचे व सोध्याचे कोणी अद्यापि नवाबाकडे आले नाहीं त्यावरून नवाब रागांत आहेत. तिकडे जावयाचे विचारांत आहेत.

१३

दमाजी गाईकवाड याणे नवाबास चालीस मोहरा व सात थाने पाठविली होती. दौलाखानाचे मारफतीनें पावली. उमाबाईस पत्र समाधान युक्त नवाबानीं पाठविले. गजेंद्रगड हिंदुरायानीं बांधला आहे तेथवर जावयाचा विचार आहे. वाघीन-गिरेवाल्यानीं पंधरा हजार रुपये दिल्हे. वरकड सुरापूर बलाऊन बसले आहेत.

¶*News-letter from the Nizam's camp to the Peshwa probably by Shankar Dattatraya. Chimnaji Damodar is reported as dead in this letter. This man's death is reported by Baburao Malhar Barve in another letter dated 3rd March 1734. This letter therefore must be taken to refer to the year 1734. The various items of news in this letter are all important, as they describe the Nizam's moves and plans to sow disaffection into the minds of several Maratha Sardars.*

No. 97] [पो *7-4-1736*

पा छ मोहरम
मु॥ किले तलागड

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलाचे सेवेसी

विनंती. निजामनमुलुक माघारे फिरले. बीड प्रांतामध्यें संभुसिंग जाधवराऊ व सरलस्कराकडील फौज व गोरखोजी भापकर या त्रिवर्गानी मुलकामध्यें धामधूम केली; म्हणून राजश्री सुलतानजी निंबालकर यांनी आपली फौज पुढे पाठविली आहे. व राजश्री जानोजी निंबालकर यानीहि आपली फौज आपल्या देशामध्ये पाठविली आहे. निजामनमुलुकहि कही कलबुरग्याकडे येणार; परंतु तहकीक वर्तमान आले नाही. आलियावर सेवेसी लिहून पाठऊ. हे विनंती.

¶*The writer Nanasaheb communicates the Nizam's movements to Chimaji Appa. The whole letter is in Nana's hand.*

No. 98] [18-6-1736?

श्री.

राजेश्री चिमणाजी पंडित गोसावी यांसी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्येयाविराजित स्नो॥ राव फतेसिंग दंडवत विनंति उपरी. येथील क्षेम जाणऊन स्वकीय आनंदलेखण करीत गेले पाहिजे विशेश. बहुत दिवस जाले पत्रद्वार परामृश केला नाही येणेकरून उदासीनता आहे. तरी कृपा करून सदैव पत्री सांभालित असिले पाहिजे. आपले वर्तमान तरी नवाब अबदुल अजीजखांही आपणास जुनरास बलाविले. त्यावरून सिनरीहून कूच करून जुनरास छ १९ सफरी आलो. गोसावियास कलावे बद्दल लिहिले असे. येथे आलियावर आइकिले की गोसावियांचे[१] दुशमनास[१] आजार आहे येणे करून चितास समाधान नाही. कृपा करून आपले आरोग्य वर्तमान लिहिणे तरी समाधान होये. तीर्थस्वरूप रा॥ कुवर बाहादर यांनी वैकुंठवास केला. तुमचे पदरी ठेऊन गेले. सर्व प्रकारे आपणास गोसावी वडील आहेत. परामृशास अंतर न करणे. आपण तुमचे आहो. विशेश लिहिणे उपरोध आहे. स्नेह वृधीस पावीत जाणे बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Fatesing to Chimaji Appa: reports his visit to Abdul Ajijkhan and the death of Kuwar Bahadur.*

No. 99] [पो॥ 10-10-1736?

छ १९ जाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ

व तथा राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती. स्वामी बाहेर निघाले परंतु आपणाजवल फौज पुर्ती जमा जाहाली नाही म्हणून वर्तमान यैकतो; तरी निजामनमुलुक दगेखोर आहे व स्वामीचे घटके घटकेचे वर्तमान त्यासी जाते. स्वामीपासी थोडे सामान पाहून येखादे जागा आपला डाव साधावयासी चुकणार नाहीं. यास्तव फौज पुर्ती जमा करावी. मातबर सामानानसी स्वामी असिल्याने शत्रुस दबाव बसोन त्याचे मनोरथ दरिद्र होतील व लोक स्वामीनी जमा न केले तऱ्ही हिसेबासुधा पैका घेतील. यैसे

---

१ गोसावियाचे दुशमनास म्ह. खुद्द गोसाव्यास ही दरबारी पद्धत!

असता रोजमुरा खाऊन जवळ फौज असिल्यासी कामाचीच आहे. तरी अगत्य-रूपे फौज जमा करावी. सुचला अर्थ लिहिला असे. हा विचार स्वामीस न कळेसा काये आहे? परंतु सूचनार्थ लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare advises Bajirao not to be too confident in his dealings with the Nizam.*

No. 100] [*11-10-1736 ?*

पाा छ १६ जमादिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामीनी लिहिले की राजश्री स्वामीस विनंती करून राजश्री सुमंतास नवाबाकडे जावयासी निरोप देवणे. त्यावरून स्वामीचे पत्र सुमंतास होते ते दिल्हे. त्यानीहि सांगितले कीं राजश्रीनी आज्ञा दिल्ह्याउपर काही जाण्याचा उजूर नाहीं. त्यावर राजश्री स्वामीस विनंती केली. राजश्री बोलिले की अवश्यमेव निरोप देऊं; परंतु सामादिकास पुसोन विचार करून निरोप देतो, यैसे बोलिले. मागती विनंती करून निरोप लौकरीच देवितो. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Purandare writes to the Peshwa and Chimaji Appa from Satara that as desired, he is moving the King to despatch Sumant to the Nizam on special mission.*

No. 101] [*About Oct. 1735 ?*

पाा छ ११ रजब

श्री

सेवेसी सेवक शंकराजी दत्तात्रये कृतानेक साां नमस्कार विनंती. याहून पूर्वी पत्रावर पत्रें सेवेसी पाठविली आहेत. पावली आसतील. प्रस्तुत नवाब छ २८ जमादिलाखर मौजे निबगाऊ पाा सिंदखेड व हिवरे पाा माार नदी पूर्णेचे काठी आले. तीन मोकाम केले. घाट नीट केला. मेहुणाचा घाट खाणून गाड्यास जातां येजेसे केले. पांच मजलीने आवरंगाबादेस जातील. फौज भिमराऊ घाटगें यानी मागोन घेऊन कसबे सवलीस नेली. येक गढी मातबर खंडगल्याची होती, त्यानी देसमुखी बळेच घेतली. ते गढी घेऊन पाडली. तो खंडागल्याने

रां चंदरसेन जाधवराऊ याचा आसरा करून लस्करात आला आहे. जुनरचे किलेदार व पारनेरचे थोरात व सुनेरचे[1] कुवर बाहादूर यानी नवाबास लिहिले की, आपण तेथे आले आहेत. जुनेर पारनेर सुनेरास उपद्रव बहुत लाविला, हे घाट उतरोन जाणांर. हे औकोन काही जाबस्वाल केला नाही. आम्हांस बोलाऊन सांगितले राजश्रीस लिहिणे की, पादशाही कसबे यासी उपसर्ग काये निमित्य? तीन फौजा करून उतर पथे जायाचा निश्चये नवाबास शृत जाला आहे. आता तरी विचार की, आवरंगाबादेस जावे. पुढे काये तजवीज करितील पाहांवे. आपले जाणे त्या देश्यास हे यासी बहुत औसाहे[2] आहे. माहोली घेतली, करनाल्यास घेरा घातला आहे, भोवताले उपद्रव फार दिधला उतरे प्रातास जात आहेत यैसेयासी विक्षेप बहुतच आला आहे. प्रस्तुत येकांत विचारच करीत आहेत. उपाधी बुधी दिसत नाही. काही विपरीत विचार आडलताच लिहून पाठवितों. या दिवसांत नवाबानी पातशाहाजीस पाठविले. आवरगाबादेहून रवाना जाले.

हाती थोर थोर उतम निवटून किमती आडीच लाख रुपये १२ हती.	चिते शिकार धरावयाचे ज्वान उतम ४.
जवाहीर येक लक्ष रु॥	कापड शाहथड पैठण बंगाला लक्ष रुा.

याप्रमाणे पाठविले. सादातखांन आगऱ्यास गौघाटास आला. यासी मालव्याची सुबेदारी देऊन पाठवीत आहेत. पादशाहाजीचा डेरा बाहीर निघाला आहे. वार्ता आहे की, डेरे दाखल जाले. आगऱ्यास येणार, पुढे फौजा पाठवीत आहेत. रवाना छ ३० जमादिलाखर लस्कर मेहूणचे घाटाखाली.

¶*Shankraji Dattatraya writes about the movements of the Nizam proceeding to Aurangabad from Nimbagaon. The articles and animals sent as presents by the Nizam to the Emperor are given in the end. The writer says that the Emperor has moved out to Agra himself and has sent forth his army.*

No. 102] [पो *29-11-1738* ?

पाा छ २७ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती. सैदलस्करखान जुनरास येऊन मखबुलआलम व ते सामील होऊन कल्याण प्रांते कोकणात उतरून धामधुम करणार म्हणून राजश्री सुमंतानी

---

१ सिंनर. २ असह्य.

सांगितलें, त्यावरून स्वामीस लिहिलें आहे; तरी स्वामीनी तिकडेहि खबरदारी करावी. कोणीकडे जातील काये करितील हा मतलब कलत नाहीं. अलीकडे कांही वर्तमान आलें असेल तरी लेहून पाठविलें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nanasaheb to Chimaji Appa informing him of the intended raids of Saiyad Lashkarkhan into Konkan.*

No. 103] [*1740 ?*

श्री

श्रियाविराजित राजाधिराजमान्य राजश्री
बाजीराव प्रधान स्वामीचे
सेवेसी.

विनंती पो श्रीनिवास गिरधरराव कृतानेक नमस्कार. उपरी, येथील कुशल जाणून आपले स्वकीये कुशल लेखन करून संतोश करीत गेले पाहिजे. विशेष. स्वामीनी दया करून पत्र पाठविले ते उतम समई पाऊन लेखनार्थ ठाऊक जाले. हजरत नवाब साहेबांस खत पाठविले होते. प्रविस्ट करून प्रतिउतर लिहिवाऊन पाठविले. असो. सर्वदा श्रीपासी स्वामीचा अभ्युदय व आपली आमची भेटी होऊन महत्त्व कार्येभागे संपादणेचा अर्थ इछितो. हेहि समयोचित घडेल. आम्हास स्वामी रा राव वैकुंठवासीचे ठाई बुधिवाद देणेसी सुज्ञा असा. प्रस्तुत सैन्ये कितुरचा मामिला निरव्हावरूप करून घेऊन बेळगावासी प्रवेश जाहले आहेत. येथील विचार मनांसी आणून बंदोबस्त करून चिकोडीच्या मानियेत आहेत. स्वामी कोठ आहा? कोणीकडे मोहिम करणेचा विचार केला असा तें सविस्तर लेखन केले पाहिजे. आरबी दोनी घोडी पाठवणे मणौन निरोपिले तरी सोंधेकर अप्रमाणिकपण करून आरबी घोडेच जाहज आली ते आम्हाकडे येऊ देत नाही. बिदरूरकड जाहज उतरताती. तिकडील दोन घोडी आणवाऊन शेवेसी पाठऊन देऊ. आम्हाकडून स्वामीच्या शेवेसी तिलांऊशे अंतर होणार नाही. आम्हासाठी दोन बैल गाडीच गुजराती उतम संपादून पाठऊन देणे. आमचा लाडे व लिहिणे चालवितां, म्हणोन लिहिले. असो. वरकड वर्तमान स्वामीच कृपेन येथास्थित आहे. विशेष काय लिहिणे. निते कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Shriniwas Girdharrao (a Jahgirdar from the south) writes to Bajirao his readiness to execute the latter's commands.*

No. 104] [1740 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. उपरी, येथे भागानगराकडून धनिकाची लिहिली जागा जागा आली कीं रा रंभाजी निंबालकर याची पत्रे नवाबास गेली जे येथे कार्यभाग ठसत नाही. त्यावरून खमालामेटावरून कूच करून हैदराबादेस आले. पुढे धारूरास यांवे यैसा विचार आहे म्हणून लिहिली आली आहेत; हे स्वामीस वर्तमान कलावें म्हणून लिहिले असे. विदित होये हे विनंती.

¶*News-letter giving news about Rambhaji Nimbalker proceeding to Haiderabad.*

No. 105]

श्री

पुरवणी राजश्री पंत प्रधान
गोसांवी यांसी

विनंती, उपरी, आम्ही कूच करून गेल्यावरी शाहार पलोन जात होतें. त्यास आम्ही पांच राऊत जामदारीस ठेविले ; आणि सरकारची जासुदाची जोडी ठेविली आहे. रयतेचा दिलासा करून, कौलास येक माणूस आपणाकडे पाठविले आहे ; तरी कौल व कमावीसदार पांच राऊत शाहारास पाठविले पाहिजेत. हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to the Peshwa. This letter cannot be fixed in time and circumstance. It may refer to the Nizam.*

No. 106]

श्री

सेवेसी विज्ञापना. नवाब तो निरोप देत नाहीं. सेवकही निरोप मागत नाहीं. राजबिराजीचे[१] दीलगिरीत, याजकरितां आणखी चार महिनें पर्जन्य कालपर्यंत येथें राहून सेवा करून दाखवावी यैसा बेत सेवकाचा आहे. या दरबारी कसा

१ सुखदुःखाचे.

रीव केला आहे, सर्व लोक उमदे कृपा कसी करितात, हे वर्तमान सेवेसी परभारे विदित होतच असेल. मोरोपंतही बाहेरंगे बहुत कृपा करितात. अंतरीचे ईश्वर जाणे. याप्रा दरबारी श्रीमंताचे नावावर वक्रानेच आहो. दरबारांत सर्व आम्हावर कृपा करितात. बातमीचे वर्तमान कांहीं उमद्याकडून कलत नाहीं. एक दोघे अंतरंगचे आहेत, त्यासी सख्य केले आहे. येथें जासुदाचा नाईक आहे, एक चोपदाराचा मिर्धा व एक आसिलेमासलांतली[१] आहे. आजपावेतो कांहीं सेवकानें प्रविष्टही केले आहे परंतु सांप्रत राजबिराजीचा प्रसंग आहे. दरमहा रुपये ५० पन्नास स्वामी कृपा करून देतील तर अंतरगचे वर्तमान सविस्तर कोण्हासही न कले ते लिहून पाठऊ यैसी सेवक उमेद राखतो. आम्ही आपले पोटासाठीं लिहित नाहीं. खर्चाची वरचेवर सेवकाची खबर घ्यावी. घरची बेगमी करावी. काम सेवकापासून घ्यावे. पायापासीं चाकरी करून आलियावर सर्फराज करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा निरंतर असू द्यावी हे विज्ञापना.

¶*This is a letter from one of Peshwa's men giving details as to how he entered into the confidence of the Nizam and how he persuaded some people in his Court to give him news.*

No. 107]

श्री

विनंती राजकी वर्तमान तीर्थरुप राजश्री अपानी स्वामीस लिहिले असेल ते लेहून पाठवावयास आज्ञा केली पाहिजे—नासरजंग व सुलतानजी याचा तह कसा होतो कोठपर्यंत तह जाला आहे ते लिहिले पाहिजे हे विनंती.

---

१ आसीलमासील = कुलीन ?

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

११

शाहू आणि संभाजी
(परस्पर हितसंबंध)

[किंमत— १० आणे किंवा १ शिलिंग १ पेन्स]


गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

Government do not share [redacted]*ny responsibility for the comments and views e*[redacted]*ssed by the editor.*

SHAHU'S RELATIONS WITH SAMBHAJI OF KOLHAPUR.


Although Shahu conciliated Sambhaji by the treaty of Warna in 1730, Udaji Chavan, Chimnaji Damodar and many other leaders of small bands used tocreate trouble, now for Shahu and again for Sambhaji, whose rivalry they fully exploited for their own personal interest. There were besides other causes to foster friction between the two royal cousins. Vyankatrao Ghorpade of Ichalkaranji was married to Bajirao's sister and found it difficult to keep friendly relations with Sambhaji of Kolhapur against whom he was often helped by the Peshwa. Once the Peshwa sent troops under Ramachandra Hari to help Vyankatrao against Sambhaji, who at once sent a strong protest to Shahu urging him to recall the troops. But Shahu's orders were not promptly obeyed by Bajirao. The following letters certainly throw a good deal of fresh light on the relations existing between Shahu and Sambhaji. In one of his letters, dated 25th May 1736, Sambhaji makes the following piquant remarks : " It seems to be my peculiarly sad fate that my visits to Shahu should always end in friction and ill-will. I have paid four visits to Satara till now and each time I had to return thoroughly discontented. The first visit was spoiled by reason of the parting presents ; the second by the absence of my queens ; the third by the question of Tarabai's residence, and the fourth by the dispute with the Ghorpades." The whole subject of Shahu's and the Peshwa's relations with Kolhapur deserves to be carefully studied in the light of many new papers and scattered references contained in this section.

No. 50



Facsimile of the handwriting of Raja Shahu (1707–1748)
(the last line)

No. 50



No. 1] [*1729*

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा
गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो उदाजी चवाण हिमतबहादर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय निजानंदलेखन करीत असिलें पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते उतम समई प्रविष्ट होऊन लेखनार्थश्रवणें समाधान जाहालें. बंदगानअली नवाब याचा व राजश्री पंतप्रधान यांचा सला जाल्याचा अर्थ लिहिला; उतम गोष्टी जाहाली. आम्हीं आपल्या पदरीचे आहों. याउपरी आमची सर्व शरम आपल्यांधीन आहे. राजश्री व्यंकटराव याचें निसबतीच्या खेडियाविसी लिों, तर आम्हाकडून तो हा कालवर उपद्रव जाहाला नाही; पुढें होणे नाहीं. कुरंदवाडावर आमची स्वारी आल्यासमई राजश्री कृष्णाजीपंत आम्हाजवल आले होते. मशारनि(ल्हे)समागमे स्वार देऊन सिराढोण व आवांतर गावखेडियाची रखवाली करविली. आम्हाकडूनच उपद्रव न जाल्यावर आम्हाकडील लोक तेथें उपद्रव किमर्थ देतील? आपण काशावरून लिों हे न कले. आम्ही आपल्या पदरीचें आहों. ही गोष्टी सर्वथैव आम्हाकडून होणार नाहीं. निरंतर याचआन्वयें पत्रद्वारें वडीलपणें परामर्ष करावा. विशेष काये लिा? कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Udaji Chavan to Chimaji Appa, expressing his satisfaction at the compromise effected between the Nizam and the Peshwa. The writer also denies the allegation that he or his men ever ravaged the villages of Vyankatrao.*

No. 2] [*5-3-1730*

पाा छ २६ साबान

श्री

पुंा[१] तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलाचे सेवसी

विनंती. काल संध्याकाळीं राजश्री स्वामी बोलत होते जे, 'आमचा हुजऱ्या आला. त्याणे वर्तमान सांगितले जे, राा उदाजी चव्हाण हिंमतबादर यास

१ पत्र नानासाहेबाचें. सबंध पत्र स्वहस्तें लिहिलेलें आहे.

राजश्री संभाजी राजे याणे सेनापती देणार,' म्हणून राजश्री स्वामी काल बोलले. आइकले वर्तमान विदित व्हावे म्हणून लिहिले आहे. कोल्हापूर मारनिलेस देऊन समजाविसी करून सेनापती सांगणार. सेवेसी श्रुत होये. हे विज्ञापना.

¶*Nanasaheb reports to Chimaji Appa the actual words of Shahu regarding the appointment of Udaji Chavan as Senapati by Sambhaji of Kolhapur.*

No. 3] [*14-4-1730*

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. स्वामींनी छ ६ सवालचे पत्र पाठविले ते छ ७ मिनहूस प्रविष्ट जाहाले. तेथे अज्ञा कीं, राजश्री अंताजी सिवदेव याजकडील व राजश्री उदाजी चव्हाण व राजश्री प्रतिनिधी व राजश्री फतेसिंगबावा यांजकडील वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे, म्हणून आज्ञा. यैसियास येथोन सेवकापासोन कांही अंतर पडित नाही. जे वर्तमान आढलते ते वरचेवरी स्वामीचे सेवेसी लिहीतच आहों. रा चव्हाण व रा अंताजोपंत व थोरात यांकडील दररोजची बातमी येथे येते तेणेप्रा दररोज सेवेसी लिहितच आहों. ती पत्रे पोंहचतात कीं नाहीं हे कलत नाहीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer Purandare accepts the Peshwa's order to supply him news about Antaji Shivdeo, Udaji Chavan, Pratindhi and Fatesing.*

No. 4] [*28-4-1730 ?*

छ २७ सवाल

श्रीभवानी शंकर

राजश्री चिमणाजी भीमराव

गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो त्र्यंबकराव सोमवंसी सरलस्कर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करीत जाणें विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाहाला. यैशास आपण कोठे आहेत, चव्हाण कोण ठिकाणी आहे, वर्तमान काये, तें

लेहून पाठविले पाहिजे, म्हणऊन लिहिले. त्यास आम्ही व राजश्री संभुसिंग जाधवराव व गोरखोजी भापकर यैसे भूसणगडाहून राजश्री स्वामीचे आज्ञेप्रमाणें कूच करून कृष्णातीरास भिलवडीविरी मुकाम केला आहे. छ मजकुरी हुजूरची फौजहि आली आहे. चव्हाण सडा होऊन तासगावानजीक आहे. पुढे जे वर्तमान होईल ते लेहून पाठविले जाईल. रवाना छ २१ सवाल बहुत काये लिहिणें हे विनंती.

श्रीराजा शाहू चरणी
तत्पर त्रीबकराव
सोमवंशी सर लस्कर

मोर्तब
सुद.

¶*Trimbakrao Somvanshi to Chimaji Appa, giving details of the expedition against Udaji Chavan.*

No. 5] [*23-7-1730 ?*

पौ छ २२ मो

श्री

श्रीमंत् राजश्री नाना स्वामींचे
सेवेसी

पोष्य मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १८ मोहरम गुरुवार दीड प्रहर रात्रपर्यंत स्वामीचे कृपेकरून मुकाम भिलवडीची वाडी येथास्थित असे विशेष. छ माारीं राजश्री स्वामीची व राजश्री उदाजी चव्हाण यांची भेटी जाली. तें आद्यंत वर्तमान तीर्थरूप राजश्री आपा स्वामीस पत्र लेहून पाठविले आहे. आपण वाचून पाहून आपल्या जासुदासमागमे सत्वर तीर्थरूपांकडे रवाना करावी. येक घटका न ठेवावें. विदित जाले पाहिजे. आजी जाले वर्तमान लिहिलें आहे. याउपरी होईल वर्तमान तें सेवेसी लेहून पाठऊं. सेवसी श्रुत हे विज्ञापना.

¶*Nanasaheb is informed of an interview between the King and Udaji Chavan at Bhilavadi.*

No. 6] [पौ 19-9-1730 ?

पौ छ १६ सफर

श्री

पुरवणी[1] राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरीं. स्वामींनी पत्र पाठविले, तेथे आज्ञा केली की, "तीर्थरूप राजश्री आपा स्वामीची आज्ञा जमावानसी राजदर्शनास जावयाची जाली. तयारी करीत असतां उदाजी चव्हाण भेटलियाचे वर्तमान आले; याकरिता गुंता पडिला. याउपरीं तुमचे पत्र आले म्हणिजे स्वार होऊन येऊन," म्हणून स्वामींनी लिहिले. त्यास चव्हाण भेटला. बीर्दे[2] बसली नाही, म्हणून निरोप घेऊन गेला. हे वर्तमान पूर्वी तपसिले लेहून पाठविले. ती पत्रे पावलीच असतील. त्यावर राजश्री स्वामींनी भिलवडीहून कूच करून सोनईस आले. ठाणे फते केले. तेहि वर्तमान स्वामीचे सेवेसी लेहून पाठविले. दरबारीचे वर्तमान सेवेसी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीस लेहून पाठविले. ती पत्रे स्वामींनी वाचून पाहून रवानगी त्यांजकडे केली आसतील. तीर्थरूप राजश्री आपा स्वामींनी मजला पत्रे पाठविली. त्यामध्ये दो पत्रामध्ये मजकूर लिहिला होता कीं, "चिरंजीव राजश्री नानाची रवानगी फौजसहवर्तमान केली आहे. जेष्टी पूर्णमा जालियावर स्वार होतील; परंतु तुम्ही वर्तमान कोठे न सांगणें," यैसी आज्ञा आम्हास आली. दरबारचे वर्तमान स्वामीस लेहून पाठविलें आसे. याउपरी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी आज्ञा करितील, त्याप्रमाणे स्वामींनी कर्तव्य ते केले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Dadoba Purandare gives details of various events—the interview between Udaji Chavan and Shahu, Shahu's camp being shifted from Bhilavadi to Sonai and Chimaji's desire to send Nanasaheb with a contingent.*

No. 7] [पौ 23-9-1730

छ २१ रावल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री उदाजी चव्हाण याजकडील रा संताजी सुर्वेवंसी कागवाडच्या ठाणियातील ठाणे देऊन राजश्री स्वामीस येऊन भेटला, तें पूर्वी

१ पत्र दादोबा पुरंदरे यांचें आहे. २ जम, घडी (?)

सेवेसी लेहून पाठविलेच होते. यैशास त्याचा कबिला आथनीपलीकडे येका गांवी होता; परंतु हा भेटल्यानंतर राजश्री स्वामीनी रा सिदोजी थोरात याचे स्वाधीन केला होता, तो लस्करात होता. छ ९ रोवली लस्करातून रा स्वामीस न पुसता उठोन गेला आहे. मागती येईल की नेहमी गेला हे वर्तमान चौ दिवसानी तहकीक जालियावर सेवेसी लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Santaji Suryavanshi, an officer of Udaji Chavan, surrenders to Shahu.*

No. 8] [*8-10-1730*

छ १६ रालाखर

श्री

पुरवणी[1] तीर्थरूप राजश्री राऊ
तथा राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. रा शामराव राजश्री उदाजी चव्हाण याजकडील, याणी गुमटांतून येक ब्राह्मण कौल मागावयाचे उद्येषें राजश्री स्वामीकडे पाठविला होता. तें वृत पूर्वी सेवेसी लिहिलें आहे. तदनंतर छ ३ रबिलाखरी इंदुवारी राजश्री स्वामीनी आपले हातचा सला व राजश्री येशवंतराव माहादेव पोतनीस त्या ब्राह्मणासमागमे गुमटास पाठविले. रा शामरायाची यांची बोलीचाली जाली. "गला पाऊणसे खंडी वस्तभाव आदिकरून अवघे हत्यरिदेखील सोडून द्यावे; गुमट देतो." यैसा शामरायानी मुदा घातला. ते वर्तमान येशवंतरायानी राजश्री स्वामीस सांगून पाठविले. त्यावर राजश्री स्वामीनी आज्ञा सांगून पाठविली कीं, त्यास दर्शनास घेऊन येणे, त्याचे मुदेमाफीक केलें जाईल म्हणून. त्यावरून येशवंतराऊ ते दिवसीं तेथे राहून दुसरे दिवसीं छ ४ राखरी मंगळवारीं रात्रीं शामराव व आपाजी माने यास घेऊन आले. राजदर्शन जालें. राजश्री स्वामीनी शामरायास सोन्याचें कडे व तिवट पासोडी व येक निमेचा[2] दिल्हा. आपाजी मान्यास सोन्याचें कडें व तिवट पासोडी दिल्ही. त्यावर दुसरे दिवसीं त्रितीये * * * बुधवारीं दरबार जाला. राजश्री स्वा(मीचे) त्यांचें भाषण जाले. दारूगोला न सोडावा, नगारा न सोडावा, गला

---

१ पत्र दादोबा पुरंदरे यांचें. २ लहान बांकदार तरवार.

पांऊणसें खंडी व हत्यारें व किरकोळ लोकांची वस्तभाव सोडावी, यैसा करार केला. त्यावर दुसरे दिवसीं छ ६ रबिलाखरीं गुरुवारीं राजश्री संभाजीराजे यांचे निशाण व पांच हुजरे शामराव व येसवंतराव यैसे गुमटास पाठऊन दिल्हे. गुमट फते जाला. राजश्री शामराऊ यास मोतियाची जोडी राजश्री स्वामीनी दिल्ही. याउपरी राजश्री येसवंतराऊ व शामराऊदेखल जमाव आलीकडे आलियावर पुढे वर्तमान सेवेसी लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Dadoba Purandare informs the Peshwa of the negotiations regarding the fort of Ghumat between Shamrao and the King Shahu. The flag of Sambhaji of Kolhapur was hoisted there at length.*

No. 9] [*11-12-1730*

छ १९ जाखर

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ११ जमादिलाखर भृगुवारपरियेत येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान अलाहिदा लिहिले आहे, त्यावरून विदित होईल. राजश्री उदाजी चव्हाण याजकडील येसाजी सिंदे आले आहेत. त्याचा बोलीचा प्रसंग काही अद्याप पडला नाही. पुढे होईल वर्तमान ते लेहून. राजश्री स्वामी पाहाटे सिकारीस जातात ते रात्री दो ती घटका रात्री येतात. यामुळे कारभाराच्या गोस्टी बोलावयासी कोणासहि फावत नाही. विदित जाहाले पाहिजे. (स्वा)मीपासी कोकण प्रांतीचे व नबाबाकडील व मखबूल अलम याकडील व बाबूराऊ दाभाडे याकडील व उतरकडील वर्तमान आले असेल ते लिहिले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji Purandare writing to the Peshwa from Satara says that Yesaji Shinde had arrived there from Udaji Chavan but was unable to get an interview as the King used to be out hunting all day long. The writer asks news from the Konkan, the Nizam, Dabhade and the North.*

No. 10] **[16-12-1730**

पा छ १९ जाखर

श्री

पुरवणी राजश्री राऊ
स्वामीचे शेवेशी

विनंती उपरी. राजश्री फत्तेसिंग भोसले व राजश्री पंतप्रतिनिधी राजश्री संभाजीराजे याजकडे गेले आहेत. त्याची भेटी जाली. मार्गशीर्ष वद्य त्रितीयेस तेथून स्वार होऊन सत्वरीच सातारियास येणार. येथें आलियावर सविस्तर वर्तमान लेहून पाठवूंन. विदित जाले पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Ambaji Purandare to Bajirao, communicating the news about the meeting between Fatesing Bhosle and the Pratinidhi and Sambhaji at Panhala.*

No. 11] **[1730**

श्री

पुरवणी[१] तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री येमाजीपंत याचे पत्र राजश्री नारबावास आले. त्यात मजकूर की, राजश्री उदाजी चव्हाण यासी राजश्री संभाजी राजे याणी राजकारण लाऊन, रताजी चव्हाण यासी सरलस्कर द्यावे, जुना सरलस्करचा सरंजाम होता त्यापैकी निमे रताजीस द्यावा व निमे सुभानराऊ सिंदे यासी द्यावा, सौ जिजाबाईसाहेबानी कृष्णातीरास यावे, रताजीस कृष्णेत क्रिया देऊन न्यावे आणि सर्व प्रकारे ऊर्जित करावे, यैसे ठीक राजकारण जाहाले आहे व रा चद्रसेन जाधवराऊ याणी नवाबाची वस्त्रे व कोणी भले माणूस उदाजी चव्हाणाकडे पाठविले आहेत. त्यावरून उदाजी चव्हाण सिराल्यावर होते ते माघारे अथणीस आले. आमचे उगेच धातुषोषण कागदपत्र राजश्री संभाजी राजे याजकडे जात येत होते, त्यावरून त्याणी आम्हास रताजी चव्हाणाचे उभारणीविसी पुसावयासी राजश्री आपाजीराऊ रामचंद्र सदासिवभट उपाधे यैसे पाठविले. त्यास स्वामीनी राजश्री स्वामीस येविसीचे विनंती करावी ; आणि आज्ञा करितील तरी रताजीचे व राजश्रीचे सूत्र जाहाले आहेत ; मोडू ; नाहीतर जसी आज्ञा करितील त्याप्रमाणे राजश्री आपाजीराऊ व सदासिवभट यासी बोलू म्हणून बावास लिहिले होते.

---

१ पत्र महादाजीपंत पुरंदरे यांचें आहे. सबंध पत्र स्वहस्तें लिहिलेलें.

ते पत्र राजश्री स्वामीस राजश्री बावानी वाचून दाखविल्यावर राजश्री स्वामीनी उतर दिल्हे कीं, ते प्रांतीचा येख्त्यार तुम्हावर आहे. तुम्ही जाणाल ते करणे व येविसी राजश्री मंत्री तुम्हास लिहितील त्यावरून कलेल म्हणून उतर देविले. व बावास सांगितले की, तुम्ही त्यास लिहिणे जे, तुम्ही सूज्ञ आहा, जाणाल ते करणे, म्हणून ल्याहावयासी सांगितले. स्वामीस कलावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji communicates to Chimaji Appa the order of Shahu regarding the settlement of the affairs of Rataji Chavan. Chimaji may dispose of them in any way he likes in spite of the intercession of Sambhaji of Kolhapur for the grant of the Saranjam of Sarlashkar in favour of Rataji.*

No. 12] *[10-2-1731 ?*

पा छ १९ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी

विनंती. राजश्री पंतप्रतिनिधी छ १३ साबानी दोनप्रहरीं आले. राजदर्शन जालें. राजश्री स्वामींनी त्यांस पुसिलें कसे काये वर्तमान ? राजश्री उदाजी चव्हाण भेटले कीं काये ? त्यावरी त्यानी उतर दिल्हें कीं भेटले ; परंतु कांही बीत बसिली नाहीं. काये निमित्य म्हणाल तरी त्यांचा अड असा आहे कीं बोलीचाली जाली नसतां आंधी कोकुटनुरांत व तेलसिंग्याचें ठाण्यांत आपले लोक आधीं घ्यावे, मग बोलीचाली करणे ती करावी. तों हे गोष्टी आपणांस कबूल नव्हें म्हणून राहिली आहे. आपले पत्र राजश्री येमाजीपंतास येणे म्हणून आलें, त्यावरून त्यांस ठेऊन आपणच आलो. चाकरी घडो अथवा न घडो, परंतु समई धण्या-जवल असावें, यास्तव आलों. राजश्री येमाजीपंताजवल येक हजार फौज व राजश्री माहदाजी घाटगे यैसे तूर्त खानापुरावरी ठेऊन आलों. चव्हाणाची बीत बसली तरी त्यांस घेऊन पोट भरावयास जातील म्हणून बोलिले. त्यावरी राजश्री बोलिले कीं कदाचित चव्हाणाचा तह न होये तरी त्याजपुरतें याजवल सामान आहे कीं काये ? कोकुटनुरच्या ठाण्यावर गेला तरी जतन होईल कीं काये ? त्यावरी प्रतिनिधी बोलिले कीं त्याजपुरतें सामान येमाजीपंताजवलहि ठेविलें आहे आणि ठाणियांतहि आहे. कांही चिंता नाहीं ; इतकी बोली जाहली. स्वामीस कलावे, याकरितां लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The failure of the Pratinidhi's mission to Udaji Chavan.*

No. 13] [*10-2-1734?*

श्री

राजश्री राऊ प्रधान गोसावी यांसी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो जानोजी निंबालकर कृतानेक दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणोन गोसावी यानी आपलें निजानंद लिहीती आज्ञा निरोपीत असिलें पाहिजे. यानंतर गोसावी यानी मेहरबानी करुन पत्रें पाठविलें; प्रविष्ट होऊन लिहिला अन्वये तपसिलें कलों आला. पत्राचें प्रत्योत्तर येत नाही म्हणोन लिहिलें. यैसियासी आम्ही माही पूर्णमेकरितां तुळजापुरास गेलों होतो. याजकरितां प्रत्योतरास दिरंग लागला. सांप्रत तुळजापुरीहून छ २५ रमजानी करमालियासी आगमन जालें. इकडील वर्तमान तरी रा. उदाजी चव्हाण सेनेसह वर्तमान पंढरपुरास आले. पांढरियांचा त्याचा बिगाड वाढला आहे. तेथील निर्गम करुन घेतलियावरी भीमेआलाकडे आमच्या मुलकात यावें यैसा विचार केला होता. हे वृत कललियावरी आम्ही आणखी लोक जमा करून मौजे कुरुडूस गेलों. त्यांचे येणे भीमेआलाकडे जालियावरी त्यांचा आमचा मोकाबिला होवा, हे वर्तमान त्यासी कललियावरी त्यानी भले माणूस पाठविले आणि करार सेफत[१] केला. आपण तुमचे जागिरीत उपसर्ग देणार नाही. कागदीपत्रीं परामृश करून श्नेह रक्षणे तो रक्षावा. त्यानी उपसर्ग मुलकास न दिधलीयाने आम्ही त्याची तफावत करू नये, यैसें परस्परें मधेस्तांच्या विचारें सिधांत जाला. तदनंतर रा. उदाजी चव्हाण भीमातीरें सगर प्रांते मुलकगिरीस गेले. व गोरखोजी भापकर यांचा मजकूर तरी ते इंदापुर देशांतून परस्परें तुळजापूर उजवें टाकून गेले. सांप्रत पंचमाहालांत आहे म्हणोन वार्ता आहे. रामजी बंडगर याने रा। माणकोजी बंडगर यांची फौज आणीकहि टालेटोले जमा करून बालेघाटी चिरंजीव माहादाजीबावाकडील ठाणे आहे त्यासी वेढा घातला होता. आम्ही तुळजापुरास गेलियावरी तोहि वेढा काहडून आफजलपूर प्रांते निघोन गेला. आम्ही श्री ची यात्रा करुन अगदी लोकांस निरोप देऊन करमालियासी आलों. आपणास कलावे याजकरितां तपसिलें लिहिलें आहे. गोसावी यानी राजश्री आपाजी भोडवियाच्याविशयीं दोन तीन वेला लिहिले होतें त्याजवरून आम्ही रांजणगावांस माहालदार पाठविले होतें. त्यासी गोसावियापासून येतांच कबिले व घोडी घेऊन राजणगावातून गेले

---

[१] शफत.

महालदारानी तुकोपंत मुजुमदार बांदल[1]कडील मातबर कारभारी आहे, यासी हजुर आणिलें. त्यास तगादा केला. त्याने सांगितलें जे रा राणोजी सिंदे यानी दबाऊन त्यासी पत्रें पाठविली. त्या दहशतीने अगोधर निघोन गेले असेत. तरी हजीर करीतों. याउपर भोंडवियांचा तलाश करुन हजीर करु देऊन, म्हणोन कतबा लेहून दिधला आहे. गोसावी यांच्या आज्ञेहून भोंडवियाची अगत्य आम्हास काये आहे? आदियापी भोंडवियांचा तलाश सोडिला नाही. आगोटीस तऱ्ही गाठी पडेल. कोठे जातील? गोसावी यानी लिहिलें जे राजश्री स्वामानी बहुत आर्तेकडून दर्शणास बोलाविले. रा नारो पंडित संचीव रा. आनंदराऊ सुमंत व राजश्री आबांजीपंत तात्या राजश्री स्वामीनी पाठविले. आपण राजदर्शणास गेलों. त्यांचा निरोप घेऊन हुताशनीस पुणियासी येत आहोंत. आवंदा सिमगा तुम्ही आम्ही येके जागा खेळावा. कितेक मजकुर बोलावा लागतो म्हणोन लिहिलें. येसियासी राउलास आगत्य तेंच आम्हास. परस्परें दुसरा विच्यार नाही. आपले आज्ञेहून विशश कांही नाही; परंतु नवाबसाहेबांची मर्जीस गोसावी जाणिताती. नवाबसांचें मनोगत रक्षून तीर्थस्वरुप राजश्री बावासाहेब राहताती. दरबारचें वर्तमान व प्रसंग जो होतो तो गोसावियांस परस्परें कलतच आहे. आम्ही पारियाये ल्याहवा येसा नाही. दाभाडियाचा मजकूर लिहिला तरी आम्ही फौजेसहवर्तमान सनिधच आहोंत. प्रसंग तैसाच असेल तरी आम्हास आज्ञा कर्तव्य ते करावी. रात्री दिवस न म्हणतां येऊन पोहचतो याजमुळे बदनामी आली तरी कबूल करून; परंतु सेवेसी यावयासी तफावत होणार नाही. सारांश दाभाडियाकडील काही घालमेल असेल तरी आगत्यरूप आम्हास पत्रें पाठविणे. आपण गोसावियांसनिधच आहोंत येसें चितांत असों दीजे. निकडीच्या कामास आपणापासून तफावत होणार नाही हे मनोमन साक्ष आसे. कर्डे प्रगाणियांत माळजी रणसिंग याजकडील उपसर्ग जाला म्हणोन लिहिले; तरी आम्ही तुळजापूर प्रांते गेलियाउपर त्यानी उपसर्ग दिधला असेल; सांप्रत आपले आज्ञेप्रमाणे त्यांसी ताकीदपत्रें सेफतपूर्वक पाठविली आहेत. आत:पर कर्डे प्रगणियासी त्याजकडील आजार लागणार नाही. घोडे पाहिजेत; तीनशां रुपयाहून जादा किमतीचे ठिकाणी लाऊन लेहून पाठविजे म्हणोन लिहिलें; तरी तमाम लोकांची घोडी मुलुकगिरीस गेले आहेत. कोणी राहिले आहेत, त्याजपासी तलाश करून घोडे ठिकाणी लाऊन लेहून पाठऊन देऊ. गोसावी यानी वळीव मुसनफ जिनाकारणे पाठऊन द्यावी म्हणोन रुबरु आज्ञा केली होंती त्याजवरून मुसनफ वळीव पाठविली आहे. प्रविष्ट

१ आडनांव आहे.

होईल. गोसावी यानी आपले वृत वारवार लेखन केलें पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar to Bajirao that an understanding has been effected with Udaji Chavan who threatened to attack his mahals. He is ever willing, he further adds, to help the Peshwa, should the latter happen to be attacked by Dabhade.*

No. 14] [*November 1732 ?*

श्री

+पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री
आपा स्वामीचे शेवेसी

विनंती. राजश्री उदाजी चव्हाण यांनीं सावळजेस वेढा घातला होता. सुरुंग लाऊन बुरुज उडविला, तेव्हां चव्हणानीं हाला केली, ते गावकरी यांनीं मारून काहाडली, हे वर्तमान स्वामीस विदितच आहे. त्यावर सुरुंग उडविला याजमुळें गावांत पाण्याचा आड होता तो आटला. पाणी नाहीसे झाले. यामुळें लोकांनी हात्यारे सोडून गाव त्यास दिल्हा. घोडीं पंचवीसेक सांपडली. बायका पोळांच्या[१] होत्या त्या सापडल्या व नऱ्होजी म्हसके उभयता भाऊ सापडले त्यास कबिलेसुधां एक एक घोडे देऊन सोडिले. त्यावर सडे स्वारीनसी धावले आहेत. कोणीकडे गेले हे कांही कळत नाहीं. राजश्री नारबावा व येमाजीपंत येथून गेले, ते कामेरीस राहिले आहेत. राजश्री प्रतिनिधींनी राजश्री स्वामीस अर्ज केला की एक पत्र बहुजऱ्या राजश्री नारबावाकडे पाठवावा कीं लौकर जात ऐसे करावें. त्यावरून पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर बावानी लिहिले कीं सावळजेहून चव्हाण सडे स्वारीनसी गेले आहेत. ते कोणीकडे गेले हे ठिकाण लावावयाकरितां चव्हाणाकडील रामाजीपंत, पत्रे व जासूद पाठविले आहेत. त्याचे उत्तर आलियावर कामेरीहून पुढें जाऊं, म्हणून उत्तर आले. राजश्री बोलिले कीं बावा मातबर माणूस गेले आहेत, ते उदाजी चव्हाणास घेऊन येतील तरच येतील. येवढे माणूस गेले ते कार्य केल्याविना उगेच आल्यानें, सातारियातील लोक व आम्ही त्यास कैसे बरे म्हणू ? म्हणून बोलिले. स्वामीस कळावे याकरितां लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji Purandare writes to Bajirao and Chimaji Appa about the movements of Udaji Chavan. Shahu sent Naro Ram and Yemaji Shivdeo against him.*

+ उदाजी चव्हाणाच्या हालचाली अद्यापि बऱ्याच अज्ञात आहेत. त्या उलगडण्यास या पत्राचा उपयोग होईल. पत्र बाजीराव व चिमाजी आपा यांस लिहिलेलें आहे. पत्र महादाजी अंबाजीचें.

१ पोळ आडनांव.

No. 15] [25-11-1732

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

पोष्ये अंबाजी त्रिंबक कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १७ जमादिलाखर जाणून स्वकीये कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. केरोजी आटोले व माणकोजी आटोले मौजे सिरसोफल पा। सुपे याचे भांडणी पत्रे पाठविली ती यादी प्रमाणे प्रविष्ट जाली. स्वामीनी आज्ञा केली की राजश्री स्वामीस विनंती करून उतर पाठवणे व राजश्री पंतसचिव यासहि वर्तमान सांगोन उतर पाठवणे म्हणून स्वामीनी लेहून पाठविले. त्यास आजी छ मा।री शनवारी प्राथःकाली राजश्री स्वामी पालीस गेले. आम्हीहि समागमे गेलो. त्यास राजश्री संभाजी राजे दर्शनास येणार. मार्गसीर्ष बहूल सतमी इंदुवारी भेटीस मुहूर्त आहे. विदित जाले पाहिजे. उभयेता आटोलियाचे वर्तमान प्रसंग पाहून विदित करून. उत्तर घेऊन पाठऊन देऊन. राजश्री स्वामीचे उतर घेतलियावर राजश्री पंतसचिव यास वर्तमान सांगोन त्याचेहि पत्र घेऊन पाठऊन देऊन. विदित जाले पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Ambaji Trimbak to Bajirao, saying that the King Shahu has gone to Pali and that Tuesday (27th November 1732) has been fixed for the interview between King Shahu and Sambhaji.*

No. 16] [23-9-1733

छ २९ रालाखर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
राऊ तथा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री उदाजी चव्हाण याचा मजकूर भृगुवारी जाला तो सेवेसी लेहून पाठविला तो विदित जालाच असेल. त्यावरी दुसरे दिवसीं मंदवारीं राजश्री धनाजी जाधव यास वस्त्रे व्हावीं, तीं ते दिवसीं राहिली. त्यावरी छ २९ रबिलाखरी रविवारीं त्रितिये प्रहरीं दरबार जाला. चव्हाणाकडील कारकून रामाजीपंत जाहागिरदारीची यादी घेऊन आले होते. ती यादी राजश्री स्वामीनी व सरकारकुनानी पाहिली. तिची नकल राजश्री स्वामीनी

करून घेतली आणि त्यास पत्रें पाठविलीं कीं, राजश्री येसाजी सिंदे व लिंगोजी जाधव यांस पाठऊन देणे म्हणून पत्रें लेहून देऊन रामाजीपंतास सेला तिवट दोन वस्त्रे देऊन, लाला भवानीदास याजकडील देवराव कारकून समागमे देऊन रवाना केले. तों सायेंकाल होत आला. राजश्री धनाजी जाधव यांस दरबारीं बोलाऊन आणिले. राजश्री प्रतिनिधीसमक्ष विडे द्यावे यैसें राजश्री स्वामी बोलिले. त्यावरी प्रतिनिधीहि बोलिले कीं विडे द्यावे. इतकी मात्र निस्चयात्मक बोली जाली. त्यावरी राजश्री स्वामीनी अमात्यपंतास आज्ञा सांगून पाठविली कीं, चव्हाणास सरंजाम होता त्याच्या सनदा धनाजी जाधव यांचे नांवें तयार करणे. इतके सांगून पाठविलें. त्यावरी होम द्यावयाचा काल जाला. राजश्री प्रतिनिधीस होम द्यावयास निरोप दिल्हा. ते उठोन गेले. त्यावरी राजश्री फतेसिंगबावा व बावा मंत्री व येमाजीपंत व आम्ही होतों. तेव्हां राजश्री स्वामीनी धनाजी जाधव यांस विडे द्यावयाचा उपक्रम केला. तेव्हा बावा मंत्री बोलिले कीं, प्रतिनिधी उठोन गेले; त्यासमक्ष विडे देणे तर द्यावे. उदईक दिल्हे तरी कार्यास येतील. यैसें बोलिले. इतका मात्र मजकूर जाला. सारांष गोष्टी, राजश्री फतेसिंगबावा व प्रतिनिधी व बावा मंत्री व सर्वांचे चितांत धनाजी जाधवाची गोष्टी हेंटालीची दिसोन येते कीं, यास सरंजाम दिल्याने, याजवल फौज कैची ? आणि यांच्याने होणे काये ? यैसे समस्तांचे चितीं आहे. पुढें काये होईल मनसबा तो पाहावा. जालें वर्तमान स्वामीस कलावें याकरितां लिहिले आहे. चव्हाणाचे जाहागिरीचे यादीची तालीक पाठविली आहे, त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Purandare writes to the Peshwa and Chimaji Appa about the affairs of Dhanaji Jadhao and Chavan. The King wanted to wrest the Saranjam from Chavan and to transfer it to Dhanaji Jadhav. This was not approved by Fatesing, Narbawa and Pratinidhi, the last of whom had however apparently to consent to it.*

No. 17] [*January 1734 ?*

श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री बाजीराऊ यांसी चिमणाजी दामोदर आसीर्वाद. येथील कुशल जाणौनू स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें पावोन बहुत संतोष जाहला. यैसेच सर्वदा पत्रीं परामर्ष केला पाहिजे. संक्रमणाचे तिलगूल पाठविला तो पावला. हे आमचें स्मरण करून तिलगूल पाठविला, त्यावरून संतोश जाहाला, तो पत्रीं कोठवर ल्याहावा.

लोकांत कळलें कीं यावर दया आहे. वरकड तुम्हाखेरीज आमचा परामर्ष करावयास कोण आहे ? आमचे म्हातारपण आहे. जो सांभाळ कराल तो थोडा आहे. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दिल्हा पाहिजे. हे आसीवाद.

¶Chimnaji Damodar, once a powerful Sardar and Peshwa of King Sambhaji, returned to his allegiance to Shahu but was afterwards reduced to pitiful straits which are mentioned in this letter. His desertion to Sambhaji was probably the cause of his ruin.

No. 18] *[10-2-1734 ?*

श्री

राजश्री चिमाजीराव आपा गोसावी यांसी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो जानोजी निंबालकर कृतानेक दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून गोसावियानी आपले निजानंद लिही ती आज्ञा केली पाहिजे. यानंतर कृपा करून पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लिहिला अर्थ तपसिलें कळो आला. राजेश्री राऊ प्रधान सतरुसीस राजश्री स्वामीनिदर्शणास रा नारबा व रा आनंदराऊ सुमंत व रा आंबाजीपंत पाठऊन घेऊन गेले. तेथील मजकूर होईल तो लेहून पाठऊन म्हणोन लिहिले. तरी मेहेरबानी करून राजश्री राऊ प्रधान यांचे वर्तमान वारंवार लिहित जाणे. याउपर महाडास फौजा गेलिया आहेत त्याचे वृत लिहिले तेहि कळले. तिकडील वर्तमान येत जाईल ते ल्याहावयाची आज्ञा केली पाहिजे. कर्डे वगैरे प्रगणियाचा मजकूर लिहिला; तरी गोसावी यांच्या आज्ञेवरून रा माल्जी रणसिंग यासी ताकीद केली आहे. आम्ही तुळजापुरास गेलो होतो. या प्रांते नव्हतो. तो-पावेतो माल्जी रणसिंग याणी कोठे उपसर्ग दिधला असेल तो आम्हास विदित नाहीं. आपण करमाळियास आलियावरी गोसावियाचें पत्र आलें, रात समई कळले. आत:पर त्याजपासून आंतराये होणार नाही. आम्हाकडील वर्तमान तरी रा उदाजी चव्हाण भीमातीरास पंढरपुरावरी आले. पांढरियांचा त्यांचा कथला वाढला होता, तो वारून भीमेआलाकड आमच्या मुलकात धामधूम करावी ऐसें त्यांचे मनोगत होते. हे वर्तमान कळलियावरी आम्ही आवघे लोक जमा करून मौजे कुरूडूस गेलो. त्यानी आलाकड धामधूम केलियाउपर आमचा त्यांचा मोकाबिला होवा तो त्यानी आपले भले माणूस पाठविलें जे, आपण तुमच्या मुलकास उपसर्ग देत नाही. परस्परे स्नेह कडून राहावे येसा मधेस्त भले माणसानी निछये केला. आणि करार प्रमाण करून भीमातीरे सगर प्रांते त्याचें लष्कर गेले.

1030

आम्ही माही पूर्णेमेकरितां तुळजापुरास गेलो. बालेघाटी चिरंजीव रा माहादाजी-बावाकडील ठाणे होते तेथे रामजी बंडगर यानी वेढा घातला होता. आम्ही तुळजापुरास गेलियावरी बंडगरानी वेढा काहडून निघोन आफजलपूर प्रांते गेला. आम्ही श्रीची यात्रा करून छ २९ रमजानी करमालियासी आलो. गोसावी यासी कळावे याजकरितां लिहिलें आहे. सदैव पत्रीं साकल्यार्थ लेखन करून परामृश करावयासी आंतर न कीजे. बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे हे विनंती.

¶*The Nimbalkars were on terms of intimacy with the Peshwa. Janoji Nimbalkar of Karmala to Chimaji Appa communicates his willingness to accede to the wishes of the addressee.*

No. 19 [18-4-1735 ?

श्री

राजश्री चिमणाजीपंत गोसावी

यांस

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री शंभुसिंग जाधवराऊ दंडवत उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ कळों आला. राजश्री संभाजी राजे राजश्री स्वामीच्या दर्शनास येणार येदनिमित्य आपण गडांस आलो म्हणून लिहिले; तर प्रसंगी आपण असावें, उचित आहे. राजदर्शन जाहलेनंतर सविस्तर वर्तमान लिहिजे. येथील वर्तमान तर बीड प्रांतीच्या तहाकरितां राजश्री आपाजी सोमवंसी फौजा घेऊन या प्रांती आले. तहाकरितां सादतखान व राजश्री मालोजी नाईक निंबालकर आले आहेत. उदैक सैदलस्करखान याची भेट होऊन तहरह जों होईल ते वर्तमान आपणांस लेहोन पाठविलें जाईल. छ ९ जिल्हेज. सूज्ञाप्रति विशेष लिहिणे नलगे.

(श्रीराजा शाहू छत्रपती चरणी दृढभाव सभू-सिग जाधवराव.)

(मोर्तब सुद.)

¶*Shambhusing Jadhav writes to Chimaji, who had gone to Satara to be present at the interview of Sambhaji of Kolhapur with Shahu Chatrapati, that the details of the meeting be reported to him. The treaty with the Nizam as regards the province of Beed will soon be finally settled.*

No. 20] [1735 ?

श्री

पुं+रवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. स्वामीनी महिमाजी पलांडे याच्या जमावातील सिपायाबराबर पत्र पाठविले तेथे लिहिले की, इचलकरंजीस राजश्री संभाजी राजे याणी पहिले वेढा घातला होता व गावावर हलाहि केली होती; परंतु गावकरी यानी हला मारुन काहाडली यास्तव वेढा उठऊन गेले होते. प्रस्तुत मागती वेढा घातला आहे व त्यास साहायासी राजश्री येमाजीपंत व माहादजी घाटगे जातात. यैसियासी इचलकरजी वगैरे ठाणी राजश्री वेकंटराऊ याची आहेत; ते तीर्थरूपाबराबर गेले आहेत. यैसे असतां ठाणी मागे घ्यावीं, हे विहित नाही व आमचा लौकिक राहात नाही; तरी तुम्ही राजश्री स्वामीस विनंती करून राा येमाजीपंतास व राजश्री माहादाजी घाटगे यासी राजश्री स्वामीची पत्र घेऊन पाठवणे की तुम्ही तिकडील साहित्यास न जाणें, म्हणून स्वामीनी लिहिले; यैसियासी राजश्री संभाजी राजे याचे पत्र राजश्री स्वामीस आलें कीं नवाब बागलकोटास आले; पुढें आपल्या राज्यातील ठाणी व लोक जागा जागा आहेत, त्यास उपद्रव देतील. यास्तव राजश्री येमाजीपंतास आज्ञा करून आम्हास सामील होत ते करावे, म्हणजे ते व आम्ही येक विचारे करणे ते करू. व उदाजी चव्हाण याची ठाणी ह्या प्रांतात आहेत त्यास पहिले तह जाहाला असता ठाणी त्याणी ठेवावी यैसे काये आहे? त्याकरिता तोहि विचार करणे तो करू म्हणून लिहिले. त्यावरून राजश्री स्वामीनी राजश्री येमाजीपंतास पत्र लिहिले कीं, उदाजी चव्हाणाची ठाणी खेरीज करून वरकड साहित्य चिरंजीवाचे सर्व प्रकारे करणे. यैसे पत्र लेहून पाठविलें व राजश्री संभाजी राजे यासीहि लिहिले की उदाजी चव्हाण आपल्या राज्यात असता विरुध करावे यैसे नाही. वरकड आपल्या सांगितल्याप्रमाणें सेवा करतील. यैसे लेहून पत्रे पाठविली. राजश्री संभाजी राजे याजकडील कारकून व हुजऱ्या पत्रे सदरहू घेऊन आला होता. स्वामीनी लिहिले त्या पूर्वीच हा कारभार उरकला. अजी राजश्री प्रतापगडास गेले. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. घोरपडेयाकडील ठाण्याविसी स्वामीनी आम्हास लिहिले होते ते पत्र राजश्री

+ पत्र माहादाजी आंबाजीच्या हातचें आहे.

नारबावास आम्ही दाखविले. त्यावर बावानी स्वामीस पत्र लिहिले त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana to Chimaji. The Nizam was pressing against Kolhapur and King Sambhaji asked Shahu's help. In the meantime Sambhaji attacked and captured Ichalkaranji, the town of Bajirao's sister's husband Vyankatrao Narayan, who was away with Bajirao in the North. Chimaji Appa requested Shahu to write to Sambhaji and ask him to desist from molesting Vyankatrao Narayan. This affair grew very troublesome and was settled personally by Shahu with Sambhaji, who was called to Satara for that purpose.*

No. 21] [*25-2-1736*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. चाकरमान्या पाटलांचा मजकूर वाईचे मुकामीहून स्वामीस लेहून पाठविला. त्या अलीकडेहि दोन च्यार वेळ लिहिलें परंतु अद्यापि काहींच उतर आलें नाही. राजश्री स्वामी नित्य पुसतात. त्यावरी आजी छ २१ सवाली वाघाचे सिकारीस जाऊ लागले, तेंव्हा पाटलांबदल चोपदार पाठविला. दरबारास जातों तेव्हां आपण खासाच पुसतात. त्यास आम्ही उतर काये द्यावे? पाठवितो अगर नाहीं पाठवीत हे स्वामीचे उतर काहीच येत नाही. येथे आम्ही जाबसाल काये करावा? ये गोष्टीस आम्हा चाकर लोकांचा उपाये काये आहे? दरबारी भरले सदरेस बोलू नये ते आम्हास बोलतात ते समई उतर काये करावें? पाटलाविषीं उत्कंठा फार धरली आहे. पाटील सत्वर पाठवावे. राजश्री रामचंद्र हरी यास स्वारादेखील सत्वर आणवावें. कोल्यास जमीन देविली आहे, त्याच्या सनदा करून देऊन समजावीस करावी. कुतेबाजाच्या पांघुरणाविषीं बहुत वेळ लिहिलें, परंतु त्याचेहि कांही उतर येत नाहीं. तो नित्य उठोन आम्हासी कटकट करितो; तरी त्याची काये आज्ञा ती लिहिली पाहिजे. सारांष त्याच्या पांघुरणाची विल्हे करून त्याची समजावीस होये यैसी आज्ञा केली पाहिजे. सदरहू मजकुराची उतरे छ २३ सवाल बुधवार प्रात:कालपर्यंत आलीं नाही तरी राजश्री रामचंद्र हरीस स्वारादेखील आणावयास कारकून माणसे बरे चालणार राऊत टाकोटाक पाठवावे आणि येक पत्र राजश्री स्वामीस आधी आधी रवाना करावें कीं राजश्री रामचंद्र हरीस आणविले, सत्वरच येतील, म्हणून पत्र लेहून जासुदास ताकीद

करून येक दिवस येक रात्र वाट चालून जाब येथे येऊन पोंहचे ते करावे. विदित जाले पाहिजे. दरबारी+ आब राहे ते गोष्टी स्वामीनी करावी विदित जाले पाहिजे सेवेसी विज्ञापना.

¶*Purandare asks Chimaji to reply to several queries of Shahu who had become impatient at the Peshwa's indifference towards him. The town of Ichalkaranji formerly belonging to the Senapati Ghorpades was in the possession of Vyankatrao Narayan, brother-in-law of Bajirao. This Vyankatrao, backed by the influence of the Peshwas, used to give trouble to Sambhaji of Kolhapur. The latter sent his troops against Ichalkaranji. Vyankatrao Narayan therefore asked the Peshwa for assistance. The Peshwa sent Ramchandra Hari Patwardhan to Vyankatrao's help. This enraged Sambhaji who made a strong protest to Shahu that Ramchandra Hari's entry into Kolhapur territory was a violation of the treaty of Warna, and if Ramchandra Hari did not go back Sambhaji plainly asked Shahu whether he would call in the Nizam. This opened Shahu's eyes to the danger of the situation and he at once ordered the recall of Ramchandra Hari. The Peshwas were slow in executing Shahu's orders on this subject and hence the reference to their indifference in this letter. Shahu called Sambhaji to Satara and in his usual way conciliated him by personal influence.*

No. 22] *[3-3-1736*

छ ४ जिल्काद

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. दरबारचे वर्तमान तरी छ ३० सवाली बुधवारी राजश्री स्वामी चहूं घटका रात्री उठोन सिकारीस गेले ते संध्याकाळीं आले. त्यावरी सदरेस बसले. दरबार भरला. आम्हींहि दरबारास गेलों. त्यावरी रामचंद्र बावाजी व ज्ञानोजी वेताळ आले. त्यानी राजश्री स्वामीस विनंती केली कीं राजश्री संभाजी राजे यांचे पत्र माहाराजास आले आहे तें वाचून पाहावें आणि आम्हास आज्ञा माघोर जावयास द्यावी. त्यावरी राजश्री स्वामी चिटणिसास बोलिले कीं हा कागद वाचून दाखवणे. त्यावरी चिटणासानी कागद वाचिला; तेव्हां स्वामीच्या राऊतांचा उपक्रम पत्रीं होता तो राजश्रीनी श्रवण केला; त्यावरून आम्हासीं कितेक विषदें करून बोलिले आणि आम्हास फिरोन पुसिलें कीं उतर काये निमित्य करीत नाही? येसे बोलल्यावरी आम्ही बोलिलों कीं माहाराजानी पहिलेंच आज्ञा केली त्यावरून येकदोन पत्रे व माणसे तिकडून जमाव आणावयास पाटविलीं आहेत. पंचमी

+ पत्र दादोबा पुरंदरे यांचें.

राष्ट्रीस जमाव पुण्यास जाईल. इतके बोलल्यावरी जानोजी वेताल बोलला कीं आम्हास माघारे येणे म्हणून आज्ञा आली आहे; तरी माहाराजानी निरोप दिल्हा पाहिजे. येसा बहुत अतिशयें करून बोलिला. त्यावरी राजश्री बोलिले कीं धारराव यादव यास पांच सा दिवस सुतक आहे. सुतक फिटेतोवर राहणे. आम्हीही राजश्री संभाजीराजे यांस पत्राचे उतर लेहून पाटवितों. त्याचाहि जाब येईल; मग तुम्हास निरोप देवून रवाना केले जाईल. येसें बोलल्यावरी चिटणासांस आज्ञा केली कीं राजश्री संभाजीराजे यांस पत्राचा जाब लिहिणे कीं राजश्री चिमाजीपंताचे फौजेचा मजकूर लिहिला तरी त्यांस आज्ञा केलीच आहे. त्यांजकडील जमाव उठोन येईल. घोरपड्यांचा मजकूर तरी त्यांस पत्र लेहून पाठविलें आहे. त्याचा कारकून येथे येईल तेव्हां घोरपड्यांचे ह्रद्र मनास आणून पुढे जो विचार करणे तो केला जाईल. भेटीचा मचकूर तरी आम्ही पालीपावेतो जाऊं. सामोरे राजश्री फतेसिंगबावा व प्रतिनिधी व मंत्रीं यांस पाठऊन देऊं. येसा जाब लेहून देणे म्हणून चिटणिसास सांगून जाब लेहून देविला. त्यावरी दरबार दाहुडला[१]. तेथून कागद आलें आहेत त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत. त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji, communicating Shahu's intentions to call Sambhaji for a visit to Satara.*

No. 23] [*7-3-1736 ?*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसांवी यासी.

ॐ श्रीसकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ता। ४ जिलकाद जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. काली छ ३ रोज मिनहूस रात्रौ सदरेस राजश्री स्वामीस राजश्री संभाजी राजे याचे पत्र आले. त्यास राजश्रीनी लिा होते की, राजश्री पंतप्रधान याची फौज येऊन मौजे * (ह)लकरणी यासी वेढा * * * * गाव खासगीचा आहे. यैसा कितेक फौज नेऊन उपद्रव केला म्हणून बहुत श्रमी होऊन लिा त्यावरून राजश्री स्वामी बोलिले कीं येक राजश्री पंतप्रधान आज्ञेखरीज उतरेस गेले; आणि सार्वभौमाचे दर्शन घेऊन कितेक मनसबे करणार म्हणौन वर्तमान यैकतो! यैसेच पेशजी

---

१ निरोप दिला.

जंजिरियाचे स्वारीचे वेलस हबसी याचे संरक्षण केले. सरखलीचा ग्रहभेद केला. सांप्रत फौज पाठऊन बंधूसी युध्य करितात ते आम्हांसी युध्य करावयास कोठे आंतर करितील ? यैसे क्षणक्षणा सिकारीत(व) सदरेस भाषण करितां(त) त्यास वरकड लोक तेच गोष्टीस आनुमोदन देतात!! यैसियास आम्ही पूर्वी आपणास लिा होते कीं, सांप्रत इकडे काही कामकाज नाहीं. यास्तव राजश्री रामचंद्रपंतास[1] तिकडे ठेवावे हा विचार लिा होता. त्यास येथील मरजी या प्रकारची देखिली. यावर आपणास फौज आणावी हा विचार लिा. त्यास आपण फौज आणावयास लिा आहे म्हणौन लिा त्यांस सांप्रत येथे वर्तमा(न)या प्रकारे यैकतो. यैसियास घोरपड्याचे जे होणार ते सुखरूप हो. यथील मरजी-करितां राजश्री रामचंद्रपंतास आविलंबे पत्र पाठऊन बोलाऊन आणविले पाहिजे. येविशी आनमान केला न पाहिजे. येथील मरजीनुरूप झाले वर्तमान विदित व्हावे यास्तव लिा आसे. (वरकड) दरबारचें वृ(त) राजश्री दादोबा याणी आपणास लिा आहे त्यावरून विदित होईल. सारांश फौज आविलंबे माघारी आण-विली पाहिजे. विशष काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती

श्रीपांडुरंगचरणी
दृढभाव चांगोजी सुत
पिलाजी जाधव

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao asks Chimaji Appa to recal Ramchandra Hari Patwardhan from the territory of Sambhaji of Kolhapur, who had complained to Shahu of the Peshwa's high-handed dealings in the region of Kolhapur.*

No. 24] [*22-3-1736*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. छ २० सवालीं रविवारी प्रात:कालीं राजश्री स्वामीनी आम्हास बोलाऊन दरबारास नेले आणि पुसीलें की राजश्री चिमाआपाचे पत्राचे उतर आलें की नाहीं ? राऊत व रामचंद्र हरीस आणवितांत की नाहीं ? त्यावरी आम्ही उतर केले की आज उद्यां जाबही येईल आणि राऊतहि आणवितील. त्यावरी चाकरमाने पाटील आले की नाहीं ? सिमग्याची मुदत केली होती; सिमगा. जाला, अद्यापि आले नाहीं,

[1] रामचंद्र हरि पटवर्धन ?

तरी त्याचा कार्य विचार तो सांगणे. नाहीं तरी याउपरी हुजरून मसाले[1] करून हुजरे पाठऊन आणविले जातील यैसे बोलिले. त्यावरी आम्ही बोलिलों, दोन च्यार वेळ लिहिले आहे. सत्वरच येतील. तरी स्वामीनी पाटील सत्वर पाठऊन दिल्हे पाहिजे. कोळ्यांस जमीन देविली आहे त्याविषी दोन तीन वेळ लेहून पाठविले आहे. त्याची ताकीद हुजुरुन बहुत आहे. तरी जमीन नेमून देऊन समजावीस केली पाहिजे; रिकामे न पाठवावे. कुतेबाजाच्या पांघुरणाविषी बहुतच निकड लागली आहे, तरी सत्वर पाठविली पाहिजेत. राजश्री रामचंद्र हरीस राऊतांसह वर्तमान तिकडून अविलंबे यावयाची आज्ञा केली पाहिजे. त्यांस लेहून पाठवावे की आधी स्वार होणे, मग पत्र वाचणे; यैसे लेहून आणविले पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*Purandare communicated Shahu's orders to Chimaji, for the recal of Ramchandra Hari from Kolhapur territory.*

No. 25] [*22-3-1736* ?

पौा छ २० शौवाल

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री आपा स्वामींचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री संभाजी राजे यांजकडील दरबारी मजकूर जाला. तेव्हां राजश्री फतेसिंगबावा सन्निध होते. त्यानी आईकीला. त्यावरून त्यानी आपलें पत्र स्वामीस लेहून दिल्हें ते पाठविलें आहे. त्यावरून विदित होईल. त्याचेहि उत्तर पाठऊन द्यावे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare sends to Chimaji Appa a letter in which Fatesingbawa gives his own point of view regarding the affairs of Sambhaji.*

No. 26] [*March 1736* ?

पौा छ २० शौवाल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. दरबारचे वर्तमान आलाहिदा लिहिलें आहे त्या मजकुरांत मजकूर: राजश्री वेतालासी बोलिले कीं घोरपड्यास व भगवंतरायास आपले

---

[1] दंड.

स्वसंतोषें पदरीं घेऊन इमान प्रमाण करून वर्तवीत असिले तर तो योग घडऊन देऊं. नाहीतरी त्यास बाहेर घालावयाचे असिलें तर तेच सेवा सोडून मोगलाईत जातील. पदरीं घेत असिले तर सौरष करून देऊं यैसे बोलिले. +सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Ramaji Mankeshwar Potnis writes to Chimaji Appa Shahu's desire to effect a reconciliation of the Ghorpades and the Amatyas with the Peshwa.*

No. 27] [*March 1736*

श्री

१पुरवणी तीर्थरूप राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामीनी पत्र पाठविले आहे आणि स्वामी पर्याय लांऊन पत्र लिहितील, "रा रामचद्र हरी फौज येत नाही," म्हणून स्वामी लिहितील. चाकरी आमची टाकिली म्हणून लिहिलीयाने राजश्री स्वामीची मरजी राहणार नाही. याकरिता दोन तीनसे स्वारानसी पुणियांस आणावा. सवेच स्वारास त्यास निरोप द्यावा; परंतु घेऊन यावे, हे उतम आहे. स्वामी म्हणतील की, दीडसे स्वार पुणियाहून तिकडील होते ते गेले. ते येत नाहीत. यैसे म्हणतील तर खरे वाटत नांही. राजश्री त्रिंबक हरी याजपासी स्वार आसतील ते च्यार दिवस समागमे आणून आपले निमित्य वारावे हे उतम गोष्ट आहे. राजश्री स्वामी सदरेस बोलिले की, राजश्री संभाजी राजे याची मरजी राहावी याकरिता आम्ही उदाजी चव्हाण यांस निरोप दिल्हा. त्याचे ऊर्जित केले नाही. तो मोगलाईत गेला. राजश्री संभाजी राजे त्यास जे गोष्टी आगत्य ते आम्हास करणे जरूर. यैसे कितेक प्रकारे भाषण केले. त्यास स्वामीनी राजश्री रामचंद्र हरी व फौज येकवेळ माघारी आणावी. राजश्री स्वामीच्या पत्राचे उतर आधी रवाना करावे. सेवसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Dadoba Purandare requests Chimaji Appa to bring back to Poona Ramchandra Hari and thus to avoid the King's disfavour. The King said in Darbar that it was in order to secure the good will of Sambhaji that Udaji Chavan was sent away. When Udaji went away thus dissatisfied he joined the Nizam.*

+ पत्र रामाजी माणकेश्वराचें.

१ पत्र दादोबा पुरंदरे याचें आहे.

No. 28] [पो॥ 7-5-1736 ?

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी विनंती. स्वामीनी लिहिले की राजश्री उदाजी चव्हाण याचे राजकारण निजामन्मुल्क याजकडे आहे. यैसियासी चव्हाण मातबर सरदार, राज्यातून जाऊ द्यावे येसे उतम नाही. यास्तव तुम्ही राजश्री स्वामीपासी पष्ट विनंती करून त्याचे मतलब असतील त्याची काही तोडमोड करून राज्यात राहात ते करावे. कदाचित गेलेच असिले तरी तुम्ही त्यासी कागदीपत्री त्यासी स्नेह रक्षणे म्हणून विस्तारे लिहिले. येसियासी राजश्री स्वामी जेजुरीस आले होते, ते समई आम्ही सिवापुरचे मुकामी विनंती चव्हाणाचेविसी केली. बरे, यैसे बोलिले, परंतु काही फलादेशास गोस्ट न आली; यामुले ते नवाबास भेटले. परंतु अद्याप काही जाहागिरीच्या परवान्यावर दस्तक जाहाले नाही. पुढे होईल ते सेवेसी लेहू. राजश्री स्वामीस काही राज्यभाराविसी विनंती केल्यास परिणाम जाईल न जाये हे स्वामीस विदितच आहे. नवाबाकडे बातमीस जोड्या पाठवितो, तेव्हां राजश्री उदाजी चव्हाण यासीहि पत्रे लिहीत असतो. त्याचीही पत्रे आम्हास येतात. कागदीपत्री राबता राखणे तो राखीतच आहो. विदित जाहाले पाहिजे + हे विनंती.

¶*Purandare to Bajirao, who had proposed to Shahu to conciliate Udaji Chavan and prevent him from going over to the Nizam. Purandare replies that Shahu so far had taken no action.*

No. 29] [10-5-1736

श्री

पुा राजश्री पिलाजी जाधवराऊ
गोसावी यांसी

उपरी. राजश्री संभाजी राजे यांचे व घोरपड्यांचे सौरष[१] जालें. सुलतानजी सि * * (तोले) घोरपड्यानी धरले होते त्यांस सोडावें * * पहिले आपाजी सितोले ज्याप्र (माणे घोर) पड्यांचा कारभार करीत होते त्या * (सुल) तानजी सितोले यानी घोर (पड्याचा कार) भार करून सेवा करावी; दाहा (हजार रुपये) सितोल्यांकडे घोरप (ड्याचे) होते ते सितोल्यांकडे * *

+ पत्र चिमाजी आपाचें.

१ मैत्री, तह.

* * * जी घोरपड्यांचे * * (संभा) जी राजे यानी राजश्री * * * * टुन मागितले त्यावरून घोरपड्यांस भिडेस घा(तले); रुपये घोरपड्यांस रोख द (ण्याची बो) ली करविले; घोरपड्यानी दि * राजश्री स्वामीनी घोरपड्यांच्या घ(रास) जाऊन घोरपड्यांस घेऊन राजश्री संभाजी राजे याजकडे वाडियांत आले. भेट केली, ते समयीं सेनापतीची वस्त्रें व देशमुखीची वस्त्रें राजश्री संभाजी राजे यानी घोरपड्यांस दिल्हीं. इचलकंरजीचे ठाणे मागून घेतले होतें तेंहि राजश्री स्वामीनी पांच हजार रुपये घोरपड्यांस दिल्हे होते ते राजश्री संभाजी राजे याही त्यापासून घेऊन इचलकरंजी व ठाणे देखील इनाम आपले तर्फेने घोरपड्यांस दिल्हे. राजपत्रें सेनापतींची व इचल-करंजीचे इनामपत्र यैसीं दिल्हीं. सितोले यांच्याही भेटी तेथेच जाल्या. त्यावरी राजश्री संभाजी राजे घोरपड्यांच्या डेन्यास बहुमा(ना)स्तव गेले. परस्परें प्रीती * * * * ते जाले. त्यावरी राजश्री संभा (जीराजे) सफरीं येथून स्वार होऊन * * * * * लास गेले. घोरपडे * * * * त आजी उद्यां जाती (ल तु) म्हास कलावे या करि (ता) लिहितां पुर्वत नाही * * * हिला आहे. राजश्री * * * कडून कागद पत्र येऊ * * * नाही. आलीयावर लेहून पाठ (वीन). छ ११ सफर बहुत काय लिहीणे.

पो. छ १७ सफर

लेखन सीमा.

¶This letter refers to the visit of Sambhaji Raja of Kolhapur to Shahu at Satara in the summer of 1736. Shahu brought about a reconciliation between Sambhaji and his Senapatis the Ghorpades. The town of Ichalkaranji had been given by Sambhaji in inam to the Ghorpades.

No. 30] *[24-5-1736 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. घोरपडे येथे आल्यादिवसापासून त्याच्या समजाविसीची घालमेल पडिली होती. यैशास छ २३ मोहरमी इंदुवारी त्रितीये प्रहरी दरबार जाला. येथील सामादिक व राजश्री संभाजी राजे यांजकडील सामादिक व घोरपडे यैसे अगदी दरबार जाला; तेव्हां घोरपड्याचा समजाविसीचा मजकूर राजश्री स्वामीनी राजश्री संभाजी राजे यांजकडील मध्येस्तास पुसिला. त्यांनी उतर केले कीं

(घोर)पड्याच्या सरंजामापैकीं दाहागांव सितोल्यास होते ते घोरपड्यानी द्यावे म्हणजे सौरस होऊन पदरीं घेतील. नाहींतर सौरष होत नाही; चितास येईल तिकडे सुखरूप जावें. त्यावरी घोरपड्यांकडील बोली मनास आणिली. त्यांचाहि मानोदये दिसोन आला कीं दाहा गांवपैकी येक गांव आकवली म्हणून आहे तितका मात्र देऊं. यासिवाये काहीं देवत नाहीं, म्हणून दुतर्फा उतरे पष्ट आली. त्यावरून समजाविषीचा विचार परिछिन्न राहिला. यैसें उभयेपक्षीं जाले. दरबार बुंडला.[१] त्यावरी फिरोन राजश्री संभाजी राजे याहीं राजश्री धारराव यादव व रामचंद्र बावाजी वे (ताल या) त्रिवर्गाबराबर राजश्री स्वामीस सांगून पाठविले कीं आमचा आणि या स्थलाचा रुणानबंध यैसा आहे कीं यावे तेव्हां सौरषानें[२] यावें आणि जाते समई विरस होऊन जावें. यैसाच महिमा आहे. हे वेलेसहित च्यार वेले येणे जालें. परंतु चहू आगमनी जातां विरसच घडोन आले. आरंभी आलो तेव्हा जाते समई देण्याघेण्याच्या माारास्तव विरस जाला. दुसरे आगमनी राण्या आल्या नव्हत्या म्हणून विरस जाला. तिसरें आगमनी मातुश्री ताराबाईसाहेबाच्या राहाण्यास्तव विरस जाला. चौथे आगमी घोरपड्याची समजावीस न जाली. हाहि लौकिक उतमच जाला! त्यावरी राजश्री स्वामी बोलिले कीं दाहा गांव (घोर) पड्याकडेच करार असो द्यावे. त्यास पदरी घ्यावे. सौरष करून जावें. त्यावरी हे बोलिले कीं दाहा गांव देऊन कधीतरी पदरी घेत नाही. आमची ठाणी जागी जे त्यांजकडे आहेत ते रिकामे करून द्यावे. आपली वस्तभाव कुल अगदीं काढून न्यावी. जागे ठाणीठुणी तमाम खाली करून द्यावी. सुखरूप मनमानेल तिकडे जावे. परंतु साहेबीं न ठेवावें. दुसरेकडे जातील तिकडे जाऊं द्यावें. त्यावरी राजश्री स्वामी बोलिले कीं तुमची स्थलें तमाम तुमचे स्वाधीन केल्यावर आम्ही त्यास ठेविले तर प्रत्यवाये काये आहे? यैसे त्यांचे यांचे परस्परे संभाषण बहुत जाले तें पत्रीं काये म्हणून ल्याहावें? संभाषणाचे समईं फिरोन राजश्री फतेसिंगबावास व राजश्री प्रतिनिधीस व राजश्री नारबावा मंत्री यास बोलाऊन दरबारास नेले आणि त्रिवर्गास राजश्री संभाजी राजे यांजकडे पाठविलें, आणि घोरपड्यांची समजाविसीचा विचार निप्रांजल करून पुसिला. घोरपड्यानी तमाम ठाणीठुणी रिकामी करून निर्वेध करून राजश्री संभाजीराजे यांचे स्वाधीन करावें यैसा निश्चये जाला. मंगलवारी स्वार व्हावयाचा मनोदये होता. परंतु त्रिवर्गास समागमें सांगून पाठविले कीं अमावाशा होऊन प्रतिपदेस स्वार होऊन जावें. त्यावरून अमवाशापर्येत रा(हिले). इतका मजकूर इंदुवारी प्रहररात्रपर्येंत जाला. त्यावरी दुसरे दिवसीं भोमवारीं

---

१ संपला? २ खुषीनें आनंदानें.

दोनप्रहरीं राजश्री सभाजीराजे खासाच दरबारास गेले. सरकारकून तमाम गेले. राजश्री संभाजीराजे यास सा वस्त्रें मुहूर्तेंकरून निरोपाचीं दिल्हीं. उतम तरवार सोनेरी परजाची दिल्ही. येक पदक दिल्हे. त्यावरी निरोप घेऊन आपल्या वाडियात आले. मग राजश्री स्वामी बोलले कीं घोरपड्याची समजावीस त्याच्यानें होत नाहीं. परंतु आपणहि जाऊं द्यावे यैसे नाहीं. त्यांच्या वडिलानीं श्रम साहास बहुत केले आहेत * * * * राजश्री उदाजी चव्हाण यांचा सरंजाम द्यावा आणि ठेवावी इतकी बोली जाली. घोरपड्याचा अगत्यवाद राजश्री स्वामीस आहे याजवरू(न) राजश्री संभाजी राजे श्रमीच आहेत. सितो-ल्यांचा अगत्यवाद त्यांस आहे. स्वामीस कळावे याकरितां लिहिलें आहें. राजश्री त्रिंबकपंताची आमची भेटी जाली नाहीं. त्यास कोणाच्या घरास फिरता येत नाही म्हणून निराळे वाटेनें भेटी जाली नाही. विदित जाले पाहिजे. पुढें होईल वर्तमान तें लेहून पाठऊं.+ मंगळवारीच कलगी जडिताची दिल्ही. जाते-समई सात आठ घोडी देणार. राजश्री येसाजी भोसले याची हतीण देणार आहेत. कांही नख्त व कापड देतील. विदित जाले पाहिजे. सेवेसी विज्ञापना

¶*Malhar Tukdeo Purandare to Chimaji Appa, communicating details of Sambhaji's visit to Satara and the points of dispute with the Ghorpade of Kapsi. Sambhaji's four visits to Satara are graphically described by himself.*

No. 31] [*22-12-1736*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामीच्या व राजश्री संभाजी राजे याच्या भेटी मार्गसीर्ष वद्य सप्तमी इंदुवासरी पालीचे मुकामी जाल्या. तेथून सातारियास आले. समागमे मातुश्री आईसाहेब होती व कबिला समागमे होता. आमच्या वाडियात राहावयास स्थल दिल्हे होते. राजश्री स्वामीनी बहुत आदर केला. हाती घोडे नखत कापड देखील पनास साठी हजार रुपयाचे वित पावते केले. दक्षणप्राते आमल बसऊन द्यावा येसे मान्य करून राजश्री पंतप्रतिनिधि फौजेसह-वर्तमान द्यावेसे केले आणि कितेक समाधानपूर्वक बोली करून निरोप दिल्हे. पौष सुध प्रतिपदेस राजश्री संभाजी राजे निरोप घेऊन पनालियास गेले. विदित जाले पाहिजे. प्रतिनिधि यानी त्या प्रांते जावेसे केले होते. त्यास तुकोपंत नवाब निजामनमुलुक याजकडे पाठविला कीं आम्ही दक्षण प्रांते जातो, सर्वप्रकारे

+ Different hand.

आमचे साहित्य करावे. तिकडील जाबसाल आले नाहीत, दिसगत लागली याकरिता आजीपरियेत प्रतिनिधी सातारा आहेत. विदित जाले पाहिजे. राजश्री येमाजी सिवदेव व बाजी सिवदेव उभयेता बंधूस दोनतीन मास वेथा जाली आहे. त्यामधे बाजीपंतास फार वेथा जाली आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sambhaji of Kolhapur visits Satara and is entertained.*

No. 32] [*1736 ?*

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामिचे शेवेसी

विनंती. घोरपड्याचा उछेद व्हावा हे उभयता राजश्रीस आगत्य आहे. इचलकरंजी व नांदणी ही दोन्ही ठाणी घेणे ऐसे पत्र येमाजीपंतास राजश्री स्वामीनी लिहिलें आहे; आणीक त्या राज्यांतील जो बंदोबस्त करणे आहे तोही त्याच्या विचारें होईल तर करणे ऐसे लिहिले आहे. राा त्रिंबक हरी स्वामीस लिहितील त्यावरून स्वामी कांही मदत पाठवावयाचा विचार करतील, तर राजश्री स्वामीचे मर्जीस विरुध होईल. यास्तव जे करणे ते राजश्री स्वामीस पुसोन करावें. विदित जाहलें पाहिजे शेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji to Chimaji Appa, advising him not to send troops to assist the Ghorpade of Ichalkaranji.*

No. 33] [*1736 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडीलांचे सेवेसी विनंती उपरी. स्वामीनी राजश्री महिपतराव यांचे पत्र आलें होते तेच पाठविलें व स्वामीनीही राजश्री उदाजी चव्हाण यांचा मजकूर लिहिला तो राजश्री बावांचे[१] व राजश्री सुमंताचे समक्ष राजश्री स्वामीस विदित करणे म्हणून लिहिलें. यैशास त्याजंकडील बातमीचें वर्तमान येथेंहि राजश्री स्वामीस आलें आहे. बावा तिकडेच गेले आहेत. सुमंत व आम्ही विनंती करून पाहू. आजी निवेदन करावें तरी राजश्री स्वामी प्रात:कालीं सिकारीस गेले. विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Nana to Chimaji. He will inform Shahu of Udaji Chavan's news upon the former's return from his hunt.*

---

१ नारबावा.

No. 34] [1736 ?

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री चिमाजी प्रति नारो राम विनंती उपरी. तुम्ही घोरपडेचे साहितेविसी तजवीज करून कांहीं मदत पाठवाल तर तो विचार करता येत नाहीं. राजश्री संभाजी राजे येही राजश्री यमाजीपंतास फौजेनिसी पाठवणे म्हणून राजश्री स्वामीस लिहिले. त्याजवरून मशारनुलेस जाणे म्हणून आज्ञा केली आहे. चव्हाणाची ठाणी न घेणे. वरकड साहित आज्ञेप्रमाणें करणे म्हणून आज्ञा केली आहे याजकरिता लिहिले आसे. आपणावरी निमित्य न घेणे. वरकड विस्तारे वर्तमान राजश्री माहादोबा सांगता कळेल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती+.

¶*Naro Ram Mantri to Chimaji Appa, communicating Shahu's orders that no troops should be sent to help the Ghorpade (of Ichalkaranji ?); Yamaji Shivdeo has already been ordered to proceed with his troops, as requested by King Sambhaji of Kolhapur.*

No. 35] [पौ 3-4-1737 ?

पौ छ १३ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ ४ जिल्हेज मुकाम वाडे सागोली जाणून येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की सांप्रत तुमचे काये वर्तमान * * कोण्हे ठिकाणी आहा? घोरपडे व पांढरे बंडगर वरकड सरदार फुटोन गेले किंवा आहेत? लस्करचा मजकूर कैसा आहे तो लिहिणे. त्यास रामजी बंडगर व पांढरे उमरजेहून स्वार होऊन आले ते ये फौजेची भेटी न घेता उभेतास घालून लस्करासेजारून नीट आपल्या प्रांतास गेले. ठाण्यासहि गुतले नाहींत व येक मुकाबलाहि जाला नाहीं. वरकड हे फौजेचे वर्तमान वसंतगडियावरून कूच करून मिरजेपावेतो जाऊन तेथूनहि येक मजल चिकोडीच्यारोखे जावे येसा सिधांत करून गेले. तो बालोजी सालोखी यानी सरलस्कर यासी भर देऊन दररोज रोजमरा पावल्याप्रमाणे देतो. सोनीच्या ठाण्यास जाऊन

+ सर्व पत्र स्वदस्तुरचें नारो राम मंत्री याचें चिमाजी आपास शाहू महाराजांचे दरबारांतून.

1044

लागावे. त्यानी मान्य केले. हे गोस्टीस रा जाधवराव भापकर घोरपडे यानी अनमोदन न देता तोफा घेऊन मिरजेचे से दोनसे प्यादे घेऊन सोनी ठाण्यास मोर्चे लावावयास गेले. ते सोमवंसी यानी पोटाचा आड घातला कीं आपणास रोजमरा बोलिल्याप्रमाणे देणे, मोर्चे लाऊ. यैसे करतां येकदोन दिवस जाले, तो लस्करांत दाणा नाही. दोन पायली धारण जाली. गाव मारावयास नाही, विकत घ्यावयास नाही. पैसा नाही. यैसे जाणून वस्तभाव मोडून आस्थ्यास ठाणी व लस्करची वरदी पाठवावी, यैसा विचार करून रा गणोजी वागमारे दिा राजश्री पंतप्रतिनिधि याजकडील समागमे दिल्हे. त्यानी एक दिवस आस्थ्यास जाऊन ठाणी भरून लस्करापासून दिढा कोसावर आले. त्यानी सांगून पाठविले की, आपल्यास फौज पाठवून नेणे, तो रा बालोजी सालोखी यानी आम्हाकडे सागून पाठविले की तुम्ही जाणे. तों तेच क्षणी खरसिंगच्या ठाण्यातील सेंभर स्वार येऊन आमचे कहीचे उंठ वळून नेले. ते वर्तमान आम्हास येताच स्वार होऊन जाऊन उंठ वळून आणिले. त्यास खरसिंगात मोडून उठ आणून त्याच्या मेंढरे सेपनास आणिली. तों रा आपाजी सोमवंसी तयार होऊ गणोजी वागमारे याजकडे गेले. तो त्याचे पुढे येका क्षेणाचे आंतरे रा उदाजी चव्हाण व येसाजी सिंदे यैसे कंवठ्याजवल दबा दोंशा स्वारानसी होते; ते त्याजवर जाऊन पडले. गणोजीस तंगी लाऊन नगारा नेला. दहावीस घोडे सरस नेले व लस्करचे बैल तीनसे देखील वाणी दाण्यासुधा व पनास पाऊणसे घोडे यैसे नेले. रा आपाजी सोमवंसी यांची त्याची नजरानजर जाली तऱ्ही गांठ घालावयास कुवत न जाली. फिरोन गोटास आले. रात्रौ तीन सेर धारण जाली. करड कुली ती गावावर गवते जाळून रक्ष्या केली. वैरण नाही. लस्करांत तैवाई[1] जाली येसे जाणून प्रात:काली कूच करून तोफा तलावर सोडून तैसेच निघाले. मग आपण उभे राहून तोफा मिरजेस पावत्या करोन लस्करात रा जाधवराव होते तेथे कुली लस्कर जमा झाले. त्यावर दुसरे दिवसी सोमवंसी बालोजी सालोखी कूच करून आस्थ्यासनिध जाऊन कुली लस्करास देशास लाविले. सोमवंसी देखील पथके पांचसे राहिले आहेत. तेणेप्रमाणे जाधवरायाची फौज कुली जाऊन चारसे पाचसे आहेत देखील हती उट रवाना केली. घोरपडे शे दीडसे आहेत. सिदोजी थोरात दोनसे आहेत. गोरखोजी भापकर यानी आपल्या पुत्रास सोनजी भापकर यास बालेघाटास जावयास आज्ञा आणून पनासापावणाशानसीं आहेत. येकून आम्ही देखील दीड हजार फौज भरता मुसकील आहे. त्यासही भक्षावयास मिलत नाही. हुजरून राजश्री स्वामीनी सरदारास दोन च्यार हजार रुपये

---

१ त्रास, दुर्दशा.

पाठविले ते भक्षून मागती रोज उठोन लोक जातात. आजच छ मारी रा घोरपडे शेदीडसे आहेत ते व देखील रा त्रिंबक हरि कूच करून जातात. रा प्रतिनिधि याजकडील गणोजी वागमारे कूच करून गेले. रा त्रिबक हरि नांदणीस चालसा स्वारानसी गेले होते. फिरोन मागती लस्करात वाडे सांगली-वरती कोसावर पालत लाऊन देखील उदाजी चव्हाण व आपाजी सितोले दोन-चारसे येऊन चिपरीस येऊन दब्रा धरून याजवर दंगा केला. ईस्वरे खैर केली. दोन घोडी घेतली. परंतु सांभाळून निघोन लस्करास आले. फिरोन चव्हाण माघारा जाऊन नांदणीचे ऊस चारून इचलकरंजीची गुरे दीड हजार व मेंढरु हजार वलून गुमटास खुशाल नेली. त्याबदल रा त्रिंबकपंत माघारे जाणार. आज देखील घोरपडे कूच करून गेले. याउपर रा बालोजी सालोखी येथे टिकोन राहतो यैसे नाही. तो माघारा चा(ल)लियास आम्ही राहावे येसे काये आहे? याउपरी फौजेचा आब गेला. चव्हाण सेर जाला. काल चव्हाणाची स्वारी दोन तीनसे गोटापासून कोसावर आली होती. आम्ही तयार होऊन रा बालोजीच्या बोले गेलो. गोटातून येक स्वार निघाला नाही. परंतु गाठ न पडता गनीमहि गेला. याच्या भरवशावर येथे राहावे येसे नाही. याउपर आम्हास आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. रोजमरियाची बेगमी पहिले केली होती. सांप्रत रा माहादाजी-पंती हजार रुपये पाठविले होते ते छ ८ जिल्हेजपावेतो बेगमी आहे. आणिखहि राऊत उमरजेस पाठविले आहेत. आपले आज्ञेप्रमाणे बेगमी करितील. लस्करचे बैल गेले ते दिवसी आम्हास न पुसता दाणे विकत घ्यावयास लोक गेले होते. त्यापैकी मानाजी घाटगे याजकडील दोन यारदी[१], येक घोडा गेला व दुर्गोजी काटकर याजकडे येक तट्टू व जानोजीकड याजकडील येक तट्टू येसे पांच घोडी च्यार यारदी व येक घोडा येसी गेली. स्वामीस कलावे म्हणून लिा असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdev to Chimaji Appa, giving details of his expedition against Udaji Chavan, Appaji Sitole, etc.*

No. 36] [*7-5-1737*

छ २८ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञाप्ति. येथील कुशल ताा छ १७ मोहरम मुाा वाडे सांगोली जाणून स्वामीचे कृपावलोकन-

१ ओझ्याचीं तट्टें.

करून येथास्तित असे विशेष. येथील वर्तमान तर हा कालपर्यंत येथे वर्तणूक जाली ते राजश्री माहादाजीपंत यांस लिहीत गेलो. त्यानी सेवेसी वरचेवर लिहिले. सांप्रत रा आनंदराव रघुनाथ दिा सरलस्कर व रा सिवबा निा जाधवराव येसे चिकोडीकरास सामील करावयांस गेले होते. त्यास त्यानी मस(ल)त दिल्ही कीं प्रस्तुत अखेरसाल जाले, मनसबा सिधीस जातो यैसे नाही. तुम्ही छावणी करणे. चेतुर्मास जालियास आपण सामील होऊन च्यारी ठाणी घेऊन देऊ; नाहीतर विवेक कराल (तर) रहेश[१] करून देऊ. त्यावरून यांचे व त्याचे कारकून आथनीस रा चव्हाण असता त्याजकडे गेले. त्यानी मुदे सांगितले कीं पूर्ववत-प्राा आपला सरंजाम व ठाणी जे गोष्टीने आपण परांगदा जालो आहो तो मुदा सारुत[२] केलियास आपण पदरी पडो. नाहीतर सडोन मरावे ते मारता मारता मरावे येसे सांगून पाठविले. येणेप्रमाणे करार होईल तर शामराव यास भेटीस पाठऊ. ये बोलीस व आपणास खावंद होईल याचे विद्यमाने भेटी घेऊ. त्यावरून रा जाधवराव व सरलस्कर यानी हुजूर स्वामीस लिहिले तों माहाराज-स्वामी प्रतापगडास गेले. जाते समई येथे सर्व सरदारास ताकीदपत्रे पाठविली की उंबरजेस छावणी जाली. तुम्ही ते प्रांती छावणी करणे. त्यावरून हे सरदारास विचारास पडले आहेत. खावंदाची आज्ञा छावणी करावी लागेल म्हणतात परंतु लोक जरूरे[३] राहातील. सरलस्कराकडील सरंजामी पथके मात्र सेदोनसे राहतील. संभुसिंग प्रस्तुत दोन अडीचसे आहेत. छावणीस कोण्ही राहतो यैसे नाही. चालीस पनास राहातील. भापकराकडील तों आताच लोक चालिले यैसा प्रसंग जाला आहे. चव्हाणाचा सला होता दिसत नाहीं. त्याचा मुदा कीं श्रीमंत राजश्री राऊ स्वामी स्वारीहून आलियावर जो मजकूर करणे तो करावा. परंतु प्रजन्यकाल समीप आला. (अपूर्ण)

¶*Vithal Shivdeo to Chimaji Appa, describing the attempts made to settle the differences between the Sarlashkar, Jadhavrao and Chavan of Athani. The Sarlashkar and Jadhaorao approached King Shahu when Chavan refused to accept the terms. Shahu gave orders to his Sardars to encamp at Umbraj. Chavan, however, submitted that the issues might be decided on the return of the Peshwa from his campaign. The letter is incomplete.*

---

१ गोडी. २ बजावणी. ३ जरूरीपुरते ? कार्याकारण ? थोडके ?

No. 37] [पो 8-7-1737 ?

छ २१ रबिलोवल.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री उदाजी चव्हाण सांप्रत जमाव करून तासगावांत थारा धरून गोहरणास प्रवर्तला आहे. पदमोजी माहाडीक नेवरीस आले होते, त्यास तासगावीहून चव्हाणानें धाऊन जाऊन नेवरीची गुरें वळलीं; तेव्हां पदमोजी माहाडीक दोघे तिघे भाऊ व आणिक भले लोक गुरांचे लागास निघाले. परंतु थोडके होते. चव्हाण भारी होता. यामुळें यांस गोळीच्या वगैरे जखमा लागून पदमोजी महाडीक वगैरे दोघे तिघे ठार पडिले. त्यांची पांचसात घोडी चव्हाणाने घेतलीं, म्हणून येथें वर्तमान आलें आहे. सत्यमिथ्ये न कळे. स्वामीस कळावें यास्तव लिहिलें आहे. त्यावरी मागती तासगावीहून निघोन डिगरज व ब्रम्हणाल याजवरी धावणी करून हजार बारासें गुरें वळून नेलीं. दोही गावचे पाटील धरून नेले. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa, describe the depredations of Udaji Chavan.*

No. 38] [4-10-1737 ?

श्रीआईआदिपुरुष

सेवेसी विज्ञापना. ताा छ २१ रजबे साहेबाचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबी आज्ञापत्र सादर केले. तेथे आज्ञा जें, मिरज प्रातांमधें चव्हाणानें खंडण्या घेऊन मुल्क उध्वंस केला. प्रस्तुत तुमची स्वारी त्या प्रांते होऊन रोखे केले आहेत. उपसर्ग होतो. कौल देऊन वस्ती जुजवी मात्र राहिली आहें; तरी प्रांतामध्यें तिलमात्र उपसर्ग लागो न देणे, म्हणऊन आज्ञा. ऐसियासी साहेबाचे आज्ञेपेक्षा अधिकोतर काये आहें? साहेबांचा मुल्क तोच सेवकाचा, तसदी लागों न द्यावी येंविसीचे अगत्य सेवकासहि आहे. अद्यापिपर्यंत मिरज प्रातांत रोखे जाहले नाहीत. पुढे करणार होतो परंतु साहेबाचे आज्ञापत्र सादर जाले त्यावरून मना केले असेत, तिलतुल्य उपसर्ग लागणार नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Pratinidhi accepts Shahu's orders implicitly to desist from molesting the ryots in the campaign against Chavan.*

No. 39] [*22-11-1737* ?
तालिक

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री...छत्रपती
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक हरी कृतानेक विज्ञापना. तागाईत छ १० माहे साबान-पर्यंत मुकाम कुरंदवाडे निाा शिरवळ, माहाराजाच्या कृपेदृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असें. यानंतर माहाराजाची आज्ञा घेऊन स्वार जाहालों तें इसलामपुरास आलों. राजश्री देवराऊ व हुजराती देखील अवघें एकत्रच होतों. चवाण भिलवडीवरी होता; आम्हीहि भिलवडीस गेलों. चवाणानें मिरजेकडे जाऊन मिरजेची पेठ जाळिली. तेथून * * * * हुपरीवरी गेला. आम्ही भिलवडीहून कूच करून आष्टीवरी आलो. तेथे मुकाम केला. हुपरीवरी जावें ऐसें होतें. परंतु कोणाचे चित्तास येईना, याकरितां न गेलों. हुपरीचें ठाणेयांत सावद होते. चवाण तेथें गेलियावरी त्याचें त्याचें युद्ध जाहालें. चवाणाकडील हत्तीवरील म्हात मारिला व सत्रा आठरा माणसें ठार पडलीं. बाहेरील गांवांत मात्र गेला, परंतु कांहीं हस्तगत जाहालें नाहीं. त्यांनीं बरा * * * * ठांचून राखिला. तेथून कुरंदेवडेनजीक येऊन इकडील च्यार दिवस शिवार चारून प्रस्तुत सडे स्वारीनें विजापुराकडे गेला. आम्ही सर्वत्र आष्टेवरीच होतों. राजश्री बावासाहेबीं[१] सोलस्कर व बांडगर वगैरें फौज आणखी पाठविली. ती आलियावरी आम्ही व राजश्री देवराव व सर्वत्रांचें विचारेंकडून त्याची अवघियांची आज्ञा घेऊन कूच करून निघालों तें कुरंदवाडावरी आलों. येथें मुकाम केला. शिरवळ व आकेवाट येथील दोन तीन रोज कही भरून आणविली. चवाणाकडील लोक आवघिया ठाण्यांत होते, ते आम्ही आल्यावरी अवघे शिरवेळांत[२] जमा जाहाले आहेत. आजीं मंगळवारीं दोवे राऊत शिरवळांतून आले. त्यांनीं रानांतील बैल वळून आवाई घातली याकरिता आम्ही तयार होऊन फौजेनशी गेलों. ते बाहेर निघाले होते. त्यांची आमर्ची गांठ पडली. मोठेसें जुंज जाहालें. माहाराजाच्या पुण्यप्रतापें करून त्यांस * * * * * * * * गाये दूम पिटीतच नेऊन ये(वे) शींत घातलें. प्यादे तुडविलें, पांच सात प्यादे मारिले, वरकड पळतच गेले. प्याद्यांच्या बंदुका पाडाव केल्या, त्यांकडील सात आठ भले माणूस ठार मारिले. दाहा पांच जायां

१ फतेसिंग भोसले ?
२ शिरोळ.

केले. घोडीं सात आठ ठार पडलीं, व पांच सांत जायां जाहालीं. याप्रमाणे जाहालें. त्यांकडील माहादजी शिंदे सरदार यास पांच साहा जखमा लागल्या. त्याचे घोडे घेतले, चिलखत घेतलें. दाटी फार जाहाली. हातघाईचें झुंज जाहालें. दाटीमुळें तैसाच राहिला, नाहींतरी त्यास आणिलें असतें. मोठीशी शर्त लोकांनीं केली. कुसोपावेतों[1] मारीतच नेलें, मग कुसाच्या आसऱ्यानें त्यांनीं मार दिल्हा. याजकरितां आम्हांकडील घोडीं सात आठ ठार पडलीं व पांच सात घोडी जायां जाहालीं. पागेकडील येक माणूस ठार जाहाला व दाहा बारा माणूस जखमी जाहाले आहे. फार सीमा लोकांनीं केली. ज्या ज्या लोकांनीं कामकाज केलें आहे त्यांस सर्फराज करणार माहाराज धणी समर्थ आहेत. फौज थोके[2] पांच हजार पावेतों फौज पंधरा दिवस असिलिया सिवार सरावयाचा नाहीं ऐसें पीक जाहालें आहे. या समयांत भारी फौज येऊन पोहोंचती तरी उत्तम गोष्ट होती. फौज आणखी रवाना करणार माहाराज समर्थ आहेत; सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Trimbak Hari reports to Shahu his encounters with Udaji Chavan at Hupri, Shirol and other places.*

No. 40] [*1737 ?*

श्रीव्यंकटेश

श्रीसकलगुणालंकरण अखडितलक्षुमीआलं-
कृत राजमान्य राजेश्री चिमणाजी पंत आपा
स्वामी गोसावी यांसी

पोश्ये व्यंकटराऊ नारायेण सा। नमस्कार विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल ल्याहवयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी जासुदाबरोबर नांदणीस पत्रे पाठविली होती त्याची प्रतिउत्तरे पाठविली होती त्यावरून आवगत जाहलेच असेल. अलीकडील वर्तमान तर आमची जमावाची समजाविसी होऊन तयारी जाहलियानंतर यावे; त्यास सुलतानजी सितोळे याचे सुटकेचा प्रसंग पडला व चव्हाणाचा व करवीरवासी यजमान याच्या दुईचा शह पडला; यामुले दोन दिवस आम्हास तट पडला. त्यास आम्ही टाकोंटाक सडे पुढे सातारियास आलो. मागून जमावहि येक दोन रोज पाडली-

---

[1] कुसुं. [2] निवळ.

माजी येणार आहे ; तो व आम्ही मिलोन पुणेस आपणापावेतो येतो. आपण आज्ञा करतील त्याप्रमाणे वर्तणूक करू. वरकड येथील लग्नाचे साहित्यास वेठें व फरासखानापैकी सामान पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. चिरंजीव सौ गोदूस आणावयास पालखी पाहिजे यास्तव आपण पालखीचे साहित्य करून देऊन रवानगी केली पाहिजे. आमची पालखी होती तीहि चिरंजीव सौ वेणुबाईस आणावयास पाठविली आहे. बरोबर रा. बालभट काले पाठविले आहेत. याबरोबर पालखी देऊन पुडे रवानगी केली पाहिजे. रा सिवरामपंत याचे गुजारतीने कापड वोजी २ दोन घेतले आहे तरी उंटावर घालून बालंभटा-बराबर लौकर पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan to Chimaji Appa regretting his delay in proceeding to Poona owing to the trouble caused by Chavan and the Chhatrapati of Kolhapur. He asks for a palanquin to be sent for Godubai.*

No. 41] [*1737-38*

पा. छ ९ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनती. राजश्री प्रतिनिधि कोठवर गेलें तें वर्तमान लिहिणे म्हणोन स्वामीनीं लिहिले. यैशास पूर्वी पत्र आलें होतें तेव्हां खानापुरावर होते. अलीकडे काही पत्र आले नाहीं. परंतु मनेराजोरीवरी मिरजेजवळ आहेत म्हणोन वर्तमान आहे. विदित जाहाले पाहिजे. राजश्री उदाजी चव्हाणाची त्याची भेटी जाहाली. परंतु बोलीचाली कांही अद्यापि जाहाली नाहीं. पुढें होणार आहे. +सेवेसीं श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Nana communicates the Pratinidhi's movements to Chimaji.*

No. 42] [*17-7-1738 ?*

छ १० रबिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीनी उंबरजेच्या मुक्कामीहून जाते-समंई राजश्री स्वामीपासीं व सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेबांसी मान्ये

+ यापुढील अक्षर नानासाहेबांचें.

केले कीं दहीगांवचें ठाणे आधीं घेऊन मग पुढें मोहिमेस जाऊं म्हणून. त्यास ते गोष्टी तसीच राहून गेली. येदंनिमित्य त्या ठाणियाचे विषम राजश्री स्वामीचे चिती बहुतसे आहे. चव्हाणाची मसलत सर जाली म्हणजे माहादेवास जावयाचे निमित्य करून दहिगावचे पारपत्य करून मग सातारियास जाणें तर जावें यैसे मानस दिसोन येतें. त्यास गतवर्षी उतरेकडील मनसबियासारिखे तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे व आपलें जाणे मजल दरमजल त्वरेने जालें यास्तव दहींगांवचे ठाणें तसेंच राहून गेले. सांप्रत आपण पुणियास आले, तीर्थरूपाचेहि आगमन जाले. याउपरी राजश्री साबाजी नाईक निंबालकर याजकडे आपलीं पत्रे व कारकून पाठवून ठाणें खाली करवावें. सुप्रवृतीने ठाणे रिकामे न करीत तर निर्भीडपणे पारपत्यपुरस्कार ठाणें स्वामीनी घेऊन राजश्री स्वामीस द्यावें म्हणजे धणी संतोषी होतील. तरी याउपरी येविषीं स्वामीनी अनमान सर्वथीं केला न पाहिजे श्रुत होये विज्ञापना.

¶*Mahadoba Purandare to Chimaji Appa expressing Shahu's great desire that Dahigam might be captured from Sabaji Nimbalkar.*

No. 43] [पौ *15-8-1738?*

पाा छ १० जााखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा

राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती. राजश्री नारबावा व राजश्री येमाजीपंत व रामाजी दामोदर व राजश्री बालाजी डुबाल हे राजश्री उदाजी चव्हाण यासी आणावयासी गेले होते. ते काली सोमवारीं राजश्री येसाजी सिंदे व लिंगोजी जाधव यासी घेऊन आले. चव्हाणाचा मुदा इतका आहे कीं, सगर व मिरजच्या कर्याती व विजापूर हवेली व खटाव माणेची चौथाई व कुकटनूर हे द्यावे, तर आपण येऊं; नाहींतर आपण येत नाहीं. हे मुद्दे राजश्री स्वामीनी कबूल केले तर राजश्री नारबावानीं आपले पत्र पाठवावे, आपण येऊं. नाहीं तर येत नाहीं यैसे आहे. अद्याप राजश्री स्वामीस वृत्त राजश्री बावानीं विदित केले नाहीं. पुढें होईल वर्तमान ते लेहून पाठवूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao and Chimaji Appa informing them of the negotiations conducted by Narbaba for the submission of Udaji Chavan. The affair had not received final sanction of Shahu.*

No. 44] [12-11-1738 ?

श्री

छ १० साबान चिटनिसी पत्रें. रा. संताजी चव्हाण यासी पत्र. रा। सिदोजी थोरात व चिकोडीकर व सावंत सितोले मिलोन वडगाव झिराल या प्रांतीं येणार आहे. धामधूम करणार. तुम्ही आपले फौजेनसी कोलापूर प्रांते येणें; स्वामीहि हुजुरची फौज पाठवितील म्हणोन पत्रें.

सिके पो हुजूर रसानगी सेख मनसूर हा। शाह महमद.

¶*This appears to refer to Shahu's expedition into the Kolhapur district.*

No. 45] [21-12-1735
[19-11-1738

श्री

राजश्री नारबावा मंत्री गोसावी यासी.

सकलगुणअलंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो राणोजी घोरपडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. पत्र येऊन वर्तमान कलत नाही. यावरून समाधान होत नाही. सर्वदा पत्र पाठऊन परामृश करीत गेले पाहिजे. आम्हाकडील वर्तमान तरी येंदा श्रावणमासी मनसाबियाचे प्रसंगानिमित्य राजश्री स्वामीनी आज्ञा केली. त्यावरून करवीरास जाऊन दर्शन घेतले. ते प्रसगी राजश्री आपाजी सितोले यास हुजूर पतक सांगून ठेवावयाचा प्रारंभ केला. त्यास आम्ही विनंती केली की थोरले सेनापतीचे वेलेस याचे बाप बाजी सितोले समागमे होते. येलेकडे राणोजी घोरपडे आमचे चुलते यानी सुलतानजी सितोले यास सरदारी सांगोन नगारा निशाण करून देऊन चालविले. तदोतर आमचे पिते पिराजी घोरपडे यांचे वेळेस हेच कार्यभाग करीत आले. सांप्रत बारा वरसे जाहली. आम्ही नेणते; आमचे कार्यभागाचे मान्तियार करितात. येसमई हा प्रसंग करावा येसे नाही. सालपावेतो जैसे चालते आहे त्या प्रमाणेच करून स्वारीचा प्रसंग संपादून स्वस्थलास आलियावरी मग चितास येईल ते केले पाहिजे. त्यावरून याप्रमाणे सितोले यास आज्ञा करू लागले. त्यानी अंतरंगीचा आश्रये पाहून मान्य केले नाही. मग आम्हास आज्ञा केली की सितोले यास सालपावतो इतलाख[१] बोली करून ठेवितो. सरंजाम आहे त्यामध्ये तिलप्राये घालमेली करीत नाही. याकडील

---

१ ठराविक नख्त पगार इतलाखी विरुद्ध सरंजामी.

ठाणी सरंजाम आहे, त्यावरी नवे लोक ठेऊन स्वारीसमागमे येणे म्हणून निरोप दिल्हे. त्यावरून आम्ही हुपरी तलदगेस येऊन, राजश्री त्रिंबक[१] हरी इचलकरंजीस होते त्यास बोलाऊन आणून गायेकवाड सिंगाडे व काले याचे समजाविसी केली. सितोलेचे सरंजामावरी मानाजी बागुल याचा पुत्र पिराजी बागुल व शाहजी बागूल व आणखी नवे लोक बोली करून ठेविले. जमावाचा[२] गोहा जाहला. आपाजी सितोले सरंजामाकरिता रुसवा करून कागलास आले. तदोतर राजश्री स्वामी तेथ येऊन सितोलियास तूर्त नालबंदीस पाच हजार रुपये नख्त देऊन बहुमानास हती येक व घोडी व कडी कलगी देऊन समाधान करून, पटणकुडीस आम्ही होतो तेथे आले. आज्ञा करू लागले की सितोले याचा सरजाम व ठाणी सालपावतो असो देणे. साल जाहलियावरी ठाणी व सरंजाम मोकला करून देऊं. त्यास आम्ही विनंती केली 'स्वामी अमृतवचन दिल्हे. आज्ञा केली त्यावरून या सरंजामांत बागुल व नवे लोक ठेविले आहेत. यास काये आज्ञा?' याचा मार्ग न करितां हेलणा करून पुढे समानगडप्राते सखेस्वरास[३] गेले. तिकडून राजश्री सुभानराऊ सिंदे सेनाखासखेल व दादाजीपंत नरगुंदकर व मनोलीकर सिंदे व गोकाकर मोगला (?) चे दोनी हजार प्यादे व स्वार दोनी हजार स्वारानिसी आले. त्यास दर्शन देऊन समानगडप्राती दोनीतिनी खेडी देसकाची होती ती घेतली. आम्ही पटणकुडीहून कूच करून कुर्दवाडासमीप येऊन राहिलो. स्वामीचे कूच होऊन भोजस आले. ते मुकामी आपाजी सितोले दाखल जाहले. आम्हाकड समजाविसीकारणे कूच होताच राजश्री सदाशिव उपाध्य व सेनाखासखेल पाठविले. त्यानी येऊन पूर्ववतप्रमाणे सितोले याचा सरंजाम सालपावेतो चालवणे, स्वारीस समागमे तेहि येतात, तुम्ही येणे, ये गोष्टीने सरजाम अगदी गुंतलियावरी लोक राहत नाहीत. तेव्हां समागमे जातिनिसी यावयाची आज्ञा जाहली तरी येऊ म्हणताच उठोन गेले. मग आम्ही कूच करून नांदणीसमीप येऊन राहिलो. त्याचे कूच होऊन इचलकरंजीवरी राहिले. तो गाव आमचा देशमुखी मिरजच्या वतनाचा. गाऊ इनाम. गतवर्षी राजश्री स्वामीचे मुकामसनिध जाहला होता ते समई वेदमुहुर्ती हरिभटबावांनी[४] दर्शन घेऊन वाडियात आणून ठेऊन घेऊन आपले शक्तिनसार परामृश करावयाचा करून विनंती (केली)की आपण कुटुंबवछल. आपले दोघे पुत्र राजश्री राऊ प्रधान याकडे सेवा करितात. दोघे पुत्र या राज्यामध्ये घोरपडेसनिध सेवा करितात. आपणास काये आज्ञा म्हणताच, तुम्ही कोणेविसी चिंता न करणे, गावात सुखरूप राहणे, येसे

१ पटवर्धन.
२ जमाव.
३ संकेश्वर.
४ पटवर्धन.

अभय दिल्हे होते. त्यावरून गावांत बेफार्म[1] होतो. यैसे असतां मुकामास आले दिवसी सिवार लुटून फना केला. दुसरे दिवसी सितोलियानी विदित केले की गावात वेदमुहूर्ती हरिभट याचे कुटुंब बाडाबिसातें[2] आहे. गावीचे गुरेटोरे बेमोबलग आहित, घोडी आहेत; त्यावरून पूर्वी अभय दिल्हे होते, त्याचे स्मरण न करितां गावावरी हला करावयाची आज्ञा केली. गावातील प्यादे बाहीर निघोन हला राखिली. दाहा बारा प्यादे ठार जाले. दाहा वीस माणूस जखमी जाहले. मग परतून गोटास गेले. मग छ १७ शाबानी रविवारी अगदी फौज चालोन नांदणीसमीप युध्यास आले. युध्य जाहले. आम्हाकडील पाच सात घोडी पडली, चौघ प्यादे ठार जाहले. भले लोक पाच सात सिपाई ठार जाहले व घोडी माणूस च्याली(स)पनास जखमी जाहले. त्याकडील घोडी पाचसात आम्हाकडे आली, पाचसात ठार जाहाली. प्यादे व भले लोक पाचसात ठार जाहले. घोडी-माणूस शंभरपावतो जखमी जाहले. मग सायेंकाली परतून माघारे गोटास गेले. आम्ही येथेच आहो. ते इचलकरंजीस आहेत. दिनप्रतीने हाच प्रसंग दिसत आहे. हे वर्तमान सविस्तर आपणास व राजश्री स्वामीचे सेवसी कळावा याजकरिता विनंतीपत्र पाठविले आहे. आपण सातारियाचे मुकामी निर्वणूक करून हाती दिल्हे, त्यास कर्जवाम करून फौज करून सेवा केली. आज्ञेप्रा वर्तणूक केली, त्याचे सार्थक याप्रकारचे जाहले! येसियासी आपण आम्हास वडील, सविस्तर सेवसी विनंती करून आम्हास काये आज्ञा करितात ते लेहून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ranoji Ghorpade of Kapsi, Senapati of Kolhapur, writes to Narbaba at Satara, communicating details of a dispute between the writer and the Sitoles.*

No. 46] [पा॥ *29-11-1738*

पा॥ छ २९ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. किले भूपालगड राजश्री उदाजी चव्हाण यांजकडे होता तो राजश्री येमाजीपंतानी घेतला म्हणून वर्तमान आलें आहे. विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे. हे विज्ञापना.

¶*News of the capture of Bhupalgad by Yamaji Shivdev.*

---

१ निर्भय, निश्चित. २ सामानसुमान, मालमत्ता.

No. 47] [पो 29-11-1738

पा छ २७ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. किले भूपालगड राजश्री येमाजीपंतानी घेतला. गायेकवाड हस्तगत जाहाले. हे वर्तमान राजश्री स्वामीस कललियावरी संतोषी जाहाले. मारनिलेस समाधानपत्र पाठविलें. विदित जाहालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nanasaheb informs Chimaji of the news of the capture of Bhupalgad.*

No. 48] [30-11-1738 ?

पा छ २७ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री येमाजीपंतानी किले भूपालगड घेतला. तेथें खेत्रोजी गायेकवाड वगैरे चौघेहि भाऊ धरले. त्यानी राजश्री स्वामीस लिहिलें की, गायेकवाड धरले आहेत. त्यावरून राजश्री स्वामीनी येमाजीपंतास लिहिलें की, गायेकवाड धरले, उतम गोष्टी केली. त्यांस न सोडणे म्हणून लेहून पाठविलें. विदित व्हावें याकरितां लिहिलें असें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nanasaheb informs Chimaji Appa of the capture of Bhupalgad and of the four Gaikwad brothers.*

No. 49] [1738 ?

वाडीस आलो. जाहाले वर्तमान आपणास कलावे म्हणून लिहिले. चवाण आथणीवर आलियाचे वर्तमान येकोन, देशिंगचे मोर्चे उठऊन गेले. विदित जाहाले पाहिजे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*This chit gives news about Chavan at Athni. The first part of it is missing.*

श्री

राजश्री भवानी शंकर मोरेश्वर व राजश्री खंडोजी जाधवराव यांसी आज्ञा केली ऐसीजे. चिरंजीव राजश्री फतेसिंग भोसले यांचा मोर्चा चौखडीस लागला. राजश्री यसाजी भोसलें यांचा मोर्चा बुखारीकडे लाविला. तुम्हां समस्त हुजरातीस विज्यापूर वेसीकडून पुढे मोर्चा चालवावयाची आज्ञा केली असे. तरी सारी हुजरात मिलोन येक मोर्चा मजबुदीने विज्यापूर दरवाज्याकडून चालवणें. +तुम्ही व वासदेव व संताजी सिरके व तुम्ही स्वता आस सार येकत्र होऊन मोर्चे चालवन. आपनास व लोकास राखोन काम करन. जेनकरून काम होई ते करन. इगत लिहिल का म्ह(णा)ल तर रा बावाचा मोरचा व रा रघोजी भोसल या उभयताचा मारचा चवखडी लागला व रा देऊराव याचा जिभीस लागला व रा येसाजी भासल व बाज लोकाचा बोखारीकड लागला. रा प्रतिनिधीचाहि लागनार. बोलता बोलता जेहुरचा इजापूर येसीचा म्हनतात, या कारण लिहिल आस. का तर इरच(इस्ट)काम. या कारन लिहिल आस. बहुत का(य) लिहिन.

¶*Siege of Bhupalgad—Shahu enjoins Bhavani Shankar and Khandoji Jadhaorao to lead a determined assault on the side of the Bijapur gate, the Chaukadi and the Bukhari sides having been attacked by Fatesing and Yesaiji Bhonsles respectively. Shahu orders them not to spare themselves in any way. The last half of the letter is in his own hand.*

No. 51] [*1738-39*

श्रीआईआदिपुरूष

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित स्वामी गोसावी यांसी सेवक श्रीनिवास परशराम कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल श्रावण शुध द्वितीया जाणऊन स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे विशेष. आपले आगमन पुण्यास जाहालें म्हणौन परस्पर वर्तमान यैकिले ; तरी आपणाकडील सविस्तर वृत लेखन केलें पाहिजे. यानंतर आम्ही कोटिहोमाचे अनुष्टान करावयाबदल राजश्रींची आज्ञा घेऊन काली सातारियासी आलों. श्रावण शुध पंचमीस अनुष्टानास प्रारंभ करून संपूर्ण जाहालियावरी लस्करात

+ येथून सर्व अक्षर खुद्द शाहूच्या हातचें.

जाऊ. आकिवाटचे ठाणे घेतले, घुमटचे ठाणेयासी मोर्चे लागले आहेत. झुंजतात. आपणास कलावें म्हणौन लिहिले असे. उदाजी चव्हाण अथणीत आहे. आपणाकडील सविस्तर लेखन केले पाहिजे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Shriniwas Parashram Pratinidhi to Bajirao informing him that he would join the army after the completion of the (Kotihom) Sacrifice which he has instituted, and for which he has received permission of the King. The news of the fall of Akiwat and the attack on the Ghumat-post and also the halt of Udaji Chavan at Athani is narrated towards the end of the letter.*

No. 52] [*11-5-1738*
[*30-4-1739*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पौष्य मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २ सफर प्रहर रात्रपर्यंत मुकाम ठाणें सोनी स्वामीच्या कृपेंकरून येथास्थित असें विशेष. राजश्री उदाजी चव्हाण याचें ठाणें शिरवल छ मजकुरीं फत्तें केलें. त्याचें आद्यंत वर्तमान तीर्थरूप राजश्री आपा स्वामीस लेहून पत्रें पाठविलीं आहेत, तीं आपण वाचून पाहून सत्वर पलीकडे रवाना करावीं. या जासुदास आपलें उत्तर देऊन इकडे पाठऊन द्यावा. विदित जालें पाहिजे. स्वामीकडून तीर्थरूप राजश्री राऊस्वामीकडे पत्रें गेलीं तर त्यांजकडेहि हें वर्तमान फत्तेंचें लेहून पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें, सेवेसी श्रुत होय विज्ञापना

¶*Malhar Tukdeo to Nana, Bajirao's son, informing of the capture of Udaji Chavan's town of Shirol.*

No. 53] [*30-6-1739 ?*

श्री

समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली यैसीजे. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तर यैसा विचार स्वामीच्या ममतेस तुमचा नाहीं; आणि प्रस्तुत ससरुषीस आगमन जाहालें म्हणऊन परस्परे स्वामीस विदित जाहले; तर तेथे आगमन जाहलियावरहि पत्र आले नाहीं; तर यैसे न करणें. निरंतर विनंती-

पत्रीं सविस्तर अर्थ लिहित जाणें. रुषीस आलियावर मनसबा काय योजिला, पुढें विचार काय हे कांहींच स्वामीस श्रवण होत नाहीं; तर [यैसे] न करणे. सविस्तर आद्यंत विनंतीपत्री लिहोन पाठविणें. वरकड कितेक अर्थ राजश्री सुभराव कोनेर पंडिते[1] यासी आज्ञापत्र सादर आहे ते सविस्तर तुम्हास सांगतील. तेणेप्रमाणें मानिलेची रवानगी होऊन स्वामीसनिध येऊन अचिरकाले पावत ते गोष्ट करणें. ग्रामाचा व ग्राहाचा मजकूर मारनिले सविस्तर सांगतील, त्याजवरून कलेल. जाणिजे रा छ ४ रबिलाखर स पी (?).

¶*Letter to Bajirao, apparently from the Raja of Kolhapur.*

No. 54] [पो *10-7-1739*

छ १० राकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आकिवाटास कृष्णेपलीकडे तोफा नेल्या होत्या. त्या मिरजेची थोरली तोफ देखील तोफा बांधून अवघ्या तोफा उतरून अलीकडे आणिल्या. विदित जाले पाहिजे. चव्हाणाकडील कितेक लोकांची अनुसंधाने राजश्री स्वामीकडे आलीं आहेत कीं आपल्यास चाकर ठेवावे म्हणून. त्यास जे चाकर राहावया येणार ते आले म्हणजे सेवेसी लेहून पाठऊं. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Letter addressed to Chimaji Appa, communicating the return of the guns across the Krishna and the overtures of Chavan for submission to Shahu.*

No. 55] [*1740 ?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

॥ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित उदाजी चव्हाण हिमतबहादूर दंडवत विनंती. येथील कुशल श्रीदयाउत्कर्ष जाणून स्वकीये निजानंदादिलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष सांप्रत पत्र येऊन कुशलार्थ

---

१ अमात्य कीं काय?

कळोन परामृश होत नाही तेणेकरून चित असंतोषी आहे. तर ऐसे न करून प्रतिपदी परामृशास अविस्मर असावे. यानंतर वेदमूर्ति आले होते, त्याजसमागमें सविस्तरे विनंती सांगोन पाठविल्यास आद्यंत कळलेच असेल. सारांष की आम्हांस सर्वस्वे हरएकविषी भरोसा राउळाचा आहे. आम्ही कायावाचामानसे आपली जोड केली. केल्यासारिखे हे आपले आहेत, असे अंत:कर्णी लक्षून कूर्मदृष्टीनें अवलोकीत जाणे. विशेष काय लिहिणे, कृपा निरंतर असो द्यावी हे+ विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Udaji Chavan offers a written submission probably to Bajirao.*

No. 56] [*1741 ?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे
सेवेसी

विनंती उपरी. करवीर क्षेत्राकडून बातमीचा जोडा आजीच सायेंकाळीं आपला आला. त्यानी जबानी वर्तमान सांगितले कीं तेथील मुख्य भार्येसहित वडगांवी होते. तेथून मध्यरात्रीं पत्नीसीं प्रतरणा करून सडे मध्यरात्रीं निघोन वारणे-अलीकडे आले होते ते कोठपर्यंत कोणे जागांहून परतोन माघारे गेलें ते न कळे. परंतु आजीच आठ दिवस जाले, रविवारीं दोघे स्वार व तिसरे खासा थैसे गुणकी-जवळ वारणा टोकरियांत उतरोन वडगांवी आले. तेथें तीन दिवस राहून चवथे दिवसीं सहपत्नी निघोन करविरास गेले असे वर्तमान सांगितले; आणिकहि बातमीस जोडे रवाना करितो. कळले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

¶*News about the movements of Sambhaji and his Rani Jijabai is sent to the Peshwa.*

+ येथें षट्कोनी शिक्का. श्रीराजा शंभु छत्रपतिचरणीं तत्पर। राणोजिसुत उदाजी चव्हाण हिंमतबहाद्दर.

No. 57] [28-4-1742 ?

श्री भवानीप्रसन्न.

सेवेसी विनंती. सेवक येमाजी सिवदेव कृतानेक विज्ञापना. ताा छ ४ रबिलावल सौम्यवासर साहेबाचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. चव्हाणाच्या पारपत्याविसी तमाम सरदारास साहेबी साहित्यपत्रे पाठविली ते पावली. आज्ञेप्रमाणे ज्याची त्याजकडे रवाना केली. त्याच्या पारपत्याचा मजकूर तरी अगोदर श्रीमत राजश्री पंतप्रतीनीधी याची सेवेसी विनंतीपत्र पाठविले आहे, त्याप्रमाणें आज्ञा देऊन फौज रवाना करावी. साहेबाचें पुण्य समर्थ असतां त्याचा हिसाब आहे यैसे नाही. धणियाचें पुण्यप्रतापेंकरून त्याचाहि पराभव होईल. धणियांनीं साहित्याची आज्ञा करून साहित्य करविलियास सेवक लोकांपासून सेवा घडोन येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Yamaji Shivdeo requests Shahu to send fresh forces against Chavan.*

No. 58] [1745

श्री

सेवेसी विज्ञापना. छ १३ षवाली नवाब अबदुल मजिदखान डेरेदाखल जाहाले. पुढे कितुर प्रांतास जावयाची बोली आहे. बारगी नरसिंगराव व सिवराव शंकर दोघे मिलून कोल्हापुरास येणार आहेत. काली सिवराव यास कोल्हापुरास जावयाकारणें वस्त्रें दिली. निरोप जाहला. भगवंतराव तमाजी वकील निा संभाजी माहाराज यासहि निरोप जाहला. या त्रिवर्गानी जाऊन सध्या दाहा हजार रुपये संभाजी माहराजास नजर देऊन स्वामीकडे तहनामा नवाबानी साल सालाबाद पौण लाख रूपये द्यावे मणून लिहून दिल्हा, तो हरप्रयेत्नेकडून आणवावा. तो तहनामा संभाजी माहाराजाकडून सिवराव यास हस्तगस्त जाहलियावरी साल दरसाल संभाजी माहराज यास वर्षापेक्षा या सालापासून पंचेविस हजार रुपये द्यावे. बषर्त तहनामा माघारा ये यैसा करार करून येताहेत. बहुतकरून स्वामीचें आगमन या प्रांतास न व्होवे, संभाजी माहाराजानी जिला न सांगावा, हाच अर्थ नबाबाच्या चिती व येथील भगवंतराव आदिकरून यांच्या चिती फार आहे. बहिरंगे श्रीमंताची फौज यावी, उभयेताहि मिलून श्रीरंगपटणावरी राजकारण करून पैका मिलऊ, येशा उपच्याराच्या गोष्टी फार बोलतो; परंतु अंतरंग या प्रकारचे आहे! राजश्री आणाजीबाबाचा मजकूर

---

१ सावनूरचा.

भगवंतराव याजकडे साबूत होतो. नवाबास स्मरण आहे की आणाजीबावा-कडील गुंता आहे ; परंतु या क्षुद्राच्या सांगण्यावरी कालोचितावरी नजर दिल्ही आहे. स्वामीच्या प्रतापामुळे सर्व शत्रु हतवीर्यच आहेत. सलाबतीखाले भयेकडून जबरदस्ताकडे मुलूक होऊ नये मणून लटिकी धावती करिताहेत. बारगी नरसिंगराव दोनी घोडे आरबी संभाजी माहराजाकारणे घेऊन येतो. कितेक वर्तमान थोडक्याच दिवसांत लिहून सेवेसी पाठवितो. बहुत लिहिणे शक्त नव्हे. हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from Savnur with reference to some of the districts of the Karnatak which the Nawab of Savnur was trying to prevent from falling into the hands of the Peshwa and for which the Nawab was negotiating with the King of Kolhapur.*

No. 59] [*After 1750*

श्रीभवानीप्रसन्न.

राजश्रियाविराजित राजमान्ये राजश्री त्रिंबकपंत नाना स्वामी गोा सेवक येमाजी सिवदेऊ कृतानेक नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा. छ १९ शाबान वर्तमान येथास्थित जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपल्यास पत्र पाठविले त्यांचे उत्तर आपण पाठवावयासी अनमान (न) केला, त्याजवरून सकल अर्थ अवगत जाला. प्रस्तुत वर्तमान ऐकतो जे, राजश्री उदाजी चव्हाण यांसी फौज मदती देऊन श्रीमंतानी रवानगी केली; त्यास आमचे पारपत्य व्हावयासी बाकी राहिली नाहीं. कांहीं त्यांची कृपा थोडी बहुत आहे, म्हणून येथे प्राण संरक्षण करून आहो. इछामात्रेंकरुन आमचें पारपत्य होणार यैसे असतां राजश्री उदाजी चव्हाणास उभे करून आमचें पारपत्य करणे, हे यैसे आगाध काये आहे? आपण प्रसंगी आहेत. श्रीमतास व राजश्री बाबास आमचेविसी विनंती करून आम्हावरील अरिष्टे दूर करवावी. त्यास आपल्यास सातारा सांगणार आमचे अमित्र बहुत आहेत. त्याजमुले आपण उदासता केली आहे. परंतु कैलासवासी तात्याचा व दादाचा श्नेह आम्हावरी बहुत होता, तो अर्थ तरी चितात आणून आमचे संरक्षण करणे उचित आहे. आम्ही ब्राम्हण आहो. आमचे निर्मूल करणे थोरास विहित नाही. लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Yamaji Shivdeo to Trimbakpant Purandare, requests the addressee to intercede on his behalf with the Peshwa and prevent Udaji Chavan ruining his home.*

No. 60]

श्री

राजश्री पंतप्रधान साहिबाचे सेवेसी

ℰ श्रीमंत अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्रो राणोजी भोईटे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन श्वकीये कुशल लिहित आसिले पाहिजे विशेश. पत्र पाठविले, पावोन सकल वर्तमान आवगत जाले. लिहिले कीं, राजश्री आंबाजीपंत व राजश्री पिलाजी जाधव पुसेसावलीवरी चव्हाणावरी गेले आहेती. तुम्हीहि जमावानसी स्वार होऊन जाऊन त्यास सामील होणे म्हणऊन लिहिले ; तरी येथे लोकानी व भोयानी हकाबदल गवगवा केला. रो घेत नाहीत. तरी कर्जवाम घेऊन लोकांची समजावीस करून लौकर येऊन पोहचतो. कितेक वर्तमान सुभानजी जासूद जबानी सांगता विदित होईल. बहुत काये लिहिणे, कृपा निरंतर असो दीजे, हे विनंती.

¶*Ranoji Bhoite to the Peshwa pleading his inability to join immediately the expedition against Udaji Chavan.*

No. 61]

श्री वेकटेशप्रसन्न

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत

राजमान्य राजश्री चिमाजीपंत आपा स्वामी

गोसावी यांसी

पोष्यें व्यंकटराऊ नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. आपला निरोप घेऊन आलो ते नांदणीस सुखरूप पावलों तों राजश्री स्वामी करवीराहून समानगडास गेलें, रो सेनापतीचे भेटीचा विचार योजिला आणि सेनापतीस बोलावणे आलें ते समयी आम्हास बोलाऊ पाठविले. मग आम्ही टाकोटाक सेनापतीकडे गेलो. त्यानी व आम्ही मिळोन राजदर्शन घेतलें. इचलकर्जी सिरेंढोणाकरिता त्याचा याचा सौरस राहिला नाही. मग निघोन लाटेस आलों. त्या उपर त्याचा निरोप घेऊन नादणीस आम्ही आलों. जमावहि करावयाचा तो केला.

पुढे सेनापतीबरोबर मुलु(ख)गिरीस जावें हा विचार योजिला आहे. राजश्री पंतप्रधान याकडील वर्तमान कळत नाही, तर सविस्तर लिहिणें; बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे. हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan writes to Chimaji Appa about his movements and plans.*

No. 62]

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो राऊ जानोजी निंबालकर कृतानेक दंडवत विनंती उपर. येथील क्षम जानोन राऊनी निजानंद लिहि ती आज्ञा केली पाहिजे. याउपर राजश्री छत्रपति स्वामी पनालियाकडे मोहिमेस जाताती. सातारा्हून किती दिवसा कूच होणार? समागमे गोसावी जातील किंवा राजश्री आपास मार्गस्त करावयानिमित्य पुणियासी येतील हें वृत लिहिले पाहिजे. राजश्री स्वामीसमागमे सरदार कोण कोण जाणार आहेत व मुलुकगिरी कोणाची रवानगी केली यैसे लिहिलें पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar to the Peshwa inquiring when Shahu was proceeding towards Panhala.*

MAP REFERRING TO THE ACTIVITIES OF SAMBHAJI OF KOLHAPUR AND UDAJI ÇHAVAN



G.P.Z.O. Poona. 1930.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१२

पेशवे आणि दाभाडे

[किंमत— १ रुपया ३ आणे किंवा २ शिलिंग]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई

१९३१


Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

THE DABHADES
&
THE CONQUEST OF GUJARAT

One fatal blunder, for which Shahu must be held mainly responsible, was that of allowing all offices to become hereditary. Shivaji never tolerated this principle of heredity and conferred all appointments strictly according to merit. At the death of the first Peshwa Balaji Vishvanath, Shahu appointed his young and inexperienced son to the Peshwaship against sober and mature advice to the contrary. Shahu, at the beginning of his career, found his position so assailed on all sides that he was induced to offer all sorts of inducements to various Maratha generals and officials to secure their allegiance to his cause. The desertion of Chandrasen Jadhav was a great shock to him, and he tried his utmost to prevent a repetition of the disaster in the case of his next *Senapati*, Khanderao Dabhade. Khanderao, who was at first a staunch adherent to the cause of Tarabai, was with difficulty induced to join Shahu. Khanderao was appointed *Senapati* on 20th November 1716 when, probably, his son Trimbakrao was made *Senakhaskhel*. Khanderao's spirited wife Umabai wielded great influence in politics at the time and strenuously helped her husband, and after him her sons, to put down all rivals to the military power of the Dabhades and obtain for them a pre-eminent position in the state. The sudden rise of the young Peshwa Bajirao and the death of Khanderao Dabhade in July 1729 altered the position at once.

At the time of his Coronation in 1708 Shahu had no army and no money. In his extremity he found Balaji Vishvanath very helpful, as he contrived to obtain funds and collect armies. Thus Balaji Vishvanath became indispensable to Shahu, thereby giving umbrage to several older chieftains who had long been serving the state most devotedly. The disaffection of the first *Senapati* Chandrasen Jadhav forms an important and well-known chapter of Maratha history, and now the disaffection of the Dabhades is for the first time fully illustrated in the numerous papers presented in this section. For forty years the Dabhade affair caused endless trouble, until they were finally wiped out by the Peshwas, who elevated the present Gaikwads of Baroda in their place. The rivalry between the two families of Bhat and Dabhade commenced in 1708 when Shahu deprived the latter of his estates and conferred them on the former. Dabhade became insubordinate, discontented and rebellious and Shahu ordered his chastisement in 1720. He then was sufficiently humbled and wrote an apologetic petition to the king. But he continued coquetting with the Nizam until ultimately Shahu had to issue orders for his extermination, which resulted in the famous battle of Dabhoi where Trimbakrao Dabhade was killed on 1st April 1731. But the Dabhades were not reconciled. The death of Trimbakrao ever rankled in the hearts of the family as a political murder on the part of the Peshwas. Shahu spared no pains to conciliate Yeshwantrao, who however proved vicious and incapable. The Peshwas never took kindly to them and deliberately encompassed their ruin. Altogether the affair of the Dabhades is a most regrettable episode in Maratha history.

No. 42



Facsimile of the handwriting of Naro Ram Mantri.

No. 1] [Before June 1708

श्री

माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचें शेवेसी

विनंती. शेवक जयेसिंग जाधवराऊ सेनापति कृतानेक विज्ञापना. राजश्री खंडेराऊ दाभाडें यास जमानाविसी आज्ञा केली. त्यावरून राजश्री खंडेराऊ दाभाडें बिरादरी देखील हाती घेतलें ताा

खासा खंडेराऊ दाभाडें	बाबूराव	आबाजी बाऊ (ड ?)
१	१	१
कोनेरपंत	जिवाजी गोविंद	
१	१	

सदरहूप्रमाणें स्वामीनी कृपालून हाती दिल्हे ते आपण हाती घेतले. शेवेसी विदित जाले पाहिजे हे+ विज्ञापना.

¶Dhanaji Jadhao to King Shahu, giving an undertaking on behalf of Khanderao Dabhade and his brother and retinue, that they would remain loyal to Shahu. Dhanaji died in June 1708 and so the letter must have been written before that time.

No. 2] [8-4-1718

पाो छ ९ रजब

मुाा कोटमगाव.

श्री

ॐ माा अनाम सिवाजी विश्वनाथ देशपाडिये देहाय प्रगणे चांदवड यासी देवजी सोमवंसी हिंदुराऊ सुहूरसन समान अशर मया अलफ. पत्र पाठविलें ते पावोन साकल्य वर्तमान कळों आलें. राा सेनापति त्या प्रों आले त्यांणीं मुलकाचा तसनस केला व वोझरकर लोक याजपासून बलात्कारे कागदपत्र करून घेतला म्हणोन लिहिलें, त्यासी ये प्रसंगी त्याजलाही संध्य सापडली. चिरंजीव तिकडे गेले आम्ही इकडें राहिलों. धामधुमेचा प्रसंग. त्याचे आगमन तिकडे जाले. सुने स्थळी जाऊन कारभार केला. बरें; ते गोष्टीचे काय आहे? ईश्वर-इच्छनें दोन महिनिया त्याची आमची गाठ दरबारी पडेल, तेथेंच जो प्रसंग होणे

+ पाठीवर अष्टकोनी शिक्का—श्री राजारामचरणीं दृढभाव। सेनापति धनाजी जाधवराव.

तो होईल. तुमचे वर्तमान कमाविसदारानी लिहिलें त्याजवरून बहुत संतोष जाला. तुम्ही जमिदारीची शर्त केली. याजउपरी सर्वाविसी आपले समाधान असो देणे. मुलकाचे तसनसेचा[1] विचार तर चहूकडील प्रसंग विज्वरच जाला, याजमध्यें त्यासी फावलें ते गोष्टवर नव जाणे. तमाम रयतीचा दिलासा करून तुम्ही कौलपत्र द्याल तेणेप्रमाणे चालऊन. तुमच्या विचाराखेरीज कांहीं पहिलेही कारभार केला नाहीं आणि पुढेंही होणे नाहीं. रयेतीस दिलासा देऊन लावणी करणें. जाणिजे. रा छ १७ जमादिलावल.

¶*Devji Somvanshi issues this order to the Deshpande of Chandwad. The Senapati referred to in this letter must be Khanderao Dabhade. The letter illustrates how the quarrels among the Maratha Commanders affected the ryots.*

No. 3] [*1719-20*

छ २९ जिलकाद

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान

गोंसावियांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. राजश्री विसाजी तुकदेव सुभेदार प्रा नासिक याजकडून पत्र आले जे. राजश्री देवजी सोमवंसी याणी राजश्री प्रधानपंताची पत्रे घेऊन वोझरी आमचा गुमास्ता पाटिलकीचा आहे तो उठऊन टाकावे म्हणून सावजी आटोलियास लिहिले. त्याजवरून आटोलियानी फौजबंदी करून कसबे मारावर लगट[2] बहुतच आरंभिला म्हणून लिहिले, त्याजवरून कललें. परंतु विचारें पाहातां येकवल दरबारी कारभार निवडला आहे तो आपणास कलला असोन यैसी पत्रे देतील यैसे होणे नाही ; तथापि विचार न कले. त्याचे सांगितलेवरून दिल्ही असतील नसतील हे आपणास अवगत असेल. तरी हें काये वर्तमान आहे तें सविस्तर लेहून पाठविले पाहिजे. त्या वतनाचा केवल दुराग्रह आम्ही आपले पदाचे बलें करितों यैसे नाहीं. हें तेथें राजश्री स्वामीसमक्ष

---

१ नासधूस, घालमेल. २ निकर्ष, तसदी,

निवडलें आहे. हें वर्तमान तपसिले देवबासच पुसावें आणि आम्हास विचार सांगणे तो सागात्रा त्या-प्रमाणेंच केला जाईल. बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे. छ २१ जिलकाद हे विनती

~ श्री ०
राजा शाहु स्वामि
छत्रपति खंडेराव
दाभाडे सेनापति.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, complaining about Devji Somvanshi and requesting that justice might be done.*

No. 4] *[15-8-1720 ?*

माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे शेवेसी.

शेवेस शेवक कालोजी भोसले विज्ञाप्त. येथील क्षेम ता। छ २१ सौवाल स्वामीच्या कृपादृष्टीकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र श्रावण बहुल सप्तमी मंदवासरचे सादर केले; तेथें आज्ञा केली ऐसीजे. फौज घेऊन स्वामीसंनिध येणें म्हणून आज्ञापत्र सादर जाले; त्यावरून शेवकाचे समाधान जाले; त्यावरून आपण फौज घेऊन येत होतों त्यास दाभाडा बलकाउनु[1] येथे आला. त्यावरून आपण फौजबंदी करून त्याचे आमचे जुज जाले. त्याचे वर्तमान पहिले लिहिलें आहे; त्यावरून विदित होईल. याउपरी आपण व रा। अमृतराऊ देशमूख व पवार व सोमवशी, गंगातीरास पाचसा हजार जमाव आला आहे, ते सत्वरच येतील; ते आम्ही सामील होऊनु दाभाडियास तंबी पोहचवितों. स्वामीच्या दर्शनास फौज घेऊनु येतो. याउपरी बाळोजी कापसा जो[2] सभाजी काळे, व आपाजी सितोळे जो शहाजी नाईक, यास रु। ६० साठ देविले ते त्यास प्रविष्ट केले. सेवेसी श्रुत होय.

सिक्का

¶*This letter shows that Dabhade Senapati was creating trouble for Shahu so early as 1720.*

---

१ बळजबरीनें. २ जथे.

No. 5] [18-8-1721

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी

विनती. सेवक खंडेराऊ दाभाडे सेनापति कृतानेक विज्ञापना. भाद्रपद सुध सप्तमी भृगुवासर मुकाम कुरकुंब माहाराजाचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वृत यथास्थित असे. माहाराजानी कृपालु होऊन सेवकास सेनापति हें पद येथास्थित देऊन गौरविले. त्याप्रा स्वामीचे प्रतापे सेवाहि येथाशक्ति करून दाखविली. जैसे तैसे सा महिन होते. पुढे राजश्री फतेसिंग भोसले याजवर कृपालु होऊन सरंजाम त्यास दिल्हा. उपनाव सेनापति सेवकास दिल्ही त्या उपनावाचें आश्रयावर माहाराजाचे पुण्यें जे जाले तें केलें. त्याजउपर सेनापतीस सरंजाम काहीं तरी असावा येसे माहाराजाचेच चितांत आले ते समई थोडासा दिल्हा. तो मारानिलेकडील अमलांत दिल्हा. असो. जें धण्याने दिल्हे तेच लक्षाचे जागा मानून समाधानें येथील आमल मागतां मागतां सात आठ वर्षे अतिक्रमली. परंतु रुपयास संबंध नाही. अगदी येवज राजश्री फतेसिंगबावा यांजकडेच गेला. निदान उपाय नाही तेव्हा मग त्याचे वलणाचा सरंजाम त्याणी ठेविला. आम्ही इकडे तीन माहाल गतवर्षी लोकास देऊन दोनी हजार फौज ठेऊन स्वामीकार्यावर आणिली. आतांही फौज सिधच आहे. जे समई कार्य उपस्थित होईल ते समई कार्याची आहे. येसे असता सांप्रत माहाराजानी आज्ञापत्र सादर केलें कीं निंबाईत खासगीकडे मुकासा ठेऊन कमाविसदार विठल रंगनाथ पाठविले आहेत, आपले लोकास ताकीद करून माहालीचा आमल सुरलित देणे म्हणून आज्ञा केली. येविषईची विनती सेवेसी पूर्वीही केलीच होती कीं, सात आठ वर्षे भागानगराकडील माहाल राजश्री फतेसिंगबावानी अमल करून येवज घेतला त्याप्रा इकडील माहालीचा येवज आपण घेऊन फौज ठेविली आहे, माहाराजानी दया करून चालवणार धणी समर्थ आहेत म्हणून विनती केली. तिचा अनादर करून प्रस्तुत आज्ञापत्र सादर केले. याजवरून पूर्ववृतातांचा विशदें लेख सेवेसी करणे लागला आणि चितातही सेवकाच्या उदासीनता आली. निमित्य की समुद्रवलयांकित पृथ्वी धण्याची, धण्याने जें ज्यास दिल्हे तें सर्वत्र चालावे आणि सेवकास दिल्हे ते न चालावे येसा सेनापतिपदाचे ठाई अपराध कोणता आहे हें न कलेसे ज्ञाले. कदाचित पदाचे ठाई अपराध असिला तर आम्ही सेवक निरपराधी असता अपराधी पदाचें योगें अपराधी व्हावें यात विशेष काय आहे? याजकरिता सेवकावर कृपा पूर्वीपासून धण्याची अनुपम आहे तेणेप्रा कूर्मावलोकन करून सेनापतीचे ठाई अपराध असेल तो दूर करून निरपराधी सेवकास निरपराधपदी

स्थापना करून सेवा घेणार माहाराज धणी समर्थ आहेत. तेथें सेवकाने विशेष काय लिहिणें. विठल रंगनाथ सेवेसी निवेदन करितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Khanderao Dabhade makes a humble request to King Shahu for a proper reward for his services. He complains that he has been singled out for displeasure ; that his estates have been given over to Fatesing Bhonsle, and that therefore he has no scope for work. He has kept an army and is ready to serve the state. If he has failed to satisfy his master, his faults may be pardoned and he may be given some definite task to perform.*

No. 6] [*1725 ?*

छ २९ जिलकाद.

श्री

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी विनंती उपर. धिराजी पवार या प्रांतें राहून धामधूम करिताती. त्यास राजश्री स्वामीचे विचारें ते येणार म्हणून अन्यत्र तरतूद कांही होत नाही. यैसे दोनी महिने निघोन गोलियावर मागती चौघे चहूकडे जातील म्हणजे येथापूर्व मुलकाचा नाश होईल. याजकरितां डोलेझांकी करायाचे नव्हे. राजश्री स्वामीस पुसोन कोणे विचारें आणिताती तो आणावा; नाहीतर हरयेक इलाज करून मुलकाचा काटा काढून मुलूक राहे ते करावें. याचा विचार आपण कैसा केला आहे तो लिहिला पाहिजे. जाणिजे. छ २१ जिलकाद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, complaining about Dhiraji Pawar.*

No. 7] [*1725 ?*

छ २९ जिल्काद

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी विनंती. उपरी, आपण पत्र पाठविले, प्रविस्ट होऊन वर्तमान आवगत जालें. तेथें बोलीचालीस प्रसंगी आम्हाकडील भाव कलियाविरहित अटकाव पडेल, याजकरितां कलावा लागतो, याजकरिता लिहिले असे. राजश्री स्वामीची आज्ञा घेतेसमयी समक्ष बोलतां

इतकेच बोलिलों जे, गुजरात मालवेकडे आमच्या फौजा जातील तैसी बाबती सरदेशमुखीची जाऊन आपला अमल करील. ज्याचा तो आपलाला धंदा करील यैसें बोलोन आलों आहें. केवल आम्ही निकाल करून देतों, अवशमेव फौज पाठवावी यैसें कांही मान्य केलें नाहीं. येविषयीं त्या प्रांते जाणारांनीही आम्हास पत्र पाठविलें होतें की, तुमचे भरवसियावर आपण मान्य करितों. याचे उतर परिछिन त्यांस आम्ही पाठविलें कीं आम्हास कोठे जाणें नाहीं. गतवर्षीचे फौजेचे समजाविसीखाली नवे लोक ठेवावे अगर मनसुबा आणिखी करावा हे कांही सुचत नाही. यैसे परीछिन उत्तर दिल्हें आहे. आपणहि प्रसंगी जे बोली कर्तव्य ते दुसरियाचा परिस्पंदन होये यैसे करून सत्वर आलें पाहिजे. जाणिजे. छ ११ जिल्काद. बहुत काय लिहिणें कृपा आसो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Letter addressed to Bajirao by (can it be?) Khanderao Dabhade. He says he cannot undertake a fresh expedition, as he has not been able to pay off his previous year's liabilities.*

No. 8] [*1725?*

छ ४ (?) सफर

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावी यांसि.

ॐ सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री खंडेराव दाभाडे सेनापति दंडवत विनती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. आपले राज्यांत जे लोक चाकर तेच रयेती. त्यास सुप्रवृतीचे दिवसांत जिल्हेदारीचा कार्यभाग करीत होतां तो बहुतसा वाईट दिसत नवता, काये निमित्य, माणसास दुसरे ठाई जावयास जागा नवता. च्यार गोस्टी आपले काकुलतीच्या दाखऊन कार्यभाग चांगला दिसत होता. आता ते दिवस नाहीत. याजकरिता आपणास येक दोनी वेळा लिहिलें. त्याचें उतरहि आपण लिहिलें की आम्ही कोणावर आतिशये करीत नसता लटिकाच बोभाट करणार करितात यास काये करावें, म्हणून लिहिले. त्यास सांप्रत राजश्री सिवाजी जगथाप पिंपळेकर

---

१ कार्य करणें; कार्यप्रवृत्ति.

बहुत दिवस चाकर आम्हाकडे आहेत हें आपणासहि विदित आहे. गतवर्षापासून त्याचा पिछा घेऊन काली परवा मुदाम राऊत पाठऊन दंगा केला. गनिमाचे भयाने इतका त्रास मनुष्य पावत नाही. यैसा त्रास होऊन मुले लेकरें बायेका कुल गावीच्यादेखील रानोरान पळाली. सिवजी सडा उपलोणी[१] घोडियावर बसून पलाला. हरकोण्ही लाहान माणूस येऊन सांगतो त्याचे पथ्य मानून जुनी लिंगाडे युगांतरीची काढून माणसाची पाठी घ्यावी हे (आप)णास राज्यभाराचे उपयोगी नव्हे. यैसा कहर जाला म्हणजे आतां जगथापनी पारनेरासे[२] जावे इतकाच आर्थ आहे. आम्हाकडील लोक ते आपले पदरीचे, इतर नव्हेत, त्यांजवर निस्टूरता धरावी यैसे नाही. लोकांची समाधाने रक्षून पाठी थोपटून आजीचे समयांत त्यांचे हातें महत्कार्ये घ्यावे यैसें इश्वरें आपणावर मख्तयार दिल्हे आहेत. क्षुलक विचार सर्वात्मना न करावे. आधीच माणूस गतवर्षापासून दुष्कालाने त्रासले. दुसरे धामधुमेचा प्रसंग; मनुष्य विचारी पडले आहे; यामधें जिकडून धावणे यावे[३] तिकडून आगी आलियावर जीव वांचवायास परकीयांचे पदरी पडतील. अत:पर आम्ही कोठवर लेहावे? जे विहित तें केले पाहिजे. केवल मोगलाई नव्हे, घरचा फितूर बहुतच फटकाल. येरवी आपण जे करिजेल ते सतेमुले सर्वहि होईल. परंतु हे दिवस नव्हेत. सुचला अर्थ तो लिहिला आहे. आपणहि हे गोस्टी चितांत आणून मनारोखा पाठविला पाहिजे व वरचीलहि गावगना कोठे कुस्टमिस्ट ये प्रसंगी मनास न आणावे. परकीयावर ताजगी[४] करावी; वरकड गोस्टी तूर्त येकीकडे ठेवाव्या; कार्येप्रयोजनास पुढें उदंड दिवस आहेत. जाणिजे छ ९ सफर. बहुत काये लिहिणे कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद..

¶*Khanderao Dabhade to Bajirao : reads him a touching sermon on the duty of the ruler in protecting his people. He must not constantly persecute them on one pretext or another.*

---

१ उघड्या पाठीचा.
२ हें मोगलांकडे असावें.
३ जिकडून धाऊन, मदतीस यावें.
४ वरचढपणा, छाप.

No. 9] [1726?

श्री

पुरवणी. राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
गोसावियासी.

विनंति उपर. राजश्री चिमणाजी पंडित राजाज्ञा येथे आले हे वर्तमान अपणास पूर्वी लिहिले होते. त्याचा जाब आपण लिहिला कीं कर्जाची वाटी जे करून घेणे ते घ्यावी. वरचीलें[1] म्हणाल त्यास सिध आहो म्हणून लिहिले. त्यास प्रस्तुत चिरंजीव राजश्री कृस्णाजी दाभाडे याणी आपणास सांगावयाचा अर्थ सांगितला तो कललाच आहे. मुख्य गोस्टी पंडित मारानिलेचा अगत्यवाद आपणास आहे तैसा आणिखी दुसरियास आहे यैसे नाही. त्याहीमधें मारनिले येथे येऊन बसले, हुजरून निघाले, हा लौकिक परकीयानी यैकून बहुत काही संतोष मानून आदरपूर्वक कागद पत्र आले ते अम्ही द्स्टीने पाहिले. जाणारास काही नाही. परंतु हे गोस्टी जाऊं देणारास युक्त नव्हे. कर्जाचा विचार पाहता राजपुत्रांकडील प्रसंग आहे. बहुतसा अगाध तुम्हा आम्हास पडतो यैसे नाही. हुजूर गेलियावर उभयेता मिळून विनंति करून घडेल निकाल तैसा काढि(ला) जाईल. तूर्त करिता इतकेच, येकवेळ आपण येऊन समाधान करून चिताची स्थिरता करावी, जाऊ देऊ नयेत. पुढे विचारे विचारें जैसे होईल तैसे करावें. याची हैगै न करावी. बहुत काय लिहिणे ? छ १२ मोहरम.

मोर्तब
सुद.

¶*Chimnaji Damodar was removed from the office of Rajadnya on 24th September 1728. This letter seems to be addressed by Khanderao Dabhade to Bajirao requesting him to adjust the dispute about Chimnaji's debts.*

No. 10] [1727?

पैवस्ता छ ८ रबिलोवल
तीसरास आले.

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी, सकलगुणालंकरण अखंडित-लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपर.

---

१ वरचिल = शेष, वरकड, अधिकउणें.

येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. [१]निघोजेचे मुकामास येणें म्हणून लिहिले त्याप्रमाणे येतों. परंतु लोक मागून येताती ते त्या मार्गे आम्ही आलियाने दगावतील, याजकरितां आजी आबी धारगावचा मुकाम करून सिबलापुरचा (?) घाट उतरोन थेहरेवर येतो. आपणहि त्याच घाटे थेहरेवर यावे. भेटी होतील. त्यानंतर विचारें करून जे * * तें करावें. लोकां-मुळे आम्हास या मार्गे जाणें लागलें. प्रवरातीरी आपल्या आमच्या भेटी होतील. जाणिजे. रा छ ९ रबिलावल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

(शिक्का) मोर्तब सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, mentioning the route he is taking to join the addressee.*

No. 11] [*1727?*

श्रीजयति.

सेवेसी विज्ञापना. आम्ही आज दोन प्रहरा येथे आलों. राजश्री रायांची व सौ मातुश्री काकीची भेटी होऊन वर्तमान सांगितलें. त्यास त्याजकडेहि तिकडील बातमी याचप्रमाणें आली आहे. हली राजश्री रायास बरें वाटत नाहीं. म्हणून आपली भेटी घेऊन राजश्री त्र्यंबकरायास फौजसमेत द्यावे, आपण राहावेसे चितांत विचार आला. परंतु ते गोष्टीवरी दोन शह. एक राजश्री छत्रसिंग ठोके याचे पत्र आले कीं तुम्ही आल्याविना बांडे हाती लागत नाही. तुम्ही आधी येणे. ते कार्य राहतें. दुसरे त्र्यंबकराऊ, तुम्ही जाऊन याणी राहावें कोठें? जेव्हां एखादे गडीं राहावें तेव्हां सारी फौज जेथे हे रहातील तेथें गला पडेल. येणेकडून विचारास उतम नाहीं. याजनिमि(त) आपली व रायाची भेटी होऊन जो पोख्त विचार कर्तव्य तो करावा. विचारे जावेसे जाले, तैसेच येतील. येथे आपले विचाराखेरीज दुसरा विचार किमपि नाहीं. यास्तव लस्कर विचारे चाकणेचे रोखे यावेसे जाले तरी पाठवावे. आपण यावें. नाहीतरी एक मुकाम तुळापुरीच करून आपण व राजश्री तात्यानी येथे यावे. सर्व वर्तमान विदित होऊन जो विचार होईल त्याप्रमाणे राजश्री सेनापति मान्य आहेत. तरी यावयाचें केले पाहिजे. यांचे विचारे व काकीचे विचारे राऊ गेल्याविना फौज

---

१ तालुके खेड.

जथत नाहीं. तुम्ही याणी एक होऊन लांब लांब मजल करून ते प्रांते जावें. पवार सोमवंशी बांडे पिलाजी जाधव कर्नाजी भोसले व ते एकत्र होऊन जे काम करणे ते करावेसे आहे. परंतु आपण येथेच येऊन विचार करावा आणि कूच दरकूच जावेसे आहे. येविसी जे आज्ञा कर्तव्य ते करून आपण यावें. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The letter is not clear. It seems to refer to Bajirao's compaign in Malwa. The handwriting suggests Ramajibava Chitnis as the writer who appears to be addressing Chimaji.*

No. 12] *[15-4-1727-28*

छ २ शाबान

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नों कृष्णाजी पवार विश्वासराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. सातारियाच्या मुकामी अपल्या आगमनाची प्रतीक्षा केली. परंतु आपले येणे व्हावयासी विलंब लागला. राजश्री स्वामीनी पूर्ववत गुजराथ प्रां चिरंजीव राजश्री उदाजी पवार यासी व आपणांस जावयाची आज्ञा केली. येसियासी या प्रसंगाचे बीजारोपण अभिमानपुरस्कर आपण करून आमचा सर्वस्वे अभिमान धरिला. येसे असतां ये गोष्टीचे उभारणीचे पारपत्य व्हावयासी विलंब लागतो याजवरून अपूर्व दिसोन येते. पूर्वीपासून आम्ही आपले पदरीचे, चिरंजीव राजश्री उदाजी पवारहि आज्ञाधारक; येदर्थी दुसरा अर्थ नाही. प्रथम आपण ये गोष्टीचा अभिमान धरून आम्हास आज्ञा करणे ते केली त्यायेगेच या प्रसंगात पडावेसे झाले. तरी अभिमान धरिल्यासारिखे येविशईचे उभारणीविंसी राजश्री राणोजी सिंदे व राजश्री मलारजी होलकर व चिरंजीव राजश्री तुकोजी पवार व राजश्री आनंदराऊ पवार यासी आज्ञा करून ते व आम्ही येका विचारे होऊन मामला निवडून ये ये[१] तो अर्थ करावा. ये गोष्टीने येश आपले पदरीं पडल्ये. येदर्थी दुसरा अर्थ नाही. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणे चतुर्वर्गास आज्ञापत्रे सादर करून ते आम्ही येकत्र होऊन मामला निवाडून ये ये तो अर्थ करावयासी आपण सर्वज्ञ आहेत. विशेष लिहिणे तरी

---

१ दुबार शब्द.

आमचा सांभाळ पूर्वीपासून केला आहे, पुढेही आपलाच आश्रय आहे. येदर्थी विस्तारे काये लिहिणे? कृपावृधि केली पाहिजे. वरकड फौजा आपल्या आहेत तेणेप्रमाणेच हेहि फौज आहे. येविसीचा साकल्य अर्थ राजश्री आपा व राजश्री आबाजीपंत याजजवळी निवेदन कला आहे. ते विस्तारे श्रुत करितील. लोभ असो दीजे हे विनंती..

मोर्तब
सुद.

¶*Krishnaji Pawar solicits the Peshwa's help to retrieve the position in Gujarat where the Pawars appear to have been defeated. It was, he adds, on the Peshwa's initiative that the expedition was undertaken. To whom else could they now look for succour ?*

No. 13] [*9-7-1727 ?*

छ ९ जिल्हेज

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित
प्रधान गोसांवी यांसी

ꣳ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्या श्नो खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती उपर. येथील कुशल जाणऊन स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर लिहिले पाहिजे. जवार रामनगर येथील बोली आपली आमची निमेनिमप्रा जाली आहे. त्याप्रा चालवावे यैसे आसेल तर आपणाकडील कमाविसदार येकत्र राहोन आमल परस्परे अनुमते करून बोलीप्रा वसूल घेऊन मुलूक स्वस्थ होये यैसे करावे. येविषई राजश्री पिलाजी जाधवराऊ यास व वरकड कोणास पत्रे लिहिणे असतील ती परिछिन लेहून पाठवावी जे; धामधूम न करीत यैसे केले पाहिजे. जाणिजे छ ३० जिलकाद. बहुत काये लिहिणे कृपा आसो दिल्हे पाहिजे हे विनंती

श्री
राजा शाहु स्वामि
छत्रपति खडेराव
दाभाडे सेनापति

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, asking for a half share in Jawar and Ramnagar.*

No. 14] [21-9-1727?

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ता। राजश्री आपा स्वामींचे सेवेसी.

अपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून तां। छ १६ सफर गुरुवासरपरियेत कुशल असो विशेष. आजी छ मारीं प्रहरा रात्रीस दरबारास गेलो होतो. त्यास निजामनमुलुख याच्या लस्करातून बातमी जोडा आला. त्याणे वर्तमान सांगितले की सुलतानजी निंबालकर याच्या भेटी होणार आहेत. त्यास लस्करचे कूच छ १४ रोजी आगर छ १६ रोजी होणार. म्हसवडावरून सातारियास यावे यैसे वर्तमान सांगितलियावर राजश्री नारबावा यास बोलाऊ पाठविले. अगोधर दरबारी राजश्री प्रतिनिधी व आनंदराऊ व मोरो शामराज होते. त्यावर मंत्री आले. भास्करबावा व नरसीपंत यास बोलाऊन आणून विचार करून स्वामीस व सेनापतीस व सिदोजी निंबालकर सरलस्कर यास पत्रे सहीची लेहून मुजरद जासूद रवाना केले. ती पत्रे स्वामीस पावतील. त्यावरून सर्व अर्थ कलो येईल. सारांश विचार राजश्री स्वामीच्या चितांतील व सामादिक यांच्या चितातील सेनापतीस व स्वामीनी येकत्र होऊन दाहा बारा हजार फौज कनिष्ट पक्षे उभयेताची जमा होईल ते जमा करून गनिमाचा शहावर जावे म्हणजे गनीम तुम्हावर येईल यैसा विचार आहे. कलेल. गनीम टाकून शाहराकडे प्रस्तूत जावे यैसा विचार नाही. स्वामीनी मनसुफीयाचा विचार काये केला आहे तो अर्थ सविस्तर राजश्री स्वामीस वरच्यावर लेहून पाठविणे. स्वामीकडे बातमी आली असेल त्याचे वर्तमान लिहिले पाहिजे. राजश्री स्वामीस ये प्रसंगी स्वामीचा व सेनापतीचा भरवसा आहे. येविसाचा अर्थ तीर्थरूप राजश्री तात्यासमागमे स्वामीस सागोन पाठविला आहे, त्यावरून कलो येईल. तर स्वामीनी याउपरी विचार काय केला, फौज जमा करून कोठे रोखे जाणार, सेनापतीचा आपला येक विचार होतो कीं नाहीं, यैसे अवघे वर्तमान राजश्री स्वामीस लेहून पाठविले पाहिजे. ये प्रसंगी स्वामीनी उत्तम प्रतीने स्वामिकार्य करून राजश्री स्वामीस संतोष होये ते केले पाहिजे. राजश्री आपास सत्वर पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malharpant Purandare to Bajirao : communicates Shahu's desire that Bajirao and Dabhade should unite their forces and march against the enemy, and report whether Bajirao and Dabhade would agree to co-operate.*

No. 15] [22-9-1727 ?

छ १७ सफर

श्रीशंकर.

राजश्री बाजीराऊ पंडितप्रधान गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेाा खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. कदमाकडील होलकर वगैरे लोक यांची बोली करून आपण ठेविले ते न ठेवावे या विचारें दोनी बंद तपशील लेहून पाठविला. त्याचा जाब अगदीं गालून राजश्री कृष्णाजी दाभाडे याचा जाब सांगतील म्हणून पत्र लिहिलें. त्याजवरून मारनिलेस पुसतां सांगितलें कीं ये गोष्टीची चर्चा तेही आम्हासी केली नाही म्हणून सांगितले. याजवरून विचार अपूर्व अडलला. सांप्रत राजश्री नागोजीराऊ पाटणकर यांस हती घोडे कबूल कबूल[1] करून बोली लाविली म्हणून येकिले. येसियासी मारानिले गतवर्षी आम्हाकडे होते. सालमारी बोली न करितां येथून आपणाकडे जाते तरी ते गोष्टीचे कांहीं नवते. त्यास येथे बोली केली. नालबदी नख्त च्यार पाच हजार रुपाया खेरीज कापड दिल्हे येसे असोन आपण त्यांची बोलीचाली करितातो तेव्हां काय म्हणावे ? मसलतेचा प्रसंग; उभयेतानी सौरस्यें जाऊन मनसबा साधावा हें काय, परस्परें भेटी होवी हें काय, आणि इकडे ज्यांची बोली होऊन नालबंदी घेतली त्यांस आपण नेऊन बोली करावी हें काय ? यामुळे विचार अगाध दिसतो. आपण तों जें करणें तें मनसबियास अनुकूल तेच करीत असतील. परंतु अडलला प्रसंग मनसबियास प्रतिकूल दिसतो, याजकरितां लिहिलें असे. याचा अर्थ विशदें लिहिला पाहिजे. आणि आपण चिखलीस कधी येणार हे लिहिले पाहिजे. आम्ही कूच करून जाणार तों चिरंजीव राजश्री कृष्णाजी दाभाडे आपणाकडून आले. त्यांचे विचारावर आपला मार्ग लक्षित मुकाम केला असे. काली राजश्री स्वामीकडून खासदस्तुरें शफथपूर्वक आज्ञापत्र आले. तैसेच आपणासहि आले असेलें.[2] याजकरिता अत:पर विलंब कार्याचा नाही. जाणिजे. छ १७ सफर. बहुत काय लिहिणे. कृपा असो दिल्ही पाहिजे. हे विनती.

मोर्तब सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, complaining against Nagojirao Patankar.*

---

१ दुबार शब्द. २ शिक्का.

No. 16] [6-11-1727

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसांवी यांसी.

॥ श्रीमत् संकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहाकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालियादारभ्य, कागदपत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी सविस्तर ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. येथील वर्तमान तरी, आम्ही मजल दरमजल येऊन नर्मदा छ १९ रबिलोवली पार जाहालो. पुढे गुजरात प्रांते मजल दरमजल जाऊन. रा। कठाजी कदम हे रेवा कार्तिक सुध प्रतिपदेस उतरून दाहोदेपलीकडे गेले. रा। पिलाजी गाईकवाड सुरतेकडे गेले आहेत. आम्ही उभयेताचे दरमियाने त्वरेनेच जात असो. आपल्या प्रतापे जे होईल (व)र्तमान ते वरचेवरी लिहून पाठऊन. आपणहि निरंतर वर्तमान लिहित असावे. बहुत काये लिहिणें, कृपा लोभ असो द्यावा. रा। छ २२ रबिलोवल. हे विनती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao: informs the addressee of his having crossed the Nerbudda and that Kanthaji Kadam had preceded him three weeks earlier.*

No. 17] [पै॥ 4-2-1759

पै॥ छ ४ रजब
फालगुन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी.

विनंती सेवक गोपाल संभाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशेल जाणून स्वकीयें लेखनआज्ञा करीत असावें विशेंस. कृपा करून पत्र पाठविले ते छ २७ माहे जमादिलाखरी पावलें. पत्री लिहिले कीं राजश्री रायांस घेऊन घणदिवी नवसरीवर सत्वर जावें. त्यास आपले पत्रा-अगोधर आज तीन रोज येथे आलो आहो. त्यास पाहांताना सर्वांचे मते येश आपणच घ्यावें ; मग सरकारकाम लौकर हों किंवा लांबणीवर पडो यैसा विचार आहे. आम्हास नारोपंतानी लिहिले कीं पुढे न. येणे. तेथेच राहाणे. परंतु

आम्ही हळू हळू दाहा कोस पुढे आलोच आहो. सुरत येथून दाहा कोस आहे. विचार बहुताचा दंडक; नासले तरी निमित्ये दुसरेयावर घालावे. कार्ये केले तर आपण केले यैसे दर्शवावे यैसे आहे. बरे, सर्व विपरयासच आहे. परंतु राजश्री रावसाहेब कार्यास चुकावयाचे नाही. राजकारण केले आहे. जर घडोन आले तरी उत्तमच आहें. हे साहेबकामास चुकावयाचे नाही. घडोन येईल ते खरें. इंग्रेजाची व हबसियाची लडाई च्यार पाच रोज सुरू जाहली आहे. जंगी बंदरांत इंगरेज उतरला आहे. हबसी पेचात आलाच आहे. राजश्री कृष्णाजीपंत व बोरगे ताकपीर व भोसले बाबर व त्रिंबकराऊ सदासिव व राजश्री रावसाहेब येका विचारे आहेत. मुलूक कौली. ताकीद उतम प्रकारें करितो. धणी असतां ताकिदीचा हैगई होते. परंतु आमचे आम्ही आहो येसे जाणून बहुत निकडीची ताकीद आहे. कडब्यासिवाय काही उपद्रव देत नाही. कडबाहि रानातून आणितों. +बहुत काय लिहूं? लोभ असो दीजे हे विनंती[१].

¶*The writer Gopal Sambhaji Khandekar refers to a naval engagement between the Sidi and the English.*

No. 18] [*21-4-1728*

छ २१ रमजान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दाभाडियाकडील वर्तमान तरी उमाबाई यानी साल्गुदस्ताचा हुझूरचा येवज पाच (हजार ?) रुपये राजश्री (यशवंतराव ?) दाभाडे याजपासी दिल्हा * * * * * घेऊन तलेगावास आले * * * * सहवर्तमान गुजराथ प्रांते * * * गायकवाड व कठाजी कदम * *. * * सहवर्तमान ये (मधील दोन ओळी फाटल्या आहेत) * कृष्णाजी पवार * * * उदाजी पवार येकत्र * * * रून विंध्याद्री पावेतो उमाबाईनी राजश्री

यासमागमे येवज देऊन रवाना केले. ते समई सांगितले की पैका हुझूर नेऊन देणे. त्यास मागून उमाबाईनी पत्र कृष्णाजी दाभाडे यास पाठविले की नारप्रभु व कृष्णाजी पवार उदाजी पवार येकत्र होऊन गुजराथ प्रांते जाताती.

\+ From here the writer's hand.

१ हें नानासाा कारकीर्दीतील पत्र अगोदर आलें आहे.

हुझूर खासगीकडे माहाल ठेविले. चापानेरचे ठाणे राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे व आनंदराऊ पवार यानी घेतले. याकरितां गुदस्ताचा पैका हुझूर द्यावासा नाही तरी तुम्ही पैका न देणे. हुझूर खासगीकडे माहाल ठेविले आहेत. त्याच्या सनदापत्रा करून घ्याव्या. मुलकात दुसरी फौज न जाये ते करावे. येसी रदबदल करून आपला मुदा हसिले[१] जाला तरी पैका द्यावा नाहीतर न द्यावा म्हणून पत्र त्यास असे लिहिले आहे म्हणून वर्तमान आहे. खरे लटके कळत नाही. राजश्री स्वामीनी कृष्णाजी दाभाडे यास आज्ञापत्र पाठविले की तुम्ही सिवापूरचे मुकामास भेटीस येणे. त्यानी उतर पाठविले * * * * सातारियास गेली * * * * * येऊन म्हणून पत्र आले * * * * * कळावे या करितां लिहिले असे. * * * विदित जाले पाहिजे.

¶*Purandare to Bājirao, informing him of the attitude of Umabai Dabhade so far as the dispute between Shahu and herself was concerned.*

No. 19] [*1728?*

श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी आपा यांसी प्रति चिमणाजी दामोदर अनेक आसीर्वाद. येथील कुशल जाणौनू स्वकीयें कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. राजश्री कुसाजी गणेश हे आमचे पुरातन सेवक कार्येकर्ते आहेत. याकरितां आपणाकडे आलेत आहेत. तरी यां योग्य सेवा असेल ते यास सागोन यांचे हाते सेवा घेतली पाहिजे. यांचे आम्हास अगत्यच आहे. आपणहि यांस वचन केले आहे. याकरिता याचे सर्वविसी आभिमान धरून चालविलें पाहिजे. केवल पडमूते[२] नाहींत. ज्या कार्यावर ठेवाल तेथे तत्पर राहातील. आणि आमचेहि आहेत. यैसे चितात आणून, याचे सर्वस्वे चालविले पाहिजे. बहुत लोभ आसो दीजे. हे आसीर्वाद.

¶*Chimnaji Damodar requests Chimaji Appa to take into service Kusaji Ganesh, his own servant for a long time.*

---

१ प्राप्त. २ पडमूत — डबघाईस आलेलें, नादान.

No. 20] [*1728?*

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो खंडेराव दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. भिकाजी सिंदे यांजकडील पत्र आले तें व आपले पत्र पाठविले त्याजवरून वर्तमान अवगत जाले. अनर्थास मूल मुलीहूनच जाले आहे, यांत पाहावे. येत्न साध्य करावयास त्यांजकडे सभ्य मनुष्य पाठविले आहे. देहावर आणून विचार सांगणार यैसेच पाठविले आहेत. सांप्रत आपण कोणे जागा आहेत, कोणे मार्गे येणार, परकीयांकडील बातमी सांप्रत येका दो दिवसांत कांही आली असेल तें व आपला विचार सविस्तर लिहिला पाहिजे. त्याप्राा आम्ही विचार करून सुमुहूर्ते कूच करून बाहेर आलो. पूर्णिमेनंतर येथून कूच आहे. कलले पाहिजे. छ १३ सफर. बहुत काये लिहिणे कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

० श्री ◡
राजा शाहू स्वामि
छत्रपति खंडेराव
दाभाडे सेनापति

¶*Khanderao Dabhade to Bajirao, promising to start with his armies.*

No. 21] [*1728?*

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री कृष्णाजी दाभाडे व राजश्री नरसिंहपंत व राजश्री माणकोजी * * * * (वायेसे) याचे भेटीनंतर येथील वृत्त व शरीरभावना कळली असेल. प्रस्तुत आपणांकडील भिकाजी शिंदे मौजे कोरेगाऊ परगणे पुणें येथं येऊन कदमाकडील लोकांसी व रयेतीस उपसर्ग

देतात. वडगावीं कुळें धरून नेऊन हाणमार करून रुपये लाविले आहेत. गतवर्षापासून आपणांस आम्ही सांगितलें कीं तेथें ठाणें न ठेवावें; परंतु चितास न आणितां सांप्रत शिंदा पाठविला. काय म्हणावें? आत:पर तऱ्ही त्यास पत्र पाठऊन ठाणें उठवावें. लटिका धंदा आपण चितांत आणावा यैसें नाहीं. जाणिजे. रवाना छ ११ जिलकाद. बहुत काय लिहिणें कृपा आसो दिल्ही पाहिजे हें विनंती

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade remonstrates with Bajirao on the high-handed action of the latter's adherent.*

No. 22] *[1728?*

छ २९ जिल्काद

श्री

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडितप्रधान गोसांवी
यांसी

विनती उपरी. गतवर्षी ज्या मनसबियाचे उदेशें इतलाखी फौज ठेविली त्यास तो विचार अवघाच येकीकडे राहून जो प्रसंग जाला तो आपणास विदित आहे. चिरंजीव राजश्री त्रिंबकराऊ दाभाडे सेनाखासखेल तों आपणासमागमें होते, पावले न पावलें हें कलले आहे. तेंसेच साताराचे मुकामी नेहमी राऊत होते त्यास कांही पावलेंच नाही. चिरंजीव राजश्री कृष्णाजी दाभाडे यांसमागमे फौज देऊन उतरेकडे पाठविले. त्याचीहि समाजाविसी जाली नाही. येवंच अवघी समजाविसी हातावर करावी येसे प्राप्त जालें. अगत्यास्तव लिहिणे लागलें. तरी ये वोढीचे प्रसंगास तूर्त पनास हजार रुपयेपावेतो पाठविले पाहिजेत. पुढे आपले आमचे भेटीनंतर भलते विचारे निर्वाह करून देविला जाईल. परंतु तूर्त अनमान न करितां लिहिलेप्रमाणे येत्नपूर्वक अगत्य अगत्य पाठविले पाहिजेत. जाणिजे. छ २२ जिल्काद. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Dabhade (Khanderao?) to Bajirao: requests a supply of funds to pay troops with.*

No. 23] [Before 1729 ?

छ ४ जिल्हेज

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
गोसांवी यासि

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिलें पाहिजे विशेष. राजश्री स्वामीकडील निकडीची आज्ञा आली. त्याजकरितां तेथे जाऊन येका दो दिवसांत सर्वानुमते विचार आचार करणें तो करून, सोमवारी दोनी प्रहरा पुणियास आलेत. दरबारचा प्रसंग आवघा आम्हास कलावा, याजकरितां पत्र लेहून पाठविलें. प्रविस्ट होऊन वर्तमान विदित जाले. पुढें कूच करायाचा विचार व आणीक विचार कर्तव्य तो आपले आमचे भेटीनंतर करावा लागतो. राजश्री चिमाजीपंतहि समागमे आले आहेत. आपणाकडून राजश्री माणकोजी वायेसे यांस पाठवावे. तदनंतर दरबारचे वर्तमान त्यांजपासी सांगोन, भेटीचा विचार करणे, तो करून, आपणाकडे पाठवितो. तर सत्वर रवाना करावे, म्हणून लिहिले. त्याजवरून कालीच रवाना करावे तर, वैधृती होती. आजी रात्री त्रिंबक जिवाजी व मारनिले आपणाकडे पाठवितो. येतील. जो विचार केला असेल, तो उभयेतांस सांगावा. आपले विचाराविरहित आमचा विचार नाही. दुसरी गोष्टी आपण लिहिली कीं, राजश्री [शिक्का] स्वामियासी तुमचेवारचे आम्ही च्यार गोस्टी विचाराच्या सांगोन, राहावयाचे आज्ञापत्र वार्तिकासमागमे मागून येईल म्हणोन लिहिले. तर हे गोस्टीचे अपूर्व नाही. तुम्ही प्रसंगी आसलेस म्हणजे आम्ही आहो. आम्ही आहो तेथे तुम्हीच आहा. परस्परें येकमेकाचे न्यून न दाखवावें, यातच लौकिक आहे. त्याप्रमाणे आपण केले. उतम गोस्टी केली. उभयेता मारनिलेचे भेटीनंतर सविस्तर कलेल. जाणिजे. बहुत काये लिहिणे, कृपा आसो दीजे. छ ४ मोहरम हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade proposes a personal meeting to Bajirao and assures him of his cordial help. It seems their disputes were settled by Shahu.*

No. 24] [Before 1729?

श्री.

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान

गोसावी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराऊ दाभाडे सेनापती दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करवीजे विशेष. राजश्री कालोजी भोंसले यांजकडे बाबतीचा यैवज पा॥ भामेर व पा॥ वणी रुपये साडेसा हजार आहेत. त्यास येक हजार रुपये सदरहूपैकी तकूब ठेविले पाहिजेत. आपली आमची भेट होईल, ते समई आम्ही हजार रुपयाचा निकाल करून देऊ. वरकड यैवज वसूल होईल. रुा

४००० पा॥ भामेर रुा ५००० पाच हजार पैकी तकूब १००० येक हजार ठेऊन, च्यार हजार रुा घ्यावे.

१५०० पा॥ वणी.

५५००

येकूण पांच हजार पांचसे रुपये वसूल देतील. येक हजार रुपये राहातील. त्याचा निकाल करून, आम्ही देऊ. मारनिलेस हजार रुाच्या तगादा न होये, ते केलें पांहिजे. बहुत काय लिहिणे ? छ १२ रविलावल.

(मोर्तब सुद.)

¶*Khanderao Dabhade requests Bajirao to allow a remission of one thousand rupees to Kaloji Bhosle. (Does this Kaloji Bhosle belong to the Nagpur family ?)*

No. 25] [Before 1729

छ १६ जिल्काद मुा सातारा.

श्री

राजश्री अंबाजीपंत गोसांवी यांसी.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांचे आमचे बोलीचे मध्यस्थीस तुम्ही आहा. बोलिले

वचन सत्य करून आले वसुलाची बाकी पाठविली पाहिजे. वरचील पंडित मारनिले यांच्या पत्रावरून कलेल. बहुत काय लिहिणे? कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Ambajipant Purandare, alluding to the adjustment of the writer's dispute with Bajirao.*

No. 26] [*Before 1729?*

छ ९ जिल्हेज

श्रीशंकर.

राजश्री बाजीराव पंडितप्रधान
गोसावी यासी.

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य प्रतीपूर्वक सौभाग्यादिसंपन्न उमाबाई दाभाडे दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे. का। कडूसच्या कारभारां इमानपूर्वक प्रमाण करून कबूल केले की आपण पत्र करून देतो. त्याजवरून आपणाकडे रंगो लक्ष्मण व खंडोजी घोरपडे पाठविले. परतु पत्रे निखालस करून न दिल्ही. याजवरून बोलीचे प्रमाण पुरते दिसोन आले. हे गोस्टी करावी थैसे नाही. जे बोली बोलल ते वचनप्रमाणें का। मजकूरची पत्रे करून पाठऊन देणे. अपल्या चितात नसल, केले वचने सेवटास न न्यावे थैस असिले तर, पस्ट उतर पाठवणे. आपण वारंवार लेहावे, आपण भिडस्त, मान्य करून सेवटी न करावे याजमधे उचित नाही. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶*Umabai Dabhade rebukes Bajirao for not keeping his word. It should be noted that in spite of the fact that her husband is living this lady takes a notable part in political controversies.*

1085

No. 27] [February 1729

श्रीजयति

अपत्यें चिमाजीनें साष्टांग नमस्कार विनंती. स्वामीचा निरोप राजश्री रामचंद्र मल्हार याजबरोबर आला कीं फौज रजपुतांची घेऊन यावेसें असिलें तरी दो दिवस राहून आपण फौज घेऊन येऊं, तुम्ही महमदाबादेस[1] फौज आहे ते बराबर घेऊन गांव लेहून पाठविले तेथें जाऊन दाणापाणी लस्करास करणें. नाहींतरी याच म्हणाल तरी रातोरात लेहून पाठवणें. आपण लस्करांत येऊन फौज मागाहून जे येणें ते येईल म्हणून आज्ञा सांगोन पाठविली. यैशास, फौज बराबर सारी घ्यावी हे गोष्ट उत्तम, परतु फौज येते ते भारी आहे नाहीं हें कलतच आहे; अगर खासा तऱ्ही येतो तरि तेंही नाहीं आणि लस्करची गत कांहीं ल्याहावीसी बाकी राहिली नाहीं. यैसी गोष्ट असतां स्वामीनी फौज आणायास दोन दिवस च्यार दिवस म्हणून गुंतोन राहावेसें नाहीं. रजपुतांची फौज बगर सिमगा जाल्याखेरीज निघते यैसें नाहीं हे स्वामीसही विदितच आहे. त्यास राजश्री पिलाजी जाधवराऊ याचे आमचे विचारे येकच विचार कीं शत्रूवरी जाणें अगर भलताहि विचार करणें तो आपले कुवतीवरी आहे. पुढें पडीचे दिवसांत होतोसें नाही, यास्तव तेथें त्यासी त्वरेनें फौज पाठवासी बोली करून राजश्री बाबूराव[2] यास ठेवावें आणि स्वामीनी लस्करांत यावे. महमदाबादेची फौज जे असेल ते बराबरी घ्यावी. स्वामी लस्करांत आलियावरी जो विचार कर्तव्य तो करून शत्रूवरी जाणें तरी जाऊं अगर प्रवासांत च्यार दिवस राहाणे तरी राहूं. परंतु आपण तेथें राहावेसें नाहीं. सर्व कारभार आपले जोरीयावरी आहे आणि केवळ त्यांची निसरसांडहि करावीसें नाहीं. यास्तव त्याजवल येकजण ठेऊन आपण लस्करास यावें. महमदाबादेची फौज बरोबर घेऊन जें कर्तव्य तें करावें हें उत्तम आहे. आम्ही उदईक सोमवारीं महमदाबादेवरी येऊन राहतों. स्वामीनी तेथें जो ठेवणें तो ठेऊन हे फौज बरोबर घ्यावीसें करून उदईक लस्करास यावें. येथें आलियावरी पुढें जो विचार कर्तव्य तो करून. परंतु उदईक लस्करास आलें पाहिजे. +राजश्री बाबूजी नाईक व राजश्री बाजी भिवराव यास स्वामीचे आज्ञेवरून बोलाऊं पाठविलें असे. खंबा-

---

१ अहमदाबादेअलीकडे.

२ अंताजी मल्हार बर्वे, बाजीरावाचा मामेभाऊ.

+ येथून अक्षर खुद चिमाजीचें.

इतचे साठ हजार वसूल जाले ते आले. याउपरी होत नाहीं. ढवलकियाचे गिरासीयाचे साडेसतेचालीस हजार करार केले होते त्यांपैकीहि येक रुपया वसूल जाला नाही. हे विनंती.

¶*Chimaji Appa to Bajirao, referring to the campaign in Gujarat. Both the brothers are camping near Muhammadabad.*

No. 28] *[27-3-1728*
[16-3-1729 ?

श्री

राजश्री अंबाजीपंत तात्या गोसावी यासी सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नेहांकित उदाजी पंवार दंडवत विनंती उपरी. येथील जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. येक दोन पत्रें आपणाकडे पाठविली. याचे उतर छ २६ साबानी मौजे निखाली पा झाबवा येथे पावले. आलीकडे वर्तमान, कंठाजी बांडे लोणवाडीयावर आले. दाहोदेस शामजीपंत कमावीसदार कंठाजीकडील आहे, त्यास लिहिले कीं आपण लस्करसहवर्तमान येतो, तरी तुम्ही गावंगना ताकीद करून गुरेढोरे येकीकडें लावणें म्हणोन वर्तमान तत्वता आले म्हणोन आपणास लिहिले असे. उदैक आपला मुकाम दोहदेनजीक होईल तरी आपण यावयाचा विचार करून अविलंबे आले पाहिजे. याउपरी विलंब यावयास सर्वथा केला न पाहिजे. आम्ही मार्ग लक्षीत असों. पिलाजी गायेकवाड डबईवर आहे. मोर्चे लाविले आहेत. जेर केली आहे. विदित जाले पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद

¶*Udaji Pawar to Ambaji Purandare, both in Gujarat.*

No. 29] *[17-3-1729*

श्रीशंकर

राजश्री अंबाजीपंत तात्या गोसावी यांस श्री सकलगुणालंकरणं अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो. उदाजी पवांर दडवंत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. काली छ २६ साबानी पत्रें आपणाकडे रवाना केली. त्यास आजी कूच करून दोहदेनजीक जावयाचा सिधांत

होता. त्यास कंठाजी कदम याचे खबरीस माणसें पुढे पाठविली होती ती आलीं. त्यानी वर्तमान सांगितले कीं कंठाजी कदम लोणवाड्यावरी होता. त्यास आम्ही आपणापासून निघालो तेसमयी त्याची बातमी होती. त्यानी तेथे खबर नेली कीं उदाजी पवार दोन हजार सडी फौजनसी निघाले त्यावरून लोणवाड्याचे मोर्चे काढून आजी छ मारी कूच करून दोहदेवर येणार. पुढे आमचे वर्तमान तत्वता मनास आणून आम्हांसी गाठी घालावी हा सिधात तेथील जाला आहे. यास्तव आम्हीं आजी येथेच मुकाम केला. पुढे आमचे वर्तमान मनांस आणून तो तत्वता गाठी आम्हासी घालितो यांत संदेह नाहीं. आणीकही माणसे बातमीस रवाना केली आहेत. त्याची सडी फौज आठ दाहा हाजार आहे. पिलाजी गाईकवाड डबईवरच आहे. त्यासहि वर्तमान आम्ही आलो येसे लिहिले आहे येसे वर्तमान तत्वता एका भल्या मनुष्याने बातमीबराबरी सागोन पाठविले. आपणहि कूच करून राजगडानजीक आले म्हणोन चिरंजीव राजश्री आंनदराऊ याणी लिहिले त्यावरून कलो आले. तरी आपण याउपरी सडी फौज दाहा हजार घेऊन पुढे चालतात तरी गाठी पडोन ईस्वर येश देतो. ये गोष्टीस येका दिवसाचा विलंब करावा येसे नाही. याउपरी तिकडील वर्तमान आम्हांस येऊन आम्हीं आता आपल्यास ल्याहावे येसी सवड नाही. संधीचा विचार आहे. बहुत काये लिहिणे ? कृपा आसो दील्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Udaji Pawar to Ambaji Purandare, who was with Chimaji Appa in Gujarat, describing the movements of Kanthaji Kadam Bande in the vicinity of Dohad.*

No. 30] *[17-3-1729*

छ २८ शाबान

श्री

सहस्त्रायु चिरंजीव राजमान्य राजश्री आनंदराऊ पवार यासी प्रति उदाजी पवार आसीर्वाद उपरी. आम्ही ता। छ २७ साबान कुशल आसो. यानंतर आजी बातमी कंठाजी कदम याजकडील आली. त्यास वर्तमान सांगितले की, कंठाजी लोणवाड्यावरी होता. आम्ही जेव्हा निघालो तेंव्हा बातमी आम्हापासीच

होती. त्यानी खबर त्यास जाऊन सांगितली कीं, उदाजी पवार सडी दोनी हजार फौज घेऊन आला. त्यावरून लोणवाड्याचे मोर्चे काढून थोडा बहुत पैका घेऊन आजी छ मारी दाहोदेस दाखल होणार. आठ दहा हजार सडी फौज. त्याचां सिधांत विचार हा आहे कीं खानखा आम्हांसी गाठी घालावी. आम्ही आजी कूच करुन दाहोदेनजीक जात होतो, तो यैसी बातमी आली. याज-कारिता मुकाम केला. परंतु तुम्हाकडे खबर पाठवावी हे सवडी दिसत नाहीं. तुमचेंहि पत्र आजी आले कीं राजगडानजीक मुकाम आहे. तरी तुम्ही राजश्री तात्या यांसी पत्र पावताच जाऊन त्यांस बहुत प्रकारे सांगोन कूच लाब लाब मजली करवणे. आमझरे व धार येथील कार्य असेल तरी राजश्री पिलाजी जाधव यांस तेथे ठेऊन सडी फौज तुम्हीं आठ दाहा हजार घेऊन पुढे चालणे. मागे बहुत कार्य होईल. दों ती मजलीचा कारभार आहे. ये गोष्टीस विलंब न करणे. ईस्वर येश खानखा देतो. यैसे सांगोन पत्र पावताच हे तजवीज करणे. त्याची तो नजर आम्हावरी घाटी घालावी यैसे आहे. हे वर्तमान तेथील येका भल्या माणसाने सागोन पाठविले. याउपर खबरीची वाट न पाहाणे. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

मोर्तब सुद.

¶Udaji Pawar after informing Anandrao Pawar of the movements of the armies tells him that Kanthaji Kadam intends to meet him. Udaji therefore asks him to proceed by forced marches along with the forces of Pilaji Jadhao.

No. 31] [*28-4-1729 ?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र छ ७ सवाली पाठविले ते छ १० सवाली मौजे वाघोलीचे मुकामी पावोन सविस्तर वर्तमान राजश्री अंबाजीपंताचे पत्री लिहिले होते ते कलो आले. फौजेसहवर्तमान जुनराभोवते राहून धिराजी पवार बाहेर न निघे यैसें करणे व लोकाची समजावीस करणे. आपणास राजश्री सेना-

पतीच्या अडामुळें च्यार दिवस राहणे जाले; सत्वरीच येऊन म्हणून लिहिले. यैसियास फौजेचा विचार, गंगथडीस येताच वैरण नाही यामुळे तमाम लोकानी निरोप घेतले. त्यास राहवावें तरी पोटास दिल्हे पाहिजे. वैरणीची तो काडी न मिळे याजकरितां निरोप दिल्हे. समजावीस करावी परंतु आपली भेटी जाली नाही. भेटी घेऊन आपले आज्ञेप्रमाणे समजावीस करावी यामुळे समजावीस राहिली. आपली पत्रे लोक गंगथडीपासून गोलियावरी येक मुखेईचे[१] मुकामी आलें, दुसरे गावास आलीयावरी आलें. राजश्री अंबाजीपंत सातारियास येत होते त्यास न येणे म्हणून आज्ञा जाली, यास्तव सासवडी राहिले आहेत. याउपरी आपली आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. विशेष काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, proposing to proceed to wherever he may be ordered.*

No. 32] [*22-5-1729*

श्रीर्जयति

अपत्यें चिमाजीनें साष्टांग नमस्कार विनंती.

येथील क्षेम तागाईत छ ४ जिलकाद मुकाम मौजे सावली नजीक पायागड येथास्थित असे. विनंती : आम्ही विरमगावापासून माघारे फिरलों. सरबुलंद-खान याणीं भेटीस यावेसें केले होते. राजश्री आनंदराऊ पवार तेथें गेले. त्याजवळ करार केला होता; परंतु त्याचें लोकांनीं गवगवा केला म्हणून ते न आले, म्हणून भेटी राहोन ढवलके पेटलोदकडे आलो. पुढें पावागडाकडे येतो म्हणून पूर्वी येक जोडी रवाना केली ते प्रविष्ट होईल. त्याजवरी प्रस्तुत किले पायागडासमीप आलों. याउपरी येथील बेगमी आधीं करावी, पुढें राहाविसा विचार राजश्री आनंदराऊ पवार याचे विचारें आहे. राहिल्यानें पुढ मुलूक आमचा, गडचा उपरालाहि राहातो; परंतु पोटास पाहिजे, त्यास यंदा रुपया मिळाला नाही. कर्जदार दिवाण लोकांची समजावीश, तिन्ही गोष्टी वाराव्यासा पैका जथला नाही; याजकरितां दोहीकडून संकट आहे कीं, राहावें तरी पोटास

---

१ तालुके शिरूर.

पाहिजे, न राहावे तरी मुलूख आपले हातचा जातो, याजनिमित्यें येथें हाली आहो. आधीं गड्ची बेगमी करून मग दुसरा विचार करावा म्हणून येक दोन मुकामे करून जो विचार कर्तव्य तो करून निश्चयेंरूप वर्तमान विचार जो लिहिणें तों मागाहून लेहून पाठवितों. सवाईजी तो मुकुंददरियाकडे गेले. अभयसिंग आपले जागियासच आहेत. आम्ही अभयसिंग राणाजी सवाईजीकडे पत्रें पाठविली व चिंतो गिरमाजी राणाजीकडे पाठविला आहे. त्यांजकडील मनसबा काहीं यंदा कार्यास येतोसें नाही. वरकड वर्तमान राजश्री दादोरायानी पूर्वी आपणांस लिहिलें आहे, त्यावरून कळेल. वरकड पुरवणी दादोरायांनी आम्हास लिहिली ती पाठविली आहे ती सविस्तर पाहावी आणि तेथें गृहस्थ गेले त्यांस च्यार महिने हरयेक तह न देता थोपून राखिले पाहिजे. राजश्री बाबूजी नाईक यांजवळ रुपये २५००० पंचवीस हजार देऊन औरंगाबादेस रवाना केले ते राजश्री बाबूराव वकील यांजवल पाठवितील ते स्वामीकडे रवाना करितील. सेवेसी विदित जालें पाहिजे. +बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji Appa to Bajirao, referring to his doings in Gujarat and dealings with Sarbulandkhan and the Rajput princes.*

No. 33] [*1729 ?*

(पहिला बंद गहाळ) २

समीप आला आहे. कागदपत्रावर सिके जाले पाहिजेत हा अर्थ चितात आणून स्वामीच्या घरास दसऱ्याचे दिवसी अथवा अगोधर आले, आणि सिके कटार स्वामीचे हाती देऊ लागले, तर जिल्हा मामला गुजरात दिल्ह्याखेरीज होत नाही. सिके करून मात्र तुम्हापासी बसून राहू. हती द्यावयाची गोष्ट तो मान्य न करितां सिके कटार दिल्ही तर घ्यावी. फौजा तो रवाना करून मुलूख पालथा घालावाच म्हणजे सहजेच डोले उघडतील. परंतु अहेवदोरा[१] हातास येऊ लागला तर टाकावा येसे नाही. दोप्रहरा सुभेदारास जो विचार सुचला तो आम्हास सांगितला. त्यावरून पत्र लिहिले आहे. परंतु आमचे विचारे हती द्यावे गड द्यावा; मोबदला गुजरातेचा नाही. इतके नसता समजावे येसे नाही. हती गड न मागता सिकेकटार दिल्ही तर रुसव्याची गोष्ट बोलतच असावी. परंतु सिकेकटार घेऊन फौजाची रवानगी करावी. काल सुभेदारास जो विचार

+ येथून अक्षर लेखकाचें.

१ गळसरी, मालमत्ता (आलंकारिक).

सुचला तो त्यानी सागितला त्यावरून लिहिला आहे हे विनंती. नेर गालणा निंबाईत येथील जमीदाराचे हातचा हिसेब पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास निंबाईत गालणियाचा हिसेब पहिले पाठविला आहे. त्यात गालणियाचा हिसेब जमीदाराचे हातचाच आहे. निंबाईतचा जमीदार कोणी हिसेब घ्यावयाजोगा रुजू होत नाही. जो वसूल आला तो मात्र घेतला आहे. नेरचा जमीदाराचे हातचा हिसेब सासवडास आहे तो आणविला आहे. मागून पाठवितो हे विनती.

¶*The handwriting of this letter, of which the first sheet is missing, is Chimaji Appa's and it appears to be addressed to Bajirao in connection with the assignment of Gujarat—about which there was a dispute with the Dabhades, at the Court of Shahu.*

No. 34] [*1729 ?*

पौ छ १९ जााकर

श्री

पुरवणी राजश्री राऊ

स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. सोमाजी सोनवणी निरवीकर राजश्री उदाजी चवाण याकडे चाकर आहेत. ते नालबंदीबद्दल सातारियास आले आहेत. त्याकडे कृस्णाजी दिवेकर वस्ती मौजे वरवड ता पाटस याणे जबानी वर्तमान सांगितलें कीं बांडे व मल्हारजी होळकर राणोजी शिंदे यामधें युध्य जालें. बांडे मोडून रनाली-यामध्यें घातलें म्हणून माणूस पाटसामध्यें आलें, म्हणून वर्तमान सांगितलें. खरें लटकें कळत नाहीं. याकरितां स्वामीकडे तत्वता वर्तमान येईल तें लेहून पाठविलें पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती+.

¶*Bajirao is informed that Sindia and Holkar have attacked Bandey who consequently had to seek the protection of the walls of Ranala.*

+ पत्र बाजीरावास.

No. 35] [1-1-1730 ?

छ २२ जमादिलाखर

श्रीआईआदिपुरुष

विनंती उपरी. राजश्री त्रिंबकराऊ दाभाडे व यासमागमेचे सरदार यास हुजूर दर्शनास आणावयास हुजरे पाा आहेत यासी रुपये

त्रिंबकजी साबळे १	माहादजी कराडकर १
तानाजी पांढरे १	शामजी चवाण १

चौघेजण पाा आहेत यासी रुपये

१०	त्रिंबकराव सेनाखासकेल	५	जाऊजी दाभाडे
१०	कृष्णाजी दाभाडे	५	कृष्णाजी पवार
५	कालोजी भोसले	५	माणकोजी वायेसे
२५		१५	

येकून चाळीस रुपये लेहून देविले पाहिजेत हे विनंती

¶*Before the battle of Dabhoi on 1st April 1731 in which Trimbakrao Dabhade was killed, Shahu seems to have made an attempt to conciliate him by sending him special messengers, as indicated in this paper, to bring him into his presence at Satara.*

No. 36] [30-1-1730 ?

छ २१ रजब

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी पोष्य वासुदेव जोसी सां. नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. ये प्रांतीचे वर्तमान सेवेसी पुर्वी लिा. आहे. यैशास दाभाडियाचा उपद्रव मावलास बहुत लागला आहे. सांप्रत वर्तमान ऐकीतो की दाभाडे फौज कल्याण भिवंडी प्रांतातून कोलवण फिरंगण प्रांते पाठवणार आहेत. त्याची फौज आली म्हणजे हा मुलूक पायमलीखालीच उठोन जाईल. आम्हाजवल राऊताचा जमाव आहे तो स्वामीस विदित आहे. कळावे म्हणून लिा असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Wasudeo Joshi to Chimaji Appa, complaining of Dabhade's activities in the Konkan.*

No. 37] [पो 26-2-1730 ?

छ १९ साबान

श्री

पुरवणी राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ व नारप्रभु याची पत्रे हूजूर. राजश्री स्वामीस आली कीं माहाराजाचे आज्ञेप्रमाणे आंम्ही उभयेता फौजसहवर्तमान फतेपुरास गेलो. राजश्री उदाजी पवार याची भेटी घेऊन त्याची समजावीस करून आम्ही त्रिवर्ग येकत्र होऊन गुजराथ प्रांते जातो म्हणून पत्रे पाठवीली आणि राजश्री उदाजी पवार याणीही राजश्री स्वामीस विनंती पत्र पाठविले कीं आपण येकनिष्ठपणे सेवा करितो, माहाराजानी ऊर्जित केले पाहिजे म्हणून पत्रे पाठविली. उमाबाई रनालीयास आली होती. कदमाची समजावीस करून मागती नवापुराकडे गेली. राजश्री स्वामीचा ऐवज गुदस्ताचा रवाना केला. चांदवडपावेतो पैका आला म्हणून वर्तमान आले आहे. विदित जाले पाहीजे सेवेसी श्रुत होये. हे विज्ञाप्ति.

¶*Purandare to Bajirao, informing him of the reconciliation of Udaji Pawar and the movements of Umabai Dabhade.*

No. 38] [28-5-1730 ?

श्री.

राजश्री जेठीबोर ठाणे गजरे गोसांवी यांसी अखडितलक्ष्मीअलकृत राजमान्य स्नो. विसाजी भास्कर किले पावागड आसीर्वाद विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. गोसांवीयांकडील वर्तमान बहुत दिवस कलत नाहीं तरी सविस्तर लिहिणे. यानंतर राजश्री पंत स्वामीकडील पत्रे मागे गोसांवीयानी पाठविले ते पावले. त्याआलाकडील वर्तमान कांहींच कलत नाही. तरी लस्कर कोठे आहे काये देशास गेले किंवा आलीकडे[1] कोठे आहित, हे सविस्तर लिहिणे व महीपलाकडील ठाणीठुणी जांगा बजागां आहेत. राजश्री नारायेण जोशी व राजश्री बाजीराऊ वासुदेव आमदाबाजेस आहेत. त्यास ठाणे मजकुरास यावयाची आज्ञा जाहली होती. त्यास आले की नाहीत, त्याजकडील काये वर्तमान, ते व राजश्री पिलाजी गायकवाड व कंठाजी कदम व उदाजी आनंदराउ पवार हे कोठे आहेत, हे सविस्तर लिहिणे. किले मजकूरचे वर्तमान तरी आजी ताा सुखरुप आहो. आम्हाविसी कांहीं

---

१ अलीकडे.

फिकीर न करणे. राजश्री पंत स्वामीची आज्ञा आम्हास आहे कीं, जे काम-काज लागेले ते तुम्हास लिहावे. त्याचा सरंजाम सर्व तुम्ही ठाणे मजकुराहून करावा, म्हणून आज्ञा आहे. यैसीयास येथील सर्व सरंजाम गोसांवियासी करणे लागेल. काही खर्चाची बेगमी केली पाहिजे. बहुत काये लिहिणे, कृपा असो दिजे. रा. छ २१ जिल्काद हे विनंती.

¶*Visaji Bhaskar, killedar of Pavagad, writes to Jethibor inquiring of Bajirao's movements and asking for provisions for the fort.*

No. 39] *[12-11-1730*

श्री

अपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १२ जमादिलौवल यथास्थित असें विशेष. स्वामीनी दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलं. राजश्रीच्या चित्तांत गुजराथेच्या सनदा अथवा सहीचीं पत्रें करून देऊन दाभाड्यांच्या आपला कजिया लावावा यैसा अर्थ आहे. यैसियास सनदा अगर सहीचीं पत्रें दिल्हीं आणि कांहीं पैका मान्य करा, यैसें म्हणूं लागले तर, पैका मान्य करावा किंवा न करावा, सनदा अगर सहीचीं पत्रें घ्यावीं कीं न घ्यावीं, याचा विचार काय तो लेहून पाठवणें म्हणून लिहिलें. ऐसीयास, हंगाम वसुलाचा गेला. आगदीं वसूल मुलकांतील पिलाजीनें घेतला. याकरितां पैका मान्य करणें तो विच्यारें करून थोडाबहुत करावा. वरकड दाभाड्यांनीं कजिया केला तर तो आम्ही संभाळतों; त्याची फिकीर आहे यैसें नाहीं. परंतु जर ते निजामास जाऊन भेटले तर परिछिन्न त्याचा हुद्दा दूर करावा येवढी गोष्ट मात्र राजश्री शीं खरी करून ठेऊन सनदा देतील त्या मान्य कराव्या. पैका तों ये वर्षी हातचा गेला; परंतु नक्षाची गोष्ट आहे याकरितां मान्य करावें. आतां आमची फौज पांच सात हजार ते प्रांतें गेली तर त्याच्या फौजानीं येऊन आमचे फौजेपुढें उभे राहावते ऐसें नाहीं. याकरितां सनदा करून दिल्ह्यातर कबूल कराव्या ऐसें आमचे विच्यारें आहे. यांत स्वामी वडील आहेत, हें विनंती+.

पैवास्ति छ १३ जमादिलौवल संध्याकाळ

¶*Chimaji to Bajirao, referring to the recovery of dues in Gujarat and a possible conflict with the Dabhade.*

+ सबंध पत्र चिमाजीच्या हातचें.

No. 40] [18-11-1730

श्री.

राजश्री चिमाजीपंतआपा साहेबाचे सेवेसी,

ॐ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये राजश्री श्रों मल्हारजी होलकर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल तागाईत कार्तिक वदी ५ मुा रजाणे स्वामीचे कृपाद्दष्टीकरून येथास्ति (त) आसें विशेष. वार्तिकासमागमें पत्रें आली त्यावरून आपण फौजेंनसी मुहूर्ते कार्तिक वदी २ कूच केले आहे. जमाव करीत आहों. कोणी लोक जमा होताती, कोणासी पत्रे पाठविली आहेत. तेहि जमा होतील. त्यासी आपण धुळे सोनगीर प्रांते येतो. साहेबाची आपली भेटी तेच स्तली होईल. व देसीची फौज तो तुम्हासमागमेच गोविंदपंताबराबर येईल. वरकड वर्तमान तरी आमित्र उभयेता खोपलीकडे गेले. निमे पिलाजी गायेकवाड राजपिपले येथे गेले. श्रृत होये. तुम्ही पत्र पावताच आति सत्वर येणे. आनमान करावयाचे कार्य नाही. चारी दिवसी मुलू(क)गिरीचे निघोन गेले हे तो स्वामी जाणतच आहा. तेथे विस्तार लिहिणे लागत नाही. सूज्ञ आहा. बहुत लिहिणे नलगे. परंतु आति सत्वर फौजेनसी आले पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Malharrao Holkar to Chimaji Appa, advising the latter that he will join him at Dhulia Songir.*

No. 41] [27-11-1730 ?

श्री

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती सेवक नारो गंगाधर कृतानेक सा। सनमस्कार विनंती. येथील क्षेम ता। कार्तिक वद्य त्रयोदसी मु।। साखरी प्रा। भामेर येथास्थित असे. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते बारावे रोजी सोनगडास पावलो. मार्गीच सेनापतीचीहि भेट घेतली. आज्ञेप्रमाणे सविस्तर वर्तमान व पत्रे निवेदन केली. त्यास बहुत समाधान पावली. आपण राजश्री पंताचे भेटीस येणे, भेटीनंतर जे आज्ञा करितील ते प्रमाण, येसे मान्य केले. गायेकवाडास पत्रे दिल्ही. त्यानी उत्तरच लिहू दिल्हे तेच

बेजिनस सेवेसी पाठविले आहे त्यावरून विदित होईल. वरकड वर्तमान दरशनांती निवेदन करून. मुख्य गोस्टी मातुश्री उमाबाईचे चिती की येदा आपणास स्वारी समागमे रा। पंती न्यावे. सेनाखासखल हे पद साताराहून करून आणवावे. खर्चवेच बसल तर राजश्री पंताचे आमचे विचारे होईल तो मान्य करावा, आणि आपली बंदोबस्ती करून फौजासहत आपणास न्यावे येसे म्हणतात; आणि दरशनानिमित्य सोनगडीहून स्वार होऊन साखरीस आली. कृष्णाजी दाभाडे रनालियास बांडियास आणावयानिमित्य गेले. येका दो दिवसी बांडे भोसले समजावून त्यास घेवून स्वामीचे रोखे येणार. स्वामीची स्वारी कोणते मार्गे होईल ते आज्ञा करावी. याचे ठाणी व पागा दोन अडीचें घोडे आवजी कवडे यानी घेतली, म्हणून श्रमी फार आहे. सेवेसी श्रुत होय ये विनंती.

¶*Naro Gangadhar Mujumdar to the Peshwa, giving details of his mission to Dabhade and his attitude.*

No. 42] *[2-12-1730*

श्रीराम

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराव तथा राजश्री चिमाजीपंत यास प्रीतिपूर्वक नारो राम कृतानेक विनंती. येथील कुशल मार्गसिर्ष सुध चतुर्थी बुधवार जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. वार्तिकासमागमे लोहनेरचे मुकामीहून पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं. लस्करसहवर्तमान आपणांस जाणें लागलें तो प्रसंग व पुढील कितेक विचार विस्तारें लिहिला व लोहनेरचें वर्तमान लिहिलें तें कलों आलें. अशास तुम्हीं त्याप्रांते त्वरनें जाल असें नव्हतें. याकरितां आम्हीं राजश्री स्वामीपासून तलेगावास आलों. तुमची आमची भेटी होऊन विचारें होईल तें करावें असा प्रसंग होता; परंतु तिकडील विचारामुलें तुम्हांस जाणें प्राप्त जाहालें. आम्हीं येथें आल्यानंतर येथील वर्तमान मनास आणितां यांचा दुराग्रह विशेषच दिसोन आला. पुरातन जें आहे ते येक खेडें उणें न होतां आमचें आम्हांकडे देऊन शेवा घ्यावी, हा बायांचा मुदा. ये गोष्टीची उदासीनता करून जावें तरी गर्गशा तुरूतच वाढणार. राज्यांतील मऱ्हाटे चौघे चौंकडे गेले, राहिले त्यांसही घालवितात हें निमित्य उत्तम नव्हे. याकरितां यांस आम्हीं सांगणें तें सागोन धण्यापावेतों न्यावें हा उपाय करीत होतों. परंतु यांचे कोणी समागमें येत नाहीं. लोहनेर व इत्यादिक तिकडील

---

१ खुद्द. जसेंच्या तसें.

खेडियांचीं वर्तमानें यैकोन विशेषच संतप्त होतात. तुम्ही तों दूर लांबलेस. आम्ही येथें येऊं येथील मनसुबा द्रष्टीस पडोन विचार प्राप्त जाहला. राजश्री अंबाजीपंतहि समागमें होते. गर्गशा वाढल्यानें राज्याच्या मनसुबियास उपयुक्तता नव्हे. तुमची भेटी होती म्हणजे हरयेक विचार करून निकाल काढिला जाता. तो प्रसंग राहिला. तेव्हां राजश्री कृस्णाजी दाभाडे यांस समागमें घेऊन राजश्री स्वामीकडे स्वार होऊन गेलों. येथें यांजवळी दाहा हजार फौज याणी तयार केली आहे. तिकडील फौजेचें वर्तमान तुम्हांस कलतच असेल. गनीमही तुम्हांसमीपच त्या प्रांतें आला. यामधें ग्रहकलह निर्माण जाहला, तेव्हां येखादे निमित्य येऊं शके. बरकड लोहनेरचा परिहार तुम्ही लिहिला. येथें मनास आणितां, आपला मुलूख खानदेश बागलाण सुरतपर्यंत त्यांजकडील अमलास तफावत करित नाहीं, असें असतां उगेच नाना प्रकारचे उपद्रव करितात म्हणून याणी सांगितलें. अशास किरकोळी बोभाट होऊं द्यावे यांत काहीं अधिकोत्तर नाहीं. जेणेंकरून कोणेविसींचे निमित्य न ये, लौकिक उत्तम दिसे तोच विचार केल्यानें उचित आहे. आम्हीं राजश्री स्वामीकडे गेल्यानंतर तेथंही जो प्रसंग होईल तो तुम्हांस लेहून पाठऊन. गर्गशा वाढला याचा विवेक होये ते केल्यानें सर्व गोष्टीस उपयुक्त आहे. तुम्ही विचारास चुकाल असें नाहीं; परंतु राज्यांतील मऱ्हाटे घालवितात हें निमित्य न घ्यावें. जें करणें ते राज्यकारभारास व्यत्यय न दिसे तें केलें पाहिजे. दाभाडे येथून बाहीर निघणार. गनीम समीप येतो. याकरितां हरयेक प्रसंगांस बहुत सावधपणे आपला नग राहे, लौकिकविरुध न दिसे, तो विचार करून वरचेवरी वर्तमान आम्हांस लेहून पाठविलें पाहिजे. येथीलही जो विचार होईल तो तुम्हांस लेहून पाठऊन. आम्हीं आजी येथून स्वार होऊन गेलों. सविस्तर राजश्री अंबाजीपंत तुम्हांस लिहितील त्यावरून कलों येईल. कललें पाहिजे. सा+ गोष्टी, पहिली बाजी राखिली त्यान्वयें बाजी राखणें. श्रीनें तुम्हांस येश बहुत दिल्हें तें जतन करणें. निमित्य सर्वथा न घेणें. गनीम बहुत दगेखोर आहे, सावधपणें राहत जाणें. याच्या मुलकास उपसर्ग न देणे. किरकोळी केलीयानें उपहास मात्र होती, इतकाच आर्थ आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Naro Ram to Bajirao. The writer along with Ambaji Purandare was dispatched by Raja Shahu to Talegaon to effect a reconciliation between Bajirao and the Dabhades. The writer admonishes Bajirao not to injure the interests of the Dabhades in trifling matters. He should take care, lest such powerful Maratha Sardars by deserting the cause of Shahu, create a bad name for the Government.*

+The writer's hand,

No. 43] [*1730 ?*

श्री

सेवेसी प्रार्थना यैसिजे. रा कृष्णाजी दाभाडे सुभेदार यांचा शह चितांत बहुतसा आणतील तर तैसा कांही नाहीं. त्यांचा हिसेब किलेब आहे. स्वामीनी अभिमान धरलीया शहाचे निवारण सहजातच होईल. माझ्या सिरावर स्वामीचा अभिये कर जाहाला म्हणजे वाजबी हिशेब आहे तो सेवेसी निवदन करीन. त्यावरून श्रुत होईल. सारांश अभिमानच धरिला म्हणजे सर्व उतम होईल. येविशई काये आज्ञा ते केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Offering to settle the dispute of Krishnaji Dabhade.*

No. 44] [*1730 ?*

पुरवणी बंद २

तो कोण्ही नव्हते. यास्तव हे जरूर जाणोन जोडी हरकारियाची रुपया येकेवीसपावतो तयार करून स्वामीकडे रवाना केले. त्यास ते जोडी ज्या ठिकाणी पोहचेल त्या मकानाचे नाव व तारीख लिहून पाठविले पाहिजे. वरकड नवल विशेश आइलिया स्वामीस वरचेवर पावल. साराऊश उमाबाई न आलीया बांड्याचा गाईकवाडाचा इतबार नवाब हरगीस[1] करीत नाही. त्याचा वकील त्यास साफ सांगितले, जोवर उमाबाई तुम्हास सामील होत नाही तोवरी आपणास इतबार येत नाही. प्रसतूत यैसा प्रसंग. स्वामीनी आपली मोहीम सिरा चढऊन मुदई[2] पेशमान[3] होत ते केले पाजे. बहुतसे काय लिा हे विनती.

¶*Complications about Dabhade and the Nizam.*

No. 45] [*13-1-1731 ?*

पा़ो छ ३० रजब

श्री

राजश्री आपा गोसावी यांसी

ॐ श्रीमंतसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित अनंदराऊ पवांर कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशेल ताा छ १९ रजबु मुकाम आरणी पंाा ललिंग जाणून स्वकीये कुशेल लेखनं करावयासी आज्ञा

---

१ बिलकूल, मुळींच. २ दावेदार. ३ पस्तावलेला.

करीत असिलें पाहिजे विशेष. राजश्री राणबा व मल्हारबा यैसे नेत्रालबारी उतरून गेलेसे आम्हास वर्तमान कललियाउपरी आम्हीं कूच दरकूच नीट मार्गें जात असतां, जावजी दाभाडे व बांडे व दलपत टोके हे सात हजार फौजेनसीं रनालियासीं होते ते रातवा खपौन चालोंन आम्हांवरी आले. कोसावरी कहीवाले यांस आढललियावरी त्यांणी आम्हांस खबर सांगितली. मग आम्हीं सडे फौजेनसीं निवडोन त्यांजवरी गेलों. त्यांचें व आमचें युध्ये बरे वजेने जाले. अमित्रांचा पराजये होऊंन पलों लागले. त्यांजकडील निशांणे भगवीं २ वगैरे ३ येकूण पांच व नगारे ३ येणेप्रों पाडाऊ जालीं. लस्करात घोडी अडीचतीनसेंपावेतों आलीं. दलपत टोके यास जखम लागोन त्याचा बस्ता घोडा आम्हांकडील जावजी बंडगर यांजकड आला आहे. पयेदुम(गायेदुम ?) सोंनगीरपर्यंत पांच कोस पलाले. त्यांचे पाठीवरी आम्हाकडील स्वार होते. फ़ारसे गर्वेकरून आले होते. आपले पुंण्येप्रतापें त्यांचा हागरा मोडिला. जालें वृत सेवेसी लिहिलें असे. आम्हाकडील वीस पंचवीस खासे खासे माणूस जखमी जाले.

चौकोनी शिक्का

वरकडहि लोक व घोडीं जखमीं जालीं आहेत. विदित जालें पाहिजे. बहुत काये लिहिणे? कृपा अखंडित असों दिल्ही पाहिजे हे विज्ञापना. हरघडी स्वकीये कुशेलार्थ लेखन करून संतोषवित असांवे. विस्मरण न कीजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Anandrao Pawar to Chimaji Appa, describing a slight skirmish which the writer had with Dabhade and Bande in which he defeated them decisively.*

No. 46] *[2-4-1731*

तेरीख ११ सवाल

श्री.

राजश्री कृष्णाजी कदम गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद. सुहूर सन इहिदे सलासीन मया अलफ. राजश्री त्रिंबकराऊ दाभाडें सेनापति व बांडे, गाइकवाड, उदाजी पवार व निजामनमुलुकाची फौज यैसी डबईस आली. आम्हींहि आपलेच फौजेनसी डबईनजीक दो कोसावरी दोन रोज मुकाम केला. नित्य सेनापति कोसावरी येऊन युध्यांस उभे राहात. तेथे युध्यास न बने यास्तव

छ ४ सवाली कूच करून थवाई प्राा डबई येथे आलो. सेनापति कुल फौज जमा करून युध्यास आले. युध्य जाले. सेनापति ठार पडले. मलोजी पवार पडले; जावजी दाभाडे पडले; पिलाजी गाईकवाडाचा लेक पडला; उदाजी पवार पाडाव जाले; चिमाजीपंत धरून आणिले. पंधरां सतरा हर्ती व नगारे निशाणे पाडाव जाली. बाडे गाईकवाड आनंदराऊ पलोन गेले. कुवर बाहादर जखमी आहेत; पलाले. तुम्हास कलावे यास्तव लिहिले असे. तेथे मुस्तफीखान आहे त्यास व पिलाजीचे फौजेस ताराज[१] करणें. आपला अमल मुस्त करणें. पैका मेलवणे. जाणिजे छ ५ सवाल.

(बाजीरावाचा शिक्का)

(लेखन सीमा.)

¶*Bajirao to Krishnaji Kadam, describing the battle between his own forces and those of Dabhade, Gaikwad, Powar and Nizam, in which Bajirao inflicted a severe defeat on the enemy. The spoils of the battle are given.*

No. 47] [*7-5-1731*

श्रीमलारी मार्तंड भैरवाय नमः

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
व राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नरसो कुसाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुषल येथील कुषल जेष्ट शुध १३ जाणोनु स्वकीये स्वानंद वैभव लेखनआज्ञा केली पाहिजे. आज्ञापत्र पाठविलें पावलें. पावोन परम समाधान जालें. वर्तमान लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास राजश्री येशवंतराऊ दाभाडे सेनाखासखेल व राजश्री पिलाजी गायकवाड राहोडीयावर गेले होते. राजश्री भावसिंग राये कबिले निघोन सुरंगाणांत गेले. खासे राहोडीयांत होते त्यांचें कांहीं न चाले. मग नाशकास आले. सात दिवस येथें होते, श्रीत्रिंबकराजासही गेले. येक दिवस जाऊन नाशकास आले. जे दिवशीं आले ते रात्रीं नवाबसाहेब निजामनमुलुक बहादुर यांचीं पत्रें आलीं. वाचून तेच घडीस स्वार जाले ते सुकेण्यावर मुकाम केला. दुसरे दिवसीं तेथें होते. राजश्री उदाजी पवार व आनंदराऊ यांच्या भेटी जाल्या नाहींत. रुसवा करून ते वाघाडियाकडे गेले. राजश्री

---

१ हैराण.

सेनाखासखेल व राजश्री पिलाजी गायकवाड येवलीकडे गेले. नबाब साहेब छ. ९ जिल्हेजीं अवरंगाबादेस दाखल जाले. यांच्या त्याच्या भेटी होणार आहेत. वार्ता आहे कीं पुणतांबीयावर येऊन राहावें. पुणतांबिहून नगर अथवा पेडगांवीं छावणी करावी. नवाबसाहेबीं अबदुलाखान दिवाण दोन हजार स्वांरांनसी करनाटकाकडे भागानगरास रवाना केले आहेत. त्यास मातुश्री उमाबाईनी आपले सरदारास पत्रें पाठविलीं कीं तुम्हीं तुरूत ताम्राकडे न जाणें. मागें फिरोन जाणें. त्यास राजश्री भावसिंगराये यानीं मौजे पिंपलगाव परगणें लोहनेर चांदवड बारी यासी आहे. गावास गढी होती तो गांव बलावला. फत्ते आबखान याची फौज आली होती. दाहा वीस खून जाले. फिरोन गेले. त्यास दाभार्डीयाची फौज त्याजवर जाणार हेहि वार्ता आहे. सारांश गोष्ट राजश्री पिलाजी गायकवाड यांसी स्वामीचें भये फारसें आहे. ते कांहीं नवाबसाहेबाचे स्नेहाचा पक्ष सोडीत नाहींत आणि नवाबसाहेबासही तुमच्या विरुधाकारणें सर्वांचा श्नेह करणें; उभये पक्षीं विचार येसा आहे. त्याहविर आपणही शैन्यांत पत्रें पाठविलीं आहेत. सविस्तर वर्तमान आलियावरी सेवेसीं लेहोन. आमचें उत्तर घेऊन जासूद राजश्री भावसिंगरायाकडे उत्तरासाठीं गेले. तेथून राजश्री उदाजी पवार याजकडे उत्तरास जातील. दिसंगती लागेल. तों स्वामीस चौहूकडून वर्तमानावर वर्तमानें येतील आणि आपणहि नवल आपूर्व वर्तमान लेहावयास अंतर करणार नाहीं. हरघडी सेवेसीं लेहोन. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Narso Kusaji to the Peshwa, giving the positions of the armies of the various Sardars and in the end discussing the chances of the Sardars leaving Peshwa's side and joining that of the Nizam, who is trying to befriend them.*

No. 48] [*7-11-1731* ?

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यासी

ॐ श्रीमंत सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १७ जमादिलोवल जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गतवर्षी किले पायागड येथील मजकूर राजश्री उदाजी पवार यासी केला होता तो योग घडोन न आला. हाली राजश्री कृष्णाजी दाभाडे याजकडून

राजकारण आले आहे की, पंनास हजार रुपये देऊन, गडदेखील वस्तंभाव आपले हवाला करावी. यैसी बोली आली आहे. आपणास लिहिले आहे, तर विचार करून, राजश्री आपास लिहिणे. तेथून उतराची प्रतीक्षा आसेल तरी, आम्ही शुक्रवारी प्राथःकाली स्वार होऊन जातो. आपल्या उतराची प्रतीक्षा करितो. उतर आलियाउपर त्यास जे लिहून पाठवावयाचे, ते पाठऊन. विशेष काये लिहिणे. कृपा आसो दीजे. हे विनती.

[पिलाजीचा शिक्का]

¶*Pilaji Jadhao communicates to Bajirao Krishnaji Dabhade's request for the delivery of the fort of Payagad.*

No. 49] [*13-11-1731*

पा छ २३ जमादिलोवल

श्रीभवानी प्रसन्न

विनाति उपरी. राजश्री येसवंतराव दाभाडे सेनापति यास व उमाबाई दाभाडी-यास दर्शनास हुजूर येणे म्हणोन खास दस्तके[1] देऊन जासूद जेथे[2] दर्याजी नाईक पाठविले, यास मसाला रुपये

२५	केदारजी पवार	२५	बुबाजी पावला.
२५	नरसोजी नलवडा	२५	जोत्याजी कदम
५०		५०	

येकूण सभर रुपये रास[3] सेनापतीकडे आ (का) रून देविले पाहिजेत. उमाबाई याचे पत्र वली[4] भरून देणे हे[+] विनंती.

¶*Umabai and Yashvantrao Dabhade visit Shahu, after Trimbakrao Dabhade fell in the battle of Dabhoi.*

---

१ दस्तक = हुकूम, हुकूमवजा पत्र.
२ जथे = जथ्यापैकी. जथा = जमाव, कंपनी.
३ रास = संख्या.
४ वली भरून = मजकूर लिहून.
+ अक्षर निराळें.

No. 50] [1731 ?

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

अखंडितलक्षेमीआलंकृत राजमान्ये श्नो कुवर बहादर विनंती उपरी. येथील क्षेम जानऊन तुम्ही आपुले स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे. याउपरी बहुत दिवस जाले, गोसावी यानी पत्र पाठऊन परामृश न केला. यैसे गोसावियास न पाहिजे. याउपरी आपण ऐकिले कीं या प्रांता येणे होनार आहे. यैसीयास आपला हेत भेटीचा आहे; तर कितेका दिवसा आगमन होईल हे लिहिले पाहिजे. वरकड आपुले वर्तमान तर कितीयेक मल्हारी कदम जबानी सांगता कलो येईल. सदैव पत्री सांभाल करीत असिले पाहिजे. कृपा निरंतर असो दीजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Kuwar Bahadar was a Rajput Sardar fighting on behalf of Dabhade at Dabhoi. He writes this letter to the Peshwa.*

No. 51] [27-2-1732

पो. छ १२ रमजान.

श्रीराम.

राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यांसी सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंक्रृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष. रा बाजी त्र्यबंक खोले यांजविशयीं आपल्यास समक्ष सांगणे तें सांगितले आहे. आपणहि मान्य केले आहे. तुम्ही ब्राम्हणकार्यास चुकणार नाहीत, याजकरितां लिहिलें असे. आपण पांचसे रुा देतो. तुम्ही येक हजार रुा देऊन ब्राम्हणाची मुक्तता होय ते गोस्टी केली पाहीजे. ये विशयीं अनमान सहसा न कीजे. आज सुटका तेथून करून उदईक रविवारी मारनीलेस आम्हाकडे पाठऊन दिल्हें पाहिजे. बहुत काये लिहिणे. लोभ आसो दीजे. छ ११ रमजान हे विनंती.

¶*Umabai Dabhade requests Bajirao to use his influence to effect the release of one Baji Trimbak Khole who appears to be her partisan.*

No. 52] *[21-9-1732 ?*

छ १ जावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान श्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आश्विन सुध त्रयोदसीपरियंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून शेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा कीं बाबतीचे रुाविसी वरचेवर हटकीत जाणे आणि सेनापति जोपरियेंत ते प्रांते आहेत तोवर तुम्ही न येणे म्हणून आज्ञा. यैसियासी सुध पंचमीस राजश्री बाबूराव * * * (सेना) खासखेल व मातुश्री उमाबाई या उभयतासी खटखट जाली. त्यास खासकेल तो रुसवा करून हलदाणीस गेले. मातुश्री उठोन वरशास गेली. राजश्री सेनापति व दमाजी गाईकवाड नवापुरीच राहिले. दुसरे तिसरे दिवसी सेनापति जाऊन मातुश्रीस समजाऊन आणिले. मग राजश्री बाबूराऊ यासहि घेऊन आले. मग दमाजी गाईकवाडास वस्त्रें मातुश्रीनें द्यावी यैसा करार जाला आणि रुपये बावीस लक्ष द्यावे यैसा निचय जाला होता. त्यास राजश्री बाबूराऊ याणी दमाजी गाईकवाड यास फितवा देऊन सोनगडी गेला यैसे वर्तमान आहे. फौजेचे वर्तमान तर राजश्री दमाजी गाईकवाड याणे नवी व जुनी आठ दहा हजारपरियेंत ठेविली आहे व मातुश्रीजवल तो दीढ दोन हजार आहे देखील टोके. राजश्री कंठाजी कदमराऊ याणी तों अदियाप ठेविली नाहीं. उदाजी पवार तो फतेपुरीच आहेत. राजश्री बापू शंकर येऊन बसिले आहेत. पवाराचाहि निकाल निघता दिसत नाही. दमाजी तो येत नाहीं. पुढे कसे होईल ते ईश्वर जाणे. गुजरात प्रांतीचे वर्तमान तर पाऊस बहुतच जाला. धारण विसा सेराची आहे. सुरत प्रांतीचे वर्तमान तर साल मजकूरचा पैसा झाडियानिसी गाईकवाडाने वसूल घेतला. सराफखानासी व किलेदारासी हमेशा शहरात जुजे होत. सातशे हवेली पडली यैसे वर्तमान आहे. माहाराज छत्रपति श्वामीचे हुजरे येऊन बसिले आहे परंतु सेनापति काही देसीं येता दिसत नाहीं. अदियाप काही मातुश्रीस रुा येक गाईकवाडाने दिल्हा नाही. कर्ज काढून मातुश्रीने राजश्री श्रीपतराऊ यांचे रुा रा केलें व देवांचे राजश्री उधोपंत याजबरोबर रुा रा केली. दुसरा कोणास (पैका) दिल्हा नाही. निज़ामाची पत्रें गाईकवाडास आली आहेत की जंबुसर आमोद व भडोच व खबाईत येथील जाहागिरीचे रुा पाठऊन देणे, नाही तर उतर सत्वर पाठवणे,

यैसी पत्रें आली आहेत. बहुत काय लिहिणे ? कंठाजी कदम म्हणतो की दोन ल(क्ष)रुा देणे म्हणजे नवी फौजे ठेवितो नाहीतर शे पनास पागेची तटे आहेत त्यानिसी येऊन चाकरी करून. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji reports the dissensions of Baburao Senakhaskhel with his brother and Umabai.*

No. 53] [*29-9-1732*

बार छ २० राखर सन सलास सलासीन

श्री

यादी राजश्री येसवंतराऊ दाभाडे सेनापति यांसी पत्र जे तुम्हांकडील लस्करची सबनिसी राजश्री लक्ष्मण त्र्यबंक यांकडे आहे त्याप्रमाणे करार आहे. हाली याणी रा। मोरो यादव यांस आपले तरफेने मुतालकी सांगोन पाठविले असेत. तरी तुम्हीं याचे हाते सबनिसींचे प्रयोजन घेत जाणे. यास वेतन पेसजीप्रमाणे प्रविष्ट करणे म्हणून पत्र

१

देणें

¶*Shahu appoints Moro Yadav as Dabhade's sabnis.*

No. 54] [*1732?*

शाहुदप्तर रु. नं ४८

श्रीरामवरद

यादी सहित्यपत्रें

किता पत्रे—दोन वरसेपर्यंत सुरत महालचे व गुजरात महालचे परगणे खासगीकडे ठेऊन अमलास राजश्री नारो विठल प्रभू व राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ व राजश्री उदाजी पवार ऐसे ठेविले असतां दोन वरसाचा वसूल तमाम तुम्ही घेऊन सेवटी तमाम फौज याजवर रवाना केलीत. तर हुजूरचा हुकूम मोडावा आणि

किता पत्रें. हुजूर खासगीकडे सुरत प्रांतीचे महाल व गुजरात प्रांतीचे महाल ठेऊन अमलास तुम्हास रवाना केले वगैरे परमुलखी सनदा असतां अमल चालो न दिला. त्यास प्रस्तुत दाभाडियास आज्ञापत्रें सादर केली असत. तरी दुसाला वसूल वगैरे अमल त्याणी सुरलीत देणे. दिल्हा तर उत्तमच जाहलें. सुरलीत देणे. दुसाला

अमल चालो न द्यावा हे गोष्ट तुम्हा सेवक लोकापासून दूर होती. परंतु ऐसा तुम्ही अविचार करून अमल न दावा ऐसे नाहीं. याजउपरी दुसाला जो खासगीच्या माहालातून जो वसूल घेतलात तो देणे वगैर अमल सुरलीत जे खासगीचे परगणे बाा सनदेप्रमाणें देणे. सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करीत नाही तरी दुसाला महालचा वसूल तुम्हांस सरकारचा सुटतो ऐसे नाहीं व महालचा तो साल मजकूरचा अमल सुरलीत देणे म्हणोन पत्रें :

१ मातुश्री उमाबाई दाभाडी.

१ राजश्री यसवतराऊ दाभाडे सेनापती.

१ राजश्री बाबुराऊ दाभाडे.

३

महंत अमरगीर गोसावी मुकाम असलाज यास समाधानाचे.
पत्र १

महालचा वसूल व खासगीचा महाल अमल न देत तरी तुम्हास कळल तैसा जबरदस्तीनें अमल खामखा घेणे. यास अंतर न करणे. दाभाडियाचा सरंजामात जो तुमचा हात चालल तेथ दुसाला वसूल व सालमजकूरचा अमल घेणे येविसीं तुम्हास आज्ञा असे म्हणून पत्रे:

१ राजश्री नारो विठल नाा खासगी

१ राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ.

१ राजश्री उदाजी पवार यास पत्र.

३

राजश्री कृष्णाजी दाभाडे यासी पत्र जे सरकारचे पागेच्या घोड्या कुमेत व बोर यैशा दोन घोड्या थाळनेरात गेल्या. त्या अद्याप तुम्ही ताकीद करून सरकारच्या पागेच्या घोड्या न दिल्हात. तर याजउपरी पत्रदर्शनी घोड्या राजश्री नारो विठल याचे स्वाधीन करणे. यास उजूर न करणे म्हणोन पत्रे १

देशमुख देशपांडे प्राा थालनेर यास ताकीदपत्रें १

२

येकूण पत्रे ९

एकून नऊ पत्रे देणे.

¶*This is an important paper which mentions the troubles in Gujarat created by the undefined spheres of activity entrusted by Shahu to his various commanders. The paper unfortunately bears no date.*

1107

No. 55] [1732?

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी पत्र पाठविले तेथे आज्ञा लिहिली कीं, राजश्री सेनापतीकडे राजश्री आयाबा पाठविले आहेत. त्याणी सल्याचा प्रसंग केला तरी कैसा तह द्यावा ये गोष्टीचा विचार लेहून पाठऊन देणे म्हणून स्वामींनी लिहिले. तरी त्याच्या मनांत सालमजकुरी तह करावा यैसे नाही. स्वामीच्या * त्र भेदे * * * म्हणतील. त्याहिमध्ये त्याणी निकालस तह केला तरी निमे मुकासे देखील ठाणी निमेनीम द्यावी. बाबती सरदेशमुखीचे दोन रुपये मल्ता स्वामींनी केला आहे. त्यास निमे त्याजपासून स्वामीनी द्यावा. दिवाणांसी त्यास प्रयोजन नाही. त्याची फौज (व) राजश्री आपा यार्णी येकत्र होऊन पोट भरावे. मूल (क) कौली आहे. त्यामध्ये उभयेताचे अमलदार देखील ठाणी येथे ठेऊन आम(ल क)रावा यैसा तह निकाल जाला तर करावा, यैसा विचार मजला सुचला, तो लिहिला असे. यामध्ये स्वामी धणी आहेत. स्वामीच्या विचारास कर्तव्य येईल ते केले पाहिजे. याउपरी दुसरी गोष्टी कार्याची नाही. परतु सुचली ते लिहिले आसे. स्वामीस कर्ज जाले आहे. कर्ज फिटले पाहिजे. याकरिता सेनापतीची बोली घालावी. येका रुपयापासून त्यांच्या संतोषे जितके देतील तितके पाच सात वरसे कर्ज फिटे तोवर त्यांणी आपले तकसीम पैकी स्वामीस द्यावे. यामुले काही * * * * करीत तरी ते गोष्टी सोडून द्या(वी). विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Peshwa Bajirao is informed of the terms of peace to be settled between the Peshwa and the Dabhade.*

No. 56] [19-1-1733

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ
वडिलांचे शेवेसी

आपत्यें नानाने सां। नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। माघ वद्य प्रतिपदा भृगुवारपावेतो मौजे जेजुरी येथें सुखरूप असों विशेष. पायागडीहून कासीद आले. त्यास येक कासीद उमाबाईनी नेला. येक कासीद येथें आला. तो

आपणाकडे पाठविला आहे, यास आज्ञा काये करावयाची असेल ते केली पाहिजे. यानंतर राजश्री वासुदेव जोशी याजकडून स्वामीस पत्रे आली आहेत. तेच बजिनस लाखोटा पाठविला आहे. त्यावरून सविस्तर वर्तमान कलेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Bajirao's letter to his father. He was just eleven years of age at the time.*

No. 57] [*31-12-1733*

छ ६ साबान

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. आजी छ ५ साबानी सोमवारी राजश्री स्वामी व राजश्री नारबावा व राजश्री आनंदराऊ व आम्ही वरकड मनुश्य जवळ कोण्ही नवते ते समई राजश्री स्वामीनी आज्ञा केली की, "उमाबाईचा विस्वास नाही. याणी मुकाम नसरापुरी केला आहे. तिकडून आपाये जाला, म्हणजे राज्यास अपाय ज्ञाला यैसे समजोन पाच सात पत्रे पाठविली की किल्याच्या आश्रयाने राहणे. ते गोष्टी त्याच्या चितास आली नाही. याउपरी पोवार हुजूर आले. उमाबाई सिवापुरच्या मार्गे येईल, याकरिता सावध असणे म्हणून पत्र लिहून पाठविणे" त्यावरून स्वामीस पत्र पाठविले आहे, तरी पत्र पावताच तेथून कूच करून राजगडाच्या आश्रयास जाऊन राहिल्ये पाहिजे. येविसीं अनमान केला न पाहिजे. स्वामीनी दुसरा विचार ध्यानात न आणिता कूच करून राजगडाचे पाठीमागे घाटमाथा राहावे. राजश्री स्वामी बोलिले कीं " उमाबाईने तलेगावीहून कूच करून सिवापुरच्या मार्गे सातारियासी यावयाचा विचार करून कूच केल्याउपरी रायानी कूच केल्यावर बदनक्षाची गोस्ट आहे. येन्हवी उमाबाईसी कटकट जालियावर प्रसंगी राऊ चुकतील यैसे नाही परंतु कालदेश वर्तमान कलत नाही," यैसे फार ममतापुरस्कर बोलिले. तरी स्वामीनी अगत्यरूप कूच करून राजगडच्या पाठीमागे किलाच्या आश्राने जाऊन राहावे, येविसीं अनमान न करावा. आमच्याहि विचारे राजश्री स्वामी बोलिले हा विचार उतम आहे. तरी सहस्त्र विचार एकीकडे ठेवून कूच करावे. आधी कूच करावे, अनमान न करणे. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶*Mahadoba Purandare to Bajirao and Chimaji, communicating Shahu's advice for the latter to take shelter at Rajgad, in order to avert a possible attack by Umabai Dabhade.*

No. 58] [1733 ?

श्री

श्रीमंत राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी पोश्यांतरगत दासानुदास चेरणरज नारो शंकर दिाा राजश्री मल्हारराऊ होळकर सा नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीये आज्ञा केली पाहिजे. याउपरी मातुश्री उमाबाई दाभाडीण फौजनसी या प्रांती येऊन पवाराचे निमित्य ठेऊन बहुताची घर लुटिली. आपण पागेसहवर्तमान मौजे आबे पाा दिंडोरी येथे होतो. तेथे आपणावरी श्वारी येत असता आपण सावध होऊन बाहीर निघालो. परंतु सात श्वार येवलियास कापडाबदल पाठविले होते. त्यासी मार्गी श्वार टोकियाची घाटी पडोन वस्तभाव सुधा धरून नेली. मातुश्रीस पत्र लिहिले की आपण श्रीमंत याचे चाकर असता घोडी न्यावी हा विचार कार्याचा नाही. परंतु त्याच्या चितास ना आले. त्रिंबकरायाच्या दुखाचे श्मरण जाहाले. "ते गेले त्याचे आम्ही काये पारपत्य केले, ते तुम्ही धणियासी लिहून काये कराल ?" हे उत्तर दिल्हे. स्त्रीनाइकीचा विचार आहे. याजकरिता सेवेसी विनंतीपत्र लिहिले आहे. याचे पारपत्य करणार श्वामी आहेत. येक पत्र मातुश्री उमाबाईस व राजश्री बलवंतराऊ ठोके यासी ताकीदपत्र पाठविजे कीं घोडी सोडणे व वस्तभाव जे नेली असल ते देणे. सांप्रत बोझरे[१] प्रांती आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Shankar, attached to Malharrao Holkar at the time, writes to Bajirao complaining against Umabai Dabhade for plundering some of his villages. Umabai seems bent upon taking revenge against the Peshwa for the death of her son Trimbakrao. The letter is all in one hand.*

No. 59] [1733 ?

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री आपा यांसी

आसीर्वाद. उपरी. सोमसेट मधवे याजकडील मजकूर लिहिला तो कलला पावागडचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास आम्ही राजश्री स्वामीस लिहिले होते त्याचे जाब आले की तुम्ही गडची बहबुदी करून गड खामखा जतन करणे म्हणून लिहून आली व राा येसवंतराऊ दाभाडे सेनापति व उमाबाई व बांडे यास राजपत्रे आली त्याच्या नकल्या पाठविल्या आहेत त्याजवरून कलेल.

---

१ तांबट्याचे ओझर, ता. दिंडोरी.

आम्ही राजश्री मल्हारजी होलकर व रा राणोजी सिंदे यास येततविशई लिहिणे ते लेहून पत्रे पाठविली आहेत. तुम्हीहि त्यास लिहिणे ते लिहिले पाहिजे. सारांश गड जतन होये ते करावे. कदाचित त्याजकडील कोणी आडवे आले तरी त्याचे पारपत्य करणे ते करीत ते करावे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद. पिलाजी जाधव याचा कागद पाठविला तो आम्ही आपणाजवल ठेविला आहे. त्याजवल दिल्हा नाहीं. राजश्रीची पत्रे सेनापति उमाबाई व कदम यांसी आली ती त्याजकडे पाठविल्यास ते जाबसुधा देणार नाही म्हणून पाठविल्या नाही. आपणाजवल दस्तावेज असावा म्हणून ती पत्रें ठेऊन घेतली आहेत. कलले पाहिजेत हा आसीर्वाद.

¶*Bajirao to his brother Chimaji, that the fort of Pawagad has been granted to him by Shahu. The fortifications should be repaired and the place be held against all opposition.*

No. 60] *[24-2-1734?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी,

विनंती. सेवक बाबुराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत छ १ सौवालपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें. यानंतर आपण वाईस लग्नाकारणें स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों. श्रीकृपेनें व स्वामीचे पुण्यें लग्नसिधि जाली. पुढें लग्न संपूर्ण करून श्रीशिवरात्रीकारणें ब्राम्हणसंतर्पणा-निमित्य जरारें गंगातीरीं यावया स्वार जालों. वरकड लग्न चिरंजीव रामचंद्र-समागमें पुण्यास जावयाचा विचार केला, तें पुण्यास येऊन सर्व निवेदन केलेंच असेल. आपण त्वरेनें येथें येकादशीस पावलों. तिसरे दिवशीं शिवरात्र; ब्राम्हणसमुदायहि मिळाला. संतर्पण स्वामीचे कृपेनें होणें तें जालें, विदित जालें पाहिजे विशेष. इकडील बंदोबस्तीचा विचार तरी अगदीं जिल्हा अबदुल-अजीजखान यांचा. अद्याप जमाबंदी कितेक होणें आहे. आजी तीन वर्षे परगणे खराब होतात, जमाबंदी करितात, शेवट वसूल झाडून होत नाहीं. त्याहीमध्यें याप्रांतीं हींव अतिशय जालें त्यामुळें रबी व उंस नाबूद जालें. कमीचें साल आहे. लस्करची रहदारी तरी फौजा येतां जातां पायेमल्ली जाली व सांप्रत होत आहे. कोणी कोणाचा धनी ना चाकर ऐसा अर्थ जाला आहे. सांप्रत दाभाड्या-कडील हणगोजी बोरगे दोनशें स्वारांनशी या प्रातें आले. तमाम मुलकांत घास-

1111

दाणा घेत गंगेसंनिध आले. येथून परगणे चांदवड येथें गांवगंना सरसुभा म्हणून चौथाईचे रोखे केले. जागीर राजश्री कुवर बाहादर याची आहे त्याचे तर्फेनें फौजदार आहेत. ते व सोमवंशी याकडील कमाविसदार येकत्र होऊन यांचा त्यांचा मुकाबला कादवा नदीसंनिध जाला. युद्धप्रसंग होऊन परस्परें घोडीं माणसें जखमीं जालीं. बोरग्याकडील बाळोजी सोनवणी पालक जखमी भारी जाला. ते समयीं बोरगे याणी शिकस्त खादली. बुणगे खानदेशांत गेले. सडे शंभर राऊत निघोन मौजे गोंडेगांव परगणे नाशिक गंगातीरीं आले. तेथें बाळोजी दाभाडा पालक लेक मृत्यु पावला व सोमवंशी याकडील भला माणूस राणोजी शेलार जखमी जाला होता तोहि मृत्यु पावला. पुढें उभयपक्षीं विरुद्ध मांडोन खराबी प्रजेची व्हावी हा विचार आपण पाहिला. त्याउपरी दोहींकडे पत्रें भले लोक पाठऊन जें लिहिणें तें लिहिलें कीं तुम्ही परस्परें भांडोन मुलूक खराब करितां, मुलुकास खावंद कोणी आहे कीं नाहीं? ऐशी भली प्रीति दर्शऊन आजींच कोठुरियामध्यें उभयतां समुदाय आणून समजावीस केली. प्रस्तुत चांदवड परगणे यांत यांणीं रोखेपत्र न करावें, खानदेशांत जावें, ऐसे करून कलह तोडिला आहे. विदित जालें पाहिजे हें विनंती.

¶*Baburao Malhar to the Peshwa, reporting Dabhade's depredations in Pargana Chandwad.*

No. 61] [*March 1734*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी,

विनंती उपरी. किल्ले त्रिंगलवाडी नाशिक परगणेयांत घांटासंनिध श्रीत्र्यंबकांसमीप दोगावांवरी आहे, तेथें त्रिंगलवाडीच्या पाटलाचे हातें भेद करून दिवसास लोक चढोन किल्ला घेतला. कोणें घेतला हा नामनिर्देश दोन च्यार दिवस येकंदर न होता. गडावरी दाहा बारा माणसे मात्र, आणि येक किल्लेदार होता. खालून भेदानें वीस माणूस दरवाजापावेतों गेले. येक दरवाजकरी होता तो मारिला तों खालून आणखी लोक चढले. किल्लेदार जखमी होऊन दस्त करून ठेविला. गडाखालीचे गांव लुटून कांहीं दाणेहि नेले. हें वर्तमान संगमनेरीं मखबुल अलम यास कळतांच फौजेनशी स्वार होऊन रात्रीचा दिवस करून त्रयोदशीस संध्याकाळीं गडाखाले हजार स्वार व बरकंदाज यांचे सर्वांचे मोर्चे लागले आहेती. कोणाच्या लोकीं गड घेतला हें तत्वत:

अद्याप आलें नाहीं. येक दोन दिवस लोक मनमानेसें म्हणतात परंतु आपण तत्वत: कलल्यावेगळें कोणाचें नांव लिहावें ? यामुळें या प्रांतीं दहशत निर्माण जाली. जरी लौकर गड याचे हातास आला तरीच बरें. किल्ला मोठा चोखटहि आहे. आणखी मोगलाईची फौज येईल. उभयेपक्षीं सल्ला असतां मध्येंच गड किल्ले घेतात, सुरळित धंदा चालतो त्यास विक्षेप आरंभला आहे. आपण मखबुल अलम यांस पत्र लिहिलें होतें त्याचें उत्तर काली संध्याकाळीं आलें. कितेक शब्द लाऊन लिहिलें कीं हा विचार काय आहे ? आपल्या खावंदास लिहिणें ऐसें लिहिलें आहे. कोणाच्या लोकीं घेतला गड हें अद्याप त्यांस श्रुत नाहीं. तत्वत: कलल्यावाचून काय लिहावे ? पुढें कळेल आणि सेवेसी लेहून पाठऊं(न). हें पत्र लिहिल्याउपरी आमचे चौकीदार यांचीं पत्रें आलीं कीं लोक किल्ले कोहजेहून विठ्ठल विश्वनाथ यांणीं पाठऊन किल्ला घेतला ऐसें वर्तमान लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. यानंतर अरकाटेहून तीर्थरूप बाबाचें पत्र व राजश्री कृष्णाजीपंतांचीं पत्रें आलीं तीं राजश्री धोंडो गोविंद यासमागमें सेवेसी पाठविलीं. पावलीं असतील. त्यांची उत्तरें काशिदांबरोबर स्वामीनें पाठविलीं असतील. कार्य थोर आहे. कदाचित न पाठविलीं असलीं तरी त्वरेनें पत्रांची उत्तरें काशिदांसमागमें पाठऊन सेवकास उत्तर पाठविलें पाहिजे. तुरकताजखान मेले, दरवेश महमदखान मेले, हें वर्तमान ऐकोन नवाब थोरले शहरास येणार ऐसें वर्तमान आहे. नवाब शिकारीस गेले होते, घोड्यावरून पडले, हातीं तीर होता तो तळहातास लागला आहे व पायहि दुखवला आहे. सैदजमालखान यास वराडचा......तालुका आजतगीर सुजायेतखान व औरंगाबादेचाही तालुका नवाबापासून होणार ऐसें ऐकिलें वर्तमान सेवेसी विनंती लिहिलें असें. विदित होये, हें विनंती.

¶*Baburao Malhar reports to the Peshwa the capture of fort Tringalwadi and deaths of Turuktaj Khan and Darwesh Mahammad.*

No. 62] [*3-3-1734*

पाा छ २२ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाबूराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत छ ८ सौवाल पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें. यानंतर आपण या प्रांते

आलेयावरी सेवेसी विनंती पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर वृत्त निवेदन जालें असें. किल्ले त्रिंगलवडी कोणाकडील लोकांहीं घेतली? नामनिर्देश कोणाचा नाहीं परंतु किला घेतला हें वर्तमान संगमनेरीं अबदुल अजीजखान यांस कळतांच रात्रीचा दिवस करून हजार फौजेनशीं किल्ल्याखाले येऊन वेढा घातला हें सविस्तर सेवेसी पूर्वी लिहिलें आहे. मोगल किल्ल्याखाले जाऊन मोर्चे चालविले. जवारकरें येकेकडून मोर्च्या चालविला. गडावरी कांहीं माणूस होतें. उपराळा कोणांकडून न होय. खालीकडून मोर्चे दरवाजापावेतों आले तेव्हां वरता धीर न धरवें, राजकारणावरी घातलें. तांब्रांनीं पांच हजार रुपये मान्य करून अभय दिल्हें. हजार रुपये रोख वरते पाठविले त्यावरून लोकांहीं दरवाजा मोकळा केला. माघ वद्य ११ येकादशीस किल्ला घेतला. आठवें दिवशीं तांब्राचे लोक वरते चढले, तेव्हां मारामार होऊं लागली. वरचे लोकीं भय धरून चाळीस माणूस दुसरिया दरवाजानें निघालें; त्यांत पळतां पळतां पंधरा सत्रा दगडानें मारिलें, वरकड पळालें, वरकड वीस माणूस वरते धरिलें. यांत बारा माणसांचीं डोकीं मारिलीं. सात मऱ्हाठे व येक ब्राह्मण जिवंत ठेविले. पळतां मारिलें त्यांची व गडावरी सांपडलें त्यांत बारा येकूण आठावीस तीस माणसांचीं डोकीं अवरंगाबादेस रवाना केलीं. जिवंत जें धरिलें त्यांपाशीं, कोणाचे लोक, पृछा केली, बहुत मार केला. दो चौकडून नावें घेतलीं; शेवटीं नांव दाभाड्याकडील घेतलें कीं आपण त्याचे लोक. इतका खराखुरा विचार केला. गडीची बेहबुदी करून तांब्र स्वार होऊन काल नासिकास आले. किल्ला फिरोन घेतला यामुळें बहुत श्लाघ्यता मानिली आहे. दाभाड्याकडील वगैरे कमाविसदार व लोकांस भय निर्माण होऊन येकेकडे आले. उत्पात फारसा मांडिला आहे. सर्वांकडील कामकाज बंद जालें आहे. आपण पूर्वी त्यांस पत्र लिहिलें होतें; दुसरेंही पत्र लेहून पाठऊन विचारें कामामुळें भेटीहि घेणें लागेल. त्याचींही येक दोन पत्रें आली होतीं. सांप्रत नाशिकास आले, महिना पंधरा दिवस राहणार, दर्शनास जावें लागेल; कामकाज अगर्दी होणें आहे. स्वामीच्या कृपेनें भेट घेऊन बंदोबस्ती करून घेणें तें घेऊं(न). अद्याप वसूल चालीं लागला नाहीं. जमाबंदी चुकत आहे. दरमाहेचा ऐवज माघमास राजश्री अंबाजीपंताकडे पुण्याहून पाविला. फाल्गून मासाची रवानगी करावी त्यास अद्याप वसूल चालीस लागला नाहीं. बाबती व सरदेशमुखीचा पैसा आला नाहीं. दरमाहेचा तों अगत्य विचार; राजश्री तात्या माणसे पाठवितील यास्तव आमावास्यापावेतों माणसें न पाठवीत ऐसें करावें. चैत्रमासीं

ऐवज रवाना करूं(न). वरकड नवल अपूर्व लिहिणेंसें नाहीं. यानंतर चिमणाजी दामोदर देवाज्ञा पावलियाचें वर्तमान आहे. तत्वत: खबर आलियावर सेवेसी लिहूं(न). विदित होये हें विनंती.

¶Baburao Malhar Barve to Bajirao, that the fort of Tringalwadi has been recaptured by the Nizam's forces from Dabhade, whose men had occupied it when there was peace between the Nizam and the Marathas.

No. 63] [*6-3-1734*

पा। छ २२ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाबूराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ ११ सवालपावेतों जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर वाईस आपण लग्ननिमित्य गेलों. स्वामीचे कृपेनें लग्नसिद्धि जाली. गगातीर प्रांतीं कामकाज होणें; वरचेवरी पत्रें आलीं कीं सत्वर येणें. यास्तव पुण्यास न येतां परभारेंच कोठुरीयासी आलों. श्रीशिवरात्रीचा महोत्सवहि कालासारिखा जाला. किल्ले त्रिंगलवाडी कोणाच्या लोकांहीं घेतली त्यास्तव त्वरेनें अबदुल अजीजखान संगमनेरीहून किल्ल्याखाली जाऊन मोर्चे लाविले हें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिलें आहे. आलीकडे वर्तमान किल्ला फिरोन याणी घेतला आणि नाशिकास आले, हें सविस्तर पूर्वी छ ८ रोजीं पत्र पाठविलें ते वेळेस पावलें असेल. सविस्तर निवेदन होईल. यानंतर श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचें पत्र कालीं आलें तेथें आज्ञा कीं हुताशनी कारणें आपण पुण्यास आलों. इष्टमित्र सर्व बोलाविले आहेत तरी तुम्ही अगत्य येणें. पंचमी जालियावरी आज्ञा घेऊन जाणें म्हणून पत्रीं आज्ञा केली. ऐसियासी आपण इकडे आलों तों तांब्र किल्ल्याखाले आला, यामुळें कितेक कामांस अंतर पडलें. सांप्रत किल्ला घेतल्यावरी बहुत कुर्मी चढली आहे. दाभाडियाकडील लोकाही गड घेतला हे तत्वत: जाले आहे. त्याहीमध्यें चोघांचीं नावें म्हणतात. खरें खोटें कोणाचे नांव होईल न कळे. परगणे नाशिक वणी दिंडोरीचा जमाबंदीचा प्रसंग आहे, यामध्यें आपणांस येऊन पंधरा दिवस जाले. इतक्यांतच त्वरेनें येथून गेलियानें नानाप्रकारचें तर्क करितील, कामास अंतराय होईल. दुसरी गोष्ट आपलें शरीर स्वाधीन नाहीं. उष्णकाल दिवस, जातां येतां श्रम होईल यास्तव हुताशनीस यावया अंतराये जाला. स्वामीनें श्रीमंत राजश्री रायास समजाऊन विदित केलें पाहिजे कीं त्यांचें चितांत ये.

आम्हा स्वकीये लोकांचें छत्र स्वामी आहेती. दुसरे कोण बोलावील आणि गौरव करील? परंतु कार्यामुळें अंतराय जाला, क्षमा केली पाहिजे. यानंतर दरमाहेचा ऐवज माघ मास राजश्री तात्याकडे पावतां जाला. फाल्गुन मासचा ऐवज पावावा त्यास इकडे अद्याप पैसा वसूल बाबतीचा अगर सरदेशमुखीचा नाहीं; यास्तव राजश्री तात्याकडील रवानगी आमावास्यापावेतों होत नाहीं. त्यांचीं माणसें येतील यास्तव लिहिणें लागलें. त्यांस लेहून आमावास्यापावेतों माणू(स) न ये ऐसे करावे. चैत्र मासीं रवानगी करितों. विदित जालें पाहिजे. कृपा कीजें हें विनंती.

¶*Baburao Malhar Barve to Chimaji Appa, referring to the news of the capture of Tringalwadi fort by Abdul Ajijkhan.*

No. 64] [*10-5-1734?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामी राजाचे सेवेसी

विनंती. सेवक माधवराऊ निंबाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना. येसीजे. येथील कुशल ता। छ १७ माहे जिल्हेज मु॥ सोनगड जाणऊन स्वानंद वैभवलेखन लेखकास आज्ञा केली पाहिजे. यानंतर रा। गोविंद गोपाळे[१] आपल्याकडून आले. यांची भेटी नरमदेच्या मुकामी राजेश्री देवजीबावाची जालियावर आपणास आज्ञा जाली कीं, तुम्ही याजला समागमे घेऊन उभयेता बंधू राजांची भेटी घेणें. त्यास पूर्वी श्रीमंत राऊ पंतप्रधान याची भेटी घेऊन पुनरपि रा। आपाच्या दर्शनास जाणें. यैसियास, श्रीमंत राऊ पंतप्रधान खानदेशात आले आहेत. आज छ मा।री स्वार होऊन पंतप्रधानजीच्या भेटीस गेलो. भेटीनंतर आज्ञा मागोन स्वामीराजाच्या दर्शनास येऊन भेटीनंतर विज्ञापना जे करणे ते करून. सेवेसी कलावे म्हणौन विनंतीपत्र लिहिले असे. वरकड वर्तमान रा। गोविंद गोपाल यानी सो। विनंतीपत्र लि॥ आहे त्यावरून सर्व निवेदन होईल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

हे विनंती.

¶*Madhaorao Nimbaji informs Chimaji Appa of his intention to visit Bajirao in Khandesh.*

---

१ कामतेकर, गायकवाडांचे पदरचा.

No. 65] [28-5-1734

नकल.

श्री.

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही उतरप्रांते गेले आहा. तिकडील बंदोबस्त ज्या रीतीनें करावयाचा तेसा केलाच असेल. बुधमंत येसश्वी सेवक आहा. राज्यभारास उपयोगी प्रसंग तोच संपादून नक्ष कराल हा स्वामीस भरवसा आहे. तदनुसार वि(चा)रास व मनसुब्यास तुम्हापासून अंतर होत नाही यावरून स्वामी अतिशयेसी संतोसित आहेत. त्या प्रातीचे अमीर व मुख्य आदिकरून येथास्थितीच आहेत अथवा त्याचा विचार विचारे करून रक्षिलाच असेल. इकडील प्रसंग तरी नवाब निजामनमुलुक बऱ्हाणपुरावर राहिले आहेत. अशास त्याच्या चितांतील भावगर्भ कांहीं कोणास अवगत होतो असे नाही. तुम्हासहि वर्तमान वरचेवरी कलतच असेल. तुम्ही सावधतेस चुकणार नाही हा निशा आहे परंतु कोणाचा विश्वास मानावा असे नाही. याकरिता हे पत्र लिहिले असे. तरी त्या प्रांतीतून माघारे देशास येतेसमई बातमी बरी चोकस राखोन बहुत खबरयाने सावधपणे यावयाचा विचार करणे. उमाबाई दाभाडे नवापुर सोनगड प्रांते बहुत दिवस जाऊन राहिले आहेत. दर्शनास यावयाचा विचार करीत नाही; आणि हुजूरचा पैकाही त्याजकडे मबलगा येणे त्याचाहि निवाडहि अद्यापिवर केला नाही. बहुधा दर्शनासहि यावे हे त्याचे चितात येत नाही असे दिसते. एसियांस यांचे पदरी मातबर पदे, फौजाचे येख्तियार, त्याणी जे समई आज्ञा होईल ते समईच हुजूर यावे हेच त्यास उचित आहे. तदनुरूप त्याजपासून विचार घडोन येत नाही हेच अपूर्व भासते! स्वामीनी दोन वर्शे त्याचे येण्याचा मार्ग लक्षिला तथापि काहीच विचार त्याणी ध्यानात न आणिला. अत:पर ये गोस्टीचा विचार न करावा तरी उतम नाही. याकरितां तुम्ही माघारें देशास याल ते समई त्याचा मार्गे येऊन उमाबाई व राजेश्री सेनापति यास बोधयुक्ती च्यार गोस्टी कलतील त्या रीतीने सांगोन त्या समागमे होऊन येणे. स्वामीस त्याचा अगत्यवाद व अभिमान कोणे प्रकारे आहे, त्याजवरी ममताहि कोणे रीतीने करितात, हे सर्व तुम्हास अवगत आहे. त्याचे ध्यानात येत नसेल तरी तुम्ही विचार करून व ममतापूर्वक भाशण करून उभयेतासहवर्तमान स्वामीचे दर्शनास येणे; इतकाहि प्रसंग त्यास प्रशस्त न वाटे आणि यावयाचा प्रसंग न करीत, त्याच प्रांतें राहावयाचा विचारच सोडला, तरी राज्यभारास विरुध वर्तणारास येथायुक्त रीतीप्रमाणे वर्तावे उचित आहेच. तुम्ही येख्तियारीच आहां. प्रसंगानरूप कलेल ते रीतीने पुढे घालून उभयेतास स्वामी-

सनिध घेऊन येणे. हा विचार अलक्ष मानून त्यास येकेकडे टाकून न येणे. जेथे असतील तेथपर्यंत जाऊन लक्ष प्रकारे त्यास घेऊन येणे. यास अंतर सहसा न करणे. त्याचे समाधान जेसे करावयाचे तसे करून घेऊन येणे. त्यास टाकून आल्याने स्वामीस मानणार नाही. हरयेक गोस्टीचे व मुद्याविसी काही वचन गुती न देतां समाधानपूर्वक घेऊन येणे. हुदा खासखेलीचा येविसी वचन गोवाल. वरकड सर्व प्रकारे त्याचे समाधान करणे. सरजामासी सरकारचा पैका याची काही बोधू न करणे. वरकड समाधान करून घेऊन येणे. त्यास सांडून येणे हे तुम्हास उचित नव्हे व राजभारासही उचित नव्हे हेहि जाणत आहा. रा मंत्री लिहितील त्यावरून कलेल व राजश्री माहादाजी अंबाजी लिहितील त्यावरून कलेल. वाटेंत सावध येणे. बहुत काये लिहिणे? सूज्ञ असा.

¶Shahu's orders to Bajirao asking him to bring to obedience the recalcitrant Dabhade and his mother Umabai who are defying openly the King's authority and possibly intriguing with the Nizam. The paper is valuable in view of the further developments of the affair.

No. 66] *[22-7-1729 ?*
[28-5-1734 ?

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. दाभाडियाकडील हुजूरचा यैवज येणे तोहि येत नाही, व मसलतीस फौजहि नाही, व घरचाहि येक विचारे बंदोबस्त नाही. कितेक अव्यवस्तपणाची वर्तणूक. यामुले व प्रस्तुत गायेकवाडाचेहि राजकारण लागले यामुले त्याची फारच अनास्था जाहाली आहे. आम्ही येथे आलियावर, राजश्री स्वामीनी आम्हास आज्ञा केली कीं राजश्री प्रधानपंत उतरप्रांतीहून येतील तेव्हा दाभाडियासी त्रिवर्गास समागमे घेऊन यावे. न येत तर मार्कूल[1] करून आणावे. येविसी आम्हीहि पत्र लिहितो. तर आमच्या पत्राप्रमाणे तुम्हीहि पत्र देणें म्हणजे कासीदजोडी रवाना करितो. त्यावरून आम्हीहि पत्रे लिहून दिल्ही

---

१ शाहाणा, समजूत पाडून.

आहेत ; परंतु कासीद अद्याप रवाना जाहाला नाही. रवाना होऊन स्वामीपासी पत्रे येतील. जाले वर्तमान स्वामीस कलावे, याकरिता लिहिले असे. हे विनंती.

¶*Purandare to Bajirao, communicating Shahu's orders to bring the three Dabhade brothers into the presence of the King, using his powers of persuasion, if they would not come willingly.*

No. 67] *[28-5-1734*

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. दाभाड्याचे व गायेकवाडाचे केवल वैमनस्य जाहाले. दाभाड्याचा विचार तर येकात येक नाहीत. त्याहीमधे काही विचार असता तर कसे तऱ्ही चालते. केवल अविचारामुले काही चालत नाही. प्रस्तुत राजश्री दमाजी गायेकवाड याणी राजश्री स्वामी यासी राजश्री फतेसिंगबावासी राजकारण केले की, गुजराथ व सुरत माहाल हे आपलीकडे पूर्वबतप्रमाणे चालवावे. येक खेडे तफरका न करावे ; व माहाराजाच्या चितास येईल (ते * वेले) ला किताब द्यावा. तूर्त दाहा लक्ष (राजश्री) स व दोन लक्ष रुपये सौ विरूबाई यासी व दोन लक्ष रुपये राजश्री फतेसिंगबावास द्यावे. तूर्त नजर सदरहूप्रमाणे तूर्त द्यावी. पेस्तर सालापासून दरसाल सा लक्ष रुपये द्यावे. दोन हजार फौजेनसी हमेशा येक भाऊ हुजरातीस चाकरीस द्यावा ; व मोहीममसलतीस दाहा वीस हजार फौजेनसी यावे. कोणी सरकारकून आमचे निसबतीस हुदे मागतील तर न द्यावे, आमचे कारकून आहेत यासी जे अधिकार आहेत तेच हुजरून करार करावे. राजश्री पंतप्रधान आपल्यास छडीतील, तर माहाराजानी साहित्य करावे. येसे मुदे सागोन पाठविले. त्यावरून राजश्री स्वामीनी सदरहू मुदे करार करून यादीवर दस्तक करून दिल्हे. त्यावरून गायेकवाड याकडील कारकून आले होते, ते त्याकडील माहादाजीपंत यासी आणावयासी गेले. राजकारण ठीक लागले आहे. पुढे होईल वर्तमान तें लेहून पाठऊ. दमाजी गायेकवाड याणी तूर्त हुजूर न यावे. माहादाजीपंत येथे येऊन अवघे बोलीप्रमाणे ठीक करावे म्हणजे गायेकवाडानी आपला भाऊ पाठवावा. त्यापासी बोलीप्रमाणे सनदा पत्रा द्याव्या. दमाजीस जो किताब देणे त्याची वस्त्रे सोनगडास पाठवावी, यैसा

करार जाहाला. * (विदि) त जाहाले पाहिजे. राजकारणाचा विचार काही राजश्रीपासून आम्हास दाखल नाही. परभारा वर्तमान मात्र जाणतो; परंतु राजकारण खरेखुरें आहे. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Purandare to Bajirao: communicates the terms of agreement which Damaji Gaikwad effected with Shahu and Fatesing Bhosle. This letter appears to have been written after the death of Khanderao Dabhade, whose sons did not mutually agree and were indiscreet in their conduct. Damaji Gaikwad took advantage of this and claimed the title of Senakhaskhel from Shahu. The terms of the agreement are given above and are clear and definite. This is the origin of the dispute with the Dabhade brothers. The Peshwa had no hand in the matter. Damaji Gaikwad warns Shahu not to allow the Peshwa to interfere with the agreement.*

No. 68] *[31-5-1734 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनती. आज्ञाधारक मलार दादाजी सां नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ ९ मोहरम स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान यथास्थित असे. यानंतर सरकारचा खजाना हजीरा हजीर मालवियातून आला तो येथून आम्ही कावनईस राा बावाजी बलकवडे याजवल पावता केला असे. तेथून स्वामीजवल प्रविष्ट करीतील. येसजी बलकवडे याणी नासिकी आबदुल अजीजखान याचे पागेवरी येऊन घातले. बारगीर खबरदार होते, जुज जाले. येसजी व दाहा विसा माणूस कामास आले. वरकड पलोन गेले. हे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले होते. ती पत्रें पावलीच असतील. येसजीने बेफामपणें हे कर्म केले. होणारास काये करावे? श्रीमंत राजश्री रायानी मोगलाई आमलाविसी लिहिले त्यावरून राा सदासिव कासी अमीन प्राा नासिक यास पत्रें पाठऊन कामकाज काही आकारास आणिले होते. त्याणी भेटीस यावे, बोली चाली करणे ते करावी, यैसे केले तों येसजीचा दंगा येऊन पडिला, त्यामुले ते सावध जाले. मातुश्री उमाबाईचा आश्रा करून राहिले आहेत. बाईच्या चितात मोगलाई अमल आपणाकडे ठेवावा यैसे आहे. आम्ही केवल सैल सोडीत नाही. होता होईल ते करीतच आहो. अकोले, कोतूल, धांधरफल येथे बाईने राऊत पाठविले. मोगलाचा वसूल मागेच बहुतेक जाला आहे. रेजों[१] बाकी तिही परगण्यात

---

१ जूज बाकी.

राहिली ते वसूल बाई घेणार. तिही परगण्यात राऊतीनी ह(गा)मा केला आहे. वणीचा अमीन पाटील व जमीदार घेऊन ठाण्यात बसला होता. वसूलवासिलात मागेच उरकिली. काही हजार पाचसे बाकी राहिली त्यामुळे गडबड ऐकताच जमीदार पाटील पुढे चालून किले अहिवंतास गेला. ठाणेयात चालीस पनास बरकंदाज ठेविले. आम्हास वर्तमान किलियास व रा। कोनर माधवराऊ व मलार माधवराव कमाविसदार दि॥ भोसले यास व आम्ही आपलियाकडील कमाविसदार व राऊत बरकंदाज वणीस पाठऊन ठाणे घेतले. सांप्रत कमाविसदार व आम्हाकडील लोक ठाण्यात आहेत. त्यास मातुश्री उमाबाई याणी शभर राऊत तेथे पाठविले. कटकट आरंभिली आहे. कलावे (या) निमित्य लिहिले असे. आपलिया विचारास येईल तर मातुश्रीस येक पत्र पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे की, मोगलाईच्या अमलास ती खटखट न करीत. तसेच बावाजी बलकवडे यास ताकीदपत्र की नासिक परगणियात धामधुम न करीत. होणार जाले. रयेतीस अजार दिल्याने सार्थक नाही. सेवेसी श्रृत होये. मातुश्री उमाबाई म्हणतात, माहाल मोकासे आमचे आहेत. मोगला * * * रेजा बाकी राहिली ते आपण वसूल घेऊ. त्याजवल दोन अडीच हजार फौजही तुर्त आहे. विदित होये हे विनंती.

¶*Malhar Dadaji (Barve) to Chimaji Appa, describing the reverse suffered by Yesaji Balkavade on account of his indiscreet attack on Abdul Ajijkhan. He further communicates the differences that had arisen between him and Umabai regarding the collection of dues from the Moglai province round about Nasik.*

No. 69] *[1734?*

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान गोसावी यासी विनंती उपर. सर्वस्वे उभारणी आपली आहे. त्यास त्यानी माहालामधें धामधूम बहुत केली आहे. यैसियास माहाराज राजश्री स्वामीस विनंतीपत्र पाठऊन राजश्री शेनापती यास राजपत्रे व हुजरे आणविले पाहिजेत जे, राजश्री हिंदुराव याजकडील फौज सरलस्कर-समागमे दिल्ही आहे, आणि तुम्ही त्या माहालामधें धामधूम करावयास प्रयोजन नाही म्हणून पत्रें आणविली पाहिजेत. राजश्री शेनापती याजकडेहि पत्रे पाठऊन त्याजकडील ताकिदी आणविल्या पाहिजेत. राजश्री चिमाजी आपा त्या प्रांतास जात आहेत, त्यास पत्रे पाठविली पाहिजेत जे, सोनगीर+ परगणि-

+ In Khandesh.

यातील त्याजकडील ठाणे उठऊन आम्हाकडील ठाणे बसऊन अमल चाले ते गोस्ट करविली पाहिजे. नाहीतर आम्हास काये आज्ञा करणे ते केली पाहिजे. निंबालकराकडील शेह आणि सेनापतीकडील शे यैसे जाहले आहे, त्यास आम्हास तो तुम्ही वडील आहां. ज्याप्रमाणें आज्ञा कराल त्याप्रमाणे वर्तणूक करूं. बहुत काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Addressed to the Peshwa, soliciting Shahu's orders on the subject of restraining the Senapati.*

No. 70] [पो *28-1-1735*

छ १४ रमजान

श्रीराम

पुा राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यांसी

विनंती उपरी. साताराचे मुकामी आपण राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे यांस पत्रे दिल्ही होती, ते राजश्री दमाजी गायेकवाडाकड पाठविली. कडी बिरमगावपावेतो गेले होते. हे पत्रे पावताच माघारे फिरोन महीतीरास आले. उदाजी पवार व रघोजी कदमराव आलीमोहनाच्या रानांत आहेत. पलीकडे जाणार त्यास तुम्हाकडील फौज सरदेसच आहेत. तर सातारा पत्र दिल्हे होते त्याजप्रमाणे हालींहि रा मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यास पत्रे लेहून सत्वर आम्हाकडे पाठवणे म्हणजे ते पत्र गायेकवाडाकडे पाठऊन देऊन ते त्यांजकड पत्र प्रविष्ट करून येका विचारे होऊन प्रसंगानरुप गांठ घालून नतिजा पावितील. याजकरितां पत्र पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे. छ १४ माहे रमजान. हे विनंती.

¶*The writer requests Bajirao to order Ranoji Shindia and Malharji Holkar to join him.*

No. 71] [28-1-1735?

श्रीराम

राजश्री बाजी भिवराव
गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रति उमाबाई दाभाडे दंडवत. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. यानंतर तुम्ही पत्र पाठविले, पावोन वर्तमान विदित जालें. दाहोदचे वर्तमान लिहिलें त्याजवरून कलों आलें. उतम गोस्टी जाली. सातारांचे मुकामी रा। मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे यांस पत्रें दिल्ही होतीं ते गायेकवाडाकडे पाठविली. कडी बिरमगावपावेतों गेले होते. हें पत्रें पावतांच माघारें महितीरास आलें. उदाजी पवार व रघोजी कदमराव आलिमोहनाच्या रानात आहेत. पुढें जाणार. तुम्हाकडीलहि फौजा सरदेसच आहेत तर सातारा कागद दिल्हा होता त्याजप्रमाणे हाली मल्हारजी होळकरास व राणोजी सिंदे यास पत्र लेहून आम्हाकड सत्वर रवाना करवणे. ते पत्र गायेकवाडांकड पाठऊन देऊं. ते त्याजकड प्रविस्ट करून येका विचारें होऊन प्रसंग पाहून नतिजा द्यावयाचा तो देतलि, याजकारितां राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस सांगोन कागद सत्वर पाठवणे. रखमाजी भापकरास ताकीदपत्र पाठविलें आहे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ १४ रमजान हे विनंती.

¶*Umabai Dabhade informs Baji Bhivrao that she would forward letters to the Gaikwad as requested and unite in the campaign along with the others.*

No. 72] [20-6-1735?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

सेवक गोविंद कृष्णा कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ ८ मोहरमपावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. सोनगडाकडून वर्तमान यैकिले की, गंगाजलनिर्मल उमाबाई व राजश्री सेनापति व राजश्री बाबूराऊ सवाई यैसी त्या प्रांतास गेली. त्यास उमाबाई व सेनापति सोनगडी राहोन, राजश्री दमाजी गायेकवाड याची भेटी घेतली आणि मनमानेसारिखी बोली लाविली. बाबूराऊ मुलकात सिरोन मुल्क मारून गोरेढोरे वलीत करून, बहुत नास केला. सेवटी दमाजीने येकच जाब दिल्हा

की, तुम्ही मुलूक मारिता आणि त्रिवर्गाची येक बोली नाही. येक विचार करून न्यायाने चालाल, दरम्याने बोलीस कोणी द्याल, तरीच आपण बोलीस उभे राहोन, मान्य करून. नाहीतर चितास येईल तैसी तुम्ही खावंदगिरीने वर्तणूक केलीत तर, आम्हा सेवक लोकांचे काये गेले ? त्यावरून बाबूराऊ यास सोनगडास आणून, त्रिवर्ग येकत्र जाहाली. सेवटी बोलीचा फाट पडोन, याचे त्याचे युध्य जाहाले. त्याजकडी याजकडील काही घोडी लोक पडले; काही जखमी जाहले. दमाजीची फौज मुलुकगिरीस गेली आहे. ते आलियावरी मागती याचे त्याचे युध्य होणार. सोनगडची पेठ याणी जालिली, यामुले व मुलकाचा नास जाला यासमधे बोलीत काही ताळ न दिसे. याजकरिता त्यासी विरोध करून, गड बलकाऊन बैसला आहे. रा। कृष्णाजी दाभाडे यासहि द्रव्याचा उपसर्ग लावणार. हे यैकोन, तोहि सोनगडी बैसला. यैसे वर्तमान यैकिले. आपणाकडे कागदी पत्री आले आसेल, ते प्रमाण. सेवेसी कलावे म्हणून लिहिले असे. राजश्री पंतप्रधान आपल्या चितानरूप मनसबा करून माघारे फिरले, यैसी बोली आहे. आपल्याकडे पत्रे आली असतील, ते प्रमाण. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे. हे विज्ञाति.

¶*Govind Krishna (?) informs Chimaji Appa of the fight between Damaji and Umabai and Baburao Dabhade at Songarh.*

No. 73] *[13-8-1735 ?*

श्री

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करविले पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविले तें पावले. कापड सनगे रुजु पाहून पटीप्रा। पाठवणे म्हणोन लिहिलें, त्यावरुन रा। दादो हरिं यासी सांगोन कापड रवाना केले असे. त्यामध्ये कांही अंतर नाही. याउपर आपले जाणे खानदेशातून जाहले तरी प्रा। थालनेर आमचा मोकासा; तेथें कांही उपसर्ग न लागे यैसे कीजे. पहिल्यापासून वडिलीं लोभ केला आहे. आमचे बहुत प्रकारें चालविले आहे त्याप्रा। तुम्ही दया करीत असिलें पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ वर्धमान कीजे. छ ९ रबिलाखर हे विनंती.

¶*Krishnaji Dabhade requests Chimaji Appa to spare his Mokasa villages in his expedition through Khandesh.*

No. 74] [23-9-1735

पा. छ १६ जमादिलावल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री
अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामीनी लिहिले की बाबूराऊ दाभाडे याणी मनमानेसारिखी धुंदी मुलकात मांडली व कूच करून भीमेवर गेले. आम्ही पारपत्य करावे तरी पहिले येक निमित्य आले. आताही तैसेच करावे तर लौकिक विरुद्ध. यास्तव तुम्ही राजश्रीस विनंती करून राजश्री सेनापतीस निरोप देणे म्हणजे त्याचे साहित्य करून त्यास विचारावर आणू व येशवंतराऊ पोतेनीस यासी पाठऊन बाबूराव यासी हुजूर आणावे येसी विनती राजश्रीस करणे म्हणून स्वामीनी लिहिले. येसियासी पहिले देवजी सोमवंसी याच्या कागदाच्या नकला पाठविल्या ते वर्तमान लिहिले आहे त्यावरून विदित होईल. प्रस्तुतहि स्वामीच्या पत्राप्रमाणे राजश्रीस विनंती केली त्यावरून राजश्रीनी दोन पत्रे स्वामीस लिहिली आहेत आणि आम्हासहि ल्याहावयासी आज्ञा केली आहे की बाबूरायानी सिलेदार मेलविले आहेत ते स्वकीये वलणातीलच आहे. तरी तुम्ही तमाम लोकास ताकीद करून कोणी त्याजवल न राहात, उठोन येत ते करणे. जो कोणी नौदिगर[१] करील त्यास सज्या द्यावा म्हणजे बाबूराऊ मातीचो[२] माल राहून अपेअप हुजूर येतलि येसे सागितले. व येथून कोणी मातबर पाठऊन त्यास अणवावे तरी ते काही येत नाही. तयास्तव तुम्हीच राजश्री पंतप्रधान यासी लेहून सदरहूप्रमाणे लोक त्यापासी न राहात ते करणे येसे सांगितले. त्यावरून हे पत्र लिहिले असे. तरी स्वामीनी राजश्री स्वामीचे आज्ञेप्रमाणे लोकास ताकीद केली पाहिजे. याउपर राजश्री सेनापतीच्या निरोपाविसीहि विनंती केली. त्यावर राजश्री स्वामी राजश्री नारबावास बोलिले की सेनापति येथे ठेविल्याने उपयोगी नाही. तयासीहि निरोप द्यावा. हे जाऊन कलेल ते रीतीने बाबूरायास माकुल करितील येसे बोलिले. साराउष सेनापतीसहि निरोप लौकरच होईल. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shahu considers measures to restrain the rebellious behaviour of Baburao Dabhade.*

---

१ अडथळा. २ कवडीमोल.

No. 75] [23-9-1735 ?

पा छ १६ जमादिलावल

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री बाबूराऊ दाभाडे यानी मनमानेसारिखी वर्तणूक केली. यास्तव त्याच्या पारपत्याविसी दोन पत्रे स्वामीस लिहिली आहेत. येक खासा त्याचे पारपत्य करावे येसा मजकूर व येक पत्र की जे लोक त्यापासी जमा जाहाले असतील त्यास ताकीद करावी की कोणी त्यापासी राहू न पावेत. नौदिगर करील त्याचे घर कैद करावे व पागेस घोडी लावावा येसे लिहिले आहे. येसियासी खासा त्याचा पारपत्याची गोष्ट स्वामीनी येकायेकी करावी येसे नाही. सेनापतीसहि राजश्री दोचौ रोजा निरोप देतात. हे स्वामीपासी येतील याचे साहित्य करून जे करणे ते करावे म्हणजे आपल्याकडे निमित नाही. कदाचित सेनापतीसहि होईना आणि मनास येईल तेसी वर्तणूक करू लागले तरी येक पत्र राजश्रिस पाठवावे. येथे श्रृत करून करणे ते करावे यैसी राजश्री मर्जी आहे. तदनुरुप लिहिले असे. वरकड सिलेदार लोकाचे ताकिदीविसी काही हुजूर आहे येसे नाही. स्वामीनी कलेल ते रीतीने ताकीद करून सांगावे. ना आइके त्याचे पारपत्य करावे. येका दोघाचे पारपत्य जाहाले म्हणजे धास्त पडेल आणि लोक बाबूरायापासील तमाम उठोन जातील. साराउंष लोक कोणी त्यापासी न राहेत ते करावे येसी राजश्रीची मर्जी आहे. विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Shahu desires the Peshwa to punish Baburao Dabhade for his unruly conduct.*

No. 76] [23-9-1735

छ १९ जमादिलाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामीनीं पत्रे पाठविली तेथें लिहिले कीं राजश्री बाबूराऊ दाभाडे याणी राजश्री देवजी सोमवंशी याचे महाल त्रिंबकजी जाधव सिलेदार यासी देऊन

सनदा चालविल्या व त्याणी पत्रे देवजी सोमवंशी यासी लिहिले आहेत त्याच्या नकला पाठविल्या आहेत म्हणून लिहिले ती पत्रे बुधवारी संध्याकालच्या सहा घटका दिवसास येथें आली. त्यावर साइकाली राजश्री स्वामी सिकारीहून आली-यावर दरबारास गेलो. राजश्री मंत्री व राजश्री सुमंतहि होते व आणिकहि लोक बहुत होते. ते वेलेस आम्ही वर्तमान विदित केले कीं राजश्री बाबूराव याणी राजश्री देवजी सोमवंशी याकडील सरंजाम व पवाराकडील गैर लोकाच्या माहालावर सिलेदाराच्या समजाविसी करून सनदा चालविल्या व मनमानेसारखी मुलकात धुंद पडली आहे. या गोस्टीचा काये विचार म्हणून अर्ज केला. त्यावर राजश्री बोलिले कीं तुम्ही कांहीं उगेच वरकडासारिखे नव्हां जे आम्हापासी बोभाट सांगतां. बाबूराऊ कांहीं आमचा हुकूम मानीत नाहीं. आम्ही त्यास हुजूर यावयाची आज्ञा करितो परंतु ऐकत नाहींत. त्याची बुधी कांहीं उतम नाहीं. यास्तव अकुर बलावला नाहीं तोच मोडावा यांत उतम आहे. राज्यांतील मुलकांवर आपल्या सनदा जेव्हां चालवितो तेव्हां पुंडाईस बाकी कोणती राहिली? याउपर तुम्ही किमपि उपेक्षा करूं नका. कलेल ते रीतीनें त्याचे पारिपत्य कलेल ते रीतीनें करणें. ऐसे बोलिल्यावर आम्ही अर्ज केला कीं एविसी एक सहीचे पत्र राजश्री प्रधानपंतास द्यावे. यैसे बोलिल्यावर राजश्री बोलिले कीं पत्र एक सोडून दहा देवितो. याउपर तुम्हाकडे कांहीं अदेश नाहीं. तुम्ही खामखा पारपत्य करणे यैसे बोलोन एक पत्र स्वामीस की कित्येक आज्ञा कर्तव्य ते राजश्री महादाजी अबाजी यापासी केली आहे कीं ते लिहितील त्याप्रमाणे दुसरा विचार न करितां वर्तणूक करणे व दुसरे एक पत्र स्वामीस लिहिले आहे कीं सिलेदार व सरदार बाबूराऊ यापासी राहिले असतील त्याचे कबिले धरणे व घोडी पागेस लावणे आणि ताकीद करणे कीं याउपर कोणी त्यापासीं राहील त्यास नतिजा देणे म्हणून आम्हास हुजुरून आज्ञा आहे येसी ताकीद करणे म्हणजे त्यापासीं कोणी राहाणार नाहीं. मालाचा मालच राहातील. तथापि जर पांचसातसे कोणी मिळालेच आणि सुधी वर्तणूक न करीत तरी परिछिन्न पारिपत्य करणे यैसी आज्ञा आम्हास करून स्वामीस पत्र लिहिले असे. त्यावर मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे व उदाजी पवार व मानाजी पवार यासी सहीपत्रे दस्तक करून दिल्ही आणि ल्याहावयासी आज्ञा केली कीं बाबूराऊ दाभाडे जिकडे जातील तिकडे त्याचे पारपत्य करणे यैसी पत्रे लिहिविली व पारसी पत्रे अभयसिंग यासी व जयेसिंग यासी लिहिविली कीं बाबूराऊ दाभाडे यासी हुजुरून तगीर केले असे, यैसे असतां मुलकांत धुंध करीतील तर तुम्ही तंबी करणे व बाबूराऊ यासी दमाजी गायेकवाड सामील जाहाले अगर उमाबाई सामील

जाहाली तऱ्ही तुम्ही तंबी करणे आणि गुजराथेंतून काहाडून देणे. सदरहू-प्रमाणें आपल्या सरदारांसही लिहविलें व चिटनिसास हुकूम केला कीं याउपर त्यासी सेनाखासखेल यैसे लिहित न जाणे यैसे बोलिले., आणिकहि राजश्री रागे भरून बहुतच बोलिले. मध्यरात्रपर्यंत दरबार जाहाला होता. मजकूर हाच होता. पत्रीं कोठवर ल्याहावे? आम्हास राजश्रीनीं आज्ञा केली कीं तुम्ही राजश्री प्रधानपंतास लिहिणे जे बाबूरायानें आमचा हुकूम मोडिला आहे व बदफैली फार केली आहे. तरी तुंम्ही माझें चाकरेस असिलेस आणि पराक्रमी अहा तर बाबूराऊ मालाचे माल राहून हुजूर येत यैसे करावे. येविसी अंतर कराल तरी तुम्हास शफत असे यैसे बोलिले. त्यावरी येशवंतराऊ पोतेनीस यांसी राजश्री बोलले कीं तुम्हास आम्ही जाऊन बाबूराऊ यासी घेऊन या म्हणून सांगितले ते तुम्ही न करितां आपल्या पुतण्यास पाठविले, अखेर ते न आले यैसे बोलिले. त्यावर येशवंतराऊ बोलिले कीं बाबूराव यावयासी सिद्ध जाहाले होते. परंतु राजश्री पंतप्रधान याचे पत्र त्यास गेले कीं तुम्ही सातारियासी न जाणे. आम्ही उतरप्रांते जयसिंग याचे कुमकेस जातो तरी तुम्ही आम्हाबराबर चला यैसे पत्र आले. ते बजिन्नस त्याणी हुजेरेयासी व यासी दाखविले आणि उठोन गेले. त्यावर आम्ही येशवंतराऊ यासी बोलिलो कीं ह्या लटक्या गोस्टी तुम्ही दरबारांत बोलाव्या हे उत्तम नव्हे. राजश्री प्रधान उतरप्रांते महाराजास पुसिल्याविना कसे जातील व जाणे जाहाले तरी बाबूराऊ कोणते वकुबदार गेले जे त्यासी सामील करून घेतील? यैसे बोलिलो. तो राजश्री स्वामी त्यासी बोलिले कीं लबाड गोष्ट दरबारांत कशास बोलता? राजश्री प्रधानपंत कांहीं उत्तरेस जात नाहींत व गेले तऱ्ही बाबूरावास सामील करून घेत नाहींत. उगीच बाबूरायाचे साजीसीची गोष्ट कशास बोलता? त्यावर येशवंतराव उगेच राहिले. राजश्री मंत्री यासी बोलिले कीं गतवर्षीच आपण ये गोष्टीचा बंदोबस्त करीत होतो परंतु बावा बोलिले कीं सेनापती दिवालखोर आहे. त्यास सवसारीं कांहीं कलत नाहीं. यास्तव बाबूराऊ याजवरीच येखत्यार द्यावा हे उतम म्हणून सेनापतीचा सिका त्याचे हवाला केला. त्यावर बावा बोलिले कीं आतां या रूपास हे गोष्ट आलिया-उपर बंदोबस्त करणे तो करावा, यैसे बोलिले. त्यावर राजश्री बोलिले कीं सेनापतीसहि पुसावे. त्याच्यानें फौज ठेवून साहेबकाम व मुलुकाचा बंदोबस्त व घरचा बंदोबस्त होऊन हुकुमाप्रमाणें वर्तणूक होत असिली तरी बरेच जाले. न होय तर एवढी फौज बुडवावी आणि जागा जागा मुलुकांत डोहोणे खारे करावें यात काय फायदा आहे? दुसरा सरदार उभा करावा. तो दिवाणाचा पैकाहीं देईल व फौज ठेवून हुकुमाप्रमाणे वर्तणूक करून साहेबकाम

करील यैसे बोलिले आणि सेनापति बोलावयासी पाठविले. ते आले. त्यासी राजश्री बोलिले कीं राज्यांत तुमच्या बापानें हुकुमाप्रमाणे वर्तणूक करून लहानाचे थोर जाहाले. कष्टहि फार केले. तुमचे वाईट आम्ही करावेसे नाहीं. तरी तुम्हास हा कारभार होऊन आपले घरचा बंदोबस्त व फौज व हुकुमबारदारी व साहिबकाम होत असेल तरी तसेच सांगणे, नाहीं तर साफ उत्तर देणे. त्यावर बोलिले कीं साहेबी पुस्तपन्हा केल्यास इतक्याही गोष्टी होतील. त्यावर राजश्री बोलिले कीं येधवा तुम्ही जाणे आणि विचार करणे कीं तुमची पुस्तपन्हा कसी करावी? तुम्ही बंदोबस्त कसा करितां ते विदित करणे, बाबूरायासी हुजूर आणविता की न आणवितां हे सांगणे. तोपर्यंत राजश्री प्रधानपंतास व वरकड सरदारास पत्रे लिहिली आहेत त्याची रवानगी करीत नाहीं यैसे बोलिले. त्यावर दरबार बहुर्डा[1] होऊन राजश्री वाडियांत गेले. जाहले वर्तमान सेवेसी विदित व्हावे यास्तव लिहिले असे विज्ञापना.

¶Baburao Dabhade's rebellious conduct was the subject of a long discussion at Shahu's Court, which is reported to the Peshwa by Purandare in this letter, which is of interest to prove how the Dabhades lost their position by sheer negligence, although Shahu was ever ready to support them.

No. 77] *[2-10-1735*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री राऊ स्वामी
वडिलाचे सेवेसी.

आपत्ये शंकराजी जनार्दन सां। नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ २९ जमादिलावल गुरुवासर मुकाम चादखेडे[2] प्रात:काळ वडिलाचे आसिर्वादे येथास्थित असे विशेष. पंताजी मोरेश्वर याजविसी राजश्री बाबूराऊ दाभाडे सेनासरखेल याचे पत्र आजी प्राथ:काळी आलें. ते बजिनस सेवेसी पाठविले आहे. त्यावरून विदित होईल. त्याजपासी दोन च्यारसे राऊत जमा आहेत म्हणून चितात संशये आणितील तरी येतद्विशई. वडिलाचे आसीर्वाद समर्थ आहे. ते तले-गावीहून कूच करून आबेकुरडी येथे नदीपलीकडे सेनाखासखेल राहिले आहेत. राजश्री पिलाजी जाधवराऊ याचे चुलत भाऊ आहेत त्यास सेनाखासखेल याणी हती व पालखी देऊन उभारणी केली. दोन हजार फौजेनसी त्यांणी

---

१ खलास. २ चिंचवडजवळ, ता. हवेली.

चाकरी करावी यैसी बोली केली. यैसे वर्तमान तेथील भला माणूस आला त्याणे सागितले, त्यावरून सेवेसी लिहिले आहे. दाभाडे यापासीहि राऊत च्यार पाचसे जमा आहेत. विदित जाहाले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Shankraji Janardan to the Peshwa, informing him of the equipment of Baburao Dabhade and the latter's agreement with the cousin of Pilaji Jadhao to entertain him into his service.*

No. 78] *[10-11-1735 ?*

श्री

पुा राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसावी यासी विनंती उपरी. चिरंजीव राजश्री बाबूराव दाभाडे सेनाखासखेल याजविशयीं हुजूरची आज्ञापत्रे आलीं याच्या नकला व त्याचे गुणानवाद स्वमुखे बुधिवाद सांगितला त्याचा विचार सविस्तर लिहिला त्याजवरून कलो आला. यैसियास लिहिल्या गोष्टी येथार्थ, त्यास अंतर नाहीं. आपणहि सांगावयास किमपि अंतर केले नाही. तत्रापि याचा विचार पूर्वीच तुम्हास सांगितला. परंतु लेकरु. विचारे करून हालखुंद वर्तोन वडीलाचे नाव संरक्षण करवावे याजमधे स्वधर्म आहे. त्यानी तो उपहासिक कर्मास अंतर केले नाही. तितक्या गोस्टी येकीकडे ठेऊन आम्हावर दस्टी देऊन राजश्री स्वामीस जे विचारे लिहिणे तो अर्थ लेहून त्याची वक्रता जाऊन कृपा होये तो अर्थ करणे तुम्हाकडे आहे. पुढे ते या प्रांतास येणार, ऐकत नाहींत म्हणून लिा. यैसियास ते तेथून उलगडून आलिया विचारे वर्तनूक करतील यैसे नाही. पुन्हा संकट तुम्हास पडल याजकरीतां त्यास विचारे करून अविचार लोकिकात न दिसे, हालखुद होऊन आपनापासी स्थिरता होये तो अर्थ कीजे. येविशयीचा बुधिवाद आपणास लेहावा यैसे नाही. विचारे करून कर्तव्ये ते केले असल. त्याचे पदरी उपहासिक कर्म पडलियाने तुम्हावर शब्द आहे याचा अर्थ चितांत अणावा. सांप्रत राजश्री चिमणाजीपंतापासून अंतर जालें तर तुम्हास वडीलपणे साभालणें लागलें. त्यासी अंतर केले तर वडीलपणास शब्द लागतो यैसा विचार चितात आणून जे गोस्टीने चिरंजीव हलखुद राहे, अर्जिले येश वडिलानी त्यास विक्षेप न होये, तुमच्या आमच्या माथा वडीलपण त्याजवर शब्द न ये ते गोस्टी करणे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे छ ९ रजब हे विनंती.

¶*Letter appears to be written by Yashvantrao Dabhade to Bajirao, requesting the latter to pardon his brother Baburao and put him in the right path.*

---

१ यथास्थित.

No. 79] [31-5-1736 ?

छ १ सफर

श्री

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो। कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखण करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले त्यावरून वर्तमान अवगत जाहाले. राजश्री स्वामीचे दर्शनास जावयाचा मजकूर लिहिला की अवश्येमेव जावे. राजश्री माहादाजीपंतास लिहिले आहे की त्याचें विचारे द्रव्यें देणे. त्यासी येथील वर्तमान तरी राजश्री स्वामीकडील हुजरे रा। धोंडो गोपाळ व खासबरदार आले आहेत. जेष्ठ सुध्ये ५ पचमीस निश्चय केला असे. द्रव्यें घेऊन स्वार होऊन जावे हा ईदेर्थी[१] आपणास कलावा म्हणून लिहिला असे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे. छ २९ मोहरम हे विनंती.

श्रीसांबचरणी
सोमाजीसुत
कृष्णाजी दाभाडे

¶*Krishnaji Dabhade to Chimaji Appa : informs the addressee of his intention to go with money and visit the King at Satara.*

No. 80] [24-3-1736

श्री

श्रीमंत राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फाल्गुन वद्य नवमीपरियंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानतर दहेकाबा। दुसाला रुपये मातुश्री उमाबाई काकी याजकडे येणे, त्यास राजश्री वासुदेव जोशी त्याणी मातुश्रीसी करार करून आम्हास हाती दिल्हे. त्यास राजश्री दमाजी गाईकवाड याजकडील कारकून आला होता. त्यास तो छ १७ जिल्हेजी आज्ञा घेऊन गेला. आम्हीहि समागमे

१ इत्यर्थ.

जावयासी आज्ञा मागत होतो. त्यास म्हणो लागली कीं आमचे पत्राचा जाब आलियावर मग तुमची रा करू. जाले वर्तमान सेवेसी लिा आहे. ज्याप्रा आपली आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करू. बहुत काये लिहिणे? सेवेसी विज्ञापना हे विनंती.

¶*Visaji Bhikaji to Chimaji Appa with reference to the recovery of dues from Umabai Dabhade.*

No. 81] *[8-4-1736*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चइत्र सुध नवमीपरियेंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीनी आज्ञापत्र पाा, पावले. लिहिला अभिप्राये कलो आला. तेथे आज्ञा कीं मातुश्री उमाबाई काकी याणी आम्हासी दोहो महिनियांचा करार केला कीं जाते क्षणी दहेकचे रुपये साडे बेतालीस हजार देतो. त्याचे वसुलास तुम्हास पाा. त्यास मातुश्रीस हटकिता किंवा नाही हे न कले म्हणुन लिा. त्यास आम्ही काही स्वामीसेवेसी अंतर कदापि करणार नाही. वारंवार तो हटकीतच आहो. आणि मातुश्रीसहि रुपयांची कालजी आहे; परंतु तिचाही उपाये नाही. यैवज सोनगडी ठेविला आहे; परंतु यांचे आज्ञेखेरीज काही हातास येत नाही. मुजरद कासीदहि रा केले आहेत. त्यास आठा चो दिवसी जासूद यावे यैसे आहे. उतर आलियाने रुा येतील. रा दमाजी गाईकवाड माघारे फिरोन बडनगर विशालनगर यांचे रोखे आले आहेत म्हणून वर्तमान आहे. अमदा(बा)देच्या रोखे गेले म्हणजे समागमे मातुश्रीचा कारकून घेऊन जातो आणि निर्गम करून घेतो. प्रस्तुत काळ लस्करांत. माध्यान कालाचे पडले आहे. यैसा प्रसंग मातुश्रीचा आहे. बहुत काये लिहिणे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Addressed to Chimaji Appa on the recovery of dues from Umabai Dabhade.*

No. 82] [30-4-1736

छ १६ मोहरम

श्रीराम

राजश्री चिमणाजीपंडित गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले, पावोन वर्तमान आवगत जाले. रा। विसाजी भिकाजी यानी साद्यंत वृत सांगितले त्याजवरून कलों आलें. सर्व प्रसंग आपल्याविगला आहे येसें नाहीं. आपलियाकडील येवजाची वरात गायेकवाडाकडे दिल्ही आहे. त्यास प्रस्तुत त्याजकडे वराताचा भरणा विशेष जाला आहे आणि ते मुलुकगिरीसहि गेले आहेत. जेष्टमास ते सोनगडास आलियावर आपला येवज प्रविष्ठ होईल. सदैव पत्र पाठऊन साद्यंत आर्थ लिहित गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ २९ जिल्हेज हे विनंती.

¶ *Umabai Dabhade agrees to pay the Peshwa's dues from Gujarat.*

No. 83] [11-5-1736 ?

छ १३ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जेष्ट शुध चतुर्दसी शुक्रवारपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री अंताजी रघुनाथ[१] यास पाठऊन देणे म्हणोन आज्ञा, त्यावरून रवानगी केली आहे. परंतु त्याचें वृत यैकजेतें कीं आपली आज्ञा घेऊन

---

१ कावळे, मालाडचा.

कल्याणास येतां तळेगावास जाऊन मातुश्री उमाबाईसीं राजकारण करून सर्वश्वें त्याचे पदरीं पडावें, फिरंगणचा मनसबा त्यांजकडून सिधीस न्यावा यैसें करून कांहीं कापड व नख्ताचे यैवजी मोत्याचा तुरा व पदक यैसें घेऊन येथें आले. वस्ता गाहाण ठेऊन पैका करीत असतां आम्हांपर्यंत वस्ता आल्या ते समई तर्कहि आम्ही केला आणि वर्तमानहि कळों आलें त्यावरून मुदा हाताखालीं घालावे याकरितां तुरा गाहाण ठेऊन दीड हजार रुपये सिंपी कारभारी पुढें करून आणिला होता त्यास दिल्हे; आणि आपणांकडे हे वृत्त लेहून पाठवावे तों त्याणें जागजागा बोलला कीं ह्या वस्ता राजश्री रायानी आपणांस दिल्या आहेत. निमित्य कीं राजश्री आपास कळावयास कार्यास न ये. त्यावरून संदेह प्राप्त जाला होता. इतकियांत आपलेंहि पत्र घेऊन पोहचलें कीं त्यास समाधानयुक्त सांगोन बराबर माणसें त्याचीं नसलीं तरी आपलीं दाहा पांच माणसें देऊन पाठवणे म्हणून. त्यावरून आपणांसहि हें वृत विदित जाहालें यैसें चितांत आलें. रुजूमाइया पाहातां तथ्य याणीं त्यांजकडे राजकारण लाविलें यैसें आहे. त्यास आपले आज्ञेप्रमाणें याची रवानगी केली. परंतु हे परम चालक आहे. आपण दाभाडियाकडे राजकारण केलें हें स्वामीस व आम्हांस दखल जालें यैसें त्याचे ध्यानांत आलें आहे. कदाचित तलेगावास माणूस पाठऊन दाहा वीस श्वार आणून मार्गांतून परस्परें तळेगावास जाईल. आपले राज्याची कैद कळलीच आहे. याकरितां आधीं तों येक दोन रोज यास रवानगीस लावितों. तथापि याणी आग्रह केला तरी बराबर दाहा श्वार देऊन बोरघाटे लोहगड डावा घालून पाठवितों. आपण दाहा वीस श्वार पुढें खंडालिया पावतों पाठऊन घेऊन गेलें पाहिजे. आपण सर्वश्वें चालवीत असतां बेमानी करून तिकडे अनुसंधान लाविलें अशा मनुष्यास कैद करून ठेवावें यैसें ध्यानास जालें होतें. परंतु स्वामी शब्द लावितील यास्तव पाठऊन देतों. यास निर्बंध ठेविलियानें पुण्यामध्यें सुधां राहावयाचा नाहीं. येकादे स्थलीं ठेवावा नाहींतर कार्याचा नाश करील. आम्ही येथेंच कैद करून पर्वतारोहण करीत होतों, परंतु आपली आज्ञा नाहीं यास्तव लिहिलें असे. तरी प्रत्योत्तर सत्वर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*This letter refers to some intrigue of Antaji Raghunath Kawale with the Dabhades regarding the Bassein campaign.*

1134

No. 84]

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ २९ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकटाक्षे करून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर या प्रांतीचे वर्तमान तर मातुश्री उमाबाई यांणी राजश्री सदाशिव कासी याजपासून रुपये दाहा हजार घेऊन नासिकचे ठाणे त्याचे हवाला केले. वणीचे ठाणेयात माहानाद सुलतान फौजदार होता, त्याचा गला वीस खडी दास्तान होते तेही भरून आणिले व चार हजार नख्त रुपये घेतले. खांदेश प्रांतें हजार पांचसे राऊत रा केले आहेत. जागा जागा डवणा करितात. अवञ्यापञ्याकडील भागरे व दिघे गौळी राहतात, त्यास बलाऊन आणून वस्त्रे व सोन्याचीं कडी दोघा चौघांस दिलीं आणि त्यास किल्याचे राजकारणास तिकडे रवाना केले. कोणीकडील राजकारण केले हे न कले. त्यास तिकडील सूत्र येतांच राजश्री जावजी दाभाडे यासमागमे फौज रा वकोजी सरपाटील याची पागा व बळवंतराव टोके यांची पागा देऊन अकोलेयासी जाऊन बसले आहेत. खादेशातीलहि स्तळ हस्तगत येकादे करावें म्हणून तरतुदेत आहेत. राजश्री चिमणाजीपंत व रा यादोपंत यांही रा वासुदेव जोसी यांजपासी करार केला कीं दोहो महिन्यांत रुा विसाजीपंताजवल देऊन रा करितों. त्यास यावतकाळपर्यंत रुा येतां दिसत नाहीं, आणि आमची रौहि गाईकवाडांकडे करीत नाहीं. ते म्हणतात कीं मातुश्रीचा रोख पाहू, त्यासारिखी तुमची रा करू. रुपये तो येतील, चिंता कांहीं नाहीं. परंतु दो तिही महिन्यांत येतील. आम्ही एकदोन वेळां निकड केली होती कीं देणे नसेल तर आम्ही श्रीमंत राजश्री राऊस्वामीकडे जाऊन दर्शन घेऊन येऊं. त्यास जाऊं तो देत नाहीं आणि या ग्रस्ताचे हाती आहे येसा अर्थ नाहीं. मोगलाईकडील आमची ठाणी उठवावी आणि बाईची बसवावी हाई विचार याही केला होता. परंतु मातुश्रीचे चितात कीं जें रायाचे विचारें जें होईल तेंच करावें. सतरुसीहून कचेस्वरबावांचे पुत्र जगोबा मातुश्रीस न्यावयांसी आले आहेत. त्यास पत्रें श्रीमंताकडे मातुश्रीनी रा केली आहेत. त्याचे उत्तर येईल त्यासारिखी तरतूद करावी. जाले वर्तमान सेवेसी लिा असे. बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Bhikaji reports Umabai's hostile activities to Chimaji Appa.*

---

१ रवानगी.

No. 85] [1-6-1736?

छ १४ सफर

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत जेस्ट सुध त्रितीयापरियंत स्वामीचे कृपेकटाक्षेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. यानंतर विश्रामजी जासूद याजबरोबर आज्ञापत्र पाठविले तेथें आज्ञा कीं त्या प्रांतीचे व मातुश्री उमाबाई व राजश्री सेनापति व राजश्री सवाई बाबूराव याजकडील सविस्तर वर्तमान लेहून पाठवणे म्हणून आज्ञा विशेष. मातुश्रीचें व गाईकवाडाचा तह आदियाप जाला नाहीं. सवाई तों हळदाणीस मोर्चे लाविले आहेत. मातुश्रीस आहेरणीस ध्यान स्वामीचें लागलें आहे. पुढें जर स्वामी त्याचा आंगिकार करून उभारणी करतील तर होईल नाहींतर कांहीं सरदारी राहाते यैसा अर्थ नाहीं. राजश्री गोविंद गोपाल[1] गाईकवाडाकडे ठेविला म्हणून मातुश्रीचे चित्तांत विकल्प पडला आहे कीं राऊ आमची उभारणी करील कीं न करीत. येक दोन वेळां मला नेऊन पुसों लागली कीं पुढें आम्हास हातें धरून चाकराचें पारपत्य करील कीं न करी? गोविंदपंत काय निमित्य ठेविले? आम्ही प्रत्योत्तर दिल्हे कीं त्याचे मनामध्ये काये मनसुबा आहे, काये विचार करितो म्हणून उगाच अंगावर घेऊन मायेंत आणून चित्तांतील विचार घ्यावा आणि वरचेवर तुम्हांस सुचना करावी यास्तव ठेविला, त्यावरून संतोष पावली. सर्व वर्तमान विश्रामजी निवेदन कारितां श्रुत होईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa, referring to the dispute between the Gaikwad and Umabai Dabhade.*

---

१ कामतेकर.

No. 86] *[20-10-1736 ?*
[1-11-1735

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २९ जमादिलाखरपरियंत शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते नवपुरीं (सुखरूप) पावलों. मातुश्री बाईस पत्र देऊन ज्याजप्रमाणे आपण आज्ञा केली होती त्याजप्रमाणे साद्यंत वर्तमान निवेदन केलें. राजश्री कृष्णाजी दाभाडे व राजश्री काळोजी भोसले येसे उभयेतां राजश्री दमाजी गाईकवाड याजकडे गेले. मातुश्री नवपुरी लस्करांत आहेत. त्याजकडील कांहीं मजकूर ल्याहावा तर आदियाप त्याचा व यांचा मजकूर बोलीचा जाला नाहीं. हालीं आपलीं पत्रें मातुश्रीस होतीं त्याचें प्रत्योत्तर आपणांकडे घेऊन पाठविला आहे. पत्राचे साकल्यार्थ मनास आणून जेणेप्रमाणे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. मातुश्री व दमाजी गाईकवाड या उभयतांची भेटी जालियावर जो मजकूर होईल तो मातुश्रीचे * * सेवेसी पाठऊन देतों. * * मातुश्रीनें आपणांस लिहिलें आहे, त्यास ते समरुसीहून आपणांपासीं येत ते केलें पाहिजे. राजश्री बहिरजी भांगरे येथें आपले चाकरींत आहेत. सेवेसीं कळवें म्हणून लिहिलें असें. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर आसों दीजे हे विज्ञापना.

¶*The writer informs the Peshwa that the differences between Dabhade and Gaikwad remain unsettled though attempts are being made to bring about a reconciliation.*

श्री

२

विनंती विशेष. आपल्या चित्तांत आहे कीं यांचा बंदोबस्त करावा यैसे आहे. त्यास तेणेप्रमाणेच होऊन येईल. येथें सर्व भरंवसा आपणाखेरीज दुसरा कोणाचा नाहीं. आपण ज्यास आज्ञा केली त्यास तेहि त्या प्रयेत्नांत आहेत. बहुत काय लिहिणे ? कृपा असों दिल्हीं पाहिजे हे विज्ञापना.

No. 87] [11-6-1736

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता जेष्ट सुध चतुर्दसीपरियंत स्वामीचे कृपेकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर मातुश्री व राजश्री दमाजी गाईकवाड याची जेष्ठ सुध त्रितीयेस भेटी जाली. आधरमान परस्परे जाला. दमाजीने सेनापतीस व मातुश्रीस दोन हती दिल्हे. मातुश्रीनेहि दमाजीस वस्त्रे व हती दिल्हा. पूर्वी पनासाचा करार केला होता त्याप्रा गोष्ट ठीक जाली. प्रस्तुत पाच लक्ष रुा मातुश्रीचे पदरी घातले. सेवेसी कलावे म्हणून लिा आसे. आम्ही आपले रुा तगादा लाविला आहे. माहाराजाचे रुा आठा चो दिवसी रा करणार. त्याबरोबर आमची रा करू म्हणून मान्य केले आहे. येदा कर्जदारास तो पैसा देत नाही. प्रस्तुत आकरा लक्ष द्यावे यैसा करार दमाजी गाईकवाड याणी केला. आण आहिले (आपले ?) रुा त्याची निशा करून हवाले आपणाकडे घ्यावे यैसे केले आहे. आम्हीहि कार्य करून सेवेसी सत्वरच येतो. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji writes about the reconciliation of Damaji Gaikwad with Umabai and the Senapati which occasion was celebrated with an exchange of elephants and other rich presents. The letter gives us a glimpse into the mismanaged money-affairs of the Dabhades. The Peshwa's agent is pressing for the Peshwa's share.*

No. 88] [16-9-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत भाद्रपद वद्य सप्तमीपरियंत स्वामीच्या कृपेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. यानंतर मातुश्री बाई अश्विन सुध त्रितीयेस स्वार होऊन देसीं येणार. सरकारचा यैवज तुळाजी जामदार याजबरोबर देऊन येका दो दिवशीं पुढें रवाना करणार आहेत. आमचाहि यैवज देऊन सरकारचे

यैवजाबरोबर रवाना करणार आहे. घडोन येईल तेव्हां खरें. त्रिवर्ग येकचित जाली. गाईकवाडहि सत्वर जावयासी खोलंबले आहेत. मोमीनखान व रणकोपंत[1] येकत्र होऊन आमदाबादेस मोर्चे लाविले आहेत. शहरकोटास मोर्चे लाविले आहेत. दर्वाजे देखील बंद जाले आहेत; यास्तव गाईकवाडहि सत्वर या प्रांतास जाणार. मातुश्रीकरतां खोलंबले. पूर्वी नेमणूक गाईकवाडाकडे पनास लक्षाची होती. हालीं साठ सत्तरपरियंत यैवज नेमून सिलेदार व कर्जदार देखील वराता केल्या आहेत. सरकारचे यैवजाच्या वराता मातुश्रीवर होत्या. त्याही जामदाराचे गुजारतीनें यैवज नेमिला आहे. आम्हांस म्हणते कीं तुमचा यैवज रोख सरकारचे यैवजाबराबर देऊन तुमचाहि रवाना करीन. आमचा कांहीं हा कालपरियंत गाईकवाडावर यैवज नेमिला तों नाहीं. पुढें काय करील तें पाहावें. मनुशाचा कांहीं उपाये आहे यैसा अर्थ नाहीं. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर असों दिल्ही पाहिजे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji writes to Chimaji Appa that Renakopant and Mominkhan have besieged Ahmedabad where the Gaikwad will soon join them.*

No. 89] [*21-10-1736*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। अश्विन वद्य त्रयोदसीपरियेंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर स्वामीची आज्ञापत्रे येतात; तेथ आज्ञा कीं मातुश्री उमाबाई काकी याजकडे येवज येणे, त्यास निकड लाऊन रुपये घेऊन सत्वर रा। करणे म्हणून अज्ञा. येसियासी आम्ही तो रुपयाविसी निकड बहुत लावली आहे; परंतु समध मातुश्रीसी आहे. ईश्वरइछेने घडोन येईल तेव्हा खरे. मनुशाचा काही उपाये नाही. हुजरे व आम्ही रुसवा करून हलदाणीपरियेंत गेलो होतो. त्यास समजावून आणिले कीं दिपवालीचे प्रतिपदेस येवज देऊन रा। करीन येसा करार केला आहे. जर येवज देऊन संतोषानरूप रवानगी केली तर उतम आहे. नाहीतर आम्ही व हुजरे उठोन येतो. सेवेसी कलावे म्हणून लिहिले आसे. हा कालपरियेंत काही सिलेदाराची वाट जाली नाही. राजश्री सवाई बाबूराऊ यासी सिलेदारानी हलदाणीचे गढीतून हाती धरून काढून

---

१ रेणको आनाजी, पेशव्यांचा सरदार.

आणिले. कारभारी सनिध होते. त्यासी लताप्रहार करून उतम प्रकारे चतुर्भुज करून बाहेर आणिले. आठदहा दिवस बसविले. त्यासी मातुश्री व देवजी येकत्र बसोन विचार करून सवाईसहि घेऊन सोनगडास आणिले. सिलेदारासी करार केला की तुमचा निर्गम आम्ही करून देऊ, तुम्ही सवाईस घेऊन येणे. त्यावरून सवाईसहि समागमे घेऊ सोनगडास आले. देवजी बाहेर जाऊन सिलेदाराचे समाधान करून युक्तीने सवाईस गावात घेऊन आले आणि फाटक मना केले की लस्करचे माणूस गावात येऊ न देणे येसी ताकीद केली. मातुश्री काही येंदा देसी येता दिसत नाही. च्यार महिने रााहि आपणाजवल उगेच ठेविले. तलेगावचा विचार तो मातुश्रीजवल नाही. कुल येकातियारी देवजीवर दिल्ही आहे. येथील निर्गमास महिने तीन चार लागतील तोहि कोणी भरोसा मानावा हे तों नाही. आदियाप कोणे मनसबा विल्हेस लागला नाही. येदा खांदेसचा तो खराबी मांडली आहे. रोखे धारणगावपरियंत केले आहेत. प्रस्तुत त्रिवर्गे येकत्र जाली आहे. आहेर्णीस देवजी येऊन बसतो परंतु त्याच्यानेहि निर्गम होत नाही. दिपवालीपरियेत वाट पाहातो. काये आज्ञा ते केली पाहिजे. त्याप्राा वर्तणूक करून. बहुत काय लिहिणे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa, informing him of the troubles between Sawai Baburao and the army over the payment of dues.*

No. 90] [*1-11-1736*

पौ छ १४ साबान

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा कार्तिक वद्य नवमीपरियंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर मातुश्री बाई व राजश्री सेनापति व राजश्री सवाई बाबूराऊ या त्रिवर्गाचे वर्तमान तर सवाईस शरिरी सावकाश वाटत नाहीं. ते कूच करून दहेवलीस गेले. मातुश्री व सेनापति तो आदियाप स्वास्थानीच आहेत. येकादो दिवसी कूच करून रनालेयाचे रोखे येणार आहेत. राजश्री दमाजी गाईकवाड याणी निकड लाविली आहे कीं तुम्ही कूच करून नवापुरावर जाणे. मग जसे कलेल त्याप्राा विल्हेस लाऊ म्हणून म्हणतात. सवाईचे फौजेची तो पाच पंचवीस देऊन समजाविसी केली. कर्जाची विल्हे गोसावी यासी रोख चौथाई

द्यावी व आणीक किरकोळीं राजश्री अतोबा ना व दादो हरि व कृष्णराऊ माहादेऊ यासी रोख तिजाई द्यावी, बाकी राहील ते दो सालामध्ये झाडा करून द्यावा, येसा करार केला आहे. गोसावी याचा येवज बाकी राहील तो ज्येष्ठ मासी द्यावा येसा करार केला. चौथी तक्षीम रोख दिल्हे. सेनापतीकडील बारगिराची तो पाचपंचवीस करार करून पारखाचा हवाला दिल्हा. मातुश्रीकडील व सेनापतीकडील सिलेदारांची मात्र समजाविसी होणे आहे. तेहि मातुश्री गेलियावर करू म्हणतात. होता होईल ते पाहावे. आपला सरकारचा येवज मातुश्रीकडे येणे रुपये ४७५०० साडेसतेतालीस हजार. त्यापैकी रोख आम्हाजवळ रु २१००० एकेवीस हजार दिल्हे ते बजिनस श्रीमंत राजश्री अपाकडे बईल भाडियाने करून माहाराजाचा येवज गेला, त्याजबरोबर रा केले आहेत. बाकी राहिले त्याची वरात गाईकवाडावर देणार आहे. त्याची वरात मान्य करून आपली चिठी आम्हास लेहून दिल्ही तर मान्य करितो. दुसरे सालचे मातुश्रीस हटकले. त्या साफ जाब देतात कीं तुम्हास आम्ही देतो त्याचा मात्र निर्गम करून घ्यावा, मग देणे येसे जाले तर त्याचीहि विल्हे करून देऊं. स्वामी या प्राते आले म्हणजे आम्हीहि भेटीस येऊं. भेटीनंतर सर्व वर्तमान निवेदन करून. राजश्री गोविंद गोपाळ याणी सेवेसी लिा आहे त्यावरून श्रुत होईल. कारभार तो दुभासी आहे. अंतकर्णापासून नाही. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर असो दिल्ही पाहिजे हे विज्ञापना.

¶*Another glimpse into the finances of the Dabhades. His army is clamouring for pay. An understanding seems to have been patched up between Dabhade and his assistant the Gaikwad.*

No. 91] [*26-11-1736*

श्री

श्रीमत राजश्री पंत

प्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष सुध पंचमीपरियेत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर सुध द्वितीयेस मातुश्रीची व राजश्री दमाजी गाईकवाड यांची भेटी जाली..................तुश्रीस घेऊन राजश्री दमाजी गाईकवाड सोनगडास जाणार आहे. आदियाप काही उभयेताची बोली देणे घेणे यांची जाली नाही. स्वामीनी मातुश्रीस पत्रे पाा होती त्याची प्रत्योतरे घेऊन सेवेसी पाा आहेत.

पत्रावरून साद्यात वर्तमान सेवेसी निवेदन होईल. राजश्री रामाजी कडूविसी लिा होते. त्यास बलाऊन आणून जे सागणे ते मातुश्रीने सागितले व राजश्री दमाजी गाईकवाड यासहि ताकीद केली की, रामाजी कडू पागा टाकून तुम्हाकडे आले आहेत त्याजकडे प्रधानपंताचे पागेचा हिसेब कितेक राहिला आहे तर तुम्ही त्यास येकदर न ठेवणे, त्यास निरोप देणे, म्हणून परिछिनवादे मातुश्रीने सागितले आहे. त्यास त्यानीहि मान्य केले की रामाजी कडू यास आपण निरोप देतो. नालबदी दिल्ही आहे. त्याची विल्हे करून घेऊन निरोप देतो म्हणून मान्य केले आहे. सेवेसी कलावे * * * असे. सरकारचे रुपये साडेसतेचालिस हजार देऊ म्हणून मान्य केले आहे. सोनगडास जाऊन आमचा निकाल निघाला म्हणजे तुमचे पदरी पैका घालू म्हणून मान्य केले आहे. बहुत काय लिहिणे? कृपा निरतर असो दिल्ही पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji, Peshwa's agent in Gujerat, writes to the latter that Damaji Gaikwad had a meeting with Umabai Dabhade though money matters remain unsettled. Damaji has promised not to entertain Ramaji Kadu, and to pay off the amount due to the Peshwa (on account of his rights in Gujerat?)*

No. 92] [*12-12-1736*

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यांसी.

ॐ सकलगुणालंकर्ण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणाकडील पत्र येऊन कुशलवृत्त कळो येत नाही, तेण्हेकरून चित्त सापेक्षित आहे. तरी ऐसे न कीजे. सदैव वार्तिकासमागमे पत्र पाठऊन सांभाळ करीत गेले पाहिजे. यानंतर आपला ऐवज मातुश्री बाईकडे होता, तो ऐवज राजश्री विसाजी भिकाजीजवळ त्यानी दिधला. तो आम्हाजवळ आसखेडीयास आला तो मारानिलेबराबर बदरगौ[१] देऊन गंगातीरी कोटुऱ्यास प्रविष्ट केला असे. तेथोन आपणास प्रविष्ट होईल. सदैव पत्री वर्तमान लिहून पाठविणे. विस्मरण न कीजे. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दीजे. छ १९ साबान हे विनंती.

¶*Krishnaji Dabhade to Chimaji Appa, sending money which was due from Umabai Dabhade.*

---

१ रक्षण करणारे.

No. 93] [20-12-1736

श्रीराम

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो येशवंतराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री बाबूराऊ दाभाडे सेनाखासखेल यांस समाधान वाटत नवते. याजकरिता सोनगडीहून पुढे लोहनेरास रवाना केले. औषध उपाय व दैवीउपाय बहुतच जाले. इस्वरे यश कोण्हास न दिल्हे. मार्गसीर्ष शुध त्रयोदसी मंदवारी देहावसान जाले. हे वर्तमान आम्हास मार्गी येत असतां कलले. भेटी देखील जाली नाही. येसे दु:खाचे वर्तमान तुम्हा समजावे म्हणोन लिहिले असे. जाणिजे : रा छ २७ साबान. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Yeshwantrao Dabhade, Senapati, reports the death of his brother Baburao to Chimaji Appa.*

No. 94] [20-12-1736

श्री

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यासी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलक्रत राजमान्य स्नो कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले पाऊन वर्तमान अवगत होऊन बहुत समाधान जाले. येसेच हरघडी पत्री सांभाल करीत विसर केला न पाहिजे. यानंतर आपण येवजाचेविसी जासूद कागद पाठविले; तरी आपले कामाकाजास सेवेसी आपणाजवलोन अंतर पडते येसे नाही. आपला येवज कोठुहुन्यास गंगा-

(१) ५-१२-१७३६.

तीरी देखील राजश्री दादो हरि व राजश्री विसाजी भिकाजी याजबराबर राऊत बरकंदाज येसा बदरगा देऊन पोहचाविला असे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे. छ २७ साबान हे विनंती.

सोमाजीसुत
कृष्णाजी
दाभाडे

मोर्तब
सुद.

Krishnaji Dabhade informs Chimaji Appa that the sums due to the Peshwa have been sent with Visaji Bhikaji and Dado Hari.

No. 95] *[4-1-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामींचे सेवेसीं

विनंती. सेवक चिमाजी सिवदेऊ[1] साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत पौष सुध १४ चतुर्दसीपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. यानंतर येथील दरबारचें वर्तमान तरी राजश्री रघूजी कदमराऊ व कंठाजी कदमराव व गोजाजी कदमराव त्रिवर्ग बंधू रामेश्वरदेवल्यास भेटीस येका दो दिवसीं येणार. दाभाडी पाटण्योवर[2] आले आहेत. त्याची भेट् घेऊन नेमाड प्रांते पोट भरावया च्यार दिवस रवाना करणार आहेत व राजश्री देवजी ताकपीर स्वारीस रेवातीरीं प्रांतें तो गेले होते. तों तेथें खासकिलीचें[3] वर्तमान यैकोन माघारे फिरोन सुरतअठाविसीमध्यें येऊन तेथून मातुश्री उमाबाई यासी समाधानाचीं पत्रें व कारकून व भला माणूस पाठविला. त्याजबरोबर सांगोन पाठविलें कीं सातारियासी मातबर माणूस पाठवावें. सरकारकुनाच्या हाते दरबारचा बंदोबस्त करावा. राजश्री सेनापतीच्या मुलाचे नांवें खासखेल पद होये ते गोष्ट करावी. यासी खर्चवेंच लागेल त्याची अनकुलता होईल. यैसी कितेक समाधानाचीं पत्रें आलीं. त्यास याच्या विचारें ताकपिरास भेटीस बोलाऊन त्याजपासून सातारियाच्या खर्चाविचाची तजवीज करून राजश्री कृष्णाजी दाभाडे यासमागमे माहाराजांचा यैवज देऊन आपणापासी पाठवावे, आपल्या विचारें दरबारचा बंदोबस्त करावा यैसा विचार. मातुश्री बाई व राजश्री

---

१ धायगुडे ? २ खानदेशांत. ३ खासखेलीचे ?

सुभेदारे[1] याच्या विचारें येसें आहे कीं आत:पर तुमच्या विचारें जें कर्तव्य तें करावें येसें आहे. त्याचे आज्ञेवरून स्वामीस पत्र लिहिलें आहे. उत्तर आलियावर राजश्री सुभेदाराची व येवजाची रवानगी आपणांकडे होईल. सविस्तर उत्तर सत्वर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ति.

¶*Attempts are being made to secure the title and dignities of Senakhaskhel for the son of Yeshwantrao on the demise of his brother Baburao.*

No. 96] [*7-1-1737*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवेसी विनंती. सेवक गोविंद गोपाल चरणावर मस्तक ठेवून कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येसी जे. येथील कुशल ता। पौश वद्य द्वितीया शाहार आमदाबाज येथास्थित असे विशेष. पहिले आपली आज्ञा घेऊन सोनगडास आलो तेथून लस्करात गेलो. लस्करासमागमे बराणपूरपरियेत होतो. त्यास तेथून श्रीमंत राजश्री राऊसाहेबी पत्रे देऊन राजश्री दमाजी गायेकवाड याजकडे रवाना केले. निमित्य जे बातमीची बातमी आनीक मातुश्री उमाबाई याजकडील पैका रुपये २६५०० साडेसवीस हजार नेमून दिल्हे आहेत याजनिमित्य पाठविले आहे. यैसियास बराणपूरचे मुकामीहून आज्ञा घेऊन आलो ते रा। देवजी ताकपीर सुरत प्रांते तडकेस्वरे[2] येथे मुकाम करून राहिले होते त्याची भेट जाहाली. त्यास पत्रे दिल्ही. वर्तमान सांगितले. त्याणी राकडे येथे पाठविले त्यावरून येथे आलो. याची भेट व रा। माहादाजीपंताची भेट जाहाली. पत्रे वाचून पाहिली. त्यास प्रस्तुत गलबल आहे. शाहारभावते पहिले रा। रेणकोपंत व मुमीनखान मोगल याणी मोरचे च्यार महिने लाविले होते. त्याणे जेर होता. सांप्रत याचे लस्कर आलियावर फारच जेर जाहाले आहे. गावात दाणे पाच सेर व गवत भारे १ रुपये ५ पडतात. बाहेर दाणे लस्करात पंचवीस तीस सेर व मुलुकात मणासी धारण आहे. याजमुलें आठा चो रोजा भंडारी पलोन जाईल ऐसे वर्तमान आहे. याचा तो करार अमदांबाज फत्ते करावी तेव्हा पुढे जावे. सुरतेचा बिघाड जाहला आहे. याजमुले रा। देवजी

---

१ कृष्णराव दाभाडे. २ ता. मांडवी, जि. सुरत.

ताकपीर तेथे राहिले आहेत. त्याचा सलुक जाहालियावर या प्रांतास येतील. तोवर शाहारचे काम निर्गम होईल. मग याची पत्रे व पुढे जे वर्तमान होईल ते सविस्तर लिहोन सेवेसी याच्या जासुदाबराबर पाठवितो; व श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजकडे सविस्तर वर्तमान व याच्या पत्राची उत्तरे पाठऊन. येथील निर्गम जाहालियाखेरीज पैकियाची निकड करिता येत नाही. मजला राहिविले आणि जासुदास निरोप दिल्हा, याजमुळे जासुद सेवेसी पाठविले आहेत. सेवेसी श्रुत जाले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Govind Gopal (Kamtekar ?) to Chimaji Appa, informs him of his arrival at Ahmedabad which was besieged by Mominkhan and Damaji.*

No. 97] *[24-1-1737 ?*

श्रीराम

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक चिमणाजी सिवेद्व कृताने (क) साष्टांग नमस्कार विनंती. येथील माघ शुध चतुर्थ भानुवासर मुकाम रामेस्वरदेवले स्वामीचे कृपेकरून येथास्थित जाणोन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविले, पावोन बहुत संतोष पावलो. कितेक मातुश्री उमाबाई याजकडील मजकूर लिहिला तो त्यास निवेदन केला. त्याणी स्वामीस पत्र लिहिले आहे त्याजवरून भावगर्भ विदित होईल. दरबारचा धरबंद करणे तो आपले विचारें करावा येसा मातुश्रीचा व राजश्री सेनापतीचा हेत मन:पूर्वक आहे आणि सिधसिही जागा हाच विचार जाईल; परंतु येथील कारकून मंडलीच्या मनात मात्र हा प्रसंग होऊ न द्यावा येसा मनसबा देणार हे वर्तमान सत्वरीच सेवेसी येऊन निवेदन करितो. विदित जाले पाहिजे. रा। देवजी ताकपीर * * * * नर्मदेआलीकडे आहे. यांच्या त्याच्या भेटी जेष्ठ मासाआलीकडे होता दिसत नाहीत. दरबारखर्चचा विचार यांस कागदीपत्री न ल्याहा. येथे समजावणार आणिखे प्रकारे समजावितात. होणे ते होऊन येईल. परंतु कागदीपत्री न ल्याहावे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Chimnaji Sivdeo writes to Chimaji that Umabai and the Senapati would be glad to have the addressee as their mediator to settle their affairs at Satara.*

1146

No. 98] [15-3-1737

पो छ १९ जिल्हेज.

श्रीराम

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी.

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्रें पाठविलीं, पावोन सविस्तर वर्तमान आवगत जालें. राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांजकडील व दरबारचें वर्तमान लिहिलें व आमदाबाजेकडील काय खबर आहे ते लेहावी म्हणून लिहिलें. ऐसियास आमदाबाजेस राजश्री रेणको आनाजी, पांच हजार फौज व मोमीनखान दाहा हांजार फौजेनशीं वेढा घाळून होते. मागाहून राजश्री दमाजी गायेकवाड समशेर बाहादुर गेले; तेथील विच्यार मनास आणितां मास दोनमास हस्तगत व्हावयास लागतील. फौज भारी, पोट चालिलें पाहिजे. याजकरितां रेणकोपंत व मोमीनखान दाहा हजार फौजेनशीं तेथें ठेऊन सोरट प्रांते पोट भरावयासी गेले. माघारें फिरलियावर तेथील विचार मनास आणतील. दरबारचा प्रसंग आम्हीं आपणांस लेहावा, तर सर्व प्रकारें आपण तेथें आहेत. याजकरितां आम्हीं बेफिकीर असों. आपण ममतापूर्वक कितेक प्रकारें लिहिलें ऐसियास ते गोष्टी करून दाखवावयाचा समये संनिधच आहे. राजश्री सुभेदार[1] दरबारास रवाना केलें आहेत. त्यांची आपली भेटी होऊन साद्यंत अर्थ अवगत जाला असेल. मनोदयाप्रमाणें प्रसंग सिद्धीस जावे तेच गोष्टी आपण करतील हा पूर्ण भरवसा आहे. सांप्रत राजश्री पंतप्रधान कोणेस्थळीं आहेत? त्याजकडील नवीन वर्तमान आलें असेल तें लेहून पाठवावें. राजश्री खंडो बाबाजी जमेनीस यांनीं सविस्तर सांगितले, त्याजवरून कळों आलें म्हणून लिहिलें. ऐसियास हल्लींही मशारनिलेची रवानगी लौकरीच करितों. यांचे भेटीनंतर तपशिलें अर्थ कळों येईल. बहुत काय लिंहिणें? लोभ असों दीजे. छ २३ जिल्काद. हे विनंती.

¶*Umabai Dabhade writes to Chimaji Appa explaining how things were managed by Renako Anaji and Mominkhan in Ahmedabad. She makes inquiries about Bajirao and his campaign.*

---

१ कृष्णाजी दाभाडे,

No. 99] [*2-4-1737*

छ १३ मोहरम जाबसूद

श्री.

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी
यांसी

॥ ॐ

श्रीसकलगुणालंकरर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो॥ कृष्णाजी दाभाडें दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखण करीत गेले पाहिजे विशेष. आपणांकडील पत्र आलें त्यावरून लिहिलेप्रमाणें सर्व कलों आलें. लग्न तों वैशाख सुध्य ११ जाहालें. याउपर सातारा जावयाचा विचार आपले विचारे होईल त्याप्रमाणे करून. मातुश्री उमाबाई यांचा मनोदये आहे तों येकदेसीं नाही. येविसी आपण मुजरत येक जोडा जासुदांचा बाईकडें पाठऊन, त्याचा कागदपत्र निश्चयेकपूर्वक आणऊन आपलें विचारे आपण आम्हांसी लेहून पाठविले पाहिजे. त्यासारिखे सातारा जावयाचे करून. ये * * विस्तारे ल्याहावे यैसे नाही. सर्व प्रकारे आमची इमारती आपणा उभयेतावरी आहे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे. छ १२ मोहरम हे विनंती.

(अस्पष्ट) (मोर्तब सुद.)

¶*Krishnaji Dabhade informs Chimaji Appa of his intention to proceed to Satara.*

No. 100] [*16-12-1738*

श्री.

राजश्रियाविराजित राजमान राजश्री
विसाजीपंत स्वामीचे सेवेसी.

सेवक गोविंद गोपाल कृतानेक नमस्कार विनंती उपर. सुरतेस खरीदीबदल श्रीमंत राजश्री आपाही तुम्हाकडून रुपये १०००० दाहाहजार देविले ते आम्हास पावलेयाचे पत्र उंदीरखेडियास पाठविले आहेत ते तुम्हास पावेल. रुपये नवापूरचे मुकामी घेतले असेत. राजश्री दमाजी गाइकवाड याजकडे पइकाचा यैवज

मातुश्री उमाबाई याणी देविला. त्यापैकी सदरहू रुपये पावले. बहुत काय लिहिणें ? शके १६६० कालयुक्तनाम संवत्सरे मार्गेस्वर वद्य द्वितीया मंदवार. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Govind Gopal Kamtekar to Visajipant, regarding purchases at Surat.*

No. 101] [*4-8-1739* ?
[*14-9-1738* ?

पौ छ २५ जोावल.

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी.

जाबसूद

सेवेसी विज्ञापना. गोविंद गोपाळ चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता. छ ९ माहे जमादिलोवलपर्येत यथास्थित असे विशेष. माहाराजांची आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते मातुश्री उमाबाईकडे रामेश्वरदेवलीयास आलों. त्यांची भेट घेतली * * * वर्तमान सांगितलें. त्याउपर त्यांचे पत्र राजश्री दमाजी गायकवाड यास घेऊन सोनगडास आलों. यार्ची पत्रें दिल्हीं, वर्तमान सांगितलें. मग अरबांच्या तलाशानिमित्य रा रेणकोपंत व बडोदे भडोच येथे पत्रें पाठविली. आणि रुा २६५०० साडे-सवीस हजारपैकीं दाहा हजारांची वरात घेऊन सुरतेस आलों. कोसांबेवर येऊन राहिलों. तेथून अरब लोकांचा तलास बहुत केला. येथील अरब अवघे मोमीन-खान याजकडे गेले. शाहरात थोडेबहुत आहेत ते मोगल बाहेर निघो नेदी. परंतु त्याचाहि तलास केला आहे. शाहरास जावयाची परवानगी पाच साहा रोजा आमची जाहली. मग शाहरात गेलो. मोगलाचा दिवाण लालचंद याची भेट घेतली. आपले पत्र होते ते त्यास दिल्हे. वर्तमान सांगितले. त्येगबेरखाची भेट न जाहाली. दिवाणानें कामकाज येणेप्रमाणें कबूल केले आहे. गायक-वाडाच्या पत्रानें कामकाज न होय. मोगलासी व याची मनापासून सलूक नाहीं. याजनिमित्य आपल्या कितेक गोष्टी एकांतीं दिवाणानें सांगितल्या. मग त्यास आपले कामकाज पुसिले. अरबाचा मजकूर तर मिळत नाहीं म्हणाला. तुम्हास मिळतील तर ठेवणें. अजीपावेतो चाळीस पनास माणूस मिळाले आहे. परंतु करार केले नाहीं. अनिकही मिळतील. काही आनिक माणूस पठाण व खान * * * सी माणूस मिळते असे ते आठा चार दिवस * * * *

करून कांही अरब व हिंदुस्थानी ऐसे सेवे * * * * ना करितो. अमदाबाजेस व बडोदे व भडोच व खंबाइत येथे पत्रे गेली आहेत. रा रेणकोपंतास त्याचे पत्र व मीही एकपत्र लिहिले आहे ते मिळतील. पांच (फाटलें.) * * महिना खर्ची देऊन पाठवणे म्हणून बहुत प्रकारें लिहिले आहे. तिकडून काहीतरी येतील. हिंदुस्थानी माणूस ठेवावयासी आज्ञा नाही. परंतु शहाने रोप * * * * वे तो ठेऊन मर्द माणूस पाठवितो. आनीक (फाटलें) * ज्ञा होईल तर ठेऊन महिना रुा सात आठ (फाटले) गतात. आरब महिना तेथील कौला(?) प्रमाणें * * * नाहीत. जाजती काही पडेल. प्रस्तुत कबूल करून ठेवितों. तेथें आलियावर जे करणे ते करावें. जिनस (फाटलें) दि निमित्य राजश्री बाबूजी नाईकाकडील गुमास्ता तो आला नाहीं. जिनसाचा भाव तरी मनास आणिला येणेप्रमाणे:

लोखंड वजन पके.	वजनी जिनस वजन पके.
८ खजेरी दरमणी रुा	८ गंधक उटीया ८१ दरमणी रुपये.
१० बिलदी दरमणी रुा	१० राळ चंदुस ८१ दरमणी
११ इग्रजी दरमणी रुा	
बाकी १ वजन पके ८८१॥ त्याचा रुपया १८≡	०

येणेप्रमाणे निरख आहे आणि येथे मिळे * * * * तका घेतला, तितका मिळेल व जकाती खेरीज * * * र निघेल. मोगलाची परवानगी घेतली त्या * * * * कबूल केले. बाहेर काढून देतील व गायकवाड * * * गोवरीपावेतो जिनस पाऊन द्यावयाचा करार केला. येणेंप्रमाणें जिनस प्रस्तुत खरिदी करावा. प्रज्यन्य काळचे गाडे चालत नाहीं म्हणून न घेतला. आज्ञा जाहली तरी * * * * * * जाहलीयावर रवाना गाडे भरून करितो. दारु व शिसे तो मिळत नाही. इजारा मोगलाचा आहे, याजकरितां त्याणी तो नाही म्हटलें, परंतु शिसे चोरीने काही मिळाले तर घ्यावे की काय व कांही दारूही यांचा भाव येण (फाटलें) दारु उत्तम दोन सेर पावणे दोनशेर प्रमाणे शिसे दोन * * * दोन प्रमाणे पके मिळेल, याची आज्ञा करावी व * * * जेजाला तो मिळत नाहीं. हातगरनाला पाचसे लिंहिल्या होत्या त्याचे नाव काय ते येथे समजत नाहीं.

मोगलांच्या कितेक गोष्टी लालचंद दिवाण यानी सांगितल्या आहेत. त्याचा भावार्थ, आपलें येणें या प्रांते होईल तर उत्तम. जिनस घ्यावयाची आज्ञा जाहली तर त्येगबेरखानास एक पत्र व लालचंद दिवाण यास एक पत्र. त्याच्या पत्रांत, गोविद गोपाळ याणी तुम्हाकडील वर्तमान कितेक लिहिले होते तरी कांही चिता नाहीं. पुढे जे कर्तव्य ते करून. याउपरहि गोविंद गोपाळ यास लिहिलें आहे. तुम्हास सांगतील म्हणून लिहिविलें पाहिजे; व काही दारू, सिसे, बाण, याजविसीं त्येगबेरखानास ल्याहावें. लिहिवितील त्याप्रमाणें माझे पत्री लिहिले पाहिजे. त्यासारिखे तेथे बोलावे लागेल. दाहा हजार रुपये दिल्हे आहेत, यांपैकी माणसे मिळतील त्यांस कांही खर्च होतील बाकी काय लागले तरी रुो साडेसोळा हजार राहिले, तेही देतील असें आहे. जिनस खरिदी करावयाची आज्ञा जाहलीतर उतम, नाहीतर रुपये अवघे वसूल जाहलेवर हुंडी करावी कीं काय, हुंडनावळ पडेल त्याची आज्ञा पाहिजे. अरब बहुत मिळतलिसा भरवसा नाहीं. जेथवर होईल तो विचार करीतच आहे. आठा दिवसांत जमा होतील ते रवाना करून मग सोनगडास जातों. आपणाकडील पत्राचे उतर आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. जिनसाची यादी तेथील येणेप्रमाणे आहे .परंतु

लोखड खंडी	गंधक खंडी	राळ खंडी	वाकिया सुमार
२९	१०	९	२०००

परंतु किती जिनस घ्यावा ते आज्ञा करावी. मोगलास व दिवाणास पत्रे बहुमानाची ल्याहावी. पहिल्या पत्राचें उतर त्याणी दिल्हे ते सेवेसी पाठविले आहे. मोमीनखान व रेणकोपंत यासी बिघाड जाला होता. एकदोन कजिये बहुत जाहले. माणसें याची त्याची मिळोन दोन तीनसे मेली. सलूक जाला आहे. पुढे निभाव होतां दिसत नाहीं. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Govind Gopal (Kamtekar ?) writes news of the situation in Gujarat and solicits orders for the purchase of ammunition and for entertaining more men into service.*

No. 102] [*17-3-1739*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री आपा स्वामीचे सेवेसी,

विनंती. सेवेशी आज्ञाधारक गोविंद गोपाळ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा. छ १७ जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते खडकेबौरे येथें आलों, तो

वर्तमान आइकिलें की राजश्री देवजी ताकपीर कूच करून बडोदियाकडे गेले. त्यावरून परभारे फुलवडी नजीक मांडवी येथे गेलो. लष्करची गांठ पडली. पत्रें व वस्त्रें त्याची दिल्ही. तेथून समागमें नर्मदातीर बावापीराचा घाटपावेतो गेलो. तेथें दोन मुकाम जाहले. तेथें सविस्तर कितेक मजकूर त्याणी पुसिला. आज्ञेप्रमाणें सांगितलें. ऐसियास याचे येणे तो प्रस्तुत राहिलें याजकरितां राजश्री माधवराव निबाजी आपणाकडे रवाना केले आहेत. हुताशनीकरितां सोनगडास आलों. राजश्री देवजी ताकपीर याणी आज्ञा केली कीं श्रीमंत राजश्री पंतप्रधानाचे दर्शण आधी घेऊन मग आपणाकडे जाणे. याजकरितां छ मजकुरी सोनगडाहून खानदेशांत लष्करांत गेलो. तेथून श्रीमंताचें दर्शण घेऊन सेवेशी येतों. भेटीनंतर सर्व विदित होईल. शेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. राजश्री माधवराऊ हे पूर्वी श्रीमंत राजश्री रायाकडे पाठविले होते ते गृहस्थ. हे विज्ञापना. राजश्री दमाजी गायकवाड हजार राऊतनिसी बडोदियांत आहेत. वरकड अवघी फौज घेऊन राजश्री माहादाजी गोविंद कछ भुज या प्रांते गेले आहेत.

¶[*Govind Gopal (Kamtekar ?) writes to Chimaji Appa news of an expedition into Gujarat and Kathiawar, of which few details are known at present.*

No. 103] [*27-4-1739 ?*

नकल.

श्री

राजेश्री तुबाजीपंत दाजी गोसावी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखांडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो बावाजी बलकवडे रामराम विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २९ मोहरम जाणौन आपले स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. ल्याहावया कारणे यैसीजे. गंगाभागिरथी मातुश्री उमाबाई दाभाडे यांच्या लोकानी येऊन किले पद्याखालें दंगा केला. पेठेस दाखल जाहले. त्यास आमचे लागे पद्याचे होते ते आम्हाजवल आले आहेत. यैशामध्ये फौज पांच सातसे माणूस घेऊन याल तर किल्यावर सदरेस नेऊन पोहचिवितो. त्यावरून आंम्ही दाहावीस माणूस लाग्याबरोबर देऊन ते लागास चौकीस पाठविले आहे. तर आम्हाजवळ दोन अडीचसेह माणूस आहे आणि तुम्ही आपणाजवळून रो रेणोराऊ यादव आले आहेत याजबो माणूस आहे त्यातील यैसे पाचसे माणूस बरखंदाज फार करून

यैसे पाठविले पाहिजे. आक्षत्रितियेचे मुहूर्त आपले निशाण चडेल यैसा विचार आहे. तरी तुम्ही रातोरात लोक व राऊत पायेलोक पाचसेपरयेंत रातोरात पांढुरलीचे वाटेने उद्यां संध्याकाळीं पांढुरलीस येऊन पोहचे ते करणे. तेथे आम्ही चौकी ठेवितो. ते आम्हाजवल दब्यास घेऊन येतील. काम खामखा ठीक आहे. तरी आनमान न करावा. जर आनमान कराल तरी काम हांतचे जाईल यैसे समजोन आगत्य पाचसे पावलोक व येकदोन करणे असले तर व दोनिसे राऊत यैसे आगत्यरूप पाठवणे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती. उद्यां सनवारीं संध्याकाली दोनी घटिका आवसीचे रात्री पांढुरलीस बरखंदाज सामानपोस चांगले कैदेने चालत यैसे पाचसे व राऊत दोनसे यैसे पाठवणे. राऊत पांढुरलीस येक दिवस ठेऊन पावलोक दब्यास घेऊन जाऊं. मग राऊतास इशारत करू तेव्हा राऊत येऊन पोहचतील. जरूर जाणून लिहिले आसे. हे गोष्टीस अंतर न करणे. लौकर रवाना करणे हे विनंती. श्रीमंतांचा आपणांस शब्द न लागे ते गोष्टी करणे हे विनंति.

¶*Bawaji Balkavde asks Tubajipant to come to his help to withstand the attack made by the men of Umabai Dabhade.*

No. 104] [*1740?*

श्री

पुा श्रीमंताचे सेवेसी

विनंती येसीजे. उमाबाईन आडागड घेतला आणि सोनगडास वेढा घातला. जावजी दाभाड तेथे आहेंत, पुढे चालणेस लागली आहेत. मुलकचे जतीचा चवनो[१] लागला आहे. गड किलियाचाहि लागला. भलत्या गावास रोखा पाठवितात की मोगलाइपैकी सैंभर रुपये देणे. पाटील कमाविसदार बोभाट आणून रदबदल करितातीं. रुपये मारता मारता घेतातीं. उमाबाई म्हणते की आपणास ठाऊक नाही आम्ही व मल्हारपंती त्यासी बहुताप्रकारे सांगितले. ती म्हणतात की बराबरी बेत्तीस परगणे व बागलाण रायानी जप्त केली. आम्ही भलीं की कोठे ठाणे बैसविले नाही. तीन ठाणी आमची आहेत. खानदसची ठाणी उठतील तेव्हा आम्हीहि उठऊ. हा मुलूक पुढे राहात नाही. हे विज्ञाप्ति.

¶*Letter addressed to Bajirao describing the depredations started by Umabai Dabhade in the region of Khandesh.*

---

१ संवय.

No. 105] *[13-4-1740*

श्री

राजश्री चिमणाजी पंडित

गोसांवी यांसी

ॐ सलकगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें, पावोन वर्तमान अवगत जाले. नासरजंग यांसी राजश्री राव यानी स्नेहाचा विचार आविलंबिला आहे, तुम्ही त्यांजकडील ठाणी घ्यावी यैसें नाही. मोगलाईचा आमल बंद न करितां आंकोलाचें ठाणे व वणीचे ठाणे उठवणे. मोगलाईचा आमल खालसा करणे, तो राव करितील. तुम्ही मोगलाईच्या आमलासीं कजिया करावासें नाहीं म्हणून कितेक तपसिलें लिहिले. यैसीयास मोगलांसी स्नेह राखावा हाच आमचा मनोदये आहे. राजश्री बाजीराव पंडित प्रधान यानी बऱ्हाणपुरापासून खानदेश-पर्यंत ठाणी बसविली. मोगलाईकडील आमल बंद करून वसूल घेतला. आम्ही दों चौं परगणियांचा बोलीचा विचार करणे तो राजश्री मल्हारपंत याच्या विद्यमाने केला आसेल, येविशई राजश्री पंतप्रधान यांचीहि पत्रें आसतील. तुम्हाकडील ठाणी बसलीं असतां आम्हाकडील दों तीं ठाणियांचा विचार लिहिला, याजवरून आपूर्व वाटलें. माहालांचा बंदोबस्त तर ज्यांचे मोकासे आहेत त्यांस करावा लागतो. मोगलाईचा आमल खालसा ठेवणे तर धणीं ठेवितील, तूर्त ज्यांचे मोकासे आहेत त्यास बंदोबस्त केलाच पाहिजे, राज्यावर परचक्र आलिया त्यांच्या पारपत्याची तरतूद आम्हास करावी नलगे, ऐसा तों आर्थ नाहीं. आपण शब्द लाऊन लिहिलें. आपूर्व गोस्टी आहे. तुम्हाकडील ठाणी तमाम उठलीयावर आम्हाकडीलहि उठविली जातील. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ २६ मोहरम हे विनंती.

¶*This letter from Umabai Dabhade to Chimaji Appa is significant of the political and administrative confusion created by Shahu's easy going nature. Umabai Dabhade, the able wife of Senapati Khanderao Dabhade, strives to maintain her rights against the grasping policy of the Peshwas. "Do you mean," she asks the Peshwa, "that we should take no steps to repel an enemy?" The reference to the treaty of Bajirao with Nasirjung in the letter gives a clue to the date of the letter itself.*

No. 106] [21-10-1740

शाहु दप्तर रु. नं. २९ पैकीं

कीर्दीस बार छ १० साबान
सुा इहिदे आर्बेन मया अलफ.

श्री.

यादी बाईका निा दाभाडे. येविसीपत्रे.

गंगाजल निर्मल गिरजाबाई कोम त्रिंबकराव दाभाडे.

गंगाजल निर्मल ताराबाई कोम बाबूराव दाभाडे.

¶*Girijabai was Trimbakrao Dabhade's wife and Tarabai was Baburao Dabhade's wife.*

No. 107] [4-1-1751

श्री

अपत्यें तीर्थरूप राजमान्येयाविराजित राजश्री स्वामी
राजश्री स्वामी वडिलांचे शेवेसी

अपत्ये अंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की पौष वद्य चतुर्थी प्राथकालपाा प्रसंगीचे वर्तमान तर सेनापति इंडीस आहेत. अरब व हरजी घारे व सिदीचे सामान आवघे पायेदल मानूस मिलोन पंधराशेपाा फौज घरपागा व सिदी व काही काही सिलेदार मिलोन उतम मध्यम मिलोन पाचशेपाा. परंतु गाईकवाडाची वार्ता आयेकोन समाधान दिसते. परंतु चितापासून हर्षामर्ष करावा हा हेत दिसत नाही. उभयेता मिलोन येकांती विचार की हर्षामर्षात काही उतम नाही. परंतु इतका लोकिक करावा हे नवते. लोकिक त्याचा जाला की थोरास थोर समयास रक्षितात. कांहीं न्यूनपूर्ण तर कीं काही कोन्हेचे फितव्यात आसो तर हा प्रसंग पाा तो विचार तर आम्हापासून जाला नाही. ताकपीर साहित्य होते ते आले (?) शैन्यास येथे कांहीं फौज फार नाही. लोकिकवार्ता तर गाईकवाडासमागमे तोफगाडी पासा आहेत व बानाचे ऊट बावीस आहेत. दारूगाडिया पंधरावीस पावेतो आहेत व बारा हजारपावेतो फौज व पायदल दोन हजारपाा आहे. लोकवार्ता आहे. परंतु दरबारची वार्ता तर याप्रमाने नाही. दारुगोली सामान व पायेदल व फौज सरंजाम चांगला आहे हे वर्तमान दरबारी आहे. मातुश्रीकडील वर्तमान काये येते त्याप्रमाने वर्तनूक करावी हा विचार यांचा आहे. रोजमुरा

वडिलानी पाठविला व शेला व पागोटे पाठविले तें पावले. घोडीस तटास बेगमीस काही नाहीं. हिशेबहि वडिलाचे चरणापासी पाठविला आहे. दानियास बेगमी नाही. पोटाची बेगमी जाली आहे. हिशोब वडिलानी पाहोन आज्ञा केली पा. वसिला तर चरण आपले आहेत, इतर कोन्ही नाही. याविशई विनंती मान्य केली पा. उधार देत नाहीत. मागील भरणा जाला. अनमान करितात परंतु वडिलाचे आसीर्वादे करून.(?) बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. पुढेही प्रसंगी वर्तमान होईल ते शेवेसी (पाठवीन) हिशोब शेवेसी पाठविला. उतर पाहिजे हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar writes to the Peshwa news about the dissensions between Dabhade and Gaekwad. Both sides while preparing for a struggle are, the writer adds, anxious to settle their differences amicably.*

No. 108] [*28-1-1751*

श्री

श्रीमंत तीर्थरूप राजमान्ये-
याविराजित राजश्री नाना
स्वामी वडिलाचे राजश्री
भाऊ स्वामी वडिलाचे शेवेसी

आपत्ये चरणरज आंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की, माघ सुध त्रयोदसीपरियेत मुा तलेगाव कुशल. यानंतर प्रसंगीचे वर्तमान की, राजश्री सेनापति बाहेर निघ(णा)र हा निश्चये आहे. कोणे दिवसी हा करार नाही. परंतु निघणार हा निश्चये आहे. लक्ष्मण जाधव सततरुसी गेला, तो आला. सिरपाव, कडी दोन व तुरा काही वस्त्रे घेऊन आला. शेनापतीने घेतली नाहीत. सततरुसीहून जाब होता कीं, तुम्ही जैसे कळेल त्याप्रमाने येऊन पोहचने. येथे आलियावर जो सरंजाम पाा तो सिध आहे. लक्ष्मण जाधव यास उतर दिधले की, ते जैसी गडावर आहेत त्याप्रमाने आम्हीहि बसोन असावे, हे पुरवत नाही. कुटुब व मातुश्री लस्करात आहेत (आ)नी आम्ही सततरुसीस जावे, हे विहित नाही. आनी मातुश्रीनी क्रिया शपत दिधली आहे. भ्रष्ट व्हावे हे उतम नाही. मातुश्रीनी वचन केले तें आपणा(स) येकरूप अतर होत नाही. गोसावी

याजपासून घोडी घेतली त्यापैकी उतम मध्यम निव(ड) होत आहे. बसावयास नेमनूक करितात. काही बरोबर होती तेहि इंदुरीस नेली. जुली (अपूर्ण).

¶*Antaji Vishvambhar writes to the Peshwa about Dabhade's determination to move out, and further informs him of the latter's refusal to accept the presents sent from Satara.*

No. 109] [*May 1751 ?*

श्री

श्रीमंत तीर्थरूप राजमान्येयाविराजित राजश्री नाना स्वामी
राजश्री भाऊ स्वामी
वडिलाचे शेवेसी

आपल्ये चरणरज अंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की सोमवारी संध्याकाली मातुश्री आलियावर मजकूर की राजेश्री शेनापतीची भेटी जाली, मजकूर सर्व विदित केला. त्याही उतर शेनापति यानी केले की तुम्ही वडिलपनें ज्याप्रमाने आम्हास सांगाल त्याप्रमाने तिलतुल्य आपण अंतर करणार नाही. सर्वही गुजरात तुम्ही कबूल केली असती तर तुम्हा वडिलावेगले अधिक आपणास काहीही नाही. त्याहीवर मातुश्रीनी भाशन केले की श्रीमंत यानी इतका अत्यग्रह हा येक मानसावर करावा हे विहित नाही. कोन्हाचेही मिलनी नसता आम्हावर क्रोध करावा हे उतम नाही. पूर्वीहि कैलासवासी उभयेता होते त्याचे आमच विरुध बहुत प्रकारे होते. परंतु त्यानी माझे मातुश्री स्वमुखे म्हटले त्याप्रमानेच निर्वाह केला. त्यामागे यानी आमचे चालवावे आनी आव्हेर न करावा. मान रक्षावा. सर्वही गुजरात यानी द्यावी होती याप्रमाने की आम्हापासी कारभारी कोन्ही नाही. आमची अवच्छा हे जाणून आमचा आगीकार जाणून ज्याप्रमाने सर्व मुलूक मालवा त्याप्रमाने गुजरातही आपलीच म्हणून म्हातारपनी आमची गोष्ट व लौकिक रक्षूण हा प्रसंग संपादून चितास ज्याप्रमाने करणें तें करावे होते. परंतु न केले उतम केले. पूर्वीही ज्या ज्या क्रि(या)शपत जाल्या त्या आद्यापि जतन आहेत. हाली आताही केली आहे तिजला काही कदापि विकल्प करणार नाही. वचनास चुकणार नाही. याप्रमाने येकांती विचार जाला तो वडिलाचे शेवेसी. याहीवरही वृत्तांत अधिकोतर आनि लौकिकवार्ता तर अनिवार त्या वडिलास लिहिल्या नाहीत. परंतु येकांती याप्रमाने मजकूर जाला.

आपल्यास रोजमुरा पा(व)ला नाही व घोडीस व तटास व पोरगियास रोजमुरा व दानी पोटास कांहींही पावले नाही व जासुदासही रोजमुरे पावले नाही. स्वामी वडील आहेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. व आंबिकाबाई, ताकपीर काही तळेगावास आली नाहीत. मातुश्री जाणार इंदुरीस आहेत. त्याहीवर विचार कलेना हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar informs the Peshwa of Umabai's chagrin at being dispossessed of the province of Gujarat in spite of solemn oaths and promises to the contrary.*

No. 110] *[7-11-1751 ?*

श्री.

श्रीमंत तीर्थरूप याविराजित
राजश्री स्वामी वडिलाचे
शेवेसी.

आपत्ये चरणरज आताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की, पूर्वीहि मातुश्रीचा विचार शेवेसी लिहीत गेलो. मार्गेस्वर सुद १ प्रतिपदा रात्रौ सर्व मडली येकत्र होऊन व बधूजी व देवजी ताकपीर व कारकूनहि मडली येकत्र होऊन निश्चये की, मगलवारी मूल नक्षत्र सा घटकामधे यात्रेस यावे. परस्परे भेटी होऊन, कितेक कल्पविकल्प निवारण होऊन, हा निकल्प करून, यात्रेस येणार. पूर्वीपासून ममता चितापासून आहे. व राजश्री मल्हार गोविदहि आले. यात्रा करून सोमवारी दोन तीन घटका दिवस या समयास आले. शेवेसी विदित होये. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed of Umabai's intention to proceed on a pilgrimage.*

No. 111] *[1751*

श्री

श्रीमंत तीर्थरूप राजमान्ये
याविराजित राजश्री नाना
स्वामी राजश्री भाऊ स्वा-
मी वडिलाचे शेवेसी.

आपत्ये चरणरज आताजी विश्वंभर करद्वये जोडून सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की दोन तीन पत्रे वडिलाकडे आली. परंतु उत्तर पावत

नाही. रुद्राजी पोरगा आला. त्याजबरोबर उतर पाठविले तें पावले नाही. आम्हाकडील जासूद आगर आवाजी ना‍ा याजकडे उतर येत आहे तें पावते. नाहीतर उतर पावत नाही. प्रसंगीचे वर्तमान आपूर्व काही नाही. ताराबाई-कडील हुजरे आले होते. त्यास साफ येकाती उतर दिधले की, आम्ही काही पूर्वीहि कोन्हाचे प्रसंगात नाही. हालीहि आम्ही आपले उपासाने व सिबदीने हयेरान आहो. आम्हापासी पैकाहि नाही. फौज काही धरती नाही. आनी तुम्हीच आधी कर्म केले की, सनदापत्रे तुम्हीच देता, परस्परे कजिया लाविता. तर यां मजकुरास आम्ही नाही. याप्रमाने उतरे करितात. राजश्री महिपतराव कारकून ताराबाईकडील पागेवर आहे. तो आम्ही येके स्थली सेजारी राहिलो आहो. हुजरे श्रमी होऊन आपणादेखत स्वार होऊन गेले. यावयाचा मजकूर होता तो, प्राथकाली राजश्री आपाजी गणेश व बधूजी व कृष्णराव व शेनापती येक स्थली होऊन राहिला हे दिसते. येकाती मजकूर जाला तोहि पुरता शोध करून शेवेसी या मंडलीवेगले आपणास तहकीक केले पाहिजे व येका तीहि कोणे कोणे रीतीने विचार तोहि ध्यानास आणिले पा‍ा. कारभार हिमत सर्व विदित आहे. परंतु तपसिले ल्याहावे हे नाही. पुढेहि वृत होईल ते शेवेसी हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar to Nanasaheb regarding the straitened circumstances of Dabhade who was obliged to refuse any monetary help to Tarabai.*

No. 112] [*17-9-1753?*

छ १९ जिल्काद

श्रीगजानन.

राजश्री त्र्यबकराऊ विस्वनाथ गोसावि यांसी अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य

प्रति सौभाग्यादिसंपन्न अंबिकाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे. गौली याचे वाडे वडगावाजवल बहुत दिवस आहेत. त्यांस हा कालपर्येंत काडीचा उपसर्ग लागला नाही. सांप्रत रखमाजी सिवदेव यानी तुम्हाजवळ काये लबाडी केली असेल त्याजवरून सोला गाडे आवघे गवत गौली याचे भरले. त्याने तो तुम्हाजवल मनस्वीपणे सागितले. त्या गोस्टीवर तुम्ही गाडे पाठऊन घेऊन जावे उचित आहे यैसे नाही. तुमच्या विचारे तलेगावीची रयेत यासी भलत्या प्रकारे निमित्ये ठेऊन येथे राहू न पावे यैसेच तुमच्या विचारे असिले तरी तैसेच उत्तर पाठवावे त्याजप्रमाणे वर्तणूक करून. क्षुलक गोस्टीचा वारंवार बोभाट तुम्हा-

पावतो लेहावे यैसे नाही. गौळीयानी गवत काही कुरणातील कापले नाही. विकत कुणबीयापासी घेतले होते. रखमाजी सिवदेव याच्या मते यानी तेथे न राहावे यास्तव इतका उपद्राप त्याने केला आहे. तुमच्या विचारास येईल तरी ताकीद पत्र सत्वर पाठऊन देणे. बहुत काय लिहिणे ? रा. छ १८ जमादिलाखर हे विनंती.

¶*Ambikabai Dabhade, wife of Yashavantrao, writes to Trimbakrao Pethe, complaining that hay has been taken away forcibly out of her possessions.*

No. 113] *[18-6-1754*

श्री

त्रिंबकराव दाभाडे सेनाखासखेल यास सदरेस वस्त्रे दिल्ही, सन खमस खमसैन जामदारखानापैकीं छ २६ साबान

सनगे	येकूण		आख	
६९२॥	खासा			
	२३८	मंदील	१	
	१५०	दुपटा	१	
	२२४॥	झगा मिठ्याचा १		
		यैाा सनगे	२ येकूण	
	८०	तुबा किमखापी	१	
	६९२॥		५	
१६३॥।=	जावजी दाभाडे सनगे ३॥ येकून			
३८८।.	जानराव पाटणकर			
	१३६॥	मंदील		१
	११०	दुपटा		१
	११२॥	झगा मिठ्याचा		१ येकून सनगे २

(अपूर्ण)

¶*List of the robes of honour presented to Trimbakrao Dabhade, upon the death of his father Yashvantrao on 18th May 1754.*

No. 114]

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

विनंती. पिलाजी गायकवाड वेलूघाटावर रेवा उतरोन आद्यापि राहिला आहे. थोडी बहुत फौज आलीकडे आहे; परंतु त्यास कुमक राजश्री खडेरायांकडून पथके वरचेवरी येतात, हें वर्तमान तेथें आपणांस कलतें किंवा नाही हे न कले. यैस-यामधे काही खासगत पागा व पथके बरी पाठविली पाहिजे; म्हणजे कितेक काम होते. पुढे सर्व जफ्त आपला बसतो. त्याचे व इकडे कोण्हीं राहूं पावत नाही. याकरिता अतिसत्वर जे फौज योजल ते पाठविली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Gaikwad and Khanderao Dabhade are reported to the Peshwa as being about to take the offensive. The Peshwa is requested to collect his forces and send them against the pair.*

No. 115]

श्रीराम

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले. पावोन वर्तमान आवगत जालें. चांद्वड परगणा सरलष्करचा, तेथें घासदाणियांचे रोखे करून जमीदारांस भेटीस बोलाविलें, याजविशई कितेक प्रकारें आपण लिहिले. येसियास चांद्वड परगणा आमचे सरंजामाचा त्यास बोझर व सुकेणे दोन्ही गांव आमचे मोकादमीचे याज-करिता राजश्री स्वामीपासून दोन्ही गाव इनाम करून घेतले. त्यास सात वरसें तेथील येक पैसा पावत नाहीं. आम्ही गावासी कजिया करावा तर वतनी प्रसंग याजकरिता गावास तगादा न केला. ते तर विचारावर न येत. यास्तव परगणियांस उपसर्ग लागत असिल. आपण म्हणतील की साता वरषाचा मजकूर येंदाच करिता? येसियास चार वेला याजनिमित्य . परगणियास उपसर्ग लागला त्यांसही जे लेहावयाचे ते लिहितच गेलो. परंतु त्यांच्या ध्यानास न ये. त्यानी पेशजीचे दोगांवच्या येवजाचें लिगाड वारून पुढें सुरलित चालो दिल्हीया परगणियांस उपसर्ग द्यावयाचे प्रयोजन काये आहे? याजकरिता आपणही त्यास सांगोन जमीदाराचे रुजुवातीने येवज ठरावेल तो देविला पाहिजे. जे गोष्टीने दों

गावचा येवज आम्हास पाऊन पुढे सुरलीत आम्हापासून परगणियास उपद्रव न लागे आपण शब्द न ठेवीत ते गोष्टी केली पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ १९ जिल्काद हे विनंती.

¶Umabai Dabhade requests Chimaji Appa kindly to write to the Sarlashker and other Jamidars asking them not to obstruct her in collecting her dues from her inam villages in Chandwad pargana.

No. 116] [*Before 1736*

श्री

पुरवणी राजश्री राऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आजी छ मजकुरीं उमाबाई दाभाडियानीं राजश्री स्वामीस व वाडियांत पत्र लेहून पाठविलें कीं मल्हारजी होलकर व राणोजी शिंदे व आनदराऊ पवार फौजेसहवर्तमान परगणे सुलतानपूर वगैरे परगणियांत जाऊन मुलूक लुटून पैका गावगना(घेत)ला म्हणून नालीसीचीं पत्रें पाठविलीं आहेत. स्वामीस वर्तमान कळावें याकरितां लिहिलें असे. राजश्री राघोराम सबनिविस यानी वर्तमान राजश्री स्वामीजवल सांगितलें कीं राजश्री चिमाजी आपा यानीं परगणें नेवासें येथें सात हजार रुपये वसूल घेतला. राजश्री स्वामीनी उत्तर दिल्हें, जरी पैका घेतला हे गोष्ट खरी असिली तरी सात हजार रुपये आम्ही पुणे देसी वसूल घेऊं म्हणून सांगितलें. स्वामीस कलावें याकरितां लिहिलें असे. राजश्री संताजी जाधव याणी राजश्री स्वामीजवल सांगितलें कीं परगणे गाडापूर व परगणे वालुंज येथें वसूल गावगना राजश्री चिमाजी आपानी बारा हजार रुपये घेतले, म्हणून सांगितलें. तरी स्वामीकडे वसूल जालियाचें वर्तमान आलें आसिलें तर लेहून पाठविलें पाहिजे. राजश्री दादाराऊ याची ही पत्रें वरच्यावर येतात कीं राजश्री पंतप्रधान याची फौज मालवीयामध्यें पाठऊ नये. स्वामीस वर्तमान कलावें याकरितां लिहिलें असे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Bajirao is informed that complaints against him have been lodged with the king. The raiding activities of Ranoji Sindia, Holkar and Powar have given offence to Umabai. Dissatisfaction is also expressed at Chimaji Appa's activities in Pargane Newasa, Gandapur and Valunj.

No. 117] [26-9-1726 ?

पौ ११ छ सफर मुा भामनदी.

श्री

राजश्री बाजीराव पंडितप्रधान गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नेहांकित खंडेराव दाभाडे सेनापति दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिले पाहिजे विशेष. राजश्री गणपतिराऊ याचे पत्र पूर्वी आले होते कीं येक खेडीयाबद्दल आमचा बेबनाव आहे याजकरितां आम्ही आपणाकडे येतो यैसे लिहिले. त्याचा जाब येथून पाठविला कीं राजश्री प्रधानपंताची आमची भेटी होईल त्यानंतर तुमचे मनोदयानरूप होईल, याचयाची उतावली न करणे यैसे लिहिले. तथापि त्याचे चित्तात उद्विग्नता येऊन सासवडीहून विजयादशमीचे दिवसी स्वार होऊन कालीं आदित्यवारी येथें आले. भेटीनंतर केवल उदासीनतेचा प्रसंग बोलोन शफथ करितात कीं मी तेथून आलो. आता कांहीं ये स्वारीस जाणे नाहीं. यैसे बालोन येथें राहिले. सेवट निदान गोस्टी बोलिले जे जरी तुम्ही अंगीकार करीत नाहीं तर हरकोठे दुसरे जागा जाईन परंतु त्याजकडे जाणार नाहीं यैसे बोलताती. परंतु त्याचे बोलीचे काय आहे? सिपाई आहे, बोलावे लागते; ते गोष्टीचे कांहीं नाहीं. विचारे पाहतां आपण उपेक्षा करावी, एका खेडियासाठीं दिलगीर करावे यैसे नाहीं. तरी एक समाधानाचे पत्र लेहून जे गोष्टीमुळें रुसवा आहे ते मान्य करून पाठविले पाहिजे. भला माणूस; याचेविषयीं आहकार धरून टाकिली साठी घ्यावी हे आपणास विहित नव्हे. याजकरितां मुजरद पत्र लेहून वार्तिक पाठविले असेत. जाणिजे छ १० सफर. बहुत काये लिहिणे? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Khanderao Dabhade requests the Peshwa kindly to consider the case of Ganpatrao who being dissatisfied with the Peshwa on the question of a village, left his side and went to Dabhade. Khanderao requests the addressee to entertain him in his service and concede him his village, as he is a good soldier.*

No. 118] [1736?

श्री

पुरवणी श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. देहरमालेस साखरीहून भोंसलें यांनीं जमावसुद्धां जाळून किला घेतला. येक चौबुर्जी मात्र राहिली तें बलकाऊन राहिले. तों राजश्री सेनापति फौजसुद्धां निघोन गेले. मदत आली ऐसें साखरीकरांसी कळलें. तेसमयीं किल्यावरील लूट गुरें ढोरें व चिंदीचौळा करून खाले उतरोन गेले. किला आरबांकडे खाईम राहिला. मग सेनापतीनीं साखरविर मोकम केला. मोर्चेबंदी केली. येक रोज मोर्चे लागले, मग बोली लागली. गावांतून भोंसले यांनीं राजश्री दमाजी गाईकवाड याकडे अनुसंधान लाविलें कीं आम्ही भेटीस येतों. मग माधवराव निंबाजी गावांत जाऊन राजश्री राघोजी भोंसले यांस सेनापतीचे भेटीस घेऊन आले. सेनापति भोंडगावीं आहेत व राजश्री राघोजी भोंसलेही येथें आहेत. भोंसले यांनीं मुद्दा घातला कीं आरबांस किल्यावरून काडावें, आम्ही पूर्वींपासून सेवा करितों तैसी सेवा हाली करूं. त्यास सेनापति म्हणतां कीं किला कांहीं तुम्ही आड घातला म्हणून आरबांकडील दूर करीत नाहीं. भार परगणेपैकी पंचवीस गांव किल्याचे तनखियास देणें; बाकी राहील ते गाव तुम्ही खाऊन राहणें. याप्रमाणें भोसल्यासी म्हणतात. हें वर्तमान परस्परें स्वामीस विदित जाहालें असेल. आरब तों फारच सेर जाहाले आहेत. आज ह्या दरबारीं आरबांखेरीज काहीं नाहीं. दुसरें पूर्वी हावजी राकसा याणें चैपाले यांसीं राकषागड बसविला होता तों सांप्रत वीस पंचवीस वर्षे वोसाड पडला आहे. त्यास प्रस्तुत सिद्दी याकुद आरब यास सनद राजश्री सैनापतीनीं करून दिल्ही, कीं तुम्ही किलियाची वस्ती करा म्हणून सांगितलें. हा विचार मातुश्रीस ठाऊक न होता केला आहे. हलद्रवणचि घाटमाथा किला आहे. नवापूर, नंदरबार, सुलतानपूर सोनगड देखील सुरत आठाविशीपर्यंत कबजाखाले माहाल येतात, म्हणून सनंदा करून दिल्या आहेत. प्रस्तुत पजन्यकालीं वसवितलि कीं न वसवितील हें कळतं नाहीं. नवापूरचे नजीक किला आहे. किल्याखाली सुरतेचा रस्ता बराणपूर व आवरंगाबाद मार्ग लागला आहे. लक्ष रुपये जकातीचे येतील ऐसी जागा आहे. तीन आंगें नाइलाज, येक आंग मात्र लगाव आहे. पाणी जिवंत आहे. राकसानें गडगा मात्र घातला आहे. देहरमालेपासून सोळा कोंसावर आंतेर आहे. दोन किल्यामध्यें संपूर्ण बागलाण देश व बुंधाटी अशा जाग्याची वस्ती जाली म्हणजे संपूर्ण मुलूक खराब, च्यार पांचशें राऊत राहत ऐसा जागा आहे. असलें

वर्तमान सेवेसी लिहिलें आहे. त्या प्रांतीचा ग्रहस्त म्हणतो कीं स्वामीचें नांव करून गड बसवितो. तों त्यास आम्ही सांगितलें कीं आम्ही श्रीमंतास लिहितों. तेथून जाब येईल त्यासारिखा विचार सांगो म्हणून सांगितलें. याची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. आढळे वर्तमान सेवेसी श्रुत होये हें विज्ञापि.

¶*Peshwa is informed of the capture of the fort of Dehermal and the subsequent settlement of the dispute about it between Raghuji and Dabhade.*

No. 119]

श्रीपांडुरंग

राजश्री चिमणाजी पंडित

आपा गोसावी यांस

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो दमाजी गायकवाड समसेर बहाद्दर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर कृपा करून सांभाळ पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाला. राजश्री दुरजनसिंग मांडवीकर याजविसीं गतवर्षापासून दोन च्यार पत्रें पाठविलीं व राजश्री आयाबा बरोबर समक्षही सांगोन पाठविलें कीं यांचें स्थल स्वाधीन करणें; पूर्ववत जागा सिध करून कुटुंबासह-वर्तमान राहतील येसे आपले मानस ते पत्रावरून मशारनुलेचे सांगितल्यावरून कलों आलें. यैसियासी न्याये अन्याये येथाविध पाहिजे त्याणें आपणांस पुसोन वर्तणूक करावी तेणेकरून मनोरथ सिधीस जातील यैसा प्रसंग विश्वतोमुखीं असतां आम्हांस अयुक्त आज्ञा करावी यैसें नाहीं. मांडवीकराचे तीर्थरूप वर्तमान असतां सौरक्षण करावयासी अंतर जालें नाहीं. त्या स्थलचे गिरासे मात्र होते. सुरत माहालात जुजवी पाच सात हजार गिरास होता. ताम्राचें प्राबल्य विशेष होतें. उभयेतांचा स्नेह जालीयाउपरी ताम्राचेही विलयास गेले. याचे कृपेमुलें ऊर्जित विशेषात्कारें जाले. मग दुर्जनसिंग यास कुबुध निर्माण होऊन वर्तणूक आरंभिली तन्मुलें पराभव पावले हे गोष्ट येथार्थ आहे नाहीं परस्परें सोध करावा. याउपरी त्याचें स्थल स्वाधीन केलियानें परिणाम कसा होतो ? तिगस्ता त्याणें पेटकर दरम्यान घालून तहनामें लिहून दिल्हे आहेत त्याप्रमाणें आम्हीं मान्य केलें. असो; वतनदार आहे, येकादी त्याणें कारारमदारप्रमाणें कबल केले असते. परंतु आपल्या आश्रामुलें ते गोष्ट टाकून हा विचार अविलंबिला. तरी मांडवीस कोट बांधून त्याणें राहावें तेव्हां पस्ट भाषणें नलगे. आम्हास आपली योजना करणे

लागेल. आपण पत्रीं आज्ञा करितात कीं त्याजपासून अंतर पडिलें तरी आम्हीं. दरम्यान. तरी आम्हांस आपण खावंद आहे कीं नाहीं? आम्हांकडील दरम्यानगत साहेबीं करून त्यास हातीं द्यावें, कबिले त्याणी गावावर आणून ठेवावे, त्यास आम्हांकडून साहेब दरम्यान जालियावर अंतर पडेल कीं काय हें ध्यानास आणावें. दुरजनसिंगाचें आगत्य धरून आम्हांसारखे सेवक लोक याचे मनोरथ न रक्षावे यैसें नाहीं. ते सनिध राहिले म्हणून कार्याचें आम्हीं दूर म्हणून अकार्याचें नाहीं. आम्हां लोकांचे मनोरथ सेवटास नेऊन सेवा आम्हांयोग्य घ्यावी. उमेदीने करून. सारांश आमचा विचार या प्रकारचा आहे. याउपरी आज्ञा प्रमाण हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*The whole letter is in one hand. Damaji Gaikwad complains to Chimaji Appa against the latter's interference in the affair of the Thakor of Mandwi.*

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१३

मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश

[किंमत— १० आणे किंवा १ शिलिंग १ पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

BAJIRAO'S ENTRY INTO MALWA AND BUNDELKHAND, 1721-1730.

The letters collected in this section will help the student to determine definitely some of Bajirao's movements and activities in Malwa, a subject which is still more or less vague. One of these letters mentions the help-mates of Bajirao in his northern conquests. Another mentions the chagrin of the Emperor upon learning of the capture of Dhar by the Marathas, Dhar being the key of Northern India. But evidently Bajirao could not push on his further conquests in 1724 as the return of the Nizam required his immediate presence in the South. The next two years, 1725-27, were spent in the Carnatic expedition and in facing other difficulties, created by the Nizam. Elaborate preparations were made after the Dussera of 1727 and large Maratha forces under commanders who were destined later to make a great name for themselves crossed the Nerbudda to check-mate the Nizam in Malwa. As the latter however made a sudden swoop southwards and threatened Poona, Bajirao left his main army to harass the northern borders of the Nerbudda, swerved suddenly to the south, and encountered the Nizam on the field of Palkhed not far from Aurangabad. The usual guerilla tactics did not avail the Marathas much, the Nizam being only arrested in his progress and compelled to accede to the two Maratha claims on the six subhas of the south agreed to previously by the Emperor in 1719. To gain time for more mature opposition he for some years continued a subtle and diplomatic campaign against Shahu.

The year 1728 was an Annus Mirabilis for the Maratha arms. While Bajirao was surrounding the Nizam in the south, some of his lieutenants in Malwa, acting on information received, planned a sudden coup. Not a moment was wasted; mobilizing a strong army at Satara at the end of the monsoon both Bajirao and Chimaji took up the command of the expedition and proceeded, the former through Berar, Nagpur and the Central Province and the latter by the Western route through Khandesh and Nemad keeping full contact with each other. Chimaji's movements proved wonderfully quick. Having left Poona towards the end of October, he met Girdhar Bahadur, the Subha of Malwa, near Amzera and killed him in a bloodly encounter in which both parties fought heroically. Within less than a month Raja Girdhar's cousin and successor, the great Daya Bahadur, was overcome by Chimaji and put to death. These achievements at once struck terror in the heart of the Emperor and his government, convincing them that the Marathas had to be reckoned with. Bajirao at the same time proceeded by the Eastern route through Mandla into Bundelkhand where the Bundelas whole-heartedly welcomed him. The Bundelas, who had been carrying on a ceaseless struggle against the Empire, had found themselves hemmed on all sides by the armies of Mahmudkhan Bangash, the famous Rohilla commander, and sorely needed help. Jaitpur, the stronghold of the Bundelas, which had surrendered to the Rohilla general, was besieged


jointly by the Marathas and the Bundelas and captured in April 1729. Mahmudkhan's army was completely disorganized, and retreated from Bundelkhand.

Thus within less than six months the Peshwa and his brother Chimaji pushed on practically to the banks of the Chambal and the Jumna threatening Delhi itself. It seems that Chimaji returned to the Deccan but Bajirao remained behind consolidating his conquests by personal influence and diplomacy. He cultivated amicable relations with Sawai Jaysing and respected the honoured heritage of the Rana of Udepur. But the hostile activities of Abhaysing of Marwar brought upon him the crushing hand of the conqueror. Next year Chimaji returned to Malwa and assuaged the feelings of the old Chhatrasal who had sought Maratha protection. These achievements not only established the reputation of the young Peshwa and his lieutenants on a sure foundation but replenished the coffers of the king at Satara convincing him that in any emergency the Peshwa and his brother could be safely relied upon.

These papers are important for another reason also. They clear up much of the haziness that hangs about the relations of the Marathas with the Empire in the first quarter of the 18th century. The details about Daya Bahadur, Girdhar Bahadur, Mahmudkhan Bangash and Raja Chhatrasal are for the first time established on an undisputable basis of time and place. It was up to this time believed that Raja Girdhar met his doom on the field of Sarangpur which was probably his base of operations. But the action in which he lost his life was fought at Amzera in the vicinity of Mandogad, while Daya Bahadur shared the same fate on that very field, although previously he was supposed to have fallen at Tirla which is not far away. The defeat of Bangash, which relieved the Bundela Raja Chhatrasal, is now definitely established to have taken place in the summer of 1729.

But the whole affair is not after all so simple as it appears. Raghuji Bhonsle and some of his colleagues are shown in these papers to be carrying their own plans independently of the Peshwa and evidently acting a part in these proceedings which requires to be further elucidated by fresh materials.

No. 43


INAM COMMISSION
A

Facsimile of the handwriting of Chimnaji Damodar Rajadnya

No. 1] [1723 ?

श्री

विनंती उपरी. आपण चिठी पाठविली की कूचमुकामाचा विचार लेहून पाठवणे. यैसियास रात्रौ रा बाबूरायासभागमे सांगोन पाठविले ते उतम आहे. माघील कामकाज, वोलों[1] मातबर आहे (त) त्याजवरींच आहे. मोहनोंवरी[2] जावे, त्याजवरी दबाव देऊन तेथील कामकाज होणे ते होऊन येईल. माघीलहि वसूल येईल, तोंपावतो तेथेच मुकाम करावा. येथे पाणीहि नाहीं. पुढे पाणी आहे. अक्षत्रितीयेपरियेत मुकाम पडला तरी उतम आहे. कदाचित मुकाम करावयाचा विचार जाहला तरी आम्ही कूच करून गोरखोजी पाटील याचे ढोलेपुढे[3] जाऊन राहून. हे विनंती. उतर पाठविले पाहिजे हे विनंती.

¶*This appears to be a reply to Bajirao's or Chimaji Appa's query how to co-ordinate the movements of troops.*

No. 2] [28-3-1724 ?

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यांचे सेवेसी

ꣻ श्रीमंत प्रौढप्रतापदिनकर खंडेस्वरी सदायेशवत राजमान्ये श्नो कंठाजी कदमराऊ दडंवत विनती. येथील क्षेम ताा छ १२ रजब मुकाम नर्मदातीर येथास्तित आसे विशश. गोसावियानी सेंधवाच्या मुकामीहून पत्रे पाठविली, ते आजी शनवारी प्राथकाली कुकसीच्या मुकामावर पावली. ते क्षणीच कूच करून नर्मदा उतरोन अलीकडे राहिलो. आजी पूर्णिमा, याजकरिता येथे मुकाम केला आहे. यावरी गोसावियाची आज्ञा येईल, त्याप्रमाणे वर्तनूक करून.

---

१ ओलीस घेतलेलीं मनुष्यें.

२ अलीमोहन = छोटा उदेपुर, बडोद्याचे पू. ४० मैल.

३ ढाल = निशाण. प्रत्येक सरदाराचे निरनिराळें निशाण असें. येथें भावार्थ गोरखोजी पाटलाच्या पथकाचा तळ पडला आहे तेथें जाऊं.

विदित जाले पाहिजे. फौज तयार करून छेबिनियांस[१] बडवाणीभोवते पाठवितो. बहुत काये लिहिणे. कृपा वृधीते पावीत गेले पाहिजे.

प्राथकाली गणेशपंत सेवेसी पाठविले होते ते पावले असतील.

मोर्तब सुद.

० श्री ~
मार्तंड चरणी दृढभाव
कमांजी सुत कंठाजी
कदमराव

¶*Kanthaji Kadam to Bajirao, informing the latter of his whereabouts, and requesting further orders.*

No. 3] [*9-5-1724 ?*

श्री

राजेश्री पंतप्रधान

गोसावियाचे सेवेसी

ॐ श्रीमत् प्रौढप्रतापादिनकर खडेस्वरी सदायेशवत राजमान्य श्री कंठाजी कदमराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशश. आपली आज्ञापत्रे आली की, नर्मदातीरी गांगली धरमपूरचे सुमारे भेटीस येणे. त्याजवरून यावयास विलंब नाही. आम्हास सनिध आहे. गोसावियाचा मुकाम कोणे स्थली आहे, तो कलत नाही. यास्तव पूर्वी राजश्री गंगाधरजी जमेनीस सेवेसी पाठविले आहेत. सांप्रत हरकारे व जासूदहि पाठविले आहेत. तरी कोणे ठिकाणी मुकाम आहे, आम्ही कोठे यावे, ते आज्ञा केली पाहिजे. आम्ही आलीस[२] आहो. पवार व पिलाजी गायेकवाड मोहनापलीकडे येका मजलीवर आहेत. गोसावियाची पत्रे आलियावर, आम्ही कूच करून गांगली धरमपुरीच्या रोखे यावे, तरी आपला मुकाम कोठे आहे, हे तहकीक[३] वर्तमान नाही, याकरिता सेवेसी लिहिले आहे. आज्ञापत्रे ये (ती) ल

[येथें शिक्का] त्याप्रमाणे वर्तणूक करून. विदित जाले * * उजणीहूण कासीद आला. त्यास नवाब (नि) जामनमुल्क यांचे वर्तमान उजणीपलीकडे दो मजलीवर आले, म्हणऊन तहकीक वर्तमान आहे. मागून

---

१ सैन्याभोंवतालचा रात्रपाहरा.

२ अलीमोहन.

* शिक्का अस्पष्ट आहे.

३ पक्कें, नक्की.

नवाब हैदरकुलीखान याचीहि फौज येत आहे, म्हणऊन तहकीक वर्तमान आले. रोहिल्यांची[1] फौज नवलाई बदनुरांवर उजणीआलीकडे दो मजलीवर आहे. हे वर्तमान गोसावियांस कलावे, म्हणऊन लिहिले असे. बहुत काये लिहिणे. कृपा वृधीते पावीत गेले पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Kanthaji Kadamrao to Bajirao, informing the latter of the writer's movements and of those of other Sardars and the Nizam. Obviously Kanthaji and Bajirao are not far from each other. Bajirao from the itinerary printed by Wad crossed the Nerbudda about 9th May 1724.*

No. 4] [पो *3-9-1724 ?*

पो छ २९ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. धारेचा किला घेतला म्हणोन पृथ्वीपती सक्रोध होऊन खानदौराचे पुत्र समसामुद्दौलास व अजमखान यांसी पांच हजार रुपये रोज करून व सवाईजीस सात हजार रुपये रोज द्यावेंसा करार करून आज्ञा केली कीं तुम्ही उभयेतां गनीमास तंबी करून चमेल उतरों न देणें. दिल्लीच्या बाहेर समसामुद्दौलानीं डेरे केले, तेहि सत्वरींच सवाईजीस सामील होणार. सेवेसी श्रुत व्हावें म्हणून लिहिलें असें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे. हें विज्ञाप्ति.

¶*The Peshwa is informed (probably by Mahadeo Hingne from Delhi) of the Emperor's chagrin on learning that the fortress of Dhar had been captured by the Marathas. The Emperor thereupon ordered Sham Sam-ud-Daula and Jaysing to oppose the Marathas and prevent them from crossing the Chambal.*

---

[1] बंगश ?

No. 5] [*4-3-1726*

(पत्र शाहू दप्तर रु. नं. १३ पंतप्रधान पुडकें.)

सुा सीत

राजमंडळ

छ १० रजब. राजश्री केसो महादेव दिाा राा पंतप्रधान यासी पत्र जे. तुम्ही विनंतीपत्र पाठविलें प्रविष्ट जाहालें. राा प्रधानपंतीं आपणास माळवेयांत पाठविलें, परंतु गिरधर बहादर सरदेशमुखी व चौथाईचा अंमल चालों देत नाहीं येविशीं त्यांनीं स्वामीस लिहिलें आहे. अंमल चालों देणें म्हणून त्यास लिहिलें आहे. याउपरी अंमल चालवितील. पत्र १

¶Shahu's letter to Keso Mahadeo with reference to Girdhar Bahadur's interference with the collection of Maratha dues. The letter proves that Girdhar Bahadur was not killed before this time.

No. 6] [*29-3-1726*

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे

शेवेसी

पोष्ये केशो माहादेऊ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चैत्र शुध सप्तमी इंदुवासर मुाा चाचेरा प्रांत खिचीवाडा स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे विषेष. स्वामीपासून राा नारोपंत आले. यानी वर्तमान सागितलें. पत्रें पाठविली ते पावलीं. स्वामीचे आज्ञेवरून राजश्री दयाबाहादुराची गाठी तोडून येक्यामते आवघेजण निघालो. स्वामीकडे यावे हा विचार केला होता. (त्या उपरी) * * येऊन पकारपूर्वक येकत्रता जाले. राजश्री कृष्णाजीपंत येकत्र होऊन, विचार केला की, बुंदीकोट्याकडे जावे. च्यार दिवस पोट भरावें. हा निश्चये करून या प्रांते आले. येथून बुधीकोट्याकडे * * * * * * अतिशय केला की, राजश्री तात्या स्वामीकडे जाऊ. परंतु कोणाच्या चितास न आले. राजश्री रघोजी भोसले व आम्ही येकत्र होतो. त्याच्या चितांतील भावार्थ कळो आला. येदंनिमित्य आम्ही विभक्त जालो. लोक आम्ही कर्जेवामें करून ठेविले होते ते त्याकडे राहिले. आम्हापासी थोडेबहुत आहेत. जाले वर्तमान स्वामीस श्रुत होवे

म्हणोन शेवेसी लिा आहे. भेटीनंतर सकल वृत निवेदन होईल. दोस्तमहमद याच्या वार्तिकोबराबर[1] पत्रे स्वामीकडील आली, परंतु आम्हास आपलें पत्र आलें नाही. आम्ही स्वामीचे पदरीचे आहो. स्थापित आहो. पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Keso Mahadeo to Ambajipant Tatya giving him news from the North.*

No. 7] [*29-3-1726*

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे शेवेसी पोष्यें नारो त्रिमल सां नमस्कार विनंती. ताा चैत्र शुध सप्तमी स्वामीचे कृपादस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालो, ते मजल दरमजल सुंदरसीच्या मुकामी लस्करात आलो. यासी पत्रें दिल्ही. वर्तमान सांगितले. स्वामीकडे यावे हा निस्चय करून राा दयाबाहादुरापासून तजविजेने आवघेजण निघोन गाठी तोडिली. पुढें विचार सारेजणी केला की बुधीकोष्याकडे जावे. हा मनसबा करून त्या प्रांतास चालिले आहेत. आम्ही कितेक गोस्टी विचाराच्या सांगितल्या. परंतु येथे भर आणिकच! राजश्री केशोपंत व राा रघोजी भोसले विभक्त जाले. सारे लोक त्याबराबर राहिले आहेत. दाहा पाच फुंट[2] सिलेदार याजबराबर आहेत. राजश्री राणोजी भोसल्याचे पाठीमागे राहिले आहेत. राा केशोपंताचा मामला आफ्तंतर[3] पडला. भेटीनंतर सकल वर्तमाम निवेदन होईल. राा केशोपंतानी पत्र लिाा आहे त्यावरून श्रृत होईल. बहुत काये लिहिणे ? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Naro Trimal to Ambaji Purandare, giving news of an expedition against Doya Bahadur.*

No. 8] [*About 16-6-1726*

श्री

राजश्री अंबाजीपंत गोसावी यांसी

सकलगुणालकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नेहांकित रघोजी भोसले दंडवत विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष.

---

१ जासुदाबरोबर. २ फुट = फिरकोळ.

३ अफतादार = बेवारसी.

राजश्री नारोपंताबरोबरी पत्र पाठविलें तें उतम समयी दयाबाहादुर यांचे लस्करांत प्रविष्ट होऊन लेखनार्थे परम सतोष जाहला. तेच समयीं तीर्थरूप राजश्री राणोजी बावाचे येथें आम्ही जाऊन राजश्री कृष्णाजी हरी यांस बलाऊन आणून मथितार्थ आरंभिला. या उभयतांनी व राजश्री सयाजी गुजर व राजश्री दतोपंत याणी संमत दिधलें कीं येथून फुटोन विभक्त होऊन येक मजल माघारे सरोन राहावे आणि तेथून येक भला माणूस पुढे मार्गस्त करून मागून कूच दरकूच जाऊन सामील व्हावे यैसा निश्चये केला. त्यावरून त्यासमागमेच आम्हीहि बहादुराचा निरोप घेऊन माघारे सरोन येक मज (ल) (गेलो). दुसरे रोज आणिकहि येक मजल जाऊन तेथून मागे उलटोन जाऊन म्हणून करार केला आणि दुसरें मजलीस गेलियावरी यां चहू वर्गानी शकटभेद[१] करून आम्हाकडून केशो माहादेऊ यांस फोडून नेऊन कुली लस्करचे लोकांसहि फोडून नेलें आणि कूच करून चालिलें. तेव्हा थोडे बहुत * * * * * * * * ले त्यांस (आ) * * * * * चा विचा(रास) आणितां कोण्ही तन[२] न देत. अतिशये करून चालावे तरी समागमे परिवार. मार्गाचा निभाव जाहाला पाहिजे. यैसी अडचण. त्याहीमधे लोकांचे अंगेजणी[३] वगैरे हरयेक विचार करावा. त्यास हे * * * लोक यांस इजतीचा[४] नगना[५](मोशी) (नाहीं). आमची तों तारांबल याणी इमान देऊन केली. यैसी अडचण चहूकडून जाहली. तेव्हां गोसावियांकडे यावयाची मसलत मोडली. आपला शब्द लागेल यास्तव हे वर्तमान कलावे म्हणून मुजरत वार्तिक सिध करून सूचनार्थ हे पत्र लिहिले असे. प्रस्तुत दोन महिने येणे राहिले. त्याहीमधे गोसावियांचे आगमन संनिध जाहलिया तेच क्षणी पांचपंचविसानसी येऊन सामील होऊन. नाही तरी दोन महिनियाने रुसिपर्वतास खामखा येतो. हरयेकविसी भरवसा आपलाच आहे. या प्रसंगी भेटी होती तरी आम्ही आपले कुवतीमाफीक[६] सेवा करून. राजश्री रायापाशी आमचा मजरा[७] होता, तो योग घडोन न आला. आम्ही यावयाची

---

१ कारस्तानी. २ तन देणे = छाती करणें.

३ पराक्रम. भावार्थ असा कीं, या अडचणींतच शिपायांना, जीव लावून लढण्याकरतां बक्षिसें कबूल करावीं लागतात तीहि खर्च पडतो.

४ व ५ अब्रूची, नांवलौकिकाची चाड नाहीं व ईर्षा नाहीं.

६ यथाशक्ति. ७ मुजरा.

कोसीसं[1] बहुतच केली परंतु घडोन न आले. ईस्वरगतीस येत्न नाही. येविसी बहुत काये लिहिणे. हर घडीस कागदीपत्री सांभाळ करीत असिले पाहिजे. कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

¶Raghuji Bhonsle to Ambajipant, explaining to him how in consultation with his Sardars he divided his forces into four divisions and proceeded in four different directions. Further he expresses his regret at his inability to join the Peshwa.

No. 9] [*16-6-1726 ?*

श्रीभार्गवराम

श्रीमंत् राजश्री पंतप्रधान
स्वामींचे शेवेसी

विनंती. सेवक कृष्णाजी हरी सां नमस्कार विनंती. येथील कुशल स्वामींचे कृपादृष्टीकरून ताा जेष्ट वद्य १३ पर्येंत मुाा सिनर येथास्थित असे विशेष. अंताजी सिवदेऊ याजबराबरी आज्ञापत्र आलें त्याजवरून फौज ठेऊन केसो माहादेऊ यास वराडप्रांते सामील जालों. केसो माहादेऊ व त्र्यंबक गंगाधर व जनाजी भोसले या त्रिवर्गांच्या भेटी जाल्या. त्यास केसो माहादेऊ याने रघोजी भोसले उभे केले कीं यांचे नावें सिकारोखा करावा. आंम्ही आनमान केला की दरबारीहून जे आज्ञा आहे तेणेंप्रमाणें करणे. ते त्याच्या विचारास न ये. आति आग्रह कीं रघोजी भोसले यांचाच सिकारोखा करावा. अत्याग्रह देखोन व स्वामी शब्द लावितील म्हणोन मान्य करावे लागलें. वराड प्रांतीहून कूच करून खांडवे प्रांतें गेलों. त्या प्रांते दोन च्यार मुकाम जाले. कर्णाजी पाटील कोलादितकर नामी मातबर माणूस होता त्यास इमानप्रमाण देऊन लस्करांत आणिला. सिरसुदकर निंबाजी पाटील याच्या बोलें मध्यानरात्री केसो माहादेऊ, रघोजी भोसले याणी सिरछेद केला! या कार्यानिमित्य निंबाजी पाटिलापासून मबलग रुपये घेतले. या नष्टाईवरून त्याचा आपला बेबनाव जाला. राजश्री त्र्यंबक गंगाधर जनाजी भोसले आम्ही येकत्र होऊन राजश्री अंबाजीपंत तात्या यास सामील व्हावयास चालिलो. आकबरपुरावर नर्मदा उतरतीरी आम्ही राहिलों. दक्षणतीरी केसो माहादेऊ रघोजी भोसले राहिले. आम्हावर चालोन

---

१ प्रयत्न.

आले. नदीमध्ये युध्यप्रसग आरंभिला. त्याणी नावेत जेजाला घालून फौज आमची उधलून काढिली. आमच्या तलपावेतो रघोजी येऊन पोहचला. स्वामीचे पुण्य आमचे पदरी समर्थ होतें. दाहापांचानसीच जे करावयाची ते (शर्थ किंवा कस्त) करून पराभवातें पाविले. नाहीतरी केसो माहादेऊ याणें बरेंच केलें होतें. दुसरे दिवसी रा फिरंगोजी सेलके व मानाजी वाघ व बहिरोपंत धायेगुडे बकानेरी होते ते फौजेनसी आम्हापासी आले. त्यांस नर्मदा उतरविले. मध्यस्त पडोन समजावीस करू लागले. परंतु कोण्या प्रकारें निकालावर न येत. मग फिरंगोजी सेलके, मानाजी वाघ याणी आम्हास आज्ञा दिधली कीं, तुमच्या विचारास येईल तिकडे तुम्ही जाणें, त्याच्या विचारास येईल तिकडे ते जातील. स्वामीच्या सनदापत्रा केसो माहादेऊ याजपासी होत्या त्या आम्हापासी न देत. आंम्ही मांडोगडचा घाट चढोन वरते गेलों. सवेच हेहि घाट चढोन वरते आलें. इंदुरांत फितूर केला. राजश्री सवाई संताजी भोसले खालते देवास प्रांते आले त्यास सामील होऊन आम्हास गाठावे येैसा इत्यर्थ केला. कुसाजी गणेश राजश्री पिलाजी जाधवराऊ यांकडील इदूरचा कमाविसदार, आम्ही रा सवाई संताजी भोसले यांजकडे पाठविला होता. त्याचे लिहिले आले कीं उभयेताची फौज तुम्हावर येते तुम्ही लांब करणे. त्यावरून कूच करून नवलाई प्रांतें आलो. तेथून मजल दरमजल राजश्री अंबाजीपंत तात्याकडे जावें, याचा शह टालोन जावे याजकरितां धारेच्या किलेदारासी सख्य संपादून आठ रोज किलेनजीक राहिलो. तों इतकियात केसो माहादेऊ, रघोजी भोसले, सवाई संताजी भोसले यांजपासून फुटोन दयाबहादुरास सामील जाले. त्यास दयाबहादुराचे हरोले[1] होऊन राजश्री सवाई संताजी भोसले याजवर चालोन आले. रा सवाई संताजी भोसले धारेवर आम्हापासी येऊन गला पडोन सामील करून घेतलें कीं तुम्ही आंम्ही येकत्र होऊन स्वामीकार्ये करून च्यार दिवस मुलुकगिरी करून येैसा आति आग्रहें करून घेऊन चालिले. बदनावर नवलाई प्रांते आलो, सवेच पाठीवर दयाबहादूर आला.. अंतर सा कोसाचे उरले. झाडून जावे, लांब करावे, तरी भोसले यांचे बुनगे बहुत. निभाव न होये यास्तव त्यांजकडे भले माणूस पाठऊन सख्य संपादून च्यार दिवस सोहबत[2] घ्यावी येैसे केलें. दयाबाहादुराची आमची भेटी जालियावर मौजे जाब प्रा इंदूर येथे येक मास वेढा होता तेथील निर्गम करून, शाहाजापूर सारंगपूरप्रांते नदीवर हुताशनी केली. त्यास राजश्री अंबाजीपंत तात्याचे वर्तमान आलें कीं, मंदसोरावर आले. म्हणौन राजश्री जनाजी भोसले व रंगो विश्वनाथ पाठविले. रा जनाजी भोसले तेथेच राहिले.

१ आघाडी. २ सोबत.

रंगोपंत फिरोन आले. साकल्य वर्तमान सांगितले. त्यावरून दयाबाहादुरापासून फुटोन लस्करास सामील व्हावे हा विचार करून निघालो. त्यास कलो न देतां ग्रहस्तानी बहादुराची बहीरबुनगा[1] लुटिली. आम्हासी शफत केला कीं, राजश्री आंबाजीपंताकडे जातों. मजल दरमजल पुढें बुंदीकोट्याच्या रोखे चालिले. आम्हास फुटतां न ये यैसे वर्तमान जालें. बुंदीकोट्याकडे गेलों तिकडे रुपया मिलाला नाही. भोसले यांचे लस्कर अनिवार. रुपया पैदा होऊ ने दीत. पर्जिन्यकाल समीप आला. चहूकडून मोगलाच्या फौजा पाठीवर आल्या म्हणौन कूच दरकूच करून दिढा महिन्या वराड प्रांतें दाखल जालों. कोठे रुपया मिलाला नाही. सिबंदीचा गवगवा बहुत जाला तो कोये[2] म्हणून ल्याहावा? बरखंदाजाचा व सिपाई लोकाचा अतिशये गवगवा जाला. घरपागेची घोडीपिढी देऊन कटकटा वारल्या. पागेची घोडी वारली. फौजेस नालबंदीबदल पर्जिन्यकाली पंधरा हजार रुपये कर्ज काढून नालबंदीस दिल्हे त्याचा येक रुपया उगवला नाही. ते कर्जे जटाधारियांची[3] त्याची धरणी येऊन बैसलीच आहे. हा श्रमाचा परिहार[4] कोठवर ल्याहावा? केसो माहादेऊ याने बरेच केलें. पूर्वीहि कर्जदार होतो, हालीहि कर्जदार केलें. मालवें प्रांते कोठे रुपया मिळाला नाही. आगर पलीकडेहि मिला[ला] नाही. यैसी तवाई[5] जाली. बरें; सर्वहि उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री सवाई संताजी भोसले यास कितेक स्वामीचे होतेचे [हातेचे?] इमानप्रमाण देऊन दर्शनास आणिले. देऊलगावीहून ते स्वामीकडे आले. आम्ही सिंनरास आलों. निमित्य कीं समा(ग)मे बरखंदाज व कर्जदार यैशा कटकटा बहु(त), याकरितां याच्या समजाविशी करून वाटे ला(वावे), (आ)णि आम्ही स्वामीच्या दर्शनास यावे, (या)करिता इकडे येणे लागलें. राजश्री सवाई संताजी भोसले याजसमागमे केसो माहादेऊ आला आहे. त्यास कितेक लबाडी करितील. याकरितां शेवेसी विनंती लिहिली आहे. आम्ही आमावाशा जालियावरी येका दो रोजा मोहर्त आहे त्या मोहर्तेकरून स्वार होऊन भेटीस येतो. कितेक वर्तमान राजश्री जनाजी भोसले याणी सेवेसी निवेदन केलेच आसेल. आपणहि सत्वरीच येऊन पोहचतो. विदित जाले पाहिजे. सेवक पुरातन पदरीचे आहो. आमचे हाते सेवा घेऊन उर्जित करणार आम्हास स्वामीवाचून दुसरा कोण आहे? 'सुटले[6] केश पाठीस शरण.' विदित होये हे विज्ञाप्ति.

---

१ बुणुगबाजार, बाजारबुणगे.
२ किती
३ गोसावी सावकारांची.
४ विस्तार.
५ विपत्ति, दुर्दशा.
६ अनन्यशरण.

श्रीमंत राजश्री पंत आपा स्वामीचे शेवेसी सां नमस्कार विनंती. राजश्री पंतप्रधान स्वामीस पत्र लिहिले आहे त्यावरून विदित होईल. आपणहि सत्वरीच दर्शनास येतों. तरी आभिमान धरून सर्वस्वें आमचे ऊर्जित केलें पाहिजे. विशेष काये लिहिणे. आम्ही पदरीचे सेवक, कुटुंबी आहो. आमचे ऊर्जित करून सेवा घ्यावी (हे) स्वामीस उचित आहे. हे विज्ञप्ति.

¶*The writer Krishnaji Hari sends the Peshwa an account of his expedition into Malwa. He says he joined Keso Mahadeo's forces who involved him in all sorts of quarrels with Raghuji Bhonsle. He was then pursued into Malwa where Keso Mahadeo abandoning all scruples went over to Daya Bahadur, the Mogul Subedar, and threatened the Maratha army. Finding his position assailed Krishnaji Hari had the wisdom to strike an alliance with Daya Bahadur. He left Daya Bahadur's camp when news reached him that Ambajipant (Bajirao's general) was in the vicinity.*

No. 10] [*17-8-1728*

श्री

श्रीसकलगुणालंकरण आखंडित-
लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
बाजीराव पंडित प्रधान व ताा रा
चिमाजीपंत आपा स्वामी गोसावियासी,

पोष्ये दादोराव भीमसेन कृतानेक नमस्कार विनती उपरी. येथील कुशल स्रावण वद्य अस्टमी जाणऊन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपणाकडील वृत बहुत दिवस कळत नाही, तरी सदैव पत्री परामृश करीत गेले पाहिजे. सला जालियाच वर्तमान ऐकोन दोनी कासीद जोडी पाठविली त्यास च्यार महिने जाहाले, अद्यापि उतर न आले. पावले किंवा न पावले हे न कळ. येथील वृ[त्त] तरी पूर्वी खोज्याचे लिहिल्यापुसिल्यावरी आलो. येथील प्रसग कोकी व रोशन-[1] दौलापुढे शंढाचे थोडकेच चालते? पादशा तो यास पुसिल्यावाचून काही करीत नाहीत. सरबुलंदखानाचा प्रसंग त्यानी केला तो निर्फळ गेला, त्यामुळे शर-(मिंदे) आहेती. सेखजीस व केशवरायास पाठविले आहे. आम्हास उतर पाठविले (तरी) कौबू[२] पाहून कार्ये करीन. सोडीत नाही. आ(पले) समाधान असो देणे. सवाईजीचे वर्तमान तरी या कार्याचा सर्वस्व अभिमान धरिला आहे,

---

1 The Emperor's favourites. २ संधि.

त्याचा तपशील राजश्री स्वामीच्या पत्रावरून कळो येईल. सैदाचे वर्तमान तरी जितके पादशाही बंदे तितके येकेकडे. यक पादशा येकेकड. कोटेयांत बसले असता तीन लक्ष रुा दरमाहा देत होते. मग गुजरातचे सुबेदारीची तजवीज केली. त्यास कमरुदीखानाने ते गोस्टी उडाऊन दिधली. मग पादशानी ग्वालेर व कालाबाग व धामोणी, जोरतलब हे खिजमत दिधली. सैदानी वीस पंचवीस हाजार स्वार ठेऊन मवासा[१] मारून तिकडील ठाणी बैसविली. ग्वालेरवालियांची कुमक सवाईजीनी केली होती, त्याचा मदतीस कांही फौज पाठविली होती. हे वर्तमान नजमुदीआलीखानानी ऐकोन येकायेकी येऊन त्याची फौज मारून तमाम ठाणी बैसविली. हे वर्तमान ऐकोन फौज फिरून आली. इतकियांत आम्ही या प्रसगी आलो. सैदाचेविशई साधक बाधक सांगून चितांत उभ[य] पक्षी किंत होता तो काढिला. त्याचे तरफने वस्त्रें घोडा येक भला माणूस पाठऊन शफतपूर्वक स्नह करून दिधला. मग सवाइजीनी सैदाविशई येक-दोनिदा मुख्यास लिहिले की जरी निजामाच कार्ये करण आहे, तरी हे काम सैदास सांगण. ते करितील. पादशानीराव जगराम विकील सवाईजीचा मातबर साहाजारी आहे. त्यास रुबरू बोलाऊन पुसिले कीं, याची सवाईजीनी काय तजवीज केली आहे? रावजगरामास सवाईजीनी तपसीलवार लिहिले होते. त्यानें सर्वहि निवेदन केले. त्यावरून सवाईजीस हुकूम येऊन पाहोचला आहे कीं सीघ्र येऊन पोहचणे. * र तमाम मारून काढिले. काही बाकी आहे ती अजमेरवरून जातील. फौजबंदी पंचवीस तीस हजार स्वार, रजपूत मनसबदार पंचवीस हजार स्वार नजमुदिअलीखानानी ठेवावा व वीस हजार तोफखाना. त्यास खर्चास पातशाहानी द्यावे. बाहेरंगे गुजरातचा सुबा, अंतरंग दक्षण. सवाईजीनी सैदाचा सर्वस्व अंगिकार केला आहे. हे कर्म स्वामीच्या भरवासियावर केले आहे. हिंदुस्तानात स्वामीचे मोठेसं नाव जहाले. माघहि मोठमोठे सरदार जाहले. (पण) यैसे कोण्हीहि केले नाही. सैदासी स्वामीचाच भरवसा आहे. हेहि येश स्वामीसच येते; तरी आपणहि सवाइजीस पत्र बरा भर भरून लिहिले पाहिजे कीं तुम्ही सैदाचा अभिमान धरून हा मनसुबा ठराविला हे गोष्टी बहुत उतम आहे. आपणहि ह्या गोष्टीस राजी आहों. येक पत्र "छेत्रसाल बुंदेला त्यांसी बंगसासी लढाई आहे. दसरा जालियावरी आमच्या फौजा त्या प्रांतास येतील. तुमची कुमक होईल," म्हणून लिहिले पाहिजे. फौज आलिया त्याकडून खर्चासहि येईल. या कार्यानिमित्य घरच माणूस दुर्गदास यास पाठविले आहे. तो जबानी सांगता कळो येईल. सवाईजीनी आज्ञा केली आहे की तुमची फौज माळवियात

---

१ पुंड लोकांस.

जलदीने येते. तरी पादशा तुमचे जे मतालेंब[1] आहेती ते सर्वहि करून देतो. फौज माळव्यात येऊन धामधूम करी ते गोष्ट केली पाहिजे. सवाई जयसिंगजीच पत्र स्वामीच नावे पाठविले आहे. उत्तर समर्पक सीघ्र पाठविणे. हली सवाईजी-कडून येक काईत व आमचे तरफेने मोरोपत सैदाकडे रवाना जाहाले. या कार्या-निमित्त शीघ्रच येतील. आपणहि नजमुदीअलिखानास बहुत समाधानपूर्वक लिहिले पाहिजे. खोजाचहि अजी उत्तर आले कीं "माहाराजास लेहून फौजा माळव्यांत व गुजरातेत येऊन सीघ्र करीत थैसे सीघ्र केले पाहिजे, म्हणजे तेच निमित्त करून सैदाची रवानगी करू. फौज माळव्यांत ये ते अगत्य केले पाहिजे" तैसेच खोजाने लिहिले आहे. हे गोस्टी अगत्य केली पाहिजे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Dado Bhimsen, who appears to be the Peshwa's agent at Delhi, writes to Bajirao news of the Emperor's Court and the plans of the various advisers of the Emperor to prevent the Marathas from crossing the Nerbudda. The writer urges Bajirao to cross the river and threaten Malwa, by taking the opportunity afforded by the operations in Bundelkhand between Chhatrasal and the Bangash. Sawai Jaysing is reported to be favouring Bajirao.*

No. 11] [*1728 ?*

श्री

राजश्री पिलाजी जाधव

दाजी गोसावियासी

॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलुक्षुमीअलंकृत राजमान्ये स्नो मानाजी वाग व निलो कृष्ण रामराम विनंती. येथील क्षेम जाणून राउलीं आपले स्वानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आपण आम्हास माडी व तलाठीस ठेविले. बकानरचे ठाणे हवाला करून रा। फिरगोजी सेलकेची व अमची * व करून त्याची आमची गाठी घातली. त्यास त्याची वर्तणूक तो पहिलेपासून आपणा ठावकी आहे थैसे असोन गाठी घालून दिल्ही. त्यास मागे रा। निलोबा फौजेनसी राहिले होते ते येतील न येत, याकरिता आपली आज्ञा मान्य करून राहिलो तो सेवेच तेहि अले. ते आपण मिलोन अवघे अजीवर गुदराण उपासपारणी करून आपला मार्ग लक्षीत आहो. परगणे तो उद्वश होते त्यास कौलकरार देऊन वसात केली. येकदोन मवास होते. त्याच्या भेटी घेऊन सरोदा[2] करून बंदोबस्ती केली. इदुरासहि पेगम लाऊन तेथीलहि

---

१ मुद्दे. २ स्नेह.

अनुसंधान आले होते. त्यास दयाबहादुर व संताजी भोसले इंदूरकर मंडलाई घेऊन जाबेवर आला त्यामुळे इदुरास जाणे जाहाले नाही व नवाब माडवचा तलाठीस आला होता त्याची भेटी घेतली. सरोदा . केला. त्याने' आपल्या अमीलास व तलाठीच्या जमीनदारास पत्र दिल्हे की. बिलाकुसूर[१] याची चौथाई देणे म्हणून राजश्री तात्याच्या नावे पत्र घेतले आहे. आपण येथे ठेविल्यासारिखे येकानिस्ठेने राहून मुलकात वस्ती केली परंतु रुपयास दर्शण नाही. काठ्यासी (?) समंध पडला आहे. फौज अबालली आहे. येविसी विस्तारे ल्याहावे तरी सर्व गोस्टीचा आमचा अभिमान आपणास आहे. कितक वर्तमान राजश्री तात्याचे पत्री लिहिले आहे त्यावरून कलो येईल. बहुत लिहिणे नलगे. हे विनंती. माडिवच्या नवाबाच्या चितात आहे की राजश्री तात्याची भेटी घ्यावी, सरोदा करावा यैसे आहे. तरी आपल्या चितास येईल तरी तैसेच उतर पाठविणे. त्यासारिखे नवाबाचा मुदा घेऊन आम्ही भेटी येऊन. तरी राजश्री तात्या व आपण याचा * * * * * * * * पाहिजे हे विनंती.

¶*Manaji Wag and Nilo Krishna to Pilaji Jadhao, who seems to be in Malwa. The writers appear to be his helpmates. The situation at Mandavgad and the movements of Daya Bahadur are described for the information of Pilaji Jadhao and Tatya (probably Ambaji Purandare).*

No. 12] [*27-9-1728*?

छ ४ रावल

श्री

पुरवणी श्रीमत् राजश्री

अपासाहेबाचे सेवेसी

विज्ञापना. साहेबी आज्ञा केली की आपले सविस्तर वर्तमान विनंतीपत्री लेहून पाठवणे. त्याजवरून सेवेसी लिहिले जाते जे. पूर्वील सविस्तर अर्थ सेवेसी श्रुत जालाच आहे. सांप्रत वराडप्रांतीहून देवगडच्या रानातून सिवणी छपारियाच्या रोखे, गढ्याच्या सरदेस गेलो. पुढे राजश्री इद्याजी सतकर मंडेलियासी[२] पाठविले. आज्ञेप्रा गढियाचा बदोबस्त करून फौज ताजी करावी, प्रसंगानरूप रा भास्कर रामासी गांठी घालावी या उदेशात होतो. त्यास श्रीमंत् राजश्री पंतप्रधान साहेबी आज्ञापत्र सादर केले की, पत्रदरशनी माघारे येणे. त्याजवरून राजश्री सरलस्कर आम्ही माघारे कुर्हियापावेतो अलो. त्यास फौज

---

१ बिनहरकत. २ मंडलगांव.

भारी. येके जागा चारापाणी न मिळे, म्हणऊन ते दो मजलीच्या अंतरियाने श्रीमंताकडे पुढे गेले. सेवकलोक बाळापूरपरियंत येऊन श्रीमंताच्या सेवेसी विनंती पत्र लिहिले आहे. जैसी आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक केली जाईल. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*This paper addressed to Chimaji Appa mentions Bajirao's expedition towards Gadha and Mandla to oppose Bhaskar Ram. Can this Bhaskar Ram be the Commander of Raghuji Bhosle who led expeditions into Bengal? This and the previous letters disclose movements on the part of Raghuji, hitherto unknown.*

No. 13] [*30-10-1728*

श्री.

चिरंजीव राजश्री चिमाजी यासी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ७ रबिलाखर जाणून, तुम्ही आपणांकडील कुशलवृत लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र छ ५ रबिलाखरीचे पाठविले ते प्रविष्ट जाहाले. चाकणेचा (कोट) बांधावयाच्या प्रवाहात तूर्त न पडाव येसी लिहिले ते कळले. येसियास तुम्हा लिहिला विचार तो उतमच आहे. तूर्तघडी राहऊन राजश्री पिलाजी जाधवराऊ यास सांगून सला करवितों. पुढे विचारानरूप कर्तव्य तैसें करून; लोक आद्याप कोण्ही आले नाहीत म्हणून लिहिले, त्यास तमाम लोकास ताकीद करून लोक रवाना केले आहेत. तमाम तुम्हाजवळ येऊन पोहचतील. गोरखोजी भापकर व देवकाते व सोळके वगैरे लोक रवाना केले. सत्वरीच तुम्हास सामील होतील. तुम्ही मजल दरमजल जाणे. थोराताकडे घोडी सिंद्याची व वाटगियाची आहेत, त्यासाठी येक दोन मुकामे करून घोडी आणवणे. त्यामध्ये दोन च्यार घोडी तुम्ही त्याचे समाधान हाताखाली घालणे. नासीक संगमनेर येथील बाबती जकातीच्या अमलास पवारानी व तुरुकताजखान याणी डोहणा[1] केला आहे. त्यास येक दोन मुकाम गंगेआलीकडे करून, तुरुकताजखान यास जे परगणे जाहाले आहेत (ते)तील अमल निटाऊन जाणे. जर अमल सुदामतप्रमाणे निटावेना तरी बेमुरवत घासदाणे घेणे. लोकास चिठ्या येथून होतात त्या कुल बार करून ठेवित जाणे. पथकें येतील त्याची गणती घेऊन, घोडेमाणूस पाहात जाणे. वरकड येथील वर्तमान तरी आम्ही नीरेच्या तीरास आलों. उदैक मुकाम कोळहाले पाा फलटण येथे होईल. पुढे मजल दरमजल

---

१ घोटाळा, घोळ.

1180

जाऊन. राजश्री स्वामी,[1] माहाल[2] माघार येत तो, जेजुरी सासवड प्रांते राहाणार. पुढे होईल वर्तमान ते लिहून. तुम्हीं आपणांकडील बर्तमान निरंतर लिहीत जाणे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to his brother Chimaji Appa. The two have planned a distant expedition to realise ghasdana levies in order to pay off Shahu's debts incurred in the recent struggle with the Nizam.*

No. 14] [*29-11-1728*

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल मार्गसीर्ष सुध दशमी भृगुवार मुकाम का रा * * न प्रा कडेवलीत जाणून तुम्ही आपणाकडील वर्तमान लिहित जाणें. यानंतर तुम्हीं पुण्याहून स्वार जाहाल्यादारभ्य काही कागदपत्र पाठविला नाहीं याउपरी तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे. येथील वर्तमान तरी आम्ही सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब यास तुलजापूरचे यात्रेस नेली होती. यात्रा जाहाली. राजश्री फत्तेसिंग भोसले व राजश्री संभुसिंग भेटीस आले. राजश्री दावलजी सोमवंसी सरलस्कर समागमेच होते. मातुश्रीस यात्रा करविल्यानंतर माघारे फिरून आलों. राजश्री स्वामीची भेट नात्यापुत्याजवल जाहली. श्रीमहादेवाचे दर्शन जाहालियावरी कूच करून नीरातीरास राजश्री आले. येक दुसरा मुकाम चंफासष्टीस नीरेवर करून छ ४ जमादिलोवली कूच करून सातारियास चालले. आम्ही छ ९ जमादिलोवली राजश्रीची आज्ञा घेऊन कडेवळीत प्रांते आलो सरलस्कर समागमे आहेत. गंगातीरप्रांते बीडपाथरीकडे जात आहों. राजश्री सरलस्करच्या सरंजामात त्याचा अमल बैसऊन द्यावयाचा आहे. तो बैसऊन पुढे पोट भरावयास जिकडे जाणे तिकडे जाऊन. तुम्ही आपले वर्तमान निरंतर लिहीत जाणें. सारांश गोष्ट विचारेंकरून मनसबा करून कर्जाचा परिहार होऊन पोख्त मनसबा होये तें करणें. राजश्री पिलाजी जाधवराऊहि समागमे आहेत. तुम्हास कलावें यास्तव लिहिले आहें. तुम्ही गेलियातागाईत वर्तमान लिहिले नाही. तरी वर्तमान वरचेवर पधरवडियांत अगर महिनियाचे महिन्या तरी लेहून

---

१ शाहू तुळजापुरचे यात्रेहून बाजीरावासह गेला. २ राण्या.

पाठवणें. लोभ असों दीजे हा आसीर्वाद. पैका बोलल्याप्रा लौकर साता-रियास रवाना करणे. तिकडे तात्यासहि पत्र पैकियाचे व आम्हाकडेहि लिहून पाठवणे. आम्ही वराडचे रोखे आहो. हे आसीर्वाद.

¶*Bajirao relates Shahu's movements to his brother Chimaji and asks him to procure money by any means at his disposal to pay the armies and to defray the debts of Shahu.*

No. 15] [*9-12-1728*

पाो छ २१ जमादिलोवल मुाा उजनी

दोनप्रहर दिवस

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी

बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल मार्गसीर्ष वद्य चतुर्थी इंदुवार मुकाम मौजे बोधेगाऊ टाकली पाा सेवगाऊ जाणून तुम्ही आपणाकडील कुशल वृत लिहित जाणे. यानंतर तुम्ही गेल्यादारभ्य काही कागद पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी साद्यंत वर्तमान लिहून पाठविणे. यानंतर सांप्रत आजीच वर्तमान आलें की तुमचे व गिरधर बाहादर याचे युध्य जाहाले. गिरधर बाहादर याजकडील कितेक सरदार व लोक मारून गिरधर बाहादर बुडविला. लस्कर लुटून खासा दस्त जाहाला म्हणून वर्तमान आले आहे. यैसियासी ये गोष्टीचे तत्वता वर्तमान काये आहे ते सविस्तर लिहून पाठविणे. जर हे गोष्ट जाहाली असिली तरी उज्जनी सुभ्याचा बंदोबस्त करून मग कोण्हीकडे पोट भरावयास असुद्या[१] मुलकात जाऊन फौजेची उस्तवारी[२] करणे. उज्जनी शहरचाहि पैका बरा घेणे. लोक कोण कोण कैसे आहेत ते सविस्तर लिहून पाठवणे. पाटणकर तुम्हाकडे पाठविले आहेत ते पावले किंवा नाहीं हे लिहिणें. येथील वर्तमान तरी आम्हीं तुलजापुरास गेल्यावर राजश्री फतेसिंग भोसले यास भेटीस आणून, त्याचे समाधान करून राजश्री स्वामीच्या दर्शनांस आणिलें आणि आम्हीं राजश्रीची आज्ञा घेऊन कडेवलितांत आलों. राजश्री सिदोजीराऊ निबालकर याचेहि समाधान करून राजश्री स्वामीकडे जावयास सांगितले. ते सत्वरीच जातील. आम्हीं प्रस्तुत गंगथडीस आलों. राजश्री दावलजीराऊ सोमवंसी

१ निर्वेध, मोकळा, कौली नसलेला किंवा जेथें कोणी येऊन तसनस लुटालूट न केल्यामुळें जो सधन वा संपन्न राहिला आह असा.

२ फौज ताजीतवानी करणें.

सरलस्कर हे फौजेसहवर्तमान समागमे आहेत. पुढें जो मनसबा विचार होईल तो लिहून पाठऊन. +तुमचे संतोषाचे वर्तमान वरचेवर लिहित जाणे. आम्ही वराडाचे रोखे जात असो. फौज फिरे कर्ज मरे येसा विचार करणे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji, giving him news of Fatesing Bhosle's reconciliation with Shahu and enquiring about the battle with Girdhar Bahadur.*

Dayaram — *Madhao Bahadur alias Chhabilaram*

Girdhar Bahadur (son of Dayaram) — *Daya Bahadur* (son of Madhao Bahadur)

The last two were quickly despatched by Chimaji Appa in December 1728.

No. 16] [*About 10-12-1728*
[*19-12-1728*

छ २८ जालोवल
मुा उजेन दोन प्रहर

श्री

राजश्री चिमाजी आपा
गोसावी यासी

श्रीमंत् अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री धनाजी ढमढेरे व सुभानजी सेलार रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. गिरधर बाहादर यास बुडऊन येश घेतले. हे वर्तमान संतोषाचे आलें. त्यावरून बहुत समाधान जाहाले. आपण येशश्वी आहेत. पुढेंहि याच प्रकारे श्री येश देईल. सदैव पत्री परामर्श केला पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा असो दीजे. हे विनंती[१].

¶*Dhanaji Dhamdhere from Bajirao's camp congratulates Chimaji upon his victory over Girdhar Bahadur.*

+ येथून अक्षर खुद बाजीरावाचें.

१ हें पत्र बाजीरावाच्या लष्करांतून लिहिलेलें आहे. कारण मागचें बाजीरावाचें पत्र ज्या कारकुनाच्या हातचें आहे त्याच कारकुनाच्या हातचें हेहिं पत्र आहे.

No. 17] *[24-12-1728*

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजी-
पंत आपा स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। पौष शुध पंचमी मु। कल्याण स्वामीचे कृपेकरून आमचे व या प्रांतीचे वर्तमान यथास्थित असे. यानंतर स्वामीनी संतोषाची आज्ञापत्रे पाठविलीं ती प्रविष्ट जालीं. तेथे लिहिले की दयाबाहादुर याणे चालोन येऊन बारी धरिली. मग आपण सख्ती करून युधप्रसंग बरा दाट जाला. दयाबहादुर व त्याचे सरदार ठार जाले. लुटून फना केला म्हणून लिहिलें, त्यावरून बहुत संतोश जाला. स्वामी पुन्यपुरुष, येशस्वी, श्रीची दया व वडिलांचे पुन्य समर्थ, यामुलेच यैसी येशे स्वामीचे पदरी पडतात. दयाबहादूर त्या प्रांते मोहोरा सामान्य नव्हता त्यासच मोडिला. याउपरी पृथ्वी स्वामीस वस्य आहे. याउपरी श्री कधीहि न्यून पडो देणार नाहीं. टक्या पैकियासहि काये उणे ? याउपरी वरचेवर आपणाकडील संतोशवृत लेहून समाधान पावीत गेले पाहिजे. या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री [१] स्वामीची स्वारी लोहगडपरयेंत जाहाली, येक दिवस मुकाम करून गड पाहिला. संतोसी जाहले. प्रसंगोचित स्वामीच्या नावाकरितां आस्त्या[२] पदार्थे सेवा जाली. राजश्री दादोबा[३] प्रसंगी होते. विदित आसावे. वरकड कल्याण प्रांतीचे वर्तमान तरी फिरंगी अद्याप वलवल करितां राहात नाही. आम्हीहि सावधच आहों. परंतु ला(फौ?)जेने धास्त घेतली आहे. मुलूक गुदस्ता धामधुमेमुले वैरान पडिला. विदितच आहे. वरकड जुनरप्रांतीचे वर्तमान तरी स्वामीचा मुकाम पुणियांस आसता चाकणेची[४] गढी मुस्तेद[५] करावयास आज्ञा केली. बेलदार स्वार व प्यादे रा। केले. गढीचा पाया घालित्ये वेलेस येक युध जाहाले. त्याउपरी त्याउपरी सांप्रत रा। गोविंद कृष्ण यास रवाना केले त्याणी त्याणी च्यार पाचसे माणुसे व स्वार ठेऊन गढी डोई इतकी मुस्तेद केली. त्यास दीडकसे राऊत व च्यार पाचसे बरखंदाज चालोन गोविंदपंतावर आले. त्याणी बाहेर निघोन मारामार बरी दाट केली. चाकणकराचा येक घोडा व सरदार ठार जाहाला. पाच सातजण मुर्दे पडिले. पंचवीस माणूस जखमी जाले. आम्हाकडील येकजण ठार जाहाला. दोघे जखमी व येक घोडा जखमी जाहाला हे

१ शाहू महाराज. २ असलेल्या. ३ पुरंदरे.
४ चाकण हें मोगलाचें ठाणें होतें त्यामुळें मारामारीचा प्रसंग आला. ५ तयार.

वर्तमान. निबालकर वडमुल्या (?) हजार राऊत निवडक घेऊन चाकणेस आला. त्याणे वलवल बहुत केली. मग सावर[1] नव्हे पाहून गोविंदपंत बाहेर निघाले. मग त्याणे गढी जाया केली. दाहा बारा गांव मारिले. गुरे ढोरे मवेसी[2] नेली. पुन्हा मागती जमाव आणखी ठेऊन गढी तयार करावयाचे प्रेत्नांत असों. विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev Chaskar to Chimaji Appa, congratulating him on his victory over Daya Bahadur and giving details of an engagement near Chakan and Shahu's visit to Lohgad.*

No. 18] [*25-12-1728*
[*30-3-1729*

छ १० रमजान

श्री

पुरवणी. चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपर. येथे कर्जदारियाची व दरमाहेच्या पैकियाची वोढ सातारियास आहे. त्यास तुम्ही तिकडे गेलियावर आधी यैवज साधेल तो हरयेत्ने पाठऊन देणे, म्हणून तुम्हास सांगितले. तुम्हीहि मान्य केले आहे. तदनुरूप यैवज जेथून[3] पाठवावा हे विवंचनत असाल, त्यास मार्ग दुर्घट, यैवज आला पाहिजे, हा कदाचित विचार प्राप्त होईल, तर केशवदास कुवरजी साहुकार औरंगाबादेस मातबर आहेत, याचे गुमास्ते उजनीस किसणजी साहुकार आहेत. त्यास केशोदास याचे पात्र (पत्र ?) पाठविले आहे. जर तुम्हास यैवज पाठवावयाचे कार्य लागले तर रा जगंनाथ नाईक याचा गुमास्ता बाबू यास उजनीस पाठऊन व केशवदास कुवरजी याचे पत्र पाठऊन, त्या गुमास्तियास बोलाऊन आपणाजवल आणून, पैका त्याचे पदरी घालून, त्याची हुंडी करून पाठवणे. म्हणजे यैवज सातारियास वोढीच्या प्रयोजनास प्रविष्ट होईल. राजश्री कृष्णाजी नाईक जोसी याचा पैका बहुतच द्यावा आहे, त्यास मारनिलेकडील शामजी नाईक यास येथे ठेऊन घेतले आहे. तुम्हाबराबरी माहादाबा नाईक व बालमुकुंदजी हे दोघेजण आहेत त्याचे पदरी पैका घालून सुरक्षित पावे ते गोष्ट करणें. +पंनास साठ रुपयेपर्यंत घालणे. रोखात पावलियाचा जाब घेणे आगर तसलमातचा जाब घेणे. राजश्री स्वामीकडील पैकियासाठी कारकून व

---

१ धीर न पुरे सबब. २ मालमत्ता.
३ जमवून. + येथून अक्षर बाजीरावाचें.

जमादार समागम आहेत, त्यास येक रुपायापर्यंत पैका देणे. जर, ईश्वरइच्छेने पैका फारसा (मिळाला) तरी त्या उभयताचे समाधान रक्षून, नेमस्त गोष्ट दरबारी सागेत यैसे करून ठेवणे. जिकडे पैका फारसा मिलेसा आसेल तिकडे जाणे. कर्जदार आधी वारणे. लोकास पैका फारसा न देणे. तनूं[1] पोटाची मात्र राखणे. रा उदबास होळकरास विचारे करून रजावंद राखण. लोमे[+] आसो दीजे. हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks for money from Chimaji Appa and instructs him how to send it.*

No. 19] *[25-12-1728 ?*
[17-1-1729

पो छ २७ जमादिलाखर
मुा कार्यीथे

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी

आसीर्वाद उपरी. सातारियाकडे ऐवज रवाना करावयाविसी लिहिले त्यास याखेरीज दुसरा निजध्यास नाहीं. सांप्रत उजेनीस आलो आहो. येथील बोली लागली आहे. नियेत जाहला नाही. येका दो दिवसी नियेत होईल तो लिहून व पैका अनकूल होईलसारीखा दिसतो. परंतु मार्गाचीच चिंता वाटते. वालखेड्यास पैका पावलियास सातारियास सुरक्षित पावले की काये येविसीची आज्ञा करावी म्हणून लिहिले, यैसियास सातारियाचे रवानगीची चिता तुम्हाखेरीज कोणास असणार ? मार्गाची चिंता वाटते म्हणून लिहिलें तरी केशोबादास कुवरजी औरंगाबादेस साहुकार मातबर आहेत ते आमचे भेटीस आले होते, त्याणी आपले पत्र किशोरदास गुमास्ता उजनीस आहे त्यास दिल्हे, ते तुम्हाकडे पाठविले आहें. रा. जगनाथ नाईक पुरंदरे याचा गुमास्ता बाबू तुम्हा समागमें आहे त्यास सांगून किशोरदार यास केशवदास * याचे पत्र दाखऊन त्याची हुंडी जे करावयाची ते करून औरंगाबादेस पाठवणे, म्हणजे पैका पावेल. त्या साहुकारास बोलाऊन त्याचे पदरी ऐवज घालाल त्याची पावती आपणाजवल लिहून घेऊन औरंगाबादेची हुंडी करणें. दुसरी गोष्ट तुम्ही लिहिले आहे की वालखेडियास पैका पोहचल्यास सातारियास पावल कीं काये ? तरी वालखेडियास आलियावरी सातारियास जावयाचे

---

१ जरूर आवश्यक तेवढाच पैसा खर्चणें. + अक्षर थोरल्या बाजीरावाचें.

अगाध कार्य आहे ? तेथेहि पैका आलियास सातारियास पावेल. त्याहिमध्ये तुम्हास दोहीतून जे अनकूल पडेल ते करणें. पैका जो पाठवाल त्याचे पत्र राजश्री अंबाजीपंत यांस सातारियास पाठवणे. लोभ+ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks Chimaji to send money by Hundi through Keshavdas Kuverji, the rich banker of Aurangabad, or via Walkhede.*

No. 20] [*25-12-1728?*
[*17-1-1729*

पौ छ १० रमजान

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी

आसीर्वाद उपरी. नंदलाल मंडलोई इंदूरकर याजकडे राजश्री अंबाजीपंताचे स्वारीबाबत रुपये ९५०० साडेनव हजार बाकी राहिले आहेत, तो यैवज रा जगंनाथ नाईक पुरधरे याजकडे देविला आहे. नंदलाल याचे कतबे व्याजसुधा रुपये द्यावे यैसे नाईकमारनिले जवळ आहेत. याणीही माणसे त्याजकडे बहुतदां पाठविली. देऊंदिलाऊ करून आजीपर्यंत रुपये दिल्हे नाहींत. त्यास हा मजकूर तुम्हास ठावकाच आहे व नाईकाचा गुमास्ता बाबू तुम्हासमागमे आहे तो तुम्हास स्मरण देतच असेल. जर नंदलालाकडील तहरह जाहा(ला) असिला तरी या रुपयाची विल्हे तुम्ही करून (घेत)लीच असेल. कदाचित या रुपयाची विल्हे जाहाली नसिली तरी त्याजपासून बेमुरवत व्याजसुधा रुपये घेऊन बाबूचे पदरी घालणें. तुम्ही तो हा यैवज उगविलाच असेल. तथापि स्मरणार्थ लिहिले आहे. लोभ+ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji : advises recovery of loan from Nandlal Mandloi.*

No. 21] [*25-12-1728*
[*17-1-1729*

पौ छ २७ जमादिलाखर

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. राजश्री अबाजीपंत याचे स्वारीबाबत नंदलाल मंडलोई यांजकडे रुपये साडेनव हजार बाकी राहिले

+ अक्षर बाजीरावाचें.

आहेत, तो यैवज जगंनाथ नाईक पुरंदरे यास देविला आहे. नाईक मारनिलेचे माणूस नंदलालाजवल बसले आहे. आद्याप रुपये त्याणी दिल्हे नाहींत. यैसियास त्याजला बरी ताकीद करून, सदरहू रुपये व्याजसुधा घेऊन, जगनाथ नाईक याचा गुमास्ता बाबू तेथे आहे, त्याचे पदरी घालणे. जगनाथ नाईक याचा पैका दिवाणात गुतला, यामुले हे वोढगस्त आहेत. यास्तव सदरहू यैवज व्याजसमेत यास पावल्याने याची वोढ वारेल. तरी त्यास ताकीद करून, याचा पैका पावता करून पावलियाचे वर्तमान लिहून पाठवणे. लोभ+ आसो दीजे. हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks for money to be sent from Mandloi.*

No. 22] [*About 25-12-1728?*
[*17-1-1729*

पो छ २७ जमादिलाखर

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. राजश्री सरलस्कर व आपण गंगातीर प्रांते आलेस, वराडात जाणार, येसियास वराडात पैका मिलावयाचा ठाव दिसत नाही. इकडे आलियाने मनसबा उतम होईल. सलाबत या प्राते पडली आहे. इकडे यावे हे उतम आहे, तरी यावयाचे करावे म्हणून लिहिले ते कलले. येसियास मालवियातही पैका विषेष आहे येसा अर्थ नाहीं. तुम्हाबराबरी फौज तोलदार आणि हेहि फौज तोलदार. दोही फौजास पैका तिकडे मिळून उस्तवारी होयेसारिखी दिसत नाही. यास्तव आम्ही चांदे देवगड बुधेलखडचा मनसबा योजिला आहे तदानुरुप करून. तुम्ही तिकडे असुधे रानै[1] पैका मिले आणि उस्तवारी होयसारिखे पाहून जाणे आणि पैका मिलून कर्ज परिहार होये आणि लस्कर फिटे ते करणें. सारांश तिकडील मनसबियाचा विचार सर्व तुमचा तुम्हावरी आहे. जो तुम्हास उतम दिसेल व तो करून वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें. रोहिल्याकडील व राणाजीकडील व सेदाकडील मजकूर लिहिला तो कलला. मुख्य गोष्ट तुमच्या व राजश्री उदाजी पवार याच्या विचारे पोख्ता मनसबा असेल तो करणे. उजनीची बोली जाहालियाखेरीज वरकड मुलकाची बोली होत नाहीं म्हणून लिहिले. येसियास मालवियाचा अर्थ तुम्हास पहिला लिहिला आहे. त्याप्रमाणे गिरधर बहादर याच्या जागिराचा पैका

+ पत्र थोरल्या बाजीरावाचें.

१ मोकळें रान.

अवघा जप्त करून वसूल घेणे. जो माहाल येईल तो वरचेवरी खंडीत जाणे. येकासाठी सारे तटावे यैसे नाहीं. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks Chimaji to make exactions from Ujjain and the whole Subha of Malwa.*

No. 23] [*27-12-1728*
[*30-3-1729*

१० रमजान

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल पौष्य शुध अष्टमी शुक्रवार मुकाम नजीक वासीम कसबा जाणून तुम्ही आपणाकडील कुशल वर्तमान लिहीत जाणें विशेष. तुमची पत्रें छ ९ जमादिलौवलीची (३०-११-१७२८) आंबझिरे[1] येथील मुकामीची आली ती प्रविष्ट जाहाली. गिरधर बाहादर वर्हमेकरून[2] युध्यास आला, त्याचे आपले युध्य बहुत जाहालें, निर्दान[3] त्यास सेनासहवर्तमान बुडऊन येश प्राप्त जाहालें, हे कितेक वर्तमान तपसिले लिहिलें ते कळलें. यैसियास शत्रू अभिमानेकरून युध्यास प्रवर्तला त्यास वडिलांचे व धण्याचे पुण्येकरून पराजये केला आणि येश संपादिलें यावरून बहुत समाधान जाहालें. श्री सदैव तुम्हांस याचप्रकारे येषश्वी करों व तुम्हीहि याचप्रकारे निरंतर आपणांकडील संतोषाचे वर्तमान लिहीत जाणें. गिरधरबाहादर यास बुडविल्यावर तुम्हीं पुढे उजनीकडे गेलेच असाल. त्यास विचारेकरून उजनीवरी दबाव घालून व गिरधर बाहादर याच्या कुल जागिरा बाद करून पोख्ता टका साधणें आणि कर्जाचा परिहार होये तें करणें. येथील वर्तमान तरी आम्ही व राजश्री दावलजीराऊ सोमवंसी सरलस्कर यैसे आवढेपर्यंत फौजसहवर्तमान आलो. पुढे बुंधेलखंडाकडे चाद्या देवगडावरून जावे यैसा विचार आहे. तिकडे आलियावरी तुम्हास लिहून पाठऊन. तुम्हीं आपणांकडील वर्तमान लिहीत जाणे. गिरधर बाहादर याचे युधी राजश्री उदाजी पवार याणी व हुजूरच्या पथकानी कस्त मेहनत बहुत केली म्हणून लिहिले. यैसियास पहिल्यापासून यैसीच असाधारण कर्मे करून येश संपादित आले आहेत. पुढेहि सर्वविसी भरोसा त्यांचाच आहे. तुम्हीं समस्तांची समाधाने करून पुढेहि स्वामीकार्य करून कीर्त संपादे ते केले पाहिजे. +आम्ही खाईमखाई गढे छत्रसालाचे

---

१ आमझरा = धारच्या नै. २० मैल. २ आकसाने.
३ शेवटीं. + येथून दस्तुर बाजीराव.

मुलकांत जातच आहो. सरलस्कर दाहा हजार .फौज व आमची च्यार हजार फौज ऐसी आहे. वीसपंचवीस हजार घोडे होईल. भोसले कोणी सामील जाले तरी करून घेऊन. तुम्हास जे पत्र पाठवणे तरी तिकडे पाठवणे. लोभ असो दीजे हे विनंति.

छ १० रमजान मुा दाहोद दोन घडी रात्र.

¶*Bajirao congratulates Chimaji on his victory over Girdhar and advises him to be cautious about future plans.*

No. 24] [*28-12-1728*

पोा छ १० रमजान

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. आजी छ ७ जाादिलाखरी काा वासीम येथे मुकाम जाहाला. पुढे मजल दरमजल देवगडाकडे जात आहो. तुम्हास कलावे यास्तव लिहीले आहे. हा+ आसीर्वाद. छ १० रमजान

¶*Bajirao writes to Chimaji from Wasim, mentioning his intention of going to Deogarh.*

No. 25] [*1-1-1729*

श्री

श्रीमत राजश्री चिमणाजीपंत आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य मल्हार दादाजी साा नमस्कार विनंती. ताा छ ११ जमादिलाखरपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर आपण पुण्यामध्यें असता सिनरीहून राा गोपाळ त्र्यबक याणी देसमूख देसपांडी पाठऊन बहुत बजिदी[१] केली की गंगथडीप्रांते येणे. त्यावरून स्वार होऊन सिनरास आलो. दोन चार दिवस तेथे होतो. त्यानतर सांप्रत गंगातिरी आहो. इकडील कामकाज चाली लागले आहे. तुरुकताजखानाचा जिल्हा त्याचे अमील आहेत ते परम नष्ट आहेती. स्वामीच्या प्रतापे कार्यप्रयोजन होई(ल); चिंता काये आहे? यानतर स्वामी सेनासमुदाये (सहवर्तमान) मालवे प्रांते स्वारीस गेले. त्यास दयाबाहादर

\+ पत्र थोरल्या बाजीरावाचें

१ अत्याग्रह.

उजेनीचा सुभा चालोन आला. ते प्रसंगी युध्य जाले. दयाबहादर ठार जाला. तसेच मोठाले सरदार ठार होऊन सर्व फौज हस्तगत, हस्ती नगारे निशाणे तोफा सकल सरंजाम हस्तगत जाला हे संतोषाचे वर्तमान स्वामीने आपणास लिहिले त्यावरून परमसमाधन जाले, की प्रथम स्वारीस स्वामी गेले. वडिलाचे आसीर्वादे व माहाराज स्वामीच्या प्रतापे थोर येश पदरी पडिले. कीर्तिघोष दिगंती गेला! स्तुतिवाद आपण काये ल्याहावा? उतरोतर श्रीने यैसीच येशे द्यावी इतके इछित आहों. यानंतर पुण्यामध्ये स्वामीने वचन दिल्हे आहे, येंदा अधिकउणा तुम्हापासून टका घेतला त्याची चिंता न करणे. येसा शब्द दिल्हा आहे त्याचे स्मरण असो दिल्हे पाहिजे. मागील कर्ज पुण्यात पाच हजार घेतले ते व दामासी मागील कर्ज आहे त्यामध्ये देऊन म्हणून अभये दिले. त्या बहुताचे भाग्ये स्वामी येसस्वी जाले. उतरोतर स्वामीस टका पैका मिळतो. येसस्वी निरंतर आहा. आमचा आसीर्वाद आहे. विशेष काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री गणपतराऊ तथा रा बाजीराऊ तथा रा आयाबा तथा अंताजीपंत स्वामीस सा नमस्कार. लि परिसीजे. आमचे स्मरण येजमानास दिल्हे पाहिजे हे विनंती.

राजश्री बाजीस आसीर्वाद. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Malhar Dadaji (Barve) to Chimaji Appa, expressing his satisfaction on hearing of the success of the latter over Daya Bahadur. The writer reminds him of his promise to repay his debts.*

No. 26] [*2-1-1729*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसांवी

यांस

८ सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्री दावलजीराव सोमवसी सरलस्कर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेश. आपण उजेनीचे मुकामीहून पत्र पाठविले तें प्रविस्ट होऊन लेखनार्थ कलो आला. दयाबहादूर फौजेनसी वहमियाने चालोन आले, त्याचे व आमचे फोजेचे दोन प्रहर युध्य जाले, दयाबहादूर ठार पडले, व वरकड मातबर येक दोघ सरदार त्यांकडील पडले, हती निशाणें नगारे

व घोडी पाडाव करून लुटून फना केला, धण्याचे व वडिलाचे पुण्ये फते जाली म्हणून युध्याचे वर्तमान तपसिले लिहिले, त्यावरून संतोशाच्या कोटी जाल्या. कस्त आपण सीमेपरती केली व महद् येश संपादिले. आपण येशस्वीच आहेत ! याउपरी वरचेवरी सविस्तर वर्तमान आपणाकडील सदैव पत्री लेहून संतोशवीत असिले पाहिजे. राजश्री पंतप्रधान व आम्ही मौजे बेलोरे पा माहागात्र प्रांत वराड येथे आलो. पुढे मजल दरमजल देवगड गढे प्रांतें येत असों. कललें पाहिजे. रा छ १२ जमादिलाखर. +बहुत काये लिहिणे हे विनंती.

मोर्तब सुद.

श्री राजाशाहु छत्रपति स्वामी चरणीं तत्पर दावलजी सोमोषी सरलस्कर.

¶*Davalji Somwanshi congratulates Chimaji Appa on his victory over Daya Bahadur.*

No. 27] [*3-1-1729?*

छ १० रमजान

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले; पावोन वर्तमान कलो आले. दयाबाहादुर आमझरा[१]चा घाट बंद करून आमझरियावरी राहिला होता. त्यास तो घाट टाकून माडवगडचे घाटे चढोन गेलियावरी तो चालोन आला. याजकरितां जरूर जाणून युध करणे लागले. त्यास राजश्री स्वामीचे प्रतापे पराभवाते पावला. खासा वगैरे सरदार ठार पडले. लस्कर लुटले. हती अठरा पाडाऊ आले, म्हणून तपसिले लिहिले त्यावरून बहुत समाधान जाले. वडिलाचे पुण्य आपले पदरी समर्थ आहे. श्रीने येश थोर दिल्हे. आमचे वर्तमानः राजश्री दावलजीराऊ सोमवंसी

\+ या पुढील मजकूर निराळ्या वळणाचा

१ मध्य-हिंदुस्थान तिरलाच्या जवळ.

सरलस्कर याचा अमल मुलकात बसिला पाहिजे याजकरितां बीड, आबेड, पाथरी या मार्गें अवढियावरून वासीमचे रोखे आलो. पुढे देवगड डावे व चादे उजवे टाकून गढाच्या रोखे येतों. आपणास वर्तमान कलावे याजकारितां लिहिले असे. वरकड वर्तमान राजश्री पंतप्रधान याच्या पत्रावरून विदित होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Pilaji Jadhao, who is accompanying Bajirao, mentions how happy he was to learn the details of Daya Bahadur's fall at the pass of Amjhera, to the west of Dhar. He communicates his own movements and plans. Girdhar Bahadur and Daya Bahadur, cousins themselves, and possessing the charge of the Subha of Malwa, were suddenly attacked and killed by Chimaji Appa within a month, the former about the 25th of November and the latter about 25th December 1728. This dramatic achievement raised the reputation of Bajirao and his brother.*

No. 28] *[3-1-1729*

(वरील भाग गहाळ)

लक्ष्मी अलंकृत * * * * *

स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनति. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपले पत्र कासिदासमागमे आले तेथे लिा की, दयाबाहादर याचे युध्य जाहाले, मोडून तारोज[१] केले. हती घोडी पाडाव केली. प्रस्तुत उजनीसंनिध आहो. येथीलहि निर्गम सत्वरच होईल म्हणून लिा. त्यास राजश्री स्वामीचे पुण्यप्रतापेकडून श्री ने तुम्हास येश दिल्हे हे बहुत संतोष जाहाला. आम्ही प्रस्तुत पाा कुऱ्हाडी या प्रांते आहो. राा कान्होजी भोसले यास सामील करून पुढे देवगड प्राते जावे हा विचार करून, अटोले त्याजकडे भेटीस अणावयासी पाठविले. त्यास ते भेटीस न आले. गावात जाऊन बैसले. त्याचा मनसबा काये तो न कले. राजश्री सवाई संताजी भोसले फौजेनिसी देवगडचे सरदेस आहेत. त्यास सामील करून पुढे देवगड गढे प्रांते पुस वद्य अमावाश्ये इतके जाऊन. त्या प्रांते कागदपत्र पाठवावयाचे ते पाठऊन दिल्हे पाहिजेत. विशेष काये लिहिणे. राा छ १३ माहे जमादिलाखर. कृपा असो दीजे हे विनती.

¶*Pilaji Jadhao congratulates Chimaji on his victory over Daya Bahadur and informs him of his own movements (along with Bajirao), in attempting to settle the affairs of Ranoji and Kanhoji Bhosle.*

---

१ हैराण.

No. 29] *[4-1-1729*

पो छ २७ जमादिलाखर
मुा नजीक काईथे.

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १४ जमादिलाखर मुा काा कलब पाा मजकूर प्राा वराड जाणून तुम्हीं आपणांकडील कुशल वर्तमान लिहीत जाणे विशेष. तुम्हीं पत्र छ २९ जमादिलोवलीचे उजनीचे मुकामीचे पाठविले ते प्रविष्ट जाहाले. लेखनार्थ विस्तारे अवगत जाहाला. नर्मदा पार होऊन मालवियांत गेलेस, गिरधर बहादर यास बुडऊन, उजनीस गेलेस हे सविस्तर वर्तमान लिहून पाठविले ते कलले. येसियास पूर्वी तुम्ही जासुदाबराबरी युधाचे वर्तमान लिहून आबझरियाचे मुकामीचीं पत्रें पाठविली ती प्रविष्ट जाहाली. वर्तमान विस्तारे कलले. येथील वृतात व पत्राची उतरे तुम्हांस पाठविली आहेत, ती प्रविष्ट होतील. सांप्रत आमचे वर्तमान तरी राजश्री दावलजीराऊ सोमवंसी सरलस्कर व आम्ही वराड प्रांते आलो. पुढे इकडील फौज राजश्री राणोजी भोसले यास समागमे घेऊन चाद्या देवगड प्राते जातो. तिकडील मनसबा करून पुढे मजल दरमजल बुधेलखडीकडे जाऊन होईल मनसबा तो केला जाईल; व तुम्हासहि वरचेवरी पत्रे पाठवून. तुंम्ही पत्रे याउपरी पाठवावी ती त्या रोके पाठवणे. आम्ही तिकडे आलियावरी तुम्हाआ(म्हा)स जवलच पडेल. तुम्ही त्या रानी पोट भरणे. आम्ही त्या रानीं जातों. पुढे विचारासारिखा मनसबा करणे लागेल तो तुमचे आमचे विचारे लिहून पुसून केला जाईल. वर्तमान वरचेवरी लिहित जाणे. गुजरात प्रांतीचे वर्तमान लिहिले ते कलले. पुढेहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. तुम्हांस जो चांगला मुलूक वाटेल तिकडे जाणे. चिं+तांत अहंता न आणणे. पैका मिलोन कर्ज कसे फिटते ते करणे. इजत राहे आणि कार्य साधे तो अर्थ करणे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶Bajirao acknowledges Chimaji's letters about his success over Girdhar Bahadur and advises him to exact heavy fines in order to pay off the debts of Shahu. " Go roaming about wherever you like, but bring money some how or other," writes Bajirao.

+ अक्षर बाजीरावाचें.

No. 30] [After 4-1-1729

छ ८ साबान मुा जावदे

श्री

पुरवणी. चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. उजनी शहरची बोली तुम्ही केली होती त्यास बोलीस त्याणी बदल खाऊन काम नासले म्हणून वर्तमान आले आहे. सत्यमिथ्या कलत नाही. बोली जाहाली होती त्याप्रमाणे वोला मातबर घेतल्या असिल्या आणि पैकियाचा निर्वाह होत असिला तरी उतम जाहालें. कदाचित् दिलीकडून कोण्ही सुभा येणार असिला, त्याची वार्ता आइकून बल धरीत असिलें आणि पैका न देत, तरी त्या पैकियासाठी तेच स्थली गुतून राहातां येत नाही. वरकडहि स्थलें व प्रात पडला आहे. तेथील पैका वसूल जाहाला पाहिजे. यास्तव तेथे न गुतावे. राजश्री बाजी भिवराऊ यास अगर दुसरा सरदार हजार स्वारानसी उजनीस नेहमी ठेऊन माणूस आतबाहेर फटकू न द्यावे. जे माणूस शहरचे सापडेल ते जिवे मारावें. दरवाजेच बंद करावे. आपण अवघ्या प्रांताचा व जी माहास्थले असतील तेथील पैका कुल जफ्त करून वसूल घ्यावा. जो मुलूक कबजी असेल त्यास पुढे कौल देऊन अमलदार राहातील तरी ठेवावे. कदाचित दिलीकडून कोण्ही नवा सुभा रवाना होऊन येईल तरी त्याची बातमी आणवावी आणि जर तो आपल्या हकेटकेत[१] असिला तरी पुढे चालून जाऊन बुडवावा. मालवियात फौजेचा पराश्रम न होयेसारिखे करा. जर फौजे तिकडून जोरावार येत असिली, आपल्या गवसात न सापडे, तुम्ही आम्ही यक होऊन घ्यावी यैसा विचार दिसून आलियास आम्हास लिहून पाठवणे. आम्हीहि सत्वरीच येऊन सामील होऊन मनसबा केला जाईल. तुमचेच हकेटकेत असलिया तुमचे तुम्ही कलेल तसें करून मातबर पैका घेणें आणि कर्ज फिटून फौज फिटे तें करणे. देवगडचा तहरह जाहालियावरी आम्ही बुंधेलखंड प्राते सत्वरीच येत आहो. मनसबियाचा डौल दिसेल त्यासारिखे लिहून पाठवणे. +बहुत सावधपणे राहाणे. पैका मिलोन कर्ज लोक फिटेल यैसा मनसबा करणे. लोक बहुत विचारे राखणें. यकाचेच लगामी न लागणें. रा उदबाचे समाधान बहुत रक्षणे. परंतु तुम्ही आपले शाहाणपणे राहाणे. सुस्ती करीत न जाणे.

---

१ हकेटकेंत येणें = तावडींत येणें, किरणांत येणें.

+ From this sign Bajirao's own hand.

सुखावर द्रिष्ट न ठेवणे. द्रव्य साधे ते करणे. लोभ असो दीजे. आम्हाकडे मातबर काम पडले तरी लेहून पाठऊन ते क्षणी येणे. बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

¶Bajirao repeats his advice to Chimaji about exactions from Ujjain and other rich towns. "Be very cautious; execute such plans as will yield money; don't be guided by only one man's advice. Keep Udaji Pawar entirely pleased. Use discretion and be alert, without considering ease or comfort. If I send any urgent call for you, come away instantly."

No. 31] [*9-1-1729?*

छ ३ साबान

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री आपा स्वामीचे सेवेसी सेवक अंताजी गणेश आ[१] देसमुख प्रां पुणे सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान पौश वध्ये शेस्टी गुरुवासरपर्यंत स्वामीच्या कृपावलोकने करून येथास्थित असे विशेष. दयाबहादुर यासी युध्य प्रसंग जाला, स्वामीची फते जाली, हें वर्तमान ऐकोन बहुत संतोष जाला. स्वामी समर्थ आहेत. थोर येष आले. पुढेही असेच येष उदंड येणार. यैसी ईश्वरी कृपा स्वामीवर आहे. आम्ही पदरचे सर्वस्वे अहो. परामृष करीत गेले पाहिजे. कृपा वृधीते पाविजे हे विज्ञाप्ति.

¶Antaji Ganesh congratulates Chimaji on his victory over Daya Bahadur.

No. 32] [*9-1-1729*

श्री

श्रीमत राजश्री चिमणाजीपंत अपास्वामीचे शेवेसी

पो बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल पौश बहुल-शष्ठी गुरुवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी येकोजी काला व राणोजी चव्हाण जासूद यासमागमे पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. दयाबाहादर यामधे व आपल्यामधे युद्ध जाले. दयाबाहादर याचा पराजय झाला. खासा ठार जाला. त्याचे लस्कर अगदी लुटिले म्हणून लिहिले. यैसियास

---

१ धडफळे ?

दयाबाहादर याचा पराजय होऊन स्वामीस येश आले हे वर्तमान कळोन बहुत समाधान वाटले. थोर येश स्वामीस आले. ये गो(ष्टी)न त्या प्रांतांत स्वामीचा नक्ष बसला. स्वामी येशस्वीच आहेत. पुढेहि त्या प्रांतातील शत्रूचा पराजय होऊन स्वामीच्या मनोदयानुरुप होऊन येईल. वरकड या प्रांतीचे वर्तमान आलाहिदा पुरवणीपत्रांत लिहिले आहे त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणे? कृपाभिवृधि केली पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Shripat congratulates Chimaji Appa on his victory over Daya Bahadar.*

No. 33] [*9-1-1729*

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यासी बाजीराऊ बलाल कृतानेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १९ जमादिलाखर मुाा आष्टे पाा गिरडमडगाऊ प्रांत वराड जाणून तुम्ही आपणाकडील कुशल वर्तमान लिहून पाठवणे. यानतर तुमची पत्रे छ २९ जमादिलोवलीची आली. त्याआलीकडे पत्रे आली नाहीत. तरीं सविस्तर लिहिणे. येथील वर्तमान छ १४ जमादिलाखरी लिहून पाठविले आहे त्यावरून कलेल. त्याआलीकडील वर्तमान तरी आजी मुकाम येथे जाहाला. येथून देवगडची सरद येक मजल आहे. देवगडावरी जातो. सीशां[1] (?) अगर सग्राम दोहीतून येक काये करितील पाहावे. आद्याप त्याजकडील पैगामे[2] आला नाहीं. परंतु येईल व तहही होईलसारीखे दिसते. येथील तह जाहालियावरी बुधेलखडाकडे जातो. तुम्ही याउपरी कागदपत्र तिकडे पाठवणे. राजश्री राणोजी भोसले फौजसहवर्तमान मालवा प्राते जाणार. सांप्रत घाट उतरून नेमाडाकडे गेले. कदाचित मालवियांत आले तरी लुटून टाकणे. आपणाकडील वर्तमान वरचेवरी लिहित जाणे. मालवा प्रातीचा टका अवघा जप्त करणे. बहुत युक्तीने चौकसीने पैका मिलवणे. जिकडे पैका मिलेल तिकडे जाणे. उर्मी चितात न धरणे. बहुत सावध राहात जाणे. आम्ही+ तिकडे यावे म्हणून तुम्ही दोंचौ पत्री लिहिले त्यासी आम्हीही गढे छत्रसालाचे मुलकात आलो आहो. येतां तुम्हास आम्हास जवलच आहे. काम मातबर असले तरी लेहून पाठवणे. त्यासारखे वर्तोन. नाहीतरी पोट तुम्ही तिकडे भरणे आम्ही इकडे भरितो. इकडे निकड येखादी कामाची असललियास लेहून पाठऊ

---

१ संधि (?) २ निरोप, बोलणें. + अक्षर बाजीरावाचें.

तेव्हा येणे. दोनी लस्करें येका जागा होऊन पैका कैसा मिळेल? याकरितां लिहिले असे व आलो नाहीं. लोभ असो दीजे. पैका सातारियास रवाना करणें. वालखेडीयास गेला तरी कार्यास येईल अगर हुंडीने आला तरी कार्यास येईल; परंतु रवाना करणे. हा आसीर्वाद. रा उदाजी पवार व रा मल्हारजी होलकर याचे समाधान बहुता रीतीने गोडीने गोड सब्दे राखणे. हा आसीर्वाद.

छ २९ रजब मुा नजीक बागलाण.

¶*Bajirao communicates to Chimaji his intentions of going to Deogarh and Bundelkhand and orders him to attack and plunder Ranoji Bhosle, should he encounter him in Malwa.*

No. 34] *[10-1-1729*

श्री

श्रीमंत राजश्री आपास्वामी साहेबांचे सेवेसी

अज्ञाधारक धोंडाजी माहादेव सा नमस्कार विनती विज्ञापना. ताा छ २० माहे जमादिलाखरपाऊतो स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान येथास्तित असे. साहेबी कासिदाबरोबर व जासूद आपण पाठविला होता त्याजबराबर पत्रे पाठविली तेथे अज्ञा ते पाऊन संतोश पावलो. साहेब पुन्यपुरूश आहेत. दिग-विजय जाला याजवरून परमसंतोश पावलों. तेथे अज्ञा केली की श्रीमंत राजश्रीस आपण पत्रे लिहिली आहेत तरी तुम्ही मुजरत जासूद पाठऊन उतर आणून पाठवणे. आज्ञेप्रमाणे आपण कासिदांबराबर जासूद देऊन लस्करास पाठविले. त्यास माहोर प्रांती श्रीमत राजश्रीपासी पत्रे पाठविली. त्यास तेही स्वामीस प्रत्योतरे दिल्ही, तें कासिदाबराबर पाठविली आहे. त्याजवरून साकल्यें कळो येईल. श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीन आपणास अज्ञापत्र पाठविलें तेथे अज्ञा की स्वामीपासी द्रव्य जमा आहे; त्यास मार्ग कठीण, याजकरितां बऱ्हाणपुरीच्या साउकाराची पत्रे उजनीस पाठवावी की तेथून हुंडिया करून बऱ्हाणपुरास आणवावी. बऱ्हाणपुरीहून चालती हुडी करून सातारा रा अबाजीपंतापासी रुा पावत ते करणे येसे लिहिले. त्यास आपण आज्ञाधारक. उजूर कार्य आहे. त्यास सांप्रत स्वामीसी व उजनीकरासी सल्लख अद्याप जाला नाही. स्वामीचे रुा उजनीमध्ये कैसे पावतात आणि साउकार हुंड्या कोन्हे विचारे करून देतील याजकरिता विज्ञापना केली जाती की साहेबाचा सल्लख उजनीकरासी जालिया सावकारास मातबर दुकानी रुा देऊन, आमच्या जागाच्या हुडिया पाठवाव्या. आपण रुा अवरगाबाजेस रा बाबूरायापासी देऊन रसीद घेऊ. तेथून ते

सत्तरुशीस रुा पावते करितील. अगर आपणासच अज्ञा होईल तरी चालती हुब्या सावकारापासून करऊ. हुडणावळी करार चालो देऊन रुसीपर्वतास पावते करून अगर सलूख उजनीचा न होये तरी जे द्रव्य असल ते आपले इतबारी स्वारापासी द्यावे. बराबर पांचसातसे स्वार देऊन बऱ्हाणपुरास पाठऊन द्यावे. आपण येथून हुब्या करून देऊन रुषिपर्वतास पावते करून. या दोहीविचारामध्ये जे पसद पडील ते करावे. याजउपरी दरबारी वर्तमान क्षणक्षणा लिहीत जाणे म्हणून अज्ञा केली. त्यास श्रीमंत राजश्रीची स्वारी गोदातीरास आली. त्यास नवाब येवजखाजीनी रा। गणेशपंत कुटे यास पाठऊन सलूख केला की आपली जागीर वऱ्हाडी आहे, त्या प्रातामध्ये न जावे. माहोर प्रातामधून देवगडी प्राते जावे थैसा पैगाम केला तो रा।   नी मान्य केले. त्यासी सलूख रक्षून माहोर प्रांतामधून देवगड प्राते गेले. नवाब निजामुनमुलुक भागानगर प्राते महिदर्गी प्राते अपाराय यळमा याच्या गडीवर आहेत थैसे वर्तमान आहे. माहाराज स्वामी रुषीपर्वती आहेत. सर्व वर्तमान अजीपाउतो स्वस्तिक्षेम असे. स्वामीस विदित होवे याजकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶Dhondaji Mahadev, Davalji Somvanshi's Karbhari, writes to Chimaji Appa news of Bajirao's movements and the way in which money can be sent to the Deccan. This is after the fall of Daya Bahadur.

No. 35] [*11-1-1729*

श्री

श्रीमत् महाराज राजश्री
पंत आपा स्वामीचे सेवसी

विनंती सेवक आज्ञाधारक मंडोजी (लाडोजी?) पा। ढमढेरे का। तलेगाऊ सां। दंडवत विनती. विनवावया प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ता। छ २१ जमादिलाखरपर्यंत श्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित आसे. यानंतर स्वामीकडील वर्तमान काही कलत नवतें. त्यावरी राणोजी व येकोजी जासूद याजबराबरी तुमची पत्र सातारियास गेली. त्याणी वर्तमान सागितले की उजनीचा सुभा दयाबहादूर बुडविला. यैसे वर्तमान यैकोन बहुत संतोश जाला. यानतर श्वामीनी

मतवाली घोडी आपणापासी जाते वेलेस ठेविली ते सबर आहे. तिची निगादास्त सागितल्याप्रमाणे करीत आहो. श्वामीस कलावे म्हणऊनं लिा आहे. यानतर तीर्थरूप राजश्री जानोजीबावानी जाते वेलस श्वामीस विनती केली होती की येक घोडा तुरकी मातुश्रीकारणे दिल्हा पाहिजे; त्यावरून श्वामीनीहि मान्य केले. तरी राजश्री खंडबा तेथे आहेत. त्यासपासी येक घोडा मातुश्रीस बसावया योग्य दिल्हा पाहिजे. श्वामी म्हणतील की खंडबाकडे घोडे सापडले आहेत. तरी त्यावरी चालढकल दिल्ही न पाहिजे. खामखा येक घोडा तुरकी दिल्हा पाहिजे. विशेष ल्याहावे तरी श्वामी सर्व जाण आहेत. बहुत काये लिहिणे. हे विनती १००००

¶*Mandoji Patil Dhamdhere congratulates Chimaji on his victory over Daya Bahadur.*

No. 36] [*23-1-1729*

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल माघ शुध पंचमी गुरुवार मुा नजीक नागपूर प्राा देवगड. तुम्ही आपणांकडील कुशल वृत लिहून पाठवीत जाणें. येथील वर्तमान पूर्वी तुम्हांस लिहून पाठविलें आहे त्यावरून कललेच असेल. सांप्रत मजल दरमजल येऊन देवगडचे सरदेमध्ये मुकाम केला. द्वेवगडकरी यांकडून येसाजीपंत नेगी (?) व रा लक्षुमणजी खंडागंले तहरहच्या मुकदम्यास येऊन बोलीचाली केली. मातबरच बोली करावी यैसा विचार होता, परंतु देवगडकरी याणी येकनिष्ठता बहुतच धरिली. यास्तव विचारानरूप समयेपरत्वे त्याचे मर्जीमाफकच बोली कबूल करून सौरहश्य संपादिलें. पुढे त्याणी हरयेकविसी श्नेहाने वर्तावे यैसा सिधांत करून बुंधेलखंडाकडे यावयाचा विचार केला आहे. याउपरी मजल दरमजल त्या प्रांते जाऊन वर्तमान लिहून पाठऊन. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao informs Chimaji of his intention of going to Bundelkhand.*

No. 37] [January 1729

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब स्वामींचे शेवसी

पोश्ये धोंडाजी महादेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशळ सदैव लेखनअज्ञा केली पाहिजे. स्वामी रुषीपर्वतीहून[१] नर्मदा पार गेले, त्याउपरी यौवनाकडील दयाबहादुरासी आपणासी योध्यप्रसंग जाला, त्यास पराभवातें पाठविले, दिगविजय जाला, हें ऐकोन परमसंतोश जाला तो कोठपर्यंत ल्याहावे ? स्वामी पुन्येपुरुश येशस्वी आहेत. आम्हाला त्यांचे छत्र आहे. साइबांचा दिगविजय होवा हेच इच्छीत आहो. त्यास सांप्रत ऐकोन आनदाते पावलों. परंतु साद्यंत वर्तमान कळो येत नाहीं. याजकरितां सेवेशी विज्ञापना लिहिली आहे. तरी कृपा करून साद्यंत वर्तमान लिहिले पाहिजे. तेणेकरून चिताचे समाधान होईल. आपण चित्तवृतीपासून कल्याण स्वामीचे इच्छितो की सदासर्वकाळ विजय होवा. स्वामीकडील दिगविजय जाले हे वर्तमान ऐकोन श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीस वार्तिकाबराबर लेहून पाठविले आहे. आपणाकडील साद्यंत वर्तमान लेखन होऊन आले म्हणजे सविस्तर लेहून पाठऊन. सेवेशी विदित जाले पाहिजे. आपण भाग्याचे विभागी म्हणवितो. पूर्व कृपेची वृद्धि केली पाहिजे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Dhondo Mahadeo congratulates Chimaji Appa on his victory over Daya Bahadur.*

No. 38] [January 1729 ?

श्री

श्रीमंत राजश्री अपासाहेब स्वामीचे सेवसी

अज्ञाधारक धोंडाजी माहादेव सा नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ माहे जमादिलाखर स्वामीचे कृपादस्टीकरून वर्तमान येथास्तित आहे. स्वामीचे सेवेस वार्तिकाबराबर पत्रे पाठविली होती. याचे उतर आज्ञाधारकास लेहून पाठविले तेथे दयाबहादुराचे वर्तमान साकल्ये लिहिले. त्याजवरून परम संतोश (जाला). साहेब पुन्येपुरुष आहे. दिगविजये जाला. हे सर्व राज्यामध्ये कीर्ति जाली. येश मोठे प्राप्त जाले. यैसेच उतरोतर श्री दिगविजई करील हा

१ ऋषिपर्वत = सप्तर्षि = किल्ले सातारा.

आपणास पूर्ण भरवसा आहे. सांप्रत आपणास आज्ञापत्री हुकूम केला की राजश्री पंत प्रधान कोन्हे प्रांते येणार हे बातमी आपणास लिहीत जाणें. त्यास आपण आज्ञाधारक, आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली जाईल. सांप्रत श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीची स्वारी नांदेड प्राते आली आहे. त्यास रा कान्होजी भोसले व सवाई सताजी भोसले या उभयेताची भेटी जाली म्हणजे देवगडी प्रांते यावे ऐसी वार्ता आहे. सेवसी विदित जाले पाहिजे. नवाब निजामुलमुलकाची वार्ता अवरगाबाजेस यावयाची वार्ता आहे. तहकीक खबर अलियां सेवसी लेहून पाठवितों. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶Dhondaji Mahadeo congratulates Chimaji Appa on his success against Daya Bahadur. He further informs him of the probable arrival of Bajirao at Deogad and of the Nizam at Aurangabad.

No. 39] *[3-2-1729 ?*

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवस विनंती

आज्ञाधारक धोंडाजी माहदेव कृतानेक सा नमस्कार विनंती. ता छ १९ रजबपाउतो स्वामीचे कृपादस्टीकरून वर्तमान येथास्तित असे विशश. या प्रांताचे वर्तमान तरी नवाब निजामुनमुल्क भागानगरी आहेत. नवाब यैवजखानी अवरंगाबाजेहून स्वार होऊन दाहाबारा कोसावरी मोकाम केला आहे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान देवगडावरी श्वारी केली अहे. वरकड वर्तमान तरी येथास्तित आहे. रा श्रीपतराय व रा फतेसिंगजी माहोर प्रांते आले आहेत यैसी वार्ता अहे. साहेबी दोनी च्यार वेला लिहिले, यैसियासी तर्तूद बहुत केली. परंतु परस्तुत अनकू(ल)ता योजून येत नाहीं. येदंनिमित्य कासिदास बहुत' प्रकारे सांगितले अहे. अनकूल जालिया सेवस पाठऊन देऊन. विदित जाले पाहिजे. साहेबी आपणाकडील वर्तमान ल्याहित जावे. तेणेकरून संतोश होत जाईल. विशश काये लिहिणे, कृपालोब असो दीजे, हे विनंती.

¶Dhondo Mahadeo informs Chimaji Appa of Bajirao's attack on Deogad. The news about the Nizam's arrival at Bhaganagar and Shripatrao Pratinidhi and Fatesing at Mohor is also given.

No. 40] [पौ *10-2-1729 ?*

छ २२ रजब

श्री

राजश्री आपा गोसावी यांसी

श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित संताजी जाधवराव दंडवत विनती. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखणआज्ञा केली पाहिजे विषेश. आम्ही गंगथडीस माहालमुलकामधे जातों. आपणास कलावे यास्तव लिहिले असे. आपण हरयेकविसी कागदीपत्री नवाबास व राजश्री आनदराऊ सुमत यास लिहून कामकाज सुरलीत चाले ते करावे; व रा॥ आवजी कवडे यासी प्रा॥ आमलनेर याविसी लिहावे. निमित्य की तेथे जागिरदार नूतन जाहाला आहे तो सुदामत तहावर येत नाही. हरयेकविसी मदत करीत ते केले पाहिजे व मौजे तोंडिलें[1] व मौजे लोणी ता॥ निरथडी हे गावी खासगत घोडी सिंगरे वगैरे कारखाना आहेत; च्यार सेरेकर[2] आहेत, चाकर आहेत, दोन घरे कुणबियाची मात्र आहेत; वस्तीस मात्र जागा आहे. वेटबेगार व फर(फड) फर्मासीचे माहालाचे रोखे होतात, तर आपण राजश्री बापूजीपंत यास सांगोन या दोन्ही गावावर कृपा करून रयांत[3] होये ते करवावे. येविसी वारंवार विनंती लिहावी येसे नाही. आमचा अभिमान धरिला आहे तो सर्वप्रकारे सिधीस नेऊन आमचा सांभाल केला पाहिजे. बहुत लिहावे तर आपण सर्वजाण आहेत. कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब सूद

¶*Santaji Jadhav, son of Dhanaji, to Chimaji, requesting attention to his difficulties in collecting the land dues.*

No. 41] [*17-2-1729*

छ २९ रजब

श्री

श्रीमत राजश्री आपास्वामी साहेबांचे सेवसी

अज्ञाधारक धोंडाजी माहादेव कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. ता॥ छ ९ रजबूपाऊतो स्वामीचे कृपादस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे.

---

१ तोंदळ शिरवळजवळ, ता. पुरंदर. २ शेरी जमिनीचे म्ह. इनामी जमिनीचे मालक.

३ सूट.

साहेबी अज्ञापत्र पाठविले तेथे अज्ञा की त्या प्रांतीचे वर्तमान लिहीत जाणे. त्यास श्रीमत राजश्री देवगडप्राते स्वारी करोन आले. नागपुरीहून आपली माणसे आली. स्वामीस पत्र आले ते सेवसी पाठविले आहे त्याजवरून कळो येईल. देवगड प्रांतीचा तहरह होणार होता तो जाला असल अगर होईल. नवाब निजामुनमुलकाचे वर्तमान तरी अपाराय येळमायाचे गढीस लागले होते. तेथील बंदबस्त करून फिरून भागानगरासंनिध आले. अवरंगाबाजेस येणार म्हणून वर्तमान आहे. साहेबास विदित होवे. याजउपरी नवाब येवजखानी शाहरीहून स्वार जाले, घाटावरी आले. अलजपूरप्रांते येणार म्हणून वार्ता आहे. राजश्री श्रीपतराय नांदेडप्रांते आले येसी वार्ता आहे. महाराज श्री रुषीपर्वती आहेत. विदित होये. साहेबी कासिदच्या जोडियाचेविशई लिहिले होते. त्यास आपण कासिदचा मिर्धा बोलाऊन सांगितले. त्यास परस्तुत लस्करास यावयाचे त्याचे अनकूल पडत नाहीं. आपण तलाशामध्ये अहो. जासूद अगर कासीद अनकूल पडालिया पाठऊन देऊ. आपणाकडील क्षणक्षणा येणाराबरावर वर्तमान ल्याहवे म्हणजे श्रीमत राजश्री कडे पत्र पावत जातील. आपण अज्ञाधारक अहो. सेवसी विदित जाले पाहिजे. कृपा लोभ पूर्ण असो दीजे. वरकड वर्तमान राजश्री बाबूरावजीनी लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶*Dhondaji Mahadeo to Chimaji Appa, giving news of Bajirao and the Nizam's movements.*

No. 42] [*25-2-1729 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री आपा

स्वामींचे सेवेसी

सेवक बाजी अनंत कमावीसदार प्रा बढवा वगैरे प्रा तलाटी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ ७ साबानपरियेत येथास्थित आसे. यानंतर राजश्री सयाजी गुजर नर्मदा उतरोन, प्रा मारी येऊन मुकाम केला; आणि तमाम तलाठीचे जमीदारास मसाले करून आणिले. आपणहि पलीकडे जाऊन भेटलो की, 'मुलुकात स्वारी पाठविली, लुटितात; धामधूम न करणें. मुलूक राजश्री पंतप्रधान याचा आहे, ते शब्द लावितील.' कितेक प्रकारे सागितले. परतु नायैकेत. बोलिले जे, सरकार माडेवगड आपले मुकासे;

तुम्हास बोलावयास प्रयोजन काये ? मुलुकाचा उसूल यैवज घेतो. दरबारी प्रसग पडिला तर, जाब देऊन. प्रा मार व प्रा बगोद व प्रा कन्हई व प्रा धारगांव व प्रा महेश्वर व प्रा धर्मापुरी व प्रा काटकूट येणेप्रा प्रगणे मिलोन, दा हजार वसूल घेतला. व बढवाईचा घोडा नजर व तमाम मुलूक लुटिला. जालून रबी चोरिली. गुरे ढोर नेली. गुंढी[1] लुटिली. याप्रा नाश केला. याजमुले तमाम तलाठीचे आमल बद जाला. आपण लस्करचा मार्ग लक्षीत बैसलो आहे. उठोन जाऊन, जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. विशेष काये लिहिणे. हे विनती.

¶*Baji Anant to Chimaji Appa, complaining about Sayaji Gujar having plundered the districts of Badhwa and Tilati.*

No. 43] [*8-3-1729*

छ १० रमजान

श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्ये राजश्री चिमाजी आपास प्रति चिमणाजी दामोदर कृतानेक आसीर्वाद. येथील क्षेम फालगुन बहुल पंचमी भृगुवासर मुा कसबा बहादुरपुरा[2] क्षेम जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. तुम्ही गेलियातागाईत कांही वर्तमान कलत नव्हते. याकरितां समाधान नव्हते. त्यास उजनच्या सुभियाचें वर्तमान तुमच्या विजियाचे यैकिले. त्यावरून समाधान जाहाले ते कोठवर ल्याहावें ? परंतु तत्वता कलले नव्हते. तो तुमच्या लस्करातून रा भास्कर माहादेव रा अंताजी रुद्र याच्या गोटातून आले. त्याही सविस्तर वर्तमान सांगितलें. ते रोजी साकर वाटिली. हर्ष यैसा जाहाला कीं, बहुतांच्या तोंडास कालिमा लागली. या कार्यावरून येशाचे नगारे विख्यात जाहाले. श्री तुम्हास कल्याण करू. याउपरी लौकरच त्या प्रांताहून आगमन होईल. भेटी व्हावी यैसा हेत बहुत आहे. चिरंजीव राजेश्री बाजीराऊ देवगाडे प्रांते होते. प्रस्तुत कोणीकडे आहेत कलले नाही. रा श्रीपतराऊ व फतेसिग यैसे निर्मलेकडे आहेत. भागानगराहून नवाबहि म्हसे मुधोलावर आले आहेत. त्याची त्यांची विरुधताहि नाही आथवा भेटीचाहि योग नाही. कलावें म्हणून लिहिले आहे. पुढे काये होईल पाहावें. आमचे वर्तमान: नवाबाकडून दोन पत्रें आली आहेत कीं, लौकर येणे. त्यास जाणे जरूर. परंतु

---

१ गुढीं. आश्रयार्थ एकत्र एकादे ठिकाणीं जमलेला जमाव त्यास गुढे किंवा गुळे म्हणतात.

२ धुळ्याचे उ. ८ मैल.

खर्चाची तंगचाई बहुत आहे. परंतु जरूर जावे लागते. प्रतिपदेच्या मुहूर्ते स्वार होऊन. रुणानबंधे तुमचे दर्शन होईल तर, उतम आहे. आमचे स्मरण न टाकणे. बहुत काये लिहिणे. लोभ आसो देणे. हे आसीर्वाद.

हो चिरजीव राजश्री गणपतरायास आसीर्वाद. चिरजीव राजश्री आपास यश आले. बहुत सतोश जाहाला. बयाज[1] ल्याहावा तरी, त्या यशास तुम्ही विभागीच आहा. लोभ आसो दीजे. हे आसिर्वाद. हो चिरंजीव राजश्री बाजीरायास[2] आसिर्वाद उपरी. युध्यामध्ये तुम्ही बहुत कस्त केलीत, ते समई तुम्हास गोली लागली याकरिता खेद जाहाला. परंतु श्रीने येश दिल्हे हे श्रवण होऊन खेद दिगांतरी जाऊन, हर्श आतिशये जाहाला तो कोठवर ल्याहावा? बरे. चिरंजीव आपाच येशस्वी आहेत. त्यांचे तुम्ही विभागी आहा. भेटी होई तर उतम आहे. बहुत काये लिहिणे लोभ आसों दीजे. हे आसीर्वाद.

¶*Chimnaji Damodar congratulates Chimaji Appa on his victory over the Subhas of Malwa and gives news of the Nizam.*

No. 44] *[April 1729?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवसी विनंती

आज्ञाधारक धोंडाजी माहादेव कृतानेक सा। नमस्कार विनंती. ता। छ[3] माहे सवालपाऊतो स्वामीचे कृपादस्टीकरून वर्तमान येथास्तित असे. स्वामीनी जासुदाबरोबर आज्ञापत्र पाठविलें तेथे आज्ञा की, इंदुराकडील यैवज काय आला आणि तुम्ही रूसीपर्वतास काय रवाना केला? त्यास, रा। कुसाजी गणेशानी दोनी वेळा मिलोन हुंडिया पाठविल्या; रु २७५३३॥। पाठविला. त्यास येथे प्रसंग विपर्यास देखोन येथून हुंडी अवरंगाबाजेची रा। कृस्णाजी नाईक जोसी याच्या नावे करून रवाना केली सतावीस सहस्र; त्यास दर सदे हुंडिणावली रु १ प्रा। दिल्हा. अवरंगाबाजेहून सातारियास रा।। नाईकी रा। दादोपंताच्या नावे हुंडी करून रूसीपर्वतास रवाना केली. त्यास येथे यैकिलियात आले आहे की, अवरंगाबाजेहून हुंडी सातारियास जाते, याची दर ती हुंडिनावण घेतात. स्वामीस विदित होवे याजकरितां लिहिले आहे. बाकी आपणाकडे पाचसे पावणेचौतीस रु। राहिले आहेत. त्यास आणीक हुंडिया,

---

१ तपशील. २ बाजी भीवराव रेठरकर. ३ तेरीख मुळांत लिहिलेली नाहीं.

कुसाजी गणेश[1] याजकडून सांप्रत यैवज येणार हा यैवज आलिया, बाकी व हाली रुा येतील ते पाठऊन देऊन. आपणापासून अंतर पडणार नाहीं. याजउपरी आपला मार्ग युवेन[2] पाहात देवगडी प्रांते राहिला होता, त्यास, स्वामीच्या आगमनाचे वर्तमान यैकोन याची वार्ता अवरंगाबाजेस यावयाची आहे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान पूर्व देशामध्ये गेले आहेत, त्याचे साध्येंत वर्तमान किमपि येत नाही. याजकरितां मुजरत कासीद अजुरदार करून पाठविला आहे, तोहि अद्याप आला नाही. विदित जाले पाहिजे. रा श्रीपतराय व रा फतेसिंगजी व रा कान्होजी भोसले मुल्य युवनांस[3] भेटले. पुढे मनसुबा होईल ते पाहावे. आपणास या प्रांतीचे वर्तमान श्रुत होवे म्हणून लिहिले आहे. साहेबी श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजकडे मुजरत कासीद अजुरदार करून जेथे असतील तेथे पावऊन जाब आणऊन पाठवणे म्हणून लिहिले. आज्ञेप्रा कासीद अजुरदार करून पत्रे रवाना करून जाब आलिया सेवस प्रविस्ट होईल. व रा दिगंबरपंत तो अद्याप आले नाहीत. त्याजकडेहि पत्र प्रविस्ट करून. स्वामीनी धनाजी पवार व राणोजी चव्हाण यास रुा १० दाहा देविले ते आज्ञे-प्रमाणे प्रविष्ट केले. विदित होये हे विज्ञापना.

¶*Dhondaji Mahadeo to Chimaji Appa, informing him of his having remitted to Satara a sum of some 27,000 rupees received as dues from Indore. The writer further gives some news of the North, that some Mussalman official was at Deogad but intends to proceed to Aurangabad and that Shripatrao and Fatesing and Kanhoji Bhonsle had an interview with the Nizam.*

No. 45] [*4-4-1729*

श्री

नकलपत्र राजश्री पिलाजी जाधव

वेदशास्त्रसपन माहाराज राजश्री नारायण दीक्षित स्वामीचे शेवेसी सेवक चरणरज पिलाजी जाधवराऊ साा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ रमजान मुाा धरणेंपारणें स्वामीचे आसीरवादेकरून सुखरूप असों. यानंतरी या प्रांतास आलिया देवगडचे सल्य संपादून गळ्यावरून आलों तो महमदखान बंगश प्रयागचा सुभा वीस हजार फौजेनसीं आला. त्यास सिकिंदीं[4] करून कोंडिला आहे. त्यांच्या लस्करांत तीं रुपयांचा सेर अंन जाले आहे.

---

१ हा पिलाजी जाधवाचा इसम इंदुरास असलेला. २ यवन.

३ निजामास. ४ जेर करून.

रसद कुली बंद केली आहे. या आठां दिवसांत त्यांस बुडऊन टाकितो अगर सलियास आला तरी सला करून लवकरीच देशास येतों. स्वामीचे दर्शन जालियावरी सविस्तर वर्तमान निवेदन होईल. पूर्वी स्वामीनीं आसीरवाद दिल्हा त्याप्रो येमुनातीरपर्यंत आपला अमल जाला. लस्करचे लोक महायात्रेसहि गेले आहेत. स्वामीस वर्तमान कलावे म्हणोन लिहिलें असे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Narayan Dikshit, informing the latter of his having besieged Mohammad Khan Bungash and having extended Maratha conquests up to the Jumna. The date corresponds to the entries in the Diary.*

No. 46] [*19-4-1729*

श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव विजयी भव * * * राजश्री चिमाजी आपा यासी चिमणाजी दामोदर कृतानेक आसी (र्वाद). क्षेम वैशाख शुध द्वितीया मंद (वासर) बहादरपुरा जाणून स्वकीये कुशल (लेखन) केले * पाहिजे विशेष. बहुत दिवस पत्र पाठऊन कुशल वर्तमान लिहिले नाही * * ध समाचार कलत नव्हता. परंतु दयाबाहादुर याचा पराभव (करून कि) तेक देश आक्रमिला हे (पर) स्पर कलोन संतोशावाप्ती * * * ता प्रस्तुत आजच राज (श्री) सोनवणी याचें पत्र * * * * * पलसनेर प्रा खंबायत * * * बहुत संतोश जाहला * * * की भेटी व्हावी. त्यास धुल (यास) फौजेचे मुकाम जाहाली (वर) व राजश्री गणबास पुढें पाठवणे. आपली भेटी जाहालियाने जैसी * तजवीज तुमच्या व याच्या विचा (रे ठरे) ल त्याप्रमाणे विचार केला जाईल. परंतु लक्ष प्रकारे भेटीचा प्रसंग होये ते करणे. बहुत काय लिहिणे ? मानाजी, जा (धव) याने बहुत बेइमानी मांडिली आहे, (आम्ही) * * औषध आहे कांही चिता (नाही तु) म्हास कलावे म्हणुन लिहिले. (बहुत का) ये लिहिणे. लोभ असो (दीजे हे विज्ञापना)

¶*Letter of Chimnaji Damodar to Chimaji Appa, written after the death of Daya Bahadur.*

1208

No. 47] [27-5-1729 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

सेवक आज्ञाधारक गोविंद कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ ९ जिलकादपावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून जुन्नर प्रांतीचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रें आलीं तीं पावलीं. सविस्तर वर्तमान कललें. गगनास गवसणी घालून उतर दिश्या जिंकोन दक्षणेकडील शाह जिंकोन सर्वांचे गर्व परिहार करून येशाकीर्ति भूमंडली न माये यैसा कीर्तिघोष स्वामीचे पदरी पडला हें संतोषाचे वर्तमान यैकोन सेवकास बहुत अल्हाद जाहाला तो त्रैलोक्यांत न माये यैसा जाहाला. वरकड आज्ञापत्राचें प्रतिउतर बितपसील.

पाईटचे रुपये पांचसें घेणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे वसूल घेऊन रा सिवरामपंताकडे जमा केले. मजकूर.

१

शंक्रांत जाहलियानंतर दुलाजी मोरया याजबरोबर तिळगूळ व पत्रें पाठविली त्यास बहुत दिवस जाहालें. स्वामीकडे पावली कीं नाही हें न कले. मजकूर.

१

श्रीभीमाशंकरी कमलजेच्या तळ्यावर बेलदार गुदस्तां लाविले होते. आगाव त्यांजला शंभर रुपये दिल्हे आहेत. आणखी दोन तीनसे देऊन काम चालीस लावणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे त्यांचा तलाश केला परंतु कोठे ठिकाण लागेना. मजकूर.

१

गला च्यार हजार रुपयांचा खरिदी करणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे दर रूपयास सेरी मापे नव पाईली प्रेाा गावगना सि * रून ताकीद केली. मजकूर.

१

स्वामीने कितेक (बु) धिवाद लिहिला. (ये) थें चितांत धरून वर्तणूक करून. मजकूर

१

जुनर प्रांतीचा वसूल गुदस्तांप्रमाणे घ्यावयाची ताकीद केली. (पिक) ले गेले यैसे ज्या गांवाना पीक असेल त्याला जमावंदीचे समई (रया) येत करावी लागेल. मजकूर.

१

आंगरे देशमुख याणी सालगुदस्ता हक घेतला नव्हता. सालमजकुरी गुदस्तांचा हक व सालमजकूरचा हक

या प्रांती जरीचा[1] उपद्रव जाहाला. घरोघर गावांचा गांव माणसे दुखण्याने पडतात. बरी होतात. ज्याची दोरी तुटली ते मरतें. मजकूर.

१

आपले आज्ञेप्रा वसूल घेतात. हक दोहीकडे दोन द्यावे. भिकणे[2] दोहीकडेहि देऊ नये म्हणून आज्ञा. आज्ञेप्रा ताकीद केली. मजकूर

१

येणेप्रमाणे मजकूर स्वामीस विदित व्हावा म्हणून शेवेसी लिहिलें असे. शेवेसी श्रुत होये. वसूल बाकी सालमजकूरची स्वामीने आणविली. यैसियासी वसूल गावाचा गाव वरचेवर होतच आहे. यामुळे जमाबंदीचे वगैरे गांवचा वसूल कलेल. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असों दीजे हे विज्ञाप्ति.

¶Govind Krishna, Peshwa's mutalik at Shrivardhan, to Chimaji Appa, congratulating the latter upon his conquest over both North and South. Some details regarding the province of Junnar, which was under him, are given in the sequel.

No. 48] *[26-6-1729 ?*

छ २९ जिल्हेज

श्री

पुा राजश्री चिमाजीपंत आपा गोंसावियांसी

विनंती उपरी. राजश्री बाजी भिवराऊ व चिरंजिव राजश्री आपा यांची पत्रें छ १९ जिलकादची जाधवहटीचें मुकामचीं आली. सर्व सुखरूप आहेंत. पलीकडील उद्योग संपादून जाधवहटीमध्यें प्रस्तुत आहेंत. दिलीहून मंहमदखांन बंगस ग्वालेरीस येत होता. चंबेलीचे रेतीमध्यें आपले फौजेचे वर्तमान ऐकिलें, मग तेथेच मुकाम करून राहिला. आपल्या फौजा जाऊन चारपाच रोज सिकंदा[3] केला. मग त्याचकडलि भला माणूस आला. इकडून राजश्री कुसाजी गणेश पाठविले होते. राजश्री राऊ स्वामींचा तिकडे श्नेहाचा विचार, याजकरितां ते गोष्टीवर नजर देऊन फौजा फिरोन आल्या हे वृत त्याणी लिहिले होतें. आपणास

---

१ जरीमरीचा.

२ जकातीवरील पट्टी.

३ सिकंदा = तंग, हैराण.

कलावें याज करितां लिहिले असें. विशेष कार्ये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती. सांप्रत पर्जन्यकाल समीप आहे. येथे सारची पागेची घोडी आहेत त्यास पाऊसात मोमजामे[1] पाहिजेत, यैशियास जामदारखानात मोमजामे आसतील तरी दोन तीन मोमजामे पाठविल पाहिजेत. विशेष कार्ये लिहिणे हे विनंती

मोर्तब
सुद

¶*Pilaji Jadhav to Chimaji Appa, writing about the opposition he encountered from Mohammad Khan Bangash, and mentioning the overtures of peace which had been opened with him.*

No. 49] [पो *22-7-1729 ?*

पै. छ ६ मोहरम.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. स्वामीनी लिहिलें कीं रा मलारजी होलकर व राजश्री राणोजी सिंदे व राजश्री कंठाजी कदम व राजश्री आनदराऊ पवार यैशा तमाम फौजा मारवाड प्राते पाठविल्या. समागमेच अवघ्या फौजा असिल्याने राणाजीच्या व सवाईजीच्या मुलकास उपद्रव देता न ये. येवढ्या लस्करास पोटास तो पाहिजे, यास्तव मार-वाडांत पाठविल्या म्हणून लिहिले. यैसियासी स्वामीनी विचार केला तो उ(त्तमच केला.) फौजा त्या प्रांते गेल्या. यामुले अभयेसिंग यासीहि शह बसला व त्याच्या मुलकास उपद्रव दिल्याने सवाईजीच्याहि मनोदयानरूप जाहाले. पुढे अभयेसिंग कमरदिखान याजकडील लगा उडऊन स्वामीच्या विचारांत येतील व आपली फौजहि ताजी जाहाली आणि जेव्हां काम लागेल तेव्हा येऊन हाजीर होतील. साराउष स्वामीनी विचार केला हा सर्वागोस्टीनी उतम केला. विदित जाहाले पाहिजे हे विनंती.

¶*Purandare to Bajirao, communicating Shahu's approval of Bajirao's action in having dispatched Holkar and Sindia into the Jodhpur territory.*

---

१ मोमजामा = मेणकापड.

No. 50] [1729 ?

छ ६ मोहरम

श्री

पुा राजश्री पंतप्रधान गो-

सावियांसी,

विनंती. राजश्री बाजीराऊ व चिरंजीव राजश्री आपा याजकडील कागदपत्र स्वामीस येतच असतील. त्या प्रांतीचे तो कामकाज उरकलेच आसेल. त्यास तिकडील मनसबियानुरूप त्यास जे आज्ञा कर्तव्य ते आपण करितील. कदांश्चित दोनी सैन्ये येकत्रच व्हावयाचा विचार करिजेल तरी चिरंजीव स्वा * * * येतील, त्याचा परामर्ष करणार आपण (आ)हेत. आम्ही ल्याहावे यैसे नाहीं. परंतु सूचनार्थ लिा आहे तो विचार स्वामीचे विचारे उतरेकडील मनसबियासारखा न जाला तरी त्यास आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*To Bajirao probably from Retrekar, asking news of Chimaji Retrekar.*

No. 51] [1729 ?

श्री

+उपरी रा निलोबा येथे रात्री पावले. सांगून पाठविले वर्तमान ते कळले. यैसियास दयाबाहादुराचे लेक उजनीस आहेत ; त्याचे कासीद दिलीहून आले होते ते आम्हास येथे सापडले. त्याजपासी वकिलाचे कागद होते ते वाचून पाहिले. त्यात सविस्तर सैदाचे सुभेदारीचा व गिरधर बाहादुराच्या लेकाच्या सुभेदारीचा मजकूर लिहिला होता. *तुरेबाजखान तेथून निघाला (अस)ता तर खबर लिहिली असती. [पुढील किती ओळी गहाळ तें समजत नाहीं) सांगून पाठविली. उतम केले. तुम्ही आजचा दिवस बहुत सावधता करणे. आम्ही आज येथील निर्गम करून लस्करास येतो. हे आसीर्वाद. जनाजी सितोले यास नारोपंतास सांगून जोट येक तीचौच्या रुपयाच्या किंमतीचा जामदारखानात असला तर देवणे हे आसीर्वाद.

¶*Niloba mentioned in the letter may be the Chitnis, son of Balaji Awji. Chimaji Appa writes this letter to some Sardar mentioning news from Delhi regarding Daya Bahadur and Girdhar Bahadur's sons' appointment to offices in Malwa.*

+ सबंध पत्र चिमाजी आपाच्या हातचें आहे.

No. 52] [1729 ?

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावियांसी.

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो धिराजी पवार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केला पाहिजे विशेष. सांप्रत गोसावियाकडून पत्र येऊन परामर्श होत नाहीं हे आपणास विहित नाहीं. आम्हास कितेक प्रकारें अवलंब गोसावियाचा आहे. ज्या रीतीनें पहिले सांभाळ करीत आलां आहां त्यास उदासीनता केली. तथापि आश्रय आपलाच आहे. साह्यता प्रसंगीं आपणच करतील हा भरवंसा आहे. येंदा या प्रसंगात गोसावियानी आमचा बहुत अभिमान धरिला आण सातारा येतांच राजश्री स्वामीस आमचेविषई विनंती करणे ते केली. पुढें कितेक विचार कर्तव्य तों आपण याप्रांती येणार म्हणून स्थिर राहिला. त्यावर आम्हांस राजश्री ची आज्ञापत्रें व आपली पत्रें सादर जालीं कीं दर्शनास येणे. यैसियास आम्ही आपले आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत असतां येणेहि जालें. याउपर आम्हांस काय आज्ञा ते करावी. तदनुरूप वर्तणूक केली जाईल. विशेष लिहिणे तर गोसावी सर्वज्ञ आहेत. हे विनंती.

मोर्तब सुद.

श्रीराजारामचरणीं दृढभाव केरोजी पवारराव.

¶Dhiraji, son of Keroji Pawar of Nagar Devle, writes to Bajirao, requesting orders whether he should proceed to Satara.

No. 53] [1729 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक जानकोजी सिंदे पाटील मौजे कोनेडखेड सा कोरेगाव प्रा वाई दंडवत विनंती विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ता छ १० मोहरमपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित. स्वामीचे कृपेकरून समस्त सुखे असो. यानंतर चिरंजीव राजश्री राणोजी सिंदे याकडील वर्तमान काही कलत नाही. याकरिता स्वामीस विनंतीपत्र पाठविले. तरी

स्वामीनी त्याकडील संतोशाचे वर्तमान लेहून सेवकास सामाधान होये ते केले पाहिजे. लस्कर कोठे आले कोठे आहे, ते न कले. याकरिता सकल वर्तमान लेहावयास आज्ञा कीजे. आपण स्वामीच्या पत्राच्या उतराचा मार्ग चातकन्याये लक्षितो. सेवेसी सूत होये विज्ञापना.

¶Jankoji Sinde, father of Ranoji, inquires of the Peshwa where and how his son was faring in the latter's entourage. This letter shows that Ranoji's aged father was living long enough to see his son rise to great eminence in life. The whole letter is in one hand, doubtless the writer's own, from which we may infer that ordinary Maratha gentlemen in those days could write very well.

No. 54] [पा *1729 ?*

पा छ २० राखर

श्री

विनंती उपरी. राजश्री उदाजी पवार याचे मजुमदार येथे होते त्यास आम्ही येणेप्रमाणे बोली सांगून त्याकडे पाठविले असेत.

पहिला सरंजाम जो आहे तो, जर आनंदराऊ समजाविला तर, अगदी करार करू. आनंदराऊ न समजला तर जलगाव नेवासे देणार नाही. जैनाबाद चिखलवाहाल बेल्हे इतके देऊ.

पंचविसा हजाराचे हवाले पधराची व रा ची (?) दाहाची वरात, दाहाचे कापड, येणेप्रा द्यावे.

हती पाच आहेत ते द्यावे.

याप्रमाणे आम्ही निर्वाह करावा. त्यानी राजश्री स्वामीस कागद पाठवावा जे प्रधानपंत आमचे बरे करीत नाही. सेनापतीपासूनहि होत नाही. आपण जिकडे पोट भरेल तिकडे जाऊ. यैसी दोन तीन पत्रे राजश्रीस पाठवावी आणि सुरत प्रांतातून गुजरातेस जावे. सुरत प्रांतात जो यैवज वसूल घेतील त्यपैकी दरसदे पस्तीस रुपये आम्हास द्यावे. गुजरातेत सवा लक्ष रुपये आम्हास द्यावे. माळव्याचा त्याचा वाटा आहे त्यास होलकराबरोबर पाचसे राऊत देऊन वाटा घ्यावा, यैसी बोली सागून पाठविले आहेत. काये उतर येईल ते पाहावे. स्वामी आज्ञा करितील तैसी वर्तणूक करू. पूर्वी वासुदेव जोशाबरोबर पवार अंतस्ते बोली करून जात असले तर पाठवावे म्हणून निरोप आला होता, त्या आशयावरून हा मजकूर सांगून पाठविला आहे. आता आज्ञा येईल तैसी वर्तणूक करू हे विनती.

¶Chimaji communicates to Bajirao terms of settlement with the Pawars of Dhar.

No. 55] [पौ 1729

पा छ २० राखर.

श्री

विनंती उपरी. उदाजी आनंदराऊ उभयता समजले तर बरे. नाहीतर आनंदराऊ हती च्यार मागत नाही, येकच हती मागतो. पैका मागत नाही. जुना सरंजाम मालव्याचा वाटा दिल्हा म्हणजे चाकरी करितात. येसियास दाभाड्यासी कजिया करणे नाही. तेव्हा प्रयोजन पवाराचे आहेसे नाही, हे खरेच. परंतु मल्हारजी होळकराचे विचारे फार आग्रह आहे की दोघा भावासही पदरी घ्यावे. दोघांचे न बनेच तर आनदरायास तरी पदरी घ्यावे. फौज भारी होईल. मुलुकगिरी लांबपावेतो जाऊन करू. च्यार रुपये जाजती मिलतील यैसे मल्हारबाचे विचारें आहे. बांडे पवार येक होऊन मालवा लुटितील येसा अर्थ मल्हारबाचे चितात आहे. विचारे पाहाता खराच आहे. हे विनंती. दुसरा येक विचार आम्ही आनंदरायास सांगून पाठविले जे, जर उदबा आमचे पदरी न राहिले तर जो सरजाम देखील मालवा आहे तो निमे तुम्हास देऊ, निमे तुकोजी पवारास देऊ. तुम्ही व तुकोजी पवार पहिल्याप्रमाणे चाकरी करणे म्हणजे तुकोजी पवाराची गुदस्ताची समजावीस अगदी उडते. परंतु हे गोस्ट आनंदरायाच्या चितास येत नाहीं. सविस्तर वृत कलावे म्हणून लिहिले असे. जर आनंदरायानी निमे तुकोजीस सरंजाम द्यावा यैसे मान्य केले तर लक्ष प्रकारे दोघास पदरी राखावे हे उचित आहे हे विनंती.

¶*Chimaji proposes to Bajirao the arrangements to be effected with the Powars of Dhar. Udaji and Anandrao are brothers and Tukoji their cousin. Anandrao died in 1736. The letter is in Chimaji's hand, probably addressed to Bajirao. Perhaps this refers to the time when Chimaji with these Sardars was in Malwa.*

No. 56] [पौ 10-10-1729 ?

पा छ २७ रावल.

संध्याकाल.

श्री

पुा अपत्ये चिमाजीने कृतानेक नमस्कार उपरी. येथील क्षेम ताा छ २६ रबिलोवल यथास्थित असे. पहिल्या तहनामियात पवारास मालवा तिजाई मोकासा होता त्याप्रमाणे आम्ही त्यास द्यावयास सिध आहो. येसे असता हाली

त्यानी निमे मालवा मोकासा द्यावा येसा आड घातला आहे. त्यास सुभेदाराचेहि विचारे त्यास निमे मालवा मोकासा द्यावा यैसे आहे. परतु आमचे विचारास हे गोस्ट येत नाही. परंतु सुभेदारादेखता आम्ही स्वामीस पत्र लिहिले आहे त्याचे उतर पस्ट येक स्वामीनी ल्याहावे जे तिजाई मालवा जो पहिले मुकासा आहे त्याप्रमाणे हाली देऊ, जाजती देत नाही. आणि हवाला अगर येक रुपया नख्त द्यावयासी मिलत नाही येसे ल्याहावे व पोकल समाधानाच्या थोरपणाच्या गोष्टी ज्या लिहिणे त्या कागदात ल्याह्याव्या. परंतु कारभाराचा जाब पष्ट ल्याहावा. तो त्यास दाखऊ व स्वामीचे विचारे निमे मालवा कबूल करावा येसेच आले तर ते पत्र निरालेच आम्हास ल्याहावे. मग जैसा विचार बनेल तैसा करू. पैकियाची गोष्ट तो स्वामीनी मान्य केलीच आहे. परंतु त्यास दाखवावयाचे पत्र ल्याहाल त्यात येक रुपया द्यावयास अनकूल पडत नाही येसे ल्याहावे. ये गोस्टीचा विचार तात्यास बोलाऊन करणे. विचार तो करून उतर पाठवावे. आमचे मते तिजाईपेक्षा जाजती मोकासा मालवा द्यावा येसे नाही. आम्ही तो निरोप द्यावयास सिध अहो. परतु स्वामीस लेहून उतर येईल त्यासारखा निरोप द्यावा अगर मुदा कबूल करावयाकरिता च्यार दिवस मोघम रायास लिहून जाब आणितो येसे म्हणून ठेविले आहेत हे विनती.

¶*All in Chimaji's own hand, addressed to Bajirao : refers to the division of the country with the Pawars of Dhar.*

No. 57] [*18-12-1730*

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलाचे शेवेसी

अपत्ये चिमाजीने सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ ८ जमादिलाखर मो। ना। पा। बहाल वर्तमान येथास्तित आसे विशेष. पा। मेहूनबारे येथील गाडे व बैल संकराजी निकम याजकडे पाठविले आहेत. येणेप्रमाणे बितो.—

गाडे सुमार	बैल सर	तरवारा
२	३४	१ बिन परजी
बंदुखा सुमार		४ किता परजाचे
७		


येणेप्रमाणे निंबाजी सिंदा व पराणजी * * ला जासूद जा। ये माजी ना। याज बा। पाठविले आहेत. घेऊन पावलियाचे उतर पाठविले पाहिजे. याखेरीज

विठल निलकंठ याजकडे गाडा येक करार केला आहे. तो त्याजकडे माणूस पाठवून आणविला पाहिजे. +बहुत काये लिहिणे? कृपा केली पाहिजे. आज मेहूणबारे[1] येथून कूच करून बाहालेपासीं मुकाम केला. याउपरी मजल दर मजल जात असो. वरकड खानदेस प्रांतात कोठे घासदाणियाचा यैवज करार करू तो स्वामीकडे पावता होय यैसे करूं. स्वामीनी कर्जदारास यैवज दिहा (ल्हा) पाहिजे. गाडे बैल स्वामीपासी कोणी मागतील तर कोणास न द्यावें हे विनंती. सुभानजी भोकऱ्याबरोबर पत्रे पाठविली ती पावली. आणिकहि मागून स्वामीकडे पत्रें लेहून पाठऊ हे विनंती. येक गाडा बापूजी मेघशामाकडे दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶Letter from Chimaji to Bajirao from Khandesh on his way to the North.

+ Chimaji's own hand.

१ मेहुणबारें व बहाले तालुका, जि. खानदेश.



G.P.Z.O. Poona, 1930.

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

MARATHA CONQUESTS IN THE NORTH, 1732-35.


The years 1729-1732 were a period of comparative calm so far as northern affairs were concerned, the Peshwa's attention being confined to the south by home distractions caused by the rising of Sambhaji of Kolhapur, the defection of Dabhade at the instigation of the Nizam, and the protracted struggle with the Sidi of Janjira, on which King Shahu had set his heart. Of the three dangers, the first was easily overcome by Shahu, who sent an expedition against Sambhaji, subjugated him completely and concluded the famous treaty of Warna in 1731 which brought lasting peace to the two branches of the Chhatrapati's house. The conquest of Dabhade was however not a one-sided affair. Only after a campaign which lasted for some six months the Peshwa finally overcame his rival Trimbakrao Dabhade, routing his army in the famous action of Dabhoi. The struggle with the Sidi went on intermittently for years and left the Sidi much crippled on sea and land.

While the Peshwa was busy in the South, his brother Chimaji and some of his trusted lieutenants, particularly Ranoji Sindia and Malharrao Holkar, employed themselves in consolidating their new conquests. There was some bickering over the territory to be granted to the Peshwa in lieu of the timely assistance he had rendered to the Bundela chief Chhatrasal, against the encroachments of Mahamudkhan Bangash. Hirdesa and Jagatraj, the two sons of Chhatrasal, would not lightly part with the fertile tract that was demanded by their powerful ally, but eventually agreed to send military help when the Peshwa should undertake a campaign towards Delhi (Letter No. 9). Chimaji, the Peshwa's brother, went to the north in 1733 and appointed officers for the management of the newly acquired territory. The letter of Mahant Garibpuri (No. 1) thus summarises the situation: "While Umabai Dabhade is active near Ahmedabad with the Gaikwad and Bande as her allies, Sindia and Holkar, despatching Anandrao Powar and Bule to Malwa, themselves descended upon Pawagad and carried Champaner by assault." They thus prepared a base on the frontiers of Gujarat, from which they could strike swiftly towards Malwa and overawe the Mogul Subedar of that province and compel him to yield the Maratha claims. Happily for the Marathas, Malwa was at this time (1732) transferred to the management of the powerful Raja of Jaypur, a lukewarm adherent of the Emperor who secretly encouraged the policy of liberation undertaken by Bajirao. In 1733 Holkar and Sindia led their armies into Malwa, crushed what little resistance Jaysingh's army could make, and exacted from him a payment of 6 lacs of rupees with a promise to pay the tribute annually. (Letter 2.)

The Imperial Court looked with grave concern on the expansion of the Maratha power almost up to the gate of their capital, and convinced that the strength of the invader was too great to be resisted effectively by a provincial Subedar, despatched the Vazir Kamruddin Khan with large


forces towards Bundelkhand, where the Marathas, as the allies of the rebellious Bundelas, had not struck deep roots. The Vazir went as far as Gazipur where he met with obstinate resistance from the Bundelas under Bhagwantsingh, the hilly nature of the country and the sullen temper of his men dissuading him from proceeding further. He then tried coercion upon Hirdesa and Jagatraj in order to alienate them from their Maratha allies. Thus eventually the Vazir had to return without achieving anything substantial. In the summer of 1734 the Marathas ravaged Rajputana and Malwa. In the winter of 1735 the imperialists started serious preparations. A formidable Mogul army well equipped with guns and ammunition was mustered at Delhi and marched against the Marathas in two sections, one under Khan Dauran, Sawai Jaysing and Abhaysing taking the easterly route, and the other by way of Agra and Muttra encountering the veteran Pilaji Jadhav near Orcha. (Letter No. 39.) Holkar and Sindia, who were then in Rajputana, adopted guerilla tactics. After a few skirmishes they left the Imperial army behind, crossed the Mukund pass, and entered the territory of the Jaypur state. The risk of being cut off from his base induced the chicken-hearted Khan Dauran to purchase peace with the Marathas by agreeing to pay them whatever they demanded. On the western front the Moguls did not fare much better. Kamrudinkhan failed to dislodge the Marathas from their position. They however returned to the South at the approach of the monsoon (Letter No. 59).

No. 54



Facsimile of the handwriting of Baji Bhivrao Rethreker. *(Died on 8-1-1739)*

No. 57



Facsimile of the handwriting of Mahadaji Ambaji Purandare. *(Died in Nov. 1760)*

श्री

मा रा बाजीराव पंतप्रधान गोसांवी यांसीं

ℰ श्रीमंत पहुडप्रतापदिनकर खाडेश्वरी परदुखभजन परउपकार सदाकाळीं येशवंत राजमुद्रायाविराजित शुभचिंतन-कारी महंत गरीबपुरी किल्ले कुकडमुडे अनेकउत्तमआशीर्वाद * * * उपर. येथील कुशल जाणून स्वकीय खबर आरोग (ग्य) निजानंदवैभव लिा आज्ञा केली पाहिजे. यानंतर माहाराजाहीं बहुत दिवसा सांभाळपत्र कृपावंत होऊन पाठविलें तें छ १७ माहे रमजानीं पाऊन बहुत आनंदमय जाला. यैसेंच पत्र निरंतरी माहाराजें अतीताचा परामर्ष करीत असिलें पाहिजे विशेष. माहाराजांहीं लिा होतें कीं, मल्हारजी होळकर वगैरें फौज कुली कोणकोणें ठायीं आहेत त्यांचा वर्तमान लिा. जर माहाराजसलामत गंगास्वरूप उमाई दाभाडे गायेकवाड व बांडे यांची फौज महीपार उतरून अमदाबादेवर असे; व धोकलसिंग अमदाबाद शहरामध्यें आहे, हें खबर कागदींपत्रीं आहे. आनखी रा मल्हारजी होलकर व रा राणोजी सिंदे यांचीं पत्रें डोंगरपूर बासवाड्याचे मुकाम छ २० माहे साबानचीं आलीं, त्यांत लिा होतें कीं, "कानसुलवरून कूच केला तें नरबदा-तीरीं पावलों. तेथें दोन फौजा केल्या. रा आनंदराव पवार व विठोजी बुले यांसी तों माळव्या प्रांतास बिदा केलें. आन आपन जरीदी फौजेसीं मजल दर-मजल पांवागडास जाऊन चापानेर सर केलें. आणखी उमरठ शहर वगैरें २ मोडून तेथील बंदोबस्त करून सर्वच मजल दरमजल मालव्यांत प्रविष्ट जालों, निमित्य कीं सवाई जैसिंग माळव्यांत आला. राजश्री चिमणाजी आपाजी व सवाईशी खटखट होणार म्हणून राजश्री चिमणाजी आपाहीं पत्रें उदाजी पंवार-कारणें व आपणांस लिा यास्तव सत्वर जाणें जाहालें." हें वर्तमान मल्हारजी होळकर यांहीं आम्हांस लिहिलें. त्यास रा उदाजी पवार व हुजुराती रा नाहार प्रभु बमये फौज आलंगोर फत्तेपुराहून कूच केला तें राजे मोहनसिंगचे मुलकांतून रा आपा मदतीस माळव्यांत गेले. हा कालपर्यंत तों लढाईभिडाई कोठें जाली ऐसें आयकिलें नाहीं. पुढें जें वर्तमान होईल तें साकल्य सेवेसी लिा पाठऊन. दुसर बांडियाची ठाणी ये प्रांतास आखराणी व राणीपुरे व दतोडें व आमोदें व कुवरखेडें यैशी आहेत. तलोदियाचे आसपास बांडियाठाणियाचा माहेश्री[१] आहे.

---

१ वेढा, महासरा.

रात्रंदिवस तलोद्याशीं खटखट करीत आहे. आमच्यानें जे मदत मावन होऊन येते ते करितों. त्यास मल्हारजी माहाराजाचा म्हणवितो, त्याचें स्थळ तळोदें आहे; सर्व गोष्टीनें उपराळा करणा जरूर आहे. यावर माहाराजाधिमाहाराजा

स्वामींहीं जासुद जोडी २ मल्हारजी होलकराचे समाचारा-निमित्य पाठविली ते छ १३ रमजांनीं आपल्या स्थलांस पावलें. आपण जासुदांस दोनतीन रोज ठेऊन मुदारात[१] करून समागमें मनुश देऊन मल्हारजीकडे राणा मोहनसिंगचे मार्गानें मार्गस्थ केलें. माहाराज सलामत आमची हकीकत तों परस्परें श्रुत जाली असेल कीं, नवाब निजामनमुलुक चालून येऊन कृपावंत जाले. सरफराजी करून मनसबदार केलें. लिहावयास कारण हें कीं, ताम्र होऊन इतकी त्यांस दया उत्प(न्न) जाली. यासी माहाराज तों हिंदूपद राजे व परशराम अवतारी म्हणवितात. अतीत ब्राम्हणांचें पोषक असतां कितीक सदाव्रतें चालवीत आहेत म्हणून विा लिा असें कीं, सदाव्रताचे खर्चानिमित्य मोकाशाची उमेदवारी राखितो, सद्व्रत चाले, आज नांव माहाराजाचें होय तो अर्थ केला पाहिजे. आपण अतीत, आज्ञाधारक आहू. आम्हायेउग कामकाज असल तें लिहित जाणें. चापानेरास ठाणें मल्हारजीचें नाहीं; पांवागडावर किलेदार आहे त्याचें ठाणें चापानेरीं आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*Mahant Garibpuri of Kokarmunda writes to Bajirao news about the movements of the various Maratha commanders.*

No. 2] [*16-3-1732*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे

सेवेसी

विनंती. सेवक कुसाजी गणेश कृतानेक साा नमस्कार विनती. येथील क्षेम ताा छ २९ माहे रमजान संवसर प्रतिपदापरियेत, स्वामीचे कृपेकरून मुाा सुरज सुखरूप आसो. यानंतरी श्रीमत राजश्री आपा स्वामीनी हिरदेनगरच्या मुकामीहून सुरतेस राजश्री नारायेणदास, आपामलाचे धाकटे मधू (बधू?) त्याजपासी पाठविले. राजश्री मल्हाराऊ होलकर व राणोजी सिंदे गुजरातेस गेले होते.

---

१ संभावना.

त्याचे वर्तमान कलावे, सवाईजीचे वर्तमान कलावे, बुधालखडाकडील वर्तमान या उभयेतास कलावे, याजसाठी नेहमी मजला येथे पाठविले होते. जे वर्त [मान] येत होते, ते लिहीत होतो. राजश्री आपास्वामीकडील वर्तमान तरी, सविस्तर लिा आहे त्याजवरून कलो येईल. राजश्री मल्हारराऊ होलकर, राणोजी सिंदे, याजकडील वर्तमान, चापानेर घेऊ (न), पावागडचा बदोबस्त करून, मालवियात आले. सवा(इ)जी मंदसारावरी होते. याणी बुलगे महीवरी टाकून सडे फौजेनसी जाऊन बहुत तंग केले. दाणा पाणी बंद केले. इतकियात, राजश्री कृस्णाजी पोवार, उदाजी पोवार याणी सवाईजीकडे राजकारण केले(की)त्यास सामील होऊन, यासी कटकट करावी. हे वर्तमान या उभयेतास कललियावरी, उदाजी पोवाराचे थोडे बहुत बुलगे लुटिले. मग भले लोक दरमियाने पडोन, त्यास फजीत केले. मग सवाईजीसी युध्येप्रसग बराच जाला. स्वामीच्या प्रतापेकरून फत करून, सवाईने सल्यावरी घातले. सला जाला. सा लक्ष रुपये रोख द्यावे. आठावीस परगणियात याणी खडणिया केल्या, त्या यानी घ्याव्या. यैसा तह करून, राजश्री आपास्वामीकडे पत्र घेऊन, वार्तिक आजीच स्वार होऊन गेले. स्वामीस कलावे म्हणऊन लिा आसे. दिलीकडील वर्तमान, पातशाहाने विसावे तारिखेस कूच करून, आगरियावरी येतो. पुढे पाहावे. राजश्री आपास्वामी गालेरीच्या रोखे भदोडियाच्या मुलकात आले आहेत. बहुत लेहावे तरी, स्वामी समर्थ आहेत. मी पदरीचा सेवक आहे, कृपावृधी कीजे हे विनती.

हे विनती.

¶*Kusaji Ganesh, who was specially deputed to the north to supply news to the Peshwa about the Rajputs, Sindia and Holkar, announces that the Powars have made secret overtures to Sawai Jaysing to oppose Sindia and Holkar in their claims. They were, however, prevailed upon to leave Sawai Jaysing after which the Marathas succeeded in inflicting a heavy defeat on the Mogul Subedar who agreed to pay six lacs in cash and a tribute to be levied over the twenty-eight parganas under him.*

No. 3] *[9-7-1732?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान व तथा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक सिवाजी शकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून आषाढ बहुल चतुर्दसी स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित

आसे. यानंतरी राजश्री राणोजी सिंदे व राजश्री मलारजी होलकर आनंदराऊ पवार पुढें देशास रवाना जाले. आम्हास बाबरी सात पाचसे फौज देऊन डोंगरपूर बसवडा येथील तहरह जाला नवता यास्तव तिकडे पाठविले. तेथे भारी फौजेबाचून कामकाज होत नाही. त्यास प्रस्तुत आपण कविठीयास आलो. राजश्री आनंदराऊ पवार * * * * जल आलें. सविस्तर वृत कलो आले * * * * राजश्री विसाजीपंत याणी सागितले. मजला स्वामीच्या पायाविना आन्य दैवत नाही. मी स्थापित आहे. विशष काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंती.

विनंती.

¶*Shivaji Shankar to Bajirao: asks for more troops to complete his mission at Dongarpur.*

No. 4] [*1732?*

श्री

विनंती उपरी. भगवतासिंग आडारू व रा। गोविंद बलाल याचे कागद कासीद घेऊन आले. ते स्वामीकडे पाठविले आहेत. हे स्वामीनी वाचून याचे जाब सत्वर लेहून या कासिदाची रवानगी आम्हाकडे करून पाठवावे. आम्ही आपली पत्रे गोविंदपतास लेहून, आपला कासीद याजबा। देऊन पुढे पाठऊन देऊन. इजतखान यासी आपली पत्रे लेहून आम्हाकडे पाठविली पाहिजे. दिलेलखान याचा लेक इजतखान यास पत्रे लिहिणे की, फौज पाठविली आहे; हे तुमची कुमक करितील. सागर किला याचे स्वाधीन करणे. आम्हीहि आज्ञेप्रा। लौकरीच जाऊ हे विज्ञाप्ति.

¶*The writer (Baji Bhivrao?) says that the communications received from Bhagvat Sing Adaru and Govind Ballal are sent to the addressee (the Peshwa?) and replies to them are awaited. Ijatkhan, son of Dilelkhan—he further writes—should be informed that forces have been sent to succour him at the fort of Sougar.*

No. 5] [*1732?*

श्री

विनती उपरी. दतिया वोंडसें या प्रांतें आल्यानंतर दोन्ही स्थलाहून बोलीचाली करावयां भले माणूस लस्करांत पाठऊन दिल्हे. त्यांचे बोलीचा भावार्थ मनास

आणितां, साल गुदस्तां आपणावरी कसाला पाडिला, मुल्क खराब जाहाला आणि पैकाहि द्यावा लागला. याजकरितां साल मजकुरीं काही रयात करून मुलुकाची आबादानी होयसी करावी म्हणून बहुतच रदबदल केली. आमची मुल्ख(क)-गिरी म्हणजे दोनआडीच महिनेपर्यंत चालोन यावयास पाहिजेत. याचप्रा जावयास लागतात. रयात करीन म्हणतां कैसे कार्यास येतें ? याकरितां साम, दाम, दंड भेदेंकडून सांगोन, जितके साधले तितके साधावे लागले. त्याप्रमाणे दोही स्थलच्या आल्या ग्रहस्तास सांगोन, गुदस्तास जेवढे आधिक साधलें तितकें साधून घेऊन, त्याच्या मुलकास कौल दिल्हा. खंडणी करार केली तो पैका येणे. त्याच्या मुदती करून दिल्या आहेत. त्याप्रमाणे पैका येईल. यैसे करून आंम्ही जाठवाड्या प्रांतांत स्वार होऊन गेलों. तेथीलहि जमीदार भेटीस येणे ते येतील. आल्यानंतर विल्हेस लाविले जाईल. तैसाच भदावरचा प्रसंग करावा लागतो. त्यास पत्रें पाठऊन, भले माणूस आणविले आहेत ते आल्यानंतर बोलीचाली करितां, जें होईल, तें केलें जाईल. सारांश जे होणें तें स्वामीचे पुण्यप्रभावेंकडून होईल. कृपा वृधींते पाविली पाहिजे. हे विनती.

¶*The writer narrates how people from Datia and Orchha came and supplicated for the reduction of the revenue on account of the bad condition of the country, and how they were disposed of.*

No. 6] *[7-3-1733 ?*

छ ३ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामी
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक सुभानजी जठार साष्टांग दंडवत. विनंती उपरी. ताा छ ३ रमजान बुधवारपावेतो मुाा काा मलकापुर साहेबाचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विषेशे. बोदवडीहून विनंतीपत्रे सेवेसी लिहून स्वार जालो ते छ २९ साबानी मलकापुरचे सरहदेत येऊन राहिलो. छ १ रमजानी कसबियासी आलो. गाव कसबती भेटला. लौकर न येत. तलाशे प्रहराकाने येक जण आला. त्याने कारभारी भेटवितो, ऐसे समाधानोतरी बोलोन, येक जागा राहावे मग अवघेच होईल यैसे जाणून राहाविया चालिलो; तो वर्तमान कलले, रा संभाजी सिंदे याजकडून रांत्री राऊत पाच आले आहेत. त्याजवरून त्याजलाहि बोलाऊन वर्तमान पुसिले. त्यानी सांगितले, ते अनुरलिबावलीवर होते. घोडसगाव

पूर्णातीरी येणार. रंग पाहावया आपणास पुढे पाठविले होते. येथील प्रसंग, रात्री आलो. रोखा गावात नेऊन पाहिला. मागती आणून दिल्हा. त्याजवरी जाबसाल नाही. मग त्यासी सांगितले; आम्ही जेथे राहतो तेथे येऊन राहणे. होईल ते पाहू. आणि राहावया चालिलो तो यैकिले(कीं) संभाजी सिंदेहि येतात. तेव्हा त्याजकडे येक राऊत जाले वर्तमान सांगून पाठविले. आम्ही, जो भेटीस आला त्याने जागा दाखविली तेथे पाहावया आलो. संभाजी सिंदे यानी आम्ही येक जागा होवे. पुढे रंगासारिखे वर्तावे. आम्ही येऊन जीन उतरिले. गावात समाधाने सांगितले. गुरूढोर बाहेर निघाले. कारभारी मातबर बाहेर यावे तो संभाजी सिंदे यानी राऊताने निरोप पाविला असतां वेसीपासी आले. गाव तो मात्रागमनी. लौकर परामृष कोण करितो म्हणून माघारे फिरले. ते जाऊन गुरे बळली. गावातून लोक धाऊ लागले. आम्ही जिन उतरिले होते. गावातील तमासबीन भोवते बहुत मिलाले होते. ते समई परम संकट इजतीचे पडले. आम्हास यैसे करितो म्हणून सूचनाहि अगोधर न केली. श्वामीचा प्रताप समर्थ. आम्ही सितार्बीने आटोपून त्या लोकातून सलुख आर्चिला की, आम्ही आलो हे त्याजला न कलोन हे केले. आम्ही गुरे वगैरे जे उपद्रव केले ते मना करितो म्हणून सावधपणे त्याजपासी पावलो. वर्तमान सविस्तर सांगून पत्रे श्वामींची दाखविली. संभाजीबावाच्या विचारास आले परंतु राघोपंत याच्या विचारास न ये. तेव्हां गुरे घेऊन आदकोसावरी राहिले. आम्हास सांगितले, गोष्टी तो जालियाउपरी कारभाराचा बनाव पडून सलूख होये ते करीत होतेसे तसे करावे. बनाव पडावा. त्यात विक्षेप जाला. त्याचे शमन करून स्थितिवरी यावया सायकाल च्यार घटिका रात्री जाली. घोडियावरी जिन कबरा बांधून कसाला[१] मातबर केला. ते समई कारभारी येऊन भेटले. त्यानी सांगितले रा आवबा व गुजर यानी मातबर उपसर्ग केला ते दुख व आम्हाकडे भेटीस पाठऊन राहविले असता हा कजिया कायेसे ? बहुत भाशण; माती डोईवर घेऊन च्यारसे माणूस स्वामीपासी यावया सिध येसा राडा च्यार घटिका जाला. तदोतर बहुत रीतीने समाधान उतरे बोलोन बनाव कारभाराचा करावा यैसे सांगितले. विचार करून प्राःथकाली पुनरुक्त येतो. यैसे बोलोन गावात माघारे गेले. गुरे येक जागा. तेथे संभाजी सिंदे याची फौज. आम्ही येक जागा. दिवस उगवला. तीन प्रहर जाले. तोपर्यंत बाहेर मातबर न येत. लौकिक कसा होईल? स्वामीनी आज्ञा केली, काये वर्तणूक कसी घडून आली हे शरम बहुत. काये करावे? आणीक च्यार कामे जाली पाहिजेत. येथेच हा प्रसंग. येथील तालुका

---

१ त्रास.

बालापूरकराचा. त्याजपासी जमाव हजार श्वार पावेतो. यैसियासी युग्तीवादे दातालेकर पुंज पाटील बोलाऊन आणून श्वामीचा प्रताप जगविख्यात दबाव देऊन व समाधानपूर्वक सांगून कामावरी प्रगणा आणावा. हा विचार सांगून गावात पाठवून गावातील मधेम कारभारी व पुंज पाटीलच मधेस्त होऊन सायंकाली छ २ रमजानी बाहेर आले. बासकल विचार संभाजी सिंदे यासी सांगावा. त्यांच्या आपल्या विचारे जेथपर्यंत होईल तेथवरी करावे. मानमार्ग श्वामीआज्ञा हा विचार ध्यानास आणून करावे म्हणून ते जेथे होते तेथे गेलो. परस्परे वर्तमान सांगितले. त्या———— (अपूर्ण.)

¶*Subhanji Jatar gives Chimaji Appa details of his expedition into Berar near Malkapur.*

No. 7] [*24-5-1733*

श्रीराम.

यादी मजली कोस

कित्ता मजली राज(ग)डापासून कोस माहे जिलकाद वैशाख वद्य ४

२ छ १८ जिलकाद रविवार (२२-४-१७३३) राजेगडाहून[1] कूच जालें.

८ छ १९ रोज सोमवार, मुक्काम नजीक बुढा डोंगर, नदी सेंध, प्रांत माळवा.

८ छ २० रोज मंगळवार, मुक्काम नजीक कालाबाग

१० छ २१ रोज बुधवार, मुक्काम मौजें काकरवा पाा शाहाढोरा, प्रांा माळवा.

८ छ २२ रोज गुरुवार, मुक्काम सराई मोगलची

कित्ता मजली बऱ्हाणपूरपासून इा छ १३ जिल्हेज, गुरुवार, पौर्णिमा जेष्ठी

६ छ मार मुा अंदुर्ली, पाा येदलाबाद.

८ छ १४ रोज शुक्रवार, मुा चांगदेव, पाा येदलाबाद.

६ छ १५ रोज मंदवार, मुा पाा वरणगाव.

६ छ १६ रोज रविवार, मुा कंडारी पाा नसिराबाद.

६ छ १७ रोज सोमवार, मुा पाा बोरनार.

८ छ १८ रोज मंगळवार, मुक्काम नजीक लोहारें पाा मार.

---

१ सिप्रीचे दक्षिणेस व कोलारसचे नजीक, बुंदेलखंडांत.

५ छ २३ रोज, मुक्काम नजीक सुरंज.

६ छ २४ रोज, मुक्काम धरगा.

१ छ २५ रोज रविवार

६ छ २६ रोज द्वादशी सोमवार.

३ छ २७ रोज मंगळवार मुक्काम

६ छ २८ रोज बुधवार, मुक्काम पारासुर दास्तक हमेदाचा मुलूक.

६ छ २९ रोज गुरुवार

६ छ ३० रोज शुक्रवार ज्येष्टशुध मजल कोंस

९ छ १ जिल्हेज शनिवार

८ छ २ जिल्हेज रविवार * * क * * रोहिल्याचे

६ छ ३ रोज सोमवार

३ छ ४ रोज मंगळवार, घाटाखाली.

८ छ ५ रोज बुधवार

८ छ ६ रोज गुरुवार, मुक्काम भिवलपूर, नर्मदा उतरोन दक्षण तीर, पा। कालीभीत.

१० छ ७ जिल्हेज, मुक्काम मौजे झिरणा, परगणे मकडाई

६ छ ८ रोज, मुक्काम मौजे चिकरपूर, परगणें चरवे

६ छ १९ रोज बुधवार, नजीक भडगांव.

६ छ २० रोज गुरुवार, मुक्काम वाघली पा। भडगांव.

८ छ २१ रोज मुक्काम पा। चालीसगांव.

८ छ २२ रोज शनिवार, मुक्काम नजीक भादली घाट उतरला.

६ छ २३ रोज रविवार, मुक्काम पालसड, पा। वैजापूर.

७ छ २४ रोज सोमवार, मुक्काम सिंहनद, पा। गांडापूर.

० छ २५ रोज मंगळवार, मुक्काम सिंहनद येथील मुक्काम

६ छ २६ रोज बुधवार, मुक्काम गंगा दक्षण तीर, पा। नेवासें

६ छ २७ रोज, मुक्काम प्रवरातीर.

६ छ २८ रोज मुक्काम शुक्रवार, नजीक सोनाई ब्राह्मणी.

८ छ २९ रोज शनिवार.

८ छ १ रोज रविवार, नजीक पारनेर मु॥ हंगे पलवे.

१० छ २ मोहरम सोमवार, मुक्काम घोडनदी, नजीक मलठण.

१० छ ३ रोज मंगळवार, मुक्काम नजीक पाबल.

८ छ ९ रोज रविवार

६ छ १० रोज सोमवार

१० छ ११ रोज मंगळवार, मुक्काम सातपुडा, आशेर

११ छ १२ रोज, मुक्काम हालआंबराई, नजीक बऱ्हाणपूर.

१६७

१० छ ४ रोज मुा वडगाव सिंद्याचें.

६ छ ५ रोज, मुक्काम पुणें, गुरुवार.

१५३

१६७ ताा

३२०

दर ४ प्रो गावे ८०

¶*This is an interesting paper stating the stages and mileage for the march of armies into Northern India. The writer finished his journey from Rajgad (near Jhansi) to Poona, a distance of 320 kos or about 640 miles, in 47 days, i.e., about 7 kos or 14 miles daily, not a bad achievement for an army of those days.*

श्री

यादी देशाची नांवें:—

बुंदेलखंड दशार्णव देश. १.

वोडसे वारुणावत भीष्माचें १.

नरवर नैषध देश राजानल. १.

चंदेरी चैद्य देश राजा शुशुपाल १.

दतिया

ग्वालियेर वृजमंडलदेश.

भदावर देश

¶*The ancient names mentioned in this short list as known in the 18th century will be found interesting.*

No. 8] [*15-6-1733 ?*

छ १३ मोहरम

श्री

विनंती उपरी. बुंधेल्यासी स्वामीनी दो लक्षाचा पटा करून घ्यावा ऐसा करार केला. आम्ही तेथे करार करून त्याचा कागद लेहून घेतला आणि हिमतरायास व लाला कृष्णसिंगास निरोप दिल्हा. तेसमई जागीर करून घ्यावी

याकरितां गोविंद बलाळ पूर्वी बुंदेलखंडचे स्वारीस स्वामीसमागमे होता व हली आम्हासमागमेहि वाकीफ जाला होता; याकरितां त्यास त्यासमागमे देऊन पाठविला. त्याने माहिना दोन माहेने खटपट बहुत करून पंनासा पंचावना हजाराचे गांव करार करून घेतले. वरकडहि मागाहून करार होतील. गाव-गंनाचे पाटील बोलाऊन आणून त्यांस वस्त्रें देऊन गावची लावणी संचणी करावी. एक जागा ठाणीयाजोगा असेल तेथे आखाडा घालून राहावें ऐसी आज्ञा आम्ही त्यास केली होती त्यामुळे तो त्या खटपटेस लागला आहे. त्यास सांप्रत येथें आल्यावर वर्तमान ऐकिलें जे मुधाजी हरी यास स्वामीनी त्या कार्यास पाठविलें. तर एका कार्यास दोघेजण कार्याचे नाहींत. स्वामीची आज्ञा होईल तर गोविंदपंतास उठऊन आणूं अगर मुधाजी हरीस आणवायाची आज्ञा होईल तर त्यास उठऊन आणूं. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. हे विनंती.

¶*Chimaji Appa writes, all in his own hand, to his brother Bajirao from Bundelkhand that he had appointed Govind Ballal Kher to look after the revenue administration of the territory, so that the appointment of Mudhaji Hari already made may be cancelled.*

No. 9] [*28-7-1733 ?*

श्रीमंत माहाराज राजमान्ये राजश्री

राऊ स्वामी गोसावी याचे सेवेसी

पो मुधाजी हरी साा नमस्कार विनंती उपरी. स्वामींची आज्ञा घेऊन स्वार जालो ते छ १४ मोहरमी बाध्याच्या मुकामी लस्कर दाखल जालो. वाटेत पुरोहितास व आसारामास वेथा जाली याकरिता दिवसगती लागली. माा राजश्री हिरदेसाव व जगतराऊजीचीं भेटी घेतलीं. वस्त्रे व पत्रे दिधली. मुख-वचने आज्ञेप्रमाणे निवेदन केले. बहुत संतोषाते पावले. आप्तकीच्या गोष्टी ममत्वेकरून बोलिले. आपणहि स्नेहममत्वपुरसर युक्तीच्या गोष्टी बोलायाच्या त्या बोलिलो. स्वामीचे ठायीं बहुत आस्ता धरिली आहे. त्यावरी जागिरीची मजकूर केला. हरिदास पुरोहित व आसारामाने निश्चयाप्रमाणे निवेदन केले. त्यास उभयेतानी सांगितले कीं माा राजश्री आपा स्वामी या प्रांतास आले होते. राा हिमतराव प्रधान व किसनसिंग फौज देवून पाठविले होते. जे कांहीं सेवा करावयाची होती ते केली. त्यावरी कासदाची जोडी माघमासी निजामाच्या लस्करांतून रवाना केली होती ते पावली. त्यावरून सवादोन लक्षांची जागीर मुकरर केली. राजश्री आपा स्वामीनी गोविंदपंतास समागमे दिधले. त्याही

ज्या जागा जागीर मागितली त्याची सनद करून दिधली आहे. सवा लाखाची जागीर राजश्री हिरदेसावजीही आपल्या जिलियात दिधली आहे व लाखा रुपयांची जागीर रा जगतराऊजीही आपल्या जिलियात दिधली आहे. येक किला राजगड नामे आहे तो हिरदेसाने दिधला आहे. येक भला माणूस आपले तर्फेने देऊन गोविंदपंतास जागिरीत अमल दखल करायास पाठविले आहे. जागिरीत जो पैसा वसूल होईल तो घेणे; कमी येईल ते आपण देऊन ऐसे सांगितले. जागिरीची याददास्ती पूर्वी गोविंदपती सेवेसी पाठविलीच असेल. हली जागिरीची याददास्त पाठविली आहे त्यावरून विदित होईल. स्वामींनी आज्ञा केली होती कीं जागिरीची नेमणूक करून डौल पाठविणे. जेथें जागीर घ्यावयाची जागा लिहून तेथे घेणे. त्यास हे म्हणतात कीं गोविंदपंताही जे जागा मागितली तेच दिधली आहे. तरी स्वामीपासी जागिरीची याद-दास्त पाठविली आहे, यात जे घ्यावयाची असेल ते ठयेराऊन लिहिणे; बाकीची जागीर आणखी जागा ल्याहाल तेथे घेऊन. वरकड स्वामींनी मुखवचने सांगितले होते तेणेप्रमाणे निवेदन केले, त्यास स्वामींची स्वारी या प्रांतास येईल तेव्हां वोडछावर स्वामींनी यावेयाचा मनसुबा राजश्री मा। हिरदेसावजी व हिमतराऊ प्राधान येहीं सांगितला आहे कीं जेव्हां स्वामी नर्मदा उतरून अलीकडे येतील तेव्हां कूच दरकूच करून मजला मोठ्या करून वोडछावर येन. आपणहि वोडछास येऊन पोहचतों. पाचसात हजार बरकंदाज व दाहा हजार स्वार वोडछाचे गीर्दनवाई आपला मुलूक आहे तेथे आपण अगोदर बसवीत आहों. स्वामी तिकडून येतील तेव्हां हे फौज कुली समागमे स्वामींचे होईल आनी आपणहि फते जालियावर येऊन पोहचोन. यैशा मनसुब्याने वोडछे हातास येईल. नाहीतर शोहरत जालियाने ते मजबुती करतील. मग प्रेत्न करणे लागेल. यैशा मनसुब्याने सहजात जागा हातास येईल. धन बहुत हातास येईल. करोडानी गनती द्रव्य प्राप्त होईल. हे जागा हातास आलियावर दतिया वगैरे मुलूक कितेक जप्त केला जाईल. वोडछाचे व दतियाचे राज्य आपणास द्यावे; येथे ठाणे बसवून पुढे स्वामी मुलुखगिरीस ज्या मुलुकावर चालतील त्या मुलुकावरी समागमे चलावे; दिलीवर चाल कराल तेव्हाहि समागमे चलावे; प्रयागास स्वामी चालतील तेव्हांहि समागमे चलावे. पुढे जो मुलुक जप्त करावा त्यात अर्धोअर्ध प्रमाणे घ्यावे. वोडछाचे राज्य यास द्यावे, त्याचा यैवज येही आणखी मुलूक द्यावा. गढे व रेवामकुंदपुरचे स्वामींनी सांगितलें होते त्यास रेवामकुंदपुरचा मुलूक आपणाखाले आहे; आपला अमल दखल परस्तुत तेथे चालत आहे. राहिले गढ्याचा मुलूक आहे, तेथे आपलाहि अमल

नाहीं, स्वामीत आपण मिळोन तेथील राज्य घेतो. तेथील आकार करून आपले जिमे कराल तर पैका देवून; नाहीतर आपले ठाणे बसविणे. ज्या गोस्टीमधे स्वामी राजी असतील तेच केली जाईल व दिलीकडील सादतखानाचा मनसुबा आहे कीं दक्षनेस यावें, परंतु स्वामीचा वसवास आहे कीं निकोर[1]-पूर्वकास स्वामी भेटले आहेत. याकरिता मा रा हिरदेसावजीच्या वकिलाणे दिलीहून लिहिले होते कीं तुम्हासी व श्रीमंत राऊ स्वामीसी येकलास[2] आहे तरी सादतखानाचा इरादा आहे कीं तुमचे हाते राऊस्वामीचा येकलास करावा आणि दक्षेनेची सुबेदारी ज्याच्या नावे स्वामी म्हणतील त्याचे नावे द्यावी व माळव्यातहि सुबेदार तुमच्याच विद्यमाने ठेवावा, आणखी जे मुदे स्वामीचे आसतील ते कबूल करावे. परंतु निकारपूर्वकाची फिकिर हारसल (?) करावी; सादतखानाही माळव्यास यावे; तेथे स्वामीची त्याची भेटी करावी; अगर वोडछास स्वामी येतील तेथे सादतखानाही यावे, यैसा मनसुबा आहे. याचा बिचार द्रढता करून लिहिला पाहिजे. तेनेप्रमाणे मनसुबा योजिला जाईल तरी याचे उतर सत्वर लिहिले पाहिजे. यांवर कमरदीखानाही मोठासा पण करून मा रा आपावर आले होते. आपा स्वामीची स्वारी निघोन गेली, अखर पेसेमान[3] जाला. वोडछेकर राजा व राऊ रामचंद्र यैसे मिळोन कमरदीखानापासी गेले आणि सांगितले कीं गनीमाची फौज हिरदेसावने आपल्या मुलुकावर पाठवून मुलूक लुटविला आनी आगऱ्यापावेतो फौजा पाठविल्या. यैशा कितियेक प्रकारच्या गोष्टी सांगून कमरदीखानास यांच्या मुलुकावर आणिले. जमुनातीरी काळपी वगैरे याचा मुलूक आहे तेथे फौज आली. त्यावरून मा राा हिरदेसाव व जगतराऊजी फौजबंदी करून आपले सरदेवर गेले. त्यास जमुनापार गाजीपूर वगैरे तेथील जमीदार आडारू, त्याचा लेक भगतसिंग नामे आहे त्याजपासी फौज दाहा बारा हजार हमेशा राहात असते, त्यास कमरदीखानाचा मेहुणा ज्याननिसारखान या जमिदाराच्या मुलुकाचा सुबा होऊन आला होता, त्यासी व जमीदारासी लडाई जाली. जमीदाराने ज्याननिसारखानास मारिले. मागे ऐसे जाले होते आनी जमीदार तो मुलूक खात होता. कमरदीखानाचे स्त्रीनें बहुत हटनिग्रह केला कीं भगवतरायास मारून भावाचा बदला घ्यावा आणि गाजीपूर वगैरेमधे ठाणे. बसवावे. मग पुढे बुंदेलखंडावरी चाल करावी. ऐसा मनसुबा करून जमनापार कमरदीखान जाऊन गाजीपुरास माहासरा केला. कमरदीखानासमागमे चालीस हजार स्वार व बरकंदाज तीस हजार होते. त्या जमीदाराच्यानें लडाई न करिविली. अखर गढी सोडून पळोन गेला. गढीत

---

१ निजाम. २ स्नेह. ३ पस्तावलेला, दुःखी.

ठाणे वसविले. मुलुकात अमल दखल केला. तेव्हा वोढछाचा राजा व राऊ रामचंद्र व महमदखान बंगस कमरदीखानास म्हनो लागले, कीं आता बुंदेलखंडावरी चालावे. ऐशात काबू आहे नाहीतर बादबरसात गनीमाच्या फौजा येतील. मग बुंदेलखंडात जाणे कठीण होईल. त्यावरून मकरदीखानाही (कमरदीखानाही) वकील याजपासी पाठविला कीं तुम्ही भेटीस येणे; आनी तुम्ही आम्ही येक होऊन जो कांहीं मनसुबा योजेल तो करून. परस्तुत तुमच्या मुलुकांत भगवतसिंग पलोन आला आहे. त्यास घेऊन भेटीस येने. कोण्हेविशयीं वसवास न करने. त्यास माा राा हिरदेसावहि तर मोठे मनसबेबाज आहेत. हे तो स्वामीहि जाणताती. याही आपले तर्फेनेहि येक भला माणूस पाठवून श्नेह संपादिला; आणि भगवतरायाचा तलास करून हस्तगती जाला तरी घेऊन येतो ऐसे रसायेनाच्या गोस्टी करून चित्रकूट पर्वतामधे आहे तेथे येऊन बसले. कमरदीखानाने विचारिले कीं बरसात मोठी आहे, ऐशात हे कांहीं जुभस[1] खाणार नाहीत. फौजेचा जमावहि विशेष होता. याकरितां टाला देऊन दिलीकडे छ २७ सफरी कूच करून गेले. त्यास माा राा हिरदेसावजीही सांगितले आहे कीं कमरदीखानाने मथुरेमधील देवाल्ये वगैरे उपद्रव विशेषसा केला आहे; तरी स्वामी येतील तेव्हा आपण व स्वामी मिलोन कमरदीखानाचे पारपत्य करावे लागेल. नाहीतर याजला मगरुरी बहुत जाली आहे. माा राा आपामागेहि धावला होता. परंतु आपा निघोन गेले होते. आता तुमचे येने जाले तेव्हाहि हा पुढे येईल. तरी याचे उतर सविस्तर लिहिले पाहिजे. जागरीचा मजकूर ऐसा आहे कीं जगतराऊजीही जे जागीर दिधली आहे ते कुली खराब व मवासा आहे. तेथे आमलहि होणे नाही. गोविंदपंत गेले आहेत तेथून राा हिमतराऊ प्रधानास लिहिले होते कीं कितीयेक गांव खराब आहेत. येथे पैसा वसुल होणे नाहीं. हे वर्तमान आपणास कलले त्यावरून माा राा हिरदेसावजीसी व हिमतरावजीसी आपणासी बहुत प्रकारे सख्त रदबदली केली. आपण सांगितले कीं तुमचे वकील हरिदास पुरोहित व आसाराम तेथे आले होते, तेव्हा हे जागीर कबूल केली आहे की सवादोन लाख रुा वसुली सालहालांत द्यावी. येक रुपया कमी म्हनाल तर घेनार नाही. ऐसा करार करून आपणास समागमे आनिले आहे. आनी आता एसी जागीर देता तरी आपणास कबूल नाही. ऐसे बहुता प्रकारे सांगितले. परंतु जागिरीत आपला काये आखत्यार आहे कीं सोडावी आनी आपणास दरमाहा रुा सेंभर हरिदास व आसारामास सागितला होता कीं जोपावेतो

---

[1] भीति.

जागीर याच्या हवाले होय तोपावेतो तुम्ही आपणापासून देने. मग जागीर हवाले जालियावर जागिरींतून घेतील. त्यास आता हे म्हनताती कीं जागीर तो हवाले करून दिधली. आता जागिरीतून घेने. तरी आपणांस येथे दोन अडीच रुा लागताती. धान्य महर्ग आहे. रोंज उठोन कूंच करावे लागते. सरजाम डेरा वगैरे पाहिजे. स्वामीच्या नावासारिखी वर्तनूक केली पाहिजे. दोन जोड कासीद समागमे आहेत त्यास पचवीस रूा दरमाहा दिल्हा पाहिजे. तो कोठून द्यावा? जागिरीत आखत्यार गोविंदपंताचा आहे. तरी याचे उतर लिहिले पाहिजे त्यासारिखी वर्तनूक करून. उभयता राजियाची वासना ऐसी आहे कीं जागीर दिल्ही आहे ते कबूल न करतील तरी दोन लाख रुा नगदच द्यावे. त्यास आपण उभयेता राजियास सांगीतले कीं पाच लाख रूा नगद द्याल तरी कबूल करनार नाहीं; परंतु सवादोन लाख रुपयाचे गावगना वसुली आबद पाहोन घेऊन. नगद घेनार नाही. त्यास ठयेराव जाला आहे कीं स्वामी तेथून लिहितील तैसे केले जाईल. यावरी गोविंदपंत जागीरीत आमल बसवायास गेले होते. त्या जिलियात जगतरायाने जागीर दिधली आहे. त्या गावाचा वाढा हिरदेसाव व जगतरायाचा जाला नाही ते जगत-रायाने गोविंदपंतास लिहून दिधले आहेत. तेथे अमल हिरदेसा देत नाहींत. म्हनताती कीं त्याही आपल्या वाद्याचे गाव दिधले आहेत; सवा लाखा रूा ची जागीर आपण दिधली आनी जगतरायाने आपल्याच वाद्यांचे गाव दिधले ते गोविंदपंती केसे घेतले? आपण गोविंदपतास जाती वेलेस सांगितले होते कीं हे गाव तुम्ही न घेने; व आपले भाऊबंद व जमातदार त्या जिलियाकडे आहेत त्यासी फितवा गोविंदपंत करितो; आनी हरकोन्हास दबावितो कीं तुमच्या जागीरा आपण घेऊन. नाहींतर आपणास कांहीं देणे. त्या जिलियाकडे जमीदारापासून आपण कांहीं वरशासन घेत आस्तो; त्यास म्हनतो कीं तुम्ही कांहीं त्यास न देणे. आपणास देने. ऐसा फितूर त्या मुलुकांत केला आहे. आपणास वसवास कितीका प्रकारचा जाला आहे. आतासींच ऐसा बखेडा घातला आहे तेव्हा पुढे राजगडावरी तुमचे ठाने बसल्याने अनर्थ कराल. जगतरायामधे व हिरदेसावामधे चित सुधहि नाही, राजगड हिरदेसायाचा आहे, त्याही आपले तर्फेनें दिधला होता. आतां या वसवासाकरितां राजगडात अमल देत नाहीत आनी याचा स्पर्धी कोन्ही आहे. तो गोविंदपंतास भेटला आहे. तो जेसे सांगतो तेसे करिताती. त्याचीच मानसे गावोगाव बसविताती. गोविंदपत तरी नावाकीफ; आनी बुंदेलखंडची मनुस्ये तर लबाड लताड आहेत. तें तो स्वामीहि जानताती. येथे तर

1232

बहुत सावधतेने वर्तनूक करावी, तेव्हा सिधीते पावेल. आपणास म्हणो लागले कीं तुम्ही जागिरीस जाणे. किलाहि तुमचे हवाले करितो. तुम्ही आपले जागिरीचा आमल करणे. जे गाव तुमच्या चितास येतील ते ठेवणे. जे चितास न येतील ते सोडने. त्याचा ऐवज तुम्ही म्हनाल ते गाव देऊन. आपण उतर दिधले कीं जागिरीची हकीकत हजूर लिहितो. तेथील उतर आलियावर जे जागा जागीर म्हनतील तेथे घेऊन. त्यांस पूर्वी गोविंदपंती जागिरीची याददास्त पाठविली आहे. हाली हिरदेसाहजीच्या जागिरीची याददास्ती पाठविली आहे. जगतरायाच्या जागिरीचा तो बखेडाच आहे; आनी पूर्वी गोविंदपंती पाठविलीच आहे. हाली हिरदेसाहजींही सागितले आहे कीं ते जागीर चितास येत नसेल तरी या परगनियात सवा लाखाची आपण देतो. लाखां रुपयांची जगतराव याच परगनियांत देतील. हिरदेसाहजीच्या जागिरीची याददास्त सवा लाखाची करून पाठविली आहे. येसेच गाव जगतरायाचे आहेत त्याची याददास्त येथे नवती, बदल पाठविले नाहीत. हा परगना मऊमहेव्याहून दोन मजली उतरेकडे आहे. हा चितास परगना येईल तरी लिहून पाठवणे. याच परगनियात घेऊन, अगर जमनातीरी याचे परगने आहेत त्या जिलियाकडे आज्ञा होईल तिकडे घेऊन; अगर पेहिले जागीर धामोनीच्या जिलियाकडे दिल्ही आहे, त्याच जिलियात वेरान गाव आस्तील ते टाकून चांगले गाव आबाद वसुली आस्तील तेच घेऊन. तरी त्यांचे उतर लिहिले पाहिजे तसे करून. यावर इकडे दस्तुर आहे कीं श्रावनमासी तीहाईचा वसूल घ्यावा लागतो. तरी स्वामीनी रा। बाबूजी नाईक जोसी याची वरात पाऊण लाख रुपयाची आपणावर करने; म्हनजे याजलाहि कलेल कीं रुपयाची ताकीद आहे. तरी वरात आगत्य करने. रुपये सत्वरीच नाईकास पावते होतील. यावरी जगतरायाचे चित आपणाकडे बहुतसे नाही, कीं राजश्री आपा स्वामी ये वरसी वोडछावर गेले होते. वोडछेकरासी जगतरायासी शरीरसमध आहे, याकरिता यास वाईट लागले आहे. आनी त्याचे येथे कोन्ही कारभारीहि नाही. हिरदेसाहजीचे येथे कुली अखत्यार हिमतरायाचा आहे. आनी हिमतराव स्वामीच्या ठाई आस्ता फारसी राखितो; याजवरी कमरदीखान भगवतसिंगावर आला होता त्याची जागा गाजीपूर वगैरे होती ते कमरदीखानाने हिरोन घेतली आहे. तो धनाढ्य बहुत आहे. त्याची वासना आहे कीं स्वामीची स्वारी या प्रांतास येते, तरी आपण काही देऊन; आपला मुल्क आपणास सोडोन देवणे; आनी जमनापार पूरवा प्रांतात व प्रयागांत स्वामीचा आमल बसवावा. दोन करोडपावेतो प्राप्ती ऐशी करून देतो. त्यास आपण

सांगितले कीं वीस लाख रुा द्याल तरी तुमच्या मुलुकाचा बंदोबस्त करून, तुमची जागा तुम्हास देविली जाईल. त्यास त्याचा मध्यस्त निरधेसिग[१] केसरीसिगाचा लेक छत्रसालजीचा नातू येथे आहे तो आहे. त्याने कबूल केले आहे कीं दाहा लक्ष रुपये आगोदर द्यावे; जागा हातास आलियावर दाहा लक्ष द्यावे. तरी स्वामी याचे उतर लिहितील तेसे ठीक करून ठेऊन. स्वामीची स्वारी नरबदेवर आलियावर दाहा लक्ष द्यावे ऐसी बोली घातली आहे. उतर त्याहाल तेसे करून. स्वामीच्या पुन्यप्रतापे इकडे आगमन जालियाने इबरतीनेच बहुत कार्ये होतील. सवादोन लक्षाची जागीर दिधली आहे ती काही विशेष नाहीं. येथील प्रसंग ऐसा दिसोन आला आहे कीं जे जागीर मागाल ते देतील. याच्या घरामधे फितवा बहुत आहे. स्वंज्ञा मात्र लिहिली आहे. येथे स्वामी आलियावर सविस्तर विदित केले जाईल. निरधसिंगास येक पत्र लिहिले पाहिजे कीं तुमचेविशाई मुधो हरीने लिहिले होते; तरी तुम्ही आपले समाधान राखून आपल्या कार्यास तत्पर असने. आपण येऊन तेव्हा भेटीस येणे. व गोविदपंतास जगतरायाने व हिरदेसाहजीने येक गाव जागीर करून दिधला आहे. आनीखहि काही देऊ केले ते न दिधले. बुधेले काबूची, लेक देऊन जावायास मारनार. आनी गोविदपंतास तो येथील विचार कलला नाहीं. याकरिता वकरेच[२] दवडिला. वकरेकरून धन्याचे कार्यें होते तें बेवकरे होत नाहीं. त्यास आतां पत्र पावतांच जागिरीची नेमणूक करून उत्तर सत्वर लिहिले पाहिजे, त्या सारिखी वर्तनूक केली जाईल. सिबंदी व आपली नेमनूक करून सनद लिहिली पाहिजे. किल्यावर सिबंदी दोनसे प्यादे पाहिजे; व जागिरीस सेंभर प्यादे तहसील व थानेबंदीस लागतील त्यास स्वामी तेथून मुकरर करून लिहितील त्याप्रमाने वर्तनूक करून. स्वामीस हिमतराऊही लिा आहे त्यावरून विदित होईल. येथे जोपावेतो उतर आले नाही तो-पावेतो कामकाज बंद आहे. तर उतर सत्वर रवाना केले पाहिजे. आनी कासिदास ताकीद केली पाहिजे की वायेदियास पोहचेत. बहुत काय लिा हे विनंती. हरिदास पुरोहित छ २३ सफरी मेला. विदित होय. आपणास खर्चास दीडसे रुा दोही राज्याही दिधले आहेत. त्यास कासदाची जोडी निघाईस रुा २४ च्यार महिन्याची तलब दिधली आहे; व हरि यास

---

१ अनिरुद्धसिंग. २ प्रतिष्ठा.

1234

च्यार महिन्याची तलब रुा २४ चुकविली ऐसे आठेतालीस रुा दिधले. विदित होये. वरकड वर्तमान जुबानी विदित होईल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*An important letter to Bajirao from his sardar Mudhaji Hari posted at Banda. The complicated situation in Bundelkhand is well depicted and the letter shows how Bajirao took advantage of it in order to extend Maratha rule in the North. The Nizam, Mohammadkhan Bangash, the Emperor's General Kamruddinkhan and Sadat Khan are all mentioned as doing their utmost to save the North from the encroaching Marathas.*

No. 10] [*26-12-1733?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ २९ रजब मुा वरणगाऊ जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण सातारियास आले म्हणून वर्तमान कळों आले. तरी जंजरियाकडील बंदोबस्ती कोणे रीतीने केली, शामलास कोणती स्थले दिल्ही हे सविस्तर लेहून पाठविले पाहिजें. आम्हाजवळी आवघी पथके जमा जाहाली. रा संभाजी भोसले व हैबतराऊ सोमवंसी व संताजी मोरे आले नाहीत. तेही लौकरच येतील. येघाजी संतकर यासहि बोलाऊ पाठविले आहे. तेहि लौकरच येतील. याउपरी मजल दरमजल नर्मदापार होऊन जाऊन. राजश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यास पत्रे पायागडचे बेगमीविसी लिहिली होती त्याजकडे पाठविली. आम्हीं नरवर उजवा टाकून सोदर बुंधीकोटे या प्रांते जाऊन मासपक्ष मुकाम करून धण्याचे पुण्यप्रतापे जें कार्य होईल ते करून फिरतेसमई वोडसे दतिये या प्रांते फौजेनिसी जाऊन आज्ञेप्रा वर्तणूक करून. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, reporting his movements to the north and inquiring what terms had been agreed to with the Sidi.*

No. 11] [1733 ?

श्री

श्रीमंत राजेश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कुसाजी गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २ माहे साबान मुाा मकडाई स्वामीचे कृपेकरून क्षेमरूप असो. यानतरी स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते नजीक संगमनेर राजेश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे याच्या भेटी जालिया. स्वामीची पत्रे त्यास देऊन साकल्ये वर्तमान उभेतास निवेदन केले. त्याणी उतर दिल्हे की, रुपयाची निशा कोन्ही करील तरी आम्ही कार्ये करून. ये गोष्टीस पंधरा दिवस रदबदल जाली. सेवटी करार केला की, प्रतापसिंगास भेटीस आणावे. मग जे होणे ते हो. यैसे उतर जाले. आम्हास आज्ञा दिल्ही की तुम्ही जाऊन त्यास घेऊन येणें. मग जे होणे ते होईल. त्याची आज्ञा घेऊन मकडाईस आलो. तो गुदस्ता थोडीसी वस्ती या मुल (खा) त होती. प्रजन्याकरिता कुल मुलूक पेस जाला. जगनोगडापासून[1] मकडाईपावेतो वस्ती नाही. मकडाईस आलो. राजियाची भेटी जाली. स्वामीच्या प्रतापेकरून बहुत सन्मान केला. माणसे सांगाते देऊन सिवणीपावेतो पोहचाविले. स्वामीस कलावे म्हणऊन लिाा असे. राजेश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे रेवापार होऊन बडवाईस मोरचे लाऊन बरी पोखती खंडणी करून सवदागराचे हती तीन होते ते खंडणीत घेऊन तेथून कूच करून मालवियात गेले. राजेश्री पिलाजी जाधवराऊ सुभेदार फौजसहवर्तमान आसेरीवरून नेमाड प्रांते आले. सेवेसी श्रृत होये. बहुत लेहावे तरी स्वामी समर्थ आहेत. कृपावृधीते पावविजे हे विनंती.

¶*Kusaji Ganesh informs Chimaji from Makdai of the movements of Ranoji Sindia, Malharji Holkar and Pilaji Jadhao.*

No. 12] [1733 ?

श्रीशंकर

सेवेसी विनंती उपरी. आपली आज्ञा घेतल्यानंतर चौघटका रात्री राजे जगतराज यांची भेटी घेतली. बोलीचा उपक्रम आम्ही काढिला. त्यास राजे मारनिले बोलिले कीं, उदईक तुम्ही आम्ही एकत्र होऊन जो निश्चय करणे तो करूं. तदनंतर राजे सभासिंग याचे दर्शनास गेलों. दोन घटकापर्यंत दरबारी होतो. परंतु त्याचा संभाषणाचा समय नव्हता. याजकरितां डेऱ्या * *

---

१ जगमगडा अथवा जगंगडापासून ?

* * * आजी मंगळवारीं प्रातःकाळीं * * * * दर्शनास जाऊन एकांती * * * * * ते व आम्ही बैसोन त्यांचा स्वहितार्थ * * सांगणे तो सांगितला. त्यावरून त्याच्या ध्यानास येऊन आम्हासी बोलावयाचा अर्थ तो बोलिले. सारांष तेथे ग्रहस्त आहेत. त्यांचे परम भये मानितात. ते विषई आम्ही त्यांचे मनोधारण कर्तव्य ते केले. त्यावरून समाधान जाले. पैकियाची वाट, जागा व मनुष्यावरी आहे ; ते तुम्ही जाणतच आहों. आम्ही आपले ठाई जो विचार करणे तो करून. कुंवर नारायण व खेतसिंग व उगर यांसी संध्याकाळीं पाठऊन देतों. ते येऊन बोलतील ते ध्यानास आणून, जे गोष्टीनें आमचें राज्य वाचे ते करावें. सर्व प्रकारे आपल्यासी अंतराय करीत नाहीं. लस्करच्या कूचाविषई पुसिले. त्याचे उत्तर दिल्हे कीं, तुम्ही सर्व प्रकारें थोर आहां. आपल्या विचारास येईल तेंच कराल. मुलुकाच संरक्षण जालिया तूर्त तुमच्याच उपयोगास येणार. ऐसें जाणोन जे संरक्षण करावयाचें तें करावें. राटपंडवरी वगैरे जागा जागा * * * * ते गांव लुटोन गुरें आणि * * * * * ल पाहाडीची चारितात. या * * * (ब) दोबस्त करावयाचा एख्त्यार (तुमचाच) आहे. ऐसे उत्तर दिल्हे. यैशास जागा जागा फौजा आहेत ; त्या कुल बोलाऊन आणावयाचा विचार आपल्या विचारास परिछिन्न आला तरी करावा. सर्व उगवणीची इमारत मुलुकावरीच आहे. फौज मुलकातून उठोन आलियानंतर यांचे चितांतील संशय दूर होऊन, कार्य लवकर करतीलसें दिसते. व राजे सभासिंग याजकडील वर्तमान रा गोविंदपंत याचे पत्रावरून विदित होईल. त्रिवर्ग सध्याकाळीं राजीयांनीं बोलीस्तब पाठवावयाचा करार केला आहे. ते आल्यावरी जो मजकूर होईल तो उदईक सेवेसी लेहूं. राजानी पुंड ऊस आपणांस व रा मल्हारराव यांसी पंनास ५० पा आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Dealings and conversations with Jagatraj and Sabhasing, sons of Chhatrasal, are reported (probably to Bajirao or Chimaji) in this letter.*

No. 13] [*1734*

छ ११ जिल्हेज

श्री

राजश्री पंतप्रधान तथा

राजश्री आपा स्वामी

गोसावी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराऊ व तुबाजी अनंत दंडवत व आा सा नमस्कार विनंती. येथील

वर्तमान ताा छ १९ जिलकाद मो नरवर येथास्थित असे. विशेष. पूर्वी इकडील सविस्तर वर्तमान दत्याचे मुकामीहून लेहून स्वामिकडे पत्रे पाठविली आहेत, त्यावरून विदित होईल. त्या अलीकडे दत्याचा कारभार उरकून राजश्री मल्हारजी होलकर व राणो(जी) सिंदे अहिरवाड्याकडे गेले. आम्ही दत्याहून कूच करून ग्वालेरीस गेलो. च्यार मुकाम ग्वालेरीखालीं केले. मुलूक तिकडील खराब पडिला आहे. काहीं गाव वस्ते होते तेथे शेपनास रुपये आले ते घेतले. भदावरचा कार्यभाग तेथेच विल्हेस लागला. मग पुढे जावे तरी मुलूक वैराण, याजकरितां माघारे फिरोन नरवरास आलो. येथे येकदोन मुकाम करून लोहरसिंग व गुजरोरा सुकलारी येथील निर्गम करून मजल दरमजल चंदेरी डावी टाकून गौरझाबरेयास येतो. तेथे गोविंद बलाल यास बोलाऊन आणून, तेथील कार्याची विचारणा करून, पुढे मजल दरमजल देशास येतो. बुदिकोटे प्रांची थोडीसी बाकी राहिली आहे. व हती आजारी तेथे ठेविले होते; ते आणविले आहेत. चऊ रोजात येतील, म्हणजे इकडील निर्गम जाहाला. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Pilaji Jadhav to Bajirao from Narwar giving an account of his activities in the region of Jhansi.*

No. 14] [*23-4-1734*

श्री

राजश्री पंतप्रधान

साहेबांचे शेवेसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रो मलारजी होलकर व राणोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना येथील कुशल वैशाख शुध प्रतिपदा सोमवांसर मुकांम मेडतें स्वामींच्या प्रतापें येथास्थित जाणून श्वकीये लेखनं करावयांस आज्ञा केली पाहिजे. यानंतरें राजश्री सवाईकडील कासिदासमागमें पत्र आलें. उतंम समई प्रविष्ट होऊन आनंद जाला. मेडतियाचें वर्तमान सविस्तर आनविले. त्यास आरंभी दाहा कोंस मेडतें राहिलें होतें. तेच समई राजश्री उमेदसिंग शाहापुरवाला मेडतीयामधे आहे, त्याजकडील भला माणूस राजश्री प्रतापसिंग याजकडे आला होता. त्यास तेथून कूच करून शहरासंनिध आलियांवरी रा। प्रतापसिंग गावांत गेले होते. भंडारी याची भेटी व उमेदसिंगाची घेतली. तेथील प्रसंग विच्यांर मनांस आनता थाक न लागेसा जाला. मंग उठोन आले. उपरांतिक शंहर प्रथम दिवसींच घेतलें. गावांत

घरोघर सडे होते. कुल पलोन सराईत गेले. ते जागां बलांऊन आहेत. प्रस्तुत मोर्चे सनिध गेले आहेत. येक दोंन वेले बाहेंर निघाले होते. जुंज जालें. त्याजकडील दाहा पांच माणूस पडले. त्यामधे प्रतिष्ठित येक ठार जाला. आम्हाकडीलहि दोघें भले माणूस जानोजी जाधव व सेकोजी धुमाल पडलें, व दोघे चौघें जखमीं जाले. त्यास अद्यापि त्यांजकडील कांहीं अनुसंधान येत नांही. विशेष या गांवची वस्तभाव अगोंदर कुल पलविली होती. घर रक्षनार्थ सडे गावांत होते ते गांव घेतांच वाडियांत गेलें.. याउपरीं होईल वृत तें सेवेसी लेहूंन पाठऊ. सेवेसी पत्रलेखन केल्यावरी नवीन वृत आरंभी जे स्थलीं आमचें मोर्चे होतें तेथून त्याचे पुढील मोर्चे उधलूंन कोटांत लोक घातले. ते ठिकाणीं आमचे बसले होतें. त्यास किल्यांतून मागती जमाव करून येऊन मोर्चा त्याणी आपला कायेम केला. किल्यावरील व खालील दोहीं कडून गोळीचा मार जाला. त्याजमुलें मोर्चा त्यांणी आपला घेतला. परंतु त्यांचे माणूस दाहा-पांच पडले व जखमींही वीस तीस जाले. आणि आम्हांकडील दोघे चौघें पडले व दाहावीस जखमीं जालें. आमचा पहिला मोर्चा कायेंम राहिला. आमचे लोक येकायेकी त्याच्या मोर्चापासून आलें नाहींत. अगोधर बरी मार दिल्ही गोल्याची. धीर फार धरून उभे होते परंतु दुतर्फा त्याजकडील रंजक याज-करता मग आपल्या पहिल्या मोर्च्यावरी येऊन राहिलें आजिच्या मोर्चियाचे घालमेलीमुले चिकिबा (सिकिंदा?) तो बरेसे जाले आहेत. याउपर जे हाती होईल ते सेवेसी लिहून पाठऊन. आपणाकडीलहि वर्तमान सदैव लिहीत गेले पाहिजे. सेवेसी श्रुत होयें हे विज्ञापना.

¶*Malharji Holkar and Ranoji Sindia describe to the Peshwa the severe encounter at Merta and the subsequent evacuation of the town by the inhabitants. Some light skirmishes between the Rajputs and the Marathas are also described.*

No. 15] [*29-4-1734*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती पोष्य सिवाजी शंकर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम स्वामीच्या कृपादृष्टीकरून छ ६ जिल्हेज मुकाम आमदानगर प्राा अशेर सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. बहुत दिवस जाले, पत्रद्वारे सेवकाचा सांभाल

---

१ ओढेकर.

केला नाहीं. कसबे सिपरी व कुलारस प्रांत नरवर सुभा आग्रे दोही शहरची खंडणी घेऊन पुढें काा सोपार सुभा आजमेर येथपर्यंत गेलों. पर्जन्यकाल समीप आला याजकरितां तेथून माघारे मुरडोन कुच करून देशास येत आहों. बऱ्हाणपुरानजीक तापी उतरोन आपल्या दर्शनास येत असों. वरकड वर्तमान राजश्री आनंदराऊ यांणी लिहिले आहे त्यावरून सेवेसी श्रुत होईल. विशेष काये लिहिणें. तेथून पत्रे समागमीयासी आली आणि या ग्रहस्तास पत्र न आले हे गोस्टी आेर्दुसी दिसोन आली. हे ग्रहस्त तो जीवेभांवे सेवा करीत आहेत. ज्यांसमागमे मार्गस्त केले त्याचे मरंजीसिवाये तीलभर वर्तणूक न करितां आपण पत्री परामृश न करावा यैसे नाहीं. येथील विचार तरी जे जोडी आपणाकडे मार्गस्त करिता आम्हास श्रुत जाली ते समयी पत्र दिल्हें. जे जोडी न कलतच आपणाकडे आली असल, तरीच पत्र आमचें पावलें नसल. सविस्तर अर्थ भेटीनंतर श्रुत होईल. विशेष काये लिहिणे. लोंभ असो दीजे हे विनंती.

राजश्री आयाबा व राजश्री अंताजीपंत व राजश्री दादजी स्वामीस सां नमस्कार अनुकर्म आसीर्वाद विनंती लिखितार्थ परिसीजे. लोभ आसो दीजे हे विनंती.

पो विठल रामराऊ सा नमस्कार व आसीर्वाद.

¶*Siwaji Shankar Odheker to Chimaji Appa, communicating his own movements. The writer further says that he is proceeding to Sopar in Ajmer after having collected the tribute from the two towns of Sipri and Kularas.*

No. 16] *[26-11-1734?*

छ ११ रजब मुा सातारा

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यासी.

ꣳ श्रीमत सकलगुणालकरण आखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहाकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ १० रजब मुा भालवणी पाा पारनेर जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आष्टमीस लोणीहून स्वार जाहालो. तो कूच दरकूच आलो. राा राणोजी भोसले सामील जाहाले. राा भिकाजी सिंदे व गोविंद हरि येका दो दिवसा सामील

---

१ आदूर्सी = अदूरदृष्टीचा.

होतील. तुबाजीपंत व विसाजीपंत डेरा व पागादेखील अजी उद्या आलियानंतर आम्ही डेरियांत जाऊन राहून. याउपरी गुतोन राहात ना (ही). मजल दर-मजल चालत जाऊन. मौजे खोकर व भोकर, नियाणी, वडिगाव याणी बदल खाऊन वसूल सुरलीत देत नाहीत. याकरिता त्याचे पारपत्य करावे, ऐसे राणोजी भोसले याचे मते जाहाले आहे. याकरिता त्याच्या पारपत्याचा [शिक्का] विचार जैसा कलेल तैसा करून तवी पोहचावितो. वरकड वर्तमान जे होईल ते शेवेसी लिहून पाठऊन. याउपरी पुढे जाऊन धण्याच्या पुण्यप्रतापेकडून जे कस्त करणे ते करून. सार्वभौमाच्या फौजा आल्या तरी जैसे कलेल तैसे च्यार दिवस डावे उजवे होऊन पोट भरून. आमचेविसी चिंता केली न पाहिजे. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhav to Bajirao, starting on an expedition into the north.*

No. 17] *[22-12-1734?*

छ ७ साबान

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेाा. पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम तागाईत छ २२ माहे रजब मुकाम नजीक तलेगाव पाा. चालीसगांव जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. काली छ २१ रोजी घाट उतरोन आजी मुकाम मजकुरास आलों. येथे लोक जमा जाले आहेत. त्याची याद अलाहिदा पत्रीं लेहून आपणाकडे पाठविली आहे. त्यावरून विदित होईल. मागाहून कितेक लोक येणें आहेत त्यास ताकीद करून रवाना केली पाहिजेत. आम्ही तो मजल दरमजल दाहा बारा रोजानीं नर्मदापार होऊन जातों. कदाचित आपला यावयाचा विचार योजून आला असिला तरी या निमित्यहि लोक राहिले असतील त्यास आपले येणें जालें तरी आपण चौं पाचाशा राऊतानिसी येतील. वरकड राऊतानी राहोन प्रयोजन आहे ऐसा अर्थ नाही. आपल्यास जितके राऊत पाहिजेत तितके ठेऊन वरकडास ताकीद करून जलदीनें आम्हास आटोपून येत तें केलें पाहिजे.

1241

राजश्री राणोजी सिंदे व मल्हारजी होलकर याची फौज करवंदीचे बारीनें पुढे गेले. रा. आनंदराउ पवार माघून जात होते. ते * * * * राग-णीयाचे कापटणे (?) येथे राहिले होते, त्याजवरी जावजी दाभाडे व दलपतराऊ ठोके छपा घालावयासीं गेले. त्याचें याचे युद्ध बरे जाहले. पवारानी सेपनास माणूस मारले. दलपतराऊ याचे मांडीवर तरवारेची जखम लागली आहे; त्यास मोडून पिटून लाविले म्हणून वर्तमान आले. बोटवदीहून सितोलियासी पत्र आले. तेच बजिनस पाठविले आहे. त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणे. कृपा केली पाहिजे. हे विनती.

(मोर्तब सुद.)

¶*Pilaji Jadhav to Bajirao: writes his plans of marching.*

No. 18] *[28-12-1733*

श्री

राजश्री पंत प्रधान

गोसावी यासी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम. ता छ २ माहे साबान मु॥ आमदनगर नजीक आसरेगड जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. आंम्ही बऱ्हाणपुरीहून कूच करून आजी येथे आलों. राजश्री संभाजी भोसले व राजश्री संताजी मोरे अद्यापि सामील जाहाले नाहीत. येका दो दिवसा येतील. रा॥ येद्याजी संतकर यास पत्र पाठविलें, तेहि येतील. याउपर मजल दरमजल रेवापार होऊन जाऊन. जे वर्तमान होईल, ते लिहून पाठऊन. राजश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे याजकडील पत्रे आली, ती पाठविली आहेत. त्यावरून विदित होईल. त्याजकडील वर्तमान आले की, बडवाई प्रात माळवा येथे मोर्चे देऊन जेर करून खडणी घेतली, म्हणून आले.

[शिक्का] कागदीपत्री नाही. नर्मदारपार होऊन गेलियानंतर सविस्तर वर्तमान परकीये फौजाचे व आद्यंत लिहून पाठवितो. आमचेविसी काही चिंता केली न पाहिजे. खावदाचे पुण्यप्रतापेकडून येश संपादून फौज

हिंडऊन आणून. वरकड वर्तमान रा तुबाजीपंताचे पत्रावरू (न) कलो येईल. विशेष कार्ये लिहिणे. कृपा असो दिल्ही पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhav to Bajirao : communicates his plans for marching into the north.*

No. 19] [*18-12-1734 ?*

पो छ ३ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. स्वामीनी केदारजी सोनजी जासूद याजबराबर पत्रे पाठविली ती पावली. राजश्री प्रतिनिधी राजश्री-पासी वऱ्हाडच्या गावाविसी व मालवा प्रांतीच्या सरजामाविसी बोलिले तरी तुम्ही जाबसाल करणे म्हणून तपसिले लिहीले. यैसियासी सदरेस उगाच मजकूर प्रतिनिधी मात्र बोलिलें, परंतु ते गोस्टीचा फिरोन प्रसंग पडला नाही. कदाचित प्रसंग पडला तर स्वामीचे आज्ञेप्रमाणे बोलो. विदित जाहाले पाहिजे. राजश्री प्रतिनिधी बोलिले तेव्हांच राजश्री स्वामीनी जाबसाल केला कीं, जलगाव व फुटगाव वराडचे हे पहिलेपासून राजश्री प्रधानपंताकडे आहेत. त्यात घालमेल चालणार नाही. वरकडानीं नवीन करून घेतले आहे ; त्याचेच कार्ये करणे ते करावे. यैसे बोलिले. हाली काही मजकूर नाही. कलले पाहिजे. वरकड उतर मागाहून पाठऊ. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa : describes Shahu's intentions as to the Peshwa's Saranjam in Malwa and Berar.*

No. 20] [*1734*

श्रीवेंकटेश प्रा

श्रीमंत राजश्री पंतप्रधान व आपासाहेब

स्वामी यांचे शेवेसी

शेवक लाला भागीरथ मुनशी दंडवत विनंती. विनवावया प्रार्थना ऐसीजें. साहेबीं निजानंदवैभव ल्याहावया लेखकास आज्ञा करीत गेले पाहिजे. विशेष.

सातारियाहून पुणियाकडे स्वार जाले तें समयीं निरोप सांगोन पाठविला कीं, कितेक विचाराच्या गोष्टी आहेत त्या भेटीनंतर सांगितल्या जातील. त्याउपरी बहुत त्वरा येथून स्वार व्हावयाची जाली. याकरितां तो प्रसंग घडून न आला. व सेवकाचें चितांत त्या गोष्टीचा संशय राहिला आहे. तरी त्या गोष्टीचा निरोप सेवकायोग्य सांगून पाठवावयाचा असेल तरी सांगून पाठविला पाहिजे. येथें वार्ता आहे कीं, स्वामींनीं राजश्री धोंडोपंत[१] यास महत्कार्य विज्ञापिलें आहे; त्या कार्याचें साहित्याविषयीं शेवकास जे कांहीं आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल; व त्या जागचे वकिलास आपला विचार कळों देणें उचित नाहीं. व माहाराजा संगरामशिंग यास देवआज्ञा जाली. व त्याचे ज्येष्ठ पुत्र राजश्री माहाराजा जगतसिंग यांस राज्याभिशेक केला, म्हणोन राजश्री राऊ नगराज माहाराजाजीचा धायेभाई व राजश्री सोमाराम मुनशी यांनीं माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी लिहिलें व सेवकांस लिहिलें कीं, राजश्री पंतप्रधान यांचे विद्यमानें माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी विनंती करून, राज्याभिषेक जाला आहे त्याचा टिका पाठवणें. यैशियासी स्वामी प्रसंगीं नवते. आपण राजश्री स्वामीचे सेवेसी विनंती करून, येक हस्ती व वस्त्रें वगैरें टिकियाचा सरंजाम चिरंजीव राजश्री लाला भवानीदास यासमागमें पाठवावयास मोकरर केला आहे. परंतु कितेक लोकांनीं या कामामध्यें मन घालून हें काम आपण करावें म्हणोन बहुत उपाय केला. यैशियासी ईश्वराचे कृपेनें व आपले दयेनें माहाराज राजश्री स्वामी यांनीं त्या लोकाचा अर्ज कबूल न केला. व चिरंजीवावर हें कार्य मोकरर केलें आहें. आतां स्वामीचा मार्ग लक्षितों. स्वामी येथें आलियावर निरोप देवितील, परंतु या गोष्टीचा इनसाफ केला पाहिजे कीं, आपण चोवीस वर्षें राजश्री स्वामीची व आपली सेवा करितों. त्याचें फळ हेंच कीं चिरंजीवास सात वर्षें घरीं बेकार बैसऊन शेवकास आठ हजार रुपयांचे कर्जदार केलें व त्यां दिवसांमध्यें दोन तीन चाकरियाहि यैशा मिळाल्या होत्या कीं, त्यांमध्यें शेवकाचें कर्ज आदा होऊन जमयेतीनें गुजारा न होय; परंतु येथील सेवेचें सबबेकरितां त्या चाकरिया चिरंजिवास करूं न दिधल्या, घरीं बेकार बैसविलें. पहिलें व हालीचें कर्जामुळें आतां कांहीं ताकत राहिली नाहीं, याकरितां सेवेसी विज्ञापना केली जाते कीं, स्वामींनीं पूर्वील आपलें वचनाचा प्रतिपाल करून, शेवकाचा अभिमान धरून, गौरव केला पाहिजे. सेवक स्वामीचे पदरचा मनोभावेंकरून आहे. स्वामींनीं व राजश्री आपासाहेबी मौजे सिलेगाऊं येथील सरदेशमुखी सेवकास दिधली असतां ते जागाचा कमाविसदार अंमल देत नाहीं. स्वामीचे दौलतेनें लक्षानलक्ष मनु-

---

१ धोंडो गोविंद, पेशव्याचा वकील, सवाई जयेसिंगाजवळ १७३९ त. (ऐ. चर्चा.)

ष्यांचें ऊर्जित जालें व शेवकाची शेवा पहिली व हालीची ईश्वरास ठाऊक आहे. व स्वामीसहि विदित असेल. थोडें गोष्टीसाठी शेवकाचा अव्हेर करावा हें स्वामीचे थोरपणास व महत्त्वास उचित नाहीं. व शेवकाचे पदरीं पंधरावीसा ब्राम्हणाचें व शांदीढशां मनुष्यांचें अन्न आहे. जो येथील कांहीं प्रासंश आहे तो विदित आहे. याकरितां वारंवार विनंती केली जाते जे वाळूज प्रांतींचे सरदेशमुखास ताकीदपत्र होय कीं, दरोबस्त सिलेगावीचें सरदेशमुखीचे यैवजात मुजाहिम[१] न होणें. स्वामीपासी हे बहुत मालियेत नाहीं, व साहेबीं कलमदानाविषयीं शेवकास फर्मायेश केली होती त्याबदल व आणिक कांहीं औषध आणावयाबदल दोघें मनुष्यें अवरंगाबादेस पाठविलीं होतीं, तेथून संदुकी कलमदान देखील साज व रुप्याच्या दौती किंमत रुपये ७० सत्तर व औषध व कापड मिळून किंमत रुपये १३० येकशेंहतीस येकूण रुपये दोशांहाची मत्ता घेऊन, ते मनुष्यें शिमगीपोर्णमेचे दिवशीं चांभारगोंदियापावेतों पावलीं. त्यांचें वर्तमान चांभार-गोंदियामध्यें आमचे वळखी लोक होते त्यांचें लिहिलियावरून कळों आलें. त्याउपरी शिमगीपूर्णमेचे दुसरे दिवशीं चांभारगोंदियाहून मनुष्यें चाललीं तें लिंपनगाऊ व गारदौंड या दोही गांवांमध्यें गायबा जालीं. सातारियाहून दुसरीं मनुष्यें पाठऊन त्यांचा तलास केला, परंतु कोठें ठिकाणा लागत नाहीं. सुभाना बेरड मौजें गारदौंड येथें राहातो. बहुधां त्यानें त्या मनुष्यांचा घात केला. तो जिल्हा स्वामीचा आहे. या गोष्टीचा तलास करणार स्वामी समर्थ आहेत. हें वर्तमान दोन वेळां स्वामीचे सेवेसी लिहिलें, परंतु त्याचें उत्तर न आलें; आतां दया करून त्या मनुष्यांचा तलाश करविला पाहिजे. स्वामीनीं सिलेगांवची दराबस्त सरदेशमुखीची सनद दया करून देविली पाहिजे. व राजश्री लाला भावानीदास व सेवकाचा गौर केला पाहिजे. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ असो देणें हे विनंती.

¶*Lala Bhagirath Munshi to the Peshwa from Satara. He says he has been serving the Peshwa for 24 years and so also his son Lala Bhavanidas. He complains that he has not been given any remuneration for his services or Jagirs to maintain himself and family. He adds, " King Shahu has received intimation about the death of Rana Sangramsingh of Udaipur and the installation of his eldest son Rana Jagatsingh to the throne. Nagraj, the foster-brother of Jagatsingh, has written to Raja Shahu to send his congratulations and a dress of honour to the new Rana with the approval and recognition of the Peshwa Bajirao." Rana Jagatsingh came to the throne in 1734.*

---

१ अडथळा. २ लाला भगीरथ मुनसी व मुलगा लाला भवानीदास. (शोभाराम मुनसी) लाला भगीरथ २४ वर्षे बाजीरावचे नोकरींत आहे. औरंगाबादचा राहणारा दिसतो.

1245

No. 21] [8-3-1735 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजेश्री आपा
स्वामीचे शेवेसी

पोश्ये बाबुजी नाईक जोशी सा। नमस्कार विनंती. उपरी : स्वामीचे आशीर्वादे करून मुकाम बुराणपूर सुखरूप असों विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन आलों. आजीपावेतों आपले घरींच आहों. बुराणपूरचे अविंधाने शेंदोनशें राऊत व दोणशें बरकंदाज नरमदापावेतों दिले. उदईक कूच करून पुढें जातों; परंतु राजकी वर्तमान सुभेदार व कमर्दिखान बुंदेलखंड प्रांती आहेत. परस्पर युध होते. होळकर व सिंदे रामपुरियानजीक होते. सवाईजी व खांदोराऊ[1] दाहां कोसांचे अंतरियानें आठचार दिवस रदबदली जाली. परस्पर बींद न बसली; त्यावरून आपल्या फौजा सवाई जयपुराकडे गेल्या. मागून सवाईजी व खांदोरा गेले. परस्पर बिगाड जाला. अविवेकें आम्ही निघालों. मातबर माणसाजवळ गेलिया-उपरी चिंता नाहीं, परंतु पंथ दूर. समय की सकलीत सामान आम्हासमागमे नाहीं. कदाचित बलकुबले[2] तर घरास तरी सुरक्षित यावें. स्वामी पुण्यवान आहेत. चिंता तों नाहीं. पुढें होईल वर्तमान होईल तें लिहून पाठऊं. बुंदेल-खंडावरून जावे तों कमर्दिखानाचा शह; सवाईजीकडे जावें तों दूर गेले. तूर्त नरमदेपावेतों जातों. पुढें होईल तें लिहून पाठऊं. सविस्तर वर्तमान मातोश्री बाईचे पत्रावरून विदित होईल. सारांश गोष्ट हजार पांचशें फौज बराणपूरपावेतों पाठवावी. दाहापांच काशिदाच्या जोड्या फौजेसमागमे ध्यावा. आमचे वर्तमान फौजेस कळे त्यांचे वर्तमान आम्हास कळेसें पत्रदर्शन तरजुत केली पाहिजे. स्वामीपासून निघालों. लोकापवादाकरितां होरट करावी तर स्वामीचें नांव थोर. विवेकें करून होईल तेच करावें. बहुत काय लिहिणे हे विनंती. फाल्गुन वदी १०.

¶*Babuji Naik to Chimaji Appa from Burhanpur, describing his journey to the north in company with Radhabai. The style of writing resembles Hindi, Babuji having spent his early life at Benares.*

---

1 Khan Dauran.

२ वाईट प्रसंग आला तर.

No. 22] [2-3-1735

नकल.

पो चैत्र सुध १९

श्रीमार्तंड

राजश्री बाजी सखदेव कमावीशदार पो हवेली गो अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत. सुा खमस सलासीन मया अलफ. तुम्हीं पत्र पाठविले ते पावून लिा वर्तमान कलो आले. आम्हाकडील वर्तमान तरी कमरुदीखां वजीर वीसापचवीसा हजारा फौजनसी दिलीहून आम्हावर रवाना होऊन आला. त्यांची आमची दोनतीन युधे जाली. त्याची दोन तीनसें उंटे व घोडी पाडाव आम्हाकडे आलीं. त्याउपरी आम्हीं तिकडून निघोन पोहरी सिवपुरी कुलारस या प्रांतें आलो. मोगल नरवरावरी आहे. त्यांसी व आम्हासी बारा कोसांची तफावत आहे. पुढें आम्ही मजल दरमजल बुंदेलखंडात बुणगे आहे त्यास सामील करून चांदे देवगडाच्या मुलकातून देशास येऊन. तुम्ही आपले परगाणियातील वसूल लौकर करून ऐवज वरातदारास नेमणूकप्रमाणें ज्याचा त्यास पावता करणे. वरकड वर्तमान चिरंजीव राजश्री संभाजी जाधव याचे पत्री लिा आहे त्यावरून कलो येईल. जाणिजे. छ १७ सवाल. बहुत काये लिहिणे.

¶*Pilaji Jadhav describes to Baji Sakhdeo his encounter with Kamruddin Khan.*

No. 23] [14-3-1735

नक्कल

श्रीशंकर

तीर्थस्वरूप राजश्री पंत वडिलाचें

शेवेसी

अपत्येंसमान नारो सिऊदेव कृतानेक साां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चैत्र सुध १ वडिलांचे आसीर्वादे मुाा काा धार सुखरूप असों विशेष. वडिलाचें आसीर्वाद पत्र आले, पावोन बहुत समाधान जाले. यैसेच अपत्याचा आसीर्वादपत्री परामृष करीत गेले पाहिजे विशेष. या प्रांतीचें वर्तमान तर बाविसीची फौज खानदौराखां व सवाई जेसिग व अभयसिग व माहाराव कोठेवाला वगैरे राजे यैसे दोन लाख स्वार व तोफखाना व आरब यासी तो संख्या नाही,

ऐसी फौज मकुंददरा उतरोन रामपुराप्रांते आले. इकडून राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे यैसे येऊन कजिया केला. आठ रोज लस्करचे चौगिर्दी कही-काबाड दाणा-घास बंद केला, लस्करची उंटे घोडी आणिली. उपरांत गनीमी कावा करून मकुंददरा उतरोन बुंदीकोटे यावर जाऊन तेथून पुढे सवाईचे मुलकात गेले त्याजवरून मोगलाईची फौज माघारी गनीमावरी गेली. प्रस्तुत खानदवराखान बुंदीवर आहे. सवाई जेनगर नजीक गेला. राजश्री मल्हारजी होळकर वगैरे दाहा कोसाचे तफावतीने पुढे आहेत. याप्रांती मोगलाची फौज नाही. गनीमाचे कमाविसदार जागा जागा आहेत. राजश्री पिलाजी जाधवराऊ कमरदीखानासी गाठ घातली. छत्रसालाचे लेक हरदेसा रा। पिलाजी जाधवराऊ यासी सामील जाले आहे. त्यानीही कमरदीखानासी येक दोन लडाई जबरदस्त घेतली. आता प्रस्तुत पाच सात कोसाचे तफावतीने आहे. कमरदीखान नरवलेवर आहे. सिप्री कुलारसेवर जाधवराऊ आहेत. पाच लक्ष रुपये कमरदीखान यासी देतात, परंतु याचे मनोगत विशेष आहे. अद्यापि काही ठराव नाही. पुढें होईल वर्तमान सेवेसी लिहोन. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*News sent to the Peshwa from Dhar about engagements with the Imperial forces in Rajputana and Bundelkhand.*

No. 24] *[12-4-1735*

पौ छ १० जिल्हेज.

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजें. येथील वर्तमान तागाईत वैशाख शुद्ध प्रतिपदा मंदवासरपर्यंत येथास्थित असें विशेष. छ २६ जिलकादीं नवाबाची येथें सोळा दिवसाची बातमी आली कीं नवाब खानदौरा व राजश्री मल्हारजी होळकर राणोजी शिंदे याच्या भेटी राजश्री जैसिंगजीचे विद्यमानें जाल्या. होळकर बुंदीवरी आहेत व खानदौरा कोटियावर आहेत. विदित होये. नवाबाचें कूच छ १२ जिल्हेजीं मोकरार जालें आहे. सांप्रत रोज्यास पिराचे तवाई * * * कारु पेशखाना गेला. आजीं प्रात:काळीं खुद स्वार होऊन गेले. कमरुदिखान यांची छावणी माळव्यांत होणार ऐशी वार्ता आहे. राजश्री सरलस्कर व राजश्री सुलतानजी निंबाळकर यांची येक लडाई पूर्वी जाली. त्यानंतर सरलस्कर व राजश्री

आवजी कवडे नडसी प्रांतें येकत्र जाले. नडसीहून दोदो कोसांवर आहेत. निंबाळकर नडसीवर आहेत. त्याचें त्याचें सख्य होणार. मध्यस्तीस लोक पडिले आहेत म्हणोन वदंता आहे. विदित होये हें विज्ञापना.

¶*News-letter about Maratha doings in Malwa with reference to Sawai Jaysingh, Ranoji Sindia, Malharrao Holkar and others.*

No. 25] [*25-4-1735*

श्री

पुरवणी[1] तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. लाला भागीरथ यासी वैशाख सुध पूर्णमा गुरुवारी देवआज्ञा जाहाली. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji informs Bajirao of the death of Lala Bhagirath, which took place on 25th April 1735.*

No. 26] [*April 1735 ?*

श्रीरामचंद्र

श्रीमंत राजश्री राऊप्रधान
व राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णाजी आनंदराऊ, कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. तीर्थरूपांकडील वरचेवरी पत्रें तेथें येतच असतील. प्रस्तुत शाहारीहून बातमीचें वर्तमान आलें. त्याची नक्कल सेवेसीं लिहून पाठविली आहे, त्यावरून विदित होईल. सारांश, खानदौरा व जयेसिंग यांच्या भेटी, राजश्री मल्हारजी होळकर यांच्या जाल्या. स्वामींचा प्रताप ऐसाच आहे. नवाबांचें बोलाऊं तीर्थरूपांस आलें. पैठणीहून शाहारास गेले. तेथील वर्तमान येतांच सेवेसी लिहून पाठऊं. दरबारचें सविस्तर वृत्त

---

१ पत्र महादाजी अंबाजी याचें आहे.

राजश्री माहादाजीपंत लिहितील, त्यावरून विदित होईल. वरचेंवरी पत्र पाठऊन वडीलपणें सांभाळ केला पाहिजे. बहुत काये लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Krishnaji Anandrao, son of Anandrao Sumant, writes to the Peshwa and his brother about the meeting of Malharji Holkar with Sawai Jaysingh and Khan Dauran. He further informs him that his father left Paithan for Aurangabad, whither he had been invited by the Nawab Nizam-ul-mulk.*

No. 27] [*April 1735*

पौ छ १० जिल्हेज

श्री

पुरवणी तिर्थरूप राजश्री राऊ तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री सुमंताकडील पत्र आलें तें आजीं मंदवारीं राजश्री स्वामीस राजश्री कृष्णराऊ[1] याणी वाचून दाखविलें. त्यांत मजकूर राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे याचा व नवाब खानदौरा याच्या भेटी जयेशिंगजीचे मारफातीनें जाहाल्या. बुंदीवर होळकर आहे व कोट्यावर खानदौरा व जयशिंग आहेत. थैसें वर्तमान सोळा दिवसाचे बातमीचे जोडे आले त्यांणी सांगितलें. शहरींहून[2] छ ११ जिल्हेजीं नवाबाचेंहि कूच होणार आहे; विदित जाहालें पाहिजे म्हणून पत्र आलें. राजश्री स्वामी कांहीं बोलिलें नाहींत, स्वामीस विदित व्हावें यास्तव लिहिलें असें. येविशीचें स्वामीकडे तपशीलवार वर्तमान आलें असेल तरी लिहिलें पाहिजे. कदाचित राजश्री स्वामी पुसतील कीं पहिले झुंजले काय? आतां भेटले काय? हा मजकूर काये असें पुशिलें तरी सांगावयासी कळलें असावें, यास्तव वर्तमान लिहिलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होये हें विज्ञापना.

¶*The writer, Mahadoba Purandare, informs the Peshwa that letters have reached Shahu giving intelligence of the meeting of Malharji Holkar and Khan Dauran. Though no discussion followed on receiving the news the King may very likely ask an explanation why they fought originally and how are they going to be reconciled now.*

---

१ कृष्णराव आनंदराव सुमंत असावा. २ औरंगाबाद.

No. 28] [*30-4-1735*

पौा जेस्ट सुधं ४

पाा छ ६ मोहरम

श्री

राजश्री भगवंत भैरव दिाा राजश्री
बाबूजी नाईक गोसांवी यांसी

ꣻ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ रामराम उपरी. येथील कुशल ताा छ १७ जिल्हेज मुकाम पाटस सांगवी प्राा देवगड जाणून स्वकीय लिहिणे विशेष. तुम्ही वैशाख शुध पंचमीचें पत्र पाठविलें ते वद्य त्रितीयेस प्रविष्ट जाहालें. राजश्री पंतप्रधान स्वामीची आज्ञा जाली त्याप्राा दोन जोड्या कासिदांच्या दों मार्गें पत्रें देऊन पाठविले असे; पावतील ते मिती लेहून पाठवावी, म्हणोन लिहिलें ते अवगत जाहालें. यैशास तुम्ही श्रीमत् राजश्री उभयतां येजमानाचीं पत्रे देऊन, कासीद जोडे येक गढ्याकडे व येक बुधलखंडाकडे यैशा दोन पाठविल्या; त्या छ १९ जिल्हेज वैशाख बहुल त्रितियेस दोन्ही जोड्या मिलोन, येकदांच प्रविष्ट जाहाल्या. पत्रें पावोन वर्तमान कलों आले. हाली त्या जोड्यासमागमे उभयेता श्रीमंतास पत्रे पाठविली आहेत. हीं पुण्यास प्रविष्ट होत तें करणे. यानंतर प्रस्तुत आम्ही देवगड प्रांत नागपुरानजीक मुकाम केला असे. वासीमच्या घाटें सेनेसहवर्तमान देशास येत असों. त्यास नवाब निजामनमुल्क औरंगाबादेस आहेत. त्यांची तेथून निघावयाची तयारी आहे म्हणून वर्तमान ऐकतो. यैशास कोणत्या रोखे जाणार किंवा ठिकाणींच राहाणार, हे बातमी वरिचेवर आम्हास कलावी लागते. तरी तुम्हीं कासीद जोडी करून, आठा दिवसांचे वर्तमान वरिचेवरी लेहून पाठवीत जाणे. कासिदांचा अजुरा पडेल, तो लेहून पाठवणे. 'मुदतीप्राा त्याहाल तो सिरस्ताप्रमाणे आम्ही देऊन. तरी वरिचेवरी वर्तमान लेहून पाठवीत जाणे. जाणिजे छ १७ जिल्हेज बहुत काये लिहिणे.

(मुद्रा:) ✓ श्री ० राजा शाहुनरपति हर्षनिधान बाजीराव बल्लाळ प्रधान.

(मोर्तब:) लेखन सीमा.

¶*Pilaji Jadhav to Bhagvant Bhairao, saying how particular he was in sending communications to the Peshwa. The addressee is further asked to write about the Nizam who is at Aurangabad.*

No. 29] *[16-5-1735?*

पाा छ ७ मोहरम

श्रीरामचंद्र

सेवेसी चर्णरज अबाजी दादाजी साा दोन 'कर जोडून नमस्कार विज्ञापना. येथील सेवकाचे वर्तमान ताा छ ४ मोहरम स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे. यानंतर उजिनीहून पत्रे आली की राजश्री राणोजी सिंदे सिरोंजे राजगड पाटण-पावेतो गेले; तेथून उजिनीवर येणार आहेत. बाा दोन हजार फौज आहे. राजश्री मल्हारजी होलकर व रामचंद्रबावा येसे कालाबागावर आहेत. कमुरदि-खान नरवरीहून कूच करून मजल दरमजल दिलीस जातांत त्यास शाहा पोहचोन माघारा चालिले येसे पत्र भाईजी नाईक याचे आले; व राजश्री सुभेदार याकडे कासिद अजुरे करून दोन जोडी पाठविल्या त्यास तेथे पोहचोन त्याची पत्रे स्वामीस घेऊन आले. येक जोडी आपलेपासी ठेऊन घेतली. येक जोडी अजुरदार रवाना केली व येक जोडी सरकारची; त्याजवल पत्रे ती त्याही येथे दिल्ही नाही. आम्ही मागत होतो परंतु आम्हासी कटकट केली. राजश्री भगवंत नाईकहि मागत होते त्यास म्हणो लागले कीं आपणच घेऊन जाऊ. डाकीबाा कागद देत नाही; माघून कासिद पत्रे राजश्री सुभेदारा घेऊन येतात. नवाब याचे मुकाम सेवालेहून बारा कोस पलिकडे आहेत. कवालाकडे जाणार म्हणऊन शहरी समाचार आहे. राजश्री सुभेदार सत्वरच येतात. राजश्री भगवंत भैरव यासी पत्रे पाठविली ती बजिनस स्वामीकडे पाठविली असेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति. राजश्री भगवंत नाईक याही स्वामीकारणे पाने विड्याची सुमार१००० हजार दिल्ही ती स्वाराबराबर रवाना केली असेत हे विज्ञाप्ति.

¶*News-letter to Peshwa from Malwa communicating the movements and performances of Ranoji Sindia and Malharrao Holkar.*

No. 30] *[23-6-1735?*

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

श्रीमत सकलगुणाळकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ १२ सफर मुाा सुरोंज येथास्थित असे विशेष. स्वामीचे पत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की, दोघा रोहिल्याचे सरदेस लस्कर आले, यारमहमदखान याच्या मुलुकास ताकीद करवितो आणि मुरवाई भोवरासियाच्या मुलकांत येतो म्हणून. त्यास भोवरा-

सियाच्यां मुलकात येऊन त्याच्या पैकियाचा निशा करून घ्यावा. मोगलाई लस्कर येथून कूच होऊन गेलीयाउपरी सुरंजेच्या मुलकात यावे. रा आपाजी जिवाजी शेवेसी गेले आहेत त्याचे वर्तमान मनास आणून काय आज्ञा ते करावी. यार-महमदखान याच्या मुलकास उपसर्ग न लागे ते गोष्टी केली पाहिजे. विशेष कार्ये लिहिणे, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao suggests to the Peshwa a line of action to be followed with regard to Yar Mohmedkhan.*

No. 31] [*16-7-1735*

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान ता
राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंतीपत्रें लिहिल्यावर कासिदाबराबर शेवकाने विनंतीपत्रें लिहिले होती त्याची उतरें कृपा करुन पाठविलीं तीं आजच मुकाम मजकुरी श्रावण शुध ८ पावली. तीर्थरुप मातुश्री बाई व राजश्री बाबूजी नाईकांस पत्रें पावती करून उतरें पाठविली आहेत. राजश्री राणाजी व रा. ब्याहारीदास यांचे नावें थैल्या दोन आहेत, त्यास ब्याहारीदास येथून पंचवीस कोस त्यांचे तीर्थरुपाची छत्री आहे तेथे लिंगाची स्थापना करावयास गेले. आम्हांस येथें सवाईजीपासी ठेविले कीं आठ दिवसानी फिरोन येऊ तोंवर राहणे. त्यास शेवकास आपले कार्ये होये तंवर हरकैसी रजावंदी राखणे जरुर, यास्तव येथे राहिलो. आठां दिवसां-नंतर आलियावर थैली देऊन समक्षहि जे बोलावयाचे ते बोलोन उतर घेऊन रवाना करीन विशेश. सवाईजींहीं आम्हास मागती बोलाऊन पुसिलें की तुमची सिधता करून पुण्यास रवानगी करितो. जर खानखा बोलीप्रमाणे कार्ये करून याल यैसा भरवसा देणे म्हणजे मुख्यापासीं हस्तनापुरी आम्हांस दोही सुभ्यांची बाहालीची करून घ्यावी लागते. नाहीतर आमचे दोन्ही सुभे मालवा व आगरें इस्ताह्र करावा लागतो. त्यास हे वर्तमान मागती आम्ही राजश्री बाबूजी नाईकास सांगितले. नाईकाही साफ उतर दिल्हे तेव्हा आम्हीहि माहाराजा सवाईस साफ उत्तर दिल्हे कीं येथून निस्चयात्मक भरवसा देवत नाही. खावंद आहेत; लक्षप्रकारें मानतील आणि येक प्रकारें ध्यानांत न आलें तर शेवक लोकांही भरवसा काये म्हणोन द्यावा, यैसें उतर प्रत्योतर करून आलों. माहादभट नासिककर पहिलें या मजकुरावर सवाईजीपासीं याची निमेच मागत

होते की फौजेचे सरदार माझे आधीन आहेत, तुम्ही परभारे राजश्री पंतप्रधान स्वामीकडे अत्र(?)लावाल तर तुमचा मुलक खराब होईल. यैसे हेहि भये आहे की स्वामीची स्वारी तर तीन च्यार वर्शें येत नाही. येथे सर्वत्र भये सरदाराचेंच आहे. आधींच फौजेचे सरदार आम्हांसी नाखूश आहेत. दुसरें हा विचार, आम्ही काये म्हणोन निस्चये करावा, बदल साफ उतर दिल्हे. शेवकाचे जुज अकलेने; विचार उतम मानिला होता की आधी वीस लक्ष मोजून घेऊन हुंडी पाठवावी की तेथे स्वामीस फौजेचे साहित्यास समयास कार्यास येईल. दुसरे नर्मदेअलीकडे स्वामी आले तर पांच हजार रुपये रोजमरा नित्यानी म्हणजे दिढ लक्ष रुपये दरमाहा येता. या वेगले गुजराथचे परगणे ईडर व डोंगरपुर बगैरे रामपुरापावेतो कमावीशबदल गुदस्ताप्रमाणें अमल करावा. हे जालियावर हुजूरचे मतालब जाले तर पातशाह मदद खर्च निराले देता. मोठी आड यांची, माळव्याचे कमाविसदार उठवावे, त्यास आंता बसले तसे बसलेच होते. स्वामीची स्वारी आलियावर च्यार महिने मोहसब्याचे मिसेकरून स्वारी बाार राहते. मागती माघारे जातेवेलेस जागा जागा अमल करिते. हितमित दोन्ही राहून हुजूर सवाईचा बोल उपर होता व तीर्थरुप मातुश्री बाई श्रीस जात आहे, सर्वांस भयेहि राहतें. तूर्त हुजूरीहून खानदौराचे अर्ज जाल्यावर तीनशे स्वार बादुशाही मातुश्री समागमें जावयास आज्ञा जाली आहे. सर्व आहे. परंतु येक स्वामीचे आज्ञेविरहित येथे निस्चयात्मक भरवासा दिल्हा नाही. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Letter to Bajirao from the Peshwa's agent with Sawai Jaisingh, reporting negotiations about the Maratha occupation of the Subha of Malwa. The letter seems to have been written about the time that the Peshwa's mother was going to visit Jaypur on her pilgrimage.*

No. 32] [पौ *16-9-1735 ?*

छ २८ जालेवल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व

तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. आजी प्रात:काली राजश्री फतेसिंगबावाच्या घरास गेलो होतो. त्याणी वर्तमान पुसिले की, राजश्री पंतप्रधान उतर प्रांते जावयाचा विचार करितात; तमाम फौज जमा केली; दीपवालीचे प्रतिपदेस स्वार होतात म्हणून

आईकतो; याचा विचार काये? त्यास आम्ही सांगितले की, फौज जमा करितात परंतु खासा जावयाचा सिधांत काही नाही. वरकड उतरेकडील वर्तमान म्हणावे तरी पातशाहा खासा निघतात म्हणून वार्ता आहे. परंतु काही कागदीपत्री वर्तमान नाही. मातुश्रीबाई जयेनगरीहून गेली इतके सागितले. त्यावर ते बोलिले की आम्हासी कितेक अर्थ जातेसमई बोलिले आहेत की, तुम्ही आपली फौज जमा करणे. आम्ही फौज जमा करितो. निजामासी कितेक राजकारणे करणे ते करितच आहो. त्याणी सुप्रवृत्तीने सलूख चालविला तर उतम. नाहीतर जसा दाव बनेल तसे करून, म्हणून बोलिले, व कितेक पुढील कर्तव्यार्थाच्या व उभयेता येकत्र होऊन मातबर मनसब्याचा विचार बोलिले. परंतु गेल्यादारभ्य येकहि पत्र पाठविले नाही, तरी तुम्ही येविसीचे तपासिले लेहून उतर आणवणे म्हणून सांगितले; व आपल्यास बावानीहि पत्र लिहिले आहे त्यावरून कलो येईल. राजश्री प्रतिनिधीनी दोनच्यारदा बाबुराऊ[1] यासी बोलाऊन नेऊन कितेक मनसबियाचे कर्तव्यार्थ सांगितले व येथेहि आले होते बोलिले की राजश्री प्रधानपंत आपल्या फौजाचे मनसबे करितात. यामुले त्याचे नाव लौकिक आहे व फौजहि पदरी आहे तुम्ही व आम्ही उगेच घरी बसलों. यामुले फौज पदरची तुटली, सर्वविसी पंगूपणहि पदरास आले. तरी याउपर तुम्ही दुसरा विचार न करिता खामखा बाहेर निघणे. तुम्ही व आम्ही येकत्र होऊन फौज जमा करून, पुढे नवाबाचे अनुमत जाहाले तरी दक्षण प्रांते जाऊं, न जाहाले तरी वराड देवगड गढे वगैरे मुलूक उदंड आहे; हरकोणी जाऊन फौजेची व आपली उस्तवारी करूं येश्या गोष्टी बोलिले. त्यावर आपण उतर दिल्हे की, आपण बोलिले इतकेहि मनसबे युक्तच आहेत, परंतु आम्हास विना राजश्रीनी आज्ञा केल्या वितरिक्त जाता येत नाही. त्याणी आज्ञा दिल्ही तर हरकोठेतऱ्ही मुलूकागिरीस जावें. फौज मोडली हे आम्हासहि अगत्य आहे. परंतु आज्ञेखेरीज जातां येत नाही. यैसे उतर दिल्हें. त्यास प्रतिनिधी बोलिले की राजश्री आज्ञा देतील यात संवशये नाही. तुम्ही व आम्ही मिलोन विनंती करून आज्ञा घेऊ. परंतु बाहेर निघोन येकत्र जावें, यैसा आपल्या गल्यावर हात ठेवणे. त्यावरून आपण त्याच्या गल्यावर हात ठेविला की, आपल्यास खामखा येदा स्वारीस जाणे यात दुसरा आर्थ नाहीं. त्याणीहि आमच्या गल्यावर हात ठेविला की आपण तुम्हाखेरीज नाही, यैसे कितेक बोलिले. प्रस्तुत तेहि फौज ठेवितात. आम्हीहि लोकाच्या बोल्या मात्र केल्या आहेत. रामाजीपंत आलियावर सिधात करणे तो करूं. राजश्रीस निरोपाविसी हटकिविले

---

१ बाबूराव शामराव अत्रे.

होते त्याणी उत्तर दिल्हे की राजश्री नारबावा आलियावर सागणे ते सागो यैसे सागितले. परंतु आपल्या चितात काही प्रतिनिधी सहवर्तमान जावे यैसे येत नाही. फौज जमा करितो. राजश्री प्रधानपंताचा व आपला योग जाहाला तर उतम; न जाहाला तर मग जो विचार करणे तो करू यैसे राजश्री फतेसिगबावा बोलिले. स्वामीस विदीत व्हावे यास्तव लिहिले असे हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao : writes about the jealousy felt by the Pratinidhi and Fatesing Bhosle of the Peshwa's military exploits and ardently desiring to emulate the Peshwa's example in going abroad on expeditions of conquest. The tone of the discussion is of great historical interest.*

No. 33] [*22-9-1735 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. ताा छ १९ जमादिलौवल मुा निघोज येथें स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा कीं पुढें येकटे न जाणे. अवघे येकत्र होऊन जाणें. यैसियास पूर्वी स्वामीचे आज्ञापत्र आलें व राजश्री मल्हारजी होळकर यांची तीन च्यार पत्रें आलीं त्यावरून तो मार्ग टाकून निघोजेस येऊन दोन मुकाम केले तऱ्ही मल्हारबाचें कूच होतां दिसत नाही. तेव्हा लोक कधीं निघणार ? आमचे या प्रांतीचे लोक त्यांमुळें गुंतले. वरकड कदमाच्या लोकांचा दंडक तो अवघे लस्कर खानदेशांत गेल्याउपरी त्याणी निघावें. आंम्ही तों स्वामीची आज्ञा व मल्हारबाची त्वरा पाहून निघालों. आजी सतरा दिवस बाहेर निघालों. सर्व कर्जावरी धंदा. कोठवरी कर्ज तऱ्ही मिळेल आणि काये परिणाम * * * स्वामीनी आजी आवघियांस ताकीद करून रवाना केले आसावें तेहि न जाहालें. सेवट आंम्ही खटपट करून फजीत व्हावेसे होईल कीं कांही कलत नाहीं. बरें; रूणानबंधास उपाये काये ? आतां तऱ्ही ज्यांस पाठवावयाचे असेल त्यांसी रवाना करावें. आमचे तो सर्व संकट स्वामीसच आहे. विशेष ल्याहावे तरी स्वामी धणी आहेत हे विज्ञाप्ति.

¶*Ranoji Sindia to Chimaji Appa, complaining about the dilatoriness of Malharrao Holkar. He is quite ready, he says, to move with his forces but owing to the lethargy of Malharrao he is involved in debts on account of the expenses of the army. He asks for speedy and explicit orders.*

No. 34] *[5-10-1735 ?*

छ २८ जमादिलोवल

श्री

पुरवणी[१] तीर्थरूप राजश्री राव व ता राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी: स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. रा सदासीव बलाल याचा कारभार होऊ न देणे, त्यालाहि ताकीद करून सांगणे म्हणून स्वामीनी आज्ञा केली. त्यास त्याचा कारभार राजश्री पंत प्रतिनिधीकडील तो मोडला. निमे लोक त्याचे नासले. आता राजश्री फतेसिंग बावाकडील कारभार आहे. त्याचा उपाये करावयाचा तो करीत आहे. त्यास स्वामीनी राजश्री दतोपंत दिा सयाजी गुजर यास पत्र पाठवावे की सदाशिव बलाल याचे आम्हास काही अगत्य नाही. राजश्री मल्हारजी होलकर व आवजी कवडे त्याचे साहित्य करणार नाहीत. राजश्री सयाजी गुजर याचे आम्हास अगत्य आहे. त्याचे साहित्य आमच्या फौजा करितील. यास पत्र येक दतोपंतास व राजश्री सयाजी गुजर यास येक पत्र याच मजकुराप्रमाणे पाठवून द्यावे. स्वामीचा आश्रा यास नाहीं यैसे त्यास कललियावर सदाशिवपंत कदाचित त्या प्रांते गेलातरी त्याचा परामृष तेच करितील यैसा विचार राजश्री दतोपंत यांचा आहे. याकरिता स्वामीनी दोन पत्रे पाठवून द्यावी आणि साहित्य पत्रे, राजश्री सयाजी गुजर आपल्या सरंजामात आमाल बसवितील, त्याचे साहित्य करणे म्हणून पत्रे राजश्री पिलाजी जाधवराऊ व राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे व आवजी कवडे यास आपल्या विचारास आली तरी द्यावी. तरी अगत्याचे कागद मुजरद जासुदासमागमे पाठविले पाहिजेत. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Purandare to Bajirao with reference to the activities of Sadashiv Ballal and Sayaji Gujar.*

---

१ पत्र माहादाजी आंबाजीचें.

No. 35] [5-10-1735?

छ २८ जमादिलावल.

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. प्रस्तुत येथे वर्तमान आले आहे की उतरेकडील काही कागदपत्र स्वामीस आले त्यावरून स्वामीनी खासा जावयाचा विचार करून दीपवाळीचे प्रतिपदेस सुमुहूर्ते स्वार होऊन मजल दरमजल जातात यैसे वर्तमान आले आहे. स्वामीनी तो काही लिहिले नाही. यैसीयासी येविसीचा विचार काये आहे तो तपसीलवार लिहिला पाहिजे. निजामनमुलूक याचा विचार व उतरेकडील स्वामी गेलियाने तेथील प्रसंग सर्व स्वामीचे हाती लागे यैसा विचार काही द्रिस्टीस पडला असेल, तरीच स्वामी जावयाचा विचार करितील. कदाचित (स्वामी) * * * (कम) रदीखान वगैरे फौजा पुढे येतील यासी आपल्या दाबामधी फावले तरी ठेचगा देऊन, फावले तर सड्या फौजा निवडून मुख्य स्थलास जाऊन जरबा पोहोचाऊ व सार्वभोम स्वार होऊन अलीकडे आले तरी त्याच्याहि गोठावर अवाई करू यैसे म्हणतील. यैसीयासी हा मनसबा जगडवाल स्वामीनी चितात आणिल्यास सिधीस जाईलच यात सवशये नाही. परंतु जे करणे ते पुर्ता तेथील विचार ध्यानात आणून करावे. येविसीचा विस्तार आम्ही काये लिहिणे? स्वामीच्या ध्यानात सर्वहि येतच आहे. जावयाचा सिधात जाहाला असेल तरी तपसीलवार वर्तमान लिहिले पाहिजे अगर जसा विचार असेल तसे लिहिले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare inquires of Bajirao about his proposed plans for going north.*

No. 36] [9-10-1735?

छ १२ जमाखर.

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. ता। छ ३ जमादिलाखर मु॥ मौजे ढांसलें पा॥ दाभाडी स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र सादर जाहालें तेथे आज्ञा की राजश्री कृष्णाजी कदम यांस आज्ञा केली आहे तेहि सत्वरच येतील. तुम्ही मोगलाची

बातमी राखोन खबरदारीने जाणे. आज्ञेप्रमाणेंच वर्तणुक करीत आहों. फौज जमा जाहली नाही. जरी जमा जाहाली असेल तरी तुम्ही जाणे, कदम येतील. फौज जमविली नसली तरी आठ दिवस राहाणें आणि जाणें म्हणोन आज्ञा होती. त्यावरून दाहा रोज त्याउपरी मुकामे जवली जवली केली. फौज जमा जाहाली. नवे लोकहि दीड हजार फौज कर्ज घेऊन ठेविली तेहि आली. मग खर्चास मिलेना यैसे जाहालें आणि रा। रंभाजी निंबालकर व थोरात मोगलाकडील मऱ्हाटे तमाम त्यास सामील जाहाले. मग सुस्ती करितां न ये यास्तव स्वार जाहालों. पा। नेवासे येथे येक मुकाम केला. पवारांकडील आमलाचा बंदोबस्त करून दिल्हा. पुढें गंगापार जाल्यानंतरी पैठण परगणियांत बाबती सरदेशमुखीकडील अमल दुरुस्त चाले यैसा करार करून काली येकतुणीवरते दों कोशावरी मौजे घारगाव येथें राहिलो. आजी मौजे ढांसलें येथे मुकाम आहे. पुढें जे वर्तमान होईल ते सेवसी लेहून पाठवितो. मालव्यांतील वर्तमान व राजश्री मल्हारजी होलकर यांच्या वर्तणूकेचा अर्थ व कुसाजी गणेश याणी वर्तमान सेवेसी निवेदन केले ते लिहिले. यैसियास मल्हारबाचा अर्थ जो आहे तो विदितच आहे. वरकड जे होता होईल तो आज्ञेप्रमाणे वर्ततच आहों. विशेष ल्याहावे तरी स्वामी सर्वज्ञ आहेत हे विज्ञापि. आमच्या पथकाची गणती अजमासे च्यार हजार होईल. तहकीक गणती जाहालियावरी सेवेसी लेहून पाठवितों. हे विज्ञापि.

विनंती सेवक रामजंद्र मल्हार कृतानेक विज्ञापना उपरी. स्वामीनी घोडीविसी आज्ञा केली ; त्यास घोडी मिलेल परंतु सध्यां पैका पाहिजे. त्यास आमचे हाती पैका तूर्त नाही. पुढें पैका हातास आल्यावरी आज्ञेप्रमाणें घोडी मिलाली तरी घेतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Ranoji Sindia to Chimaji Appa, informing him that according to instructions he is collecting forces and trying to proceed. The writer complains towards the end of the letter about the dilatoriness of Malharrao Holkar.*

No. 37] [*11-10-1735 ?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित आनंदराऊ पवार कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल ता। छ ९ माहे जमादिलाखर मु। खेड पा। वलिंग जाणून स्वकीय लेखन करावयास आज्ञा करित गेले पाहिजे. विशेष. जमावाकारणे स्थिर स्थिर आजीपर्यंत जात होतो.

सांप्रतकालें जमावहि कुल आला. याउपरी मजल दरमजल जाऊन राजश्री मल्हारजी होलकर व राजश्री राणोजी सिंदे आम्ही सामील होऊन. विदित जालें पाहिजे. रा सितापजी पवार व राजश्री गणेश दादाजी हे स्वारसहवर्तमान सेवेसी पाठविले आहेत. हरयेकविसीं यांचें चालवणार स्वामी समर्थ आहेत. विस्तारे लेहावे येसे नाही. वरकड साद्यंत अर्थ रा गणेशपंत जबानी निवेदन करितां श्रुत होईल. बहुत काये लिहिणे? कृपा वृधीथें पाववीत असिले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Anandrao Powar writes to the Peshwa that he has now mustered his forces and will soon join Sindia and Holkar by forced marches.*

No. 38] [*13-10-1735*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसीं

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणऊन स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तेथे आज्ञा केली कीं, कार्तिक सुध अष्टमी सोमवार मुहूर्त पाहिला आहे. तोच वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायेण जोसी यांस पुसिला. त्याणी तोच मुहूर्त उतम आहे म्हणऊन सांगितलें. तरी त्याच मुहूर्तें स्वार होऊन जाणे म्हणऊन आज्ञा केलीं. यैसियासी तो मुहूर्त उतम आहे; परंतु मातुश्रीचे श्राध ते दिवसी आहे. याकरितां जावें न जावें यैसें आहे; परंतु आपण लिहिलें तरी डेरा बाहेर करून. आपण लोकांस ताकीद करून लोक जमा होत ते करावे. आम्हीं पुढें जातों. मागून जमाव लौकर होत नाही. मागून पथके येतात ते रयेत उपसर्ग लाऊन बोभाट आणितात. याकरिता त्यांस ताकीदपत्रें पाठवावीं आणि ते लौकर जमा होत तें करावें. आम्ही मजल दरमजल जातों. लोक लौकर येत नाही. कोणी नर्मदेवरी आटोपून येतात. कोणी मालवियांत येतात. याकरितां आगोदर जमा होत ते करावें. आम्ही आष्टमीचे दिवसी डेरा इंद्राइणीचे काठी करवितों. आपणास कलावें याकारितां लिा असे. भागवताचे पुस्तकांविसी लिा त्यास तीन स्कंद नाहीत. वरकड अवघे पुस्तक पाठविलें आहे. तीन स्कंद नाहीत ते लेहून घालावे लागता; परंतु कोणी लेखक नाही याकारितां लिहविले नाही. विशेष काय लिहिणे? हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, mentioning the auspicious time for him to start for the north. He adds that he has sent the Bhagwat excepting the three chapters which are missing. This shews that Maratha Sardars like Pilaji Jadhao possessed Sanskrit works like the Bhagwat and could possibly read them by themselves.*

No. 39] [*21-10-1735*

छ १९ जमादिलाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामींचे सेवेसीं

विनंती. दिलीहून मयाराम वकील याचे कागद आले, त्यात मजकूर कीं अभयेसिंग व कमरदीखान याचा येक हात पातशाहानी करून दिल्हा व सुभे अकबराबाद व गुजराथ मालवा या सुभाचा तालुका कमरदीन याजवर सार्वभौमानी सोपला आहे. जयेसिंग फौज सुधा सामील जाहाले तरी त्याच्या तालुकियांत तफावत न करावा. जर सामील न होत तरी याणी जे करणें तें करावें व गनिमाच्या फौजास पैका देऊन सल्लख केला यामुळे खानदौरा व जयेसिंग याजवर पातशाह इतराज आहेत. खानदौरानी पातशाहास विदित केलें आहे कीं गनिमाचे सरदार आले होते त्यासी आपण करार केला कीं मालवा प्रांतें मवासी मुल्क रोहिल्याचा वगैरे आहे तो त्यास जाहागिर द्यावा व पातशाही मुलकास हारगीस तोसीस न द्यावी व राजश्री बाजीराऊ सर्वविसी हाजरतीचे पदरीं पडतात. दक्षणेहून गंगास्नानाच्या बाहान्यानें कबिलेहि आणितात. मातुश्री पुढें पाठविली आहेत यांत तफावत किमपि नाहीं. यैसी पातशाहाची निशा उमिरुल उमराव याणी केली. सादतखान यासी बोलाऊं पाठविलें आहे. त्याणी कितेक मुदे घातले आहेत कीं प्रयागचा सुभा महमदखान बंगस यासी द्यावा, म्हणजे तो छत्रसाल यासी तंबी करून मुल्क काबीज करील व आपल्या(स) पटणाचा सुभा द्यावा व कितेक खुलासा जाहागिरी द्याव्या तेव्हां आपण हुजूर यावें आणि साहेब काम पडेल तें करूं यैसा मतलब आहे. प्रस्तुत नद्यांचें पाणी उतरल्यावर मग खासाच सार्वभौमानी निघावें यैसा विचार आहे. अमिरुल उमराव व जयेसिंग जयेनगराकडून दक्षण प्रांतास येतील व कमरदीखान अभयेसिंग व सादत-खान याणीं ग्वालेरच्या मार्गें यावें यैसा विचार आहे. मातुश्री बाईस पातशाहाचीं दस्तक त्रिस्थली यात्रा करून सुखरुप नर्मदापार करून द्यावें यैसी दिल्ही आहेत. व गुरूज बारदार दोघेजण व हजार स्वार दिल्हे, आहेत. मथुरेहून पुढें गेली, यात्रा करून जातील. जागाजागा उमरावानी अहेर मेजवान्या जवाहिर व हत्ती घोडे देऊन गौरऊन आपल्याले हादेतून पोंहचाऊन देतात. जागाजागा उमराव

द्रव्यहि देतात. यैसी पत्रें दो महिन्याचीं येथें आलीं. स्वामीस वर्तमान कलावें याकरितां लिहिलें आसे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶The News-letter received at Satara from the Maratha agent Mayaram at Delhi is communicated to the Peshwa by Mahadoba Purandare. The letter mentions the plans of the Emperor to oppose the encroachments of the Marathas and also the grand reception which was given to the Peshwa's mother who was on her pilgrimage to the north. Chhatrasal is mentioned in the letter as living at the time.

No. 40] *[23-11-1735 ?*

पौ छ २ साबान.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

पौश महिपत आनंदराऊ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत मार्गेस्वर बहुल पंचमी जाणोन निजानंद लिहावया आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष. स्वामीनी आज्ञा देऊन रवाना केलें. राऊत समागमे दिल्हे होते. आम्हांपासी येऊन पोह(च)ल नाहींत. येक दिवस मार्गी वाट पाहिली. परस्परें शहरास गेले म्हणोन कलों आलें. यानंतर मजल दरमजल शहरास आलों तों नवाबाचें वर्तमान आलें कीं अजनठीयास आले. कूच करून शहरास येणार याकरितां दोन रोज शहरीं राहिलों तों नवाब फुलबारीस आले. आम्ही तेथें जाऊन मुलाजमत केली. वर्तमान सविस्तर सांगितलें, महाराज राजश्री स्वामीची व आपली थैली गुजरानिली. माहोलीचे किल्याकरितां व आपले तिकडे प्रयान जालें याकरितां नवाबानी फार विपरित मानिलें आहे. आम्ही आपले निरोपिले वर्तमान सांगितले त्यावरून कांहीं येक समाधान जालें परंतु चित्तांतील संशये जात नाहीं. आपले थैलीचा जाबहि लौकरच घेऊन सेवेसीं पाठवितों. नवाब छ १४ रजबीं शहरीं दाखल जाले. दारूगोलीचा सरंजामाची जलदी फार आहे. लौकरच कूच करून जायाची वार्ता आहेत. बुनग व मोहतझमखा बक्षी व राजश्री गोपाळसिंग भदोडे व राजश्री चंद्रसेन जाधवराव हे आनिक कुली फौज अजठीयापासीं अवने म्हणोन परगणा आहे तेथ ठेऊन आले. राजश्री सुलतानजी निंबालकर यास आज्ञा केली कीं तुम्ही बाफौज घाटदेऊळ-गांवापासीं चारापानी पाहून राहवें. ते येऊन राहिले. पुढें पाहावें काये मनसुबा करिता. जें वर्तमान होईल तें लिहीन ; परंतु बातनीजोडे सदैव पाठवित

असिलें पाहिजे. व हिंदुस्तानाकडील वर्तमान छ १७ जमादिलाखरचीं पत्रें इद्रंप्रहस्तीहून आलीं त्यांत लिहिलें होतें कीं सादतखानास सार्वभौमाहीं हजूर बोलाविलें आहे ते औध व लखणो येथून स्वार होऊन बुंधेलखंडाचे व अगरियाचे व इलाहबासचे दरमीयान अडाऊ जमीदार याचे लेक जसवंत-सिंग दाहाबारा हजार स्वारानसी सियादतखानाचा मुकाबिला युधास जाला होता त्यास खानमाइलेहीं मारून घेतला. मोठीसी फते जाली. हें वर्तमान सार्वभोमाही आयकून संतोश मानून त्याजवर कृपावंत आहेत. सुंबेदारी मालवीयाची यास व आगरीयाची महमदखा बगस यास देणार आहेत. विदित होये व अंगुराचा सिरका बहुत उत्तम जाणोन वजन ८८१ येक सेर आपणास पाठविला आहे. पावलीयाचें उत्तर पाठविलें पाहिजे. स्वामीवर हे फार चितांत श्रमी आहेत म्हणून लोक मात्र बोलतात परंतु नवाब कोणापासीं हा कालवर बोलले नाहीं. माघून जें होईल तें सेवेसीं लिहीन. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahipatrao, son of Anandrao Sumant, in this and the next letter reports to Bajirao that the addressee's latest move has aroused the Nizam's suspicion, and he is thereupon massing his forces. Sadatkhan is active in the Doab.*

No. 41]

पौ छ २४ रजब

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

पोश महिपत आनंदराऊ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागायत छ १९ रजब सोमवार जाणोन निजानंद लिहावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. जासुदाबराबर पत्र पाठविलें तें पाऊन संतोश जाला. आपली आज्ञा घेऊन स्वार जालों ते औरंगाबादेस पावलों. तों नवाबाचें वर्तमान आलें कीं, अजनठीयापासीं अवनें परगानियांत बहिरबुनगें व मोहतशमखां बक्षी व राजश्री गोपालसिंग भदोडे व राजश्री चंद्रसेन जाधवराव आणि कितेक फौज येऊन जरिंदे शहरास येतात. याकरितां दोन रोज शहरीं राहिलों. तों नवाब फुल-बारीस आले. आम्ही जाऊन भेटी घेतली. वर्तमान कुली सांगितलें. छ १४ रजबीं नवाब औरंगाबादेस दाखल जाले. दारूगोली वगैरे सरंजाम तयारी करितात. माहोलीचे किल्याकारितां व राजश्री पंतप्रधान याचे प्रयान जालें

याकरितां फार श्रमी आहेत. विपरीत चितांत मानिलें आहे. तजविजा करितात. आज रोजियास गेले. तेथून आलियावर दो ती रोजांत कूच करून जातील. जमालुदीखानाचेविशाई अतरबाही काही बहुताप्रकारें सांगितलें त्यावरून छ १८ रजबीं हफजुदीखां व अबदुलाखां पाठऊन मुलाजमतीस आनिले. कृपा फार केली. तेच समई वस्त्रें सिरपाव दिल्हा. पुढें येकादें स्थल देतील; यैसी तजवीज आहे. राजश्री पंतप्रधान घाट उतरून गेले. विदित होये. हिंदुस्थानचें वर्तमान आलें कीं, पातशाहानी सादतखानास हजूर बोलाविलें. ते औध व लखणौन येथून स्वार होऊन बुंधेलखडाचे व इलाहबाद आगरीयाचे दरम्यान अडाऊ जमिदार याचा लेक जसवंतसिंग दाहा बारा हजार स्वारानसीं सियादतखानाचे मुकाबलीयास युधास आला, त्यास खानमाइलेही मारून घेतले. मोठीसी फते जाली. हें वर्तमान सार्वभौमाहीं आयेकून कृपावंत होऊन. मालवीयाची सुबेदारी यास व अगरीयाची महमदखा बंगसास देणार आहेत म्हणोन वर्तमान आलें होतें. विदित होये. बहुत काय लिहिणें कृपा लोभ आसों दीजे हे विनंती.

No. 42] [*28-11-1735*

पौ छ २८ रजब.

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक भगवंत भैरव दिा राजश्री बाबूजी नाईक जोसी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा मार्गशीर्ष बहुल दशमीपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून येथास्थित असों. विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा कीं, लाखोटा पाठविला आहे. बमुजरद अजुरदार कासद करून मातुश्रीकडे पाठऊन पत्राचीं उत्तरें आणविणें. आज्ञाप्राा आजच कासद अजुरदार करून पत्र रवाना केलें. विदित होये. उत्तर आलियावर सेवेसीं पाठऊन देऊं. नवाब निजामनमुल्क सैद जमालखानासाठीं शहरास आले. हवेलीदाखल जाले. हाजुदीखान सैद जमालखानाचे घरास पाठऊन बहुमानें नेऊन परस्परें भेटीचा संभव जाला. च्यार वस्त्रें व येक तरवार खलेत दिली. खातरतसले बहुतसी केली केली. जागिराहि द्यावयाच्या तजविजेंत आहेत. आणि फौजेचे हरोल करावे हा मनसबा आहे. मुकरर जालियाउपर सेवेसीं लेहून पाठऊन.

उदईक नवाबाचें कूच बुऱ्हाणपूरच्या रोखें आहे. जिनसी तोफखाना वगैरे कासारीच्या घाटे उतरावयाचा हुकूम जाला आहे. पुढें कोणीकडे जाणार पाहावें. श्रीमंत राजश्री पतप्रधान नजरदार सुलतानपुरच्या रोखें तापी उतरोन गेले. उत्तरेकडील वर्तमान तर सादतखान आगरीयास येतां मार्गी आडारूचा राजा चालोन दाहा हजार फौजेनसीं येऊन जूज घेतलें. सादतखानापासी चाळीस हजार फौज व तोफखाना मुबलग होता. जूज मोठे जालें. पाच हजार माणूस ठार जाले. सोला सरदार मातबर सादतखानाकडील ठार जाले. राजा तों जिवेंच मारला. परंतु सादतखानाही बहुत हतवीर्य जाला. सवाईवर यावें या उमेदीनें आले होते ते उमेदींत तफावत पडला. याउपर टाकोटाक यावें, हे तो प्रस्तुत राहिले. हस्तनापूरकर आमीर खानदौरा वगैरे याचाहि फितवा पूर्ण आहे. त्यास गुदस्ता नतिजा प्राप्त जाला. साल मजकुरीं हे आले आहेत. याचा उत्कर्ष होऊन यावे या उद्योगांत लागले आहेत. हें लिहिली सराफाच्या येथें लिहिलें आले आहे. आणखी नवल विशेष ल्याहावे यैसें नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶Bhagvant Bhairav to Chimaji Appa, describing the interview between the Nizam and Said Jamalkhan. The writer also gives news from the north regarding the battlies that took place between Sadatkhan and the ruler of Adaru. Sadatkhan lost heavily and was much crippled in the expedition which he was leading against Sawai Jaysingh.

No. 43] *[10-12-1735*

पाा छ १३ साबान राऊ प्रधान

पुाा सीत

श्री

सेवेसी आज्ञाधारक शंकराजी दतात्रये कृतानेक साां नमस्कार विनंती. आज्ञापत्र पावले. सनाथ जालो. श्रीमत राजश्री याचे वर्तमान नवाबाचेथे बातमी आले की, नरबदापार मालव्यात जयेपालपूरच्या ताल्यावर पोहचले. कांहीं दिवस मोकाम आहेत. नवाब बामनी परगण्यात आले. दुर्ग चिचवन इठोलीस जातील. तेथून दोनी विजा(चा?)र;नांदेड प्रातास आथवा येतगीर सगर या प्रातास जावे; कर्णाटकाचा पैका घ्यावा. नवीन वर्तमान लिहिले जाईल. गालापूर वाळूज आणीक कितेक परगण्याचे पाटील फौज पाठऊन धरून नेऊन मनमाने ते पैसे घेतले. यावरून नवाबानी विशाद मानिले. परतु उपाये नाही. उतर प्रातास गेले, काये मनसुबा करितील हे चिंता फार यासी आहे. गुजरातीत

भंडारी फौज घेऊन बडोधावरी गायेकवाडाचे ठाण्यावरी चालून आला (जुज) आहे. गायेकवाड मोडले. घोडी घेतली. हे ऐकोन दमाजी गायेकवाडाने आणीक फौजा तिकडे पाठविल्या. नारो आपा राणोजी रघोजी भोसल्याचा दिवाण सालबारडीवर च्यार फौजेसी बसोन देश्यांत उपद्रव करीत असतां, लक्षमण खडोगले व आणीक डोगरे मिलोन झापा घातला, नारो आपा मोडला. फौज लुटिली. नारो आपा पाच सा राऊतासी निघोन गेला. वरकड कितेक वर्तमान रा महिपतराऊ तात्यानी लिहिले आहे. दोनी जोडी हरकारे आहेत. जाले वर्तमान लिहून नवाबानी सादातखानासी श्नेह केला. नवाबाचे जे आप्त दिलीस आहेत यासी नवाबानी लिहिले आहे. रा राऊ आले आहेत याचा मनसुबा सिरे चढूं न दीजे. यैसेच सादातखानास लिहिले आहे. हे आपल्या उपायास कागदी पत्री आलस करीत नाहीत. आवरगाबादेसहि दगा करायाचे बुधीवरच आले. परतु फौज आपली होती; याकरितां भरमामधे राहिले. आताहि भये आहे. तरीच त्याप्राते येत नाहीत. स्वामी आहेत. पिलाजी जाधवराऊ आहेत. निभाव नाहीं याकरितां फिरोन चालिले. जाले वर्तमान लिहिले. हे विनती.

रा छ ६ शाबान

¶News-letter from the Nizam's camp at Aurangabad addressed to the Peshwa, whose expedition into the north is said to have created a stir at the Nizam's Court.

No. 44] *[15-12-1735?*

छ ११ रजब

मुा सातारा.

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसांवी
यांसी

सकलगुणालकरण अखंडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ १० रजब मुा भालवणी पाा पारनेर जाणून स्वकीयें कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्हीं अष्टमीस लोणीहून स्वार जाहलो ते मजल दरमजल आलो. राजश्री राणोजी भोसले आम्हास सामील जाहाले. रा गोविंद हरीहि येकादा दिवसा सामील होतील. रा तुबाजीपंत विसाजीपंत आजी उद्या आम्हाजवली येतील. याउपरी कूच दर-

कूच गंगा उतरून जाऊन. मौजे खोकर भोकरवाडी गाव वगैरे पाच सात गाव वसूल देत नाहीत म्हणून राणोजी भोसले याणी सांगितले. पारपत्याचा विचार करून त्यास सुरलीत करितों. त्यास बरीसी जबरदस्ती पोहचाऊन सुरलींत आणितो. येक दुसरा मुकाम जाहाला तरी करून त्याचे पारपत्य करितो. पुढे जे वर्तमान होईल ते शेवेसी लेहून पाठऊन. विशेष काये लिहिणे ? कृपा असो दीजे हे विनंती. आम्हीं जे मेहनत करावयाची त्यास अंतर होणार नाहीं. डेरा अद्याप आला नाहीं. डेरा, कारकून आलियावर डेरियात जाऊन राहून. विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa, communicates his movements.*

No. 45] [*16-2-1735 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक रंगो शंकर व लक्ष्मुमण नारायेण व अंबाजी गोपाल साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १२ सवालपावतो स्वामीच्या कृपावलोकने सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतरी येथील रुपयाचा मजकूर तरी, आम्हास येऊन बारा रोज जाले. त्यासी याचा वाइदा, छ १३ सवाली पनास हजार रुपये देऊन बरानपुरास रवाना करावे; त्यापैकी छ माा पंचवीस हज़ार रुपयाची निशा केली. पुढे राहिले ते पंधरा दिवसा देऊन रवाना करून म्हणतात. ज्या दिवसी पैका देतील त्या दिवसी बऱ्हणपुरंची रवानगी करून सेवेसी लिहून पाठवितो. नवाब यारमहमदखान हेहि रूपयाची तरतुदेत बहुत आहेत. मुलकातील रुपया यावा तरी, प्रस्तुत रयेत परांगदा जाली आहे. आता रुपया होणे तो दाडफुरई करून जमा करीतात. परंतु हरइलाज करून देतील येसे दिसते. तूर्त पंचवीस हजार रुपये दिल्हे. तेहि छेटुराम साहुकाराची बारा हजाराची निशा करून दिल्ही. ते घेतले. न घ्यावे तर आणखी निकाल पडला पाहिजे. याच रुपयासी अडवावे तरी, पुढेहि पैका उंदड येण, याजकरिता निशा आठा चौ दिवसाचे अंतरेने घेऊन पुढे तगादा लाविलाच आहे. जेथवरी ज्या रीतीने रुपया निघेल त्या रीतीने घेतच आहे. पुढे वर्तमान होईल ते सेवेसी लिहितो. रुपयाची निशा यैसी घेत नाहीं. कालकला जोखम होईल. माहा-राजाचे पुण्य समर्थ आहे. जाले वर्तमान सेवेसी लिहिले पाहिजे; याजकरिता तपासिले लिहिले. यानंतरी ये मुलकीची गूरे तमाम गीर्दनवाईच्या मुलकात आहेत,

ते याणी ठिकाणी लाविली आहेत. आम्हास म्हणतात की, तुम्हास आज्ञा आहे त्याप्रा सोडून देणें. याचे तो नुकसान बहुत आहे. यामधे साहेबाच्या आज्ञे-प्रा आज्ञाधारक वर्ततील. यानंतरी नवाब निजामनमुलुक याजकडील वर्तमान तरी, तापीपुरासच आहेत. अद्यापि कूच करून आले नाहीत. परतु वार्ता आहे की, रेवातिरापावतो येणार. परंतु कोणे घाटे येतील या बातमीस हरकारे पाा. आलियावरी सेवेसी लिहितो. राजश्री आवजी कवडे बागलाण प्रांते आहेत. त्याजवरी ऐवजखानाचे पुत्र पाठविले होते. परंतु कोठे आहेत हे तहकीक आले नाही. यानंतरी हतीचे वर्तमान तरी, माहाराजाचे कृपेकरून बरा जाला. दास्त बहुत केली. आणखी पंधरा दिवसा चालेसा होईल. आज्ञेप्रा सिरोजेस पावता करू. व सदाराम करवल याची हगवण बरी जाली. परंतु अशक्त शरीर जाले. याजमुले पाये सुजले आहेत. शक्त आलियावरी सेवेसी येतील. त्याचाहि इलाज करीत आहे. यानंतरी पाा भेलसा याचा सायेरचा मजकूर तरी, साबक दस्तुर चालत आहे त्याप्रा यानी पत्रे दिल्ही. पुढेहि जे लागतील ते देवितच आहेत. पेहाडोदरे येथील आज्ञा होती की, तह करून देणे. त्यासी गंगाजी माहादेव याजकडील कारकून वसूल रुजू करावयासी बोलविला आहे. आलियावरी तह विल्हेस लावितो. सेवेसी श्रुत होय. पुढे याची गुरे परगणियात आहेत, त्यासी आज्ञापत्र पाठवाया आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bajirao is informed by his agents in Malwa that half the amount to be realized from Malwa had been realized from Yarmahamad. There is some difficulty about collecting the balance.*

No. 46] *[14-12-1733*

श्री.,

राजश्री चिमाजीपत अपा गोसांवी यांसी

श्रीसकलगुणालकरण अखडितलक्ष्मीअलकृत राजमान्य स्नेहाकित पिलाजी जाधवराऊ दडवत विनंती. येथील क्षेम ताा छ १७ रजब मुाा खोकर भोकर पाा नेवासे जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पत्र पाठविले पावले. सागरच्या हुद्याची कबजे अगोधरच येऊन पोहचली होती. खोकरकराच्या पारपत्यानिमि(त्य) तीन मुकाम करून सिवार चारून सुड्या खरीफाच्या चारल्या. काही जालिल्या. माघून लस्कर येईतोपावेतो येक दुसरा मुकाम करून पारपत्य करितो आणि फौज जमा जाहालियानंतर कासारीचे घाट उतरून जाऊन. गंगथडीमध्ये जीव नाही. खानदेशात विचारासारखे

अमलदार जमिदार आणून, अमलाची बदाबस्ती करून, थोडाबहुत खासदाणा जेथवर साधेल तो घेऊन, रोजमुरियांसी खर्च करून, जे वर्तमान होईल ते लिहून पाठऊन. रा। येद्याजी संतकर व हैबतराऊ सोमवसी याची बोली करून लेहून पाठविलें त्याप्रमाणे त्याची रवानगी करून आम्हाकडे सत्वर येत ते केले पाहिजे. त्याची गणती घेऊन तहाप्रा। त्यास पाऊन. संतकरास नालबंदी दिल्ही आहे तो येवज * * * * * * * * * ते केली पाहिजे. त्यासारखी वर्तणुक करून. धण्याचे पुण्यप्रतापेकडून फौज हिंडवून, खावंदाचा नक्ष राखून, पोट भरून येऊन. पैका मिळणे तो खावदाचे प्रा्तने मिळेल. परंतु येशास आतर होणार नाही. सार्वभामाच्या फौजा आलीकडे आल्याच तरी, विचारासारखे ज्या रोखे जाणे तिकडे जाऊन पोट भरून नक्ष राखून. आमचेविसी काही चिता केली न पाहिजे. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa, communicates his plans for an expedition into the north.*

No. 47] [*Aug. 1735*

श्रीशंकर.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान ता। राजश्री आपा स्वामीचे सेवेसी,

विनंती. सवाईजीही येकांती सिरीचंद दिवाण व ब्याहारीदासजी व आपणास बोलाऊन वर्तमान पुसिले कीं, आम्ही रायांचा लौकिक उत्कर्श रक्षिला, सबब कीं, तुरकाचा भरवसा नाहीं. जर दक्षणी फौजावर शेर होते तर आम्हांसहि न मानिते. यामुले सर्वश्चे रायाचा बोल उपर केला. हे रायास वर्तमान कललेंच असेल. सांप्रत हस्तनापुरी यैसी मसलहत जाली कीं, सादतखान व सरबुलंदखान वगैरे याणी हजूर आमची नालीश बहूत केली की, राजाधिराज परिछिन दक्षिणयांची हिमायेत करून बाविसी खराब केली. सादतखानाने अर्जी केली की, मजला आगरे व मालवे सुबेदारी मात्र देणें. पैका टका हजूर मागत नाही. बाविसी जाते. ते करोडों रुपये खर्च मागतात. मी खजानापूर आहे. दुसरे दक्षणचे अधिकारी[1] निकारपूर्वकासी सादतखानासी स्नेह आहे. दक्षणी नर्मदेअलीकडे उतरू देत नाही. यैस्या कितेक मतालिबाची अर्जी

---

१ निजाम.

हुजूर आली. तेव्हां खानदौरा व राजाधिराज हे येकचित आहेत. याणी अर्ज केला की, दक्षिणियासी युध करितां पुरी पडणार नाही. आम्ही सलूक करून रायांस अंगर त्याचे बंधू दोघातून येक जण हुजूर येऊन मुलाजमत करतील. त्याचे मतालिब जालियावर मुलकास उपद्रव काही होणार नाही. जर सादतखान व निकारपूर्वक एकचित जाले तर दुसरा पातशाह उभारतील. तेव्हां पातशाहजीचे चिती गोष्ट आली, परंतु विचारांत आहेत. बुधीहि क्षणभंगुर आहे. या निमित्य सवाईजींहीं आम्हांस मसलत पुसिली कीं, उभयेता सरदारांतून येक सरदार पांच हजार फौजेनसी मजपासी यावें. माळवे प्रांतीं व सिरोंज प्रांतीं दातिया वोडसा वगैरे जे रुपये उत्पन होतात ते आम्ही येथे नकद निशा आज करितों. जितके फौजाचे सरदार राजश्री पिलाजी जाधवराऊ व माळवे प्रांतीचे त्रिवर्ग यैसे सर्वत्र मिळोन स्वामीसमागमें पाच हजार समुदायानसी लुट न करितां मजपासी यावें. यास रोजमरा निराला दर राऊतास रुपया येके प्रा सुभा माळवाचा पैका व रा पिलाजी जाधवराऊ यांचे तालुकियाचा पैका दोन्ही पथके बिनमक्ता रुपये २०००००० वीस लक्ष रुपये नख्त आधी येथे घ्यावे मग फौजाहि स्वामीसमागमे यावे. त्यास फौजास पांच हजार रुपये रोजमरा निराला द्यावा. हे निदानची गोष्ट रदबदल बहुत होऊन ठैराविली. त्यास स्वामी आलियावर भेटीनंतर जर मसलहत जाली आणि हस्तनापूरची खानदौराचे मारफती कौलकरार शपतक्रियापुरस्कर जाले तर हुजूर भेटीस जावे. नाहींतर माघारे जावे. यैसी मसलहत जर मातुश्री बाईस व नाईकांचे ध्यानास येईल तर आम्हास विचारून सांगणे कीं हुजुरची बंदोबस्ती करून. त्यास आम्ही मातुश्रीबाई व नाईकाचे शेवेसी विचारिले. त्याणि उत्तर दिल्हे की आम्ही यात्रेस आलों आहों. राजकारणाचा विचार त्यांचा त्याजवर आहे. यैसे उतर मातुश्रीबाई व नाईकाचे सवाईजीपासीं सांगितले. तेव्हां त्याणी आम्हास पुसिले कीं तुमचे ध्यानांत येते की राऊ मान्य करतील. शेवकानेहि उतर दिल्हे की भारी गोष्ट आहे. याविगळे आमचे परगणे डोगरपूर बासवाडे, देवले, रामपुरा वगैरे पैका मुबलग जातो. तेव्हां सवाईजींहीं मान्य केले कीं, गुजरात प्रांत आम्हाकडे नाहीं. तुम्ही ते परगणे मामूलप्राा वसूल घेणे. त्याउपरीहि आम्ही त्यांस उतर दिल्हे की आम्ही शेवक लोक; आमचा धीर पुरत नाही. रायास हुजूर लिहून उतर आणितो. त्यास सवाईजीही उतर दिल्हे की उतर तेथून निश्चयात्मक भरवसीयानें येईल येसें असिलें तर तैसाच विचार करूं. त्यास मागती उत्तर दिल्हे कीं भरंवसा पांचशें कोसांचा देवत नाहीं, कीं फौजा पुढें आल्या तर लटकें पडावें बदल उतर होत नाहीं म्हणोन दिल्हें. परंतु जालें वर्तमान शेवेसीं

लिहावें. कदाचित् स्वामीचे चित्तास आलेंच तर कासीद अजुरदार पाठविला याजबराबर उतर सत्वर आलिया येक मास येथें राजश्री ब्याहारीदासजीस येथे लागेल इतकीयात उतर आलें पाहिजे. व फौजेचे सरदार आपले स्वाधीन ठेविले पाहिजेत. यैसें न होय कीं, सरदार हातचे गेले, तर त्यांचीं नांवें या प्रांतीं उतमप्रकारें जालीं आहेत. स्वामी सर्व विवेकी सुज्ञ आहेत. शेवकानें जालें वर्तमान शेवेसीं श्रुत व्हावें, बदल विनंतीपत्र लिहिलें असे. हे विज्ञप्ति.

¶*The writer, the Peshwa's agent with Sawai Jaysingh, writes to him details of the negotiations which the writer is conducting with that Raja in order to prevent the Marathas from entering Malwa.*

No. 48] *[Before 1736*

श्री

विनंती. सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. स्वामीच्या आज्ञापत्रावरून आपण मलठणास गेलो. राजेश्री आनंदराऊ पवार व मल्हारजी होलकर याची भेटी जाल्या. त्यासी मल्हारजी होलकरास घेऊन येत होतो तो, राजेश्री आनंदराऊ पवार याच्या चित्तात कित्तेक विपर्यास आले कीं, आम्हास टाकून राजश्री मल्हारजी होलकरास नेतां, तस्मात अपला आव्हेर केला, यैसे आपले ठाई बहुत श्रमी जाले. त्याजकडीलहि ब्राम्हण स्वामीकडून आम्हा अगोधरच गेले होते. यानीं वर्तमान सांगितले आसेलच. त्यावरून पवारास बहुत श्रम जाला आहे. याजकरितां राजश्री मल्हारजी होलकरास टाकून आलो. त्याचेहि मानस देखिले कीं, उभयेतानीं भेटीस यावे. यैसे जाणून त्यांचे समाधान करून आपण वाघोलीस आलो. या उपरी स्वामीनीं एक भला माणूस व उभयेतास समाधानाची पत्रे पाठवून सेवेसी नेले पाहिजे. पत्रे व भला माणूस पाठवणे ते आविलंबे पाठविले पाहिजेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञाप्ति.

¶*Ranoji Sindia writes to the Peshwa that the addressee should call to his presence Malharji Holkar and Anandrao Powar, the latter of whom is much offended at being left behind.*

1271

No. 49] [7-1-1736?

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांस

पोष्य बाजी भिवराऊ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। माघ शुध पंचमी सौम्यवार जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. बहुत दिवस तुम्हांकडून पत्र येऊन कुशल वृत कलत नाही तरी सदैव आपणाकडील कुशलार्थ लेखन करून समाधान पाविलें पाहिजे. यानंतर आम्हाकडील वर्तमान तरी श्रीमत राजश्री राऊ प्रधान यांची आज्ञा घेऊन स्वार जाहालो तें मजल दरमजल दतिया वोडशे या प्रांते येऊन पोंहचलों. दोही स्थलांतून बोलीचाली करावया भले माणूस लस्करांत आले, त्याजवर बोली करून खंडणीचा भाग वारिला. द्रव्य यावयाच्या मुदती करून दिल्या आहेत त्याप्रमाणें येईल. पुढे उरल्या स्थलांचाहि खंडणीचा निर्गम होऊन येणें तो येईल. वरकड सविस्तर राजश्री राऊ प्रधान यांच्या पत्रावरून कलों येईल. वडिलाचा मनसबा सर्व तुम्हावर आहे. तुम्ही जो करणे तो दूरदेशी पाहून केला पाहिजे. कोणाचा विश्वास धरावा येसे नाही. यामधे तुम्ही सर्व माहीत आहा. आम्ही त्याहवेसे काये आहे? बहुत सबूरीने कार्यभाग करणे. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ असो दीजे, हे विनंती. तीलगूल पाठविला आहे, घेतला पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao Retrekar to Ramchandra Baba, giving news of the Peshwa's expedition into Bundelkhand.*

No. 50] [18-1-1736

श्री

तीर्थरूप राजश्री दादा स्वामी
वडिलांचे सेवेसी

अपत्यें ज [ग] नाथराऊ कृष्ण कृतानेक सिरसां नमस्कार विनंती. अत्रत्य कुशल ता। छ १९ रजमान मु॥ सवाई जयेपूर जाणून स्वकुशलोदंत लेखनाज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष. बहुत दिवस जाहाले वडिलांचे हस्ताक्षर पत्र या दिवसांत न आले. यास्तव रात्रौदिवा चित सचित असेत. यैसीयास सदैव आसीर्वादपत्रीं परामर्ष करीत असिलें पाहिजे. येथील वृत तरी राजश्री प्रधानपंत

यांची आमदानी या प्रांती जाहली आहे. हा कालवरी तरी कुलासीस फते करून डोंगरपूर बांसवाडा या प्रांती चालले आहेत. राणाजीचे भेटीसहि येणार. यास्तव राणाजीहि मेजमानीचा सरंजाम करितात व पटगारी देतीलच. प्रस्तुत त्यांकडून येथे माहादेवभट नासीककर आला होता, त्याबाा राजा मलजीसहवर्तमान माहाराजी दोन लाख रुपये नख्त यासिवाये जवाहिर व वस्त्रे व पाच घोडे व येक हती याप्रकारें येकून पांच लाखांचा यैवज प्रस्तुत पाठविला असे आणि बहुत त्वरेने प्रधानपंतासहि बोलाविलें आहे. माहादेवभटास पालखी व कडी देऊन बहुत सन्मान केले. पुढे प्रधानपंत आलियानंतर सीघ्रच हुजूर भेटीस नेणार. यैसा तह करून राजा मलजीस त्याकडे रवाना केले असे व हुजूर खानदौराजवल दादाजीपंत आहे. सारांष सकलहि जवाबसाल राणोजी सिंदे व रामचंद्र सेणवई याच्याच मारफातीने आहे. येथें तरी भटार्चाच मातबरी पडिली आहे व हजूरचें वृत तरी सादतखान सुब्याहून आला. सारांष याचा समयानसार सकलहि हत रहीत जाले व मुख्य पातशाहा अरजूमंद जाहला. या प्रसंगामुले राा सवाईजीचा खान पैसाचा (डौराचा?) बहुत मुजरा जाला. यैशास प्रधानपतहि सीघ्रच येतील. त्यानंतर हजूरहि जाणे होईल. पुढे जे काही अपूर्व वृतांत होईल तो सकलहि लिहिला जाईल. हुजूर गेल्यानंतर वीस लाख रुपये नख्त द्यावे आणि च्यालीसा लक्षांची जागीर मालवीयांत द्यावी, दोस्त महमदाचे मुलकात तनखा द्यावी हा तह जाला आहे. राजा मलजीसहि आम्ही सुचना आपली केली आहे. बहुत काये लिहिणे? कृपा असों दिल्ही पाहिजे हे विनती.

¶*The writer and the addressee cannot be definitely fixed. The letter however is very important as it explains Bajirao's entrance into Imperial politics at Delhi. Bajirao arranged terms with Sawai Jaysingh through Mahadeo Bhat Hingne, his agent at the Mogul Court. Ramchandra Baba is for the first time here mentioned as being instrumental in arranging the accommodation. It seems the Maratha penetration into the north was a deliberate stroke of policy fixed by the various eminent Maratha Sardars after mature consideration for years.*

No. 51] *[25-1-1736*

छ २६ दोनप्रहरीं मोकाम सरहद्द भदेलखंड

श्री

तीर्थरूप मातुश्री बाई

वडिलांचे सेवेसी

अपत्यें बाजीरायें साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा माघ बहुल नवमी मुकाम प्रांत मेवाडपर्यंत वडिलांचे आसीर्वादेंकरून येथास्थित

असे विशेष. बहुत दिवस वडिलांकडील आसीर्वादपत्र येऊन वर्तमान कलत नाहीं यास्तव चित्त सापेक्षित असे. तरी निरंतर आसीर्वादपत्रीं कुशलार्थ लेखन करून आपण कोठें आहेत, काये वर्तमान, माघारीं बुधेलखंडांत आलीत न आलीत, तें वृत्त साकल्य लिहिलें पाहिजे. यात्रा लौकर करून माघारी बुधेल-खंडांत येणे. आपले माघारें आगमन व्हावें हे प्रतीक्षा करीत आम्ही लाणवाडा डोंगरपुराकडोन मेवाडांत आलों. लौकरीच घांट चढोन वरते येऊन. मनसुबियाचे दिवस निघोन जातात तरी तुम्हीं सत्वर येणे. दिलीकडील राजकारण दढतर लागलें आहे. खानदौराकडील निज्याबतअलीखान खर्चासाहित येतात व सवाईकडील अयामल खर्चासहित येतात. लौकरीच उभयेतां येतील. तदोतर पुढें जो विचार करणें तो करून आपणांसहि लिहून पाठऊन. मुख्य गोष्ट पृथ्वीपतीआदिकरून स्नेह इच्छितात. आपणांस कलावें म्हणोन लिहिलें असे. लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Bajirao to his mother, informing her of his probable success in the campaign against the Emperor.*

No. 52] *[30-1-1736?*

श्री

विनंती उपरी. लोणवाडीयाच्या मुकामापासून पत्र आलें. त्याआलीकडें वडिलाकडून कांहीं वर्तमान कळत नाहीं. त्यास आम्ही पूर्वी वोंडसे व दतिये चुकले त्याचें वर्तमान लिहून जोडा पाठविला. दुसरा जोडा स्वामीचा आला. त्याबाा पत्रें पाठविलीं. गोलेरचे मुकामाहून येक जोडा पाठविला आहे. त्यास स्वामिचें जाणें कोठवर जालें, पुढें काय मनसबा केला आहे हें कांहीं लिहिलें नाहीं; यावरून बहुत चित्तास स्वस्थता नाहीं. त्यास काये मनसबा योजिला आहे, आम्हास काये आज्ञा, आम्ही कोणें प्रांतें राहावें, कोणें प्रांतें यावें, काये विचार करावा, हें आज्ञा केली पाहिजे. सेवकाचें वृत्त तर वोंडसेयाची व दतियाची खंडणी चुकविली. त्यास त्यांनीं वाईदा निमें पंधरा दिवसाचा व निमें पंधरा दिवसाचा केला. त्यापैकी येक वाईदा येऊन पावला. दुसरा वाई-दाहि येऊन येक दिवस आधिक जाला. आजि उद्यां येऊन पावतील. दोंहीमधें ज्याचा पावेल त्याचा मुल्लक रक्षेल. नाही त्याचा मुलुक खराब केलीया त्याचाहि वाईद्याप्रमाणें रुपये पावील. परंतु दोही संवस्तानाचा पैका राहत नाहीं. मुल्लक खराब करूं देत नाहीत. आजीवर आम्ही भोवतें फिरलों. मुल्लक रक्षिला. याउपरीहि लौकरीच यैवज पावेल. भदावरचाहि चुकारा जाला. त्याचाहि

वाईदा येकादो रोजांनीं होईल तेहि येऊन पावतील. त्याचे सरदेमध्यें आहों. या उपरी तिनी संवस्तानाचा पैका येऊन लौकरीच पावेल. आजी आमचा मुकाम नजीकसेवडा कनरगड प्रा। दतियेनजीक सिंध नदी येथें आहो. येथें भदावरचाहि मेढा आहे व हिरदेशाहजीचाहि मेढा आहे. याउपरी पुढें जावयास जागा नाहीं. गालेर नजीक आलों होतों, तेथें मुकाम करावा तर तिनी सवस्तानाचा पैका यावा व जाटवाडा खंडला त्याचाहि पैका आला नाही. याजकरितां याप्रांतें आलों. त्याहीमधें त्याच प्रांतें राहावें तर जुना दाणा नाहीं. नवा दाणा जाला नाहीं. अद्याप गहुं व हरभरा फुलास आला आहे. याप्रकारचें वृत्त आहे. स्वामींनीं जें पत्र पाठवणें तें याच प्रांतें पाठविलें पाहिजे. याच प्रांतें बहुत दिवस राहूं म्हटलीया कौलाचा मुलूक खराब होईल. बहुत दिवस राहतां येत नाहीं. स्वामी आज्ञा ज्याप्रांतें यावयाची होईल त्या प्रांतें पत्रदर्शनीं येऊं. पुढें येमुनेवर येत जावें तर मार्गीं पाणी नाहीं. कुव्याचें पाणी आहे. मुलूक बुंधल्याचा व भदावरचा; दोंहीच्या मध्यभागीं मुलूक परकी नाहीं. असता तर च्यार रोज कालक्रमणा करितों. दाहा दिवसाचा नेम करून पत्र पाठविलें आहे. जें क्षणीं पत्र पावेल तेंच क्षणीं उत्तर द्यावयास आज्ञा केली पाहीजे. अजुरा मातबर केला आहे. सेखाचें महूचें असपास बारा कोसीं आहों. गोविंद बलाळ बुंधेल्याकडे गेले होते, त्याचें उत्तर गेल्यादारभ्य आलें नाहीं. तीर्थरूप मातुश्रीबाईकडीलहि कोणीं आले नाहीं. स्वामीचें लस्कर सांगानेर जैसिंगनगर प्रांतें जाणें जालें, म्हणून जनवार्ता आहे. पत्राचा मार्ग लक्षीत आहों. जो विचार करणें तो बहुत सावधपणें करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति+.

¶*A similar letter is addressed by Baji Bhivrao to the Peshwa. As this letter is also in the same hand it may be taken to be from Baji Bhivrao. He asks Bajirao's orders about his future movements. He mentions Bajirao's mother and so the letter can be referred to the period 1735-36.*

No. 53] *[30-1-1736 ?*

छ १२ सवाल मुकाम रिसडा पा। बाजेडा

श्री

श्रीमत राजश्री राऊ

स्वामीचे सेवेसीं

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ २७ रमजान मुकाम कन्हरगड प्रांत दतिया जाणून स्वानंद-

---

+ पत्र बाजी भिवराऊचें.

लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीकडून कासीद जोडी लोण-वाड्याचे मुकामीहून पत्रें घेऊन आली त्याचें उत्तर देऊन जोडी रवाना केली. त्याउपरीहि ग्वालेरचे मुकामीहून जोडी रवाना केली आहे तीं पत्रें प्रविष्ट होऊन जाहालें वर्तमान लिहिलें होतें तें विदित जालेंच असेल. त्याअलाकडील आम्हांकडील वर्तमान स्वामीस विदित होऊन आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी याकरितां अलाहिदा पुरवणी लिहिली आहे, ते चितारूढ करून उत्तर सत्वर पाठवावया आज्ञा केली पाहिजे. वडिलानी मनसबा मातबर चित्तांत आणून स्वारी केली आहे त्यास सेवकास दूर आंतर आहे. स्वामीनी वरचेवर वर्तमान ल्याहावें, उत्तम आहे. त्यासारखी आज्ञेप्रमाणे वर्तणूक घडोन येईल. बहुत काये लिहिणें कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao requests the Peshwa Bajirao to write to him frequently about the great enterprise which he is launching.*

No. 54] [*Jan. 1736?*

श्री

विनंती उपरी: आज्ञेप्राा बोडसे दतिये दोनी संवस्तानास सेनेसह वर्तमान येऊन पोहोचलो. त्याचा मामला गुाास अधिकोत्तर वडिलाचे दयेकरून घुलाविला. पुडे भदावर व जाटवाडा प्रातास जात आहें. तेथीलहि साधेल ते करितच आहें. त्यास राजश्री हिरदेशाकडून गोविंद बलाल आले. त्याचे दरशन जाले. सविस्तर अर्थ निवेदन केला. त्यास त्याच्या फौजा सामील कराव्या हा इत्यर्थ करून गेले आहेत. भदावर चुकले म्हणजे पुढे मुलुकगिरीस स्तल नाही. येमुनापार जावें हा विचार आहे. त्यास पाणी बहुत आहे, पायेवाट नाहीं. नावा उतरून जावे यैसे आहे. उभयेता राज्याकडील कुवर व दिवाण आले म्हणजे त्याच्या विचारे जो मनसबा होईल तो करू. काल्पीसमीप उतरले पाहिजे. मुलूक त्याचा आहे. राक्षिला पाहिजे. आम्ही तो प्रेत्नास अंतर करणार नाही. होणे जाणे स्वामीचे पुण्य आहे. आडारूचाहे येऊन सामील होवा हेंहि आहे. स्वामीचे येणे कोठवर येत जाले, पुडे काय मनसबा योजिला आहे, हे आज्ञा केली पाहिजे. दिलीचे वर्तमान स्वामीकडे वरचेवर दिनप्रति-दिन येतच आहे. आम्हाकडेहि वार्ता येत आहे. त्यास मोगल तेवडे येकीकडे जाले आहे. ते व खानडौरा व जयेसिंग व मुख्य यैसे येकीकडे आहेत. त्यास सादतखान व कमरदिखान याची गुज मोडिल्याखेरीज मनसबा केला सेवटास जाऊ देतात यैसे दिसोन येत नाही. आाणि मोगल अविश्वासी बेईमान आहेत.

1276

स्वामीनी जो मनसबा करणे तो सबूरीने केला पाहिजे. चबेलीचे पार दिलीचे रस्तेने द्रव्य नाहीं. जो द्रव्यलाभ स्वामीस होणे . तो जयेसिंगकडून होणें तो होईल. मुख्य स्तलास वकील पाठऊन मनसबा करणे तो करावा. केवल . फौज भारी जाली म्हणून स्वामीनी दरशनास जावयाचा मनसबा करावा हें विहित नाहीं. बहुतसी तृस्णा करावी यैसे नाहीं. जे होईल ते करावें. जे साधेल तेच उतम म्हणावे ऐसे आहे. मुख्य स्तलचे मातबर लोक आहेत. ते जीवासीच गाठ घालितात यैसे आहे. वडिल सर्व जाण विवेकी आहेत. आम्ही लेकुरपणे लिहिले आहे म्हणून विशाद मानिला न पाहिजे. मनसबा बहुत मातबर आहे. जो करणे तो दुरंदेसी पाहून केला पाहिजे. आम्हास जे समई आज्ञा येईल ते समई सर्वासी सिध असों. वडिलाचे पुणेकरून जेथवर मुलूख फाइून स्वामीकार्य होय ते गोष्टीस सेवकापासून अंतर होणार नाहीं. या मुलकांत धारण फार आहे. नवे धान्य जाल्याविना परिपूर्ण होत नाहीं. जो विचार करणे तो सामादिक सेनेचे आहेत, त्यांचे विचारें केला पाहिजे. केवल फौज भारी म्हणून उतावली केली न पाहिजे. राणाजीसी द्रव्यासाठी अतिशये फारसा केला न पाहिजे. त्याचे समाधाने होईल तेच करावें. जयेसिंगाचे हातून कार्य होऊन येईल तेंच करावें. येकेच दिवसीं सर्व प्रथ्वी गोला करावी यैसे नाहीं. सुचला अर्थ सेवेसी लिहिला आहे. वरचेवर बुधिवाद ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति+.

¶*The writer warns the addressee (Bajirao ?) to be cautious in his movements against Delhi and not to attempt the conquest of the whole earth at once.*

No. 55] [*3-4-1736 ?*

छ २ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. महमदखान बंगस चमेली उतरोन आलीयाचे वर्तमान तहकीक असिलें तरी, तुम्ही त्याजवर जाऊन नतिजा पावणें, येक दुसरी ठिकाणी लाविल्याखेरीज जबरदस्ती दिसोन येत नाहीं, म्हणोन विस्तारे आज्ञा केली. यैशास बंगस चमेलीवरी येऊन, रेतीत बेहड्याचा आसरा करून राहिला होता. आम्हीं नुराबादेचे सराईवरी येऊन मुकाम केला. नुराबादेहून सोल्याची सराई साहा कोस आहे. तेथून चमेल दोन अडीच कोश आहे. पुढे येईल म्हणून

+ पत्र बाजी भिवरावाचें.

आम्ही दाहा बारा रोज तेथेच मुकाम करून राहिलों. परंतु फौजेची आवाई ऐकोन खली धरिली ती तोडिली नाही. आमचे सडे राऊत जाऊन मोगल पाहून.उभे राहिले. तऱ्ही बाहेर येकंदर पडिला नाही. त्यावरी आंम्ही सिकर-वाराचा गाव बागतिनी आहे. तेथे मोठे मवास सिकरवार राहात होते. कोण्हाचाहि हात त्यांस लागला नाहीं. मवासगिरी करून होते. तेथ आंम्ही फौजेनसी येतांच, यालगार करून गाव घेतला. माणसे मारिली. हे वृत पेशजी लेहून पाठविलें होतें त्यावरून विदित जालेंच असेल. आंम्ही इकडे आल्यावरी, बंगस चमेलीहून अलाकडे येऊन चमेलीच्या व कोरी नदीच्या चिमट्यामध्यें बेहड अडचण पाहून, सभवतें भिताड घालून, तोफखान जोडून बैसला आहे. त्यावरीहि फौज पाठविली होती. परतु येकंदर बाहेर पडला नाहीं. ठिकाणीं आसऱ्यास बैसला आहे.. तेथे येत्न चालत नाही. बंगस भ्याड आहे, तो कलतच आहे. त्याहीमध्ये स्वामीचे फौजेचा अनभव त्यास बराचसा आला आहे. या प्रकारचा त्याचा विचार. यैसे असतां स्वामीनी लिहिलें कीं, आपल्या फौजा अखेरीस सहजेच जातील ; परंतु त्यास पातदशाहास सिपारस लिहील. तरी, त्याणें सिपारस काये ल्याहावी आहे ? स्वामीचे यश कीर्तीचा ध्वज सामान्ये लागला नाही. जे कोण्ही आपली सिपारस ल्याहावी यैसें श्रीनें होऊ दिल्हें नाहीं. सारांश, स्वामीचा पुण्यप्रभाव तैसाच आहे. विदित जाहालें पाहिजे. हे विज्ञाप्ति.

¶*Baji Bhivrao writes to Bajirao about the movements of Muhammad Khan Bangash and the measures the writer took to oppose him.*

No. 56] [*5-4-1736*

श्री

श्रीमंत राजश्री राऊ प्रधान

स्वामीचे शेवेसी,

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। चैत्र शुद्ध चतुर्थी भृगुवासर मुकाम परगणे सोमावली जाणून स्वानंद-लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी कासीदासमागमें छ ९ सवालचें पत्र पाठविलें तें छ २८ मिनहूस पावलें. सारांश लिहिला की उमदा मनसुबा करीत असता क्षुलक उपद्रव करावेसें काये आहे ? याकरितां येमुनापार होऊन न जाणें. राजश्री सवाईजीची आमची भेट होते व खानदौराहि दिलीहून

येतील त्याची भेट होईल. सौरश्य कैसा होऊन मनसुबा करितात त्यासारिखें तुम्हांस जें लिहिणें तें लिहिलें जाईल म्हणोन विशदें आज्ञा केली त्यावरून कलोन समाधान जाहालें. यैशास स्वामीचे आज्ञेप्रमाणेच वर्तणूक करून या प्रांतें आलों हें वृत्त तपसिलें शेवसीं लेहोन पत्रें पाठविलीं आहेत तीं प्रविष्ट होऊन विदित जाहालेंच असेल. राजश्री सवाईजी आपल्या स्थलाहून स्वार होऊन स्वामीच्या दर्शनानिमित्य गेले. इतक्या दिवसांत भेटी जाल्याच असतील. भेटीनंतर काये मनसुबा केला, प्रस्तुत स्वामीचा मुकाम कोणे स्थलीं आहे, पुढें काये मनसुबा करणार, फौजा मारवाड प्रांतें रवाना केल्या होत्या त्या स्वामीसनिध आल्या कीं नाहीं, हें सविस्तर लेखन करावयास आज्ञा करावी. कदाचित फौज आपणासनिध आली नसेल तरी फौज आपणांनिराली असावी यैसें नाहीं. याकरितां आज्ञा करून फौज लौकर सनिध आणविली पाहिजे. आमचें वर्तमान तरी सेनेसहवर्तमान आलीपूर[१] प्रांतें आहों. जाधवहटीआदीकरून या प्रांतामध्यें कालहरण करीन म्हणतां येवढा चैत्राचा महिना होईल यैसें दिसत नाहीं. जाधवहटीपुढें जावें तरी मालवा लागला; तेथें उपद्रव लागता येत नाहीं. इतके फौजेस साठ होऊन चाललें पाहिजे. लस्करच्या पोटास काय करावें यैसा प्रसंग आहे. स्वामीचें आगमन लौकर या प्रांतें होत नाहीं. मनसुब्याचा विचार, जैसा मान मार्ग पडेल तैसे रीतीनें स्वामीस मनसुबा करावाच लागेल यैसा प्रसंग आहे. पुढें आम्ही काये विचार करावा ते आज्ञा करणार स्वामी वडील आहेत. स्वामीस आम्हांस अंतर फारसें नाहीं. तरी वरीचेवरी आम्हांस वर्तमान कले यैसें करावया स्वामी समर्थ आहेत. [२]स्वामीच्या आज्ञेप्रमाणें या प्रांते लस्करचें पोट चाले तेथपरयेंत सेनेसह-वर्तमान कालक्रमणा करीत आसों. वडिलानी मनसबा अविलंबें उरकून सेवकास दरशानाचा लाभ या प्रांतें दिल्हा पाहिजे. पंथ दूर, आवकाश थोडका, यामधें समर्थ सर्वजाण आहेत. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao Retrekar had been ordered not to enter the Doab as overtures of peace had been received from the Mogul commanders Sawai Jaysingh and Khan Dauran. Baji Bhivrao writes that the Peshwa's orders should be obeyed and solicits details of the proposed interview which Bajirao was to have with the Moguls.*

---

१ परगणे बदाऊन.

२ येथून पुढील अक्षर खाशाचें.

No. 57] [12-4-1736

पा॰ छ १२ जिल्हेज.

श्री.

तीर्थरुप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी आपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान स्वामीच्या आसीर्वादेकरून ता॰ छ ११ जिल्हेजपरियेत येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान आलाहिदा पत्री लिहिले आहे त्यावरुन विदित होईल. उतरेकडील राजश्री मलारजी होलकर व राजश्री राणोजी सिंदे याजकडील व राजश्री पिलाजी जाधवराऊ याजकडील साप्रत वर्तमान स्वामीकडे आले आसेल ते ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. शहरीहून सुमताकडील पत्रे आली असतील तेहि वर्तमान लिहिले पाहिजे. खानदौरा व जयेसिग याच्या व स्वामीकडील फौजाच्या भेटी जाहाल्याचे तहकीक वर्तमान आले आसिले तरी ते लिहिले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji Purandare solicits from the Peshwa detailed news form the north, especially pertaining to Holkar, Sindia, Jadhavrao, Sumant, Khan Dauran and Jaysing.*

No. 58] [May 1736 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी,

पोष्ये आबाजी नाईक जोसी सा॥ नमस्कार विनंती. स्वामीचे कृपेकरून, वैशाख वदी ९ पर्यंत सुखरूप आसो विशेष. स्वामीचा निरोप घेऊ(न) रा॥ नारायेणजी निघाले, ते आम्हाजवळ पावले. तीर्थरूप भाऊ बाबूजी नाईक याचे पत्रे लस्करास पावल्याची आली. श्रीमत येजमान स्वामी आहीरवाडियात आहेत. रा॥ बाबूरावं[१] इद्रप्रस्थास गेले. तेथून जाब आल्याउपर लौकरीच लस्कर फिरून देशास येईल यैसे पत्र आले होते. वर्तमान स्वामीस कलावे म्हणून लिहिले आसे. रा॥ मलोजी थोरात याचा रोखा आम्हाजवल होता तो स्वामीकडे पाठविला आसे. त्याचे रुपये उगऊन घेविले पाहिजेत. बहुत काय लिहिणे? लोभ आसो दीजे. हे विनंती.

¶*Abaji Naik to Chimaji Appa, informing him that his brother Babuji Naik has reached the armies in the north and Baburao Malhar has gone to Indraprastha.*

---

१ बाबूराव मल्हार बर्वे ?

No. 59]

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावियासीं

॥ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ ११ सफर भोमवार मुाा सुरुंज येथास्थित आसे विशेष. आपले पत्र छ १० सफरचे सादर जालें तें छ ११ मीनहूस त्रितीय प्रहरी पोहचले. आपले कूच होऊन धामोणी-पुऱ्याकडे आले. उतम आहे. यारमहमदखान पैका देत असतां त्याच्या मुलकास आजार लागो देत नाहीं, याउपरी ताकीद करून म्हणोन लिहिलें, तरी यारमहमदखान आपल्यासी (दुस)रा विचार धरितात यैसे नाहीं. पूर्वीहि त्यांच्या मुलकास फारच आजार लागला व नबाबाचेंहि लस्कर त्याच्याच मुलकातून आलें. विषेषात्कारेंच आजार लागला आहे. सांप्रत आपण ताकीद करवितो म्हणोन लिाा तरी उतमच आहे. ताकीद बरीच करविली पाहिजे. यारमहमदखानाकडील येका हाफ्तियाचा पैकाहि आणावयास गेले आहेत. पैका येईल आणि मुलकास उपसर्ग लागो न द्यावा. पैका रयते * * * न घ्यावा लागतो. गांवोगांव बाणदार * * * * बोस खेडी देखील आसतील. त्याचीहि ताकीद करावी. नवाबाचे काल कूच होऊन नारायणपूरचे घाटाजवळी होते. आजीं कचनारचे सराईस गेले. दाहाबाराक हजार फौज समागमे नेली. वीस बावीस हजार फौज व बुणगे व मराठे सरदार कुल माघारे रवाना केले. नसुरतदौला नवाबाचे चुलते फौजा घेऊन माघोर जात आहेत. छ १४ रोजी सुरोजहून कूच करितील. आमचेहि मुकाम चौदावे तेरिखेपावतें जालें. चिरंजीव आपास बोरशापावेतो जावयास नवाबानें सांगितले आहे. त्याची व फौजाची रवानगी करून आम्हीहि कूच करून आपणाकडे येऊन तों * * * * * * भवराशापलिकडे नदी आहे तेथें मुकाम करावें. खेमलासे भोरासें येथीलहि पैका घ्यावा आणि वेत्रवतीआलीकडे येऊ नये. त्या मुलकात दाणादुणाहि मिळेल. राऊत मुलकात जाऊन गुरुंढोरें आणितील तरी बहुतसी ताकीद केली पाहिजे. राा आपाजी जिवजी व राा त्रिंबक राजदेव आम्हाजवली आले आहेत, त्यास सुरुजेचाहि कामाकाजाची बदोबस्ती करून आम्ही येऊन. भेटी-नंतर नवाबाचे व आमचे भाषण जालें ते श्रुत होईल. त्यांच्या चित्तांत कांहीं कृत्रिम प्रकार नाही. आपले ठाई * * * ष सा स्नेह आहे. रयतेच्या विसीहि * * * * ऊन (पैका घ्यावा म्हणो)न फारसें विचार कडून

1281

सांगितलें आहे. सविस्तर अर्थ भेटी जालियावरी निवेदन होईल. मोहनलालहि सेवेसी आले आहेत. पैका आणावयास रगो शंकर व अंबाजी गोपाल गेले आहेत. कलले पाहिजे. विशेष काय लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, that he has issued strict orders to his army not to ravage the province of Yar Mohammad. The writer further says that the armies of the Nizam and Chimaji Appa are on their way back.*

No. 60] [*13-6-1736*

श्री.

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

॥ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आजी छ १४ सफरी नवाबाच्या लस्करचे कूच करऊन गेलो. नवाब आजी बुढ्या डोंगरास गेले. लस्करासमागमें चिरंजीव आपास रवाना करून आम्ही आपणाकडे येतो म्हणो [न] पूर्वी आपणास लिहिले होते; त्यास मागती नवाबाचा कागद आला की तुम्हीच दोनच्यार मजली जाऊन लस्कर पोहचावणें. त्यावरून आम्हास जाणे लागलें. अनुरूलाखान नवाबाकडे गेले आहेत तेहि मागाहून लस्कर आटोपून येतील. त्यास आपले लस्करचे कहीवाले राऊत रानात जात असतात त्यांचा येखाद उपसर्ग होईल याकरितां लस्करात कुल गोटोगोट ताकीद करवावी की कोण्ही मोगलाच्या राऊताचे वाटेस न जात व आपणहि अनुरूलाखानास येक पत्र पाठवावें की तुम्ही सुखरूप लस्करास जाणे. याउपरी मार्गहि उजनीकडे जावयाचा मोकला जाला. जेष्ट बारा रोज राहिला. त्या प्रांते मुकाम याउपरी करावे ऐसे नाहीं. भौरासे खेम लासे येथील वसुलास कमाविसदार ठेऊन आपण कूच करून आपल्या विचारानरूप उजनीचा मार्ग धरावा आणि मनसुबा करून येक पंथ आटोपावा. प्रजन्यकालचे दिवस याकरितां सूचना मात्र लिहिली आहे व राजश्री बाबूराव सेवेस रवाना केले आहेत. येथील सविस्तर अर्थ निवेदन करितील. येथे थोरसा धुंणा[१] पडला होता; परंतु आम्ही येथे येऊन मनसुबा जाला आणि नवाब तिकडे गेले आणि वरकड सरदार मराठे व बुनगे माघारे रवाना जाले. कललें पाहिजे. विशेष काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao: communicates his dealings with the Nizam who was on his way to the north.*

---

१ घोळ, अडचण.

No. 61] [*28-6-1735?*

छ २४ सफर.

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

॥ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधव दंडवत विनंती. येथील क्षेम ता। छ १७ माहे सफर मुकाम नजीक फुलमरी[1] जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्हीं या प्रांते येऊन पोहचलो. त्याजकडील अमलदार ठाणियात बसोन अमल चाली लागले आहेत. याउपरी गोसावियाचे पुण्य आमचे पदरी आहे. कस्त करा-वयास अंतर होणार नाही. पाटवदियात मावजी पवार याने अमल बसविला. राजश्री आपाजीपंतास निरोप देतेस तरी ते आम्ही सामील होऊन पाटवदियातून त्यास काढितो. वरकड तिकडील मुळीं तोडावयाचा विचार दोनच्यार वेल लिहिला आहे त्याप्रमाणे आपण करावें. इकडील मामला आम्ही त्याचा सुरलीत चालो देतो थैसे नाही. आमचे भाऊ येणार होते त्यासहि सत्वर यावयाची तजवीज करावी. आमची चिंता काही न करणे. चाकरी होईल ते वर्तमान मासापक्षा विदित होईल. विशेष काये लिहिणे ? बाकीच्या यैवजाची तजवी-जहि सत्वरीच करून रवाना करितों. माहालकरी घाटाखालते आहेत ते भेटले म्हणजे विलंब लागणार नाही. जोसी याचे दुकानची हुंडीची तजवीज करून. विदित जाले पाहिजे. लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

¶|*Pilaji Jadhao to the Peshwa on his way to the north.*

No. 62] [*1736?*

श्री

राजश्री आपा स्वामी
गोसांवी यांसा

॥ श्रीमंत सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री येशवंतराऊ पवार कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल ता। छ २३ जमा-

---

१ जि. औरंगाबाद.

दिलीवल मुकाम मौजे गाते पा। आगर प्रांत मालवा स्वामीचे आसीर्वादेकरून संतोश असो विशेष. बहुत दिवस स्वामीकडून पत्र येऊन सांभाल होत नाहीं, तेणेकरून चित सापेक्षित असे. तरी येसे न करावे. सदैव पत्रद्वारें सांभाल केला पाहिजे. यानंतरी हस्तनापुरीहून वेदमूर्ती राजश्री माहादेवभट ज्या कार्यास गेले होते, तें कार्य करून परवाने घेऊन आले. याचें सविस्तर - वृत्त राजश्री मल्हारबा व राजश्री राणबा याणी लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल. विशप काये लिहिणे ? लोभ आसो द्यावा हे विनंती.

श्री साबचरणी
दृढ भाव.

¶*Yashvantrao Pawar to Chimaji Appa, informing him that Mahadev Bhat Hingne has secured permits from the Emperor, to whom he had been specially deputed.*

No. 63]

श्री

राजश्री वासुदेव नारायेण गोसावी यासी,

श्री पिलाजी जाधवराऊ रामराम. उपरी, नवाबाचा कूच होऊन तुबाख्याआलं कडील पिराचा दांइरा[१] आहे तेथे पहिले मुकामाजवली मुकाम होईल. तुम कूच करून उतरेकडे पाणी पाहून उभे राहाणे. राजश्री राऊ प्रधान यां चिठी पाठविली आहे. त्यांची आज्ञा येईल त्यास उसीर लागेल. तुम्ही दोन आडीच कोस मोगलाचे लस्कराचा मुकाम टाकून आमचे लस्करचे सुमारे राहाणे विलंब न लावणे. जाणिजे. छ २० रमजान फर्प.[२]

¶*Pilaji Jadhao orders Vasudeo Narayan to encamp at a certain place not far from the writer's but separated from that of the enemy by four or five miles.*

---

१ दायरा = A Muhammadan burial ground.

२ हीं दोन अक्षरें पिलाजी जाधवरावाच्या हातचीं असावींत.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१५

बाजीरावाची दिल्लीवरील स्वारी

[किंमत—१ रुपया ३ आणे किंवा २ शिलिंग]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

DOCUMENTS RELATING TO BAJIRAO'S ADVANCE UPON DELHI, 1737-38


The year 1728-29 has been described as marking the first period of Bajirao's brilliant career. His next achievement, perhaps even more striking than the first, was his expedition to the North which, commencing in the Dussera season of 1736, culminated in the complete defeat of the Nizam in January 1738. Unlike the year 1729, when his younger brother Chimaji was in charge of the main operations, in this his second great triumph it was the genius and courage of the Peshwa alone that directed the campaign from beginning to end. As soon as the first penetration of the North was effected, Bajirao and his brother started in right earnest the task of settling the newly conquered territory in Malwa and Bundelkhand. The Imperial Court, however, wasted much precious time in concerting various plans ranging from open hostility to the invaders to complete submission. Fully aware of this vacillating attitude of the Imperial Court, Bajirao went north towards the end of 1735 and tried to secure his ends in a diplomatic conference, in March 1736, with Sawai Jaysing, the powerful prince of Jaypur, and other magnates who possessed influence with the Emperor. The Peshwa succeeded in winning over Jaysing who consistently advocated a policy of conciliation with the Marathas. There was however another party headed by Sadatkhan, Kamrudinkhan and others, who, not apprehending the magnitude of the danger, were opposed to any concessions to the intruders and advocated armed resistance. Bajirao, fully realizing that the ultimate decision must rest on an appeal to arms, returned to the Deccan in the summer of 1736, made elaborate preparations for a grand move, and after the Dussera started a campaign of systematic plunder and devastation throughout the Imperial territory beyond the Nerbudda. Baji Bhivrao Retharekar was sent in advance to secure the co-operation of Hirdesa and Jagatraj, the two sons of Chhatrasal, and reduce to obedience the chiefs of Bhadavar, Jatwada, Datia, Orchha and other Bundela chieftains. A detachment under Malharrao Holkar, ...thoji Bule and others crossed the Jumna to plunder the Doab, but was repulsed with heavy losses by Sadatkhan, who magnified this action into a great victory and followed up the Marathas to Muttra. But here his triumphant march was stopped. He effected a union with Mahmadkhan ...gash and bore down upon the Maratha forces. Bajirao by a clever ... detached Baji Bhivrao into the Doab in order to divert his opponent's ...tion and himself with the main army made a sudden descent upon ...mperial Capital itself, creating indescribable panic and consternation. ...l description of this brilliant exploit appears in his letter to his Guru ...nendra Swami. The Emperor was now so completely demoralized ...he prayed for terms through the mediation of Khan Dauran and ...ng. To complete his life's work the Peshwa during the monsoon ...37 quartered his army in Bundelkhand.

In dire extremity the Emperor was persuaded to call in the Nizam to make a last attempt to bolster up the tottering edifice of the house of Babar. The Nizam, who was shrewdly watching the development of affairs in the North, was convinced that the time to strike had arrived, and at the head of a powerful army crossed the Nerbudda in April 1737, reached Delhi, and held long consultations with the Emperor as to the best way of dealing with the Maratha danger. All that the Nizam demanded was conceded by the helpless monarch. The letter of Venkaji Ram (No. 29) eloquently summarises the situation, and weighs the issue between peace and war.

The Nizam's departure to the North caused no little anxiety to King Shahu, who was much exercised by the danger of Bajirao's position and specially deputed Pilaji Jadhav to meet him and secure his goodwill. This Pilaji succeeded in doing and advised the Peshwa to adopt a conciliatory attitude. At this critical juncture Bajirao's innate genius shone at its brightest. He laid his plans with consummate skill. To prevent succour reaching the Nizam he stationed his brother Chimaji in Khandesh. Chimaji faithfully carried out his mission. During the early days of 1738 the Nizam was completely brought to bay at Bhopal in a battle the details of which are already well-known—and which is rightly set down as a master-piece of guerilla warfare. The defeat of the Nizam decided the fate of the Empire.

Bajirao had now all but achieved the supremacy over all India for the Marathas, but two accidents intervened before the consummation could materialise. In the early months of 1739 Nadirshah swooped down upon Delhi, while Bajirao remained wavering between two plans—co-operation with the Emperor to rid India of this new nightmare, or allowing Nadirshah to complete his own work of dismembering the Empire. He remained on the banks of the Nerbudda watching the course of events and trying to meet the rumoured possibility of Nadirshah's advance So[illegible]rds from Agra. Simultaneously with these events in the North [illegible] Maratha arms achieved, as we know, a signal triumph over the Portuguese [illegible]in. One may therefore conclude that the Peshwa after the summer of 1739 obtained a short respite. Shahu showered lavish congratulations upon his minister and his brother and was justly elated at the success of the Maratha arms.

No. 71



Facsimile of the handwriting of Bajirao Ballal *(1720-1740)*

No. 1] [10-4-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी, आज्ञाधारक शामराऊ मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ९ जिल्हेज जाणऊन स्वामीनी आपले क्षेम स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आपण राणोजी सिंदे याजबराबर गेलो होतो त्यास नर्मदा उतरून मालवियांत गेलो. बडवाईस वेढा घातला. तेथे आपला पाय जाया जाला ते घोडियावर बसाव-याची मुस्कील जाली. तेथून पुढे दोन मजली पालखीत घालून नेले. परंतु विशेष पायाचा दुखाचा विचार जाला. मग तेथून त्यानी माझेबराबर स्वार देऊन खर्गोनास पाठविले कीं तेथे तबीबाचे[1] हाते उपाये करून पाये काही बरा जालियावर घरास जाणे म्हणऊन खर्गोनास पाठविलें. तेथें तबीबउपाये बहुत केले. तीन महिने तेथे राहिलो. काही पाये बरा जाला. मग तेथून घरास नीरवीस[2] आलों. येथेहि औशध उपाये केले. पाये बरा तो जाला परंतु आधू * * त्यावर स्वामीचे दर्शनास यावयाचा (बेत के) ला तो चिरंजीवाचे व्रतबंधाचे करणे आगत्य. हे कार्य संपादून स्वामीचे दर्शनास येणार. व्रतबंधाची तीथ वैशाख सुध १० दसमीचे लग्नसिधि जाली. पूर्णमा जालियावर स्वामीचे दर्शनास पुणियास यावे तो आजी ऐकिले की स्वामीची स्वारी खानदेशात जाली. आजी मुकाम जवलियावर[3] जाला. याजसाठीं सेवेसी विनंती लिहिली आहे. आज्ञा स्वामीची येईल ते प्रमाण. बहुत काय लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*Shamrao Malhar to Bajirao : an account of his wound at the siege of Badwai, in company of Ranoji Sindia.*

No. 2] [15-11-1736 ?

छ ७ साबान.

श्री

राजश्री चिमणाजीपंत
आपा गोसांवी यासी

ℒ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २२ माहे रजब मुकाम

---

१ शस्त्रवैद्य. २ शिरूर तालुका. ३ मंचरजवळ.

नजीक तलेगांव पाा चालीसगाव जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. काली छ २१ रोजी घाट उतरोन आजी छ मजकुरी येथे आलों. लोक काही जमा जाले आहेत, काही जमा होणे आहेत. त्यास राजश्री पंत प्रधान यांच्या आगमनाचा विचार योजून आला म्हणोन लोक राहिले आहेत किंवा काय हे वर्तमान कलत नाहीं. आम्ही तों मजल दरमजल दाहा बारा रोजानी नर्मदापार होऊन जाऊन. येथे लोक आले आहेत यांची यादी आलाहिदा लेहून पाठविली आहे. राहिले लोकास ताकीद करून लौकरी आटपोन येत तें केलें पाहिजे. राजश्री पंतप्रधान यांचा यावयाचा विचार सीघ्र घडोन आले तर उतम आहे. नाहीतरी आम्हास जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. त्याप्रमाणे वर्तणूक करून. आमचेविसी चिंता केली न पाहिजे. जैसी कलेल तैसे प्रकारे फौज हिंडऊन आणितों. विशेष काये लिहि(णे), कृपा आसो दिल्ही पाहिजे, हे विनंती.

मोर्तब
सुद.[1]

¶*Pilaji Jadhao, proceeding north, makes inquiries about the Peshwa's whereabouts and the time when he would set out in the same direction.*

No. 3] [*About 1736-37*

श्री (फाटले)

राजश्री बाजीराऊ व चिमणाजीपंत गोसावी यांसी,

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चंद्रशेन जाधवराऊ दंडवत विनंती उपरी, येथील जाणऊन स्वकीय कुशललेखन केले पाहिजे विशेष. राउली पत्रे पाठविली ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ सविस्तरे अवगत होऊन सविस्तरे वर्तमान श्रुत होऊन परम संतोश जाला. यैसेच निरंतर पत्र पाठऊन परामृश करीत गेले पाहिजे विशेष. पत्री उतरेकडील वृत लेखन केले व सांप्रत राजश्री राऊ पुण्याहून श्रीमंत स्वामीच्या दरशनास गेले म्हणऊन लिाा त्यावरून परम संतोश जाला. आपण श्रीयात्रेस येतो म्हणऊन लिाा * ते त्याचे प्रतिउतर न पाठविले यावरून आपूर्व वाटले. त्यास आपण श्री यात्रा उदेशे भालकीहून कूच

१ येथें पिलाजीचा शिक्का.

केले ते प्रांते आलो. येथूनहि कूच करून श्रीच्या पर्वतास येण * * तेथून रा * * उळाकडे पत्रे पाठऊन * * * * सदईव आपले व राजकी वृत सविस्तरे लिहीत गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Chandrasen Jadhav expresses friendly feelings towards Bajirao and Chimaji. He appears to have overcome his ill-will towards the Peshwa.*

No. 4] [*2-1-1737*

छ १४ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे
सेवेसी

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २१ रमजान मुकाम नजीक कसबे आलोरी प्रांत भदावर जाणोन स्वानंदलेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी वार्तिकासमागमे पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर व आम्हांकडील जाहालें वर्तमान आद्यंत लेहून आल्या कासीदजोड्यासमागमें पत्रें पाठविलीं आहेत तीं प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाहालाच असेल. त्या अलाकडील वर्तमान तरी जाटवाडियाचे जमीदार येणार ते येऊन खंडणीचा भाग चुकविला. उरतां या प्रांतामध्यें भदावर उरले होतें तेथील मातबर पांच आले होते, व भदावरकरांनींहि बहुतच निष्टार्थ दर्शऊन लिहिलें होतें कीं आपण जाल्या कराराप्रमाणें आजीपर्यंत अंतर केलें नाहीं, पुढेंहि पडणार नाहीं. तरी नियेताप्रमाणें सालमजकुरीं द्रव्य द्यावया दुसरा विचार नाहीं. अधिकोत्तर म्हणिजेल तरी मुलूक उद्वस आहे. सर्व प्रकारें आपलें अगत्य धरून चालविलें पाहिजे. सालगुदस्तां ताम्राच्या फौजा आल्या त्यास आपणास आ * * त्यानसी जाऊन भेटों लागलें. परंतु आपणांपासून अंतर पडों नेदीना. द्रव्य रेवातीरास पाठवावया अंतर केलें नाहीं. आपण पदरींचे असों म्हणून लेहून पाठविलें व त्यांकडून आलें. त्यांही रदबदल बहुतच केली. त्याप्रमाणें निर्वाह करून घ्यावा तरी आपले कांही तऱ्ही अधिकोत्तर कार्य करून घ्यावें, केवल तटी लावीन म्हणता कार्यास नये, विशेष करून घ्यावयाचें विचारावरी घातले आणि न जालें तरी मुलुकांत सिरोन परभारी गावगना खंडणी करावी, त्यामुळें साध्य होईल यैसे म्हणावें तरी तो अर्थ नाहीं. मुलूक खराब

आहे. साध्य कांहीं होणार नाहीं. हा अर्थ चितांत आणून कळेल त्या विचारें आल्या पाचांचे समाधानें जेथवरी अधिक गुद्स्तास साधलें तितकें करून घेऊन निरोप दिला. द्रव्य यावयाचें तें लौकरीच येईल. तेथील द्रव्य यावयास दुसरा विचार नाहीं. याप्रमाणें या प्रांतीचा कार्यभाग उरकडिला. पुढें या प्रांतांत दुसरे जागा जाऊन मुलूकगिरी करीन म्हणता जागा आहे ऐसे नाहीं. याकरितां जालें वर्तमान स्वामीस विदित व्हावें. स्वामी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करावी, म्हणून लिहिलें असे. तरी काये ती आज्ञा करून उत्तर पाठविलें पाहिजे. तदनरूप वर्तणूक करून स्वामीच्या पुण्यप्रतापे याच प्रांतें आज्ञा ये तोंवर कालक्रमणा करीत आहे. बहुत काये लिहिणें कृपालोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao to Bajirao Peshwa, regarding the collection of tribute from the newly conquered provinces in Bundelkhand. The work, he says, is going on smoothly. The landlords from Bhadawar are seeking postponement as the province suffered greatly from the Mugul invasion.*

No. 5] [*13-1-1737*

पौा छ १२ सवाल.

श्रीशंकर.

राजश्रीं आपा स्वामी गोसावी यासीं

ॐ श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेाा तुकोजी पवार व जिवाजी पवार दंडवत विनंती उपरी, येथील कुशल पौशे बहुल नवमी गुरुवासर पावेतो मुाा कसबे भेलसे ये स्थली सहमंडलीनसी येथास्थित असो. श्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपणाकडील पत्र बहुत दिवस येत नाहीं तेणेकडून चितास उतकंठा वाहते, तर सदैव पत्री परामृश करीत असिले पाहिजे. यानंतर राजश्री प्रधानपंत देसीहून आले. त्यांची आमची भेटीहि कसबे मजकुरीच जाली. भेलसियावर वेढा घालोन बसलो आहू. येथोन निर्गम जालियावर पुढे जाणार. हे सविस्तर वृतांत राजश्री प्रधान पंत यांच्या पत्रावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

¶*The two brothers Tukoji (1728-53) and Jivaji (1728-75) Pawar, founders, respectively of the senior and junior branches of the House of Dewas, write this letter to Chimaji Appa informing him that they have besieged Bhilsa,*

No. 6] [१०

छ १० सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आज्ञाधारक धोंडो माहादेव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम स्वामीचे कृपेकरून ताा छ १ माहे सवाल पर्यंत यथास्थित असे. श्रीमंत राजश्री नानास्वामीकडील लाखोटे ४ च्यार श्रीमंत राजश्री आपास्वामीकडे रवाना करावयासी पाठविले ते जासूद छ ३० रमजानी पावतांच बुंदेलखंडाकडील लाखोटे त्याचक्षणी कासीदजोडी बोलाऊन तीस रुपये आजुरा पदरी घातला आणि रवाना केले व पूर्वीहि कासीद दोन वेळा पाठविले आहेत. त्यांकडील जैसे वृत येईल ते सेवेसी लिहून. प्रस्तुत आईकतों जे बुंदेलखंडात वोंडशावर आहेत. काही तहरह करून कार्य करून घेतील थैसे आइकतो व माळवा प्रांते मंदसराजवळ सवाई व स्वामीकडील सरदार होते. दरम्यान तह करावयाची बोली घातली. सा लक्ष रुपये सवाई द्यावयावर आले. होळकरानी काही अधिक घ्यावयाची बोली घातली इतकियांत हस्तनापूरकर मुख्य आगऱ्याकडे येणार हे आवाई कळोन एक दिवस रजपुतानी केशरी वागे (?) करून लढाईचा प्रसंग घातला. सवाईचा चंडोल कामास आला. से दोनसे घोडी होळकराकडील जाया जाली व दहावीस बरीबरी माणसें कामास आलीं. इतके होऊन होळकर सोळा कोस अलीकडे आले. मागून सवाईहि आठ कोश आले. सातआठ कोसाचे मुकाबिल्यानें राहिले आहेत. होळकरानी बहीरबुनगे एकीकडे लाऊन जेरिंदे फौजेनसी सवाईकडे चाल केली ऐसे वर्तमान नवाब हफीजुदीखानाकडे डांकचौकीने बातमी आली. त्या प्रसंगी सेवक तेथें होता. डाकचौकीने पत्रे नवाबाकडे तुळजापुरास लिहिली गेली. सेवकानेंहि आपल्या खावंदास कळावें म्हणून आईकिले वृत्त लिहिले असे व पृथवीपतीकडील समाचार कीं यमुना उतरोन तीरोंतीर सिकार खेळत हळुहळू आगऱ्याकडे चाल धरिली. सादतखान वगैरे अमीर पातशाही शेर मार्गानें फौज व येते व रजपुताची फौज गोपाळसिंग भदोडिये व दातियाचा राजा वगैरे रजपूत हमराई होती त्यास हुकूम जाला जे पुढें रुसकत होऊन आपलाले मुलकाचा बंदोबस्त करणे. त्यावरून कितेक रजपूत सवाईकडे आले, कितेक जागाजागा गेले. हेहि वृत्त कळो आलियाप्रमाणे लिहिलें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter to Bajirao giving an account of an encounter between Sawai Jaysing and Holkar near Orchha.*

---

१ सडे

No. 7] [25-1-1737

छ ४ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आज्ञाधारक केशो गोपाळ दिमत राजश्री आवजी कवडे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील सेवक लोकांचे वर्तमान ता।। छ २६ रमजानपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. गंगाजी व सिदोजी जासूद याजबरोबर आज्ञापत्र पाठविले ते उत्तम समई प्रविष्ट जाहले. श्रीमंत राजश्री पंतप्रधान फौजेसहवर्तमान मालव देशांत गेले, तांव्रासी युध्य प्रसंग जाहाला, तांव्र माघारा सरोन भुपाळ (* * फाटले आहे * *) आपल्या फौजा भोवत्या राहून (सिकिं) दा केला आहे म्हणोन लिहिलें तेणे करून सेवक लोकांस संतोष जाहला तो पत्रीं कोठवर ल्याहावा? याउपरी फौजेचे प्रयोजन आहे, तरी मामलियावरी दृष्टी न देतां फौजेनसी येऊन पोहोचणे म्हणोन आज्ञा केली. व या पत्रापूर्वी आज्ञापत्र आले त्या पत्राचें उत्तर सविस्तारें सेवेसी लिहिलें आहे त्याजवरून विदित जाहलें असेल. सांप्रत राजश्री बाबूराव नारायण सेवेसी पाठविले आहेत. मुखवचनें फौजेचें व सेवक लोकांचे वर्तमान निवेदन करितां विदित होईल. त्याचा विवेक समर्थांनी चितांत आणून जे आज्ञा करिजेल तदनुरूप वर्तणुक करून. स्वामींनी वारंवार लिहिलें कीं मामलतीवर दृष्टी न देणे. तरी आपली दृष्ट स्वामीच्या चरणाविरहित आणखे स्थळीं नाहीं. परंतु राजश्री आउबासाहेब यांचे रवानगीस कर्जवाम जाले. सालगुदस्तां तांव्राच्या शहाकरितां मुलकांत बाकी राहिली (नाहीं) सालमजकुरीहि साहुकाराचा पैसा घेऊन सरकारांत दिल्हा. मुल्रक प्रज्यंन्याकरितां हलाखीत आहे. हंगामसीर जोर पोहोचऊन वसूल घ्यावा. राजश्री आउबासाहेब तिकडे मोहिमेस श्रीमंतासमागमे. त्यांचाहि उपराळा इकडे सांप्रत नाहीं, एसें या लोकांस भासले आहे. साहुकार व कमावीसदार यांचे गळे उगवावे हेंहि संकट आहे. यांत समर्थांची आज्ञा आपणास प्रमाण. सेवेसी बाबूराऊ विनंती सविस्तर करतील ते चितांत आणून जे आज्ञा करिजेल ती प्रमाण. मामलियेत उगवे, साहुकार फिटे, फौजेची उस्तवारी होऊन स्वामीसेवा घडे, सेवक लोकांस कोणेविसीं नामोसी न ये, अऊ (बा पा) वेतो साहुकाराचा व कमावीसदाराचा (बो) भाट न जाये,

सेवकास शब्द न लागे, तो विचार ध्यानास आणून राजश्री बाबूरावासमवेत आज्ञा येईल तैसी वर्तणूक केली जाईल. यांत समर्थ सर्वज्ञ असत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

हे विनंती.

¶*Kesho Gopal on behalf of Avji Kavde to Chimaji Appa, pleads his inability to join Bajirao in Malva for want of funds.*

No. 8] [पो *31-1-1737*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. दतिया वोंडसे जाटवाडा इत्यादिक या प्रांतीचा कार्यभाग उरकणें तो उरकिला. उरतां भदावर येक राहिलें आहे. तेथील बोलीचा करार करून यावया त्यांकडील पांच आले होते ते मागती भदावरास गेले आहेत, ते लौकरीच येतील. दाहाबारा रोजांत तेथीलहि काम विल्हेस लागणें ते लागेल. पुढें लस्करानें जावें कोठे, करावे कायें ? फिरावयास जागा नाहीं. पूर्वेस जावे तरी येकीकडे भदावरचा मुलूक, दुसरेकडे बुंधेलेयांचा मुलूक, कोण्हासहि उपसर्ग लागों देतां येत नाहीं. ग्वालेरीकडे चमेल उतरोन जावें तरी लस्करास पोटास मिळणार नाहीं. दिलीचा रस्ता हमेशा मोगली फौजा फिरतात त्यामुळें मुलकांत काहीं ताकत नाहीं व पीकपाणी जाले नाहीं. मलूक भयान यैसा प्रसंग आहे. कोठेहि फिरावयास जागा नाहीं. पुढें काये विचार करावा याकरितां लिहिले असे. तरी स्वामीनी काये ते आज्ञा केली पाहिजे. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Baji Bhivrao asks Bajirao whether he should proceed to collect dues after settling affairs at Bhadavar.*

No. 9] [पो *31-1-1737 ?*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. भदावरचा प्रसंग तरी, त्यांकडे अगोधर कागदपत्र पाठवणें ते पाठविले होते कीं, तुम्हीं आपले मातबर पांच पाठऊन देणें. जों तुमच्या मेळ्यास फौज आली नाहीं तों खंडणीचा मामला चुकावणें. फौज समीप आली. देशात

सिरल्यावरी मुलकाचा नाश होईल म्हणून लिहिलें होतें. त्यावरून भदावरकरांनीं आपणाकडील मातबर पांच लस्करास पाठविले ते येऊन भेटले. त्यांणी आपला सारांश बोलीचा भावार्थ सांगितला कीं, साल दरसाल ज्याप्रमाणें आमचा करार द्यावयाचा आहे व राजश्री पिलाजी जाधवराऊ याणीं घेतलें आहे त्याप्रमाणें द्यावयास मान्य आहों. आधिकोत्तर करू नये, आणि आमच्यानें मान्य करवत नाहीं. त्यास त्याहीं रदबदल केल्याप्रमाणें गुदस्ताप्रमाणें पनास हजार घ्यावयाचा करार करावा, तरी मागील दोन्ही संस्थानावरी साधलें तितकें आधिक करून घेतलें यैसें असतां भदावरच न घ्यावें यैसें नाहीं. याकरितां आल्या मनुश्यांस परिछिन्न सांगितलें की, गुदस्ताप्रमाणें करार होत नाहीं. त्यावरून ते म्हणों लागलें कीं आम्हीं आपल्या खावंदाकडे जातों. त्यास हें वर्तमान सांगोन मागती काये तो करार करून लौकरीच येतो म्हणून निरोप घेऊन गेले आहेत, ते लौकरीच लस्करांत येतील. ते आल्यानंतर त्यांचे बोलीचा भावार्थ मनांस आणून जेथपर्यंत आधिकोत्तर साधोन येईल ते करून. अद्याप त्याच्या देशास आम्हांकडून काडीचा उपद्रव लागला नाहीं. या आठा दाहा रोजात तेथील काये तो निर्गम होऊन येतो. जें होणें तें स्वामीचे पुण्यप्रभावें होईल. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*News-letter probably addressed to the Peshwa by Baji Bhivrao, mentioning that the chief of Bhadavar expresses unwillingness to have the tribute levied from the State increased.*

No. 10] [*January 1737*

श्री

विनंती उपरी. राजश्री हिरदेशा व जगतराज यां उभयेतांकडे रा। गोविंद बलाल प्रयोजनानिमित्य गेले होतें ते, आम्ही या प्रांतें आल्यानंतर भेटीस आले. त्यांबराबर उभयेता राज्यांची पत्रें व कितेक श्नेहवादांची उत्तरें व मनसुब्याचा विचार सांगोन व लिहून पाठविला आहे. स्वामींचीहि पत्रें त्यांस कितेक मनसुब्याच्या प्रसंगाची गेली होतीं त्यावरून बहुत समाधान जाले. स्वामीचे येणे या प्रांतास जाले म्हणजे उभयेतानी सेनेसहवर्तमान दर्शनांस यावें यैसाच भावार्थ त्यांचा आहे, तो स्वामीचे आगमन जाल्यास होईलच. दुसरे भगवतसिंग अडारू यास सादतखान याणीं जीवें मारिला. त्याचा पुत्र रुपसिंग येऊन बुंधेल्यांचे पदरी पडिला आहे. त्याची व गोविंद बलाल यांची भेट जाहली होती. त्याणेहि कितेक विचार सांगोन पाठविले आहेत. त्याचा भावार्थ यैसा आहे कीं आपली

स्थापना पुनरुक्त आपल्या स्थलावरी करावी येैसें आहे. ये गोष्टींचा अभिमान बुंधेल्यास आहे. याकरितां आम्हीं उभयेतां राज्यांस पत्रें देऊन गोविंद बलाल याची रवानगी त्यांकडे करून त्याजकडील रा॥ हिमतराऊ व कृष्णसिंग च्यार पांच हजार फौजेनसीं आणविले आहेत व भगवंतसिंग याचाहि पुत्र भेटीस येणार आहे. त्यास बुंधेल्याकडील उभयेता व रुपसिंग अडारू येैसे आलेवर आम्हीं येकत्र जाहलों म्हणजे त्यांचे आमचे विचारें जो विचार कर्तव्य तो केला जाईल. हे वृत स्वामीस विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. जे होणें तें स्वामीचे पुण्य होईल. भदावरचा कार्यभाग उरकल्यांवरी येमुनेआलाकडे मुलुकगिरी करावयास लस्करास आणखी जागा नाहीं, हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of his efforts to negotiate a settlement with the Bundele Rajas. Govind Ballal was despatched to the Bundeles on that mission.*

No. 11] [*31-1-1737?*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. दतिया वोंडसे येथील प्रसंग उरकला. भदावरचें भले माणूस गेले आहेत ते आले म्हणजे तेथीलहि काम विल्हेस लागेल. सुकलोरा, गुजरोला, पछोर, उचाट, जाटवाडा येथील जमीदारांकडून खंडणीच्या प्रयोजनास माणसें येऊन बोलीचाली करून खंडणी करार करून देणे ते जीवनमाफिक करून दिल्ही. तो पैका बोलीप्रमाणें निर्वाह करून देतील व अंत्रीपार बनवार येथीलहि निर्गम होऊन आला. या प्रांतामध्यें हाली व्हावयाचें स्थल भदावरानिरालें राहिले नाहीं. तेहि लौकरीच होईल. स्वामीस विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs the Peshwa of his efforts to exact tribute from the different provinces.*

No. 12] [*January 1737?*

श्री

राजश्री राणोजी सिंदे गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ बाजी भीवराऊ आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. बहुत दिवस गोसांवियाकडील पत्र येऊन कुशल वृत कलत नाहीं. तरी येसे न

करिता सविस्तर वृत लेखन करून समाधान पाविले पाहिजे. यानंतर श्रीमंत राजश्री राऊ प्रधान यांची आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते मजल दरमजल दतिया व वोडसे या प्रांते आलो. दोहि स्थलातून भले माणूस भेटीस आले. खंडणीची बोलीचाली करणे तें करून निर्वाह केला. पैका यावयाच्या मुदती करून दिल्या आहेत त्याप्रमाणे येऊन पोहचेल. पुढे जाटवाडा व भदावर वगैरे राहिले आहेत तेथीलहि बोली होणे ते होईल. वरकड सविस्तर राजश्री रावप्रधान याचे पत्री लिहिलें आहे त्यावरून कलो येईल. जाणिजे छ ९ माहे रमजान. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao writes to Ranoji Sindia that tribute from Datia and Orchha will soon be collected, and thereafter he will move on towards Bhadavar and Jatwada.*

No. 13] [*January 1737*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री वेंकटराऊ
स्वामी गोसावी यासी

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणांकडून पत्र येऊन कुशलवृत कलत नाहीं. तरी सविस्तर लेखन करून समाधान पावीत गेलें पाहिजे. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री राऊ प्रधान यांची आज्ञा घेऊन सेनेसहवर्तमान स्वार जाहालों ते मजल दरमजल दतिया वोंडसें प्रांतें येऊन, दोही संस्थानाची खंडणी गुदस्तापेक्षां कांहीं अधिकोत्तर करून, जाटवाडा भदावर प्रांतें जात असों. वरकड सविस्तर राजश्री राऊ प्रधान यांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कलों येईल. आपणांकारणें संक्रमणाचे तीलशर्करा पाठविली आहे, घेतली पाहिजे. बहुत काये लिहिणें, कृपा लोभ आसों दिल्हा पाहिजे, हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Vyankatrao (Ghorpade) that he is marching upon Datia and Orchha under orders from the Peshwa to collect the annual tribute, after which he may very likely move towards Bhadavar and Jatwada.*

No. 14] [*January 1737?*

[आरंभीचा मजकूर गाहाळ.]

कार न करणे. तिकडील तालुकियाचा मात्र धंदा उरकून तिकडेच राहणे. लेहून पाठऊ त्याप्रमाणे वर्तणुक करणें, म्हणोन डोंगरपूरच्या मुकामीहून लेहून पाठविलें, ते सविस्तर कलों आले. यैशास स्वामीनी ज्याप्रमाणे आज्ञा केली त्याप्रमाणे दतिया व बोडसे व भदावर येथील बोलीचालीमुलें साल गुदस्तांस जे आधिकोतर साधले, ते करून विल्हेस लाविलें. हे वृत्त स्वामीस लेहून पाठविले आहे. तीं पत्रें प्रविष्ट जाहालीच असतील. त्यावरून विदित होईल. अलीकडे स्वामीचे पत्र येऊन काही वर्तमान कलत नाहीं. तरी स्वामीचें आगमन कोठ-पर्यंत जाहालें? पुढें काये मनसुबा योजिला आहे? आम्हाकडील धंदा स्वामीचे आज्ञेप्रमाणें विल्हेस लागला. याउपरी फौजेनसी कोठे राहावे? काये करावे? हे सविस्तर आज्ञा करून पत्र सादर करावया आज्ञा करावी. त्याप्रमाणे वर्तणूक करून. बहुत काये लिहिणे, कृपा वर्धमान आसो दिल्ही पाहिजे, हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs the Peshwa of his dealings with Datia and Bhadavar and solicits further orders.*

No. 15] [पो *31-1-1737*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. बुंधले यांस ताकीद करून पैक्याचा निर्वाह होऊन ये तें करणें म्हणून आज्ञा; तरी उभयेतां राज्यांस नर्मदातीरांस येतांच पत्रें पाठविली होतीं कीं, सालगुदस्ताची बाकी राहिली आहे ते व सालमजकूरचा यैवज निर्वाह करून देणें; आम्हीं फौजेनसीं या प्रांतें आलों असों म्हणून लेहून पाठविलेच होतें. त्यावरी रा गोविंद बळालहि याच प्रयोजनानिमित्य उभयेतां राज्याकडे गेले होते ते त्याकडील द्रव्याची बोलीचाली करून आम्हांकडे आले. त्यांणी वर्तमान सांगितलें कीं, राजश्री हिरदेसाहजी यांणी आपले निसबतीचा बाकीचा निर्गम करून दिल्हा. राजश्री जगतराज यांकडील बाकीचा यैवज राहिला आहे. त्याची विल्हे करून देतों म्हणत आहेत. व सालमजकुरचेंहि वसुलांचें काम चालविलें आहे म्हणून सांगितलें. त्यावरून आम्हीं आपलीं पत्रें रा जगतराज यांस बहुत विचारें लिहिलीं आहेंत कीं, बाकीचा पैका अद्याप ठेऊन घ्यावा हे गोष्ट कामाची

नव्हें म्हणून व सालमजकूरचाहि पैका झाडियानसी वसूल होये तें करावें म्हणून लिहिले आहे व गोविंद बलाल मागती त्यांकडे पाठविले आहेत. ते द्रव्याचा निर्वाह करून देतील, ठेवणार नाहीं. सारांश उभयेता राज्याची निष्ठा स्वामीचे ठायीं निःसीम आहे. दुसरा अर्थ त्यांच्या चितात किमपि नाहीं. स्वामीचे येणें या प्रांते जाल्यांस उभयेतांनीं दर्शनास यावें, स्वामी आज्ञा करितील त्याप्रा वर्तणूक करावी, हाच त्यांचा भावार्थ आहे, हे स्वामीस विदितच आहे. हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of his endeavours to settle payments due from Hirdesav and Jagatraj, sons of Chhatrasal.*

No. 16] [पो *31-1-1737*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. येमुनेआलाकडे लस्करास फिरावया निर्वेध जागा कोठेहि नाहीं. त्यास रा गोविंद बलाल बुंधेल्याकडून आले. त्याणीं त्याकडील राजकारण त्याचे विचारें आणिलें आहे. त्यास येमुनापार होऊन जावें तरी सिमगा चैत्र वैशाखपर्यंत येमुनेस उतार नाहीं. जेष्ठ मासीं उतारसा पडणार तो आमच्या प्रयोजनाचा आहे नाहीं तें स्वामीस विदितच आहे. त्यास हा मनसबा करणें तो बुंधेल्याचे विचारें करावा. त्यांची फौज असिल्याविना होणार नाहीं. याकरितां गोविंद बलाल यांस उभयेतां राज्यांकडे पाठविले आहेत. आणि त्यांकडून राा हिमतराऊ व कृष्णसिंग पाच साहा हजार फौजेनसीं बोलाविले आहेत. त्यास गोविंद बलाल जाऊन बोली करून त्यांची फौज आणविल्याप्रमाणे येऊन भेटली आणि त्यांचे आमचें विचारें येमुनापार होऊन जाऊन योजिला कार्यभाग करावा यैसें आहे. त्यास गोविंद बलाल त्यांकडे गेले आहेत; त्यांचे उतर अद्यापि आलें नाहीं. जरी त्याची फौज लिहिलेप्रमाणें आली तरी त्याचे आमचे विचारें जो होईल विचार तो केला जाईल. विदित जालें पाहिजे. जे होणें ते स्वामीचे तपोबलसामर्थें होईल. हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of his efforts to cross the Jumna with the help of the forces supplied by Bundele.*

1296

No. 17] [पौ *17-4-1737*

पौ छ २७ जिल्हेज.

श्री

विनंती उपरी. सांप्रत नवाबाचे येथ सादतखानाचे पत्र छ २३ जिलकादचे व फेरोजंगाचे खत आले. छ १० जिलकादी दो प्रहर रात्री. तेथ लिहिले आहे की, "राजश्री पंतप्रधान चमल उतरून फरिदाबादेस गेले. तेथून आगरे बारा कोस राहिले. राजश्री पिलाजी जाधव याचा पुत्र वगैरे पंधरा हजार स्वार व आडोरचा राजा च्यार हजार फौज यैसे येमुनापार उतरून गेले. तिकडून सादतखानाची फौच पंधरावीस हजार अली. त्यासी यासी गाठी पडली. हे मधे, इकडे येमुना, डावीकडे करांडा, उजवीकडे येक सरदार सादतखानाचा आणि सन्मुख सादतखानाचा भासा. सादतखानास दोन कोस मागे टाकून पुढे चालोन घेतले. लडाई जाली. मोगलानी फार दबाविले. यासी वाट कोन्हीकडे फुटना. यैसे संकट जाणोन येमुनेत घोडी घातली. तेव्हा मोगलानी दाटी करून असी माणूस मारले, से दोनसे जखमी जाले. पाचसे माणूस व घोडी लाहान थोर, यारंदी[1] दोन च्यारसे राहिली ते नेली. नदीत कितेक माणसे व घोडी बुडाली. वरकड फौज सुरक्षित राजश्री पंतप्रधान यापासी येऊन पोहचले. पातशाहाचा फर्मान सादतखाजीस येऊन पोहचला की, तुम्ही लडाईची जलदी न करणे. वजीर आजम व खानदौरा व बंगस वगैरे अमीर तईकेले[2] (?) आहेत हे येऊन पोहचतील. मग लडाई करून पराभव पावऊन ताकूब[3] करून तंबी करणे. तंबी केल्याविगले फिरोन न येण त्यास यानी जाब पाठविला की, लडाई शुरू जाली आहे. आता सबूर करिता येत नाही. नावाचा पूल नदीत बांधिला आहे. त्यात दाहा १० नावा कमी आहेत. त्या आज रात्रीमधे आणून पूल पुरता बांधून उद्या पार उतरून लडाई करितो. मग जे होणार ते हो. येणार ते येतील अगर न येतील. आता आम्ही इतकियावर सबर करीत नाही." यैसे उतर लिहिले. व यास पत्र लिहिले. बहुधा लडाई जाली असल. मागून वर्तमान साध्यांत येईल ते लिहून पाठऊ. माहाराज राजश्री स्वामीचा प्रताप व वैकुंठवासी राजश्री नानाचे पुन्य मस्तकी आहे. येशवंत होऊन येतील. सादतखानासी व वजिर आजमासी बावण कोसाचे अंतर आहे. कलल पाहिजे. परंतु आवघे येक होतील. बडाई लिहिली आहे. पाहावे, हे तयारीत आहेत.

---

१ लहान, किरकोळ ओझ्याची. २ ? ३ पाठलाग.

विस्वास काय? यासीहि जाले आहे. मुख्याचे समाधानाते करावे. कुचाचे तयारीत आहेत. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*News from Delhi, dated 2nd March 1737, of an encounter between the Marathas and the Emperor's forces, is transmitted to Poona by the Peshwa's agent with the Nizam. This refers to Bajirao's famous raid against Delhi.*

No. 18] [*21-3-1737*

श्रीशंकर

उतमगुणालंकरण कमलाअलंकृत राजमान्ये राजश्री
प्रधान पंडित स्वामी गोसांवी यासी,

सेवक जगनाथराऊ कृष्ण कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुषल तागाईत छ २९ जिल्काद मुकाम जांबरोली जाणून स्वकुषलोदंत लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपले आगमन फौजेनिसी याप्रांतात होऊन रोहिल्याचा जिला काबीज करून अटेरवाल्यासी येथवरी बतंग केले कीं सहकुटुंब त्यासी जीवदान दिधले हा सकलहि प्रसंग ऐकून चितासी अतिहर्ष जाहला व पुढेहि नीट अगऱ्याचे मार्गे (कूच) होऊन श्रीमथुरास्नान होणार यावरून तरी चितासी अतिआनंद जाहला तो अर्थ कोठवरी लेखन करावा? सारांष आपण पूर्ण येषस्वी आहेत. प्रतापकटाक्षेकडून दिवसोनदिवस तांब्रहि सकल आदिकरून हतरहीत होतात. काही सत्वता राहिली ऐसा अर्थ नाही. श्रीकृपेकडून सकलासी तोंडघसी देऊन श्रीमथुरास्नान सकलसमुदयेसह घडेल यांत संदेह नाही. तोच सुदिन जे मथुरास्नान होऊन भेटीचा लाभ घडे. राजकी वृतांत तरी अभयसिंग दाहापंधरा हजार फौजेनिसी मौजाबादेस स्थिर आहेत. माहाराजासी हजुरून खास दसकती रुका व सकारपूर्वकाचीं पत्रें आलीं त्यावरून बाहिर व बुनगाह मानसिक समागमे घेऊन जेरिदे पंधरा हजार फौज व यासिवाय तोफखाना समागमे घेऊन जयेपुरासी दाखल न होता परभारेच काली डेरेदाखल जाहले. संध्याकाली आजी नौकोसाचे तफावतेने अगऱ्याचे रुखे जाबरोलीचे घाटी डेरे जाहले आहेत. कूच दरकूच अगऱ्या प्रांती जाणार. बहुधा बाहियात्कारे येकत्रटहि होतील विदित होये. हे वृत आपणासी समयोचित कलावे यास्तव अजुरदार कासद करून पाठविला असे. सदैव स्मरण पत्रार्थी स्वानंदऊन चितासी आनंदवीत असिले पाहिजे. विशेष काये लिहिणे, कृपा असो दिधली पाहिजे, हे विनंती. रा। छ २९ प्रात:काल जिल्काद.

¶*Jagannath Krishna congratulates the Peshwa on his victory at Ater and gives him news of the movements of Abhaysing of Jodhpur.*

No. 19] [पाो 30-3-1737

छ ९ जिल्हेज.

श्री

सेवेसी विज्ञापना. अवरंगाबादेहून सावकारी लिहिली आली कीं, तीर्थरूप राजश्री रायानी अटेरीचा किला घेतला. हें वर्तमान दिलीस कललियावर बहुतसा दबाब बसोन पातशाईनी खानेदौरा यास आज्ञा करून पुढें रायास सामोरे येऊन सलामामला करावा, द्रव्य द्यावें, द्रव्याच्या बहुतशा गोष्टी लिहिल्या आहेत, यैसें वर्तमान सावकारी लिहिल्यात

* * * * * *

¶A business letter from Aurangabad, stating that the news of the capitulation of the Ater fort quite overawed the Emperor who thereupon ordered Khan Dauran to negotiate terms of peace that would satisfy the Peshwa's demands.

No. 20] [March 1737 ?

श्री

विनंती उपरी. आपणाकडून रा बाबूराऊ आले, वर्तमान सांगितले, त्यावरून कलले. मोगल दोघेतिघे येकत्र जाहाले. आजी पाटोदीचे सराईवरी आला असिला तर अठरा कोसाचे आंतर आहे. सादतखान लांब चालतो. राण[1] त्याचे आहे. जाट हरोले[2] आहेत याकरिता उदैक प्राथःकाली तलावरी भोजन न करावे. आगोधरच जावे. राजश्री नाना फराल करून चालतील. दोन दिवस श्रम जाहाले तरी उतम. आपला आब राहातो. मोगल तिघे तिहीकडे लांब लांब होते ते थोर थोर मजली करून येके जागा जाहाले आहेत. पंचवीस कोस मैदाने रात्रीचे चालोन उजेडता हरोलाची गाठ पडलियावरी उतम नाहीं. माघारे कोणी तोंड करणार नाहीं. घोडियास पाणी विहरीवेगळे नाहीं. काहाडून पाणी पाजावयाचें संकट आहे. याकरिता पाहाटेच सिलावेलाचे चालावे हे उतम आहे. दोन तीन मजली आडचण. बारी आहे ते टाकून लांब जावे, हे उतम आहे. सूचक आर्थ आपणास लिहिला आहे. अम्हास म्हणतील कीं घाबरे जाहालेत. तरी वलण राण मोगलाचे घर आहे. वाकीफ[3] रातचेच चालतील. यास्तव गाठ तोडावी हे उतम आहे, हे विनंती.

---

१ राण=रान, मुलूख. २ हरोल=आघाडी. ३ वाकीफ=जाणता.

उदैक तळावरी दोन हजार स्वार मातबर सरदार ठेवावे. तिसरा प्रहरपरियेंत, तळावरी राहून दुसरे दिवसी बातमी घेऊन येत यैसा धीर धरावयाचा सरदार पाठविला पाहिजे, हे विनंती.

¶*The Maratha Commander has issued orders to move rapidly avoiding contact with the enemy's forces which have gained in strength as a result of the combination of the Moghal war-lords.*

No. 21] [*Jan. 1737*

श्री

विनंती उपरी. जाले वर्तमान पूर्वी पत्री लिहिले आहे त्यावरून सेवेसी श्रुत होईल. भदावरचा मामला विलेस लाविला. केवल हटनिग्रह करावा तर मुळूक उद्वस केला आणि येके मापें टका जमा होतो यैसे नाहीं. याजकरिता त्याचे हातून थोडेबहुत अधिक करून विलेस लाऊन घेतले. याउपरी भदावर डावे टाकून सेखाचे महूस गेलों. तेथे स्तल थोडके. येवडे लस्कर आट रोज टिकते आणि पोट भरते यैसे नाहीं. पुढे जावे तर मुळूक बुंधेल्याचा. त्यास तोसीस देता येत नाहीं. भदावरकराचाहि मामला विलेस लागेल. कोठे लस्करास पोट भरावयास जागा नाहीं. त्यास उभयता राज्याकडे राजश्री गोविंदपंत पाठविले आहेत. त्याचा मार्ग पाहवयास त्या प्रांते जात आहे. ते आले तर त्याच्या विचारें जो मनसबा होईल तो करीत आहें. त्या प्रांते टिकाव होईल तेथवर करू; नाहींतर ढवलपूरचे रोखे येऊ. दिवस तीन महिने पोट भरावयास राहिले आहेत. मुळूक तो सर्व कौली जाला आहे. बुंधेल्याचें दोनी दिवाण आले म्हणजे येमुनापार होत आहे. वडिलाचे पुण्येकरून जे होईल ते करीतच आहें. याउपरी वडिलाचे आज्ञेचा मार्ग पाहात राहिलों आहे. स्वामीनी जो मनसबा करणे तो बहुत विचारें केला पाहिजे. या प्रांतातील या प्रकारचें वृत आहे. सेवेसी विदित व्हावे याजकरिता लिहिले आहे. वडिलाची आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञास.

¶*The writer, probably Baji Bhivrao, expresses the difficulties that he experienced in collecting money in the north for the maintenance of his army. The letter seems to be addressed to Bajirao.*

No. 22] [3-4-1737

पौ छ २७ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे-
सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा चैत्र शुध्ध १९ पावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री राव यांचे व सादतखान यांचे युध्ध जाले. वर्तमान येथें आजी पंधरा दिवस आले होते. त्यास छ ११ जिल्हेजी नवाबास सादतखानाचे पत्र आलें कीं, गनिमाचें आपले युध्ध जाले. गनिमानी शेखी बहुत केली होती. त्यास तंबी पो(हच)विली. त्या पत्राचा अभिप्राये सर्व कारभारियांचे मुखे मनास आणितां तर युध्ध जालें. राजश्री मल्हारजी होलकर यांचें वर्तमान विपरीत आहे. व आपाजी जाधव पाडाऊ जाले. माधवराऊ नारायेण पाटणकर हेहि पाडाऊ जाले. आणिकहि सरदार मातबर दाहा पाच माणूस व सिपाई लोक दोनसे माणूस जिवंत धरून नेले. च्यारपांच हजार घोडी नेली. व यमुनेत लोक बहुत बुडाले गेले. या जातीचे वर्तमान आहे. मोगल पाठोपाठ येत आहे. आपले लस्कर जैसिंगाचे मुलकाचे रोखे गेले, म्हणून वर्तमान आहे. परंतु आद्याप आपले लस्करचे लिहिले आलें नाही. जे लिहिले वर्तमान येईल ते खरे. व येथील मुख्याचा विचारहि ऐसा आहे कीं, नर्मदेपावेतो जाऊन तिकडील भावगर्भ पुर्ता मनास आणून जर आपले अटसटीयांत गोष्टी आली तर वेलास न चुकावे, असा रंग आहे. उदईक कूच करून जाणार. स्वामीस कलावे यास्तव लिहिलें आहे व श्रीमंत राजश्री रायांकडे येथोन कासीद रवाना केले आहेत. तेथील उतर आल्यानंतर आपणास लेहून पाठऊन. तेथील उत्कर्ष ऐकोन वृध्धास आवेश बहुत आला आहे. जर हे या मार्गे पडोन आले तर खामखा गले पडावे ऐसा विचार आहे. आपल्यास कलावें यास्तव लिहिलें असें. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶Krishnarao Mahadeo informs Chimaji Appa that rumours have been received that the Maratha forces under Malharrao have been routed and that they lost a number of horses and their baggage in the retreat.

---

१ ऐट.

No. 23] [7-4-1737

छ ९ मोहरम
मुा. खेतोली.

श्रीवंकटेश

श्रीमंत सदायेशवंत धर्मपरायेण
राजश्री राऊ स्वामीजीचे सेवसी

सेवक वेंकाजी राम सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १७ माहे जिल्हेज मुा गडहसी नजीक सवाईपूर कोस वीस जाणून येथास्थित आसे. स्वामीस पत्रे पाठविली. उपर हुंडीचे पैरवीत राा * * राजी याचेथील करून हुंडी वाटे लावावी म्हणून सावकारास बोलाविले जे. पंचविसा हजाराच्या टिबा[1] दिधल्या, त्याची हुंडी करून देण. यैसियास त्यानी आर्ज केला जे, आपण टिबा दिधल्या हजार पंचविसाच्या. त्यास राा राउराजा म्हणत आहेत जे, गांवगणा माल देतो, घेणे. त्यानी उजूर[2] केला जे, फौज तिकडून गेली आणि माल लस्कराने लुटून घेतला तरी, आपण दोहीकडून बुडालो. तेव्हा आपण त्यांची निशा केली की, हे वर्तमान आपण राजश्री स्वामीस लिहिले आहे. त्याजपासून पाऊण लाख रुपये घेणे लागतात. याबद्दल विनंतीपत्र पाठविले आहे. त्यावरून श्रीमंत स्वामी बुंदीच्या मुलकातून जाणार नाहीत. आणि त्यांचा मुल्क मार्गावेगलाहि आहे. स्वामी कृपा करून तिकडून न जातील यैसे बहुत प्रकारें त्यांचे समाधानी करून सांगोन कार्यावर आणिले. यैसियास स्वामीनी राा राऊराजियाचा राा पंडितरायाचे विदेमाने नेमस्त केले, त्याप्रमाणे सरंजाम देतात. यास्तव विनंती लिहिली असे. तरी त्यांचे मुलकातून स्वारी न होय ते केले पाहिजे, की साहुकारासी वचनास आंतर न पडे. आणखी पनासाची निशाहि त्याज हातीच करणे लागती. याबद्दल विनंती लिहिणे लागली. इतकियावर औरंगाबादेची हुंडी पंचवीस गंगाभागिरथी मातुश्रीबाईसाहेबबाा राा सवाईजी व प्रतापसिंग बाा पंचवीस राऊराजा येकूण पनासाच्या हुंडिया औरंगाबादेस सहजराम नावाणी याचेथे हुंडिया पाठवितों. आणि श्रीमंत राजश्री आपा स्वामीस विनंती पत्र लिहितों. आम्हापासी जासुदांची जोडी आहे. व सरकार राा सवाईजीची जोडी देऊन औरंगाबादेस पाठवितों. तेथून आमची जोडी पुणियास जाऊन, विनंतीपत्र देऊन, तेथून श्रीमंत राा आपा स्वामी पैका पुणियास आणवितील. या प्रकारें वाटे लावितों. स्वामीनी बुंदीच्या मुलकातून स्वारी न जाय, ते केले पाहिजे. स्वामीनी जयेपुरीयास सौदियादखल तीनसे

१ यादा. २ तक्रार.

रुपये पाठविले होते. त्यास तेथून याचे तरफेचा जोरावरसिंग आहे. त्याने सौदा व तीनसे रुपये माघारे पाठविले. आणि पांच हजार रुपये मेजमानी पाठविली. तेहि स्वामीनी मान्ये केली. येणेकडून आसता भाऊपणा राखिला यैसे रा। सवाईजीस भासून परम संतोश मानिला. आपणास बोलाऊन बहुत संतोशाच्या गोस्टी सांगितल्या जे, रा। अपणासी भाऊपणा आणि माया बहुत राखतात. राहत्या स्थलाचीहि गौर करून थोडीबहुत मेजमानी पाठविली, तेहि घेतली. इतकियाने आपणास फार संतोश जाला. आमचा सर्व प्रकारें अभिमान त्यासच आहे. स्वामीचे पत्रहि येऊन पावले. उभयेताची पत्रे दिधली. आमचे पत्र रा। सवाईजीस आक्षरेशा वाचून दाखविले. पाहून परम समाधान जाले. रा। स्वामीचे आपण सेवक आहोत. मुलूक त्यांचा, आपण त्यांचे. सर्व प्रकारे रक्षेण करणे त्यासच आसे. पुढे डावे उजवे टाकून गेले पाहिजे. हेहि विनंती केली जे, सोम्हईला (?) न्यातीच्या मुलकाचे तऱ्ही रक्षण करून गेले पाहिजे. गंगाभागीरथी मातुश्रीही बहुत कृपा केली. त्याचप्रमाणे स्वामीनीहि करावी. यैसे राजश्री सवाईजीनी सांगितले आणि साहुकारांचे तो अगत्य असे. पहिलेहि पत्र स्वामीस लिहिली आहेत. हालीहि विनंतीपत्र लिहिले आसे. तरी उतरे पाठविली पाहिजेत. येक जोडी कासदाची येथील वर्तमान लिहून पाठविले होते. ते जोडी आगर उतर आले नाही. तेथे आसता पाठविले पाहिजे. माघील पनास सहश्रांस सरकारची जोडी तो नाही. राजश्रीपासी येथून कासी(द) (जो)डी बराबर आज्ञा होईल तरी देऊन पुणियास पाटऊ. धुलगडावर तीन नबाब आहेत. चौथा नवाब मनसूआलीखान सादतखानाने पूर्वस पाठविला. तिकडील मवासानी जामीदारानी फितवा केला यास्त (व) वाटे लाविला. दुसरे दिलीस जाऊन पातशास जाऊन मनसु * * पुसावा की मागे मागे जावें की काये? बरवे प्रकारे फजीत पावले. आतां येऊन काये होणे? परंतु रा। सवाईजी भितात की, राच्या तलाने तल येतील. बरे जे होणार ते होईल. राजश्री आम्हावर संतोशरूप राहिले, सर्वहि पावले. स्वामी उतर पाठवितात ते रा। सवाईजी आपणासमीप बसऊन वाचून पाहतात. ल्याहावयासहि कितीक मजकूर तेच सांगतात. विशश काय लिहिणे? कृपा निरंतर आसो दिल्ही पाहिजे. धुलगडीहून मोगल पुढे चालली-याचे वर्तमान आले नाही. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीन. हे विनंती.

¶ *Vyankaji Ram writes from the camp of Sawai Jaysing that the latter was favourably inclined towards the Marathas and was willing to help the Maratha cause at the Court of Delhi provided his territory remained unmolested by the Maratha hordes. The letter emphasises the friendly attitude which Jaysing evinces towards Bajirao.*

No. 24] [11-4-1737?

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे शेवेसी

अपत्यें जनार्दनानें साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ताा छ २१ जिल्हेज मुकाम काा कोठडें सैदाचें वडिलांचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिलांची आज्ञा घेऊन आल्यादारभ्य येकहि आसीर्वादपत्र येऊन कुश(ल) वृत कलत नाहीं. याकरितां चित सापेक्ष आहे. तरी वडिलाची स्वारी कोणत्या रोखे जाहाली आहे, प्रस्तुत मुकाम कोठें, काये वर्तमान हें सविस्तर लेखन करावया आज्ञा करणार स्वामी वडील आहेत. आम्ही या प्रांते आल्यापासून तीनचार पत्रें मुजरद कासिदासमागमें व राजश्री जगतराज याजकडील कासीद गेले त्यासमागमें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहाली कीं नाहीं हें काहीं कलत नाहीं. पावली असिलिया वर्तमान विदित जाहालेंच असेंल, प्रस्तुत आम्हाकडील वर्तमान तरी वडिलाची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते दिवसीं येऊन चमेलीवरी मुकाम केला. तेथून दुसरे दिवसी कूच करून कोर नदीवरी येऊन दोनरोज तेथें मुकाम जाहाला. त्यावरी कूच दरकूच करून पाढोरेवरी आलो. तेथें पाचसात मुकाम जाहाले. तेथून साहा कोश कोच राहिली होती तेथें येऊन तीन च्यार रोज मुका(म) जाले. त्यावरी तेथून कूच करून प्रस्तुत येथे मुकाम आहे. या प्रमाणें कूचमुकामें करीत करीत येथपर्यंत आलों. पुढें चारापाणी पाहून कधी कूच कधी मुकाम करून वडिलांची आज्ञा येई तावत्काल राहून. विदित जाहालें पाहिजे. राजश्री रुपयांचे[१] रवानगीचे व दतिया वोडसें व वरकड वर्तमान राा विसाजी दादाजी यांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. मोगलाची युध्यप्रसंग जाला म्हणून वर्तमान आइ-कतों. परंतु वडिलांचे आसीर्वादपत्र येत नाही त्यावरून चितास समाधान नाहीं. याजकरितां सविस्तर वर्तमान ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardanpant (?) to Bajirao, inquiring about his movements.*

---

१ 'रुपरायाचें'? हा अंतर्वेदींतील जमीदार पेशव्यांस सामील होता.

No. 25] [*15-4-1737*

श्रीशंकर

छ २ मोहरम

(जाबसूद)

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवक बाळाजी भिकाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून सेवकाचे व मामलियाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष. स्वामी फिरंगाण प्रांते जाऊन साष्टी प्रांत फते केला, वसईस मोर्चे लाविले आहेत, यैकोन संतोश जाहाला. या प्रांतीचे वर्तमान, खानदेशात तांब्र मुतवलसखान बागलाण वगैरे जाहागीरदार दोन हजार फौजेनसी पूर्वी होते. नबाबाकडू बकसी दोन हजार फौज व तीन तोफ खानदेशात येऊन उभयेता थालनेरी येकत्र जाहाले. राजश्री सेनापति थालनेरी तांब्रास भेटले. खानदेश प्रांतीची ठाणी स्वामीचे तर्फेची मोडावी हे तांब्राचे चितात आहे. आरडीचे ठाणे परगणे डागरीस राजश्री आवजी कवडे याणी नवे ठेविले आहे. मोगलाने फौज पाठऊन ठाणे बेलदार लाऊन पाडिले. ठाणियाचे लोक तर्फकी[1] जाहाले होते. त्याणी ठाणे मागती बांधावयासी लागले आहेत. उदीरखेडिया-वरहि मोगलाचा दबाव आहे. येणार यैसे वर्तमान आहे. प्रस्तुत तांब्र सुलतानपूर परगाणियात कुढावदासी भांडतो. लाहान थोर कुल बिछोद[2] तीन च्यार हजार आहे. कुढावेद फते जाहालिया कोणीकडे जाईल तें न कले. जमा लुदीखान दाहा बारा हजार फौजनसी राजश्री आवजी कवडे याचे मागे लागले होते. झुंजत भांडत देशपर्यंत पिछा करून कोलवलीस कवडे गेले म्हणून वर्तमान आईकिले. तांब्र माघारा फिरोन आवरंगाबादेवरून नबाबाकडे मजल दरमजल गेले. उतरेकडील वर्तमान आठ दाहा दिवस बाधावाई (?) आले होते की निजामनमुल्क याचा लेक व सादतखान भडभुंज्या उभयेतासी व श्रीमंतासी युध्येप्रसंग जाहाला. हे वर्तमान आलियावर जासुदांची जोडी बराणपुरास खबरीस पाठविली. बराणपुरी नबाबाने तीन दिवस शहरात दवंडी पिटिली की सडे फौजेबरोबर जो निभावेल त्याणे तयारी करून बरोबर यावे. छ १७ जिल्हेजी मुख्ये कूच करून सडे फौजेनसी आराब टाकून हंडियाचे घाटे

---

१ हैराण. २ बिछायत = मालमत्ता.

रेवा उतरावयासी गेले. उतरेस युध्यप्रसंग जाला. हेहि बोली बराणपुरी दाट आहे. स्वामीकडे कागदपत्र आले आसतील ते तथ्य, सेवेसी शृत होये हे विनंती.

¶*Balaji Bhikaji congratulates Chimaji Appa on his successful attack on Salsette and wishes him good luck in his enterprise against Bassein. He informs the addressee that the Nizam's army has been on the move of late and has captured some places belonging to the Peshwa. There are rumours, he adds, of an engagement having been fought out between Bajirao and the Moghal army in the North.*

No. 26] [*15-4-1737 ?*

श्री

राजश्री आपा गोसावी यांसी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित देवजी सोमवंसी हिंदुराऊ कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून श्वकीये लेखन करावयासी अज्ञा निरोपित असिले पाहिजे, विशेष. दिवस जाले आपणाकडील पत्रआगमन होऊन परामर्ष जाला नाही, तेणेकरून चित सापेक्षित आहे. तर गोसायानी साकल्य कुशलवृत लेखन करून आमचा सांभाल केला पा. यानंतर बऱ्हाणपुरीहून पूर्वील राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत याची पत्रे आली ते गोसावियाकडे पाठविली. प्रविष्ट होऊन अभिप्राये विदित जाला असेल. प्रस्तुत रा। गणेश अनंत यांचे पत्र आले. छ १७ जिल्हेज शुक्रवारी नवाबाचे कूच जालें. उतावली नदीवर गेले. मजल दरमजल हस्तनापुरास जातातीं. या प्रांते आबदुल रहीमखां व अनरुलाखां दिवाण येसे पाच हजार स्वारानसी व नसरतजंग लेक औरंगाबादेस सुभा पाच हजारानसी येसे ठेवितात. वराडात सुज्यातखां. याप्रमाणें बदोबस्त करून राजश्री स्वामीस व राजश्री प्रधानपंतास पत्रे लिहिली की, आपले सिरी यागीपणाचा[१] शेह आहे तो खावंदाजवळ फेडावा. तुमचा आमचा भाऊपणा आहे त्यांत खेता[२] नाहीं यैसे कितेक प्रकारे स्नेहवादे लिहिले आहे. चितातील विचार भिन्न आहे. राजश्री पंतप्रधान हे दिलीस जाऊन सार्वभोमाची भेटी घेतात हा निश्चये जालियावर, आपली गत काये ? दुसरा सुभा येईल यास्तव तमाम उबरावास व दिलेश्वरास पत्रें पाठविली की आपण दर्शनास येतो. सरकारचा खजाना आहे. आपण तेथे आलियावर गनीमास

---

१ बागी = बंडखोर; स्वामिद्रोही. २ लबाडी.

मारावयाची काये हजत[1] आहे ? येसे लिहिल्यावरून सार्वभोमाने रा। पंताचे भेटीस विचार महकूफ[2] करून नवाबास नानेरोंटी[3] पाठविली. ह्याजवरून हे जलदीने जात आहेत येसे वर्तमान लिहिले आले. यास्तव गोसावियासी वर्तमान कलावें म्हणून लिहिले असे. याउपरी जो विचारपैरवी कर्तव्य तो करावा. विशेष काये लिहिणे ? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Devji Somvanshi communicates to Chimaji Appa the movements of the Nizam towards Delhi.*

No. 27] [*19-4-1737*

श्रीशंकर

श्रीमंत राजे[4] आपा स्वामीचे
शेवेसी,

पोश्यें बाबुजी जोशी सां। नमस्कार वीनंती उपरी. आजीच शाहरीहुन भगवंत भैरव यांचे पत्र आलें. नवाब भामगढास[5] गेला. पुढें दरकुच जातों. श्रीमंत राजेश्री रायांचे वर्तमान तर, आगरीयाचे मुलकांतुन दोन तीन मजली आलीकडे आले. तमाम अमीर येकेठाई जाले. आपला शह त्यांजवर बसत नाहीं. अठेर मारल्यामुळें, फौज भारी जाली. यामुळें कामकाज होतां दिसत नाहीं. दुसरे वर्तमान सटवोजी जाधव यासमागमें पांच सात हजार फौज देऊन यमुनापार पाठविलें. तेथें साहदतखानाची गाठ पडली. आपली फौज कोती. यामुलें युध न होतां मोगलाची दाटी देखोन, फौज पळोन, यमुनातीरास आली. उतार सांपडला नाहीं, यामुळें कीतीयेक राऊत बुडाले, कितीयेक पळोन लशकरास आले. साहदतखान शेर होउन आगरीयासंनिध पुल बाधुन आलीकडे उतरला. तमाम फौजा येकेठाई जाल्या. असें जाणोन नवाबहि भारी फौजेनशी उजीनीस जाणार, इंदुरापासुन कुल माहलांत जीमीदार वसुल देत नाहींत. तरतें बुडतें पाहतात. दोन वाटे वसुल आला. बाकी वसुल येत नाही. स्वामीनी ये समयांत गंगातीरी असावे. आवजी कवडे आणखी येक दोन सरदारांनीं खांदेश प्रांती असल्याने नवाबास वचक पडता. प्रस्तुत स्वामीचा गुंता ते प्रांती जाला. यामुळे नवाबास शह नाहीं. हे गोष्ट उतम न जाली. चार पत्रे शाहरीहून आलीं. तेधवा स्वामीस लिहिलें आहे. चितास येईल तो वीचार करावा.

---

१ हरकत. २ रहित, तहकूब. ३ शपथ, क्रिया.
४ 'श्री' अक्षर सुटलें असावें. ५ खाण्डव्याजवळ नेमाड जिल्ह्यांत.

शरीरास दोन दिवस आरोग्य वाटतें. फीरोन ज्वर येतो. भोग सरेल तेधवा आरोग्य होईल. पायचे माणूस दोन चार हजार व येक दोन शाहणें माणूस ठेउन, स्वामीचे येणें वरतें होईल तर उतम आहे. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे वीनंती. वैशाख शुध १ मंगळवारे[१].

¶Babuji Naik informs Chimaji Appa of Bajirao's encounters with the Imperial armies. He has heard rumours of disasters to the Maratha arms. Bajirao had written glowing accounts of his victories a week before, but the writer's information is quite to the contrary.

No. 28] *[20-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती छ ३० जिल्हेज बुधवारपर्यंत ये प्रांतींचे व सेवकाचें वर्तमान स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे लस्करचें वर्तमान शहरींहून व नवाबाचे लस्करांतून आलें ते पूर्वी सेवेसीं दोन पत्रें पाठविलीं आहेत. हालीं आजीच औरंगाबादेहून शामजी गोविंद याचें पत्र आलें. राजश्री भायजी नाईक इंदुरीं आहेत त्यांचें पत्र भगवंत भैरव यांस आलें त्याची नकल शामजीपंतीं येथें पाठविली ते नकलेची नकल सेवेसीं पाठविली आहेत, त्यावरून सविस्तर वर्तमान विदित होईल. पूर्वी वर्तमान आलें होतें तें सर्व मिथ्या. राजश्री पिलाजी जाधवराऊ व राजश्री मलारबा व बाजी भीमराऊ व तमाम फौज यमुनापार गेली होती, तेथें दोन शहरें मारून मोंगलासी युध्य प्रसंग जाला. मोंगलास थंडा करून फौज सांभाळून सरदार सर्व राजश्री पंतप्रधान यांजवळ आले. हें वर्तमान नकलेवरून विदित होईल. मोगलाई लस्करची खबर पूर्वी आढलली होती ते लिहिली होती. परंतु या पत्रावरून ते मिथ्या आहे. औरंगाबादेस जासूद बातमीस ठेविले आहेत. मागाहून वर्तमान येईल तें सेवेसी लिहोन. आपले लस्करचीं पत्रेंहि लवकरच येतील म्हणोन शामजीपंतीं लिहिलें आहे. नवाबानी कबिले बऱ्हाणपुरीं ठेऊन वजारतखान वगैरे मुतसदी कचेरी शहरास

---

१ सबंध पत्र बाळबोधींत हिंदी वळणाचें, ठळक, फाटेदार अक्षरांचें आहे.

रवाना करून आपण जरूरे होऊन नर्मदातीरास गेले म्हणोन शामजी गोविंद याणी लिहिलें आहे. सेवेसीं शृत होये. आपणाकडील वृत्त लिहिलें पाहिजे. हे विनंती.

¶*Malhar Dadaji Barve writing to Chimaji Appa contradicts the news regarding the successes of the Moghul army. There was a battle, he further says, between the Imperialists and the Sardars in which the former sustained a defeat.*

No. 29] [*21-4-1737*

श्रीवेंकटेश.

श्रीमंत सदायेशवंत धर्मपरायेण

राजश्री राऊ स्वामीजीचे सेवेसी

सेवक चरेणरज वेंकाजीराम सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल मुा जयेनगर ताा छ माहे जाणून येथास्थित असे. येथील वर्तमान तरी जयेनगरास दाखल व्हावयास राा सवाईजी चालिले ते दिवसी मार्गी पर्जन्ये जाला, वारा सुटला, वीज पडून बैल १ व माणूस १ मेलें, यामुळें आंबेरीस राहिले. दो चौ रोजांत जयेनगरास येणार. राा पंडितरायेजी बाा हुंड्या लक्ष रुपयाच्या. त्यापैकीं राा सवाईजी बाा हुंडी पचवीस हजाराची आहे ते गंगाभागीरथी मातुश्री साहेबांची आहे. तो पैका सध्या घ्यावा व राजश्री राऊराजीयाबाा हुंडी पाऊण लाख रुपयाची आहे त्याचा वायेदा आखाडमासचा आहे. बजिनस हुंडिया व राजश्री येऊन पोंहचले असतील या पोंहचतील. सादतखान पूर्वेस गेला. दिलीस गेलियावर वकीलहाती अर्ज करविला जे, आपणास अगरें व गुजरात व मालवा व अजमेर च्यान्ही सुभे देणें. आपण गनीम येऊ देणार नाही यैसा मुचलका देतों. त्यास पातशाने जाब दिल्हा जे, खानदवरा आपण येक जालियावर उतर देऊं. म्हणून मोहगम उतर दिल्हे. त्यावर वाईट लागलें. खानदवराच्या चितांत हे गोष्ट नाही. दुसरें हें कर्म करावे तेव्हा राा जयेसिंगास दुखवावें तरी हिंदु हिंदु येक न जा * * से होईल. दुसरे खानदवराचा याचा विचारहि येक आहे. यास्तव हे गोस्ट न जाली. त्यास खानदवरास सांगोन पाठविले जे, मागें लाग करून जाऊ. त्यास उत्तर दिल्हे जे कितीक लोक कमरदीखानाकडील जखमी व मारले गेले. बाहिर मागून आली नाही. उतावली केलियाने काये होणार. यैसें उतर प्रतिउतर जाले. यांच्या चितानरूप गोस्टहि न जाली. त्यावरून पूर्वेस गेले. बादेजबरसांत आपण येऊं यैसे सागोन उभयेतां (स) (सांगितले) उपर खानदवरा व कमरदीखानानी महमदखान बंगश यांस आपणा-

---

१ सडे. २ नंतर, बरसातीनंतर.

कडे रवाना केले. तेहि आपल्या मार्गें येत असतां रा सवाईजीनी पत्र पाठविले जे, आपल्या मुलकांत जाता येता रा चे स्वारीमुळे कांहीं राहिले नाही. मुल्क खराब केला. तुम्ही न येण्यामुळे ते आगरियाच्या मार्गें चालिले आहेत. निजामनमुलुक बहुत दिवस कुत्रिम बुधीने बुऱ्हानपुरी बैसले आहेत ते स्वामीस विदित, पत्रें वरचेवर खेलवितात. त्यास आतां छ ११ तारखेस जिल्हेजी डेरादाखल होऊन चालिलें तेहि येताती. त्यांची धमक फारसी आहे येकदां तों स्वामीनी त्यांचे येश घेतले. जरी ऐवजखान दरम्यान नसता तरी विश्रांत केली असती. आतांहि फारा दिवसाचे जाले आहेत. मृत्य होत नाही. स्वामीचे हते मृत्य होणार यास्तव चालोन येतात! हिदुस्थानांत तो यैसा कोण्ही दिसत नाही की अगारी घेऊन स्वामीवर यावें. हे गोस्ट तों राहिली. आतां अमीरांच्या पातशांच्या चितात की कधीं जालें नाही तें जालें. आता निजामनमुळुक आलियावर युध तऱ्हीं करावें अगर येखादी मसलत करावी की कांहीं बंदोबस्त होये तो विचार पाहतात. उभयेता अमीर अलाहिरंदीवरच[1] आहेत. रा सवाईजीनीहि आपला मुनसी मुशखसचंद निजामाकडे पाठवावयाचा विचार केला आहे. तो आजीउदीया स्वार होणार. ताजा कलम. मुनसी तो निजामनमुलुकाकडे वाटे लाविला आणि आपली स्वारी आगरियाकडे चालली म्हणून रा सवाईजीनी रा राजामालजीस फौज समागमे दिल्ही. सुरजमल जाट व राणाजीची फौज देविचेंद समागमे देऊन चैत्र वदी चतुर्दसी वार आईतवार छ २७ जिल्हेजी रुकसत करून वाटे लाविले. ते आगरियास ये * * * तिकडून महमदखान बंगस * * * च येतो. उभयेता आग * * तो * * * वरच आहेत. विशश काय लिहिणें. आम्हास रा सवाईजी आपणापासी ठेवित होतें. त्यास स्वामीनी मलजी बरोबर दिल्हे. त्यास जाबस्वाल यांसीच आहे स्वामींची फौज त्या प्रांते आली. जाबसाल तिकडेच पडला यास्तव आपण मलजीबराबर आहोंत. रा सवाईजी म्हणू लागले जे, जात असता रुकसत[2] करू. आपण त्यांस उतर दिल्हें जे, आपणास राजश्रीची आज्ञा नाही. जेव्हा आज्ञा होईल तेव्हा रुकसत होऊ. उतरप्रतिउतर मलजीस आहे. सर्वास भे हेच आहेत. याबदल समागमे चाललो. विशश काये लिहिणे. कृपा निरंतर असो दीजे हे विनंती. रा राजामलजीस आगरियाकडे रवाना चतुर्दसीस केले. अमावाशेस स्वार जाले. प्रतिपदेस मुा बुजेवर केला. आगरियाकडे येतात. खानदवरा महमदखान बंगश आपले वर्तमान आगरियास येताती म्हणून ऐकून आगरियास चालिले. महमदखान बंगश एक मजल पुढे चालतो.

---

[1] A place near Delhi. [2] निरोप.

मागें खानदवरा आहे पलवलेवर बेडलेवर आले आहेत. कमरदीखानहि मागे येक मजल येत आहेत. यैसिया प्रकारे चालले आहेत. निजामनमुळुकहि येत आहेत, कमरदीखान सेरीर संमधीहि होणार, भेटीहि होणे आणि कितीक कार्यभाग बंदोबस्त करणे. पातशाची लिहिलीयावर लिहिली जातात, यास्तव येतात. यास्तव रा। सवाईजीनीहि आपली फौज देऊन राजामलास पाठविले. आवघे आगरियांत संगम होईल. जयेनगरी सोनार कारेगार आहे त्याचे नांव रुपा. आणखी संगती तिघेजण आहेत. बहुत कारेगर आहेत. त्यास मिनाकारी काम कुवत्फ व जडाव व साधा काम हिंदुस्थानी व कलेचे काम यैसे की सुरईदार पात्र पुढे ठेवावें, त्याने कारंजे आपणच उडावे. दुसरे काम पुतलीचे हाती पानदान द्यावे तिने मजलसेत विडे वाटावे. विडे सरलियावर आपणाजवल यावे. मागती विडे पानदानात घालावे, मागती तिने मजलसतींत वाटावें. येक पुतली यैसी की पलंगाजवळ ठेवावी तिने घडियाळ वाजवावे. दिवस रात्र घटका जाली म्हणजे वाजवावें. तिजला येकदाच कल करून देतात. अखंड घडियाल वाजवील. या वेगलेहि आणखी कळेचे काम आज्ञा करतील तेणप्रमाणे करू म्हणून करार केला. कारेगरी बहुत प्रकारे करून स्वामी आपणावर संतोसी होऊन कृपा करतील यैसी चाकरी करू म्हणतात. काम देखून मेहरबान होऊन देतील त्यास राजी अगर चाकर ठेवितील त्यास राजी आहेत. यैसियास त्यानी अर्ज दाटून येऊन केला म्हणून विनंती लिहिली. जरी सरकारांत दरकार असलिया त्यास कौल रुपया वगैरे माणसे च्यार येणप्रमाणे लेहून पाठवावा. आपण येतासमागमे घेऊन येऊं. यास जैसी आज्ञा होईल, तेणप्रमाणे वर्तणू (क) करतील. हे विनंती. इकडे धारण रुपयास आठ सेर, नव सेर गवत भारा रुा. १।. प्रमाणे आहे. सेवेसी श्रुत जाले पाा हे विनंती. राणाजीची फौज फिरोन गेली. यांचे आगरे म्हणून हे आले.

¶This important letter from Venkaji Ram, the Peshwa's envoy with Sawai Jaysing, reveals the currents and undercurrents of Delhi politics. Sadatkhan, leader of the party intent on opposing Maratha encroachments, proposed that the subhas of Malwa, Agra, Gujarat and Ajmir be made over to him, for which he would accept the responsibility of driving out the intruders. Khan Dauran and Jaysing thought drastic measures useless and advocated a conciliatory policy. Disgusted with the attitude of his opponents, Sadatkhan retired to his subha of Oudh. "Kamardikhan and Khan Dauran," says the writer, "are encamped upon Alavardi and have asked Sawai Jaysing to join them immediately." "Everything," the letter concludes, "hinges on the arrival of the Nizam, who will decide whether it is to be peace or war with the Marathas. The writer also recommends to Bajirao for employment an artist from Jaypur working in gold and executing several curious articles of common use.

No. 30] [पो 26-4-1737 ?

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री भीवेराऊ[1] येमुना उतरले हे वर्तमान दिलीस गेलियावर सादतखानानी पातशाहाचा निरोप घेऊन याजवर आला आहे व अभयसिंग यानीही आपल्या मुलकास जावयासी निरोप घेतला. आपल्या देसास येतील. मोगलियाची गुंज[2] फुटली. येक कमर्दीखान मात्र तेथे आहेत. खानदौरा व जयेसिंग येकचिते आहेत. सार्वभोमाचीहि कृपा याजवर आहे. अभयेसिंग दिलीहून अलीकडे आलियावर त्याची आमची भेट होईल म्हणून लिहिले, येसी-यासी स्वामीचे हास्त गोलीब[3] आहेत. जे स्वामीच्या मनसबियासी अनिष्ट इछितील ते दरिद्रमनोरथ[4] होतील. मोगल्याची गुज फुटली हेहि उतमच जाहाले. पुढे स्वामीची जबरदस्ती ते प्रांती पूर्ण आहेच. यामुले सार्वभोमाचे सर्व सामादिक स्वामीपासून गौरव इछितात. पुढे सर्व स्वामीपासी रुजू होऊन आपले मर्जीमोफक[5] वर्ततील. श्रीकृपेने वडिलाच्या आसीर्वादेकरून स्वामी जो मनसबा करितील तो सिधीस जाईल येसे आहे. विदित जाहाले पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji to Bajirao : congratulates the latter on his strong action at Delhi.*

No. 31] [26-4-1737

छ १९ मोहरम

(जाबसूद)

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक बालाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत वैशाख शुध ७ सप्तमी परयेत स्वामीचे कृपाद्रिस्टी ठाणे उदिरखेडा सुखरूप असो. यानंतर पूर्वी सेवेसी पत्रे बातमीची श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीकडील पाठविली

---

१ (?) २ गुंज—जमाव. ३ गालिब=बळकट, जोरावर, वरचढ. ४ भग्नमनोरथ. ५ मर्जीप्रमाणें.

होती. येसियास प्रस्तुत शहरीहून आजी बातमीची पत्रे आली कीं सावकाऱ्यामधे बऱ्हाणपुरी खबर तहकीक[1] आली आहे की भदावर शहरयाची अटेरीस युध्य थोर जाले. अमित्रांचा मोड जाला. श्रीमंताचा जये जाला. लस्कर अभेर[2] जाले. तेथून लस्करसहवर्तमान फिरोन सिरोजेवर श्रीमंताचा मुकाम जाला आहे म्हणोन वर्तमान आले आहे. सेवेसी कळावे म्हणोन लिहिले असे. आजम नवाब निजामनमुलुक रेवातीरी दक्षणभागी मकडाई प्रांतेच सेनासहवर्तमान स्थिरतेनेंच आहेत. बहुतसा चलचलावे नजरेस येत नाही. खानदेशांत तोफ आली होती ते गेली. बराणपुरी दाखल जाली. गोविंद सिधेश्वर याणे कुसुंबाचे खले जालिले. उसाच्या घाणियां माल सुधा जालिल्या आणि लुटून नेल्या. खराबीवर उठला आहे. बंधारा फोडावा यैसा निश्चये जाला. सरदेशमुखीचा गुमास्ता कैद करणार होता, परंतु गुमास्ता पळोन आम्हाकडे आला. आजीतागाईत कुसुंबाचा मोकासबाबेचा येक रुपया वसूल नाहीं. त्याच्या तालुकियांत रुपया खावंदाचा घेणे आला. आज्ञा करणार खावंद समर्थ आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶Balaji Bhimaji to Chimaji Appa, describing a battle between Bajirao and the Imperialists in which the latter were completely repulsed. The plundering activities of Govind Sidheshwar and the activities of Nizam-ul-mulk are further described by the writer.

No. 32] [पौ *29-4-1737*

छ ९ मोहरम

श्री

सेवेशी विज्ञापना. रा रूपरायासमागमे राा राणोजी भोसले व राणबाकडील व मल्हारबाकडील देवजी हंबीर बुनगियात आहेत ते कुल देऊन व बुधेल्याची फौज देऊन अंतरवेदीत रवाना आज्ञेप्रमाणे करणे म्हणून आज्ञा. ऐशास वडिलांचे आज्ञेप्रमाणे बुंधेल्यास सांगोन त्यांची दोन हजार फौज व आम्हाकडील राा राणोजी भोसले यांजकडील रा राघो गोविंदचे सवासे स्वार व राा तुकोजी पवार व येध्याजी सतकर व धालवडे वगैरे मिळोन दोन अडीचसे स्वार ऐसे राा गोविंद बलाळ यासमागमे देऊन रवानगी केली त्यास आजी पंधरा रोज जाहले. हे सविस्तर वर्तमान मुजरद कासीद अजुरदार करून वडिलांकडे पाठविले ते पावले नसतील. अलाकडे रूपरायाचे पत्रहि आले कीं आपण

---

१ खरी. २ श्रीमंत, तृप्त.

यमुनापार होऊन आपल्या देशास आलों आहों. आपले वारीसदार आहेत ते फिसात[1] करितात. त्यांचेही पारपत्य होणे ते होईल. राऊसाहेबाची कृपा आपले मस्तकीं असतां कांही चिंता नाहीं. पुढें होईल वृत्त तें लेहून पाठऊं म्हणून त्याचे पत्र आलें. राा मल्हारबा व राणबा व यसवतराऊ पवार याजकडील राऊत पाठवावयाविसीं सांगितले, परंतु त्यास अनुकुल पडले नाहीं. मग जे जाहले ते रवाना केले. तिकडून राा गोविंद बलाळ व राा रुपराऊ याणी पत्रे स्वामीस लिहिलीं असतील त्यावरून अंतरवेदीचे वर्तमान विदित होईल. शेवेसी श्रुत जाले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of the despatch of an expedition into the territory beyond the Jumna, under Govind Ballal and others.*

No. 33] [*April 1737*?

श्रीभवनीशंकर

श्रीमंत सकलगुणालंकरण विद्वजनमंडण धर्ममूर्तिपरायेण गोद्विजप्रतिपालन अखंडितलक्षेमीप्रसन माहाराजाधिराज राजश्री रावसाहेबाचे सेवेसी

सेवक आनंद यादव कृतानेक नमस्कार. येथील क्षेम जानऊन स्वकुशल-लेखन सनाथ केले पाहिजे. यानंतर कृपापत्रे कासिदाबराबर पाठविली ते पावोन संतोश जाला. राजे बख्तमलजीस खत लिहिले ते आपन त्याहास पावत केल तेहि अम्हादेखता वाचिलें आनि इबारतखताची मजेमून[2] पाहून बहुत खुशवख्त जाले आनि आम्ही सूचना केली की, हे खत निदानच आहे. ज्याकारण तुम्ही मत्रकूफ केले होते, ते ते सर्व तुम्हास लिहिले आहे. मुख्यासी जो विचार करण तो करून, बहुताप्रकार बोध करून, काम कु र सि नि सी करून जाब लिहून द्या. त्यास म्हनो लागलेत की प्रहर येक दिवस राहातां आपन मुख्यापासी जाऊन येकांत जाबस्वाल करू. यैसा करार करून साघटिका दिवस राहता गेले व यादगारखान पाच सात दिवस अमीरुलअमरावजीचे लस्करात होते तेहि आलेत. मुख्याची भेटी घेतली न कले की काये जाबसाल जाला. त्याच रात्रीस आपण राज्याजीचे भेटीस गेलो आनि जाबसाल काये जाला हे विचारिले. त्यास उतर दिधले की, आपन जाबसाल करीत होतो की यादगरखान आलेत. रावाचे खत बजिनस[3] बकसीजीपासी पाठविले व यादगारखान तेच दिवशी काय जाबसाल होते ते मुख्यासी करून, रुकसत होऊन, बकसीजीपासी गेलेत. राजियाही

---

१ बंडावा, फितुरी, कलह. २ मजकूर. ३ हुबेहुब, खुद्द.

उतर दिधले की, त्याजपासून उतर आलियावरी जाब देऊ. त्यास रोज तीन जालेत की जाब आला नाही म्हनतात. पाचसात कोस लस्कर बकसिजीचे आहे. त्याचा भेद कलत नाही. आम्ही पुरजा[1] लिहिला होता की माा राजश्री रावजीची मानसे जाब मागतात. त्यास त्याही पुरजियावरी दसखत केले की जाब आला नाही. तोहि पुरजा बजिनस सेवेसी पाठविला असे. नकारपूर्वक नरमदा उतरून चार मजली आला, याकरिता याचे चितात काये आहे ईस्वर जाने ! नाहीतरी माहाराजासारिखा सरदार याचे हाती लागला असता हे अरकान[2] कदर जानत नाहीत. बगसास आगरियासी पाठविले आहे आनि हजुरीहून मबलग दिधले. बाकी आगरियासी पावलियावरी देऊ केले आहेत. राजश्री सिवरामपंताचे कागदावरून कलो येईल की सिवरामपंत येथ आम्हापासी होते, त्यास ते राजश्री यादोरावजीचे संगतीस तरबियेत जालेत, त्यास आगडेबागड[3] पाहिजे. आम्हास तरी प्रमाण असलिया आमची शरम[4] राहे. आजिपरियेंत ईस्वरजीन निर्वाह केला. हली माहाराजाची कास धरिली त्यास आमचे अद्रुष्टीं येश येनार असल तरी येईल. माहाराज भाग्यवान आहेत. याचा तरी येसा प्रसंग आहे. राजे बखतमलजीस जाब खताचा मागितला. हे जाब देता अनमान करू लागले. मग येकांती खिलवतेमधे पुसले की जाब का देत नाही ? त्यास म्हनो लागले की या दिवसात खतपत्र मुफसल[5] लिहिन मुनासीब[6] नाही. जो पावेतो नकारपूर्वक येत नाही तोपावेतो कांही कामकाज होत नाही येसा जाब दिधला. मग बजिदी करून जाब लिहून घेतला तो पाठविला आहे. यामधेहि अम्हावरी हवाला घालून लिहिले आहे. मुख्ये आधीच तरी हे विल्हेवाले करीत होतेत. आता नकारपूर्वकाचा बाहना यासी जाला येसे वर्तमान आहे व माहाराज तरी याचे भरवसियावरी होते. हिंदुस्तानी दुसरे खातरी लोक आहेत व कशमेरियासी जाऊन भेटलो. तो तरी आपलाच रड रडत होता की कोन कोने रीतीन याच्या कामास कुरसी बसविले होते ? आनि याही आपले काम आपन खोविले. अता तरी दक्षनेचा सुभेदार आला आहे, तो आलियावरी मग काये होन ते होईल येसे म्हनत होतां. रोहिले (राहिले ?) नकारपूर्वकाचा लेक गाजुदीखान हजुरामधे आहे, वजिराचा जावाई आहे. यान्हे कबूल केल आहे की जर आपले नांव खत ये तरी आपन नकारपूर्वकास बजीद होऊन रावाचे कामकाजाची कुरसीनसी करून, येसे पूर्वी वजिराचे भरवसियावरी म्हनत होता व वजिरासी गोस्टमौतहि केली होती. मधे सवाईरामनामे फकीर हिंदू आहे.

---

१ पत्र. २ दौलत ? ३ (?) ४ प्रतिष्ठा

५ सविस्तर. ६ रास्त. ७ जाबसाल.

बख्तमलजी वगैरे हिंदू मानितात व मुसलमानहि वजीर खानदोरा याचे घरी कधीकधी जातो तेहि मानितात. येकप्रकारी स्वामीजी श्रीवारानसीमधे राहतात, त्याचा सिश म्हनवितो. याकरिताच रा। धोंडाजीपतास भेटला व माहाराजाचे कामकाजाबा। बहुत खातरखुद करितो. वजिराचे जाबस्वालामधे व गाजुदीखानाचे जाबस्वाल याचे मा। आहेत. परंतु आपन माहाराजाचे मरजीस कागदापत्रावरून वाकीफ होतो की अदियापहि बखतमलजीस खतपत्र येत तऱ्ही अमिरुल अमरायेजीचे हस्ते जोबाब[1] करा येसे लिहिता. याकरिता आपन कधीही हा प्रसंग न लिहिला. हाली नकारपूर्वक आहेत व गाजुदीखान त्याचा लेक व वजिराचा जावाई आहे. जर चितास येईल तरी सिष्टाई स्नेह करीता गायेबाना[2] सवाईरामाचे लिहिल्यावरून कळू आले येसे चितास आलिया लिहीन. आपन सहजामधे लिहिले आहे. आमचे नाव काही न लिहिन. जर नकारपूर्वकासी जाबस्वाल असेल तरी यास सिष्टाई मात्र पत्र लिहीन. मनास न येईल तरी न लिहीन. दुसरे छावनी कोठ करावी काही मनोगत मजला चितास आलिया लिहीन. मजला आपले शुभचिंतकात जानिजे. नकारपूर्वक ये (तो करितां सर्व) लहानथोरास वसवासा[3] जाला आहे. कोन्ही म्हनतात की मुख्याची आजी बाहादुरशाह पादशाहजीचा महाल तिची मा। आहे. तिन्हे मुख्यास सांगून बलाविले. कोन्ही म्हनतात की सकारियाने सलाह करून स्नेह करून बलाविले आहे. कोन्ही काही कोन्ही काही म्हनतात. हजूर आलियावरी काये प्रसंग होतील ते लिहिले जातील. सवाईरामहि येसा शाहना वितपन[4] आहे. स्वामीजीचा सिश म्हनवितो. जाबस्वाल हिंदवी फारसीमधे अमीराचे सागती योग्ये आहे याकरिता लिहिले आहे. सिष्ट जानून मरजी असलिया यासी पत्र लिहीन. नाहीतरी न लिहीन. त्याचे मतलबाचा जाब पाठविने. हे विनंती.

¶*Anand Yadav to Bajirao, reporting the attitude of Sawai Jaysing and (his agent ?) Bakhatmal towards Bajirao's demands about Malwa. The letter gives important details and mentions Nizam as having crossed the Nerbudda, i.e., during the summer of 1737.*

No. 34] [*April 1737 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीची आज्ञा कीं, वोडसें, दातिया, बुंधलखंड हा मुलूक कौली[5] आहे. यास उपसर्ग येकजरा[6] लागो न देणें. आज्ञेप्रमाणें ताकीद करून

---

१ जबाब २ अपरोक्ष = पाठीमागें. ३ संशय.
४ व्युत्पन्न, धूर्त, दूरदर्शी. ५ कौल दिलेला, सरकारी. ६ थोडा सुद्धां.

उपद्रव लागो न देतां दतिया वोडशाचा मुलूक उजवा घालून सरहदेनं आलों. वोडशाचा व दतियाचा वगैरे जागांचा पैका सुरोजेस पाठवावयाची आज्ञा स्वामीची जाहाली होती. संस्थानास कारकूनहि पाठविले. त्यास वर्तमान मनास आणितां कोठूनहि पैका सुरोजेस गेला नाहीं. कारकून पाठविले त्यांची पत्रें आली कीं, याजकडील पैका लौकर येत नाहीं. अंतरवेदींत फौज गेली होती, तिची व सादतखानासीं गाठ पडिली, लडाई, जाहाली, ते समईं मोड जाहाला. सादतखान फौजेनसीं आगऱ्यास आले. श्रीमंत सडे फौजेनसीं गेले. वरकड माघारें बुनगे लाविले. यैशां नाना प्रकारच्या खबरा येतात त्यावरून हे विचारावरी आहेत. समजावीस मात्र करितात म्हणोन वर्तमान आलें. त्यास रजवाडियांची जे रीत आहे ते विदितच आहे. मानेमार्ग कैसा पडती हे पाहावे हे रीतच आहे. त्यास आम्ही आल्यावरी त्यास बहुतच दबाऊन लिहिलें कीं तुम्ही नेमाप्रमाणें पैका सुरोजेस पाठविला नाहीं हें वर्तमान श्रीमंतांस विदित जाहालें. त्यावरून आम्हास आज्ञा केली आहे कीं, तुम्ही आपले व बुंधेल्यांचे फौजेनसीं मुलकांत जाऊन बेमुलाहिजा पैका घेणें. त्यावरून त्यांच्याहि चितांत आलें कीं, पैका न देतां गत्य नाहीं. सुरोजेस पाठवा म्हणावें तरी त्याचे वस्तु निभाव नव्हे. दिवसगत लावितील, पाठवणार नाहीं, याकरितां पैका आम्हाजवळ पाठवणे म्हणून लिहून पाठविलें. त्यावरी दतियाचे रुपये रामाजीपंत घेऊन आम्हाजवल आलें. त्याकडील पैका येणें त्यापैकीं कांहीं सोड मोकल करून द्यावी म्हणून बहुतच रदबदल केली. परंतु आम्ही परिछिन्न सांगितलें की, आज्ञेविना येक रुपया सोडवत नाहीं. तुम्हास आपला मुलूक वाचवणें असेल तरी ज्ञाडियानसीं पैका आणून देणे. त्यावरून दतियेकराचा पैका सारा आला. च्यार पांच हजार रुपये बाकी राहिली आहे तेहि देतील. तैसेच वोडसेकरहि रदबदल करीत होते. त्यांसहि साफ जाब सांगितला. त्यांकडे अडीच लाख रुपये यावे, त्यापैकीं दीड लाख रुपये आणून दिल्हे. बाकी येक लाख राहिले आहेत त्यांविशीं ताकीद करणें ते केलीच आहे. आणितील तेव्हा घेऊन. दतियेकर रा। रंगोपंत व रामाजीपंत समागमेंच आहेत. वोडसेकर गणेशपंतहि आहेत. जालें वर्तमान सेवेसी विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. दतिया वोडसें येथील पैका सुरोजेस पाठवावयाचा निभाव आपणाच्याने होईना, यैसें सांगोन पाठविलें, त्यावरून जरूरास पैका येथें आणवावा लागला. विदित जाहालें पाहिजे. शेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The writer, probably Baji Bhivrao, writing to Bajirao, mentions that the Chiefs of Datia and Orchha hesitated to make payment of dues for a long time and that the writer compelled them to satisfy the Maratha demands.*

१. संधी.

No. 35] [April 1737 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीचे आज्ञेप्रमाणे राजश्री जगतराज याजकडे जाऊन सविस्तर वर्तमान सांगितलें कीं श्रीमंताची आज्ञा त्वरेने यावयाची जाहली आहे. तरी कूच करून जावें. दिरंग लावतां कार्यास येत नाहीं ऐसें म्हटल्यावरी त्याहीं उत्तर दिलें कीं या दिवसांत बुनगे माघारे बोलाविलें हें काय निमित्य ? एक वेळ तिकडून येता काय हवाल जाहाले, खल्या काय, खोचरे काय, उष्णाचे दिवस, चोरांचे भय, इतके असतां त्यांचे कृपेकडून येथपर्यंत सुखरूप आलों. आतां फिरोन जाईन म्हणतां ज्यामार्गें आलों त्यामार्गें जावयास वैरण मिळणार नाहीं. धान्य न मिळे. इतकेही असोन श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें जावें उचित. परंतु त्याहीं बोलावितां आम्हास व रा हिरदेसायांस बोलाविलें. त्यास ते तो मोहूस आहेत त्यांजकडे पत्रें व भला माणूस बोलाऊ पाठवावा लागतो. ते आलियावरी त्याचे विचारे जावयाचें करावें. दुसरे, रा भारतीचंद लष्करांत आले होते. ते राऊ साहेबांस दखल आहेत. त्यास बरें वाटत नव्हतें, ते मृत्य पावले. ते दिलगिरी जाहली आहे. वैशाख शुा १४ चर्तुदशीस शुधता होते तो पावेतो आपणास कूच करिता येत नाहीं. शुधता जाल्यावरी रा हिरदेसाहहि बोलाऊ पाठवितों. ते येतील तो राऊसाहेबास पत्रे लेहून पाठवितों. तेथून आज्ञा येईल तदनुरूप विचार कर्तव्य तो केला जाइल ऐसे बहुतच बोलिले. त्यास आम्ही जे जे रीतीनें सांगावयाचें ते सांगितलें कीं श्रीमंताची आज्ञा त्वरेने यावयाची असतां गुंतोन राहतां नये. परंतु मोठा अडथळा त्यास भारतीचंद याचा जाला आहे. यास इलाज नाहीं. प्रस्तुत त्याहीं रा हिरदेसाहजी यासहि पत्रें पाठविली आहेत कीं तुम्ही लवकर येणें. राऊ साहबांचे आज्ञेप्रमाणें जावे लागतें ऐसें लिहिलें आहे. परं(तु) या बुंदेल्याची स्थिरता कोणे विचाराची आहे ते विदितच आहे. त्यास यावयास किती दिवस लागतील न कले. याचा विचार या प्रकारचा आहे. आम्ही स्वामीचे आज्ञेप्रमाणे ते क्षणी स्वार होऊन यावें तरी येथून ज्या मार्गें आलों त्या मार्ग गोहदच्या मुकामास यावयास दहा बारा मजली आहेत. मार्गी खल्या; रान मवासाचें; तिकडुन येतां समागमे बुधेल्यांची फौज; दिवसाचे चालता जेथें अडचण होती तेथे ठाई ठाई चौक्या ठेवीत होतों, रात्रीस आम्हाकडील प्यादे व त्यांजकडील बरखंदाज आणून चौक्या बैसऊन चौकशी करीत होतो. तरी चोरट्यांचा उपद्व्याप सामान्य जाहला नव्हता, परंतु स्वामीच्या पुण्यप्रतापें हा काल संरक्षण करून आहों. ज्यामार्गें यावें तो मुलुक एकाची सरद आहे ऐसे नाहीं. वोडसे, दतीया, भदावर, बुधेले इतक्यांचा मुलुक. तद्

ठार गेले त्याविसीं सांगोन आणवणे म्हटले तरी एक आगास लाऊ न देई, ऐसा हा मुलुक ! यामध्यें बुंदेल्यांची फौज टाकून यावें तरी निभाव इतक्या बुनग्याचा कैसा होतो ? बुदेल्यांची फौज समागमें होती त्यामुळें भारदारीनें चालले. आम्हाबराबर फौज म्हणावयास एक रा। राणोजी भोसले कोठे जामदारीस अगर कामकाजास पाठवावयास व समागमे चालवावयास इतकेच, आणखी घोडे म्हटले तरी लष्करांत बहुतच आहे. परंतु कोठें पाठवावयास व समागमें चालावयास कोण्ही नाहीं ऐसा प्रसंग आहे. जरी मार्गाचे सुगम निभाव होईसा असता तरी बुदेले मागाहून येते. आम्ही यांस टाकून पुढेंच येतों. निभाव नव्हे यास्तव यास टाकून येतां नये. चारींदे जाहले आहे. त्याहीमध्यें स्वामीची आज्ञा कीं उभयता समागमे घेऊन येणे. त्यावरून टाकून येता नये. यामध्ये स्वामी आज्ञा करतील ते प्रमाण. रा॥ जगतराज याणी पत्र पाठविले आहे, त्याणी लिहिले असेल. त्यावरून श्रुत होईल. सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

¶*In this and the following letter Baji Bhivrao gives Bajirao full details of the activity of Chhatrasal Bundela's two sons, Hirdesa and Jagatraj. The dates of these letters cannot be finally fixed, until further light is obtained on the incidents referred to.*

No. 36] [*3-5-1737* ?

छ १३ मोहरम.

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री हिरदेसा व जगतराज यांस फौजसुधां समागमे घेऊन यावयाची आज्ञा. ऐशास रा। हीरदेसा तों मोहूस आहेत रा। जगतराज हजार दोनहजार व सभासिंग पाचसाशे स्वरानसी आम्हाजवळ आहेत. हिमतराऊ मागें आपल्या मुलकांत राहिले. उभयतांचा जमाव बहुतेक फुटोन जागां गेला. यांचा विचार ऐसा दिसतो कीं रा। हीरदेसा यांस बोलाऊ पाठविले आहे ते येतील तेव्हां त्यांचे आपले विचारे जे मसलहत ठराव होईल ते करावी. माघारे यावयाचे मानस कांहीं दिसत नाहीं. हा विचार आम्ही आपले जागा करीत होतो त्यास आजीच राजश्री रायेराया सदानंद डेऱ्यास आले. त्यांनी अंतस्थ यांचे वर्तमान सांगितलें की याच्या चितांत मघारे जावयाचें नाहीं. जमाव फुटला. हिरदेसा यास बोलाऊ रा। महासिंग पाठविले आहेत ते कधीं येतील तेव्हां जगतराज हे मिळोन विचार करतील. आधीं तो जाणे जरूर होईल. त्याहीमध्यें जरूरीस जावयाचा विचार केलाच तरी मागती फौज जमा करतील. फार जमा जाली

तरी दोन हजारपर्यंत माघारी जावयास निभावली तरी नकळे ऐसा विचार याचा आहे म्हणून सांगितलें. त्यावरून आमच्या विचारास व याच्या सांगण्यास गाठ पडली ऐसा याचा विचार दिसोन न आला. जरी धामोणीकडे जाणे होते, तरी बराबर आहेत हे येऊन निभाव करीतेच. माघारे म्हणता घाबिरे जाले आहेत. हे वृत्त सेवेसी श्रुत व्हावे म्हणून लिहिले असे. हे विज्ञापना.

No. 37] [2-5-1737

श्रीरामवरद

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

सेवेसी सेवक कृष्णाजी सिवदेऊ कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील क्षेम ता। वैशाक सुध चतुर्दशी मुकाम औरंगाबाज सुखरूप असों. श्रीमंत स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालो, ते पुणियास आलों. राजश्री अंतोबाची भेटी घेतली. त्यांणीं वर्तमान सांगितलें कीं ज्या कार्यास तुम्हास रवाना केले आहे, तो पैका येऊन पोहोचला. परंतु तुम्ही बऱ्हाणपुरास जाणे. आणखी ऐवज आला असेल तो घेऊन येणे. त्यावरून आपण औरंगाबादेस पोहोचलों. पुढें राजश्री राघोपंताची भेटी घेतली. सविस्तर वर्तमान त्यास निवेदन केले. उदयेक स्वार होऊन बऱ्हाणपुरास जातो. राजकी वर्तमान तर राजश्री राघोपंती वर्तमान सागितलें कीं, राजश्री पंतप्रधान याणी राजश्री राणोजी सिंदे व मल्हारजी होळकर आणिखी फौजा दिलीवर रवाणा करून चार पाच पुरे जाळून टाकिले. फौज दिलीहून युध्यास सात पाच हजार निघाली. युध्य बहुत जाहले. दोघे मातबर सरदार जिवेच मारिले. पाच सात हती व दोन तीन हजार घोडे हातीं लागले. येस घेऊन फौजेत दाखल जाले. येसे वर्तमान सावकारी आहे. निजामनमलुक रेवातीरी आहे. पार होऊन जाणार आहे. बऱ्हाणपुरास गेलियावर तथ्य वर्तमान सेवेसी लिहून पाठवीन. लस्कर सुखरूप आहे, समर्थाचे पुण्य विशेष आहे. येस घेऊन श्रीमंत येतात यास संदेह नाहीं. सेवेसी विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Shivdev writes to Chimaji Appa news of Bajirao's attack on Delhi and his subsequent encounter with the imperial forces at Talkatora on 29th March 1737.*

No. 38] [*3-5-1737*

छ १३ मोहरम

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे

सेवेसी

अपत्यें जनार्दनाने साष्टांग नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ ८ मोहरम मुकाम कोठरानजीक गंजघाट नदी धसाण, वडिलांचे आसीर्वादेंकडून येथास्थित असे विशेष. वडिली आसीर्वादपत्र छ २९ जिल्हेज सोमावलीचे मुकामीचें पाठविलें तें छ ६ मोहरमीं पावलें. कुशलार्थश्रवणें संतोषावाप्ति जाहाली. तुम्हीं रहिलीकडे गेलेससे उडतें वर्तमान कललें, त्याजवरून न येणें म्हणून लिहिलें होतें. यैशास तुम्हीं रहिलीस कैशास जाल? आलीकडेच असाल, लौकर येणें. राजश्री हिरदेसाह व जगतराज बराबर घेऊन येणें म्हणून * * * * * * * न पाठविली होती कीं आम्ही पांढार कोच सैदाच्या कोठ्ड्यावरून धामोणीच्या रोखें जात आहो. वडिलाची आज्ञा ये तावत्काल कधीं कूच कधी मुकाम करून वैरण पाणि पाहून चालत आहो. त्यास आमचे पत्र येकहि प्रविष्ट जाहालें नाहींसें वडिलाच्या पत्रावरून कलों आलें. 'रहिलीकडे गेला असिला तरी न येणें' हे पत्र आम्हांस पावलेंच नाहीं. हाली आज्ञा की उभयेता राज्यास समागमें घेऊन सत्वर येणें म्हणून, त्यावरून राजश्री विसाजीपंतास राा जगतराज यांकडे पाठविले होते. त्यांची बोली चाली जाहाली ते सविस्तर मारनिलेच्या पत्रावरून विदित होईल. राा हिरदेसाई तो मोहुसच आहेत. जगतराज आपल्या जमावानसी व सभासिंग पाचसांतशानसी आम्हाजवल आहेत * * राा विसाजीपंताच्या लिहिल्या * * * त होईल तदनरूप जे आज्ञा होईल तैशी वर्तणूक करून. शेवेसी शृत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardan (?) acknowledges receipt of the letter, written by the Peshwa, in which he was asked to come soon with the Bundele Rajas.*

No. 39] [*4-5-1737*

पौ छ २९ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री चिमणाजी पंडित

गोसावी यांसी

विनंती उपरी. प्रत्योत्तर पाठविलें तेथें 'नवाब उत्तर प्रांतीं जात आहे त्यास पायबंद द्यावयापेक्षां दुसरा मनसबा अधिकोत्तर आहे असें नाहीं. येथील

बंदोबस्ती करून लवकरीच वरते येत आहों, तवपर्यंत फौजाची तयारी राजश्री स्वामीस पुसोन करविली पाहिजे' म्हणून विस्तारें लिहिलें तें कळों आलें, अशास आम्हाकडील फौज तों तयारच आहे. परंतु राजश्री बाजीराव प्रधान यांकडील वर्तमान येथें आम्हास कांहीं कळत नाहीं. तुम्हाकडे तेथील वर्तमान वरचेवरी आद्यंत येत असेल, परंतु कांहीं आपण लिहून पाठवीत नाहीं. तर येविशीचा वृतांत विस्तारें लिहावा. खालील बंदोबस्ती करून वरते येतों म्हणऊन, तरी तेथील बंदोबस्तीचा विचार कसा काय आहे? पर्जन्याचे दिवस आले. फिरंगियाचा स्नेह संपादून वरते येणार किंवा निक्षेप[1] करून दिनप्रतीनें मोर्चे चालऊन स्थलें काईम करणार हा अर्थ लिहिला पाहिजे. राजश्री छ १४ मोहरमी श्रीचें दर्शनास सडेस्वारीनें गेलें. चवदावें रोजीं फिरोन येतील. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हें विनंती.

¶*The writer asks Chimaji Appa to supply him news both as regards his own campaign against the Portuguese and Bajirao's campaign in the North.*

No. 40] [*10-5-1737*

छ २७ मोहरम

श्रीरमावर

श्रीमंत राजेश्री पंत
प्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक रंगो शंकर व आबाजी गोपाळ सां नमस्कार विनंती. ता छ २० मोहरम पावेतो मो सिरोंजे सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. इकडील सविस्तर प्रतिपत्री सेवेसी लिहित गेलो. प्रस्तुत नवाब निजामनमुल्क का मजकुरी मो आहेत. स्वामीचे आगमन कोणे मार्गे होतो हे पाहतात. पुढे जो विचार होईल ते पावे. यार[2]महमदखान याजकडील वर्तमान तर प्रस्तुत याजबा आहेत. पुढे कोठवर घेऊन जातील ते पावे. रुपयाचा मजकूर तर पहिला वाइदा दिला. त्याउपरी येक रुपया दिला नाही. आम्ही बहुताप्रकारे अतिशये केला, परंतु देऊ मात्र म्हणतात. स्वामीचे आगमन या प्रांते जालियावर जे होणे ते होईल. प्रस्तुत रुपया देत नाहीत. वरकड सविस्तर पत्री लिहिता पुर्वत नाही. भेटीनंतर सेवेसी निवेदन होईल. मुलकात तमाम अमल बिघडला.

---

१ निकर्ष. २ भोपाळचा.

सेवेसी श्रुत होये. सिरोजचे वर्तमान राजश्री आपाजीपंती व त्रिंबकपंती लिहिले आहे त्यावरून सेवेसी निवेदन होईल. पा शाजापुर येथील वर्तमान तऱ्ही शहर टाकून निघाले. उजनीकडे गेले. येक दोन माणसे मारली गेली. बहुत नुकसान जाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Rango Shankar and Abaji Gopal inform Bajirao that the Nizam, having encamped at Sironj, was watching the movements of the addressee.*

No. 41] [*12-5-1737*

श्री

श्रीमंत राजश्री साहेब

अर्जदास्त अर्जदार बंदेगीबंदेकमीन कमतरीन बंदेशाह खेमामिरधे रामराम विनंती विज्ञापना. येथील क्षेम तागाईत वैशाख वद्य ९ गुरुवासर द्वितीय प्रहर साहेबाचे नेक नजरें करून खानाजादाचें वृत्त येथास्थित असें. विनंती. सांप्रत येथील वर्तमान तरी शहरचा व किल्ल्याचा बंदोबस्त तरतूद आपले जागां सावधानी फार करितात. तमाम सेकावत वगैरें ठाकर लोकांस श्रीजींनीं आज्ञा केली कीं बाहेर तुम्ही न राहणें, शहरांत येऊन राहणें. त्यास कितेक लोक शहरापासून लांब होते ते शहरांत न गेले. कितेकांनीं कोटानजीक डेरे देऊन राहिले आहेत. सेकावतांनीं डेरे उपडले नाहीं. श्रीजींनीं अर्जी केली कीं आम्हास सागानेर अथवा अमेर व जयेपूर या तिही किल्ल्यांतून येक जागा सतंतर आमच्या हवालें करणें म्हणजे साहेबचाकरीस बहुत सावध राहून बंदोबस्ती करुं; या प्रकारें विनंती केली. चादपोवल तागाईत सुरजपोवलपरियेंत बुरूज साठ आहेत. दर बुरुजावर तोफ येक येक चढवि(ली)ले आहेत. ठाकर लोक यांचे डेरे कोटा नजकि बरोबर नवद डेरें जाले आहेत. फौज सुमार दक्षणेचें अंगास आठ हजार पडली आहे. तमाम सेकावत चादपोवल हतोरीचा गढी हींत तीन हजार फौजेची चौकी आहे. येथें वरकड जागां नाकेबंदी जाली. येथे मोजदाद फौज सर्व वीस बावीस हजार स्वार आहे. साहेबाचे सेवेसी श्रुत होय हें अर्जदास्त. कालीं बुधवारीं रात्रीं दारु गोळी पंनास उट भरून सागानेरास पाठविली. तेथील बंदोबस्त फार आहे. येथें धारण जव सोळा सतरा शेर, व गहुं तेरा शेर, तूप दीड शेर, गूळ पांच शेर, तेलं च्यार शेर, मुगाची मठाची दाळ सा शेर, वजन कच्चे, दर रुपयाप्रमाणें बाजार निरख आहे. खुर्दा टके तेरा विकतो. तमाखू

रुपयासी दीड शेर विकत आहे. पाणें विड्याचीं दर रुपये च्यारशें व लांकडें दर रुपयास मण तीन घांस सरदोजी (?) दोन वजन दोन मण त्या प्रकारें शहरांत भाव आहे. सेवसी श्रुत होये हें अर्जदास्त.

¶*The messenger Khema gives news of the disposal of the enemies' forces, probably in view of a decisive action.*

No. 42] [*19-5-1737*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
श्वामीचे शेवेसी

विनंती; सेवक जगनाथ वैजो कृतानेक सां नमस्कार विनंती. ता जेस्ट शुध १ पर्यंत श्वामीच्या कृपावलोकनेकरून कुरवाई भोरासियामध्यें सुखरूप असों विशेष. या तालुकियाचें वर्तमान येकदोनदां सेवेसी लिहिलें त्यावरून शृत जालें असेल. सांप्रत आपाजीपंती व त्रिंबकपंती पत्रें लिहिलीं त्याबराबर पत्र पाठविले तें सेवेसी पावलें असेल. निजाम सिरोंजेसंनिध आलियावर आपाजीपंत व त्रिंबकपंत निघोन गेले, फिरोन आले तें वर्तमान त्याहीं लिहिलें असेल. सिरोंजेस निजाम आलियावर या प्रांतीचे तमाम जमीदार भेटोन मुलकांत फितवा केला. रुपया तों काहीं दिल्हा नहोता. त्यावर हें पुट जालें. आम्हीं याच्या सलुखे यापासी राहिलों. बाहेर जावें तों दुसरें ठिकाण नाहीं यास्तव राहिलों. इतकामात्र आम्हांसी सलुक राखिला. श्वामीच्या आगमनाचें वर्तमान यैकोन परम आल्हाद जाला तो कोठवर लिहावा! अतां सर्वाच्या पारपत्याबराबर यांचेहि होईल. पैंकाहि वसुल होईल. निजामापासी फौज मऱ्हाटे हजार पांचसाहापर्यंत व त्यांची फौज पंधरा, येकून वीस बावीस हजार आहे. त्यामध्यें लोक रजावंद नाहींत. तमाम दक्षणेस जाणार. परंतु श्वामीच्या आगमनेंकरून तटस्थ होऊन बैसला आहे. आपली फौज दाहा वीस कोस पुढें गेलियावर दो चौ हजारांनसी दिलीकडे जाणार; बाकी फौज माघारीं जाणार. जमीदार आपलाल्या ठिकाणीं जातील. इतका जमाव करावयासी प्रयोजन, आपलें आगमन मार्ग धरून जालें यास्तव. बहुत काये ल्याहावें हे विनंती.

¶*Jagannath Vaijo informs the Peshwa of the arrival of the Nizam at Sironj and the trouble started by him.*

श्रीमार्तंड

श्रीमत् माहाराज राजश्री
आपा साहेब स्वामीचे सेवेसी

विनती. सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक सां नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ २ सफर मुाा उमरावती प्रात वराड माहाराजाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञेप्राा राा आऊजी कवडे यासी कुकडमुढीयावर येऊन सामील जाहालो. तेथून दरकुच वराड प्रांतास आलो. राजश्री आऊबास पाच सात बेला खडेगणती जोहारास उभे राहून, चौदाश्या स्वाराची दिल्ही. त्यापैकी च्यारसे करोल व हजार आड हत्यारी व भालेकरी याप्राा दिल्ही. गोठगणती च्यार हजार घोडे भरले. याखेरीज आपले निाा सिलेदार पथके राा संताजी मोरे व सटवोजी करंडे व येद्याजी सतकर व लक्षुमणजी बिन सिवाजी करडे याची गणती निरालीच सतंतरच दिल्ही. व आम्ही आपले जागा फौज जोहारास उभी राहाते तेव्हा रोज दर-रोज खडेगणती घेतच आहो. गणतीस तिलमात्र अंतर पडो देत नाही. जैसी जैसी गणती घ्यावयाची, तैसीतैसी घेतच आहो. तिलमात्र अंतर सेवकापासून पडणार नाही. स्वामीनी आपल्यास येक लक्ष रुपये, याखेरीज संताजी मोरे व सटवोजी करंडे व येद्याजी सतकर व दर्याजी सतकर व लक्षुमणजी करडे याजला वराता देविल्या. त्यास राा आऊजीबावानी उतर दिल्हे की, वराड प्राती गेलियाउपरी आधी तुमचे पदरी पैका घालू. त्यास इाा मलकापुरापासून ताा नागपूरपर्यंत दोन तीन लक्ष रुपये प्राप्त जाले. परंतु आम्हास व आमचे निाा सिलेदारास येक रुपया पावला नाही. त्यास आम्ही दोन च्यार वेला रुपयाचा उलेख केला. त्यानी साफ जाब दिल्हा की, आपले कर्ज वारून, लोकाच्या आपल्या समजाविसी जाली (या) वेगल, तुम्हास पैसा द्यावयास मिलत नाही. तुम्ही हुजूरची पथके आहा. तुमचे कर्ज खावंद वारतील. यैसी साफ उतरे दिल्ही. व तुमच्या लोकाची समजावीस खावंद करितील. आम्ही त्यासी कजिया करावा तरी स्वामीचे सेवक. बेकैद करावी, हे गोस्ट आपणापासून व्हावी यैसे नाही. स्वामीजीचे परवरदो[१] आहो. त्याप्राा कैदेने वर्तणूक करावी.

---

१ पोष्य.

स्वामीनी करोलास व शगीर्दपेश्यास पागेस व भोई जासूद यास दरमाहा च्यार हजार रुपये नेमून दिल्हे. त्यास येक रुपया दरमाहा रोजमरियास दिल्हा नाही. भोई यास व जासुदास व पागेचे जडीप आढलाचे बारगीर व करोल मातबर आढलाचे स्वामीच्या ठेविले त्यास महिने बाधून दिल्हे, ते दरमाहा दिल्हेच पाहिजेत. येक दिवस आधीक जावयास कार्यास नये. येथील विचार. तो येप्रकारचा. पैसियास ठाव नाही. मग रा आवजी कवडे याजकडे जिवाजी गायेकवाड सिलेदार आहेत त्यास याणी समजावीस वीस हजार रुपये दिल्हे. त्याजपासून आम्ही कर्ज बारा हजार घेऊन, व आपल्या लस्करात सिलेदारास बक्षिसे कडी सोन्याची दिल्ही होती ती घेऊन, अजीपर्यंत थोड्याबहुताने रंग राखला. पुढे रा भास्कर[1] हरी व कृष्णाजी आटोले व आलीखान वगैरे सरदार याची फौजेसी घाट घातली. उजवे बाजूस आमची फौज करार केली. आम्हासमागमे सताजी मोरे व राघो कृष्ण व आपली फौज यैसी येक टोली केली. डावे बाजूस पदमोजी जाचक व आणिखी हुजरातची पथके व रा आऊजी कवडे याणी आपली काही फौज देऊन मधे आपण फौजेनसी आपले राहिले. त्याचेहि फौजेच्या तीन टोलिया जाल्या होत्या. आमचे विल्हेस आलीखान व गावडे वगैरे फौज होती ती मोडून तीन कोसपर्यंत तगी लाविले. मधे भास्कर हरी होते ती फौज रा आऊबानी याप्रा माडली. हाती व घोडे व नागारे व पालख्या कूल घेतले. डांवे बाजूस पदमोजी जाचक याच्या मुकाबलियावरी कृष्णाजी आटोले होते त्याणी पदमोजी जाचक यासी मोडले. दोबाणाची खांचपर्यंत पदमोजीबावास तगी लाविले याजमुले भास्कर हरी याचे बुलगे[2] वाचले. नाही तरी मोडून लुटून भयाभंगास नेले असते. आणि युध्यापासून तीन कोसपर्यंत बुलगे मागे टाकिले होते. त्यामुले व पदमोजीबावानी मोड खादला यामुले बुलगे वाचले. नाही तरी लुटून पस्त केले आसते. त्याजवरी कूच दर कूच पुढे देवगड प्रांच्या मजली चालिलो. मागोन भास्कर हरी सडे होऊन देवगडकर मोगल व खंडागले यैसे पंचवीस हजार फौजेनसी येऊन, बोली घातली की, आपले हाती आपणास देणे आणि तुमची आमची भेट होऊन, पुढे जो मनसबा करणे तो करू. ते गोस्ट रा आऊजीबावाच्या चितास न येता मागती युध्यप्रसगास सिध जाले. मागती पहिल्याप्रा तीन टोलिया त्यानी केल्या. आम्ही आपली टोली दोबाणाची खाच मोडून माघारी घातली. डावे बाजूस पदमोजीबावानी व रा आऊजीबावानीहि सिकस्त खादली. यामुले सारे फौजेचा

---

१ पटवर्धन ?   २ बुणगे.

घाणा होऊन येक प्रहर युध जाले. मग रा। आऊजी कवडे व पदमोजी जाचक वगैरे फौजा पळोन गेल्या. आपली फौज दोन घटिकापर्यंत भाडत होती. तिन्ही टोल्या येक होऊन आम्हावरी मिठी पडली. तेथे आम्हाकडील मातबर लोक व रा। राघो कृष्ण व माळजी कोलते यैसे ठार पडले. घोडी फार ठार पडली. आपली खराबी फारसी त्यामुळे जाली. जोतियाजी चौधरी व हैबतराव बिन शाहाजी सिंदे व भवानजी महाडीक व भगवतराव काळे व बापूजी तावरे यैसे मातबर सरदारच ठार पडले. याखेरीज दाहा वीस आसामी अढलाचे व करोल तीस चालीस आसामी ठार पडले. बावीस घोडे ठार पडले. गेली घोडी त्याचा सुमार नाही. रा। माळजी कोलते यानी भाऊबंदसहवर्तमान पंचवीस असामी यानसी सिपाईपणा अतिशयेसी शर्तीचा केला. तो ईश्वरे इमानात बैसोन पाहावा. परंतु ईश्वरे त्याचे मोठेसे वाईट केले. त्याचे चालवावयास माहाराज समर्थ आहेत. पुढे युध्यप्रसंग जालियाउपरी रा। आऊजी कवडे याची फौज वराड प्रांतची व बालेघाटची होती ती तमाम पळोन गेली. आमचे वळणचे लोक यानी पळोन मागती कोठे तोड दाखवावे? यामुळे तैसेच राहिले. त्यावरी आलीकडे आजी तागाईत चाकरीस आऊबाचे आज्ञेखेरीज तिळमात्र अंतर करीत नाही. परंतु आऊबापासून येक रुपया प्राप्त होत नाही. अजी तागाईत आठा दाहा हजार रुपये सा साता महिनीयांत पडले. पान आदा जाला आहे. येवढी सरदारी महिनेमाहाल लोक कैसी जिनगानी रक्षावी? कर्जदाराचे कर्ज वारावयाची फिकीर आम्हास काये आहे? माहाराज समर्थ आहेत. परंतु आम्हास पोटापाणियास वस्त्रापात्राचे हाल येऊन पडले आहेत. युध जालियाउपरहि रा। आऊजीबावास नागपूर व देवगड वगैरे पैका मिळावयाचा तो मिळाला. परंतु ईश्वरे त्यास आम्हास द्यावयास बुध दिली नाही. देवगडचे हाती दोन व घोडी उटेहि काही प्राप्त जाली. आपल्या लोकाची पडली घोडी कोणाकोणाची दिल्ही. परतु आम्हास येक पैसा आगर घोडे उट दिल्हे नाही. आमच्या लोकानी रुबुरू पडले घोडे त्यासाठी हैराण दररोज करितात. स्वामीनी आम्हास कोणीकडे नेमिले आणि कोणीकडे येणे जाले; त्याचा परिणाम सेवट कैसा जाला. त्याहीमधे आऊबाचे सोबतीचा येक दिवस येका युगासमान आहे. योगभ्रस्ट, आविवेकी, आप्रमाणिक, बोलल्या बोलाचे शाश्वत नाही. बरे ज्याबा। जावे त्याचा बोभाट खावंदास ल्याहावा, यैसे नाही. परंतु हे सरदार थोर प्राक्तनाचे बळवत आम्हास मिळाले. तेणे करून आमचेहि उर्जीत उतम जाले. बरे खावंदाचे पाये समर्थ आहेत. वर्षाप्रा। याची बुधी आहे, यैसे नाही. याचे

बुधीस भ्रंस जाला. चाकरी मोरचीयात व गावखेडियास करणे ते करितच आहो. आणि युधातहि करणे ते केली. परंतु बेबूज कारभार फार आहे. सेवसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Letter from Antaji Mankeshwar to Chimaji Appa from the camp of Avji Kavde whom Antaji was deputed to accompany. Antaji details the bad treatment he received from Avji Kavde. They had even come to blows.*

No. 44] *[21-5-1737?*

श्री

छ ११ सफर दोनप्रहर

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

श्रीमत सकलगुणालकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनती. येथील क्षेम छ ९ सफर रविवार प्रहर रात्र परियेत येथास्थित आसे. यानंतर काली नबाबाची भेटी जाहाली. आजी प्राथःकाली सिरपाव व घोडी * * * * * * दोन दिल्हा. * * * * * * * * कूच होऊन नवेसराई आलीकडे मुकाम नेमला आहे. दक्षण कचेरी व मऱ्हाठे यासीहि निरोप दिल्हा. त्याजसमागमे चिरंजीव आपास[1] दुराहीपावितो जाणे म्हणून सांगितले. त्यास उद्याचा दिवस आम्ही मुा येथे करितो. आपण दु गाहा पुढे गेले असतील तरी गडोल्यासन्निध मुकाम करावा. दाणादुणा डावे हाते कटारियाच्या मुलकांतून आणवावा. रोहिल्याच्या मुलकास तूर्त उपसर्ग न द्यावा. रोहिल्यानी पैका एक हप्ता निशा करून देणार आहेत. वरकड कितेक वर्तमान भेटीनतर निवेदन करीन. आपण नवाबास वस्त्रे पाठविली होती ते गुजरानली. आपल्यास सिरपाव पाठऊन देत आहेत. उदैक आम्हाजवली येईल. आम्ही शेवेसी येऊन पोहचोन तोवरी मुकाम केला पहिजे. भेटीनंतर जो विचार करणे तो करावा. विदित होये कृपा केली पाहिजे हे विनंती. चंदेरीकरहि पैका कराराप्रा द्यावयासी सिध आहे. एक जोडी जासुदाची त्याच्या गावास पाठविली आहे. कलले पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao : communicates to him details of his interview with the Nizam, and asks him not to settle further plans until they meet.*

---

[1] सटवोजी जाधव.

No. 45] [30-5-1737?

श्री

राजश्री पंत प्रधान गोसांवी यासी

श्रीमत सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दडवत विनंती. येथील क्षेम ताा छ ११ सफर प्रहर दिवस परियेंत क्षेम असे विशेष. नवाबाचे आजी कूच होऊन कालापाणी कचनाराआलीकडे मुकाम जाहला. रात्री राजश्री आनंदराऊ पंडित सुमत यासी बोलाऊन नेऊन आज्ञा केली की आपण कूच दरकूच जात आहों. नसीरदौला व मराठे याचा कूच छ १४ तेरिखेस होईल. तोवरी दोन दिवस आम्हास मुकाम करावयासी सांगितले. कूच जाहालियानंतर चिरंजीव आपास घाटापावतो समागमे देऊन आपल्या दर्शनास आम्ही येऊन तो परियेत दोन दिवस गुंता जाहला तरी उतावली न करणे, म्हणून बहुत प्रकारे लिहिले होते. त्याची चिठीच पाठविली आहे त्यावरून विदित होईल. दोन दिवस आम्हास तो राहणें लागलें. याचा फासाठी तोडून टाकितो. आपला लस्करचा मुकाम पटारीच्या नदीवर जाहला म्हणून वर्तमान आलें. यैसियासी अजम यार महमदखान याची भेटी जाहाली. त्यानी बहुत प्रकारे आपल्या शेवत स्नेहाचाच अर्थ निवेदन केला. पका करारप्रा न पावला सबब पैका वसूल करून सावकाराचे घरी ठेविला होता तो तुमचा जाहला. तोच आपण खर्च केला. तुमचा पैका देणे जरूर आहे. गावास जाऊन तरतूद करून निकाल करून, शेवेसी पाठवितों. कमाविसदारास पुढें भूपालास पाठउन देतो. मुलकास पहिलेहि उपसर्ग लागला. खराब जाहला. मोगलाचे फौजेच्या दलवटामुले खराब जाहला. सांप्रत जो मुलुक आसुदा राहिला त्याच मुलकात लस्कर आले खराबी होईल पैसा मुलकावरी आहे. रयेतीस आजार न द्यावा. हंगाम लावणीचा आहे, यास्तव लस्कर येकीकडून काहाडावे म्हणून बहुत प्रकारे विनंती केली. आपल्या करारात अतर पूर्वीहि केले नाही; पुढेहि न करान म्हणून सांगितले, त्यावरून लिहिले आहे, तरी रोहिलियाच्या मुलकास उपसर्ग न लागे ते गोष्टी करावी. रयेत खराब जाहालियाने नुकसानी होते, यास्तव ताकीद उतम प्रकारे करावी. मोहनलाल सेवेसी पाठविले आहेत. रा. आपाजी जिवाजी व त्रिंबकराज

श्रीपांडुरंगचरणीं
दृढ भाव चांगोजीसुत
पिलाजी जाधव.

देव दोन प्रहर रात्रीं आले याचे व सुरंजकर जमदार याचे वर्तमान मनास आणून शेवेसी पाठऊन देऊन. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, giving news of the Nizam and his interview with Anandrao Sumant.*

No. 46] [*May 1737*

श्री

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक सां नमस्कार विनंती. प्रार्थना यैसीजे. श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान बऱ्हानपुरावरी आलियावरीं वरचेवरी पत्रे येतांत कीं, रयेतीस काडीचा उपद्रव न देतां तुम्ही वराड प्रांती मोगलाईचा अमल बैसवणे. त्यास राजश्री अवबाची[१] क्रिया ठिकाणीं नाहीं. जे गावीं कौल द्यावा, पैका घ्यावा, तेथे इमान देऊन झाडा घ्यावा, सेवटी गाव जाळावा, हे पाप अतिशये जाले. गाईचे वळीत वगैरे पाप लस्करात फार. या पापास्थव लस्करे बुडाले व पुढें प्रस्तुत अमल बसवावयाचा प्रसंग आला तों कुणबियाच्या इमानास काडीमात्र रजावंद नाहीं. येकहि ठाणें बसत (नाहीं). ज्या गावांस जातों तेथे याजला काणी बधत नाही. रयेतीचा फारसा बेंदुवा याचे पदरी पडला तो कांही लिहिता पुरवत नाहीं. त्या पापांचे सोबती आम्ही; सर्वस्वे फकीर जालों. पुढें कर्ज तैसेच राहून स्वारीत पोटाचे कर्ज उलटे जालें. पुढें रजपूत करोल दोनसे आहेत. पेंडगाव व नगरकर हलालखोर त्याचे पंचवीस माणूस ठार पडिलें. खराब जाला. त्याणी चाकरीच केली. मृगसाल होतांच समजाविसीमुळे कजिया करणार. अऊजीबावानीं सारें वराड पालथे घातलें. लस्करात ताकीद काडीची नाहीं. ताकीद करून मागती झाडा घ्यावा. जे आहे ते बरेंच आहे. वरचेवर श्रीमंतांची पत्रें योविसी येतात कीं, काडीचा उपद्र(व) रयेतीस न देणे. परंतु ते होत नाही. पुढें ठाणे काही याचे हाती येक लागत नाहीं. प्रस्तुत अलंजपुरावरीं आलें आहेत. तेहि होत नाहीं. आम्हास रा अऊबानी चौदा परगणे ठाणी बैसवावयास दिल्ही. त्यांस आपल्या इमाने तमाम ठाणी बैसविली. परंतु रा बाबाचे येक ठाणे बैसत नाही. सेवटी

---

१ अवजी कवडे.

आम्हासहि प्रस्तुत आज्ञा करितांत कीं, तुम्ही ठाणी सोडणे. आम्ही येजमान स्वामीस बऱ्हानपुरास विनंतीपत्र लिहिले आहे. उतर आलियाप्रों वर्तणूक करून. आपासाहेब, मजला कोठे रवाना केले आणि पुढें कोठे आणून घातले ? माझी जोड ते माहाराजाचे पायें. येवढें कर्ज, लोक किती, खर्च केवढां, कैसे करावे हे कलत नाही. मी केवल खिजमतगाराप्रा सेवक. माझी इमारत माहाराजांची आज्ञा. ज्या सरंजामावरी येवढें ढाल केले त्याचा परिणाम कोणीकडे जाला बरें ? सर्वा गोस्टींचा निर्वाह करणार माहाराज समर्थ आहेत. सारे आऊबाच्या लस्करात माझे खराबीप्रा खराबी येवढी दुसरियाची नाही. पुढें स्वामी समर्थ आहेत. मजला चिंता काये आहे ? कोणास वरात सेतसनद मागे देविली होती त्यातहि निमे देविले म्हणून कलले. तरी यैसे न पाहिजे. याउपरी ताकीद करून देविले पाहिजेत. घरी तीनच्यार लग्ने होती. बेगमीचा विचार कलतच आहे. इकडे प्रसं(ग) ये जातीचा आहे. त्यात चितास येईल ते करावे. रा अऊबाची काये निमत्य लिहिली म्हणाल तर लिहिल्याचे चौपट त्याची वर्तणूक जाली. आम्हास अतिशये ये सोबतीने बेजार केले. चाकरी लस्करापेक्षां येकांग्या करून खराब होऊन नाचीच जाले. सार्थक नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. रा राघो कृष्णांच्या मुलाबालाचे सर्व प्रकारें चालवावें. राघोपंत आम्हापासीं सम्मुख परम संकटी मृत्य पावला आहे. हे विनंती.

¶*Antaji Mankeshwar to Chimaji Appa : complains bitterly about Avji Kavde and asks redress. One Ragho Krishna, he adds, fell fighting and his children deserve to be rewarded.*

No. 47] [*3-6-1737*

श्री

पुरवणी राजश्री बापूजी पंत स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. तीर्थरूप राजश्री राऊ भदावरास गेले. तेथील खंडणी केली. आण पुढे चालिले. भदावरकरानी खंडणीचे रुपये द्यावे तो सादतखान समीप आलेसे पाहून त्यासीं राजकारण कडून ते व हे येक हाती व्हावेसा विचार केला. आण रुपये द्यावे त्यास नौदिगेर[१] मांडिला. हें वर्तमान कलतांच तीर्थरूप राजश्री राऊ याणी सडी फौज करून शहरावरी चालोन घेतले आपण शहर घेऊन भदावरच्या कोटास मोर्चे लाविले. तेव्हा भदावरचा राजा बाहेर येऊन भेटला.

---

१ अडथळा.

वीस लक्ष रुपये खंडणी कबूल केली आण पंधरा लक्ष रुपये वसूल दिल्हा. पाचा लक्षाच्या वोली दिल्या. तदनतर कूच करून सवाई जयनगराचे रोखे यमुनातीरास गेले. तो सादतखान यमुनानजिक आला, हे वर्तमान कलतांच सडी फौज करून राजश्री पिलाजी जाधवराऊ व मल्हारजी होलकर आदिकरून यमुनापार केले. त्याचे व याचे युध्य जाहाले. थंडे केले. बाण फौज सहवर्तमान आलाड आले. सादतखान यमुनापार होऊन आगऱ्यानजीक शहर पाठीसी घालून राहिले व खानदौराहि मागाहून आले ते व सादतखान येक जाहाले हे वर्तमान कलतांच तीर्थरूप याणी बुलगें बुंदेलखंडास रा करून सडे फौजेनसी लाब लाब मजला करून दिलीसंनिध गेले. पुढे जावे तो शहर पुरातन आद्यस्छान. त्याहिमध्यें येवनाधीश सुलूक करावा हे इच्छा धीरतात. यास्तव लस्करास ताकीद करून पुरे जालू दिल्हे नाही. परंतु पातशाहास बहुत गडबड होऊन शहराची बंदोबस्ती करावयास लागले. आण आमचे फौजेचे तोडावरी खास चौकीचा सरदार कोका व सिवसिग वगैरे पाचसात हजार फौजेनसीं पाठविले तो तीर्थरूप याणी कूच केले की आद्यस्छानास उपसर्ग समीप राहिलियाने लागतो. यास्तव ती कोसावरी शहरानजीक राहावे म्हणोन चालिले तों गनीम पाठीवरी आलासे पाऊन चालोन घेतले. सिवसिग मारिला. कोक्यास जखमा लागल्या. पांच सातसे घोडे घेतले. कोकाहि शहरात गेलियावरी मेला म्हणोन वर्तमान आले. पुढे भदावर प्रांते तीर्थरूपानी यावयाचा विचार केला तों कमरदीखान आडवे आले. त्याचे व याचे युद्ध जाले. सेपनास घोडे व येक हाती कमरुदिखानाचे घेतले. तो बातमी आली कीं सादतखान व खानडौरा सा कोसावरी आले. त्याहिमध्ये रात्र जाहाली यास्तव कमरुदिखानास सो(डून) भदावर प्रांते आले. बाकी साकी राहिली तेहि वसूल करून बुदलखंडा (स) येणार आहेत. आले असतील जाणिजे छ १९ सफर.

¶*This is a news-letter giving details of the battles first with the Chief of Bhadavar and then with Sadatkhan. The Chief of Bhadavar, who tried to defer payment of the tribute agreed upon, had to be compelled to pay at the point of the bayonet. Sadatkhan upon being driven across the Jumna by Pilaji Jadhao and Holkar, wanted to combine with Khan Dauran. But Bajirao took some picked men with him and by forced marches appeared all of a sudden within a few miles of Delhi. A battle was fought and Bajirao succeeded by means of guerrilla tactics in tempting the enemy to pursue him and then turning suddenly upon him. Shivsing and Koka, the Moghal sardars, were killed in the action.*

No. 48] [4-6-1737 ?

छ १० सफर दोन
प्रहर

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसांवियांसी

ॐ श्रीमत् सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम. ताा छ ८ सफर मुाा सुरूंज येथास्थित असो विशेष. छ ६ रोजी आपली आज्ञा घेऊन स्वार जालो. ते आजी शनवारी चौ घटिका दिवसां प्राथकाली मुकाम मजकुरी दाखल जालो. नवाबाची भेटी जाली. बहुत आदर करून खेशावख्त[1] जाहाले. कितेक ममतेच्या विचाराच्या गोष्टी सांगितल्या त्या भेटीनंतर विदित होतील. छ १० मोहरमी+ नवाबाचे कूच होऊन, पुढे जाणार आहेत. आम्हीहि निरोप घेऊन तेच दिवसी स्वार होऊन. आपणहि जयसिंगनगराअलीकडेपलीकडे त्याच मुलकांत असावे. यारमहमदखानाकडील रुपयाचा हफ्ता तूर्त देतो यैसे म्हणतात. त्यास रुपयांची निशा त्याजपासून करून घेऊन, परंतु फौज त्यांच्या मुलकात गेलियाने पूर्वीहि उपद्रव फारच लागला आहे आणि याउपरीहि आजार[2] लागलियाने अतिशयेसीच खराबी होईल. याकरिता त्याच्या मुलकास आजार लागो देऊ नये. लस्करास दाणावैरण सागरच्या मुलकाभोवते [येथें शिक्का] आसेल तेथून कुरवाईकरांच्या मुलकातून आणविले पाहिजे. आम्हीहि सत्वरीच येऊन आपणासन्निध पोहचोन. विदित जाले पाहिजे. चंदेरीकरास व कुरवाईकरास व यारमहमदखानास ताकीद केली आहे की, कुल[3] पैका झाडियानिसी देणे. आम्हांसहि सांगितलें कीं, राजश्री रायाजवळी विनती करून, पंधरा दिवसा महिन्याच्या आवकाशे पैका मागे पुढें घेत ते करणे. त्यावरून यारमहमदखानानी पैका द्यावयाचें केले आहे व आम्हासी भेटीचा उद्येसै[4] करीत होते व चिरंजीव राजश्री आपास[5] डेरियास बोलाऊ पाठविले होतें. त्यास आम्ही हाच जाब दिल्हा की, विना पैका आल्याखेरीज,

---

१ खुषी. + मोहरमच्या ऐवजीं सफर पाहिजे. २ उपद्रव.
३ सर्व. ४ इच्छा. ५ पिलाजीचा मुलगा सटवोजी.

तुमची आमची भेटी होणार नाहीं. त्यावरून उदैक पैका द्यावयाचा इत्यर्थ केला आहे. उदैक वर्तमान होईल ते लेहून पाठऊन, विशेष काय लिहिणे हे विनंती. [मोर्तब]

¶*Pilaji Jadhao to the Peshwa, communicating to the latter his interview with the Nizam.*

No. 49] *[8-6-1737*

छ १३ सफर
प्रहर रात्र

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसांवी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १३ सफर जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपले लस्करचा कूचमुकामाचे वर्तमान कालपासून कलले नाही. आपले लस्कर कोणे स्थली आहे पुढे कोणत्या सुमारे येणार, हे लिहून पाठविले पाहिजे. येथील वर्तमान तर नवाबाचा काली मुकाम शाहाडौरावरी जाहाला. आजी बढाडोंगर येथे गेला. आनरुलाखान दिवाण माघारा जाणार. त्यास निरोप आद्यापि जाहाला नाही. तो लस्करातून येई-तोवरी मऱ्हाठे आवघे लस्कर खोलंबले आहे. छ १४ मिनहूस येथून कूच होणार त्यास दिवाण आला नाही याकरिता खोलंबा होईल की काये पाहावे. याज * * दोन मजली पावते करावे. मग आम्ही आपण * यावे. यामुले दोन च्यार दिवस गुता जा(हाला). याचे पुरोड[1] लांबल्याखेरीज, आपले ल(स्कर) वेत्रवती उतरून आलीकडे येता नये. * * * खातील. यास्तव दोन दिवस भोवराशासन्निध मुकाम करावा. तेथील कार्यभाग निर्गम करून घ्यावा. आहीरवाडियातील कमाविसदार आले असतील, त्याचाहि काये तो निर्गम करावा. सुरंजेचे कामाकाजाचा विचार, प्रस्तुत तों लस्कर शाहारात राहिले. हे गेलिया उपरी लस्कर सन्निध आल्याने, आपले विचारे, जे होणे ते होईल. रयेतीचा आन्याये नाही. ज्याणी लबाडी केली त्याचे पारपत्य करावें. वरकड स्थलचे कमाविसदार भेटीस आले असतील.

श्रीपांडुरंगचरणीं
दृढभाव चांगोजीसुत
पिलाजी जाधव.

---

१ मूळ अर्थ पुरांतील राड. येथें सैन्य व सैन्याबरोबरील खटले हा इत्यर्थ.

खे[1]ची तों नवाबाबराबर गेले आहेत. हा (गुं)ता उरकला. याउपरी जो विचार करणे तो करावा लागेल. सुरंज डावी टाकून उजनीचे सुमारे जावयाचे विचारे जाहाले तरी उतम. आवब्यावरी दबाव पडोन कामाकाजाचा निर्गम होईल. लस्कर मोगलाचे माघारे जाते. याचा वस[2]वास तुटेल. यास्तव पुढे आपण मनसुबा योजला असेल, तो लिहून पाठविला पाहिजे. रा। बाबूराऊ यासहि शेवेसी पाठ-(ऊ)न देतो. वर्तमान सविस्तर निवेदन करितील. त्यावरून श्रुत होईल. जैसी आज्ञा येईल, तैसी वर्तणूक करून. विदित होये. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao in the Delhi expedition : communicates that the Nizam has moved towards Budha Dongar and asks him to proceed with Bundela chieftains.*

No. 50] [*About June 1737 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

पोष महिपत आनंदराऊ सां नमस्कार विज्ञापि. येथील क्षेम स्वामीचे कृपे-करून येथास्थित असे. शाहाजानाबादेहून वर्तमान आले की, पातशाहाचा व नवाबाचा शपतपूर्वक स्नेह जाला. कुरा[3]न दरम्यान दिल्हे. राजश्री बाबूराव मल्हार यास पातशाहाच दर्शन केले. हस्ती, जिर्गा[4], वस्त्रे, अस्व, सिरपाव जाला. सविस्तर वृत्य परस्परे निवेदन जाले असल. नवाब लौकरच रुकसं[5]त होऊन येणार. इरानचे पातशाहाची मोहीम जाली आहे. काबूल, खंदार, गजनी वगैरे च्यार सुबे घेतले. पुढे चाल करितात म्हणोन वदंता. यास्तव नवाबहि फौजबंदी करून त्याचे पारपत्यास जाणार म्हणोन वर्तमान आले आहे. राजश्री रघूजी भोसले पैठनपर्यंत आले. गंगा उतरून पुढे माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी जातात. विदित होये बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Mahipat Anandrao Sumant writes from Delhi to the Peshwa about the friendly understanding that was effected between the Emperor and Nizam-ul-mulk.*

---

१ खेचीकर सरदार. २ संशय, भीति. ३ कुराणाचें इमान प्रमाण झालें.
४ पागोट्यावर बांधावयाचा रत्नालंकार. ५ निरोप घेऊन येणार.

No. 51] [June 1737 ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजेश्री विष्णुपंत
स्वामीचे सेवेसी

पाो नारो व्यंकटेश कृतानेक सांा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. स्वामीकडून पत्र येऊन पराम्रस होत नाही; तरी यैसे न करिता आहिर्णिसी पत्री सांभाल करीत जावा. श्रीमंतांची छावणी तिकडे हिंदुस्थानात होणार म्हणून आइकतो. त्यास इकडे येणे होते किंवा नाही हे साद्यंत (वृत्त) लिहिल पाहिजे. आम्हास तो सर्व भरोसा आपला आसे. बहुत काये लिहिण, लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*Naro Vyankatesh asks Vishnupant whether Bajirao was going to spend the next monsoon in North India.*

No. 52] [June 1737 ?

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान गोसावी
यासी

विनंती उपरी. पाा सुरूंज येथील रयत तजावेजा[१] जाली होती. त्यास आम्ही कौले[२] देऊन राखिले आहे. लस्कर इकडे येईल तेव्हा गीर्दनवांई[३] गाव लुटले जातील. याकरिता राा आपाजी जिवाजी यांकडील कारकुनासमागमें पनास पाऊणसें राऊत पाठऊन गावोंगाव व शाहारची रखवाली करविली पाहिजे. चौरासी सुरुंजवाला याजलाहि बोलाऊन आणिले होतें. त्यास हिसेबी पैका निघेल तो त्याणी द्यावा हा त्याचा करार आहे. व शाहारांत कमाविस-दारांकडील कारकून चौऱ्यावरी आसते म्हणिजे रयत वसवसा[४] न खाती. तरी येक कारकून व कौल पाठविला पाहिजे. व चौऱ्यासीसहि कौल आपला येईल तरी तो शाहां(रात) राहील. नाही तरी तो मुले माणसे घेऊन पलोन जाईल. आपण खावंद आहेत. सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिले आहे. शाहारचे लोक पलाले म्हणिजे शाहार राहणार नाही. कलले पाहिजे. विशेष काय लिहिणे ? हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao : writes about the condition of Sironj.*

---

१ तजावजा होणें = घाबरणें. २ अभय. ३ सभोंवतालचे. ४ भीति.

No. 53] [10-8-1737

श्रीवेंकटेश

श्रीमंत सदायेशवंत धर्मपरायेण

राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

सेवक चेरणरज वेंकाजीराम[१] सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २४ राखर मुाा जयेनगर जाणून येथास्थित असे. यानंतर दिलीहून वर्तमान आले. त्यांत मजकूर की नवाबानी पातशापासी करार केला जे आपणास पाच सुभे देण आणि करोड रुपये देण. आपण हरिभक्तांस[२] रेवांपार[३] होऊ देणार नाही. आणि कदांचित फार शोंकी[४] करतील तरी दक्षणचीहि चौथ उठऊन देऊ येसे बहुतप्रकारे वलगणा केली ते कागदी कोठवर ल्याहावी? पातशास चढी[५] लाऊन बहुत भासेणें करून भेटी जालिया दिवसापासून येकांतलोकांत मोठासाहिच[६] केला आणि कुल येख्तियार[७] करून घेतला. दक्षणेस तो पुत्र आहे आणि इकडे गाजुदीखान याचे नावे दोन सुभे अक(ब)राबाद व मालवा करार करून छ १७ राखरी सिरोपाव दिल्हा. कुल अमिरानी मुबारकी[८] दिल्ही. आता राहिले तीन सुभे प्रयाग व गुजरात व अजमेर तीन सुभे आपले भाऊबंद कोण्ही पाव—(अपूर्ण).

¶*Venkaji Ram, Peshwa's agent at Jaypur, writes thus to Bajirao on 10th August 1737 : " Information has been received from Delhi that an agreement has been reached between the Nizam and the Emperor according to which the former has undertaken to stop the Maratha advance beyond the Nerbudda. In return for his services he is to be rewarded with five Subhas and one crore of rupees. He boasts that in case the Marathas persist in their depredations even the grant of Chauth from the Deccan would be withdrawn. Since his meeting with the Emperor he has had secret conversations with him as a result of which the supreme command of the state has been conferred upon him. One of his sons is posted already in the South. Another, Gaziuddin, has received Malwa and Akabarabad. The remaining three Subas of Prayag, Gujarat and Ajmir would be granted to his friends and adherents."*

---

१ जयपूरचा पेशव्याचा वकील. २ मराठे. ३ नर्मदा. ४ गडबड.
५ भर देणें. ६ मोठासा. ७ अधिकार. ८ अभिनन्दन.

No. 54] [25-10-1737

श्री

श्रीमंत सदायेशवंत राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

सेवक वेंकाजीराम सा। नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता। कार्तिक सुध त्रयोदसी स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे. यानंतर रा। बाबांस्वामी[1] दिलीहून आश्विन वदी द्वादसीस सवाई जयेपु(री दाखल) जाले. रा। सवाईजीचे भाशेण जाले, ते सेवेषी लिहिले असे. जयेपुरीहून राजश्री कार्तिक सुध अष्टमीस स्वार जाले. सेवेसी येऊन वृत विदित करणार. वरकड श्रीमंत स्वामीस लिहिले असे हे विनंती.

¶*Venkaji Ram, stationed at Jaipur, to Chimaji, saying that Bajirao has arrived and visited Sawai Jaysing.*

No. 55] [30-11-1737 ?

श्री

श्रीमंत महाराज राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करावयास लेखकास आज्ञा केली पाहिजे. सेवकाचे वर्तमान ता। मार्गेस्वर वद्य ५ पंचमी येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों तें मौजे बेरी कुकडीवर लस्करात सामील जालें. श्रीमंत माहाराज राजश्री राऊ स्वामीचे दर्शन जालें. पत्र दाखविलें. त्यावर सामान पाहिलें. सारें सामान गणतीचे घोडें ३८९ पैकी हमेशा निशाणा बा। स्वार १४८ देखील सटवोजी सेवाला चालतों, त्यास खावंदानी सामान पाहून आपणावरी खुशाल जालें. राजश्री राऊ सामानाविसीं संतोश जालें. मग सिवणीकर केरोल[2] मानाजी पायेगुडे याजकडें दिल्हें आणि आपणास हुजरातीस ठेऊन पाठीमागील विल्हे दिल्ही. आज्ञेप्रमाणें येकनिस्ट सेवा करून; परंतु येंदा लोक आपणाकडें भारी आहेत आणि कर्जहि फार जालें, याचा परिहार करणार स्वामी समर्थ आहेत. हरयेकविसी खावंद कृपा करितात. आपले बधु राजश्री हरिपंत याजवल वेथा अतिशये होती. काही आरोग्यतेचे वर्तमान कलत नाही. तरी स्वामीनी आमचे पत्र चांबलीस पाठऊन तेथील उतर

---

१ बाजीराव. २ बंदुकस्वार.

आणऊन कासीद येतील त्याजबाा पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. येदां घरी चिरंजीव उभयेतां मुलाची लग्ने आहेत. त्याचें साहित्ये सर्व माहाराजावरी आहे. येक कवडीचा ऐवज दुसरा नाही व खासगत पागेचे स्वाराची व आमची नालबंदी मिळोन सरसाल बेगमी वरात नारोदादावरीं च्यारसे रुपये देविलें, त्यास ताकीद करून सत्वर ऐवज पावे तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. कुटुंबघात होये थैसे न करावा. सेवकाची सर्व फिकीर माहाराजास आहे. वरातेच्या भरवसियावरी शंभर हवाले घरी देउन आलो आहो. आपले बंधु आबाजी हरयेकविसी विनंती करितील त्याचें पारपत्ये करणार स्वामी समर्थ आहेत. सेवकाची विनंती उदास[१] न करावी. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ आसो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Antaji Mankeshwar requests from Chimaji Appa funds for the expenses of his troops which, he says, were examined by Bajirao and approved.*

No. 56] [*3-12-1737*

श्री मलारी मार्तंड भैरवनाय नमः

पौ छ २६ साबान.

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नरसो कुसाजी साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील कुशल मार्गेश्वर वद्य ८ शनवार प्राथःकाल जाणोन श्वकीये स्वानंद वैभव लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष, कृपा करून आज्ञापत्र पाठविलें, पावलें. येजमानास पत्र पाठविलें होतें तें त्यास प्रविष्ट करून उत्तर पाठविलें आहे, त्यावरून विदित होईल. आज्ञा केली कीं सविस्तर वर्तमान लिहिणे त्यास, राजश्री सुलतानजी राऊ निा दिडा हजारा स्वारानसी आले. नबाब नासरजेंगजी साहेबास भेटले. ते त्याचे घरास आले. महलों[२] स्वारांचा पाहिला. त्याचे पुत्रास तरवार दिल्ही. त्याचा हेत आहे, गवत अंजेनटावर[३] आहे. तेथे फौज पाठवावी. शें दोनशें स्वारानसी येथें राहावें. तैसेच राजश्री जानबाराऊ च्यार पांचशें स्वारानसी आले. त्याचीहि फौज दोन तीनसें कडीवाकडे मिरजगावाकडे जाणार. राजश्री कुसाजीराम बकसी बाार पाठवितात. बाकी फौज राहाते. यावर राजश्री धिराजी पवार सें दीडसें स्वारानसी आहेत. फत्तेसिंग देशमुख पनासेक स्वार

---

१ अमान्य. २ जमाव. ३ अजिंठा.

आहे. सुभानजी थोरात सेंभर स्वार लिंगोजी देखील आहे. हाफिजुलाखानास आज्ञा जाली दुर्नदी(?) व सरमस्तखान आहेत. वरकडहि जे अविंध आले होते त्यास आज्ञा देतात. आमच्याहि येजमानास आज्ञा देतात. एका दो दिसातून तिकडे जातील. परस्तुत तो जितके आले तितके वारोपाणी[1] होतात. परंतु करार केला आहे कीं नबाब निजामन मुलुक बहादर यानी पत्रें पाठविलीं कीं येणें तर त्वरेनें यावें. त्यास आमचे येजमानानी करार केला, कीं पत्र पावतांच येतो. यैसें सर्वांनीं करार केलें. त्यास गवत कडबा माहाग, पाणी नाहीं, म्हणून फौजा दूर दूर ठेवितात. नबाब निजामनमुलुक बहादर हांडियाचे घांटाकडे येणार. धामणें नाा सिरोज ६० कोस आहे. बंदूकवाले तेथें आहेत. फौज साठ हजार बार[2] आहे. हिरदेसा वगैरे छेत्रसालाचे पुत्रहि भेटले यैसें वर्तमान छ २९ रजबचे आलें आहे. लाख वाटे तो हें श्रीमंत राजश्री राऊसाहेबांसी सख्ये तोडीत नाहींत. परंतु परिणाम काये होईल तो पाहावा. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेसीं लेहोन पाठऊन. रावस्वामीकडूनहि वर्तमान हरघडी येतच असेल. विशेष वर्तमान आडललियावर सेवेसीं लेहोन पाठऊन. बहुत काय लिहिणें विज्ञापना.

¶*The writer Narso Kusaji is the Peshwa's man in the army of a certain Maratha ally of the Nizam and writes to Chimaji Appa giving him the postings of the various forces of Nasirjung. He further writes that the Nizam is proceeding to the ford of Handia and presumes that the Nizam will not break off relations with Bajirao.*

No. 57] [*15-12-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक रघुनाथ सिवराम सां नमस्कार विज्ञापना. स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वृत येथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र सादर जाले तेथें आज्ञा जे सकल वृत लिहून पाठवणे. यैसीयास राजश्री सुलतानजी निंबालकर व राजश्री जानोजी निंबालकर व राजश्री धिरोजी पवार वगैरे मऱ्हाटे सरदार लहान थोर व आविध सरदार मिळून आवघी फौज दाहा बारा हजार आजी आहे. चंद्रसेनहि येणार यैसी वदंता आहे. याची अद्यापि मसलत बाहेर निघावयाची किमपि दिसत नाहीं. नवाब सिरोंजेपलाकडे धामोणीवर होते

---

१ दाणादाण होणें, फाटाफूट. २ पायीचे.

ते च्यार कोस आलाकडे आले म्हणून वर्तमान आहे. वर्कड संकल सेनेचे येथील वृत हलकारे[1] याणी अवलोकिले आहे. सेवेमध्ये निवेदन करितील. सेवेसी विदित जाले पा हे विज्ञापना. स्वामीनी विठल सिवदेव यास रुा कोकणामध्ये न्यावयासाठी येथे पा. त्यास दाहा वीस हजार रुाच्या हुंडियाची मुदती पुस शु ५ होणे आहे व अद्यापि रासीचा भावहि पुर्ता चुकला नाहीं. थोडा बहुत पंधरा रुपये सेकडा बटाप्रा चुकला. त्यास स्वामीचे आज्ञेप्रा मारनिलेस येकवीस हजार रुपयेच्या नासिकच्या हुंडिया व बाकीचे रुपये रोकडे देऊन रवाना केले. व रामजी घम यास रु. २००० देविले, तेहि दिल्हे. व दाहा हजार रुपयाची हुंडी बाबूजी ना भिड्ये याजवर पा, आणि लिा जे सातारेयाच्या हुंडिया करून राजश्री दादोबा याजकडे पा, त्यास आज्ञे-प्रा हुंडावण दरा प्राो देऊन हुंड्या करून सातारेयास जासुदा समागमे रवाना केल्या. हे विनंती.

¶*Raghunath Sivram to Chimaji Appa, giving news of the Nizam's forces and movements.*

No. 58] [*17-12-1737?*

श्री

छ ७ रमजान

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेशं

अपत्ये महिपत आनंदराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत पुष शुद्ध सप्तमीपरियंत जाणोऊनु स्वकीयें कुशल लेखण केलें पाहिजे. यानंतर स्वामीकडील पत्र येऊन वृत्त कळत नाहीं तरी सविस्तर वृत्त लिहिलें पाहिजे. इकडील वर्तमान तरी छ ३ रमजानीं मोठे नवाबाचीं खतें अवघियांस आलीं. नवाब नासरजंग व सैद जमालुद्दिखान व सुलतानजी निंबाळकर व जाणोजी निंबाळकर व अबदुलाखान वगैरें जितके लहानमोठें तितकियांसहि आज्ञा आली कीं हजूर येणें. साठ जनाचीं नांवचीं खतें होतीं. येथें शहरांत कोतवाल व मकबुल अलम यांस राहवयाची आज्ञा आहे. नवाब नासरजंग यांनीं तमाम मनसबदार यांस बोलाऊन येक येक चोबदार व येक येक ढलाईत ऐसें सर्वांस पाठविलें आहेत कीं पत्रदर्शनीं येणें. सुलतानजी निंबाळकर व जानोजी निंबाळकर व हिरजुला गुलाबनबाखां हे तों अगोधरच येथें आले

---

१ हरकारे.

आहेत. चंद्रसेन यास आज्ञा आहे कीं पुत्रासमागमें फौज देऊन पाठवणें आणि तुम्ही विज्यापूर भागानगरप्रांतीं मजबुतीनें राहाणें. नवाब नासरजंग याचें कूच छ ७ रमजान अगर छ १० रमजानचें महमदीबागांत आहे तेथें कुळ फौजेचा जमाव करून पुढें जावें. सैद जमालुदिखान याचा पेशखाना[1] बाहेर निघाला. आपण छ ९ रमजानीं डेरादाखल होणार ऐसी येथें गडबड जाली आहे. प्रसंग विज्वर[2] दिसतो. स्वामीस कळावें म्हाणोन लिहिलें आहे. दुसरें आणीक वर्तमान मालवियातून कासद आले त्यानी सांगितलें कीं मीरमानीखान अमील शाहाजांपूर यांनीं कमाविसदाराचें ठाणें जवळपास होतें त्यावर धाऊन ठाणें मारलें. कमाविसदार मारला. हें वर्तमान राजश्री मल्हारजी होलकर व रानोजी सिंदे यांस कळलें. हे जलदी करून धावले. तों मीरमानीखां ठाणें मारून फिरून आपलें मकाणास जात होते तों यासी त्यासी गांठ वाटेंत पडली. येक प्रहार लढाई जाली. मीरमानीखां जित धरिला. फौज अवघी लुटून घेतली. दोन लाख रुपये देत होता कीं मजला सोडणें. यांनीं म्हटलें कीं आमचा कमाविसदार मारला आहे, रुपये घेऊन काय करावें? त्याचा बदला घेऊन. ऐसे म्हणोन मीरमानीखानास जीवें मारिलें ऐसें वर्तमान कासदांहीं सांगितलें. स्वामीस कळावें म्हणून लिहिलें आहे. येथें शहरांत शहरपन्हा[3] मऱ्हामत करून तोफा वरत्या चढवितात. जागां जागां खबरदारी करितातो. किल्ले अर्कामध्यें तोफा व दारु-गोळी बहुत आहे त्याची मोजदाद पाहून दुरुस्त करितात. नवी निगादास्त बरकंदाज शहरचे रखवालीस पांच हजार ठेवायाची आज्ञा आहे ऐसे येथील वर्तमान आहे. पुढें जें वर्तमान होईल तें लेहून पाठवीन. आपलें वर्तमान बहुत दिवस कांहीं कळलें नाहीं तर सविस्तर लिहून पाठवीत जाणें. येथेंहि फौज वीसहजारीपर्यंत भारी मातबर आहे. राजश्री सुमंत छ १६ साबानीं लष्करांत दाखल जालें. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असें. आतां बिगाडाचा डौल कुल जाला आहे. बिघाड होणें मात्र बाकी आहे. याजवर आपण जो विचार केला असेल तो बराच केला असेल. आपणांपाशींहि फौज मातबरच असें. अबदुल अजीजखानास येथें ठेवावयास आज्ञा आली आहे. अनवरुल्लाखानहि येथेंच राहिले आहेत, यांजवर आपण बरें सावध असलयाने बरें आहे. आपल्या प्रांताकडे किलयाची बंदोबस्ती केल्याने बरे आहे. आम्ही वर्तमान ऐकिलें लिहिलें आहे. याजवर स्वामीची इच्छा. येंदा नवाबासमागमें फौज सत्तर हजार तमाम भारी चांगली व सवारीं हातनाला व जेज्यायेलाचे व बाणाचे व

---

१ स्वारीचा पुढील मुकामास गेलेला डेरा. २ विचित्र. ३ शहरचा कोट.
४ दुरुस्त. ५ अर्क किल्ला. बाले किल्ला.

सुतरनालाचे उंट मिळून तीन हजार आहेत. याजवेगळें नवीनिगादास्त तिघेजण करितात. नवाब खुद्द व गाजुद्दीखान नवाबचा पुत्र व राये नवनिध ऐसें तिघेजण करितात. व जेथं नासरजंग नित्य शें दीडशें दोनशें स्वारपर्यंत नित्य नवी ठेवितात याप्रकारचें वर्तमान आहे. चंद्रसेनास व तसे मोहदीखान वगैरे यास हैदराबादेच्या तहीआंत (?) केलें आहे. मीरमुल्लादुदाखान भागानगरीं चार हजार फौजेनशीं होता त्यास नवाबांनीं बोलाविलें आहे. तोहि आणखी पंधरा दिवसा बराणपूर प्रांतें येईल. नवाब कोठे आहेत तसें वर्तमान हें तों स्वामीजवळ आलेंच असेल, येत असेल. वरचेवर मागूनहि वर्तमान सविस्तर सेवेसी लिहून पाठवीन. बहूत काय लिहिणें लोभ असो दीजे हें विनंती.

काशिदास अजुरा लिहून दिधला आहे तो दिधला पाहिजे. पुढें काय आज्ञा ? उत्तर आज्ञा कराल तर वर्तमान पावतें होईल, यावर जे आज्ञा. हे विनंती.

¶*Mahipat Anandrao Sumant writes to Chimaji Appa news from Aurangabad about the colossal preparations of the Nizam and his son Nasirjung with an end to finally put down Maratha activities. The letter is very significant as regards the position of the two hostile parties.*

No. 59] [*24-12-1737*

पौ १४ रमजान

जाब

श्रीगजानन प्रसन्न

श्रीमंत राजश्री चिमणाजी आपा स्वामीचे सेवेसी

सेवक महिपत आनंदराव[1] कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत तारीख पुष्य शुद्ध चतुर्दशी तिसरा प्रहर शनिवारपर्यंत जाणून स्वकीये कुशल लेखन करावें. यानंतर स्वामींनीं पत्र पाठविलें पावलें, लिहिलें वर्तमान कळूं आलें. ऐसेंच सर्वदां पत्र पाठवीत गेलें पाहिजे. जामनेर वरणगाऊ परगणा तीर्थरूपाचा आहे. स्वामीचा व त्याचा दुसरा विचार नाहीं त्या परगणियांत स्वामी आहेत, हितास येईल तें केलें पाहिजे. येथील वर्तमान तर राजश्री राघोजी भोंसले याजवर चालून मीर शमसुदीखान बक्षी तीन हजार स्वार नवाब नासरजंग व रिसालदार बक्षी व मनसबदार वगैरे च्यार हजार ऐसें मिळून सात हजार स्वारानशीं आज रुखसत केला. आज हरसुलावर उतरणार. अबदुल

---

१ सुमंत.

अजिजखानहि दोचौ रोजांत येतात. बहिरजी सलगर व गिरजोजी हरके च्यारशें पांचशें स्वारांनशीं आले. मुलाजेमत[1] जाली. नांदेडामध्यें मिरमोमिनखान आले आहे त्यास तिकडे तीर्थरूप राजश्री व्यासराऊ बफौजे[2] आहेत. त्यास मीर मोमीनखानानें लिहिलें होतें कीं नांदेड कसबियास हे उपद्रव देणार. त्यास येथून मदत तीनशे स्वार व च्यारशें बरकंदाज मदत पाठविला. नवाब निजामन-मुलु(क) दुराह्यापलीकडे छ ३० साबानी दाहा कोस पलीकडे होते. राजश्री पंत प्रधानासी व नवाबासी तिसा पस्तिसा कोसाचा अंतराये उरला आहे; हेही नवा(बा)स सुजायेतखानाचें वर्तमान कळलियावर जे आज्ञा येईल त्याप्रमाणेंच वर्तणूक करितील. पूर्वी पत्रे नवाबाची नासरजंगास आली होती कीं तुम्ही हुजूर येणे. येथे औरंगाबादेस सुभेदारीस मुतवसलखानास ठेवावा, त्यास आलीकडे वराड प्रांतीं ऐसें वर्तमान आलें याजनिमित्य नवाबाचे उत्तराचा मार्ग लक्षितात. पुढें हे नवाबांकडे चाललियानें स्वामीचा निर्देश[3] काय आहे ? कोणीकडे रोंख होणार ? हें सविस्तर लिहिलें पाहिजे. याजपाशीं फौज बरी मातबर आहे. कांहीं नवदा(द)हा कालपर्यंत सलुखाचा पैगाम[4] कांहीं नाहीं. मग येथें आल्यानंतर सेवेसी सविस्तर लिहीन. विदित होय हे विज्ञाप्ति. छ १२ रमजान.

¶*Mahipatrao Sumant writes to Chimaji Appa news of the movements and activities of Bajirao and Nizam-ul-mulk and his son Nasirjung.*

No. 60] [*Dec. 1737 ?*

श्री

पुरवणी श्रीमत पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना (ब)हुत सोखी करीत आहे. जर स्वामीची फौज यावयावसी चार दिवस विलंब जाहला तर येमुना उतरोन कालींजरपावेतो मुलुक मारील याजकरितां इकडील पेरवी[5] सत्वर केली पाहिजे. वरकड जमीदार बिंधवासनीपासून आहित त्याजवरी सलाबत[6] घातली आहे. कोणी भेटीस गेले. कोणी वकील पाठविले. जागा खाली आहे. त्यासी सत्वर राजेश्री आवजी कवडे बघेलखंड प्रांते आले ह्मणजे त्यास हि सलाबत पडेल आणि तमाम जमीदार स्वामीचे होतील;

---

१ भेट. २ फौजेसुद्धां. ३ हुकूम.
४ बोलणें. संधान. ५ बंदोबस्त. ६ दाबदबाव.

नाहींतरी नवाब आलीकडे उतरोन तमाम गढी घेऊन जागा दस्त[१] केली तरी मेहनत करणे येईल. याजकरितां अगोधर आपली फौज जाऊन जमीदार हाती घेऊन दस्त जाहाला म्हणजे ते जमीदार मोगलासी हरगाह सला करणार नाहीं. तूर्त ऐवज हुंडी सेवेसी पाठविली आहेत. ५ राजश्री बाबूजी नाईक अबाजी नाईक जोसी याजवरी रुपये १०८०६५

जागिरीचे ऐवजी यैन हुंडणावल सिवाई.

६२००० बाकी सन १७९४ पैकीं
४०००० किता
२२०००
———
६२०००
३५००० जागिरीचे रहिलीची आहे त्याचा वसूल सन १७९५ पैकीं
———
९७०००

वोलाचा हिसेब अलाहिदा आहे.

१०२० बदरेठाबाा सन १७९३ पैकीं
६५० मौजे झरी गुाा राजे महासिंग सन १७९४ पैकीं
७००० सकुराबाद सन १७९३ पैकीं
———
८६७०
पैकीं वजा हुंडणावळ रुपये ६०५ बाकी.

जागीर लक्ष्मणसिंग पैकी २००० रुपये ऐन. हुंडी रुपये ८०६५ येणेंप्रमाणे हुंडी पाठविली आहेत. पावलिया आज्ञापत्रे सादर केले पाहिजे. या हुंडीचे मागोमाग दुसरा ऐवज पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer warns the Peshwa that the longer absence of his army would seriously imperil his position and would embolden the Nawab to march upon the stronghold of Kalinjar. Some of the local magnates, he adds, have already offered their allegiance to the Nawab. The writer further sends hundis for supply of funds.*

No. 61] [*Dec. 1737 ?*

श्री

**राजश्री रामचंद्रबावा गो-
सांवी यांसी**

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराव रामराम विनंती येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आम्ही इकडे

---

१ काबीज; जप्त.

राहिलो. नरवरच्या मामलियास चिरंजीव राजश्री सुलतानजी जाधव यांस दोनसे स्वारानिसी पाठविले होते त्यास जागडे हरामजादे याणी फौजबंदी करून त्याजला दोन आडीच महिने आमल न दिल्हा. तेव्हा राजश्री गोपालसिंग जाधव करोलीकर व राजश्री खांडेराये याचे पुत्र नवलराम बिजेपूर+ याणी बहुत प्रकारें खासा आंगे हजार स्वार व दोन च्यार सहस्र बरखंदाज घेऊन येऊन त्याचा रेचे[१] मोडला. जिवेप्राणे उभे राहिले, तेव्हा त्याणी अमल दिल्हा तह केला. ऐसियासी गोपालसिंग जाधव व नवलराम सर्व प्रकारे आम्हासी घरोबा धरून जिवे प्राणे उभे राहिले यैसीयासी आपण त्या प्रांतातून जातील आगर येतील त्यास जाधव आणि बिजेपूर जागा आमची आहे सर्व प्रकारे त्याची रखवाली करविली पाहिजे. आपण तो करितील हा भरवसा आहे. राजश्री गोपालसिंग व नवलराम हे बहुत प्रकारे कार्यास आले. आम्ही तिकडे नसतां त्याणी त्याचा दावा कबूल करून नरवरचे काम करून दिल्हे. यैसियासी त्याविसी नजर आम्हावरी देऊन त्याचे चालवावे. कोणेविसी त्यास तोसीस न लागे यैसे केले पाहिजे. रा छ २० सफर बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Pilaji Jadhao to Ramchandrababa, asking him not to molest his possession of Narwar.*

No. 62] [*1737?*

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा गोसांवी यांसी

॥ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजमान्ये श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणऊन स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री रायाची पत्रे व रा गोविंद हरी आले. सविस्तर वृत कलो आले. त्याचा विचार येकच आहे प्रस्तुत काळी निकाल काढून तेथून निघावे यैसे आपण त्याचे उत्तर लिाच आहेत उतमच आहे. आम्ही या आठा रोजांत जाऊ त्याजवली पोहचतच आहो. भेटी जालियावर राजश्री आबाजीपंत तात्याच्या आमच्या विचारें विचार जो उतम

+ येथें पिलाजीचा शिक्का.

१ हड्डी नरम केली,

दिसेल तो करून. वरकड कितेक वृत रा। गोविंदपंत सांगतां कळो येईल. उदैक संध्याकाळी अगर परवा दो प्रहरा राजश्री स्वामीचे उतर येईल, त्या प्रा। स्वार होऊन आपले भेटीस येतो. जरी इकडून जावयाची आज्ञा आली तरी नांदेडीयावरून याच मार्गे भेटी घेऊन जाऊन. नाहीतरी भेटी घेऊन सातारियास जाणें जाले तरी भेटी घेऊन जाऊन, बहूत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. राजश्री रायासी दुसरी पुरवणी लिहावी कीं मसलत तो कठीण पडली; परंतु उताविली न करावी. समागमी दुसरे आले त्यानी निकाल काढिला तरी आपणास सहजच मोकलीक जाली. नाहीं तर जैसा उभयेताच्या विचारें निकाल निघेल तो काढावा यैसे लिहावें हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa : communicates to him Bajirao's news.*

No. 63] [*7-1-1738*

छ ३ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेबांचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक शंकराजी निकम सां। दंडवत विज्ञाप्ति येसिजे. साहेबांचे कृपावलोकनेकरून सेवकाचें व पागेचें वर्तमान ता। पुश वद्य १३ त्रियोदसी मंदवासरपरियेंत क्षेमरूप आसो. यानंतरी मामलतीचे वर्तमान तरी आवंदा प्रजेन्यवृष्टं थोडी जाली. याजमुळें तमाम गाव वैरान जाले. नेवास परगणियांतील पन्नास गाव केवल उठून गेले. वैजापूर परगणियांतील गाव वीस व गांडापूर परगना तो आर्धा केवल निर्मानसी गाव जाले. सिवारांत[1] सेती येक दाना बीजाचा गेला नाही. कितेक गाव पेरले होते ते केवल बीज बुडाले. येसा ईस्वरें कोप केला आहे. त्यास युग्तीने वसूल घेतला पाहिजे. दिवस बहुत जबून[2] आहेत. साहेबाचे कृपेकरून येका दो मासात वसूल घेतले. यानंतरी शहरचें वर्तमान तरी सेवकाचे कारकून हिरजुलाखान वैजापुरचे जागीरदार हफीजुदीखान याचे भावाकडे गेले होते. त्यास नवाबाचे लस्करांतून कागद हिरजुलाखानास आले होते. त्याणी स्वमुखे वर्तमान सांगितल की श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबासी नवाबसाहेबासीं युध्यप्रसंग येक वेल जाला. त्याजवरी बोली लागली आहे कीं माळव्ये प्रांतीचे बिलमुक्ता[3] नवाब निजामनमुलीक

---

१ गांवच्या जमिनींत. २ भिकार. ३ मक्त्याप्रमाणें.

रूपये पासंष्ट लाक रूपये देतात. श्रीमंत साहेब पच्यासी लाख रूपये मागतात येसे लिहिले आहे. इतकियावरी सत्य मिथ्या इस्वर जाणे. शहरीहून नवाब नासरजंग व तमाम मनसबदार कूच करून पाल म्हणोन गाव फुलंबरीनजीक आहे तेथ जाऊन मुकाम केला आहे. वार्ता आहे कीं आजनठावरून बऱ्हांनपुरास जाणार आहे. साहेबास तो बातमी असल. परंतु येकिल वर्तमान सेवेसीं लिा आहे त्यानंतरी पुरवी आज्ञापत्र आले होते की जमावानसी सिध राहणें, आज्ञापत्र पाठऊन ते समई येऊन पोहचणें त्याजवरून जमावाची सिधता करून आज्ञापत्राचा मार्ग लक्षितो. ज्या रोखे आज्ञा कराल ते स्थली येऊन पोहचतो. ये प्रांती आवंदा आफत[1] बहुत आहे. याजमुळें वसूल युगतीने या महिनियांत घेतला पाहिजे. जागीरदाराची जमाबंदिया जाल्या आहेत. याजकरिता त्वरा करून वसूल आगोधर घेतला पाहिजे यैसा प्रसंग आहे. त्यावरी आगत्ये जरूरच असेल तरी त्वरेने आज्ञा लेहून पाठविली पाहिजे. जमावानसी येऊन पोहचोन. साहेबाचे आज्ञांपेक्षा येथील काये विशेष नाहीं. चेरनारविंदापासीं चाकरीचे सार्थक आहे. आज्ञा होईल तेणेप्राो बर्तनूक करून. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Shankraji Nikam to Chimaji Appa, giving a description of the desolated state of the Newasa, Gandapur and Vaijapur parganas on account of the famine of 1737-38.

No. 64] [*22-1-1738 ?*

श्री

श्रियासह विराजमान श्रीमंतु राजश्री
चिमाजीराऊ गोसावी यासी

८ विनंती. श्नेहेंकित मालजी चव्हाण कृतानेक दंडवत विज्ञापना प्रार्थना यैसजे. येथील कुषल तागायत छ १२ माहे सवाल पावेतो येथास्थित जाणून स्वकीये लेखन कराविया अज्ञा केली पाहिजे. यानंतरे राजश्री राऊ मुख्ये प्राधान मुलुकगिरीस गेले होते त्यामधें व तिकडील तांब्रामधें युध्ये प्रसंग जाहाला. लोक फार खस्त[2] होऊन पडिले. नामांकित लोक ठार जाहाले म्हणऊन वर्तमान परस्परें ऐकितों. याकरितां चितास समाधान वाटत नाहीं, तरीं आपणांकडील

---

१ दुष्काळ. २ ठार.

सकल अर्थ कलावे यास्तव हें पत्र लिहिणें लागलें. तरी तिकडील सकल अर्थ व आपण कोणे ठिकाणी आहां, मनसबा काये योजिला, हे अवघे सकलार्थ लेहया (लेहावया) आग्ना (आज्ञा) केली पाहिजे. आपणांकडील पत्र आलेवरून समाधान होईल. इकडील वर्तमान तरी आपणांस परस्परें कळतच असेल. कृपा वर्धमान केली पाहिजे. हे वीनती.+

¶*Malji Chavan to Chimaji Appa, inquiring as to the actual state of things in the fight that took place between Bajirao and the Moghuls.*

No. 65] [*24-1-1738*

श्री

राजश्री सदासिवपंत भाऊ गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकर अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम माघ शुध पुर्णिमा मुा. नजीक भुपाल जाणून स्वकीयें लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन परामर्ष होत नाही. याकरितां चित्त सापेक्ष आहे. सदैव पत्री दर्शनाचा लाभ देऊन परामर्ष करीत असावें. ईकडील वर्तमान श्रीमंत व आम्ही मुकाम मजकुरास आलो. राजश्री मल्हारबा व राजश्री राणबा कोथ्यावरी आहेत. त्याकडील वर्तमान श्रीमंतानी आपल्यास लिहिले असेल. विशेष कायें लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

(मोर्तब सुद.)

¶*Pilaji Jadhao to Sadashivrao Bhau from Bhopal with compliments.*

No. 66] [*Jan. 1738*

[आरंभीचा मजकूर गाहाळ]

गमे सेवेसी पा आहेत. घेतले * * * * * ज्या मुकामी येऊन पाो * * * * मुकाम लिहून पाठवावा. त्याप्रमाणे यास अजुरा देणे लागेल. वरकड वर्तमान तर पोस वदी १२ चे दिवसी तांब्राचे सैन्यामध्ये धान्याची व तृणाची महर्गता फार जाली. दीड रुपये सेर धान्याचा

+ हा शब्द बाळबोधींत आहे.

भाव जाला. त्याजउपर दुसरे दिवसी राजश्री आनंदराव याणी राजश्री पिलाजी जाधवराव यास आणावे ऐसे निश्चय केला. त्याजवर सैदलस्करखां व अनवरखां दोघेजण सामोरे जाऊन राजश्री पिलाजी जाधवराव यास घेऊन आले. खिलाबती जालियावर माघारे लस्करांत गेले. मग रस्त पाठऊन दिल्ही. ते दिवसी सायेकाळीं तांब्राचे सैन्यात वीस सेर, धारण जाली. याप्रकारे सला जाला. म्हणून लिहि[१]ली बाजारांत लोकाचेथे आली आहेत. परंतु डौल सलियाचा कोणे प्रकारे पडि(ला हे लि)हिले आले नाही. मागाहून आणखी (अपूर्ण)

¶*As advised by Anandrao Sumant, Saidlashkarkhan and Anwarkhan are deputed to bring Pilaji Jadhao into the camp of the Nizam to settle negotiations. The first and last parts of the letter are missing.*

No. 67] [*Jan.-Feb. 1738 ?*

श्री

पुरवणी रा॥ विसाजी दादाजी विनंती उपरी. येथें वर्तमान आइकतो कीं रा॥ पंतप्रधान यासीं सात हजारी व रा॥ चिमाजी आपा पंच हजारी यैसें तहकीक सराफाचे दुकानी लि॥ आली आहेत. तरी याचा विचार काये तो लिहिला पाहिजे. आमदाबाजेच्या सराफांची लिहिली आली आहेत की उभयता मिलोन बारा हजारी मनसब आली आहे. पृथ्वीपतीचेंहि पत्र आले आहे यैसें म्हणतात. कलले पाहिजे. ब+हुत काय लिहिणे हे वीनंती.

• ¶*Addressed to Visaji Dadaji. The writer hears the news that Bajirao and Chimaji Appa have been created commanders of seven and five thousand respectively by the Emperor.*

No. 68] [*6-2-1738*

छ १८ जिल्हेज.

श्री

राजश्री आपा स्वामी गोसावी यांसी.

ॐ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित येशवंतराव पवार कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २७ माहे सवाल मुकाम ना॥ कोटे स्वामीच्या आशीर्वादें करून

---

१ पत्रे

+ हा मजकूर बाळबोधींत.

क्षेम असों विशेष. स्वामीकडून पत्र येऊन परामृष होत नहोता, तेणेंकरून चित्तास समाधान नहोतें. त्यास प्रस्तुत छ २१ रोजीं स्वामीचें पत्र आलें तें पावोन परम समाधान जालें. ऐसेंच निरंतर पत्रीं सांभाळ करीत असिलें पाहिजे. ऐशियास या प्रांतीचें वृत्त तरी निजामन्मुलुक सडा हस्तनापुरास गेला. आम्ही मजल दरमजल श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीसमागमें कोट्या प्रांतास आलो. कुली परगणा लुटून नेस्तनाबूद केला. तेव्हां कोटेकर माहाराव हाडा[1] गडगांगरुणीस पळोन गेला होता, तेथून रसायेणासें[2] वेदमूर्ति वेणीराम भट पाठविला. खंडणी रुपये दाहा लक्ष द्यावे ऐसा करार केला. प्रस्तुत सदहू ऐवज यावयास च्यार रोज लागतील. रुपये हातास आलियानंतरी बोडसे दतियाकडे जावें यैसा करार आहे. स्वामीस विदित जाहलें पाहिजे. लोभ+ असो द्यावा हें विनंती.

¶*Yashavantrao Pawar writes to Chimaji Appa of his arrival at Kotah with Bajirao.*

No. 69] [*3-6-1738 ?*

पो छ २३ सफर

श्री

राजश्री बाळाजी पंत बाबा गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २९ मोहरम मुाा कुरवाई भोवरासे जाणूत स्वकीयें लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. या प्रांतीचे वर्तमान तरी कोट्याकडून अहिराचे मुलकांत आलों. आहीर बाहीर काढून ठाणी घेतली. प्रस्तुत कुरवाईस मोर्चे लाविले आहेत. बाहरील शाहरपना घेतला. कोट मात्र राहिला आहे; तोहि हस्तगत लौकरीच होईल. बुंधेले उभैता भेटीस आले आहेत. वरकड वर्तमान राजश्री पंत प्रधान याणी राजश्री चिमाजीपंत आपा याचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. विशेष काय लिहिणें? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao writes to Bajirao's son Nana Saheb giving him news of his fighting in Ahirwada.*

---

१ रजपूत जातीचें नांव. २ समजूत. सलख.

+ अक्षर निराळें. पत्रावर पवाराचा शिक्का व मोर्तब आहे.

No. 70] [27-6-1738?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक शामजी गोविंद सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आखाड वद्य ७ भोमवारपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे. यानंतर येथील वर्तमान माहादजी व खंडोजी जासूद याबाार विनंती पत्रीं लिाा आहे. ती पत्रे पावलीच आसतील. आलीकडे राजश्री बाबूरावजीकडून हस्तनापुरीहून पत्रे तीन बंद आलीं ती बजिनस सेवेसी पाठविली आहेत. पत्रार्थीप्राा उतरे विस्तरे सादर करणार स्वामी खावंद आहेत. उतरे सत्वर आलिया हस्तनापुरास मुजरद कासदा बाार सेवक रवाना करील. नवाब सैदजमालखां याचे जागिरीचे इजारियाविसी पूर्वी लिाा आहे. व हंली राजश्री रावजीनी लिाा आहे, त्याप्राा पारपत्य करणार साहेब आहेत. व पूर्वी मुजरद कासदाबाार चंद्रसेन जाधवराऊ व विरापा माहाजन याजकडे कर्जाचा यैवज येणे. यास्तव विनंती लिाा आहे. त्याप्राा पत्रे ताकिदीची पाठविणार स्वामी समर्थ आहेत. आरब सिदी याणी प्रस्तुत आपण व जोतीपंतासीं आतिशये कजिया केला आहे. . आबरूवर गोष्ट आली आहे ते लिाा पुरवत नाही. विस्तरे विनंती पूर्वी लिाा आहे. त्याप्राा त्याचा वीसरोजा राहिला असलिया सवासाशाचा कजिया पाचशावर चुकविला आहे. पाचशे रुपये द्यावया आज्ञा अगर वीस रोजा राहिला नाहीं, इाा नोकरी ताा रुसरवंती आपला हक भरून पावलो यैसी कबज असली तर ते कबज व नासरजंग सैफुलाखान कोतवाल यासीं पत्रे उभयतांस हकनाहक मुजाइम[१] होतात. त्यास ताकीद करून मुजाइम न होत ते करणे, यैसी पत्रें मुजरद येक चोपदाराबाार सदर करणार स्वामी समर्थ आहेत. विनंतीप्राा पारपत्यास दिरंग लागला म्हणजे आमची अबरू राहात नाहीं. सेवक युक्तिप्रयुक्तीस चुकला नाहीं. परंतु नासमज माणसांसी काम पडलें आहे. काजीकोतवालास खातरेस आणीत नाहीं सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Shyamji Govind (Takle), Peshwa's agent with the Nizam, writes to Chimaji Appa about various monetary transactions and asks orders.*

---

१ प्रतिबंध.

No. 71] [*9-2-1739*

श्री

आशीर्वाद उपरी. राजश्री बाबूराव मल्हार याची पत्रे छ १० जिलकादची आली होती. तीं आपणाकडे पाठविलीं, ती पावलीच असतील. सांप्रत रा। वेंकाजीराम याची पत्रे दोन एक माघ शु॥ सप्तमीचे व दुसरे पत्र एकादसीचे ऐशीं दोन आलीं. त्याच्या नकला पाठविल्या आहेत. त्यावरून वर्तमान कळेल. तोहमास्तकुलीखांनाचे फौजेत व महमदशाहाचे फौजात युध्य जाहले. कृपाराम पळून आला आणि कुरुक्षत्रीहून पत्र आल्याचा मजकूर पहिल्या पत्री लि॥ आहे हे खरेच. परंतु मेले कोण, राहिले कोण, तत्वता[1] नाही. जो पळून येतो तो औघेच वारले म्हणतो. परंतु लिहिले पुसिले येईल ते खरे. दुसऱ्या पत्री लिहिले आहे तेही खरे कशावरून मानावे? राजश्री बाबुरायाचे पत्र येईल ते खरे. मुख्य गोष्ट पातशाही गर्दी[2] जाहली आहे हे खरे. कागदपत्रहि चालत नाही. मागाहून तत्वता येईल वर्तमान ते लिहून पाठऊ. लोभ असो दीजे हे आशीर्वाद+.

¶*Letter of Bajirao to his brother Chimaji Appa giving news of Nadirshah's invasion of Delhi in the early months of 1739.*

No. 72] [पा॥ *31-3-1739*

छ २ मोहरम.

आसीर्वाद उपरी. आम्हीं अत:पर बऱ्हानपुरापुढें जात नाही. बऱ्हानपुराजवलच मुकाम करून राहून खानदेश प्रांताचा बंदोबस्त करितों. आपण कोकणातील कार्यभाग उरकून फौज घाटावरी पाठऊन मुलकाचा बंदोबस्त करावा. वसईचा प्रसंग उरकून आपण लौकर घाटावरी यावें. पागेची पथके घाटावर आम्हाकडे पाठवावीं. जागा जागा परगणियांत ठेऊन बंदोबस्त केला जाईल. डाक नासिकपावेतो रावताची बसविली याजबराबरी दिनप्रतिदिनी वर्तमान ल्याहावे. नासिकापासून डाक बरवाजी ताकपीर याची आहे. चहूदिवसीं वर्तमान तुमचे आम्हास पोहचेल. आमचे तुम्हांस पावतें करणें. × आपा!

---

१ तहकीक, खरी बातमी. २ क्रांति. + बाजीरावाच्या हातचीं अक्षरें. बाजीरावाचें पत्र चिमाजी आपास. नादीरशाहाची स्वारी स. १७३९ फेब्रुवारी ते एप्रिल. × येथून अक्षर बाजीरावाचें.

परराज्य राहिले तरी सर्वांवरी आहे. त्यास फार विचार मनांत न आणिता इकडील कार्याची पैरवी मनांत आणून कर्तव्य ते करावे. आम्ही बेवकूप, परंतु आपणच विचार करणे (तो करावा) आम्हास सुच(ले ते लि)हिले असे.

¶*Bajirao asks his brother Chimaji to finish up the Bassein business and send him reinforcements post haste : "Remember the magnitude of the situation. If the new invader (Nadirshah) roots himself in the soil it will be disastrous for all. But you appreciate the danger better than I can explain to you."*

No. 73] [*March 1739*

नकल

श्री

राजकी वर्तमान तरी तहमासकुलीखानासी दोन लडाया जाहाल्या. उभयतांकडील तीस हजार माणूस मेलें. खानदौराखां बिरादरीसुधा[1] मेला. सादतखान पाडाऊ करून नेला. त्याजवरी सला च्यार रोज विस्वास दाखऊन महमदशाहा व निजामनमुलूक कमर्दीखान यांसी कैद केले. फौज कुल लुटून घेतली. सादतखानास चाकर ठेऊन बा। फौज देऊन रवाना केले. त्यानी पानिपत शहर लुटले. करोडी रुपयाचा माल लुटला. काबिले बाटविले. तेथून दिलीस आले. तेथें येक प्रहर लडाई किल्यासीं जाहाली. तों दिलीमध्यें गुंडेयांहीं[2] लूट आरंभिली. तेव्हा लोक कौलांस[3] आले. सादतखान दिलीदाखल होऊन नादरशाहाची द्वाही फिरविली. गजसिका चालिला. पातशाहा गर्दी जाहाली. ते वर्तमान शहरी आलें. येथेंहि प्रलये जाहाला आहे.

¶*News-letter from Aurangabad to Poona, referring to Nadirshah's invasion.*

No. 74] [*4-4-1739 ?*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री तुबाजीपंत स्वामी गोसावी यांसी पो बाजीराऊ बलाल प्रधान नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून आपणांकडील कुशल लिहित जाणें विषेश. तुमची पत्रें आली ती प्रविष्ट जाहाली. तिहि

---

१ भावाबंदासहित. २ गुंडांनीं. ३ शरण.

स्थळांचा मजकूर लिहिला तों कळला. यैसियांस स्थळांचा पैगम केला, उत्तम केला. परंतु कार्य येव्हांच करावें यैसे नाहीं. काये निमित्य की नासरजंग भागानगरास गेला होता तो पुन्हा या प्रांतें येतो. त्याची आमची भेटी होऊन त्यास विचारांत घ्यावा, कांही आपलें कार्यहि त्याजपासून करून घ्यावें यैसा विचार आहे. आणि प्रस्तुत या स्थळांचे कार्य केलें तरी आधीच आमल उठविला याजवरून त्याच्या चितांत भये व संकोच प्राप्त जाहला आहें. स्थळांचे कार्य सध्या केल्यांस त्याच्या चितांत वसैवास[१] पुर्ताच निर्माण होईल. यास्तव तूर्त कार्य ठीक करून ठेवावें. किलेदार आपलें चाकरच यैसेच करून आपल्या विचारांत आणून जेव्हां कार्य करू म्हणू तेव्हा होयें यैसे आनसुंधान ठीक करून ठेवावें. नासरजंग आपल्या लगामी लागला तरी उतमच जालें. स्थळें आपलींच आहेंत. तो लगामी न लागें आणि आपलें कार्य न होयें तेव्हा यासच ठिकाणी लावावयाचा उपायें करून ठिकाणी लाविला म्हणजे सारीच स्थळें आपलें पदरी पडतील. तेव्हा तिहीचाच मजकूर काये आहे? सारांश तूर्त अनुसंधान ठीक करून सारा दोरा राजश्री मल्हारपंत यांचे हातीं देऊन तुम्ही स्वार होऊन आम्हाकडे येणें. लोभ असों दीजें हे विनंती. रा छ १ सफर.

¶*Bajirao writes to Tubajipant that he should proceed very cautiously so as not to alarm unnecessarily Nasirjung with whom friendly negotiations had already been opened. Severe measures should be resorted to only in case Nasirjang was unfavourably inclined towards the Poona Government.*

No. 75] [पौ. *6-4-1739*

पौ छ ८ मोहरम.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बापूजीपंत स्वामी गोसावी यांसी

पो बाजीराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष. सांप्रत तुमचे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लेहून पाठविलें पाहिजें. या नंतर उतरेकडील वर्तमान तरी, तोहमास्तकुलीखांन लाहूर घेऊन पुढें आला. दिलीहून महमदशाहा

---

१ भीति. Fearful, suspicious.

पातशाहां आमीरसहवर्तमान चालीस पनांस कोस पुढे गेले होते, येक दोन लडाया सामान्यच जाल्या. त्यावर तोहमास्तकुलीखान याची कजलबासांची फौज सादतखानाचे बुनगें खजाना येत होता त्यावर चालोन आली. शादतखान आगोधर पातशाही भेटीस आलें होते. त्यास फौजेचे वर्तमान कलताच खानदौरा व सादतखान त्यावर गेलें. लडाई मोठी मातबर जाली. ते समई सादतखान यास जिवंत धरून नेलें. खानदवरा त्याचे येक भाऊ व लेक समेत मृत्य पावलें. उमदे उमदे लोक बहुत पडिले आणखी लस्करचें माणूस पाचसात हजार रणीं पडिलें. येसे युध्य जाहाल्यावरी दिलीचे फौजेने मोठी धास्ती घेतली. त्याचा जोरा बहुत पाहून निजामनमुलुक याणी सल्याचा संदर्भ लाऊन आपण जाऊन भेटले. पातशाहास धरून द्यावें आणि आपले बरे करून घ्यावें हे दुष्ट बुधि चितांत आणून पातशाहासहि तोहमास्तकुलीच्या डेरियास घेऊन जाऊन भेट केली. भेटी जाहालियावर फिरून आपल्या डेरियास आले. दुसरे दिवशी तोहमास्तकुलीखान महमदशाहा पातशाहाच्या डेरियास आले तेंचसमई महमदशाहास कैद केलें. निजमनमुलुक व कमरदीखांन यासहि कैद केलें. कुलपातशाहाचें व आमिरांचे कारखानें जफ्त केलें. सादतखान या बराबरी आपली फौज देऊन दिलीस पाठविले. तेथे आपली द्वांही फिरविली. मागाहून आपणहि दिलीस दाखल जाहालें. दिलीची पातशाही येकायेकीच बुडाली. या उपरी दक्षणेस चाल करणांर. मोठे आरिष्ट आहे; याची आगोधर तरतूद व पैरवी करावी. आणि मातबर फौज जमा करून हिंदुस्थांनची फौज सामील करून घ्यावीं आणि चमेलीपलीकडेच लडाई घालून तिकडेच गुंतवावें. ईकडे पराश्रम होऊ देऊ नये. याजकरिता यें गोष्टीची तरतूद करणे ते करीत आसों. बऱ्हाणपुरीच मुकाम आहे राजश्री स्वामीस विनंतिपत्रें फौज सामील व्हावयाविसी पाठविली आहेत. गड किलियास सामान करावा लागतो. तरी तुम्ही पाच हजार रुपये पावेतो (पुढीलबंद गहाळ)

¶*This is an important letter written by Bajirao to Bapuji Shripat about Nadirshah's attack on Delhi. The last half of the letter is unfortunately missing. He first describes how Khan Dauran and Sadatkhan were completely defeated by Nadirshah and how he aroused terror in Delhi by confining the Emperor and his ministers and by confiscating all their belongings. Bajirao proposes to prepare for action by collecting all his forces and to encounter him on the other side of the Chambal. The addressee is asked to approach the King and request him to issue orders for the mobilisation of the army and to remit some money.*

---

१ प्रवेश.

No. 76] [7-4-1739

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

विनंती सेवक मलार दादाजी सां नमस्कार विनंती ताा छ ९ मोहरमपर्यंत सकल वर्तमान स्वामीचे कृपादृष्टीकरून यथास्थित असे विशेष. चिरंजीव राा बाबूराऊ[1] यांजकडून कासीद जोडी दोन जयनगराहून येथे आले. स्वामीचे नावें लाखोटे याजपासीं आहेत. आम्हास तों चिरंजिवाचे पत्र नाहीं अथवा आणिक कोंणाचे नाहीं. श्रीमंत राजश्री रायांचे लस्करांतूनच हे कासीद आले. त्यांचेहि पत्र आम्हास नाही हस्तनापुराकडील वर्तमान तहकीक कांहीं न कललें. कासिदांस जबानी पुसिलें. त्याणी सांगितले की तोहमषकुली दिलीस आला होता, त्यास मारिले, महमदशा तख्ती बसोन द्वाही फिरावली येसें वर्तमान सांगितलें. परंतु लेख दृष्टीने पाहिला नाहीं यावरून चितास निश्चय न कले. निमित्य सेवेसी विनंती लिहिली असे. साकल्य वृत लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. नासिकचे वर्तमान काल दोन पत्रीं लिहिलें आहे त्यावरून निवेदन जाले असेल. काा वणी येथे मोगलाचे ठाणे होते ते टाकून गेले. निमित्य आम्ही आपले लोक व राा कालोजी भोसले याचे कमाविसदार पाठऊन ठाणे बसविले. मुलकाचा वसूल तों बहुतेक मोंगलाने घेतला आहे. रेजो[2] बाकी राहिली ते वसूल घ्यावी. त्यास मातुश्री उमाबाई याणी काली शंभर राऊत वणीस पाटविले आहेत. ती ठाणे घेणार यैसा विचार आहे. येविषींचा बंदोबस्त करावयास स्वामी खावंद आहेत. नासिकचा तह करावयास सदासिव कासी येणार होते त्यास येसजी बलकवडे यांचा विचार येसा जाला. यास्तव सदासिवपंत प्रस्तुत उमाबाई यांचे विचारांत आहेत. उमाबाईचे चितांत आपलें ठाणें नासिकीं ठेऊन परगणियाची मोगलाईचा वसूल घ्यावा यैसें आहे. सेवेसी विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Malhar Dadaji to Chimaji, asking news of Baboorao's doings in the North.*

No. 77] [पो. *20-4-1739*

छ २२ मोहरम.

आसीर्वाद उपरी. आवजी कवडे मोडल्यावरी राजश्री स्वामीनी वर्तमान आइकून संतोष तो मानिला. तथापि दरबारच्या व त्या गोष्टी चितांत आणीन

---

१ लेखकाचा मुलगा. २ तुकडा, अंश.

म्हटल्यास समये नाहीं. काडी इतके बिखर न दाखविता सर्वप्रकारे गम खाऊन मातबर काम करावे, मोगल बुडवावा, रकारपूर्वकास कागदीपत्रीं बिखर काहीं न ल्याहावे; म्हणजे लगामी लागून कृतोपकार मानील. लगामी लागलेया आवजी कवडे याची वस्तभाव सुतलीचा तोडा तोहि देईल म्हणून लिा ते अवगत जाहाले. यैसियास चाकरा चाकरात होऊन गेलियात अन्याये त्याचा काये आहे. आणि आम्ही बिखर कशास दाखवावे? त्यास लिहिणे ते समाधानपूर्वकच लिहित असतो, व त्याणीहि जाहले गोष्टीचे भये मानून नम्रतेचेच पत्र पाठविले आहे. वस्तभाव आवबासी सोडून देतील व आम्हांसहि सर्व प्रकारे त्याचे समाधान रक्षून लगामी लाऊन घेणे लागले. प्रागतनवान आणि बरा धाडसी आहे. आणि आम्हांस पुढे नादरशाहाच्या उपमर्दाचा मनसुबा कर्तव्य यास्तव सर्व प्रकारे गम खाऊन समाधान करून लगामी लाऊन घेऊ. चिरंजीव राजश्री नाना यासहि लिहून पाठविले आहे. तेहि त्यास लेहून रघूजी भोसले यास आपल्या विचारांत येतसारिखे करितील. प्रस्तूत आऊजी कवडे व सरलस्कर गढे प्रांते गेले आहेत. लोभ आसो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji Appa, advising him to try to win over Raghuji to their side as he would be of much use when they marched against Nadirshah. Raghuji should be addressed in a conciliatory tone although he had put down Awaji Kawade.*

No. 78] [पौ. *27-4-1739?*

पौ छ २९ मोहरम

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. मयारामाचीं पत्रें दिल्लीहून आजी राजश्री स्वामीस आली आहेत. लाखोटे फोडून वाचून पाहिले नाहीं. लाखोटे फोडून वाचून पाहतील तेव्हां असेल वर्तमान तें लेहून पाठऊं. कासिदानी मात्र जबानी सांगितले कीं तुरेबाजखान मृत्य पावले. स्वामीस कळावे याकरितां लिहिलें आहे. सेवेसी विज्ञापना.

¶*Malharpant Purandare to Chimaji, communicating news from Delhi about Nadirshah's invasion.*

No. 79] [12-5-1739 ?

नकल

श्री

श्रीमंत राजश्री पंत दादा+ स्वामीचे
सेवेसी

पो शामजी गोविंद सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता वैशाख सुध १५ पर्यंत स्वामीचें कृपेंदृष्टीकरून येथास्थित असे. यानंतर वो आपाभट स्वामीची आज्ञा घेऊन आले ते शहरी सुखरूप पावले. वर्तमान सांगितले त्यावरून कळो आलें. इकडील वर्तमान तरी येथास्थित असे. नवाब नासरजंग नांदेडास आले. सैदजमालुदीखान यास व सुलतानजी निंबाळकर व चंद्रसेन जाधवराव यांस व चव्हाण वगैरे तमाम सरदारास नूतन जागिरा व नकदियांत खर्चास दिल्हे. सैदजमालखान यांस नकद दोन लाख व आठ लाखाची जागीर पा आठ ८ दिल्हे. याच प्रकारें सुलतानजीस पांचा लाखाचे माहाल ५ व धारूर किला मनुष्ये ठेवावयास दिल्हा. व चंद्रसेन यांस कल्याण कलबुरगे किला व आवसे किला मनुष्य ठेवावयास दिल्हा. पाचा लाखाची जागीर दिल्ही. दाहा दाहा हजार फौज मातबर ठेवावयास आज्ञा केली. ह्याप्रमाणे समस्तहि कलमंजारी[१] केली आहे, व आपणहि फौज ठेवित आहेत. राजश्री सुमंत हस्तनापुरीहून प्रस्तुत येथे आले आहेत. यांस माहाराजाकडे पाठऊन स्नेह संपादून रा राघोजी भोसले व राजपुत्र यांची फौजा साह्य करून श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांसी बिघाड पुरता करून समजावें येसें चितांत आणिले आहे. * * जेबेगी व राजश्री गणेशपंत कुंटे श्रीमंताकडे पाठविले आहेत. जरी श्रीमंतहि जफ्ती (जप्ती ?) मोकूफ[२] करून पहिले करारप्रा वर्तले तरी उतम; नाहीतर याप्रा कटाव आरंभिला आहे. मोठी खराबी आहे म्हणून राजश्री गोविंद बलाल कुंटे नवाबाबा आहेत त्याणी लिा आसे. श्रीमंत बऱ्हाणपुरावरी आहेत. आवजी कवडे दाहा पंधरा हजार फौजेनसी वराडात आले आहेत. त्यास फिरोन आपणाजवळ बोलाविले आहेत. याप्रमाणे गडबड दिसते. पुढे पाहावे गोष्ट कोण्या थरास जाईल. याउपर स्वामीनी सावध असावे. रा बाबूजी ना व निकम जफ्तीच्या वसुलावरी आहेत. नेवासे टोके इकडे, त्याजवर रा कृष्णराव माहादेऊ दोन हजार फौज घेऊन गेले आहेत. बहुतेक तों त्यास कललियावरी पलीकडे

+ दादोपंत पुरंदरे=मल्हाद तुकदेव असावा. १ सैन्य जमवण्याची तयारी. २ तहकूब.

सरकतील. न गेल्यास कठीण. सांगे[1] नवाबाची आज्ञा नाइकांसी परिछिन समजावयाची आहे. स्वामींनी याउपर सर्वासी रसायेण संपादून चंदे[2]रोज त्या प्रांते राहाणे तर राहावे. मागाहून विस्तारे लिहितो. राजश्री राऊजी जयेनगरी सुखरूप आहेत. पत्रे येत असतात. चिंता न करावी. धोंडोपंत वकीलें[3] श्रीमंताकडे यावया जयेनगरीहून निघाले आहेत. बहुधा ब-हाणपुरास दाखल जाले असतील. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Shyamji Govind Takle, the Peshwa's agent with the Nizam, sends to Purandare news of the activities of Nasirjung.*

No. 80] [*25-5-1739*

छ ४ रालोवल

श्री

आसीर्वाद उपरी. तुम्हाकडे पत्रे पाठवावयास लिहून दिलीकडील दुसरे वर्तमान यावयाची वाट पाहात असतां काल छ २६ सफरी राजश्री बाबूराऊ मल्हार याची पत्रें छ ११ सफरची पत्रें आली. त्यात लिहिले कीं नादरशाचा पुत्र छ ६ सफरी सालिमार बागात गेला. छ ७ सफरी नादरशा महमदशाहा यास दिलीत ठेऊन शालिमार बागांत दाखल जाहालें. अमीर पावीतें शालिमार पावेतो गेले होते. त्यास ताकीद करून निरोप दिल. सालिमार बागांत तीन दिवस राहून दरकूच पुढे जाणार. * * फरमान पाठविला आहे. त्यास लिहिले * * * हिंदुस्थानचे पातशाहा * * पातशाही राखून आपण जातो. तुम्ही पुरातन चाकरीचे आहा तरी आज्ञेंत वर्तणूक करीत जाणे म्हणून ताकिद केली आहे. महमदशास रोडसोड हती शंभर दिल्हे व पनास लक्ष रुपये दिल्हे. काही घोडी दिल्ही. सवाईजीनी पाच लक्ष रुपये व पाच हती पातशाहास पाठवावयाच्या विचारात आहेत; पाठवितील. व वस्त्रे पातशाहास व अमीरासहि पाठवणार. आपणहि काही वस्त्रे व हती पाठवावे उचित आहे. तजवीज करावी लागेल. राजश्री बाबूरायानी लिा आहे कीं आपणास निजामन-मुलूक याणी व पातशाहानी बोलाविल्यास जावे की न जावें ते आज्ञा जाहाली पाहिजे म्हणून लिा आहे. यैसियास त्याणी जावे कीं न जावे, राजकारण कोण्याप्रकारे राखावे, ते लिहिलें पाहिजे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji Appa, asking advice as to what attitude the writer should take as regards the dispositions effected by Nadirshah at Delhi.*

---

१ . २ कांहीं दिवस. ३ धोंडो गोविंद=पेशव्यांचा वकील जयपुरास.
४ पोचवीत.

No. 81] [*14-7-1739* ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक शामजी गोविद सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आखाड वदी ९ पर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून शहरी येथास्थित असे. यानंतर यथील वर्तमान राणोजी देवजी जासूद याबाा मुफसल[1] लिहिले आहे. ती पत्रें पावलीच आसतील. आलीकडे नवल विशेष तर राा आबाजी नाा जोसी याची पत्रे श्रीमंत राजश्री येजमान स्वामीचे लस्करातून आलीं. श्रीमंत राजश्री नर्मदा सेनेसहवर्तमान तुबाडीचे घाटे उतरले. कूचदरकूच या प्रांतास येत आहेत. नर्मदातीराहून कासद लस्कर सोडून आला. बलकी आज काल बऱ्हाणपुरापलीकडे येक मजल लस्कर आले आसेल. विदित होये. हस्तनापुरीहून राजश्री बाबूरावजीकडून पत्र छ ११ सफरचे आले. पातशाहाची भेट जाली नवती. सिदी जोहर वगैरे आरब याणी वीसरोज्यासाठी दंगा येथे आपणावर केलियाचे वृत पूर्वी येक दोन विनंतीपत्रीं लिाा आहे. मुजरद आजूरदारहि पाठविला आहे. त्यास आद्याप पारपत्यपुरसर उतरे सेवकावर कृपालू होऊन न आली. प्रस्तुत त्याणी आतिशये दंगा केला आहे तो पत्रीं कोठवर लिहावा? जर वीसरोज सरकारांत राहिला आहे तर ६२० रुपये होतात. त्यापैकी रुपये ५०० पाचसेवर मुकरर केले आहेत. ते द्यावे न द्यावे आज्ञा करणार स्वामी आहेत. वीस रोजा राहिला नसेल तर त्याची कबज इा नौकरी ताा रुसखती मोघम आसिली तर ते वजा. नासरजंग सफीउलाखान कोतवाल यास पत्रे की आरबाची तलब[2] कऱ्या कुल चुकऊन दिल्हा आसता हाली शहरांत जाऊन शामजी गोविद व जोतीपंत बासिंगे साहुकारीने आहेत त्यासी बाईलत[3] इकडून नाहक मुजाहीम होतात तर त्यास ताकीद व तंबी करून मुजाहीम[4] न होत ते करणे, यैसी पत्रे व कबज आति सत्वर पाठविणार स्वामी आहेत. पूर्वीपासून आपणासी कजिया कषमकी[5] करीतात. त्यास आपणावर आंगेजून जाबसाल करून आजवर ठासून ठेविले. हाली सबलसिंग तिकडून आला आहे. त्याणे खंदे चालीस पंनास माणूस जमा करून कजिया आम्हासी रुजू केला आहे. येऊन जाऊन आपले प्राणासी गाठ पडते. शहरांत आमचा वाली कोणी आहे नाहीं हे कलतच आहें. स्वा * * * * कागदपत्राचाहि उपराला न होये तेव्हा आपले करणच हक

१ सविस्तर. २ पगार, तनखा. ३ ?
४ प्रतिबंध करणारा. ५ ?

नाहक आहे. कालीच तेथे आरब चाकर आहेत त्याची हुडी जोतीपंतावर पाचशे रुा आली. ते रुा त्याणी घेतले. त्याणी सिदी जोहर वगैरे हरामचोदास सागितले. त्यावरून दाहा पाच माणूस जोतीपंतांचे घरास जाऊन कजिया केला. तेव्हां त्यास कोणी सागितले की, शामजीपंती तुम्हाकडे पाठविले; त्यावरून त्याणी विवेक न करितां कोतवालापासी जाऊन सागितले की, आपणासी काही त्याचा दावा नाही. नाहक कजिया करितात. दावा आहे तर बाबूराऊ यांसी आहे. त्याचे निसबतीचे शामजीपंत आहेत त्यासी आहे. त्याचे गळां जाऊन पडावे यैसे सांगितले. ते वृत आरबाकडील प्यादे होते त्याणी ऐकिले. त्यावरून आज पाहाटेपासून दाहा माणसे निःसंग लडाईवरच येऊन आपले घरी बसले आहेत. आजवर आपण आपले * * * * ट लागो न देतां जाबसालावर ठासून ठेविले होते. आतां घरांतच फूट होऊन त्याजला जाहीर जाले. खरे आगर लटके औबुज[1] जातीस विचार कोठील? याप्राा जोतीपंती खता केली. आपण आज सा मास हा कजिया सोसितो, तेव्हा जोतीपंतास रघुनाथपंतास लाऊन न दिल्हे, आणि आतां लाऊन कैसे देऊन. हाली आपण लाऊन दिल्हे आसतील तर स्वामीचे पायाची शपत आसे; व सर्व आलमास ठावके आहे तेच आपले हातचा दरेरा देतील. आद्यापहि आपण आलाहिदा होऊ सकतो; परतु पाजी माणसासी समध. यास्तव आपणावर कजिया वोढितो. माहादजी खंडोजी याणी नजरेने हकीकत पाहिली आहे. सेवेसी विदित करितील. याउपर विनंतीचे पारपत्य करणार स्वामी आहेत. फार काये लिहावे हे विज्ञप्ति.

¶Shamji Govind Takle, the Peshwa's envoy at the Court of Nizam-ul-mulk, speaks of his difficult position and requests Chimaji Appa to send him assistance in troops.

No. 82] *[3-11-1739*

छ १२[2] रमजान

श्रीशंकर

राजश्री चिमणाजी पंडित अपा गोसांवी यांसी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये स्वानंदलेखनाभिव्रधी करीत असिलें पाहिजे विशेष. उतर प्रांताहून

---

१ आडदांड. २. २२ अंकाचा खोडून १२ केलेला दिसतो.

तांब्राची सेना आली आहे त्यांचा पराजये कर्तव्यार्थ. येदंनिमित्य सामील व्हाव्र-याविषई राजश्री स्वामीचे आज्ञापत्र व राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांचें पत्र रा। गुणाजीराव सामुणकर घेऊन परसोपंताचे नेरच्या मुकामीं आले. ते परिसोन चित संतोशातें पावलें. यैसियास आपणावितरिक्त अंम्ही काये अहों? यास अमचा मनसब्रा होता जे राजश्री कान्होजीबावा भोसले यांची जागा भांब, तेथें जाऊन मोरचे लाऊन ते स्थळ हस्तगत करावें. परंतु हे कार्य मसलतीचे. अगत्यवाद जाणून तो विचार टाकून राजश्री रायांकडे जावयाचे उदेशें कूच करून माघारें फिरून, सालबरडी नजीक घाटतोंडे आलों, तंव्र सुज्यायेतखान अळजपूरचा सुभा याने तीन वरशे अमचा ज्याहरम[1] दिल्हा नाही वकील पाठविले होते ते देखील उठऊन दिल्हे अणि बहुतसा गर्वाभिमाने फौजबंदी पोख्तें[2] करून अडवा चालोन अला, तेव्हा त्याचा परामृश करणे जरूर जाहालें. अणि त्याचे पारपत्याविषई अपणहि पूर्वी येक दोन वेळां पत्रें पाठविली होती. या करितां युध्यास प्रवर्तलों. त्यासी अंम्हासी युध्य तुंबळ जाहले. राजश्री स्वामीचे पुन्य प्रतापें व अपलें कृपेकरून त्यास हतप्रभाव करून हस्तगत केलें. त्याचा आक्रम लयातें पावविला. याउपरी मजल दरमजल फौजेनिसी राजश्री रायांकडे जात असों. तरी अमचें विशई त्यांस जे लेखन कर्तव्ये ते करून पत्रें पाठवावी. येतद्विशई विस्तारें ल्याहाविसें नाही. सर्वप्रकारें अपले पदरीचे असों. आपण येशाधिकारी आहेतीं. या मामलियाचा मानाभिमान सर्वोत्कर्षे चिती धरून उर्जित केलियां येश किर्ति आपलीच असें. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंति.

अष्टकोनी शिक्का
श्री
शाहुराजपदांभोजभ्रमरायित-
चेतसः। बिंबात्मजस्य मुद्रैषा
राघवस्य विराजते॥

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhosle to Chimaji Appa, informing him that as per instructions from the King and Bajirao he is proceeding to join the main army under Bajirao to fight against Nadirshah. The writer also describes a certain action which he had with Sujayatkhan, the Subha of Alajpur (Ellichpur), who refused to pay his dues.*

२ चौथाई. २ पूर्ण, भरपूर.

No. 83] [1739-40?

श्री.

तीर्थरूप राजश्री बाबा वडिलांचे शेवेशी अपत्यें बापूने कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १३ माहे रावल मु॥ इंद्रप्रस्थ वडिलांचे आसीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. येथील साकल्य वृत श्रीमंत स्वामीस विनंतीपत्रीं लिहिलें असें, त्याजवरून सविस्तर श्रृत होईल. यानंतर फर्मान व नवाब बादर व निजामनमुलुक यांची पत्रें श्रीमंताच्या नावाची व सैदलश्कर खानाचे नावाचे पत्र यैसी पाठविली असेतीं पावतील वडिलांचे नावाचा फर्मान व तेथील ताम्राकडील सरदार यांस निजामनमुलेकाची पत्रें तयार होतात, तें मागाहून सेवेसी येऊन पावतात. पेशजी निजामनमुलुकाची पत्रें परभारें यांच्या सरदारकडे गेलीच आहेत. सैदलश्करखानाचें पत्र पाठविलें आहे. त्यास दोन मजली आलीकडे बोलाऊन व वडिली दोन मजली येऊन भेटून रसरंग राहून बोलबाला निजामन मुलुकाचा होय ते गोष्ट करणार वडील समर्थ आहेत. हजरत जीलसुभानी[१] छायाखाले येऊन सर्व लहान थोर यांस देखतां बोलिले कीं, मी आपल्यास रामचंद्रपंतास[२] सोपिले आहे. बरे करोत अथवा वाईट करोत. हा यख्तियार त्याचा आहे. याप्रा। बोलिले. त्यावरून निजामनमुलुक बोलिले जे, हजरतजी, आपल्यास ज्याचे हवालें केलें इतका तर्फजूल[३] त्याचे हकांत हजरतचा त्यास पाहिजे जे आम्ही अरको[४] नाही त्यासी किबले काबे जाणावे मग वजीर मुमालिक व अमीरुल[५] उमराव याणीहि बहुतसी तारीफ केली. त्यास निजामनमुलुकाची सरदारी आहे ते वडिलांची आहे. पातशाहापासी सुरूखुरू करणार वडील समर्थ आहेत. बहुत काय लिहिलें, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*This appears to be a letter from Bapuji Hingne to his father Mahadev Bhat, giving news of the Emperor's plans and advising the addressee to befriend the Nizam.*

No. 84] [12-3-1740

आशीर्वाद उपरी. रा॥ फतेसिंग व रा॥ रघुजी भोसले यास येथील सला जाहाल्याची पत्रे आम्ही पाठविली तेहि खालते बेदरप्रांती गेले. आम्ही मोगलास जरबेत आणून सला केला यावरुन राजश्रीस बाजीराऊ प्राग्तनवान जे चितावर

---

१ जीलसुभानी = ईश्वराची छाया, बादशाहाचें विशेषण. २ हा रामचंद्रपंत कोण ?
३ कृपा, उपकार. ४ लहान. ५ बडा सरदार.

धरतात ते करतात येसे भोसल्याचें वृत माहादोबानीं तुम्हास लिा ती पत्रे तुम्ही पाठविली ती पावली. आम्हास नासरजंगापासून पाच लाख रुपये प्राप्त नसतां त्यांचे (शाहूचे) चिती प्राप्त जाले येसे आलें. असो. सलाबतीची गोस्ट उतम आहे. छ २४ जि(ल्हेज) हे आ(शीर्वाद).

¶*Chimaji Appa to Nana, referring to the reconciliation effected with Nasirjung. Shahu was pleased with the performance and success of Bajirao's undertakings.*

No. 85] [*8-3-1740 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक गोविंद सिवदेव आा सरदेशमुख मामले बीड व पाा पाथरी साा नमस्कार विनती उपरीं. सेवेसीं विज्ञेप्ति कीं स्वामीचे आज्ञापत्र छ २० माहे जिल्हेजी मढीचे मुकामी येऊन पावले, तेथें आज्ञा कीं नासरजेंग व राजश्री सुलतानजीराव निंबाळकर व राजश्री चंद्रसेन जाधवराऊ हे कोणे ठिकाणी आहेत, व फौज कितेक आहे व मनसुबा कर्तव्य काये, तैसेच राजश्री फतेसिंग भोसले व राजश्री रघोजी भोसले यांसमागमें फौज काये जमा जाली आहे, ते कोठे आहेत, कोणत्या रोखे जातात, कर्तव्य काय, हें सविस्तर वर्तमान मुजरद मानूस पाठऊन तहकीक आणऊन लेहून पाठवणें. त्यास आज्ञेप्रमाणें मुजरद मानसें पाठऊन वर्तमान अणविलें. त्यास त्यांचें वर्तन यैसें आहे कीं नासरजेंग व जमालुदीखान शहरीहून स्वार जाले, ते शहागडावरी आले. समागमें फौज सा सात हजार आहे. यांवेगळे राजश्री चंद्रसेन जाधवराऊ दोंशां स्वारानसी आहेत; व चव्हान पनासा स्वारानसी व राजश्री सुभानजी थोरात शंभरां स्वारांनसी व रो धिराजी पोवार पनासा स्वारानसी यैसे मिळोन आठेक हजार स्वार आहेत. शहागडावरी दोन तीन मुकाम होते. तेथून राजश्री सुलतानजीराव निंबाळकरास सांडन्या व अहादी[1] बोलाऊं पाठविले होते, त्याचे उत्तर नासरजेंगास आलें कीं तुम्ही धारुरावरी येणें, आपणहि तेथें मुलाजमतीस येऊन. यैसें उतर आलियावरी नासरजंगी वैशम्य मानून तेथून कूच करून धारूरावरी गेले. इकडून खरडियाहून राजश्री सुलतानजीराव निंबाळकर हेही गेले. तेथें मुलाजमत जाली, परंतु चित शुध नाहीं. मग हे व ते यैसे मिळोन पुढे भागानगरच्या रुखे गेले. दुसरें वर्तमान कीं राजश्री फतेसिंग भोसले व राजश्री रघोजी भोसले यांसमागमें

---

१ लढाऊ स्वार.

फौज दाहाबारा हजार आहे. भागानगर प्रांतें जातात. राजश्री रघोजी भोसलियांनीं नारायणपेठ मारली, व हुमनाबादही मारहि ; व वीरपा चंद्रसेनाकडील होता, त्यांसीं व रघोजी भोसलियाचे फौजेसीं झुज जाले. वीरपाचा मोड जाला. त्याची सें दोनसें घोडीं यांचे हातीं लागलीं. विरपा पळोन गेला. येसें वर्तमान जालें. हें वर्तमान राजश्री चंद्रसेन जाधव यास कळलियावरी त्यांनीं नासरजेंगास सांगितलें. त्यानंतर नासरजेंगांसहि रा। रघोजी भोसलियावरी राजश्री सुलतानजीराव निंबाळकर व चंद्रसेन पाचा हजारां फौजेनसी तैई (?) केले. त्यास ते पुढें हे मार्गे जात आहेत. त्यास आतां खबर उडाली आहे कीं यांचें व त्यांचें झुज जालें. त्यास मागती जासूद पाठविले आहेत. तहकीक खबर आलियावरी सेवेसी साकल्य लेहून पाठऊन. यानंतर बीडपाथरीचे मामलियेतीचें वर्तमान तरी खरीफ [यापुढील सुमारें अडीच बंद मजकूर या दोन मामलतीसंबंधानें वसुलाच्या हिशेबी अडचणी सांगणारा असल्यामुळें सोडून दिला आहे.] श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीही नासरजेंगास शहरास बोलाविलें आहे, म्हणऊन वर्तमान आहे. त्यास ते भागानगर सोडून शहराकडे येतात. सेवेसी विदित होय. विशेष काये लिहिणें हे विज्ञाप्ति.

¶*Letter from Govind Shivdeo to Chimaji Appa, giving news of the movements of Nasirjung and his Sardars Sultanji Nimbalkar, Chandrasen Jadhao and of Fatesing and Raghuji Bhonsle.*

No. 86]

श्री

यादी पारसी पत्राचा आन्वय सुा।
ईहिदे समानीन मयां व अलफ

छ १४ रमजान सन जलुसी महमदशा पातशा सन १२	१	गुजराथ सुभ्याची पत्रे चौथ सरदेशमुखीच्या अमलाविसी माहालोमाहाली पत्रे ४४ चवेतालीस बमोहर सर बुलंदखान याची त्याचा मा।र देसाई व कानगो व मोकदम व रयेत व मुजारी यांस लिहिले जाते की, चौथ व संदेशमुखी चवेतालीस महाल सुभे गुजराथ येथील खंडेराव यांजकडून तगीर करून बाजीराव यांजकडे करार केली तर माल व सायेर पौ। चौथाईचा हिसा व रयेतकडून सरदेशमुखी हिसेब प्रो। देत जावी म्हणौन पत्रे सुमा ४४

---

१ रवाना ?

[25-4-1739

छ २७ मोहरम सन हिजरी ११९२

१ नादरशाहाचा फरमाना कीं, महंमदशाहाची व आमची दोस्ती जाहाली. तुम्हीहि त्यांच्या स्नेहात आसावे म्हणौन बाजीराव साहेब यांच्या नावें.

[10-3-1728

६ सरदेशमुखी व चौथाई साहा सुभे दक्षणचे आमलाविसी निजामनमुल्क यांच्या मोहरेनसी साहा सुभ्यास सनदा साहा येक मोहरी सनदा

छ ९ शाबान सनं हिजरी ११४०

१ सुभे महमदाबाद बेदर
१ सुभे औरंगाबाद
१ सुभे बिज्यापूर
१ सुभे वराड
१ सुभे खानदेश
१ सुभे हैदराबाद
―
६

सनदा साहा त्यांतील मार सांप्रत चौथ सरदेशमुखी सदरहू सुभ्याची पेशजी प्रो शाहू राजे यांजकडे बाहाल केली. त्यास राज्याकडील सरदेशमुख व कमाविसदार याणी रयेतेस आपलेकडून राजी ठेऊन आबादी व लावणी विशेष होये ते करावें. हिसेबखेरीज जाजती उपसर्ग न करावा. देशमूख व देशपांडे व मोकदम व रयेत व मुजारी सदरहू सुभ्याचे याणी चौथाई व सरदेशमुखीचा हिसा जमाबंदीप्रो शाहू राजे याजकडील कार व सरदेशमूख यांस देत जावा म्हणौन.

६ साहा सुभे दक्षणच्या चौथ सरदेशमुखीच्या अमलाविसी निजामनमुल्क यांच्या मोहरेनसी सुभेदारास ताकीदपत्रे सुमार

पत्रांत सन व तारीख नाही.

१ राजे गोपालसिंग सुभेदार बेदर
१ औवजखान सुभेदार औरंगाबाद
१ ताल्हा (?) मोहिदीखां सुभेदार विज्यापूर
१ सैद जमालखां सुभेदार वराड
१ हफीजुदीखान सुभे हैदराबाद
१ चिकीलीचखांन सुभेदार खानदेश
―
६

येकूण साहा ताकीदपत्रें त्यांतील मार कीं, सदरहू सुभ्याची चौथ सरदेशमुखी पेशजीप्रमाणें शाहू राजे याजकडे बहाल करून हरयेक सुभ्यास सनदा आलाहिदा सादर जाल्या आहेत; तर तुम्ही राजे यांकडील मोकासदार व सरदेशमूख यांस माहलोमाहलीं आमल देऊन चौथाई व सरदेशमुखीचा औवज जमाबंदीप्रो पावता करीत जावा म्हणौन पत्रें.

[10-3-1728

१२ यैवजखानाच्या माहरेनसी चौथ सरदेशमुखीच्या आमलाविसी आमलदारास ताकीदपत्रें:

छ ९ साबान सन हिजरी ११४०

१ प्रो पाथरी
१ प्रो जालनापूर
१ वासीम व सेरपूर
१ प्रो नरसी
१ प्रो मंगलळूर
१ प्रो रमेतपूर
१ प्रो आकोले
१ प्रो बोरगांव
१ प्रो हासनबीड
१ प्रो खानापूर
१ प्रो माहागांव
१ प्रो दर्यापूर

१२

बारा ताकीदपत्रे त्यातील मार चौथाई व सरदेशमुखी साहा सुभे दक्षणची पेशजी प्रो राजे शाहू यांजकडे बाहाल जाली. त्यास राज्याकडील कमावीसदार माहलो माहली येतील, त्यास तुंम्ही आमल देऊन जमाबंदी प्रो हिसा देत जावा; म्हणौन येक मोहरी पत्रें.

[9-2-1728

छ ९ रजब सन जुलुषी ९

१ सुभे गुजराथची सरदेशमुखीची सनद सरबुलंदखांन याच्या मोहरेनसी त्यांतील मार कीं, सुभे मारची सरदेशमुखी च्यार लक्ष तेरा हजार आसी रुा तेरा आणे नजर घेऊन शाहू राजे यांजकडे मुकरार केली. त्यास राज्याकडील कादार याणी नजरेचा ऐवज खजान्यांत दाखल करावा व सरदेशमुखीचा हिसा

सेकडा दाहा रुा करार केला, त्याप्रो घेत जावा. ज्याजती उपसर्ग न द्यावा; व चांगल्या जमावानसी पातशाहाची चाकरी करीत जावी व मुलकाची आबादी व मुफसद[1] याच्या पारपत्याविसीं निरंतर सादर आसावें कदाचित कोणाच्या येथे चोरी जाली तर चौकसी करून चोराचे पारपत्य व ज्याचा माल त्यास द्यावा व खालश्याच्या माहालाच्या वसुलाविशी सरकारच्या आमलाची व जागीरदाराची मदत करीत जावी. म्हणौन देसाई व चौधरी व कानगो व मोकदम व रयेत मुजारी यांस.

[9-2-1728

छ ९ रजब सन जलुषी ९

१ सुभे गुजराथची चौथाईची सनद सरबुलंदखांन व अलाबिरदीखांन याच्या मोहरेनसी करोडे व जागीरदार व फौजदार व ठाणेदार देसाई, कानगो व मोकदम व रयेत व मुजारी[2] याच्या नावे. त्यांतील मजकूर कीं, बाजीराव याणी विनंती केल्यावरून मुलकाची आबादी व रखवाली व मुफसद यांच्या पारपत्यावर नजर देऊन सुभे मारची चौथाई आडीच हजारा स्वाराच्या सरंजामाबदल राजे शाहू यांजकडे मुकरार केली. त्यास चौथाईचा हिसा तुम्ही तफावत न करिता राज्याकडील कमावीसदारास देत जावा. राज्याकडील कमावीसदार याणीं रयतेस राजी ठेऊन आबादी व लावणी विशेष होये ते करावे व हिश्या-खेरीज जाजती उपसर्ग न द्यावा. सदरहू स्वाराच्या जमावानसी हजीर राहून चाकरी करीत जावी; व चौथाईच्या वसुलास हरयेक पर्गण्यात दोन तीन माणसे ठेवीत जावी व सरकारचे आंमलदार व जागीरदार यांसी येकविचारे आसावे. सदरहू करारखेरीज कोणी वर्तुणूक करील त्यास तगीर करावे. सरकारच्या आमलदाराचा आपराध आसल्यास आम्हांस ल्याहावें. पारपत्य केले जाईल म्हणौन.

---

१ बंडखोर. २ शेतकरी.

[27-8-1743

१ कमरदीखान यांच्या मोहरेनसी मालव्याच्या सुभेदारीची सनद व फौजदारी नानासाहेब यांच्या नावें. त्यातील मार पातशाहाच्या हुकुमाप्रो मालव्याच्या सुभेदारीची नियोबत[1] तुम्हाकडे मुकरार केली. त्यास तुम्ही शहराची व परगण्याची व वाटेची रखवाली येथास्थित करीत जावी; व मुफसदाचे पारपत्य करून कोण जबरदस्त रयतेस जुलूम न करीत ते करावें म्हणौन.

छ १७ रजब सन जलुषी २४

[24-6-1743

१ मालव्याचे सुभेदारीचा फरमान बातशा महमदशा व कमरुदीखान वजीर याचे मोहरेनिसी नानासाहेबाचे नावे की, त्यातील मजकूर या दिवसात तुम्हावर कृपाळू होऊन मालव्याचे सुभेदारीची नियाबत तुम्हाकडे मुकरर केली. त्यास तुम्ही सुभ्याचा बदोबस्त व रयतेची उस्तवारी व मुफसदाचे पारपत्य यथास्थित करावे. व जे गोष्ट शास्त्राविगली असेल ती होऊ न द्यावी व कोणाहि जबरदस्ताचा उपद्रव गरिबास न होय ते करावे. सदरहू लिहिल्या मजकुराविसी सर्वकाल सावद असावे म्हणौन.

छ १२ जाावल सन जलूस २४ पत्र बादशाहाचे येकच परंतु वर मोहर कमर्दीखानाची असे.

[8-9-1738

१ महमदशा बातशा याचा फरमान बाजीरावसाहेब याचे नावे. त्यातील मजकूर कृपा करून तुम्हास जाहागीर व मनसब व माहाल व वतन हकराई लोकासहित दिल्ही खिलत[2] उमंदा[3] व जिगा[4] व सरपेच व मोत्याची माल व येक हती व येक घोडा पाठविला आहे. तरी तुम्ही येकनिष्टपणे राहून सरकारची चाकरी करीत असावी म्हणौन.

छ ४ जाखर सन जुलषी १९

१ सवाई जैसिग याच्या मोहरेनिसी तहनामा बिदीहाल बद

१ मुतालिकी. २ वस्त्र; ३ उमदा=उंची. ४ (?)

उमरखेड वगैरे माहाला-विसी.	१	ऐवजखान याचे मोहरेनिसी पत्र अजीनबेगखान याचे नावे. त्यातील मजकूर चौथ व सरदेशमुखी साहा सुभे दक्षणची पेशजीप्रमाणे शाहू राजे याजकडे बाहाल जाहाली. तरी तुम्ही राज्याकडील कमावीसदार व मोकासदार यास आपल्या परगण्यात अमल देऊन जमाबदीप्रमाणे हिसा देत जाणे म्हणौन पत्र

निजामनमुलूख याच्या खास दस्तुराची फर्द[1] त्यातील अन्वय बितपसील

सुभेदारी माळव्याची व दरोबस्त सुभा आमचे जाहागिरीत मुकरर व्हावा; व याच्या सनदा बादशाहाचे मोहरेनिसी करून द्याव्या	बातशाहानी कृपा करून पनास लक्ष रुा मदत खर्च मुकरर केला, तो याजकडून पावला, तर उतम; नाही तर आपण आपल्याकडून देवावा.
सुभेदारी माळव्याची आंम्ही आपलेकडून दिल्ही, सुभेदारीची सनद व जाहागिरीची सनद बातशाहास अर्ज करऊन देविली जाईल. तुम्ही येकनिष्टपणे शेवा चाकरी करीत जावी. अंतर न करावे.	बातशाई मुत्छद्यानी जे मुकरर केले असेल ते कोसीस करून देविले जाईल. नाहीतर आम्ही आपले सामर्थ्यानिरूप रयात करू.

म्हणौन येका पत्राचा अनवय आहे.

१४ जाबसाली फरमान व हातरोखे बातशा वजीर याचे मोहरेनसी

४ खानदौरा याची पत्रें बाजीराव साहेबाचे नावें

१ सालमजकुरी इकडे येणे होत नाही तरी पेस्तर साली तरी लौकर यावें. कौल करार जाले ते अमलात आणावे. उजनीपर्यंत आल्यावर धोंडोपंतासी ज्या गोष्टी जाल्या त्या सर्व घडोन येतालि म्हणौन.

१ गुदस्ता यावयास बनले नाही; हाली तरी यावें म्हणौन.

---

१ एकेरी पत्र.

१ धोंडोपंताबरोबर पत्र पाठविले ते पावले. काही मतालबी मजकूर लिहिला तो पातशाहास विनंती केला. पातशाहानी तुमचे लिहिल्याप्रो सर्व मतालब कबूल केले म्हणौन.

१ गुदस्ता लिहिले की आम्ही दिलीस येत नाही. त्यास यंदा तरी तुम्हीं यावें. उजनीपर्यंत आल्यावर हिकडून हि मातबर मनुश पुढें येईल म्हणौन.

४

१ फरमान नानासाहेबाचे नावें महमदशा बातशाहाचा फरमान अर्जी पाठविली ती पावली. त्यात लिहिले की आम्ही सरकारचे चाकरीत हजीर आहों. त्यास तुम्हीं अर्ज केल्या प्रमाणे जे आज्ञा करावयाची ती माहादेवपंत यास केली आहे. तुम्हापासी येऊन सांगतील त्याप्रमाणे चालावें. हुजुरची कृपा तुम्हांवर होईल म्हणौन.

१ महमंद अलीखानाचे पत्र बाजीरायाचे नावें; त्यातील मजकूर की तुमचा आमचा श्नेह बहुत दिवसाचा आहे. पुढेंहि तसाच असावा. हाली वेकाजीपंत याजबरांबर पंधरा छिटे कलंसपाकी पाठविली ती पावतील म्हणौन.

१ नरोपंत याचे पत्र बाजीरायाचे नावे: त्यातील मजकुर की तुम्ही दिलीकडे आला हे आइकोन संतोष जाहला म्हणौन.

१ गुलाम मेहेदीखान याचे पत्र बाजीरायाचे नावे की रासीनच्या किल्यास पठाणानी येऊन धामधूम केली आहे; त्यास कुमकेस फौज व खर्चास पाठवावे म्हणौन.

१ निजामनमुलुख याचे पत्र बाजीरायाचे नावे की कालाबाग वगैरे अबदुलाखानाचें जाहागिरींत आहेत. तुम्हांकडील त्यास उपद्रव लागतो. त्यास न लागावा म्हणौन.

१ फरमान महंमदशा याचा बाजीराव याचे नावे की खिलद सात, पारचें[१] व सिरपेच व तरवांर व हती व घोंडा तुम्हांसाठी पाठविला आहे पावेल म्हणौन.

---

१ पोशाख.

१ महमूदशाचा फरमान बाळाजी बाजीराव याचे नावें की येकनिष्ठतेवर द्रिष्ट देऊन रघोजी भोसले यास बातशाई मुलखात येऊन द्यावें म्हणौन.

१ मंहमदशा बातशाहा याचा फरमान नानासाहेबाचें नावे की तुम्ही अर्ज केला त्याचा जाब निजामनमुलुख व माहादाजीपंत याचें लिहिल्यावरून कळेल. आम्हाकडून तुमची खातरनिशा असावी म्हणौन.

१ खानदौरा याचे पत्र बाजीरायाचें नावे कीं पत्र पाठविले ते पावेले व धोंडोपंताचे सांगितल्यावरून सर्व विदित जालें. वजीर बंदोबस्तास नर्मदेवर येणार आहेत. धोंडोपंत सांगितील त्याप्रो तुम्हींहि यावें म्हणौन.

१ उमदतुलमुलुख याचे पत्र बाजीरायाचे नावे कीं तुम्हीं बातशाहास अर्जी व नजर पेशकश पाठविली ती पावली, त्याचा फरमान तुम्हांस पाठविला आहे. व पातशाहानी बाबूराव याजवळ सांगितले त्याप्रो करावे.

१४

१ निजामनमुलुख याचे दस्तकाची फर्द.

दक्षणचे कामाकाजाचा बंदोबस्त आमचे हाते घ्यावा ईश्वरीकृपेकरून दौलतखाई व किफाईत केली जाईल. बशर्त दौलतखाई तुमचे हाती घेतला जाईल.

आनंदराव शाहू राज्याकडून आपणापासी आहेत. त्यासी आम्हासी नीट नाही. सबब त्यास निरोप[1] द्यावा. आम्हांकडून कोण्ही आपणाजवळ राहील. रूकसद दिल्हीं.

येका पत्रातील अन्वय सरकारातून मतलब लिहून दिल्हां त्याचा जाबसाल.

९ सरकारातून राजे शाहू याणी मतलब लिहून दिल्हा त्याजवर निजामन मुलुख याणी दसखत केले त्यांची कलमें.

---

१ निरोप.

संभाजी राजे यास निरोप द्यावा की ते पुन्हाल्यास जात. रूकसत करितो.

पा। आकलकोट व खेड व तलेगाव व बारामती व इंदापुर व नारायणगड व पुणे वगैरे ठाणी पहिल्यापासून स्वराज्यात आहेत; हाली आपण सरकारची जप्ती केली ती मोकली करावी.

ठाणेदार व फौजदार यास लिहून दरोबस्त ठाणी तुमचे हवाली केली जातील.

साहा सुभे दक्ष (ण) च्या सरदेशमुखीची सनंद व स्वराज्याची सनंद नवी द्यावी.

पेशजीच्या सनदेप्रमाणें अमलदाराचें नावे परवाना दिल्हा जाईल.

बलवतसिंग वगैरे यांस पेशजी प्रों मनसबा जाहागिर देऊन सरफराज करावे.

कबूल.

बाजी संखपाल याणीं नापरूटी पा। चांदवड येथील मोकदमास जिवे मारिले. घोडे वगैरे वस्त भाव नेले ते माघारे देवावे.

संभाजी राजे यास विज्यापूर सुभ्या पौ। कृष्णा व पचगंगेपलीकडील प्रांत आम्हीं दिल्हा आहे व त्याची सनदहि आम्ही करून दिल्ही तेच असावी. आपण न द्यावी.

हे कबूल केले.

सिलमखान वगैरे याणी कमाविसदारास जिवे मार्ले व घोडी वगैरे वेस्तभाव नेली ती माघारी देवावी म्हणौन.

शोध करून माघारी देविली जाईल.

सुलतानजी निंबालकर आपणासी मिलाले त्यास सुलतानजीस जाहगीर अंबड व बीड येथे आहे. कदाचित त्याचे भाऊ सिदोजी व कान्होजीराव त्यासी खटला करितील आणि शब्द आम्हावर येईल.

सुलतानजी आम्हांसी मिलाले तेव्हा त्याची रयायत[1] आम्हांसी लाजिम[2] आहे.

संभाजी राजे याजकडील कमावीसदारानी माहोली माहाली वसूल घेतला असेल तो आमचे हिसेबी न ल्याहावा आम्हाकडील कमावीसदारानी वसूल घेतला असेल तो मजुरा देऊं.

चौकसी करून शाहू राजे व संभाजी राजे याणी वसूल केला असेल तो मजुरा देऊन बाकी तहसील करावी.

वडगाव वगैरे सात गाव पा। गालणा येथील जमीदाराचे गुमस्ते मोगल

१ कीव, भीड.　२ योग्य.

चौकसी करून देविली जाईल.

पिलाजी जाधव व रगोजी जाधव याजकडे शाहागडची पाटीलकी आहे, त्यास तेथील जाहागिरदारास ताकीद करावी की पाटीलकीचा अमल चालवीत.

ताकीद केली जाईल.

तुरकताजखान याणी स्वराज्यात जाऊन बंद धरून आणिला आहे तो सोडऊन द्यावा. सोडून देविला जाईल.

तोकरे परगण्याचे सात गाव मजीठोके याचे देशमुखीचे आहेत त्याची सनद देवावी.

दफ्तरचा दाखला पाहून देविली जाईल.

मौजे मजकुरचे महसुलाची चौकसी करून रयात केली जाईल.

अलीखानाचे कैदेत आहेत ते सोडऊन द्यावे.

मोगल अलीखानास लेहून सोडविले जातील.

पा। कर्डेनिबोणे येथील पाच गांव कृष्णाजी पवार व उदाजी व केरोजी पवार यास इनाम द्यावे.

आमचे चाकर होतील तेव्हा त्यास दिल्हे जातील.

संभाजी राजे यास सुभे विज्यापूर पा। कृष्णा व पंचगंगेच्या पलीकडे प्रात येथील चौथ सरदेशमुखी आम्हीं दिल्हीं ते त्याणी घेत जावी. कृष्णेच्या अलिकडे उपद्रव न करावा.

मंजूर व स्वाद[1] (?) कबूल.

यो पाचा पत्रातील मंजकूर कलमबंदीने लिहिला आहे.

२ ज्यासुपारखानाची (?) पत्रे बाजीरायाचे नावे.

सोनगड तालुका आम्हाकडे आहे. नवाबानी व आपण तमाम मुलुखात वाजवी चौथ सरदेशमुखी मुकरर केली.

नवाबानी आपण स्नेह करून तमाम मुलुखात चौथ सरदेशमुखी मुकरर केली. त्यास आमचे जाहागिरीत चासकर उपद्रव करितात त्यास

१ (स्वत: ?)

आमचे तालुक्यास सयाजी चासकर जाजती उपद्रव करितात त्यास ताकीद करावी.

ताकीद की जाजती तगादा न करावा म्हणौन.

यो दोन पत्राचा मतालब लिहिला असे.

११ यादी बादशाहा व वजीर यांच्या दस्तकानसी कांही दस्तका सिवाय.

१ यादी मतलब धोंडो माहादेव याणी बादशाहा यासी लिहोन दिल्हे व वजीरानी दसखत केलें कलमे.

हिंदुस्थानात येक जागा वतनी द्यावी, मंजूर म्हणौन हुकुंम जाला.

मनसबा व जागीर आम्हांस द्यावी व समागमे लोकासहि द्यावी.

तुमच्या सांगितल्याप्रमाणे जाब त्याबा देऊ.

हुजुर आल्यावर दोन तीनदा खलबतीत बलाऊन जाबसाल श्रवण करावा.

तुमची योग्यता पाहून बादशा बलावतील.

भेट होई तों पावेतो इकडील फौजा मुलकात धांमधुम करतील त्याच्या ताकिदीविसीं हुजुरची फौज जावी.

मराठे याणी पहिल्या प्रो अमर्यादा केल्यास पारपत्य होईल.

दक्षणची सरदेशपांडगिरी आम्हांस द्यावी.

हुजुर येऊन कांही नजर दिल्यास सनदा देऊ.

हुजुर आलियावर खर्चास द्यावे.

जागिरीत आंमल होईतों पावेतो दिल्हे जाईल.

बादशाहाची भेट जाल्यावर कामाकाजाविसी चित पुरवावे. मुलाजमत जाल्यावर कामाकाजाविसी साहित्य केलें जाईल.

कोणी मातबर जाबसालाच्या मध्यस्ती आसावा.

हुजुरचा मातबर जाबसालाच्या मध्यस्तीस राहील.

कलमे ८ याद येक.

१ सदरहू यादीची नकल धोंडोपंत यांच्या मोहरेनसी धोंडोपंताची.

१ याद बाजीराव याची विनंती जे दोन कलमे लिहिली आहेत ती मान्य करावीं.

मालव्याची सुभेदारी व दरोबस्त सुभा बादशाही किले व जागीर व कदीम राजे व इनामदार व रोजीदार याखेरीज आंम्हास जागीर द्यावा.

मंजूर.

नगद खर्च प्रथम सालीं.

१ पिलाजी जाधव. हुजूर येऊन करारमदार केल्यावर च्यार लक्ष.

१ खरिफाचा मंवसम जाल्यावर पांच लक्ष.

१ रबीच्या हंगामावर च्यार लक्ष.

३

तेरा लक्ष रुा॓ खर्चास द्यावे.

मंजूर.

कलमे दोन या॓ याद येक.

१ याद दक्षणच्या सरदेशपांडगिरीस नजर द्यावी म्हणोन आज्ञा जाली त्यास सा लक्ष रुा॓ नजर मुकरर करावी; पैकी चौथाई नख्त व तीन हिसे किस्तबंदीने आंमल जाल्यावर दाखल करूं.

आज्ञा जाली की सनद दिल्यावर सा लक्षाचा चौथा वाटा व बाकी किस्तबंदी द्यावी.

१ याद बाबूराव याची; विज्ञापना कीं चिमाणाजीपंत बाजीराव यांचे भाऊ सरकार चाकरीत येकनिष्ट आहेत; व सरकार कामाविसी बाजीराव यासी बहुताप्रकारे समजावितात. सबब दोन लक्ष रुा॓ चिमाणाजीपंत यांस सरकारांतून रयात करावी.

पिलाजी जाधव हुजुर आल्यावर येक लक्ष.

मंजूर.

कौल करार जाल्यावर रबीच्या हंगामात येक लक्ष.

मंजूर.

दोन कलमे मिळोन येक यादी.

१ यादी बाजीराव पंत प्रधान यास खर्चाविसी आज्ञा जाहाली. त्यास उजनीस पावल्यावर अर्ध, व हुजूर पोहचल्यावर अर्धे करार पैा द्यावें. पाच लक्ष रुा मालव्यांत आल्यावर व भेट जाल्यावर पाच लक्ष व अखेर साली पाच लक्ष यो पधरा लक्ष रुा देऊ.

१ यादी राजे वतनदार मालव्यातील त्याणी बितपसील बाजीराव यास खर्चास द्यावे.

ओडशाचे राज्यापासून दोन लक्ष

भदावरकर राजा सवा दोन लक्ष

चांदेरीकरापासून पनास हजार

नरवरकरापासून तीस हजार

सिपरीकर पंचवीस हजार

रामपूरकर तीस हजार

अमझरेकरापासून पचवीस हजार.

कोटेकर राज्यापासून सवा दोन लक्ष

दतियाकर राज्यापासून येक लक्ष

खेचीकरापासून चालीस हजार

सोंधेकर तीस हजार

बुंदीकरापासून पंचवीस हजार

येक यादीचा अन्वय लिहिला.

१ यादी माहादेवपंत याची विज्ञापना की, बालाजीराव याची अर्जी आसंदयारखान याचे विद्यमाने दिल्ही, व बेलभडारहि दिल्हा ; व खान मजकूर याणी जान कुराण देऊन खातरजमा केली. यावर खान मजकूर जो आपला हुकूम पोह्चावतील त्या प्रमाणे बालाजीराव यास लिहून करविले जाईल. अंतर होणार नाही. हूकूम जाला की, आसंदयारखान सांगतील त्या प्रमाणे बालाजीराव यास लिहावे.

१ यादी बाजीराव पंतप्रधान याचे मतालबाची निजामनमुलूख यास लिहून दिल्ही.

चंदीचंदावरचे राज्य सिवाजी राज्यास होते. त्या प्रो शाहू राज्यास द्यावे.

पंत प्रधान यास कर्जाची ओढ जाली. त्यास खर्चाची मदत करावी.

खानदेश औरंगाबाद व विज्यापूर तिही सुभ्यापौ पनास लक्षाची जाहागीर पंत प्रधान यास द्यावी.

सरदेशपांडगिरी दक्षणची वतनी दर शेकडा रसूम[1] दर ५ करार करून द्यावा दक्षणचा बंदोबस्त राव पंत प्रा यांचे विद्यमाने करावा.

सिवनेरचा किला पंत प्रधानास द्यावा.

किती येक गाव इनाम करून द्यावे.

याचा जाबसाल जबानीने केला असे.

येक यादीचा अन्वय

१ यादी बाजीराव पंतप्रधान याणी बातशाहास लिहून दिल्हा. त्यातील मजकूर दक्षणची सुभेदारी बातशाहजाद्यास व साहा सुभ्या पैा पनास लक्षाची जाहागीर आम्हांस व जो खजिना दक्षणचा आमच्या कोसीस केल्याने हुजूर येईल; पैा अर्धा सरकारात व अर्धा आम्हास व सिवनेरचा किला व दक्षणची सरदेशपांडगिरी वतनी व कितियेक गांव मोकासी वतनी व चंदावरचे राज्य शाहू राजे यास कृपा करून द्यावे म्हणौन.

याचा जाबसाल जबानीने करून घेतला असे.

१ यादी बाजीराव पंत प्रधान याणी बातशाहास लिहून दिल्हे. त्याची कलमे बितपसीलवार.

१ सुभे मालवा दरोबस्त राज्याचे तालुक्यासहित आम्हांस जाहागीर व सुभेदारी आमचे नावे द्यावी.

ज्या प्रो पेशजी मुकरर जाले त्याप्रमाणें.

१ यार महमदखान व इजतखान यास काढून द्यावयाविसी सरकारातून कुमक व्हावी; व त्याच्या तालुक्याची जमीदारी आम्हास द्यावी.

जे समई तुमची फौज त्या जिल्ह्यात जाईल तेव्हा हुकूम केला जाईल.

---

१ फी, कर.

१ किले मांडवण व धार व रायसेन प्रांत माळवा कुटुंब ठेवावयासी पंत प्रधानास द्यावा.

हुजूर आल्यावर व तुम्हाकडून खातरजमा जाल्यावर येक किला देऊ.

१ चमलचे किनाऱ्यापावेतो जाहागीर राव पंतप्रधानास द्यावी. जे समई तिकडील राजे रुजू होऊन नजर देतील तेव्हा त्याच्या वतनी माहालास उपद्रव होणार नाहीं.

ज्याप्रो पेशजी ठरावात आले त्याप्रो उपद्रव न करावा.

१ राव पंतप्रधान यास कर्जदारीची वोढ बहुत, सबब पंनास लक्ष रुा तूर्त बंगाल्यावर देवावे.

ज्याप्रो पेशजी करार जाले असेल त्याप्रो.

१ प्रयाग, कासी व गया व मथुरा येथील राव पंत प्रधानास जाहागीर द्यावी.

दसक केले नाही.

१ आपण आगऱ्यास यावे व राव पंतप्रधान याची भेट अमीरखान व राजे जयसिग याचे विद्यमाने सरे (?) स्वारी व्हावी; व भेट जाल्यावर निरोपहि लौकर द्यावा.

हुजूर आल्यावर जे जेथे हुकूम होईल तेथे घ्यावी.

१ सरदेशपांडगिरी दक्षणची पंत प्रधान यास वतनी करून द्यावी.
दसकत केले नाही.

१ दक्षणेत कितीयेक राव पंतप्रधान यास इनाम देऊन सनदा करून द्याव्या. दसकत केले नाही.

९

येणे प्रमाणे यादीवर कलमे

११

१ निजामनमुलूख याचे पत्र अमलदाराचे नावे त्यातील मजकूर बाजीराव याणी सांगितले की, राजे शाहू याच्या तगीरीच्या दिवसात बहुत करून कमावीसदारानी चौथ सरदेशमुखीचा पैका घेऊन हिमाइतीने

लपून बसले आहेत. त्यास ताकीद व्हावी सबब हे पत्र सादर केले असे. तरी बाजीराव याजकडील लोक ज्यास दाखवितील त्यास ताकीद करून बाजीराव याजकडे रुजू होतसे करावे.

१ निजामनमुल्लूक यांचे पत्र नासरजंग यास की, वेरूलची पाटीलकी शाहू राजे यांजकडे आहे. ते सुरलीत चालवावी म्हणौन.

१ निजामनमुलूक याचे पत्र सेदजमालखान यैवजखान यांचे पुत्र याचे नावे कीं, साहा सुभे दक्षणची चौथ सरदेशमुखी पेशजी-प्रमाणे शाहू राजे यांजकडे जाहाली. त्यांस बाजीराव यांजकडील कमावीसदार चौथ सरदेशमुखीचा आंमल करावयास येतील. तुम्ही जमिदारास ताकीद करून आमल सुरलीत चालवणे म्हणौन.

तारीख साल नाहीं.

१ वजिराची आर्जी बादशाहास त्याची नकल: त्यातील मजकूर; पंधरा लक्ष रुा बालाजीराव पंतप्रधान यांस इनाम द्यावे म्हणौन करार जाहला आहे. त्यास कृपा करून त्यापैकी येक हिसा तूर्त, येक हिसा भेट जाल्यावर, व येक हिसा आखेर साली द्यावा.
यादीवर स्वाद दसखत केला.

१ याद करारनामा पंत प्रधान याणी लिहोन दिल्हा. त्यांतील मजकूर बी तपसील कलमे.

बादशाहाची भेट घेऊ कलम १

कोणी मऱ्हाठ्याची फौज नर्मदा उतरणार नाही. उतरला तर जिंमा आमचा असे. कलम १

जे रुपये सरकारातून आम्हांस इनाम दिल्हे त्यासिवाय साल दर साल न मागतां चाकरी करून. कलम

मालव्याखेरीज दुसऱ्या स्थलास उपद्रव करणार नाही

येक सरदार पांचशे स्वारानसी हुजूर चाकरीस राहील कलम १

हुजूरची फौज बाहेर निघाल्यावर च्यार हजार स्वारानसी चाकरी करू याखेरीज याखेरीज फौज हुजुरात पाहिजेसी असल्यास हुजूर बोलावावी व हुजुर राहे तो खुराक द्यावी. कलम १

चमलनंदीच्या तिकडील जमिदारास नजर पेशकशी सिवाये काही न मागू
कलम
१

जमिदार मुपसत याचे पारपत्यास हुजूरून हुकूम जाहल्यास च्यार हजार फौजेनिसी जाऊन पारपत्य करू
कलम
१

किलेदाराची जहागीर व मश्रुत व काजी व दुपती यास जमिनी इनाम व रोज हुजूरच्या फरमाणा ब मोजीव असतील त्या प्रो त्याजकडे चालवू; कोणेविशी उपद्रव करणार नाही.
कलम
१

येकूण कलमे आठ व याद १

¶*This is a long paper containing 25 Modi sheets. The top line describes it as a Marathi translation of Persian originals, which formed the correspondence of the Emperor of Delhi and his officers on the one hand, and Bajirao I and his son Nanasaheb on the other. The correspondence between these latter and Nizam-ul-mulk is also included in these papers. The papers generally prove how the two Peshwas gradually made their entry into Malwa and Bundelkhand and compelled the Emperor to accede to their terms. Similar terms were also exacted from the Nizam. The whole paper is helpful in determining the various transactions of Bajirao and his son, as it contains the gist of various older documents.*

87] [7-4-1736

श्री

छ ६ जिल्हेज

विनंती उपरी. वडिलास सेवकाने सेवेचे व मुलकाचे वर्तमान लिहिलें. त्यास उत्तर साफ लिहिले कीं पोट भरेना तर रेवामुकुंदपुरचे राज्य घेणे अगर देशास जाणे. त्यास खावंद दिलीचे दरवाजा जाऊन बैसले आहेत आणि आम्ही देशास जावे तर आमचा देशी कोणी धणी आहे ऐसे नाहीं. सेवकाचें सर्व आहे

---

* पुढील आठ पत्रें पुरवणी म्हणून दिलीं आहेत.

ते स्वामीचे पाय आहेत. वडिलांच्या चरणा खेरीज दुसरे दैवत आहे ऐसे नाहीं. आजिवर जाधवहटीमधे कालहरण केले. याउपरी जाधवहटीचे सरदेस व शहाबाजेचे सरईस व सोपारहि आठरा कोस आहे यामधे धंदेरियाचे गांव आहेत. विजेपूरचीहि सरद आहे. येथं कालहरणै होईल तेथवर करीत आहे. लस्कराचे धास्तीमुलें मुलुक उद्वस जाला आहे. लस्कराच्या आसपास पाणी बाराकोसी नाहीं. झाडखडीमधे राहिलो. चमेलीचे काठी ढोढलपूर व देवगीर उदगीर जाधवाचे गांव मवासी आहेत. चमेलीपार मुलुक उद्वस आहे. येथून कूच करावे तेव्हां ढोढलपुरावर राहावें ऐसें आहे. दिलीकडून यादगारखानहि येऊन दाखल जाले असतील. मनसबा होणे तो स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून होऊन येईल. सेवकासहि वृत ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. जखमेच्या हातास तिडीक लागली होती. ते आरोग्य जाली. सेवेसी कळावें म्हणून लिहिले आहे. सोपारचे कमावीसदारहि आले आहेत. लस्करासहि ताकीद केली आहे. याउपरी जे आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.+

¶*Baji Bhivrao to the Peshwa, communicating his own movements and doings in the Bundella country.*

88] [11-5-1737

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे सेवेसी

अपत्यें जनार्दनाने साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २१ मोहरम बुधवार वडिलांचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिलीं पत्र छ १८ मिनहू हुबकाचे मुकामीचे पाठविलें तें छ १९ रोजी घटका रात्रीस पावलें. लिहिला अभिप्राये सविस्तर कलला. त्यावरून काली छ २० रोजी कूच करून झासीनजीक मुकाम केला. आजी छ माारी तेथून कूच करून मौजे खमारी नजीक लोनेर उदगावा येथें मुकाम केला. वडिलांची आज्ञा कीं, सोनारी उजवी टाकून सिंद नदीवरी येणें, त्यास त्या मार्गे यावें तरी पाणी लस्करास मार्गी अगदीं नाहीं. लस्कर पाण्याकरितां हैरान होईल. लांब मजल करिता नये. म्हणून पाणी पाहून येक मजल आधिक करावी लागली. बुधवारीं नदीवर यावयास आज्ञेप्रमाणें यावयास गांठ पडिली नाहीं. गुरुवारी सिंद नदीवरी येतों.

+ पत्र बाजी भिवरावाचें.

वडिलांचे येणे नर्दावरी जाहालें असिलें तरी आपलेंच येणे येथें होईल किंवा आम्हीच तेथें यावें तें आज्ञा करून राऊत रातोरांत आम्हाकडे पाठविले पाहिजे. त्याप्रमाणें वर्तणून करून. शेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardan to Bajirao giving his programme of journey.*

89] [पौ 31-1-1737

श्री

छ १० सवाल.

विनंती उपरी. चंबेलीपलेकडे जाऊन मुलुकगिरी करावयाची राहिली आहे. त्यास आगरेसमीप स्वामीचे येणे त्या प्रांते होत आहे. वडिलानी मनसबा मातबर केला आहे. आम्हांस हस्तनापूर समीप आहे. राजकारणाचा विचार आहे. पाछाई रस्ता; आहिर्णीसी मोगली फौजा येत आहेत. मार्गी आगरेपरयेंत मुलकामधे टका मिलतो यैसे नाहीं. हा विचार स्वामीसहि श्रुत आहे आणि त्या प्रांताचे लोकहि सेवेसी आहेत. मुलकाचा विचार तो या प्रकारचा आहे. आम्हास तो त्या मुलकाखेरीज दुसरे स्तल राहिले नाहीं. गालेरीहून पश्चिमेस जावे तर मालवा लागला आहे. तीन मास कालक्षेप करावयाचे आहे. त्यास काये आज्ञा ते केली पाहिजे. येमुनेस उतार काळपीसमीप आहे, परंतु वैशाख आखेर होईल यैसे म्हणतात. तोपरयेंत आम्हांस धीर होतो यैसे नाहीं. नावा आहेत; त्यास, त्या काहीं त्याचे आज्ञेविना हातास येतात यैसे नाहीं. त्याची फौज आली तर सर्वहि वडिलाचे पुण्यप्रतापेकरून घडोन येईल. अम्ही मार्ग पाहात आहो. स्वामीनी लिहिले की गुंता उरकून सिध राहणें. त्यास आम्ही आज्ञेप्रा गुता उरकून सिध आहों. द्रव्याचा मुल्लक नव्हे. च्यार वरसे फौजेने चोलले व मोगलानीहि लुटले आहे. आम्ही कोणे प्रांते यावें, कोणे ठिकाणी राहावें हे आज्ञा केली पाहिजे. दिलीकडील वर्तमान लिहिणे म्हणून आज्ञा केली. त्यास आम्हांस स्तल समीप आहे. मयारामाकडे जोडे वरचेवर पाठवीत आहे. त्याकडील वर्तमानहि येत आहे. त्यास, तेथील विचार हाच की, मोगल तेव्हडे येकीकडे जाले आहेत. खानडौरा व जैसिंग येवडे स्वामीकडे आहेत. नवाब किलीजखान याचें जासूद आहिर्णिसी दिलीस जात आहेत. त्याचे आज्ञेमधे कमर्दीखान व तुरेबाजखान व सादतखान व आभेसिंग यैसे येक होऊन मनसबा वडिलानी योजिला आहे तो काहीं सेवटास जाऊ द्यावा यैसा त्याचा हेत आहे यैसे नाहीं. स्वामीनीहि केवल त्याच्या भरवश्यावर दिलीस जावे यैसें दिसोन येत नाहीं. स्वामी तों विवेकी आहेत.

मनसबा थोर आहे. स्वामीची फौज थोर आहे. परंतु दिलीमधे भारी आहे यैसे नाहीं. पूर्वी तीर्थस्वरूप कैलासवासी गेले होते त्यासमई सैद मातबर इमानी होते. मध्यस्त शंकराजीपंतहि होते. ते समई मोगल आगदी बुडाले होते. किलीजखान फकीर होऊन शहरी होते. या मनसबियास सर्व शाबूत फौजेनसी हवेलीमधे आहेत. स्वामीनी जो विचार करणे तो बहुत सावधपणें करणें. कोणाचा भरवसा धरून केला न पाहिजे. दिलीस सोरत जाली आहे की राव सेवामुले दर्शनास येत आहेत. मोगल बाईल देऊन काम करावे यैसे त्यांचा मनसबा आहे. जो मनसबा करणे तो दुरूनच करावा. केवल सनिधच जाऊन करावा यांतच कीर्ति आहे यैसे नाहीं. किलीजखान त्यांस वरचेवर शाहाणपणाचा विचार लिहित आहेत. दिलीतील ग्रहस्त त्याचे आज्ञे-खेरीज नाहीत. आम्ही लेकुरपणे लिहिले आहे. म्हणून रागास आले न पाहिजे. राणाजीस व जैसिंग यास टक्यामुले श्रमी केले न पाहिजे. थोर आहेत. हे विज्ञाप्त.

¶Baji Bhivrao requests the Peshwa to be very cautious in leading an attack on Delhi as all the Moghal sardars in the capital had already mustered their forces strong and made a common cause in order to present the Marathas a very strong opposition.

90] [पौ. *31-1-1737*

श्री

छ १० सवाल.

विनंती उपरी. वडिलाचे दयेकरून वोडसे व दतिये थोडेबहुत आधिक करून निमे वसूल पदरी पडला. बाकी राहिला तोहि अठा रोजानी पदरी पडेल. पार व दानवार व पछोर व पमइछा व शुकलारी व गुजरोला व उचाड यैसी खंडणी करून चुकविली. वसूलहि होत आला आहे. जाटवाडा आगदी झाडा जाला. नरवरचें वृत तर राजश्री जाधवराव याचा कमावीसदार आहे त्यास खंडणीचा मोकरार करून दिल्हा. वसुलास राऊत ठेविले आहेत. वसूल लस्कर मुकाम करून घ्यावा यैसी परगण्यामधें बाकी राहिली नाही. परगणा आगदी उद्वस आहे. वसूल होता होईल तो खरा. पाा गालेर येथे कोणी जमीदार आगर जागीरदार मातबर आहेत यैसे नाही. गाव जुजवी आहेत. काहीं वोस जाले. काही आहेत ते भेटले. परंतु द्रव्यास समध नाही. केवल परगणा भिकारी आहे. भदावरचे पाच आले होते त्याचा विचार मनास आणिला.

त्यास, त्याचे मतें च्यार वरसे घेत आलो आहे त्याप्रा येंदाहि चुकवावे. त्यास मागाहून दोनी सवस्तानें आधिकोतर केली आणि यास जेव्हां पूर्ववत केले म्हणजे मागील हसतील. याजकरिता त्यास आज्ञा दिल्ही. ते आपल्या राज्यास पुसावयास गेले आहेत. आम्हीहि मेढ्यास बैसलों आहों. मुलूक मातबर आहे. उद्वस करून नाश करितील यैसे दिसोन येत नाही. यामधे स्वामीचे पुण्य समर्थ आहे. तेहि चुकवितील यैसे आहे. येद्यपि मुलूक वोस केला तर आमची खंडणीपुरता वस्ता राहील यैसे आहे. आम्ही तो श्रम करावयास आंतर करितो यैसे नाही. राजश्री हिरदेशा व राजश्री जगतराज उभयेता राज्याकडून रा गोविंद बलाल आम्हाकडे आले होते. त्याचा विचार आहे कीं आपली फौज व आम्ही येकत्र होऊन मुल्लकगिरी करावी यैसा विचार त्यानी सांगितला; त्यावरून गोविंद बलाल फिरून त्याकडे पाठविले आहेत. ते फौज घेऊन आले तर मुलुकगिरी करावयास येमुनेआंलाकडे स्तल नाहीं. भदावरचा व हिरदेशाह्चा मुलूक येकत्र जाला आहे. दोनीच्या सरदेने जावे तेव्हा येमुनेस दाखल होवे, तर उभयेता राज्याचा सलूख; मुलकास उपद्रव देता येत नाहीं. भदावरची खंडणी जालियानंतर यासहि आजार लागू द्यावयास येत नाहीं. यैसे येऊन संकट पडले आहे. दोघाचे सरदेस मुलुक परकी असता तर च्यार दिवस कालक्रमणा करावयास येती. त्यास हिमतराव व क्रस्णासिंग आले तर त्याचे विचारें जे करणे तें करू. अडारूच्या राज्याचा लेक येमुनेआलाकडे आला आहे त्यासहि बोलाऊ गेले आहे. तोहि आला तर जो मनसबा होईल तो करीतच आहों. गुदस्ताप्रा मुलूक होतो तो चुकला. या उपरी मुल्लक राहिला नाहीं. दिवस तो तीन महिने राहिले आहेत. मुलाकात आन नाहीं. ज्यांस कौल दिल्हा त्यास लुटले म्हणजे बेकौल होईल. दुसरा देश तो राहिला नाहीं. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao writes to the Peshwa about the collection of tributes from the provinces of Jatwada, Narwar, Datia, Orchha, Gwalior and Bhadavar.*

91] *[1737*

श्री

विनंती उपरी. दिलीकडील व अमीराकडील वर्तमान येत जाईल तें लिहीत जाणें, म्हणून आज्ञा तरी दिलीस मयाराम याजकडे मुजरद कासीद जोडी पाठविली होती. त्यास तेथील वर्तमान यैसें आहे जें कमरुदीखान व सादतखान व तुरेबाजखान व अभेसिंग याचा येक विचार आहे, कीं पादशाहाचें व स्वामीचें सल्यत्व जालें तर हा मनसबा येकंदर होऊं देउं नये. हा मतलब त्या चतुर्वेर्गाचा

आहे. खान डौरा व राजश्री सवाई जयेसिंग यांचा येक विचार कीं स्वामीचें व पादशाहाचें * * * दावेंयांत उत्तम आहे यैसा तेथील * * * ग जाहला आहे. स्वामीकडेंहि वर्तमान * * * * तदनुरूप जो विचार कर्तव्य तो स्वामी * * * करतील. वरकड कितेक दिलीचें वर्तमान * * * विदित व्हावें याकरितां तेथून पारसी * * * त्याची नकल बजिनस पाठविली आहे. * * * विदित होईल. सारांस जें होणें तें स्वा(मीचें) पुण्यप्रभावें होईल. लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंति.

¶*A news-letter from the North referring to a compromise between the Emperor and the Peshwa which Kamrudikhan, Sadatkhan and Abhesing did not wish to have effected.*

92] [*1737 ?*

श्री

विनंती उपरी. आपण रा. सदोबा बराबरी सांगोन पाठविले जे, खानाचा आजी मुकाम होतो. नवाबाचा हुकुम किल्यावर दाणा चढवावयाचे आला, त्यावरून कारितात, तरी माघारे येणे. त्यास रात्री कुचाचा निश्चय जाहाला त्यास घाटाचे आडचणीमुळे पहाटेच कुच करून पुढे आलो. मोगलाचा मुकाम तेथें होईल तरी त्यास सांगोन कुच करून आपणाजवल आणवावे. येथून किलाहि जवल पडतो. दाणा जलद पोंहचेल ऐसे सांगोन राऊत बा द्यावे. सादतखान जातील त्यास मागे टाकून आपण पुढे राहवेसे नाही. दाणादुणा कुणबियाचा जाहला नाही, दिसगत लागेल. येथे वैरण काडीहि नाही. याकरितां घाटावरी आणवावे ते मागे राहून कुणब्यास दबाऊन आटकारीतील. आपणाजवल राहिल्यास उत्तम आहे: वाघ दरवेसियाजवली आणून हाती घालून मारून टाकावा. हात्ती सेर होतील. हातीचा वैदनक्ष[1] होतो तरी त्यास अणला असेल तर उत्तम. नसेल तर आणविला पाहिजे हे विनंती.

¶*Letter to Bajirao in his northern expedition against Sadatkhan. The writer advises certain movements in view of the Nizam's halt.*

---

१ दुलौकिक.

93] [13-1-1739

श्री

विनती उपरी. पूर्वी अयकिले वर्तमान ते लिहिलें होते. परंतु राजश्री आवजी कवडें याचे वर्तमान साध्यात नव्हत. साप्रत वर्तमान नवाबाचे येथे आलें की नरसी प्राती सुखरुप आहेत. जमाळुदिखा ताकुबास गेले होतें ते घामपूरावर उतरले आहेत. राजश्री पंतप्रधानं दतियापावेतो गेले. तेथेच मुकाम आहेत. प्रुथवीपतीचा फर्मान नवाबास आला तो छ १३ सवाली फर्मानबाडीस जाऊन घेतला. तेथे लिहिले आहें मी आपलें कूच केलच आहें * * * * हे सादतखा कालपीपासी येमुनातीरी आहेत. तोहूखान यैलतीरी उतरला. म्हणोन वर्तमान आले. आवघे आपलाले जागा खुशाल आहेत. राजश्री रावहि शंतोशरूप आहेत. कळल पाहिजे. राजश्री रावरंभाजी निंबालकर याचे पुत्र राजश्री जाणबा व माहादोबा व जानबाची धाकटी मुले कुली अली. नवाबाचे आज्ञेने जैनाबादेपासी तापीतीरी डेरा देहून राहिले. नवाब त्याचे डेरियास जाऊन फार समाधान व आदरमान कृपाउतर केली यैसी मागे कोन्हे मऱ्हाटियावर केली नसल. त्यावर हे नवाबाचे दरबारास चौथे दिवसी आले. नजर न्याज जाली. नौबतीचा हुकूम नवाबाही दिल्हा, यैसी कृपा बहुता प्रकारें केली. वरकड देणे घेणे अद्याप काही नाही. राजश्री रघूजी भोसले व लक्ष्मण खंडागले यानी नागपूर देवगड प्रांतीचें मारिलें म्हणोन वर्तमान आहे. कळल पाहिंजे. रायाचे वर्तमान तर नवाबास बहूत समाधान लिहिलें आहें. कमरुदीखानाचें व बगस कूच करून येणार. धेकडसिंग सादतखान आलीकडे उतरले यानीं मदसोरपरयेंत मार्ग सोडविला आहे. दिलीपतीनी राा रायास जवाहीर पत्रें पाठविली म्हणून वर्तमान आहें. यानी पहिलें दूर ओलंपाच हजार स्वार ठेविले. आणीक नवे च्यार पाचपरयेत ठेविले. कमरुदीखान निघाले हे वर्तमान येताच साहेबी नर्मदातीर जाणार आहे. राा चद्रसेन जाधवराऊ वेथे-मुले घरी राहून पुत्र व मलारराऊ पाठविलें ते आले यैसे वर्तमान आहे बहुत काये लिहिणे. त्याचे पत्र राा माध्दाजीपंताजवल पाठवणे. बातमीजोडे नाहीत याकरिता लागेर भोईनदार *

¶*The letter gives news from various quarters, e.g., Awaji Kavade being safe at Nadasi, the Peshwa having marched as far as Datia, the Nizam receiving a firman from the Emperor, the Nimbalkers having encamped on the Tapti and Raghuji Bhonsle creating troubles round about Nagpur and Chandagad.*

1388

94] [19-12-1739

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद सुा आर्बैन मया अलफ. तुमचे पत्र आजी बुधवारी पावले. लिहिले वर्तमान कललें. येसियास तुम्हास अनकूल पडेल आणि पुढे आलेस तरी येणे. चिरंजीव राजश्री आपासमागमे याचे असेल तरी त्यासमागमे येणे. आमचा मुकाम नजीक नगर आहे. तरी तुम्ही दोहीतून अनकूल पडेल तैसे येऊन सामील होणे. जाणिजे. चिरंजीव राजश्री आपाचें पत्र पाठविले तेहि पावले. जाणिजे छ २८ रमजान. बहुत काये लिहिणे ?

लेखन सीमा.

¶*Pilaji Jadhav is asked by the Peshwa to join him at his earliest convenience. Bajirao is encamped near Nagar.*

BAJIRAO'S ADVANCE UPON DELHI
1737-38

